मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळीची पुस्तकमाला.
पुस्तक ८३ वें.

पौर्णिमेचा चंद्र !

श्रीयुत प्रभातकुमार मुकर्जी, बी. ए., बार-ॲट-लॉ,
यांच्या ' रत्नदीप ' या कादंबरीच्या आधारें
श्रीयुत **विठ्ठल सीताराम गुर्जर** यांनीं लिहिली.

"अहमिह स्थितवत्यपि तावकी
त्वमपि तत्र वसन्नपि मामकः ।
न तनुसंगम एव सुसंगमः
हृदयसंगम एव सुसंगमः ॥"

प्रकाशक
मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी, गिरगांव, मुंबई.

[...न १९२०]

[किं. २-०-०.

Printed and published by K. R. Mitra, at the Manoranjan Press,
3 Sandhurst Road, Girgaon; Bombay.

प्रस्तावना.

प्रस्तुत कादंबरी श्रीयुत प्रभातकुमार मुकर्जी, बी. ए., बार-ॲट-लॉ यांच्या 'रत्नदीप' नांवाच्या कादंबरीच्या कथानकाच्या आधारें विस्तृतपणें लिहिली आहे. 'मानसी' नामक श्रेष्ठ वंग मासिकांतून 'रत्नदीप' ही कादंबरी क्रमशः प्रसिद्ध होत असतां, केवळ या कादंबरीच्या हृदयंगमतेमुळें त्या मासिकाचे वर्गणीदार अतिशय थोड्या मुदतींत दुप्पट झाले, हा या कादंबरीसंबंधानें सांगण्यासारखा विशेष होय. तिचें प्रस्तुत महाराष्ट्र-रूपान्तरहि तसेंच लोकप्रिय होईल, असा भरंवसा वाटतो.

आपल्या कादंबरीचा उपयोग करण्याची उदार अंतःकरणानें परवानगी दिल्याबद्दल श्री बॅरिस्टरसाहेबांचा अत्यन्त आभारी आहें.

मुंबई,
ता. १५ मे १९२०.

वि. सी. गुर्जर.

अनुक्रमणिका.

खंड पहिलें.

खंड दुसरें.

खंड तिसरें.

खंड चौथें.

खंड पांचवें.

पौर्णिमेचा चंद्र !

खंड पहिलें.

प्रकरण पहिलें.

बायकोला आणायला !

बुधवारचा दिवस: दुपारची तीन साडेतीन वाजण्याची वेळ. जी. आय्. पी. रेल्वेच्या ‘ दुधई ’ स्टेशनावरील आपल्या ‘ मकाणां’त स्टेशनचे ‘ असिस्टंट मास्टर ’ गणपतराव देशपांडे हे आपल्या कामांत अगदीं गढून गेले होते. ‘ आपल्या कामांत ’ या शब्दांवरून ते स्टेशनवरील आपल्या ‘ ड्यूटीं’त निमग्न होऊन गेले होते, असा वाचकांचा समज झाला असला तर तो अगदीं चुकीचा आहे. गणपतराव आपली प्रवासाची तयारी करण्यांत गढून गेले होते. त्यांच्यासमोर एक लहानशी पत्र्याची ‘ ट्रंक’ असून तींत ते आपलीं धोतरें वगैरे दोन दिवसांच्या जुजबी प्रवासाला लागणारे जिन्नस नीट व्यवस्थेनें भरून ठेवण्यांत निमग्न होऊन गेले होते. त्यांच्या मुद्रेवर कांहीं चिंता व कांहीं आनंद अशा विकारांची मिश्र छटा दिसून येत होती.

भुसावळपासून जबलपूरकडे जी. आय्. पी. रेल्वेचा जो फांटा गेला आहे, त्यावरील ‘ दुधई ’ नांवाच्या एका लहानशा स्टेशनावर गणपतराव हे दुय्यम स्टेशनमास्तर होते. गणपतराव हे नाशिक जिल्ह्यांत बिंबवली नांवाचें एक लहानसें खेडेगांव आहे, तेथले रहाणारे. ते अगदीं तरुण असून त्यांचें वय कांहीं तीसएकतीस वर्षांपेक्षां अधिक नव्हतें. रंगानें ते साधारण काळ्यासावळ्या मंडळींतच जमा होण्यासारखे होते; परंतु त्यांचा सावळेपणा चांगला उजळ होता. रूपानेंहि आमच्या गणपतरावजींची चांगल्या सुंदर पुरुषांत गणना होण्यासारखी होती. ते फार उंच नव्हते, त्याप्रमाणेंच ठेंगूहि नव्हते. त्यांच्या शरीराची काठी मध्यम उंचीची असून त्यांचा बांधा चांगला नीटनेटका, गोंडस आणि कोणाच्याहि सहज मनांत भरण्यासारखा होता. त्यांचे डोळे तेजःपुंज असून नाक तरतरीत होतें. कपाळपट्टीहि चांगली रुंद होती. सारांश, आमचे गणपतराव जरी जी. आय्. पी. च्या पदरीं एका भिकार नोकरीवर रखडत असले, तरी त्यांची ईश्वरदत्त रूपसंपत्ति चांगल्यापैकीं होती.

ईश्वराच्या घरचा नियम कसा आहे कोणाला ठाऊक ! पण जेथें रूपसंपत्तीची समृद्धि, तेथें बुद्धिसंपत्तीचा कमीपणा, असें बऱ्याच उदाहरणांमध्यें दिसून येतें, यांत कांहीं शंका नाहीं. या नियमाला आमचे गणपतरावजीहि कांहीं अपवाद नव्हते. त्यांची बुद्धि आपली बेतास बातच होती. निदान, विद्यार्जनाच्या बाबतींत तरी ती बिलकूल चमकली नाहीं; इतकेंच नव्हे, तर ती निवत निवतच गेली, असें म्हटलें तरी चालण्यासारखें आहे. मुंबई विश्वविद्यालयाच्या प्रवेशपरीक्षेच्या गणपतरावांनीं एकंदर तीन वेळ कीं चार वेळ वाऱ्या केल्या. खरोखर लोक विश्वविद्यालयाला ‘ माता ’ या नांवानें उगीच संबोधितात ! आपल्या अनेक संतानांनां, तीं वारंवार तिच्या चरणांशीं लोळण घेत असूनहि, ती लाथेनें दूर झुगारून देते ! तिचें हृदय एकाद्या शत्रूच्या हृदयापेक्षांहि क्रूर असतें ! आमच्या गणपतरावांशीं या ‘आल्मा मॅटर’नें असाच अत्यंत निष्ठुरपणाचा व्यवहार केला. जितक्या वेळां ते तिच्या दाराशीं आले, तितक्या वेळां निष्ठुर हृदयानें तिनें त्यांनां झिडकारून दूर लोटून दिलें.

मॅट्रिक्युलेशन परीक्षेंत तीनचार वेळ अपयश आल्यामुळें गणपतरावांची अर्थात्च अत्यंत निराशा झाली. विश्वविद्यालयाचें प्रवेशद्वार हें अत्यंत कठिण अशा दगडांचें बनविलेलें आहे, यांत संशय नाहीं. या दरवाज्यावर आजपर्यंत कितीतरी विद्यार्थ्यांचीं डोकीं आपटून रक्तबंबाळ झालीं असतील ! अविचारानें एकाद्या दगडाशीं धडक घेतली, कीं, डोकें फुटावयाचेंच ! यांत आश्चर्य तें काय ? विद्यार्थिदशेंत विद्यार्थी आपल्या पुढील आयुःक्रमासंबंधानें केवढे मोठमोठाले बेत रचीत असतात ! केवढे उंचउंच मनोरथ तयार करतात ! पोकळ हवेंत केवढाल्या उंचउंच हवेल्या

भारीत असतात ! परंतु या दगडी प्रवेशद्वारावर त्या सगळ्या हवेल्यांचा आणि मनोरथांचा चक्काचूर होतो, आणि बऱ्याचशा विद्यार्थ्यांचीं डोकीं ठिकाणावर येऊन त्यांनां आपली खरीखुरी योग्यता कळूं लागते. आमचे गणपतरावजीहि विद्यार्थिदशेंत आपल्या भावी स्थितीविषयीं मोठमोठ्या हवेल्या हवेंत रचीत असत; परंतु युनिव्हर्सिटीच्या प्रवेशद्वाराशीं दोनतीनदां जबरदस्त थडका मिळतांच त्यांचें डोकें ताबडतोब ठिकाणावर आलें, व आपण कोण, आपली वास्तविक योग्यता काय, हें त्यांनां नीट कळून चुकलें.

परीक्षेंत आपणाला यश येणें बहुतेक अशक्य आहे, अशी मनाची खात्री झाल्यावर भावी परिस्थितीविषयींच्या मोठमोठ्या कल्पनांनां व आशांनां रजा देऊन गणपतरावांनीं शेवटीं कंटाळून युनिव्हर्सिटीचा नाद सोडला, आणि ते नोकरीकडे वळले; परंतु याहि बाबतींत त्यांनां लवकर यश आलें असें नाहीं. या अहमहमिकेच्या व तीव्र चढाओढीच्या काळांत यःकश्चित् सामान्य नोकरी मिळवायालाहि अतिशय कष्ट पडतात, वारंवार तीव्र निराशेचे प्रसंग येतात, मानहानीचे कटुप्रहार सोसावे लागतात, असाच त्यांनां अनुभव आला; परंतु निराश होऊन त्यांनीं जसा युनिव्हर्सिटीचा नाद सोडला, तसा नोकरीचा नाद सोडून गणपतरावांचें बिलकूल भागण्यासारखें नव्हतें. त्यामुळें परिस्थितीचे धक्के खात त्यांनां त्या नादांत बरेच दिवस रहावें लागलें. अर्जावर अर्ज करण्यांत गणपतरावांनां कागदांचीं रिमेंच्यारिमें नासावीं लागलीं; उत्तरासाठीं पोस्टाचीं तिकिटें अर्जांबरोबर धाडण्यांत त्यांचे रुपयांचे रुपये खर्च होऊं लागले; अर्जांचीं उत्तरें आणणाऱ्या पोस्टमनची वाट पहाण्यांत त्यांचे तासच्या तास जाऊं लागले; ‘ देएंगे दिलाएंगे ’ करणाऱ्या अनेक ‘कंदीलवाल्या जॅक भुतां’(Jack-o-Lantern) च्या मागें त्यांनां धांवावें लागलें ! शेंकडों प्रसंगीं तीव्र निराशा झाली ह्मणजे ‘नको हा जीव’ असें गणपतरावांनां होऊन जाई; परंतु लवकरच परिस्थिति त्यांनां नीट शुद्धीवर आणी, आणि ते पुनः नोकरीच्या प्रयत्नाला लागत. शेवटीं, अनेक प्रयत्नांनीं, मोठ्या कष्टांनीं सर्वांचें मायपोट अशी जी. आय्. पी. रेल्वेमाता तिला आमच्या गणपतरावांची दया येऊन त्यांनां तिनें आपल्या पोटांत घेतलें. लायनीवरची कष्टदायक अशी नोकरी गणपतरावजींनां मिळून एकदांचे गंगेंत घोडे न्हाले ! गणपतरावांनां नोकरीवर रुजू होऊन आज सहासात वर्षें झालीं होतीं, परंतु रेल्वेमाता कांहीं त्यांच्यावर अजून फारशी प्रसन्न झाली नव्हती. गणपतराव पहिल्यानें पंधरा रुपये दरमहावर रुजू झाले, ते वाढत वाढत या सात वर्षांत पंचवीसांपर्यंत येऊन थडकले होते. लाइनीवरची नोकरी असल्यामुळें, या पंचविशीच्या ‘वरची’ प्राप्ति गणपतरावजींनां दरमहा अगदींच कांहीं होत नसे, असें शपथेवर सांगावयाला निदान आमची लेखणी तरी तयार होत नाहीं.

गणपतरावांच्या नोकरीच्या चिकाटीच्या प्रयत्नांविषयीं आम्हीं जें वर वर्णन केलें आहे त्यावरून, त्यांच्या घरची स्थिति चांगलीशी नव्हती—नव्हे, अगदीं गरिबीची होती, असें निराळें वर्णन करावयाची कांहीं जरूरी नाहीं. त्यांचे वडील सदाशिवराव हे बिंबवलीच्या मराठी शाळेवर ‘हेड मास्तर ’ असून त्यांनां शेवटीं शेवटीं दरमहा अठरा रुपये पगार देण्याची सरकारच्या विद्याखात्यानें उदारपणानें मेहेरबानी केली होती. या ‘मास्तरकी’च्या उत्पन्नावर व गांवांत त्यांची अगदींच थोडी शेतजमीन होती, तिच्या उत्पन्नावर सदाशिवरावांचा संसार कसातरी खुरडत चालत असे इतकेंच. गणपति जेव्हां पांच कीं सहा वर्षांचा झाला, त्या वेळीं सदाशिवरावांनां अर्धांगाचा झटका आला; कांहीं दिवस त्या दुखण्यांत खितपत पडल्यानंतर वर्षानें कीं सव्वा वर्षानें, डॉक्टरवैद्यांच्या प्रयत्नांनां न जुमानतां त्या दुखण्यानें शेवटीं सदाशिवरावांचा बळी घेतला !

अगोदरच अशी हात धुऊन पाठीस लागलेली गरीबी आणि त्यांत घरच्या कर्त्यासवरत्या मुख्य आधारस्तंभ पुरुषाचा मृत्यू ! सदाशिवरावांच्या मृत्यूनें त्यांच्या संसाराची अगदीं वाताहातच होऊन गेली ! त्यांच्या मागें उमाकाकूंचा संसार अगदींच उघडा पडला; परंतु उमाकाकू भारीच धीराची बायको. पतीच्या मृत्यूच्या वज्राघाताचा दारुण प्रहार मस्तकावर सहन करून उमाकाकूंनीं तिळमात्रहि धीर सोडला नाहीं, आणि संसाराचा चालता गाडाहि अडूं दिला नाहीं.

परंतु बलवान् दैवापुढें दुर्बल माणसाचें काय चालतें ! बिचाऱ्या उमाकाकूंवर दैवाची पुरीच वक्रदृष्टि होती, असेंच ह्मटलें पाहिजे. कारण, पतीच्या मृत्यूला दोन वर्षें कशींबशीं लोटून संसाराचा गाडा आपटत धोपटत चालला असतां उमाकाकूंचा धाकटा मुलगा वामन

हाहि चांगल्या धडधाकट स्थितींत, पहातां पहातां, विषमज्वराचें निमित्त होऊन वारला, व उमाकाकूंच्या मस्तकावर सारें ब्रह्मांडच हादरून कोसळलें! परंतु खरेंच भारी धीराची बायको ती! उमाकाकूंच्या जागीं एकादी कमी धीराची बायको असती, तर अशासारख्या एकावर एक ताण करणाऱ्या भयंकर दुर्दैवाच्या प्रहारांनीं जागच्याजागीं चीतच झाली असती; परंतु उमाकाकूंनीं याहि प्रसंगाला तोंड देऊन त्यांतूनहि त्यांनीं वर मान केली, व पुनः संसाराचा गाडा धीरानें, धोरणानें आणि शहाणपणानें त्या हांकूं लागल्या. आतां त्यांचा सारा भरंवसा काय तो त्यांचा थोरला मुलगा गणपति याच्यावर होता. तो ईश्वरकृपेनें निर्विघ्नपणें मोठा होईल, चांगला सुशिक्षणसंपन्न होईल, रगड्डन पैसे मिळवील, आपल्या आईबापांचें नांव काढील, आणि म्हातारपणीं आपले डोळे निववील, याच आशेवर आतां म्हातारी जीव धरून राहिली होती. तिच्या आशेचे अंकुर चांगले धरतील व पोसतील, अशाच तऱ्हेचा गणपति हाहि मुलगा होता. आपल्या पोटाला चिमटा घेऊन, शेजाऱ्यापाजाऱ्यांचें साहाय्य मिळवून, गांवांतील उदार श्रीमंत मंडळीकडून पाट्या, पेन्सीली, पुस्तकें, फीचे पैसे वगैरे मदत मिळवून उमाकाकू गणपतीला शिक्षण देत लहानाचा मोठा करूं लागल्या.

गांवांतल्या गांवांत गणपतीचें मराठी चार इयत्तांचें शिक्षण पुरें झाल्यावर शेजारच्या गांवीं इंग्रजी तीन इयत्तांपर्यंतची एक शाळा एका 'बी. ए. फेल' गृहस्थानें काढली होती, तींत तो जाऊं लागला. लहान नाजूक मूल तें! रोजच्यारोज मैल दीड मैल चालून जेवून जावयाला गणपति कंटाळत असे. 'आज मी शाळेंत जातच नाहीं,' असा मधुनमधून तो हट्ट धरून बसे; परंतु उमाबाईनीं कांहीं केल्या त्याचा तो हट्ट पुरा केला नाहीं. पुढील परिणामावर लक्ष्य देऊन, मारून पिट्टून त्या त्याला शाळेला घालवीत. ऊन असो पाऊस असो, थंडी असो वारा असो, उमाकाकू मुलाला वेळेवर जेवावयाला घालून त्याला शाळेला या पाठवावयाच्याच. त्यांनीं त्याची कधींहि गय केली नाहीं. इतर बाबतींत, गरीबीच्या संसारांत, त्या शक्य तितके व शक्य त्या तऱ्हेनें गणूचे लाड पुरवीत; परंतु विद्येच्या बाबतींत गणूचे भलतेच लाड त्यांनीं कधीं चालू दिले नाहींत. शाळेच्या शिक्षणाबरोबर गणपतीला उमाकाकूंकडून उत्तम गृहशिक्षणहि मिळत होतें. उमाकाकू सरळ, सद्गुणी, संकटाला कधींहि न डगमगणारी बायको होती आणि आपले हे गुण आपल्या मुलामध्येंहि पूर्णपणें उतरावे, या इच्छेनें ती गणपतीला कधीं उपदेशानें तर कधीं उदाहरणद्वारा, तसें शिक्षण देत असे.

तीन वर्षांत गणपतीच्या इंग्रजी पहिल्या तीन इयत्ता चांगल्या रीतीनें तयार झाल्या; इतकेंच नाहीं, तर इंग्रजी तिसऱ्या इयत्तेच्या चढाओढीच्या परीक्षेमध्यें साऱ्या तालुक्यामध्यें त्याचा पहिला नंबर येऊन त्याला चार रुपयांची शिष्यवृत्तिहि मिळाली. या प्रसंगीं त्याच्या वृद्ध मातेच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले! मुलगा आपल्या अटकळीप्रमाणें बरा निपजत आहे, देवाची दया असली तर लवकरच तो आपले पांग फेडल्याखेरीज राहाणार नाहीं, असें वाटून कृतज्ञ हृदयानें म्हातारीनें परमेश्वराचे उपकार मानले.

गणूचें तीन इयत्तांपर्यंत शिक्षण तर कसेंवसें निभावलें; परंतु आतां पुढें कसें करावयाचें, हा उमाकाकूंना मोठा प्रश्न पडला. पुढल्या शिक्षणासाठीं त्याला कोठें तरी ठेवावयालाच पाहिजे होतें. आजपर्यंतची गोष्ट अगदीं निराळी होती. आजपर्यंत मुलगा प्रत्यक्ष उमाकाकूंच्या नजरेखालीं होता; त्याच्या शिक्षणावर प्रत्यक्ष जरी नाहीं, तरी अप्रत्यक्ष रीतीनें त्यांनां नजर ठेवतां येत होती. त्याची चालचलणूक कशी आहे, त्याचें नैतिक आचरण बिघडतें आहे कीं काय, वाईटसाईट खोड्या त्याला लागत आहेत कीं काय, त्याला अनिष्ट अशी कुसंगति जडत आहे कीं काय इत्यादि गोष्टींवर त्यांनां प्रत्यक्ष नजर राखतां येऊन उपदेशादि द्वारें त्याच्या कोंवळ्या ग्राहक बुद्धीच्या ठिकाणीं सद्गुणांचे अंकुर जोमदार रीतीनें मुळें धरतील अशी व्यवस्था त्यांनां आजवर उत्कृष्ट रीतीनें करतां येत होती. गरीबींतच कां होत ना, आपल्या अल्पशक्तीप्रमाणें जेवण्याखाण्यांत व इतर बाबतींतहि मुलाचे लाड व कोडकौतुक त्यांनां पुरवितां येत होतें. मुलाला आपल्या गरीबीची किंवा परवशतेची अल्पहि जाणीव न होईल, अशा रीतीनें उमाकाकूंनां त्याला अल्प परिश्रमानें वागवितां येत होतें; परंतु आतां पुढील शिक्षणासाठीं गणूला कोठें तरी अगदीं परक्या ठिकाणीं पाठवावा लागणार होता. तेथें कोणत्याच प्रकारानें त्याच्यावर त्यांनां प्रत्यक्ष रीतीनें दाब ठेवतां येण्यासारखा नव्हता. सर्व तऱ्हेनें त्याची आबाळ होण्याचा संभव होता. गरीब, परोपजीवी म्हणून वारंवार त्याची मानखंडना होण्यासारखी होती. शहरातील

वाईट संवई आणि कुसंगति त्याला जडण्याचा संभव होता; परंतु मुलाच्या पुढील शिक्षणासाठीं या साऱ्या तोट्यांकडे दुर्लक्ष्य करणें उमाकाकूंनां भाग होतें, आणि त्यांनीं तसें केलेंहि. उमाकाकूंचा भाऊ नाशिकास एका श्रीमन्त सावकाराच्या पेढीवर मुनीम होता. बहीण जाऊन हातांपायां पडल्यावर भावानें तिच्या मुलाला शिक्षणासाठीं आपल्या घरीं ठेवण्याचें कबूल केलें, व अशा रीतीनें उमाकाकूंची काळजी तूर्तातूर्त कशी तरी मिटली. एक दोन दिवसांतच गणू नाशिकला जाऊन मामांच्या घरीं दाखल झाला. नाशिकच्या हायस्कूल-मध्यें चवथ्या इयत्तेंत त्याचें नांवहि दाखल झालें.

मामांच्या घरीं टक्केटोणपे खात, गणू एकएक इयत्ता पुढेंपुढें जाऊं लागला. मामा स्वभावानें साधारण बरे होते; परंतु मामी तशा नव्हत्या. त्या भारी खाष्ट असल्यामुळें त्यांच्यापासून गणूला भारी त्रास होई, व अभ्यासा-लाहि कमीअधिक व्यत्यय आल्यावांचून रहात नसे. सुटीमध्यें गणू घरीं गेला, ह्मणजे या साऱ्या तक्रारी तो आईसमोर मांडी, आणि त्यांपासून आपली मुक्तता करण्याविषयीं तिची परोपरीनें विनवणी करी; परंतु उमाकाकूंनां त्या सर्व तक्रारींकडे अर्थात्च डोळेझांक करावी लागे. कधीं बाबापुता करून, कधीं आंजारून गोंजारून, कधीं प्रेमानें जवळ घेऊन, कधीं मृदु शब्दांनीं त्याची कानउघडणी करून उमाकाकू मुलाची समजूत घालीत, व पुढील परिणामांवर लक्ष्य देऊन, या साऱ्या त्रासांकडे दुर्लक्ष्य करून झटून अभ्यास करण्याविषयीं त्याला प्रेमानें व अत्यंत कळकळीनें उपदेश करीत. गणू सुटीनंतर नाशिकाला मामांकडे येई तो आईच्या उपदेशामृतानें ताजातवाना होऊन येई. मामींची त्याला मग फारशी भीति वाटत नसे. आपल्या प्रेमळ मातेच्या उपदेशाकडे लक्ष्य देऊन तो मामींच्या त्रासाकडे दुर्लक्ष्य करीत असे, व आपलें सारें लक्ष्य अभ्यासाकडे लावी.

गणूची बुद्धि फारशी तरतरीत नव्हती. बुद्धीनें तो अगदीं सामान्य मुलगा होता. आईची टोंचणी मागें होती, ह्मणूनच तो येथपर्यंत तरी आला. तो कधीं परी-क्षेंत पास होऊन वर चढे, कधीं नापास होऊन जेथल्या तेथें खडके. तो नापास झाला ह्मणजे उमाकाकूंनां भारी वाईट वाटे; परंतु त्यांनीं वेडेंवांकडें बोलून मुलाच्या अंतःकरणाला कधीं घरें पाडलीं नाहींत, किंवा पुढील आयुःक्रमासंबंधीं त्याला त्यांनीं कधीं निराशहि केलें नाहीं. अशा रीतीनें चढतपडत गणपति एकदांचा कॅंडिडेटक्लासपर्यंत तर येऊन थडकला.

मॅट्रिक्युलेशनच्या वर्गांत आल्यावरोबर गणपतीच्या आयुष्यांत एक अत्यंत महत्त्वाचें स्थित्यन्तर घडून आलें. उमाकाकूंनीं त्याला 'चतुर्भुज' करून टाकलें, व त्या खरोखरींच अगदीं कृतकृत्य झाल्या. चिंचवली-पासून अडीचतीन कोशांवर चांदगांव ह्मणून एक चांगला संपन्न गांव आहे, तेथील एका गृहस्थानें आपली उपवर मुलगी पदरांत घेण्याविषयीं उमाकाकूंनां विनंति केली. मुलगा रंगारूपानें उत्तम आहे, चांगला शिकतो आहे, घरची गरीबी असल्यामुळें आपली कन्यादायांतून साधारण विनत्रासानें व कष्टावांचून सुटका होईल, असा विचार मनांत आणून स्वारीनें उमाकाकूंच्या दाराशीं धरणें धरलें. उमाकाकू काय विचाऱ्या! आधींच दुःखांनीं त्या पोळून निघाल्या होत्या. गरिबीमुळें हे दिवस येतील, अशी त्यांनां कल्पनाहि नव्हती. त्या गृहस्थाच्या या प्रस्तावानें त्यांनां आनंद झाला. मुलगी वगैरे भावाकडून 'पाहवून' त्यांनीं त्या गृहस्थाला होकार दिला, व आमचे गणपतराव एका सुमुहूर्तावर चतुर्भुज झाले.

उमाकाकूंच्या उजाड संसारांत 'लक्ष्मी' येऊन त्याला आतां चांगली कळा आली. सुनेवर—सरस्वतीवर उमाकाकूंचा अगदीं जीव कीं प्राण होता. सुनेच्या पायगुणानें आपले सर्व मनोरथ पूर्ण होतील, मुलाचा संसार सोन्याचा होईल, अशी त्यांची खात्री होती. लग्न झाल्यापासून सरस्वती सासरीं क्वचित्च असे. बोलूनचालून अल्लड पोर ती. पोरीसोरी मैत्रिणींनीं केलेला सासरचा बाऊ तिला खरा वाटावा, यांत कांहीं नवल नव्हतें. सासरीं आपणाला जाच होईल, एवढीच तिची कल्पना. यामुळें सासरीं जावयाला ती कबूल नसे, हट्ट करी, व तिचे आईबापहि आपल्या लाडक्या मुलीचें हें कोड कौतुकानें पुरवीत. 'आहे लहान तोंवर करील हट्ट! पुढं मोठी होऊन तिचं तिलाच समजूं लागलं, नवऱ्याची ओळख झाली, त्याच्या नादानं सासरचा लळा लागला ह्मणजे आह्मीं शंभर बोलावणीं धाडलीं तरी दिखील यायची नाहीं पोर! सध्यां नाहीं पाठवली तरी चालण्यासारखं आहे पोरीला सासरीं!' अशी मल्लिनाथी सरस्वतीची आई आपल्या नवऱ्यापाशीं करीत असे, आणि तेहि मुलीला सासरीं न पाठवितां तिचें कौतुक करून तिला घरींच ठेवून घेत. या प्रकारामुळें

विचाऱ्या उमाकाकूंनां भारी वाईट वाटे; परंतु येथेंहि त्यांची 'गरीबी' च त्यांनां नडे, व त्यांच्या तोंडाला घट्ट कुलूप घालीत असे. कधीं वर्ष सहा महिन्यांनीं सुनमुखाचें चारआठ दिवस दर्शन झालें तर आपलें महद्भाग्य असें त्यांनां वाटे, व त्यांतच त्या आनंद मानून रहात.

अशा स्थितींत दोनएक वर्षें गेलीं, आणि इकडे गणपतरावांच्याहि प्रवेशपरीक्षारूपी पंढरीच्या दोन वाऱ्या झाल्या. गणपतराव जेव्हां पहिल्यानें परीक्षेंत नापास झाले, त्या वेळीं उमाकाकूंनां भारी वाईट वाटलें; परंतु तें वर बिलकूल दिसूं न देतां मुलाला त्यांनीं अतिशय धीर दिला, त्याच्या दुःखी मनाचें समाधान केलें, आणि त्याला इकडचींतिकडचीं दोनचार उदाहरणें सांगून 'पुनः यत्न करून पहाण्या' विषयीं अतिशय प्रोत्साहन दिलें. त्या प्रोत्साहनानें प्रेरित होऊन गणपतराव पुनः अभ्यास करूं लागले, व दुसऱ्या वर्षीं फिरून परीक्षेला बसले. परीक्षेचा परिणाम काय झाला, हें वाचकांनां माहीत आहेच.

या खेपेला मुलाला उमाकाकूंनीं प्रोत्साहन वगैरे कांहींच दिलें नाहीं; कारण, त्यांचाच या वेळीं अगदीं धीर सुटला असून त्यांनांच कोणींतरी उत्तेजन द्यावयाची अतिशय जरूरी होती. त्यांनां उदासीनतेनें गांठलें, व आपली भिकेच्या शिंक्यावरची हांडी कांहीं त्या वर चढावयाची नाहीं, अशी त्यांची पक्की खात्री झाली. आपला संसार कधींहि चांगल्या स्थितीला यावयाचा नाहीं, असें त्यांनां वाटूं लागलें, व त्या संसाराविषयीं अगदीं–अगदीं पूर्णपणें–निराश होऊन गेल्या. मामांच्या आग्रहामुळें गणपतराव 'फिरून एकदां यत्न करून पहावयाला' सिद्ध झाले, व जारीनें अभ्यास करूं लागले. तिसऱ्या परीक्षेच्या वेळीं उमाकाकू तापानें भारी आजारी होत्या. मुलगा तिसऱ्याहि वेळीं नापास झालेला ऐकून त्यांची अगदीं कमरच खचली. त्याच स्थितींत त्यांनां जोराचा भ्रम झाला, आणि भ्रमांत मुलाच्या परीक्षेसंबंधीं, संसारांतील दारुण निराशेसंबंधीं, सुनेसंबंधीं बडबडत, मुलाच्या मांडीवर मस्तक ठेवून त्यांनीं तिसरे दिवशीं प्राण सोडला. सुनेचें तोंड पहावें, एवढी एक तीव्र आशा उमाकाकूंनां लागून राहिली होती; परंतु नष्ट दैवानें तीहि पुरी केली नाहीं, आणि अशा रीतीनें त्या सात्त्विक अंतःकरणाच्या पूर्ण निराशेंत अंत झाला.

मातेच्या मृत्यूनंतर गणपतराव चाकरीसाठीं घराबाहेर पडले. नोकरी मिळविण्यासाठीं त्यांनां कसकसे श्रम पडले, किती तीव्र निराशा अनुभवाव्या लागल्या वगैरे हकीगत वाचकांनां माहीतच आहे. जी.आय्.पी. रेल्वेच्या लाईनवर शेवटीं त्यांनां एकदांची नोकरी मिळाली, व पांचसात वर्षें ते या नोकरीवर असून सध्या ते 'दुधई' स्टेशनावर असिस्टंट स्टेशन मास्तर होते, हीहि हकीगत वाचकांनां ठाऊकच आहे. गणपतराव हें आमच्या कथानकांतील अत्यंत महत्त्वाचें पात्र असल्यामुळें त्यांच्या आजपर्यंतच्या चरित्राची वाचकांनां जरा विस्तारानें माहिती करून द्यावी लागली. आतां कथानकाकडे वळावयाला आपणांला हरकत नाहीं.

या दुधई स्टेशनवर गणपतराव वर्ष दीड वर्ष होते. हें स्टेशन लहानांपैकीं असून अगदींच भिकार होतें. रहाण्याकरितां गणपतरावांनां 'सरकारी' जागा मिळाली होती. ही जागा इतकी लहान होती, कीं, तिला 'मकाण' ह्मणण्यापेक्षां 'माणसाचा पिंजरा' असें ह्मणणें अधिक शोभेल. स्टेशनच्या आसपास फारशी वसती नव्हती. खुद्द दुधई गांव स्टेशनपासून बरेंच लांब होतें. या सर्व परिस्थितीमुळें आमच्या गणपतरावजींची खाण्यापिण्याची सोय कोठेंच होण्यासारखी नव्हती. स्वतः हातानें करून खाण्याशिवाय त्यांनां कांहीं गत्यंतर नव्हतें, व ती दगदग दररोज दोन वेळ उरकण्याचें तर त्यांच्या अंगीं बिलकूल सामर्थ्य नव्हतें. 'गरज ही कल्पकतेची आई आहे,' या न्यायानें गणपतरावांनीं त्यांतल्यात्यांत आपल्या उदरंभरणाची सोय करून घेतली होती. स्टेशनावर पाणी वगैरे भरण्याकरितां, व उतारूंनां पाणी पाजण्याकरितां कंपनीनें जो एक हिंदुस्तानी ब्राह्मण नोकर ठेवला होता, त्यालाच त्यांनीं आपला 'अन्नदाता' करून घेतला होता. हे 'जलधर महाराज' गणपतरावजींनां रोज दोन वेळ 'स्वयंपाक' करून घालीत. त्यांच्या या नोकरीबद्दल वेतन ह्मणून ह्मणा अगर बक्षीस ह्मणून ह्मणा, दरमहा दोन रुपये गणपतरावांनां त्यांनां द्यावे लागत असत; परंतु या पांडेसाहेबांच्या स्वयंपाकांत एक मोठी गोम होती. 'रहडका दाल' आणि 'आलुका भुंजी' या दोन पदार्थांशिवाय त्यांनां तिसरा पदार्थ ह्मणून बिलकूल बनवितांच येत नसे. बरें, हे दोनच पदार्थ कां होत ना, परंतु ते तरी नीट होतील! दोहोंपैकीं एकहि पदार्थ चुकून कधीं एकदा देखील चांगला

…न नसे. ‘ दाळ ’ कधीं कची राही, कधीं अगदीं बुडाशीं लागे, कधींकधीं तर साफ जळून तिचे कोळसे होत ! भाजींत कधीं सर्व समुद्रांतलें मीठ एकदम घातलेलें असे, तर कधीं मुळींच नसे ! भाजी बुडाशीं लागून आपल्या डाळ-भगिनींच्या बरोबरीचें ‘ स्थळ ’ महिन्यांतून दहापंधरा वेळ तरी मिळविल्यावांचून रहात नसे ! तरुण वयांत अशा तऱ्हेचें घाणेरडें अन्न खाणें—तेंहि रोजामागून रोज, महिन्यांमागून महिने—भाग पडावें, ही दुर्दैवाची सीमाच होय ! आमच्या गणपतरावांचे या भिकार स्टेशनावर अतिशयच हाल होत होते. परंतु करणार काय ?

गणपतरावजींची अर्धांगी सरस्वती हिचें वय या वेळीं एकोणीस वर्षांचें होतें. अजूनहि ती आपल्या माहेरीं आईबापांकडेच असे. गणपतरावांचे खाण्यापिण्याचे अतिशय हाल होतात, सुखाचे दोन घांसहि त्यांच्या पोटांत जात नाहींत, सदन्नाच्या अभावीं त्यांची प्रकृति वाईट होत चालली आहे, असें पाहून मुख्य स्टेशनमास्तर व त्यांची बायको गणपतरावांनां ह्मणे “गणपतराव, तुमच्या जेवण्याखाण्याचे. अन् इतरहि बाबतींत इतके हाल होतात, तर तुम्ही आपल्या बायकोला आणीत हो कां नाहीं? नाशिक नाशिक ह्मणजे का इथून कांहीं हजारबाराशें कोसांवर आहे ? पट्दिशीं जायचं एका दिवशीं अन् घरीं जाऊन घेऊन यायचं बायकोला ! आहे काय त्यांत एवढं ? खरंच गणपतराव, कां हो आणींत नाहीं तुम्ही बायकोला ?”

गणपतराव ह्मणत “ न आणायला काय झालें ? लहान वयांत इतक्या दूर घेऊन यायची ह्मणून मनाला जरा हें वाटतें, दुसरें काय ?”

मास्तरांची बायको ह्मणे “ आणा आपली तिला. मी सारी मदत तिला करीन—तुह्माला नको त्याबद्दल कांहीं काळजी. आणाल ना लवकर ?”

“हो,” असें ह्मणून गणपतराव तेथून निघून जात, व खिन्न हृदयानें आपल्या मकाणांत येऊन एक दीर्घ निःश्वास टाकीत. कधींकधीं त्यांचे डोळेहि पाण्यानें भरून येत.

अशा प्रसंगीं गणपतराव जे उद्विग्न होत, त्याला तसेंच कारण होतें. गणपतरावांची अर्धांगी सरस्वती ही माहेरापासून दूर जावयाला मुळीं कबूलच होत नसे. आईबाप दृष्टिआड झाले, कीं, तिचा जीव अगदीं कासावीस होत असे. उमाकाकू जिवंत असतां मधुनमधून ती सासरीं येत असे हें खरें; परंतु तिचें तेथें वास्तव्य चारदोन दिवसांच्या पलीकडे कांहीं होत नसे. अधिक दिवस सासूनें ठेवलेंच, तर मुळुमुळू रडून ती जिवाचा अगदीं आकांत करून घेई, आणि उमाकाकूंनां तिला मुकाट्यानें माहेरीं पोहोंचती करावी लागत असे. उमाकाकू वारल्यानंतर काय—‘ आधींच उल्हास, त्यांत फाल्गुन मास !’ सासरचा सर्वच संबंध आटोपला ! हवें होतें तेंच—माहेरीं रहाणें—सरस्वतीच्या नशिबीं आलें ! दोन वर्षांपूर्वी गणपतराव जेव्हां तेजवाडा स्टेशनावर दुय्यम मास्तर होते, त्या वेळीं मोठी खटपट करून, शिकस्तीनें बायकोचें मन वळवून, नाना तऱ्हेच्या धमक्या दपटशे देऊन गणपतरावांनीं एकवार तेथें तिला आणून बिऱ्हाड थाटलें होतें. परंतु हें ‘कुटुंबसौख्य’ गणपतरावांनां फार दिवस कांहीं लाभलें नाहीं. या बिऱ्हाडांत पाय टाकतांच सरस्वतीनें रडूनरडून जिवाचा बोजवारा करून घ्यावयाला आरंभ केला. गणपतरावांनीं नानाप्रकारांनीं तिची समजूत घालण्याचा प्रयत्न केला, धाक दाखवूनहि पाहिला—परंतु ज्याचें नांव तें ! सरस्वती आपली एकसारखी रडत होती ! चारसहा दिवसांत तिच्या डोळ्यांचें पाणी ह्मणून खळलें नाहीं. रडूनरडून तिच्या डोळ्यांच्या पाकळ्या लालबुंद होऊन वर आल्या. पत्नीची ही ‘ लीला ’ पाहून बिचाऱ्या गणपतरावांनां तर अगदीं ‘भीक नको पण कुत्रा आवर !’ अशी स्थिति होऊन गेली. अर्धांगीच्या प्रेमाचें, ‘सुखकर’ सहवासाचें सुख नको, गृहसुख नको, खाण्यापिण्याचे हाल झाले तरी सुखें होवोत, पण ही रडव्या मुद्रेची ब्रह्महत्त्या आतां येथें नको, असें त्यांनां वाटूं लागलें. त्यांनीं श्वशुरांनां ताबडतोब तार करून बोलाविलें आणि त्यांच्याबरोबर आपल्या मंगल गृहदेवतेची माहेरीं रवानगी केली. जिवावरचें एक मोठें दुखणेंच गेलें, असें या वेळीं गणपतरावांनां वाटूं लागून त्यांचें मन बरेंच स्वस्थ झालें. तेव्हांपासून सरस्वती माहेरीं सुखानें काळ कंठीत होती. बिंबवलीला ती आतां कधींहि येत नसे, असें ह्मटलें तरी चालण्यासारखें आहे. आणि आणणार तरी कोण ? गणपतरावांच्या घरांत त्यांचें असें आतां ह्मटें कोण ? नाहीं ह्मणवयाला त्यांचा एक चुलत भाऊ मात्र अलीकडे त्यांच्या घरीं येऊन राहिला होता, त्यामुळें दररोज बिचाऱ्याच्या वास्तूजवळ दिवा तरी लागे.

बिचारे गणपतराव ! पति आणि पत्नी, दयित आणि दयिता, वल्लभ आणि वल्लभा यांच्यामधील दिव्य स्वर्गीय प्रेमाच्या महतीची माहिती त्यांनां कादंबऱ्या आणि नाटकें वाचून काय झाली असेल तेवढीच ! त्यांच्याबरोबरीच्या स्नेह्यांसोबत्यांकडूनहि त्यांच्या अर्धांगीच्या दिव्य प्रेमाच्या गोष्टी त्यांनां ऐकावयाला मिळत असत; परंतु स्वतःच्या आजपर्यंतच्या साऱ्या आयुष्यांत गणपतरावजींनां त्या प्रेमरसाचा स्वर्गीय आस्वाद कधींहि चाखावयाला मिळाला नव्हता ! खरोखर त्यांच्यासारखे हतभागी तेच ! विवाहानंतर गणपतराव नाशिकाहून जेव्हां कधींकधीं सुटींत वगैरे विंबवलीला घरीं जात, त्या वेळीं सरस्वती बहुधा सासरीं नसेच; ती नेहमीं माहेरींच असावयाची. शिवाय त्या वेळीं ती बरीच लहान होती. कधीं काळीं कपिलाषष्ठीला सरस्वती आणि गणपतराव एकदम घरीं असण्याचा दुर्लभ योग जमून आलाच, तर त्यांची प्रत्यक्ष भेट होऊन उभयतांमध्यें प्रेमसंभाषण असें कधींच झालें नाहीं. पुढें आई वारल्यानंतर नोकरी करतां ते जे घराबाहेर पडले, ते तेव्हांपासून असे परदेशींच होते. पहिल्यानें नोकरी मिळविण्यांत आणि नंतर उमेदवारींत अगोदर बरेच दिवस गेले. नंतर पांच सात वर्षें तर लाइनीवरची अतिशय कठीण अशी नोकरी करण्यांतच त्यांनीं घालविलीं. आतां बहुधा प्रत्येक वर्षी निदान एकदां तरी-मिळाली तर सुटी घेऊन, नाहीं तर आजारी पडल्याचें निमित्त करून गणपतराव आपल्या घरीं गेल्यावांचून रहात नसत. तसें केल्यावांचून त्यांच्या मनाला समाधानच वाटत नसे. विंबवलीला गेल्यानंतर ते लगेच चांदगांवला आपल्या सासुरवाडीला जात. दहाबारा महिन्यांनीं—इतक्या दिवसांनीं पतीची चिरवांछित भेट झाल्यानंतर पत्नीला ज्या प्रकारचा विलक्षण आनंद व्हावयाला पाहिजे, तसा आनंद आपली गांठ पडल्यावर कांहीं आपल्या अर्धांगीला होत नाहीं असेंच प्रत्येक खेपेला गणपतरावांच्या अनुभवाला येत असे. पतीच्या दीर्घकालानंतर घडलेल्या भेटीमुळें स्त्रिया आनंदानें बेभान होतात—परंतु सरस्वतीच्या चेहऱ्यावर गणपतरावांच्या आगमनानें तिळमात्रहि फरक झालेला आढळून येत नसे. गणपतरावांची सुटी ती कितीशी असावयाची ? आजाराचें निमित्त करून जर ते आलेले असले, तर एकदोन दिवसांपलीकडे त्यांनां सासुरवाडीला रहातां येत नसे, आणि हक्काचीच सुटी त्यांनां मिळालेली असली तर फार तर दहा नाहीं तर बारा दिवस त्यांनां शिकस्तीनें घरीं रहातां येई. पति जावयाच्या दिवशीं सरस्वतीच्या डोळ्यांत कधीं अश्रुबिंदु दिसला नाहीं, कीं, ती कधीं पतीला असें ह्मणाली नाहीं, कीं, " इतक्या लवकर कां बरं जायचं गडे ? आणखी एखाद दुसरा दिवस नाहीं का रहातां यायचं ?" फार काय, गणपतराव फिरून कधीं येणार, याविषयीं चुकूनहि कधीं त्या भाग्यवान् बायकोनें चौकशी केली नाहीं. गणपतराव सासुरवाडीहून निघून जातांना सारीं माणसें त्यांनां निरोप द्यावयाला बाहेर येत; परंतु सरस्वती कधींहि त्यांचें ओझरतें दर्शन घ्यावयाला खिडकीशीं देखील आली नाहीं. पतीबद्दल सरस्वतीच्या मनांत अशी कांहीं निर्लिप्त भावना किंवा दूरीभाव होता. तिला साधारण बऱ्यापैकीं लिहितांवाचतां येत असे आणि ही गोष्ट गणपतरावांनांहि चांगली ठाऊक होती. यामुळें त्यांनीं आपण होऊन आपल्या पत्नीला प्रेमानें ओथंबलेलीं लांबलचक पत्रें पाठवावयाला सुरुवात केली. परंतु सरस्वतीनें पहिल्यानें मुळीं गणपतरावांनां बिलकूल कांहीं दादच दिली नाहीं. त्यांनीं जेव्हां नेटच धरला, आणि तिच्यावर पत्रांचा सारखा वर्षाव सुरू केला, तेव्हां कोठें चारपांच ओळींचें एक वेडेंवांकडें पत्र तिनें त्यांनां शेवटीं पाठविलें. तेव्हांपासून गणपतराव आठवड्यांतून एकतरी पत्र बायकोला पाठवीतच; परंतु ती त्यांच्या पत्रांनां नियमानें उत्तरें पाठवीच असें नाहीं. गणपतरावांचीं तीनचार पत्रें आलीं, कीं, सरस्वतीनें एखादें पत्र त्यांनां पाठवावें, आणि तेंहि अत्यंत संक्षिप्त—चारसहा ओळीचें ! आणि त्यांत 'आपली प्रकृति कशी आहे ?' 'आम्ही सुखरूप आहों,' अशा तऱ्हेच्या दोनचार मामुली गोष्टींपलीकडे कांहींहि नसावयाचें. आपली पत्नी आपणाशीं अशी अगदीं परकेपणानें, दूरीभावनेनें कां वागते, याविषयीं गणपतरावांनां अत्यंत आश्चर्य वाटे; कदाचित् तिच्याशीं आपणच कांहीं कठोर अगर गैररीतीनें वागत नाहीं ना, अशीहि त्यांनां शंका येई. परंतु आपल्या वर्तनांत चमत्कारिक अगर कठोर असें कांहींच त्यांनां आढळून येत नसे. त्यांतल्यात्यांत मधूनमधून गणपतरावांच्या मनांत असे समाधानपर विचार येत, कीं, इतक्या अवधींत आपणां उभयतांनां कधीं एकत्र रहाण्याचा सुयोग आला नाहीं, ह्मणूनच सरस्वतीच्या मनांत तिच्या तारुण्याला उचित असा आपणाविषयींचा रम्य

अनुराग अद्यापि उत्पन्न झाला नाहीं. कांहीं दिवस आपण उभयतां एकत्र राहिलों ह्मणजे प्रेमाच्या गोड रज्जूनें एके ठिकाणीं बांधलीं जाऊं आणि आपल्या उभयतांच्या हृदयांमध्यें स्वाभाविक मधुर अशा प्रेम-भावना आपोआप उत्पन्न होतील–आपला पतिपत्नी-भाव अधिकाधिक हृदयंगम होईल !

याच भावनेनें प्रेरित होऊन गणपतरावांनीं आतां सरस्वतीला दुधईला घेऊन येऊन संसार थाटण्याचा मनांत निश्चय केला, व तशी त्यांनीं तयारीहि चालविली होती. सासुरवाडीला व बिंबवलीला आपल्या घरीं चुलत-भावाला पत्रें पाठवून आपला बेत त्यांनीं कळविला होता. फेब्रुवारीच्या दहा तारखेला सरस्वतीला घेऊन बिंबवलीहून ते निघणार होते. सरस्वतीसह या वेळीं बिंबवलीहूनच निघावें, असें त्यांनीं ठरविलें होतें. सासुरवाडीहून निघणें गणपतरावांनां या वेळीं श्रेयस्कर वाटलें नाहीं. सरस्वतीला जर तोंपर्यंत माहेरीं ठेवली, तर आईबापांच्या फाजील प्रेमामुळें ह्मणा, अगर तेथल्या इतर कांहीं मंडळीच्या भलत्याच शिकवणीमुळें ह्मणा, सरस्वती आयत्या वेळीं अडून बसावयाची, व ‘ मी नाहीं इतक्या लांब परदेशीं यायला कबूल ! ’ असा हट्ट धरून रडूनरडून आकाश–पाताळ एक करावयाची, अशी गणपतरावजींनां भीति वाटत होती. यामुळें, दूरदृष्टि वापरून, आपल्या चुलतबंधूंनां व सासऱ्यांनां पत्रें पाठवून त्यांनीं आपल्या पत्नीला जाने-वारीच्या शेवटल्याच आठवड्यांत बिंबवलीला आपल्या घरीं आणून ठेवविलें होतें. पुढील सारीं धोरणें याप्रमाणें नीट बेताबेतानें बसवून, दिवसांचा चांगला हिशेब करून गणपतरावांनीं सुटीविषयीं अर्ज केला; परंतु अशा प्रसंगीं काय व्हावयाचें तेंच झालें. त्यांची सुटी मंजूर झाली नाहीं. रेल्वेच्या नोकरीमध्यें हीच तर मोठी अडचण असते. तिच्या सेवेमध्यें रात्रंदिवस, अष्टौप्रहर मरमर मरावें, हाडांचीं काडें करून घ्यावीं, आणि वर्षांतून कधीं एखाद्या अडचणीच्या वेळीं आपण सुटी मागावयाला जावें तर बेलाशक ‘ या वेळीं तुह्माला रजा देणें शक्य नाहीं ’ असें वरिष्ठांचें उत्तर येतें. एकदां एका गृहस्थानें बापाच्या मृत्यूनंतर त्याचें और्ध्वदेहिक करण्यासाठीं ह्मणून पंधरा दिवसांची सुटी मागितली. त्यावर साहेबानें असा हुकूम दिला, कीं, ‘या वेळीं काम भारी तुंबलेलें असल्यामुळें सुटी देतां येत नाहीं. बापाचें और्ध्वदेहिक दोन महिन्यांनीं करावें ! ’

सुटी नामंजूर झाल्यामुळें गणपतराव मोठ्या पंचा-यतींत पडले. सुटी मिळेल, या भरंवशावर त्यांनीं सर्व व्यवस्था अगदीं चोख करून ठेविली होती. आतां काय करावें ? बायकोला आणावयाचा बेत सुटी मिळे-पर्यंत दूर ढकलावा ? छट् ! अगदीं अशक्य ! सरस्वतीला घेऊन येऊन कधीं एकदां आपण बिऱ्हाड थाटतों, असें त्यांनां झालें होतें. ती उत्कंठा दूर सारणें त्यांनां आतां शक्य नव्हतें. शेवटीं पूर्वीच्या बेताप्रमाणें दहाव्या तारखेलाच सरस्वतीला घेऊन यावयाचें, असेंच गणपतरावांनीं ठरविलें. अशा प्रसंगीं नोकर लोक जो उपाय अमलांत आणीत असतात तोच या वेळीं आपणहि अमलांत आणावयाचा, असा गणपत-रावांनीं निश्चय केला. फेब्रुआरीच्या दहा तारखेला सरस्व-तीला घेऊन यावयाचें त्यांनीं निश्चित केलें होतें; त्यांच्या पूर्वी एक दिवस ह्मणजे नऊ तारखेला सरकारी रीतीनें आजारी पडावयाचें, असें गणपतरावांनीं ठरविलें. त्या दिवशीं ‘ सिकरिपोर्ट ’ वरिष्ठांनां सादर करून दुपारच्या डाऊन गाडीनें मुकाट्यानें ‘ यःपलायते ’ करावयाचें; ताबडतोब बिंबवलीला जाऊन दहाव्या तार-खेला सरस्वतीला घेऊन परत फिरावयाचें, आणि अकराव्या तारखेला सकाळीं नवांच्या गाडीला मुकाट्यानें दुधईस्टेशनवर सपत्नीक उतरावयाचें, असा एकंदर कार्यक्रम गणपतरावजींनीं आंखला होता; व त्याप्रमाणें त्यांनीं बिंबवलीला आपल्या ‘दादां’नां दोनतीन पत्रें लागोपाठ पाठवून आपली एक मिनीटभर खोटी न होईल, अशी व्यवस्था ठेवण्याविषयीं त्यांनां विनंति केली होती. ठरलेल्या कार्यक्रमांत एवढासा बिघाड झाल्यास केवढा घोंटाळा उडेल, याचें भयंकर शब्दचित्र आपल्या पत्रांत उठवून देऊन सरस्वतीच्या पाठवणीची सर्व तयारी जय्यत ठेवण्याविषयीं त्यांनीं आपल्या दादांनां पत्रांतून पुनःपुनः प्रार्थना केली होती. दुधईच्या मुख्य स्टेशनमास्तरांची गणपतरावांच्या या बेताला आंतून चांगली अनुकूलता होती. कारण, त्यांनींहि इतर सर्वांप्रमाणें आजपर्यंत याच महाजन-मार्गाचें वेळोवेळीं अनुसरण केलें होतें, व पुढेंहि तें सोडून यावयाचा त्यांचा विचार नव्हता. रेल्वेचे ‘डॉक्टरसाहेब ’ हे अतिशय उदार स्वभावाचे होते; त्यांनां रेल्वेनोकरांच्या अडचणी व दुःखें यांची पूर्ण माहिती असल्यामुळें ते त्यांच्याशीं अत्यंत सहानुभूतीनें वागत असत, आणि कधींहि कोणावर उपकार करा-

वयाचा प्रसंग आला असतां तो ते सहसा फुकट जाऊं देत नसत. गणपतरावांनीं आपली अडचण त्यांच्या कानांवर घालतांच, आपण 'सिक सर्टिफिकिट' देऊं, असें त्यांनीं त्यांजपाशीं कबूल केलें.साहेबानें योग्य वेळीं रजा न दिल्यामुळें जो घोटाळा उडणार होता, त्याच्या प्रतिकारार्थ गणपतरावांनीं अशा तऱ्हेनें आपणाकडून जय्यत तयारी केली, व 'सिकरिपोर्ट' वगैरे लिहून तयारहि ठेवला.

एक दिवस गेला,दोन गेले.पहातां पहातां फेब्रुआरीची नववी तारीख उजाडली. ज्या दिवसाची गणपतराव इतक्या उत्कंठेनें मार्गप्रतीक्षा करीत होते, व जो दिवस बहुधा कधींच उगवावयाचा नाहीं, असें त्यांनां वाटूं लागलें होतें, तो दिवस तर एकदाचा येऊन ठेपला. गणपतरावांच्या मनाला एकसारखी हुरहूर लागून राहिली. ठरल्याप्रमाणें सर्व कार्यक्रम निर्विघ्नपणें पार पडतो आहे कीं नाहीं, का कोठें भलतेंच एकादें विघ्न मध्येंच अकल्पित रीतीनें दत्त ह्मणून उभें रहातें या आशंकेनें त्यांच्या हृदयांत हुरहूर हुरहूर होऊं लागलें. सकाळपासूनच त्यांचें मन आज ठिकाणावर नव्हतें, व ती त्यांची स्थिति पाहूनच मास्तर व त्यांची बायको यांनीं त्यांची सरस्वतीसंबंधानें दोनचार वेळ थट्टाहि केली.

तीन वाजले. गणपतरावांनीं 'ऑफिसां'त जाऊन आपला 'सिक रिपोर्ट' स्टेशनमास्तरसाहेबांनां सादर केला. मास्तर त्यांच्याकडे पाहून हंसले व त्यांनीं विचारलें "परवां खात्रीनें याल ना? कीं, सासुरवाडीला जाऊन दोन दिवस बायकोसह पाहुणचार झोडायला रहाणार ?"

"वः ! हें काय विचारणें ?" गणपतरावांनीं हंसून उत्तर दिलें. "असें भलतेंच कुठें झालें आहे ? परवां नऊ दहा वाजतां आपला मी इथें हजर !"

"जोडप्यानें–हातांत हात घालून !" असें ह्मणून मास्तरसाहेब मोठमोठ्यानें 'हो हो' करून हंसूं लागले.

"बरें येतों मी." असें ह्मणून गणपतराव तेथून त्वरेनें निघून गेले.

असिस्टंट स्टेशनमास्तरांचा तो 'रिपोर्ट' नियमाप्रमाणें तारेनें 'हेड' ऑफिसांत व डॉक्टरसाहेबांकडे पाठविण्यांत आला.

हातीं लहानशी ट्रंक व काखोटीला वळकटी मारून संध्याकाळच्या डाऊन पॅसेंजरनें गणपतराव घरीं जावयाला निघाले. त्यांच्या बल्लवानें दोन रोट्या व थोडीशी 'आलूकी भुंजी' जरा लवकर तयार करून त्यांच्यासाठीं एका डब्यांत घालून ठेवली होती. तो डबा गणपतरावांनीं वर खिशांतच ठेवून दिला होता. आठ वाजले, कीं, आंतील पदार्थांवर ताव मारून एकाद्या स्टेशनावर पाणी ढोसण्याचा त्यांचा विचार होताच. उगीच कोण ट्रंक उघडीत बसतो, असा विचार करूनच गणपतरावांनीं डबा खिशांत ठेवला होता. स्टेशनमास्तरसाहेबांच्या बायकोनें सरस्वतीबाईंकरितां मुद्दाम एक खण व हळदीकुंकवाच्या दोन पुड्या पतिराजांपाशीं देऊन ठेवल्या होत्या. गणपतराव गाडींत बसले, त्या वेळीं मास्तरसाहेबांनीं खण व पुड्या गणपतरावांच्या हातीं देऊन ह्मटलें "हा आपल्या कुटुंबाकरितां आमच्या घरांतून दिला आहे अन् 'न विसरतां बाईंनां घेऊन लवकर या,' असा तुह्माला निरोप सांगितला आहे."

गणपतरावांनीं खण हातीं घेऊन नुसतें स्मित केलें.

"अन् हें पहा गणपतराव !" मास्तरसाहेब ह्मणाले: "तुह्माला जर विशेष तकलीफ होत नसेल, तर नाशकाहून कांहीं तरी आमच्यासाठीं फळफळावळ घेऊन या. या भिकार जागीं वर्षन्‌वर्षं कांहींएक फळ नाहीं दृष्टि पडत !"

"जरूर आणीन. तकलीफ कसली त्यांत ? बरें येतों— नमस्कार !"

"नमस्कार !"

गाडी चालू झाली !

प्रकरण दुसरें.

पण पत्ता नाहीं !

बिंबवली हा गांव नाशिक रोड स्टेशनपासून असा मध्येंच वायव्येकडील कोंपऱ्याला अडीचएक कोसांवर होता. स्टेशनपासून बिंबवलीपर्यंत साधारण बऱ्यापैकीं पब्लिक वर्क्सची सडक असून तेथपर्यंत जावयाला टांगे नसले तरी छकडे मिळत असत.

योग्य वेळापेक्षां सुमारें अर्धा तास विलंबानें गणपतराव सकाळीं नाशिक रोड स्टेशनवर उतरले. गाडींत गर्दी फारच असल्यामुळें त्यांनां रात्रभर जागरण झालें.

असून त्याचा परिणाम त्यांच्या चेहऱ्यावर—विशेषतः त्यांच्या डोळ्यांवर बराच झाला होता. स्टेशनावर उतरून छकडा करून ते तसेच विंबवलीकडे निघाले. सुमारें नऊसाडेनऊ वाजतां ते आपल्या घरीं पोहोंचले.

गाडीवाल्याकडून ट्रंक व बिछाना घरांत नेववून ठेवून गणपतरावांनीं त्याचें भाडें चुकतें केलें, व तो निघून गेला. गणपतराव तसेच अंगणांत आले. तेथें येऊन पहातात, तर जिकडेतिकडे उदासीनता पसरलेली, सर्वांचे चेहरे अत्यंत गंभीर, कोणाच्या तोंडावर एवढी रया किंवा प्रसन्नता ह्मणून नाहीं. चहूंकडे खेदाचें—विषादाचें साम्राज्य ! अंगणांत प्रवेश करतांच या विषादाची छाया प्रत्यक्ष गणपतरावांपर्यंत येऊन थडकली! त्यांनांहि एका खेदमय भावनेनें चट्कन् घेरलें. कांहीं तरी अज्ञात असें संकट आपणावर येऊन लवकरच आदळणार आहे, असें त्यांनां वाटूं लागलें. निरनिराळ्या शंकाकुशंकांनीं तितक्यांतल्या तितक्यांत त्यांच्या हृदयांत हलकल्लोळ उसळून दिला. कोणत्या कारणामुळें आपल्या घरावर व घरांतील मंडळीवर ही उदासीनतेची—विषादाची—निराशेची काळीकुट्ट छाया पसरली आहे हें गणपतरावांनां कळेना, आणि त्यामुळेंच त्यांच्या हृदयाला एकाएकीं कंप सुटूं लागला.

बाहेर ओटीला लागूनच एक उघडें खोपट उभारलें असून त्यांत ‘दादां’च्या दोन गाई होत्या. त्यांच्यापुढें पानवण ठेवून ‘वहिनी’ आज इतक्या उशिरां त्यांचें दूध काढावयाला बसल्या होत्या. पण भलत्याच वेळीं दूध द्यावयाला त्या ‘गरीब गाई’ कांहीं केल्या कबूल होत नव्हत्या. लाथा हांसडून, शिंगें हलवून आणि इतर धिंगाणा घालून, ‘या वेळीं दूध द्यावयाला आपण साफ कबूल नाहीं,’ असें त्या हरप्रयत्नानें सुचवीत होत्या. पण त्यांच्या त्या कबुलीकडे लक्ष्य देतो कोण ? तोंडांतल्या तोंडांत अस्पष्ट रीतीनें गाईंनां शिव्या देत वहिनी त्यांचे आंचळ ओढीतच होत्या, व तीं जनावरेंहि त्यांच्या या जुलमाचा आपणाकडून होईल तसा व होईल तितका प्रतिकार करीत होतीं.

गणपतरावांच्या गाडीवाल्यानें त्यांचें सामान नेऊन ओटीवर ठेवलें; गणपतराव अंगणांत आले; त्यांचा शब्दहि वहिनींनीं ऐकला; परंतु तोंड फिरवून एकदांहि त्यांनीं ‘भाऊजी’ कडे पाहिलें नाहीं, कीं, ते आल्याचें आपणाला कळलें, असें त्यांनीं दाखविलें नाहीं. त्या आपली दुधाची खंडणी गाईंकडून वसूल करण्यांतच निमग्न होऊन गेल्या होत्या. दादांची ह्मातारी सासू—वहिनीची आई—तोंडानें कांहीं पुटपुटत व हातांतली लहानसीशी तुळशीच्या मण्यांची माळ हळुहळू फिरवीत अगदीं अंगणांत दाराशींच असलेल्या गुलाबाच्या लहानशा झाडांवरील फुलें काढण्यांत दंग होऊन गेली होती. गणपतराव येतांच तिनें एकदां त्यांच्याकडे आपली क्षीण दृष्टि फेंकली; परंतु पुनः ती काढून तिनें आपल्या कामाला आरंभ केला; पुनः ह्मणून तिनें गणपतरावांकडे पाहिलें नाहीं, कीं, आपला हातहि थांबविला नाहीं. घरची मोलकरीण मैनेची आई पार्वती कमरेवर कळशी घेऊन पाणी आणावयाला चालली होती. गणपतराव अंगणांत येतांच एकवार तिनें त्यांच्याकडे पाहिलें, परंतु विषादानें तत्क्षणीं तिनें जी खालीं मान घातली, ती त्यांच्या समोर पुनः ह्मणून वर केली नाहीं. गणपतराव येतांच, ‘काय ? बरं आहे ना ?’ असा एकतरी कुशल प्रश्न ती उत्सुकतेनें विचारावयाची; परंतु आज एक नाहीं दोन नाहीं; त्यांच्याकडे एकदा विषादमय दृष्टिक्षेप करून पार्वती खालीं मान घालून आपल्या कामाला निघून गेली.

या साऱ्या विषादमय वातावरणाचा, या साऱ्या घरच्या मंडळीच्या उदासीन किंबहुना दुःखप्रदर्शक अथवा सुतकी वर्तनाचा अर्थ काय, हें गणपतरावांच्या लक्ष्यांत येईना. कांहींतरी घोटाळा झाला आहे, कांहीं तरी शोक उत्पन्न करण्यासारखें संकट या मंडळीवर—नव्हे, आपणावर—कोसळू पहात असून त्याचा स्फोट लवकरच होणार, अशी अंधुकअंधुक कल्पना मात्र त्यांनां आली. प्रत्यक्ष संकटाच्या दारुण स्थितीपेक्षां अज्ञात संकटाशंकेची अर्धवट स्थिति बरी, असें वाटून उलगड्याच्या भीतीनें गणपतरावांनां कोणालाहि प्रश्न करण्याची छाती झाली नाहीं.

इतक्यांत त्यांच्या दादांची आठ वर्षांची मुलगी वेणू—ही अतिशय मायाळू आणि गोड पोरगी होती—घरांतून हळुहळू बाहेर आली. गणपतराव आपणाशींच विचार करीत अंगणांतच उभे आहेत, असें पाहून ती त्यांच्याजवळ आली, आणि आनंदानें किंचित् हंसून गणपतरावांचा हात आपल्या चिमुकल्या हातांत धरून ती हर्षनिर्भर स्वरानें ह्मणाली “काका—”

या गोड पोरीनें तरी आपणाला हांक मारली, या विचारानें गणपतरावांच्या विषादपूर्ण हृदयाला किंचित्

आनंद झाल्यावांचून राहिला नाहीं. प्रेमभरानें वेणूच्या पाठीवरून हात फिरवीत ते ह्मणाले " काय बाळ ?"

" काका, तुह्मी आलांत तरी केव्हां ?"

" हा, आतांच येतों आहें मी, बाळ !"

"गाडी करून नाहीं आलांत? कुठं दिसत नाहीं गाडी?"

गणपतराव किंचित् हंसून ह्मणाले " मला येऊन दहाएक मिनिटें झालीं–गाडी मघांच गेली. बरें, वेणू, मला एक सांगशील ?"

गणपतरावांच्या चेहऱ्याकडे पाहून वेणूनें विचारलें, " काय काका ?"

" मला सांग अगोदर–घरची सगळी मंडळी खुशाल आहे ना ?"

या वेळीं गणपतरावांच्या शरीरांतील सर्व शक्ति त्यांच्या कर्णरंध्रांत येऊन एकत्र झाल्या होत्या. वेणू काय सांगते, त्याकडे त्यांचें सर्व लक्ष परमोत्कंठेनें–अत्यंत अधीरतेनें–लागून राहिलें होतें.

" सारीं खुशाल आहेत. कां काका ?"

गणपतरावांचा टांगलेला जीव एकदांचा खालीं पडला. त्यांनीं सुटकेचा एक मोठा उसासा सोडला !

" बरें, तुझे बाबा कुठें आहेत ग ?"

आपला चिमुकला तळहात चट्कन् फिरवून वेणू ह्मणाली " काय कीं बाई ! कुठं गेले आहेत कुणाला ठाऊक !"

" कुठें कामाविमाला का गेले आहेत ?"

" ठाऊक नाहीं काका ! परंतु कामालाच गेले असतील—"

" केव्हांसे गेले ग ?"

" मी उठायच्या अगोदर गेले आहेत–मला ठाऊक नाहीं काका !"

" बरें तुला विचारूं एक ? सांगशील ?—"

वेणूनें आपले मुग्ध नेत्र गणपतरावांच्या चेहऱ्याकडे लावले, व त्यांचा हात धरून ओढीत ती ह्मणाली " सांगेन. पण तुह्मी असे अंगणांतच उभे कां काका, घरांत चला ना ?"

काकांनां हातीं धरून वेणू घरांत जाऊं लागली. गणपतरावांनीं फिरून तिला विचारलें " माझें पत्र पोहोंचलें का ग बाबांनां तुझ्या ?"

'काय चमत्कारिक प्रश्न हा तरी तुमचा !' असें सुचविणाऱ्या दृष्टीनें ती गोड पोरगी आपल्या गोड दृष्टीनें गणपतरावांकडे पाहूं लागली. नंतर ती एकदा खुदकन् हंसली व ह्मणाली " हें हो मला काय विचारतां काका ? बाबांनां आलं असेल पत्र ! मला तें कसें कळणार ? ते का मला पत्रांचं कांहीं सांगतात ?"

इतक्या अवकाशांत वेणूनें हात धरून गणपतरावांनां ओटीवर नेलें. तिकडे जात असतां व गेल्यावरहि ते अत्यंत उत्कंठित व उत्सुक दृष्टीनें इकडेतिकडे पहात होते; परंतु त्या दृष्टिक्षेपांनीं ते जें कांहीं शोधीत होते त्याचें किंवा त्याच्या नुसत्या छायेचेंहि चिन्ह त्यांनां कोठें आढळून आलें नाहीं ! काय चमत्कार आहे पहा ! उत्कंठा जितकी अधिक, तितकीच तिच्यासंबंधाची निराशाहि तीव्र व त्वरेनें होते !

गणपतरावांच्या हृदयांत निरनिराळ्या आशंकांनीं व भीतीनें काहुर करून सोडलें. त्यांचें हृदय खरोखरच कांपूं लागलें. भयशंकाकुल दृष्टीनें ते पुनःपुनः इकडे-तिकडे पाहूं लागले; परंतु पुनःहि त्यांच्या कपाळीं पूर्ण निराशाच होती !

इतक्यांत त्यांच्या वहिनी हळुहळु तेथें येऊन ठेपल्या. त्यांचें पाऊल अगदीं हळू व भाराक्रांत असें पडत असून त्यांची दृष्टिहि खालीं जमिनीकडेच लागली होती. मधुनमधून त्या उसासेहि सोडीत असाव्या असा गणपतरावांनां भास झाला.

वहिनी जवळ येतांच गणपतरावांनीं त्यांनां वांकून नमस्कार केला, व विचारलें "कसें काय वहिनी ? सारीं खुशाल ?"

"हो." वहिनींचा चेहरा खिन्न व स्वर विषादपूर्ण होता. अजूनहि त्यांचे डोळे जमिनीकडेच लागले होते.

"वहिनी, माझें पत्र पोहोंचलें का ?"

"कुठलं पत्र ?"

"आज, मी बिंबवलीला येऊन पोहोंचेन, ह्मणून तीनचार दिवसांपूर्वीच मुंबईहून दादांनां पत्र घातलें होतें, तें पत्र त्यांनां पोहोंचलें नाहीं का !"

"पोहोंचलं. न पोहोंचायला काय झालं ?" असें ह्मणून वहिनींनीं एक मोठा उसासा सोडला.

वहिनींचा प्रत्येक उसासा तीव्र शस्त्र बनून गणपत-रावांचें हृदय चिरीत होता. क्षणभरानें त्यांनीं विचारलें "दादा कुठें आहेत ?"

" काय कीं बाई ?"

" कुठें कामाला गेले आहेत वाटतें !"

" मला कांहीं कळलं नाहीं."

" केव्हांसे गेले ?"

" अगदीं उजाडतच !"

अजूनहि वहिनींच्या एकंदर वर्तनांतला गूढपणा व स्वरांतील विषण्णता दूर होत नव्हती. हळुहळू युक्ति-युक्तीनेंच त्याचें कारण आपणाला समजून घेतलें पाहिजे, घाई करून उपयोगीं नाहीं, असा गणपतरावांनीं विचार केला.

" बरें, धाकटा बाबू बरा आहे ना ?"

" बरा आहे. नुकतंच त्याला गोंवर येऊन गेल्या-मुळं थोडासा अशक्त झाला आहे अन् ह्मणून आतांशी चिरचीर भारी करतो. "

बोलतांबोलतां हळुहळू गणपतरावांनीं कपडे काढून खुंटीवर ठेवले,व ओटीच्या दरवाज्यांतून ते आंत आले. वहिनी जवळ आहे, हें ध्यानांत असतांहि ते तीव्र शोधक दृष्टीनें अत्यंत उत्सुकतेनें इकडेतिकडे पाहूं लागले; परंतु 'त्रिखंड हिंडून'हि त्यांच्या दृष्टीला ती शोधीत होती, तें कांहीं 'गवसलें' नाहीं !

" वहिनी, भारी तहान लागली आहे मला. थोडें पाणी तरी दे ग !"

"हो, विसरलेंच अगदीं मी. मी आलें मुळीं त्याच्या-साठीं अन् मेलं आयत्या वेळीं विसरलेंच ! चहा ठेवला आहे तुमच्यासाठीं. झालाच असेल इतक्यांत. हातपाय धुवा, तों आलेंच मी चहान् फराळाचं घेऊन !" असें ह्मणून वहिनी तेथून निघून गेल्या. या वेळीं त्यांची उदासीनता किंचित् नाहींशी झाली असून त्यांचें पाऊ-लहि त्वरेनें पडत होतें. चहांत उत्तेजक असा गुण आहे, असें ह्मणतात तें कांहीं खोटें नव्हे !

वहिनी स्वयंपाकघराकडे निघून जातांच गणपत-राव पुनः बाहेर ओटीवर आले, व तेथें पायऱ्यांपाशीं ठेवलेल्या कळशींतून जवळच्या तांब्यांत पाणी ओतून घेऊन अंगणाच्या पायऱ्यांवर येऊन त्यांनीं हातपाय आणि तोंड धुऊन स्वच्छ केलें, व पुनः आंत येऊन दारापासून किंचित् अंतरावर मांडलेल्या बाजेवर ते बसले. त्यांचे डोळे या वेळीं आंतल्या दरवाज्याकडे एकसारखे लागून राहिले होते. आपणाला पाहिजे आहे तें माणूस आतां येईल, या क्षणीं येईल, या पळाला येईल, असें त्यांना वाटत होतें. आपली भावजय अति-शय शहाणी व धोरणी आहे. आपल्यासारख्या तरुण माणसांची इच्छा काय असते, हें जाणून ती फराळाचें आणि चहा आपल्या अर्धांगीच्या—सरस्वतीच्या—हातींच पाठवून देईल, अशी त्यांनां पूर्णपणें आशा लागून राहिली होती, व या आशेमुळेंच त्यांच्या भुकेची तीव्रताहि क्षणोक्षणीं अधिकाधिक होत होती.

परंतु गणपतरावजींच्या त्या उत्सुक आशेचा पूर्ण निराशेंत अंत व्हावयाला फारसा वेळ लागला नाहीं. सरस्वतीच्या हातच्या गोड फराळाचा काल्पनिक उपभोग घेत,मिटक्या मारीत, ते जों कांहीं क्षण दर-वाज्याकडे नजर लावून उत्कंठेनें अर्धांगीची वाट पहात बसले आहेत, तोंच स्वतः वहिनी—मूर्तिमंत निराशाच—फराळाचें व चहा हातीं घेऊन तेथें आल्या. फराळाचें तें काय असावयाचें आहे ? ताटलींत बेसनाच्या लाडवांच्या दोन गोळ्या आणि चहा !

भाऊजींसमोर फराळाचें व चहा ठेवून वहिनी तेथेंच उभ्या राहिल्या. त्यांची विषण्णता पूर्ववत् त्यांच्या चेहऱ्यावर परत आली होती. इतक्यांत पानसुपारीचा डबा घेऊन वेणू नाचतनाचतच तेथें आली, व तो काकांच्या शेजारीं ठेवून, त्यांच्याशीं एक शब्दहि न बोलतां पुनः नाचतच निघून गेली.गणपतराव हळुहळू 'फराळ' करूं लागले. फराळ त्यांच्या घशाशीं अगदीं अडकूं लागला. घांस तोंडांतल्यातोंडांत फिरूं लागला. वहिनींनीं झट्कन् जाऊन पाण्याचा तांब्या व पंचपात्री त्यांच्यापाशीं आणून ठेविली होती. पाण्याच्या साहा-य्यानें गणपतराव फराळाचे घांस गळ्याखालीं ढकलीत होते. वहिनी उदास दृष्टीनें बाहेर पहात, श्वास सोडीत त्यांच्यापासून किंचित् अंतरावर राहिल्या होत्या.

एकदांचा फराळ तर संपला. चहाहि तसाच ढोसून गणपतरावांनीं ताटलींतच हात धुतले, व डबा अलीकडे ओढून, अडकित्यानें सुपारी फोडीत तिचीं खांडें ते तोंडांत टाकूं लागले.

फराळ चालला असतां वहिनी किंवा भाऊजी पर-स्परांशीं कोणीच बोलत नव्हतें. सुपारी चघळीत गण-पतराव ह्मणाले " दादा कुठें गेले आहेत, तें तुला माहीत नाहीं का ?"

" नाहीं."

" बरें, ते परत तरी केव्हां येतील घरीं ?"

" तेंहि नाहीं बाई मला ठाऊक !"

" बरें, एक छकडा सांगून ठेवायला हवा आमच्या-साठीं."

" आमच्यासाठीं ' या शब्दावर जोर देऊन गणपतरावांनीं वहिनीकडे पाहिलें. कांहींच न बोलतां वहिनी खालीं पाहूं लागल्या.

" का दादांनीं अगोदरच सांगूनहि ठेवला आहे ?" क्षणभरानें गणपतरावांनीं पुनः प्रश्न केला.

" काय कीं बाई !"

" शिकस्त ह्मणजे तीन वाजतां इथून ' आह्मांला ' निघालेंच पाहिजे. रहायची कांहीं आज सोय नाहीं बिलकूल ! साहेबानें शेवटीं कांहीं नाहींच सुटी दिली ! अस्सा राग आला होता ह्मणतेस, कीं–पण ह्मटलें जाऊं द्या. मग आजारीपणाचें ढोंग करावें लागलें आयत्या वेळीं ! करतेस काय ? ' सिक रिपोर्ट ' देऊन मी हा इथें पळून आलों आहें. आजची संध्याकाळची गाडी कांहीं चुकवून भागायचें नाहीं. बरें वहिनी, तुमचें कसें काय ? इथली सारी व्यवस्था जय्यत आहे ना ? नाहीं तर आपला बायकांचा कारभार आहे तो–आयत्या वेळीं हेंच राहिलें, तेंच घ्यायला पाहिजे होतें, अस्सें शेवटपर्यंत चालायचें ! सारे बोजेबिजे बांधून सारी तयारी जय्यत आहे ना ?" असें ह्मणून गणपतराव शोधक दृष्टीनें इकडेतिकडे पाहूं लागले. हें बोलतांना वहिनीशिवाय 'दुसऱ्याहि कोणाला'तें स्वच्छ ऐकूं जावें, ह्मणून गणपतरावांनीं या वेळीं स्वर जरा चढा धरला होता !

गणपतरावांनीं एवढें लांबलचक भाषण केलें, परंतु वहिनींचें त्याच्याकडे लक्ष्य तरी होतें कीं नाहीं कोण जाणे ! भाऊजींकडे त्या पहातहि नव्हत्या.

गणपतरावांनीं फिरून प्रश्न केला " सर्व तयारी आहे ना ? "

वहिनींनीं मानेनेंच ' नाहीं ' असें सुचविलें. गणपतरावांनीं त्यांच्याकडे पाहिलें तों त्यांच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले असून त्यांतून दोनतीन खळकन् खालीं जमिनीवरहि पडले. त्यांनीं पदरानें झटकन् आपले डोळे पुसले व नाकानें 'सूं सूं' करीत, शून्य दृष्टीनें बाहेर पहात, त्या जागच्या जागीं उभ्या राहिल्या.

वहिनींचें हें चमत्कारिक वर्तन पाहून गणपतरावांच्या छातींत तर भीतीनें धस्सच झालें. त्यांच्या या वर्तनाचा अर्थ काय, हेंच मुळीं त्यांच्या लक्ष्यांत येईना.

" सारीं माणसें तर खुशाल ?" त्यांनीं एकदम कंपित स्वरानें विचारलें " वहिनी, काय झालें ? तूं अशी रडतेस कां ?"

वहिनींनीं कांहींच उत्तर दिलें नाहीं. पुनः त्यांनीं पदरानें एकदां डोळे पुसले, व त्या बाहेर पहात राहिल्या.

तेव्हां गणपतराव स्वस्थानावरून–बाजेवरून–उठले, व वहिनीच्या अगदीं जवळ जाऊन उभे राहिले. त्यांचें हृदय या वेळीं थरथर कांपत असून भीतीनें पायहि लटलटत होते. शुष्क, कांपऱ्या आवाजानें त्यांनीं विचारलें " वहिनी–तर–मग—"

त्यांच्यानें पुढें बोलवेना. कंठ अगदीं दाटून आला !

" भाऊजी !—"

गणपतरावांनीं सावध होऊन इकडेतिकडे पाहिलें. पुनः त्यांनीं विचारलें "वहिनी, तर–मग ती या जगांतच नाहीं काय ?" असें ह्मणून त्यांनीं दोन्ही हातांनीं आपला चेहरा घट्ट झांकून घेतला.

" इतकं कुठलं भाऊजी, तिचं न् तुमचं भाग्य !" वहिनी तीव्र स्वरानें ह्मणाल्या.

गणपतरावांनीं झट्कन् वर पाहिलें–वहिनींकडे नजर फेंकली. त्या तीव्र परंतु स्थिर दृष्टीनें त्यांच्याकडे पहात होत्या. त्यांच्या दृष्टींत, स्वरांत, वर्तनांत एक प्रकारचा तीव्र अधिक्षेप, निंदा व तुच्छता यांची छटा स्पष्टपणें दृग्गोचर होत होती. गणपतरावांची आपणाला कींव येत आहे, त्यांजविषयीं आपणाला अत्यंत सहानुभूति वाटत आहे, असें त्या आपल्या वर्तनानें सुचवीत होत्या.

गणपतरावांची स्थिति या वेळीं खरोखरच अनुकंपा करण्यासारखीच होती. एवढा पुरुषासारखा पुरुष तो, पण त्याला आंतल्याआंतून रडण्याचे कढ येत होते. आपण आहोंतरी कोणत्या स्थितींत, याची त्यांनां कल्पना येईना. रडव्या स्वरानें त्यांनीं विचारलें "काय ह्मणतेस तूं हें वहिनी ?"

वहिनी तीव्र स्वरानें ह्मणाल्या "मी ह्मणतें तेंच !"

"वहिनी, झालें काय ? तिचें–झालें काय ?"

"काय झालं तेंच तर कळत नाहीं, भाऊजी !"

"ह्मणजे ?"

"आज पहांटेपासून सरस्वतीचा मुळीं कुठं पत्ताच लागत नाहीं आहे !"

वहिनींच्या तोंडचे हे शब्द ऐकतांच, आपल्या मस्तकावर दारुण वज्राघातच झाला, असें गणपतरावांनां वाटलें. त्यांचें मस्तक सुन्न झालें. त्यांनां चहूंकडे अंधार दिसूं लागला. त्यांनीं दोन्हीं हातांनीं आपलें मस्तक घट्ट दाबून धरलें. त्यांची छाती अगदीं भरून

घेऊन आपला श्वासच जणूं काय कोणीं जोरानें काढून नेत आहे, असें त्यांनां वाटूं लागलें.

छातीवर हात ठेवून, धापा टाकीत, अडखळत अडखळत ते ह्मणाले "काय ह्मणालीस वहिनी? तिचा पत्ताच लागत नाहीं?"

"हो."

"ह्मणतेस काय? कुठें-गेली तरी कुठें ती?"

"देवाला ठाऊक! कळतं तर आणखी काय पाहिजे होतं?"

चमकल्यासारखें करून गणपतराव ह्मणाले "तर मग वहिनी,दादा सकाळपासून गेले आहेत ते-"

"तिच्याच शोधाला!"

गणपतराव आपणाशींच कांहीं वेळ विचार करीत होते. वहिनीहि स्तब्धपणें उभ्या होत्या. कांहीं वेळानें गणपतरावांनीं विचारलें "वहिनी, कांहीं भांडणबिंडण झालें होतें का अलीकडे?"

"छेः, भांडण कसलं आलं आहे?"

वहिनी असें ह्मणाल्या खऱ्या, परंतु त्यांच्या स्वरा-वरून गणपतरावांनां असें वाटलें, कीं, वहिनी आपणा-पासून कांहींतरी महत्त्वाची बातमी लपवून ठेवीत आहे हें खास! ह्मणून त्यांनीं विचारलें. "बिलकूल झालें नाहीं भांडण?"

"भांडण असं कांहीं नाहीं-" खालीं पाहून वहिनी ह्मणाल्या.

"तर मग?"

"सारी हकीगत सांगतें, त्यावरून काय तें तुह्मीच ठरवा. काल संध्याकाळीं दिवा हातीं घेऊन सरस्वती सैंपाकघराकडे जात होती, इतक्यांत जातांजातां दिवा तिच्या हातून पडला—"

"आणि?—"

"साऱ्या दिवलींतलं एवढं मोठं तेल जमिनीवर सांडलं."

"ह्मणून तूं तिला खूब बोललीस वाटतें?" गणपतरावांनीं जरा उग्र स्वरानें प्रश्न केला.

"मी कांहीं तिला 'खूब' बोललें नाहीं. फक्त एवढंच ह्मटलं, 'सरस्वती, जरा बघून नीट सावधपणानं चालवं माणसानं. एवढं थोरलं दिवलीभर तेल सांडून तूं फुकट घालवलंस,हें बरं का केलंस? तेल घरचं का आहे आपल्या, सुनबाई? बाजारांतून रोख किंमत देऊनच तें आणावं लागतं. ओढघस्तीचा आमचा संसार! असं निष्काळजीपणानं वागून आह्मां गरीबांचं चालणार कसं? नेहमीं सावधपणं वागायला हवं!' मी तिला बोललें बोललें जें काय,तें हें एवढंच! एक शब्द दिखील अधिक नाहीं."

आपणाशींच विचार करीत गणपतराव ह्मणाले "अस्सें! मग पुढें काय झालें?"

"पुढं काय व्हायचं आहे? हातून अपराधच झाला, तेव्हां बोलायला कांहीं तोंडच नव्हतं. तेव्हां चिमणीएवढं एवढंसंसं तोंड करून राहिली होती. कुणाशीं कांहीं न बोलतां फुगटून मात्र बसली होती-"

"रात्रीं जेवली तरी का नीट?"

"नेहमींप्रमाणें कांहीं नाहीं, भूकच नाहीं, ह्मणून बसली होती; परंतु आग्रहच केला अन् 'भरल्या घरीं तुझ्यासारख्या सवाष्ण बायकांनीं रागानं उपाशीं राहूं नये' ह्मणून सांगितलं तेव्हां खाल्लेन् दोन घांस कसेबसे!"

वहिनींच्या बोलण्यावरून तात्पर्यार्थ काय काढा-वयाचा तो गणपतरावांनीं केव्हांच काढला. जितक्या साहजिक रीतीनें आणि नरमपणानें हा सर्व प्रकार घडून आल्याचें वहिनींनीं वर्णन केलें, तितक्या सहजतेनें आणि नरमपणानें तो खरोखर घडून आलेला नाहीं, अशी त्यांची खात्री झाली. आपल्या बायकोच्या हातून जमिनीवर तेल सांडण्याचा अपराध झाला असेल, नाहीं असें नाहीं; परंतु तेवढ्यासाठीं वहिनी तिला घालून पाडून खूब कडूजहर बोलली, यांत कांहींच संशय नाहीं, असें गणपतरावांनां वाटूं लागलें. सरस्वती ही आई-बापांच्या लाडांत लहानपणापासून वाढलेली मुलगी. आजपर्यंत तिला कधीं 'हूं' ह्मणून घ्यावयाची संवय नव्हती. स्वभावानें ती तापट आणि अत्यंत अभिमानी होती. अशा स्थितींत,विशेष संबंध नसलेल्या, आऊच्या काऊ चुलत-जावेनें सामान्य अपराधासाठीं आपणाला असें कडूजहर बोलावें, हें तिला सहन झालें नाहीं, तर कांहीं नवल नाहीं. रागाच्या भरांत त्या अभिमानी मुलीनें पाण्यांत जाऊन खात्रीनें जीव दिला असेल, अशी एकाएकीं गणपतरावांच्या मनांत कल्पना आली, आणि प्रतिक्षणीं विचारांनीं ती अगदीं खरी असावी, आपल्या बायकोला आपण कायमचे आंचवलों, अशी त्यांची खात्री होत चालली.

क्षणभरानें गणपतरावांनीं विचारलें "बरें वहिनी, काल रात्रीं ती निजली होती कुठें?"

"त्या पलीकडच्या खोलींत."

" आणखी तिथें कोण निजलें होतें ?"

" तिथं कुणीच निजत नाहीं—"

" तर मग ती एकटीच निजली होती ? "

" तशी ती एकटी नव्हती. सरस्वती इकडे आल्यापासून वेणू न् ती एकाच अंथरुणावर त्या खोलींत निजत असत."

" नेहमींप्रमाणें वेळेवर ती निजायला गेली का ?"

" हो-जरा अगोदरच."

" मग मध्येंच केव्हां उठून गेली ?"

" तें कांहीं आह्मांला कुणालाच कळलं नाहीं."

" कुणालाच कसें नाहीं कळलें एवढ्या घरांत ?"

" कुणाला कळणार आहे ती जर भर मध्यरात्रीं अगदीं पायहि न वाजवतां गेलीं असली तर ? कळून-कळून कळायचं एका वेणूला ?"

" तिला नाहीं का कळलें ?"

" तिला काय कळणार आहे ? एवढंसं पोर तें ! रात्रीं अंथरुणाला एकदां तिची पाठ लागली कीं, हांहां ह्मणतां तिला झोंप लागते, ती सकाळीं तिला उठवावी तेव्हां जागी होते. मध्यंतरीं तासेढोल वाजवीत एकादी वरात जरी जवळून गेली, तरी पोरीला जाग यायची नाहीं, कीं, नुसतं हूं का चूं करायची नाहीं. काल रात्रीं वेणू निजली ती आज सकाळीं जागी झाली. जागी होऊन पहाते, तर काकू नाहीं !"

" बरें, सकाळीं उठल्यावर घराचा एकादा दरवाजा उघडा आहे, असें तुह्मांला आढळून आलें का ?"

" हो—"

" कोणता दरवाजा उघडा होता ?"

" मागचा. "

गणपतराव कांहीं वेळ आपणाशींच विचार करण्यांत निमग्न होऊन गेले होते. त्यांचा गळा अगदीं दाटून आला. ऊर भरून आलें. सद्गदित स्वरानें ते ह्मणाले " वहिनी, मागच्या विहिरींत तिनें खात्रीनें जाऊन जीव दिला असला पाहिजे—"

" मला नाहीं असं वाटत. "

" माझी अगदीं खात्री आहे. दम धर मी त्या महादू पवाराला बोलावून आणतों. तो बुडून तिला वर काढील." असें ह्मणून, दुःखावेगाच्या भरांत गणपतराव खरोखरच बाहेर जाण्यासाठीं अंगरखा टोपी घालूं लागले.

वहिनींनीं त्यांचा शर्ट धरून, त्यांना अडवून ह्मटलें " थांबा भाऊजी, चाललांत कुठं ?"

" हैबतीला बोलावून आणतों— "

" वेड लागलं आहे कीं काय तुम्हांला, भाऊजी ? उगीच आपण होऊन तुह्मीं अधिक घोंटाळा करून बजबजपुरी माजवूं नका. समजा, तुमचा तर्क खरा असला, सरस्वतीनं खरोखरीच जीव दिला असला, तर हैबतीला आतां बोलावून आणून तुह्मी करणार काय ? त्यानं बुडी मारून तिला वर आणलं तरी तुह्मी तिला वांचवूं का शकणार आहां ? "

गणपतराव खालीं मान घालून स्तब्ध उभे होते. त्यांनीं एक मोठा उसासा मात्र सोडला.

" पाण्यांत माणसांनं जीव दिल्यावर फार तर तो अर्धी घटका जिवंत राहील. सरस्वती घरांतून रात्रीं कधीं बाहेर पडली कोण जाणे ! आतां का ती तुह्मांला जिवंत मिळणार आहे ? मला अगोदर तुमचा हा तर्क खरा असेल असं वाटत नाहीं; अन् असलाच, तर आजच्या दिवसांत ती पाण्याच्या वर येऊन तरंगूं लागेल. माणूस पाण्यांत कधींच तसं दबून रहात नाहीं. दुर्दैवानं तसं जर नसेल, तर आपणालाच अगोदर जिकडेतिकडे बातमी उठवली पाहिजे, कीं, चांदगांवाहून काल रात्रीं तिच्या माहेरची मोलकरीण किंवा गडी तिला नेण्याकरितां आला होता, अन् तिच्याबरोबर ती अवशींच निघून गेली !"

वहिनींच्या तोंडचे हे शब्द ऐकतांच, गणपतरावजींच्या छातींतून विजेचा असा एक सणकारा निघाला, कीं, आपली छाती फाटून तिचें तुकडेतुकडे होत आहेत, असेंच त्यांना वाटलें. त्यांचें मस्तकहि अगदीं सुन्न होऊन त्याला बधिरता आली. वहिनींच्या मनांत कोणती कल्पना आली, आपल्या अर्धांगीविषयीं कोणता भयंकर संशय त्यांच्या मनांत उत्पन्न झाला आहे, हें एका क्षणांत त्यांच्या ध्यानांत येऊन चुकलें. तत्क्षणीं त्यांचें मन त्यांना आवेशानें आणि जोरानें ग्वाही देऊं लागलें, कीं, वहिनींचा संशय फोल आहे— ती गोष्ट सरस्वतीच्या हातून कधीं झाली नाहीं—आणि कधीं स्वप्नांतहि होणें शक्य नाहीं ! असंभवनीय— अगदीं अशक्य कल्पना !

गणपतराव आवेगपूर्ण स्वरानें ह्मणाले "वहिनी, तुझ्या मनांत तिच्यावद्दल कोणता संशय आला आहे, त्याची मला पुरी कल्पना आली; परंतु तुझा संशय खोटा आहे. तिच्या हातून बेचाळीस कुळें बुडविणारें

असलें पापी वर्तन कधीं स्वप्नांतहि व्हायचें नाहीं, अशी माझ्या मनाची पक्की खात्री आहे."

गणपतरावांकडे पाहून वहिनी किंचित् हंसल्या. त्यांच्या त्या हास्यांत अविश्वास आणि हेटाळणी हीं स्पष्ट दिसत होतीं.

गणपतराव पुनः बोलूं लागले "कदाचित् तुला माझें ह्मणणें पटणार नाहीं; परंतु माझी त्याबद्दल खात्री आहे. तुझ्या कानउघाडणीमुळें अभिमानानें रागाच्या भरांत तिनें विहिरींत जीव तरी दिला असेल एक, किंवा ती खरोखरच माहेरीं पळून गेली असेल. तिच्या डोक्यांत इतक्या थोरपणींहि माहेरचें वेड अजून बरेंच आहे, हें मी कबूल करतों. वहिनी, मी गडबड अगर घोटाळा कांहीं करीत नाहीं. मुकाट्यानें एकदा विहीर वरवर बघून येतों. जर तिनें विहिरींत जीव दिलाच असेल, तर तसें कांहीं ना कांहीं तरी चिन्ह मला आढळून येईलच, यांत कांहीं संशय नाहीं."

"तुमची मर्जीच आहे तर जा–बाकी तुह्माला तिथं कांहीं दिखील आढळून यायचं नाहीं."

वहिनींनां कांहीं उत्तर न देतां गणपतराव मुकाट्यानें मागील दारच्या विहिरीकडे निघून गेले.

विहीर कांहीं मोठी नव्हती–लहानच होती. गणपतराव दोनचार वेळ तिच्या भोंवती फिरले. पांचदहा वेळ आंत डोकावून पाण्यावर कांहीं तरंगतें आहे किंवा काय अथवा दुसरें कांहीं आढळून येत आहे कीं काय हें त्यांनीं नीट बारकाईनें पाहिलें; परंतु कोठेंहि संशयास्पद असें कांहींहि त्यांनां आढळून आलें नाहीं.

विहिरीच्या कांठाशीं उभे राहून गणपतराव आपणाशींच विचार करूं लागले. आपण या विहिरीकडे आलों ही चूकच केली, असें त्यांनां वाटूं लागलें. सरस्वतीच्या मनांत जीवच द्यावयाचा असें जर आलें, तर ती एवढ्याशा लहान विहिरींत का जीव देणार आहे? यांत माणूस पुरतें बुडण्याइतकें तरी पाणी असेल कीं नाहीं याचीच मुळीं शंका ! घराच्या पुढच्या अंगाला, जवळच जो मोठा तलाव आहे, तेथें जाऊन अगोदर आपणाला शोध घेतला पाहिजे, असें त्यांनां वाटूं लागलें. सरस्वतीनें जीव दिला असेल तर त्या तलावांत दिला असेल, असा त्यांनीं तर्क केला; कारण, त्या तलावांत पाणी तरी बरेंच होतें.

गणपतराव घरांत न जातां बाजूनेंच त्या तलावाकडे गेले. त्यांच्या हृदयांत या वेळीं भीति, उत्कंठा वगैरे विकार थैमान घालीत होते. त्या तलावापाशीं गणपतराव जातात, तों एक निराळीच अडचण तेथें दत्त ह्मणून हजर ! गांवची बरीच मंडळी कोणी स्नानाला, कोणी धोतरें धुण्याला वगैरे तेथें आली होती. गणपतराव दृष्टीला पडतांच, 'ओहो–गणपतराव!' 'काय गणपतराव, कधीं आलांत ?', 'काय गणू, मध्येंच रे एकदम ?', 'अरे हा गणपति ! कायरे बरा आहेस ना ?', 'अरे वः ! गणपतराव ! आहे ना मुक्काम दहा बारा दिवस ?' या व अशाच तऱ्हेच्या अनेक प्रश्नांचा एकसारखा धूमधडाक्याचा मारा त्यांच्यावर होऊं लागला. गांवच्या लोकांची ती स्नानाची वेळ होती. कोणी तळ्याच्या बांधलेल्या घाटावर बसून 'हरगंगे भागीरथी' ह्मणून डोकीवर कळशांच्या कळशा ओतीत होता, कोणी तितक्यांतल्या तितक्यांत तीन आचमनांचीच खंडणी देऊन संध्या केल्याचें पुण्य संपादीत होता, कोणी पंचा लटकावून धोतर बडवीत होता. एका बाजूला बायकांच्या धुण्याची गर्दी उडाली होती. पोक्त व ह्मातान्या बायका तितक्यांत झटपट स्नानेंहि उरकून घेत होत्या.

अशा स्थितींत, तलावाभोंवतीं फिरून सरस्वतीच्या शरीराचें किंवा इतर कसलें चिन्ह कोठें दिसतें कीं काय हें शोधून काढणें या वेळीं अशक्य आहे, अशी गणपतरावांची ताबडतोब खात्री झाली, व कोणाला कांहीं, कोणाला कांहीं उत्तरें देऊन त्यांनीं तेथून काढता पाय घेतला. थोड्याच वेळांत घरीं परत येऊन ते बाहेर ओटीवर टांगलेल्या झोंपाळ्यावर बसले. बसले ह्मणण्यापेक्षां, अस्ताव्यस्त पडले, असेंच ह्मणणें अधिक शोभेल.

आसपास कोणीच कोठें नव्हतें. वहिनी आपल्या कामाला लागल्या होत्या, गणपतरावांनींहि त्यांनां हांक मारली नाहीं. थोड्याच वेळांत आपणाशींच गुणगुणत वेणू तेथें आली, व काकांच्या शेजारीं बसून हळुहळू त्यांच्या अंगावरून हात फिरवूं लागली.

सभोंवतालच्या शांत परिस्थितींत, मुकाट्यानें विचार करीत असतां, गणपतरावजींचें हृदय दुःखानें अगदीं भाराक्रान्त होऊन गेलें, व त्यांच्या डोळ्यांतून पाणी वाहूं लागलें. वेणू लहान होती, तरी हुषार होती. तिची नजरहि चपळ व सूक्ष्म होती. गणपतरावांच्या डोळ्यांत अश्रुबिंदु उभे आहेत ही गोष्ट त्या बालिकेच्या नजरेंतून निसटूं शकली नाहीं.

वेणू आपल्या भेदक, परंतु शांत दृष्टीनें, अनुकंपेनें काकांकडे पहात होती. कोणत्या शब्दांनीं काकांच्या दुःखी हृदयाचें या वेळीं समाधान करावें, हें तिला कळेना. काकांच्या डोळ्यांनां पाणी कां आलें, त्यांनां कसलें तीव्र दुःख होत आहे, त्यांची अशी अनुकंपनीय स्थिति कां झाली आहे, हें सर्व कांहीं तिला कळत होतें; परंतु काकांच्या हृदयांत कांहीं विलक्षण तीव्र असें शल्य सलत असेल, अशी मात्र त्या मुग्ध बालिकेला कल्पना नव्हती.

काकांच्या दुःखी मनाचें सांत्वन करण्याकरितां काय करावें, हें न कळल्यामुळें वेणूनें त्यांनां हळूच सहानुभूतीच्या स्वरानें विचारलें "काका, कपाळ का दुखतं आहे ? सुंठ उगाळून आणून देऊं का ?"

"नको बाळ !"

"मग तुमचं कपाळ चेपूं का थोडंसं ? पहा, बरं वाटेल."

त्या गोड पोरीच्या पाठीवरून प्रेमभरानें हात फिरवीत गणपतराव ह्मणाले "नको बरें बाळ ! माझें कपाळ दुखत नाहीं."

"मग तुह्मी असे रडतां कां ?"

गणपतराव क्षीणपणें हंसून ह्मणाले "रडतों ? वा ग पोरी ! मी रडतों का आहें ? खुळी कुठली !"

"तर मग काका, तुह्माला बाबांच्या विड्यांपैकीं एकादी देऊं का विडी आणून ?" बालिकेनें विचारलें.

"नको बाळ, माझ्यापाशीं आहेत विड्या. बरें वेणू, मी विचारतों त्याचें मला उत्तर देशील नीट ?"

"हो–न द्यायला काय झालं ?"

"तुझ्या काकूचें झालें तरी काय ? आहे तुला ठाऊक ?"

वेणूनें चट्कन् खालीं मान घातली. करुण स्वरानें ती ह्मणाली "मला ठाऊक नाहीं काका ! पण मला वाटतं—"

"काय वाटतें तुला ?" उत्सुकतेनें गणपतरावांनीं विचारलें.

"कीं, काकू बहुतकरून माहेरीं गेली असावी."

वेणूच्या या उत्तरानें गणपतरावांच्या मनाला पाहिजे होतें तें सहानुभूतीचें उत्तर मिळालें, आणि त्यांनां एकदम उत्तेजन आल्यासारखें झालें. ते उल्हासानें ह्मणाले "होय वेणु, मलाहि तुझ्यासारखेंच वाटतें. ती खरोखरच माहेरीं गेली असली पाहिजे. बरें, तूं काल साऱ्या रात्रींत जागी झाली नाहींस ना ?"

"नाहीं काका !"

"बरें वेणू, तुह्मी दोघी ज्या अंथरुणावर निजलां होतां, त्यामध्यें एकादा कागद किंवा पत्र अगर चिठ्ठी तुला आढळली का सकाळीं उठल्यावर ?"

"नाहीं काका ! अंथरूण तर मींच गुंडाळलं उठल्यावर. पण त्यांत कागदबिगद मला कांहींच दिसला नाहीं कुठें !"

"त्या अंथरुणाची वळकटी तशीच आहे का अजून?"

"हो—"

"कुठें आहे ती ?"

"आह्मी निजतों त्या खोलींत पेटीवर ठेवतें मी आमचं अंथरूण."

"असें का ? बरें वेणू, आपण तें अंथरूण एकदा नीट पाहूंया फिरून तपासून. पाहूं कुठें एकादें पत्रबित्र आहे का !"

जीं माणसें आत्महत्या करतात, अगर घरांतून पळून जातात, तीं तत्पूर्वी आपल्या आत्महत्येचें अगर परागंदा होण्याचें कारण लिहून ठेवतात, व तें पत्र बहुधा त्यांच्या बिछान्यांत सांपडतें, अशा अनेक गोष्टी गणपतरावांनीं ऐकल्या होत्या, त्यामुळें त्यांनां ही सरस्वतीच्या पत्राची एक अंधूक आशा लागून राहिली होती.

"चला–" असें ह्मणून काकांचा हात धरून वेणू निघाली.

त्या खोलींत जाऊन दोघांनींहि त्या अंथरुणाची अगदीं कसून झडती घेतली. परंतु त्यांत त्यांनां कांहींदेखील आढळून आलें नाहीं. त्या खोलींतील कोनाडीं, खिडक्या, भिंतींतील चिरा वगैरे सर्व जागाहि त्यांनीं बारकाईनें तपासून पाहिल्या; परंतु त्याहि तपासांत गणपतरावांची अगदीं पूर्ण निराशा झाली.

गणपतराव पुनः तसेच ओटीवर आले, व एकाद्या क्षुब्ध वाघाप्रमाणें इकडूनतिकडे तिकडूनइकडे एकसारख्या येरझारा घालूं लागले. आपल्या छातींत जणूं प्रचंड आग धडकली आहे, कशानेंहि व कधींहि ती शांत होणार नाहीं, असें त्यांनां वाटूं लागलें. मधुनमधून दोन्ही हातांनीं ते छाती घट्ट दाबून धरीत, तों ती आग मस्तकांत चढली आहे, असें त्यांनां वाटे. त्यांची अगदीं शोचनीय स्थिति होऊन गेली होती.

या वेळीं वहिनी स्वयंपाक घरांत खलबत्त्यांत कांहीं कुटीत असून त्याचा ठणठण आवाज बाहेर ऐकूं येत होता. पार्वती माजघरांत बसून धाकट्या बाबूला बोंडल्यानें दूध पाजीत होती. आजीबाई सैंपाकघराच्या उमरठ्याशीं बसून जपाची माळ ओढीत होत्या. हें सर्व आमच्या गणपतरावांनां दिसत असूनही जणूं दिसत नसल्याप्रमाणें झालें होतें. स्वप्नांत ज्याप्रमाणें माणसाला पदार्थांची छाया किंवा तसेंच जवळजवळ कांहीं तरी दिसतें त्याप्रमाणें हा सारा देखावा गणपतरावांनां बाह्यरेखात्मक असा कांहीं दिसत होता.

काकांच्या या स्थितीकडे वेणूचें पूर्ण लक्ष्य होतें, असें दिसलें. हातांत काड्यांची पेटी व दोनचार विड्या घेऊन ती त्यांच्याजवळ आली, व त्यांनां ह्मणाली "काका या घ्या विड्या. बाबा ह्मणतात, यांच्यासारख्या विड्या कुठंहि मिळायच्या नाहींत—"

त्या गोड मुलीचे हे अत्यंत ममतेचे, सहानुभूतीचे, प्रेमळ शब्द ह्मणजे गणपतरावांच्या तप्त हृदयाला अमृताप्रमाणें वाटले. या तीव्र दुःखाच्या वेळीं, या दारुण अनर्थाच्या प्रसंगीं त्या घरांतील एकहि माणूस त्यांच्याकडे ढुंकूनहि पहात नव्हतें ! कोणालाहि हृदय हा पदार्थ काय आहे, हें माहीत नव्हतें ! फक्त हा एक लहानसा जीव गणपतरावांच्या दुःखी, तप्त हृदयाकडे पूर्ण अनुकंपेनें पहात होता. त्यांच्या हृदयाच्या दारुण यातनांनां तो अंतःकरणपूर्वक भागीदार झाला होता. वेणूबद्दल त्यांनां अत्यंत प्रेम वाटूं लागलें.

गणपतरावांच्यानें आतां वेणूला 'नाहीं' ह्मणवेना. ते झोंपाळ्यावर बसले, व वेणूनें इतक्या सहानुभूतीनें आणून दिलेली विडी पेटवून तिचे झुरके मारूं लागले.

अशा स्थितींत कांहीं वेळ गेला. इतक्यांत गणपतरावांचे 'दादा' जोडा फटफट करीतकरीत घरीं येऊन ठेपले.

दादा वयानें गणपतरावांपेक्षां दहाएक वर्षांनीं वडील, ह्मणजे सुमारें चाळीस वर्षांचे होते. त्यांच्या शरीरावर मलेरियानें चांगलाच प्रभाव गाजविला होता. त्यांची देहयष्टि अगदीं बारीक असून डोळे बरेच खोल गेले होते. वर्ण अगदीं फिकट असून चेहऱ्यावर तिळभरहि तेज नव्हतें. त्यांच्याकडे पाहिलें ह्मणजे ते होते त्यापेक्षां पांचसात वर्षांनीं मोठे असावे, असाच पहाणाराचा तर्क होत असे.

दादा आलेले पहातांच गणपतरावांनीं हातांतली विडी झटपट झोंपाळ्यावरच विझविली, आणि चटकन् उठून त्यांच्याजवळ जाऊन त्यांनीं त्यांनां नमस्कार केला. दादांनीं त्यांनां रीतीप्रमाणें पांचसात कुशल प्रश्न विचारले. नंतर विडी पेटवून तिचे झुरके मारीत त्यांनीं गणपतरावांनां विचारलें "ऐकलीस ना सारी हकीगत?"

खालीं मान घालून गणपतराव ह्मणाले "हो, ऐकली–"

"मग पुढें ?"

"कांहीं शोध लागला का ?"

"कांहींदेखील लागला नाहीं. लागणार कसा ?"

"ह्मणजे ?" गणपतरावांनीं आश्चर्यानें विचारलें.

"कोणाला स्पष्ट असें कांहींच विचारतां येत नाहीं, या बाबतींत मुख्य अडचण आह्मांला पडली ती हीच ! तोंड दाबून बुक्क्यांचा मार झाला आहे हा आह्मांला !" असें ह्मणून दादांनीं एक सुसकारा टाकला.

इतक्यांत पतिराजांचा शब्द ऐकून दादांच्या अर्धांगीहि तेथें येऊन उभ्या राहिल्या. त्यांनीं पतिराजांनां विचारलें "कांहीं लागला का शोध ?"

"कांहीं नाहीं."

"मग आतां पुढं काय ? झाल्या गोष्टीला उपाय काय करायचा ? गांवामध्यें तर दोन घटकांच्या आंत हलकल्लोळ होऊन जाईल ! तोंड काढायला जागा नाहीं उरणार !"

दादा ह्मणाले "तूर्त एकदोन दिवस तरी ती भीति नाहीं ह्मणा—"

वहिनींनीं विचारलें "ती कशी बाई ?"

"मीं गांवांत दोघांचौघांजवळ बोललों आहें, कीं, सरस्वतीची आई एकाएकीं काल आजारी पडल्यामुळें चांदगांवाहून तिच्या माहेराहून माणूस आला, अन् रात्रींच्या रात्रीं गाडी करून तिला घाईघाईनें घेऊन गेला."

गणपतराव ह्मणाले "दादा, माझा एक तर्क आहे–"

"काय तो ?"

"ती खरोखरच माहेरीं पळून गेली असावी रातोरात."

"मला नाहीं वाटत असं." वहिनी ह्मणाल्या. "कुणाबरोबर जाणार ती ? एकटी तर कांहीं जाणं शक्य नाह्य."

" कां नाहीं शक्य ? कालच्या प्रसंगीं ती एकटी देखील जाईल !"

" कशावरून ?"

" माहेर सोडून माझ्याबरोबर इतक्या लांब जायला पहिल्यापासूनच ती अगदीं नाखूष होती. आतां अगदीं जायची पाळी आलीच, घेऊन जायला मी आज इथें येऊन टेपणार, आतां गेल्याशिवाय कांहीं सुटका नाहीं, अशी खात्री झाल्यावर ती रातोरात बापाच्या घरीं पळून गेली, यांत तिळमात्र संशय नाहीं. "

मान उडवून वहिनी ह्मणाल्या " छट्, तुमचा आपला भलताच कांहीं तरी तर्क, भाऊजी ! सासुरवाशीण, एकटी, रात्रीची वेळ–चांदपुर का जवळ तरी आहे ? इतक्या रात्रीं दोन अडीच कोस रस्ता तुडवीत सरस्वती एकटी माहेरीं जाईल, हें मला स्वप्नांत दिखील खरं वाटायचं नाहीं. तुह्मी आपला वाटेल तो तर्क करा. अगदीं दगडावरची रेघ–सरस्वती माहेरीं गेली नाहीं!"

वहिनींकडे करुण दृष्टीनें पहात गणपतराव ह्मणाले " वहिनी, ती किती हट्टी, हेकेखोर अन् एककल्ली आहे, याची तुला कल्पना नाहीं ! "

वहिनी हेटाळणीनें हंसल्या, व तीव्र स्वरानें ह्मणाल्या " कल्पना कां नसेल ? तुमच्या बायकोबद्दल मला अगदीं पूर्ण कल्पना आहे हो भाऊजी ! या गेल्या पंधरा दिवसांत माझीं हाडं खुसळून खुसळून तुमच्या बायकोनें माझ्या हाडान् हाडाला आपल्याबद्दलची अगदीं पुरीपुरी कल्पना आणून दिली हो ! नको ग बाई, त्या अकस्ताळ बायकोशीं पुन्हां जल्मांत कधीं प्रसंग नको ! " असें ह्मणून वहिनींनीं अंगावर शहारे आल्या-प्रमाणें केलें.

नंतर आपल्या पतिराजांकडे वळून त्या ह्मणाल्या " आपलं काय मत आहे ? भाऊजी आहेत तरुण. त्यांनां नाहीं जगाचा अनुभव; पण आपलं तर तसं नाहीं ना कांहीं ? आपण इतके दिवस जगांत टक्केटोणपे खाऊन संसार करतां आहां–आपणाला दिखील असंच वाटतं का, कीं, इतक्या रात्रीं सरस्वती दोनतीन कोस चालत माहेरीं एकटीच निघून जाईल ह्मणून ? "

दादांची चमत्कारिक स्थिति झाली होती. त्यांनां त्या पक्षाकडे मत देतां येईना किंवा त्या पक्षाच्या ह्मणण्याचें समर्थन करतां येईना. तेव्हां, आपल्या अर्धांगीच्या ह्मणण्याचें समर्थन किंवा खंडन करावयाच्या भरीला न पडतां ते ह्मणाले " मी ह्मणतों, जरी ती माहेरीं गेली असली, तरी तें तिनें चांगलें केलें, असें का वाटतें तुला गणू ? हें ऐकल्यावर लोक काय ह्मणतील ! तोंड तरी वर काढूं देतील का आतां ते आह्मांला ? छे छे छे छे ! गृहस्थाची मुलगी ही, अन् असें हिचें वर्तन !"

बिचारे गणपतराव दादांचें हें भाषण मुकाट्यानें खालीं मान घालून ऐकत होते. त्यांचा प्रत्येक शब्द त्यांच्या हृदयाचा एकएक लचकाच तोडीत होता !

कांहीं क्षण सारींच स्तब्ध होतीं. नंतर वहिनी ह्मणाल्या "कुणी काय वाटेल तें ह्मणा–पण मी साफ सांगतें, कीं, सरस्वती कांहीं माहेरीं गेलेली नाहीं ! किंवा पाण्यांतहि ती बुडाली नाहीं ! आह्मांला न् आमच्या बेचाळीस पूर्वजांनां मात्र तिनें जलसमाधि दिलीन् पुरती ! "

दादा कांहींच बोलले नाहींत. ते गंभीरपणानें स्तब्ध बसून राहिले.

कांहीं वेळानें मान वर करून गणपतराव ह्मणाले "दादा, जेवण झाल्यावर मी चांदगांवला जाऊन येतों. पहातों तरी काय घोटाळा आहे तो प्रत्यक्ष ! "

वहिनींनां ही सूचना फारशी पसंत पडली नसावी, असें दिसलें. त्या तीव्र स्वरानें ह्मणाल्या "जाणार तर जा तुह्मी भाऊजी ! आह्मी कांहीं नको नाहीं ह्मणत. पण मी आपली तुह्मांला स्वच्छ सांगून ठेवतें, कीं, जरी ती तिथं गेली असली, तरी कधींहि या घरीं तुह्मीं तिला आणतां कामा नये. हो, मी आपली आहें सरळ अन् स्पष्टवक्ती ! तुह्मांला आपला राग आला तरी येऊंद्या. तिथं ती असली तर तिला घेऊन खुशाल तुह्मी आपल्या नोकरीवर जा, नाहीं तर जिथं तिची मर्जी लागेल तिथं जा. पण आपलं तुह्मांला आमचं एक सांगणं एवढंच, कीं, मेहेरबानी करून तुह्मी तिला पुनः कधीं या घरांत आणूं नका. आह्मी आपलीं गरीब संसारी माणसं–कसाबसा संसार चालवितों सगळ्यांच्या मदतीनं. अशी ही अवदसा आमची सून ह्मणून जर आह्मी गांवांत मिरवूं लागलों, तर लोकं दोन घटकांत आमच्या संसाराचा बोजवारा उडवतील अन् दुसऱ्या दिवशीं आह्मांला इथून काळं करावं लागेल कायमचं ! त्यापेक्षां तुह्मीं आपले तिच्यासह परस्पर पावणेतेरा करानां ! "

बिचारे गणपतराव ! वहिनींचा हा कडाका ऐकत, मस्तकावर हात ठेवून मुकाट्यानें बसून राहिले !

प्रकरण तिसरें.

कुळाची दिवटी !

कांहीं वेळानें दादा तेथून उठून आपल्या कामाला गेले, व केवढा थोरला विजय केवळ आपल्या सामर्थ्यावर मिळवला हा, अशा वीरश्रीच्या जयमुद्रेनें वहिनीहि आपल्या राज्याकडे–स्वयंपाकघरांत–निघून गेल्या. बिचारे गणपतराव मात्र हताश भावानें तेथें बसून राहिले.

त्यांच्या मस्तकांत आणि हृदयांत जणूं प्रलयाग्नीचा भडका उडाला होता. मस्तक सुन्न झाल्यामुळें कांहीं सुचत नव्हतें. आपण होतों कोठें, आलों कोठें, झालें काय, पुढें करावयाचें काय, या चिंतांनीं त्यांनां अगदीं व्याकुळ करून सोडलें.

अशा स्थितींत अर्धा एक तास गेला. इतक्यांत वहिनी पुनः तेथें आल्या व त्यांनीं हांक मारली " भाऊजी–"

गणपतराव तत्क्षणीं चमकून जागृत होऊन ह्मणाले " काय वहिनी ?"

" तुह्मी मग चांदगांवाला जाणारच ना ?"

" हो, गेलें हें पाहिजेच." एक दीर्घ निःश्वास टाकून गणपतराव ह्मणाले.

" तरमग आंघोळ करून या झट्पट! सैंपाक झालाच आहे बहुतेक. झट्कन् जेवण घ्या उरकून अन् जा तसेच. उगीच असं बसून काय होणार आहे? आणखीं बसूनबसून विचार करकर केला, तरी फळ काय ? कांहीं तरी पुढला रस्ता हा पाहायला हवा ना ?"

" खरें तें वहिनी ! पण–"

" पण नाहीं नी बीण नाहीं. उठा आतां. वेळ कांहीं कमी नाहीं झाला. अजून थंडच पाणी करतां ना ?"

" हो–तिकडे कोण आह्मांला पाणी तापवून देतो, वहिनी ?" खिन्नपणें हंसून गणपतराव ह्मणाले.

" नाहीं तर आपली मी वेणूला सांगतें पाणी तापवायला."

" नको–कांहीं जरूरी नाहीं."

" उठा तर–तांदूळ दिखील वैरले मीं." असें ह्मणून वहिनी पुनः आपल्या कामाला निघून गेल्या.

गणपतराव उठले, व ट्रंकेजवळ जाऊन, ती उघडून त्यांनीं तींतून आपलें धोतर व टॉवेल बाहेर काढला. अंगांतील शर्ट, जाकीट काढून तीं खुंटीवर ठेवून, खांद्यावर टॉवेल आणि धोतर टाकून ते मागील दारीं विहिरीवर स्नानाकरितां जावयाला निघणार, इतक्यांत बाहेर दरवाज्यावर कोणीं थाप मारली, व ह्मटलें " दार उघडा दार, दार !"

गणपतरावांनीं विचारलें " कोण आहे ?"

" दादासाहेब आहेत का ?"

दादासाहेबहि आंघोळीला जावयाला निघण्याच्या तयारींत असून माजघरांतील बाजेवर एकामागून एक विड्या फुंकीत आपणाशींच विचार करीत बसले होते. इतक्यांत गणपतराव आंत येऊन ह्मणाले " दादा, तुमच्याकडे कोणी आला आहे."

दादा झट्कन् बाहेर येऊन ह्मणाले "कोण आहे ?"

" मी तो येसबा नाईक. "

' नाईक ' हें नांव ऐकून दादा मनांत जरा चरकले; परंतु घाबरल्यासारखें न दाखवितां त्यांनीं विचारलें " कां हो–काय काम आहे ? "

" भारी जरूरीचें काम आहे–अगोदर दरवाजा उघडा. "

येसबा नाईक हे बिंबवली व आणखी त्याच्याजवळचे दोनचार गांव यांच्यावरचे पोलिसच्या शिपायांचे नाईक होते. पोलिस आणि त्यांचें ' जरूरीचें काम ' हें ऐकून घरांतील सारी मंडळी जरा भेदरून गेली, यांत संशय नाहीं. क्षणार्धांत दादांच्या साऱ्या घरांत बरीच गडबड उडाली. गणपतरावहि आंघोळीला जाण्याकरितां निघाले होते, ते जागच्या जागीं उभे राहिले.

दादांनीं घाईघाईनें जाऊन अगोदर दरवाजा उघडला, व अर्धवट पोलिसचा व अर्धवट साधा पोषाक केलेले ' नाईकसाहेब ' आंत आले.

" या नाईकसाहेब–बसा–"

येसबा झोंपाळ्यावर बसले व शंकित मुद्रेनें इकडेतिकडे पाहूं लागले.

" काय नाईकसाहेब–काय खबर ?"

नाईकसाहेब वयानें पंचेचाळीशीच्या सुमारानें असून अंगानें चांगले मजबूत आणि उंच होते. त्यांच्या हातांत एक भली थोरली जाड अशी काठी होती. त्यांची मुद्रा पोलिसीला योग्य अशी उग्र नसून बरीच सौम्य होती. नाईक आलेले ऐकून घरांतल्या बायकाहि

आपापलीं कामें टाकून, ओटीच्या दरवाज्यामागें येऊन कान टवकारून उभ्या राहिल्या.

येसवा ह्मणाले " दादासाहेब, तुह्माला कांहीं माहिती विचारायची आहे–"

" माहिती ?–विचारा. "

" काल रात्रीं आपण आपल्या धाकट्या भावजईला तिच्या बापाच्या घरीं पाठविलीत काय ? "

जरा तोंडांतल्या तोंडांत घुटमळत, इकडेतिकडे पाहून दादा ह्मणाले " हो–कां बरें ? "

" तर मग त्या सटवीनें खरेंच सांगितलें ह्मणायचें !"

" काय सांगितलें ? कोणीं सांगितलें ? " दादांनीं उत्सुकतेनें विचारलें.

" बरीच मोठी हकीगत आहे ती–सांगतों ऐका. दादासाहेब, काल अशी प्रहर रात्र बाकी असेल. ह्मटलें यावें एक 'रोंद' मारून, ह्मणून चौकींतून मी बाहेर पडलों. छान खाशी चांदणी रात्र होती. आकाशांत पांढरा ढग देखील कुठें नसल्यामुळें स्वच्छ चांदणें पडलें होतें. गांव सोडून जवळजवळ मी कोसभर गेलों असेन. चिंचगांवच्या हद्दीशीं मला वाटतें मी पोहोंचलों होतों, इतक्यांत पहातों तर दोन मूर्ति रस्त्यानें झराझर चालल्या आहेत ! पहातां क्षणींच त्या बाया असाव्या, असें मीं ओळखलें. जरा वेगानें त्यांच्या जवळ जाऊन पहातों, तर त्या बाया खऱ्याच–पण त्यांपैकीं एक विधवा असून दुसरी सवाष्ण आहे, असें मला आढळून आलें. जी विधवा होती, ती बरीच मोठी चांगली माझ्या वयाची असावी असें मला वाटलें; परंतु तिच्या बरोबर जी सवाष्ण होती, तिनें डोकीवरून पदर घेतला असून त्याच्या शेवटानें नाकापर्यंतचाहि तोंडाचा भाग झांकून टाकल्यामुळें ती अमुक वयाची, तरुण आहे कीं प्रौढ आहे, हें कांहीं मला समजलें नाहीं. रात्र इतकी झालेली, मोकळ्या मैदानांतून दोघीच जणी बायका चालल्या आहेत, बरोबर कोणी पुरुषमाणूस नाहीं ! अशा स्थितींत त्यांनां पाहून मला जरा चमत्कारिक वाटलें अन् मनाला कांहीं भलताच अंदेशा आला. मीं जोरानें पुढें होऊन त्या बायांनां हटकलें, व ओरडून ह्मटलें 'इतक्या रात्रीं कोण चाललें आहे तें ?' माझी ती दरडावणीची हांक ऐकतांच त्या बाया चमकल्या अन् झट्दिशीं जिथल्या तिथें थांबल्या. त्यांच्या जवळ जाऊन मीं त्यांनां विचारलें ' कोण तुह्मी ? कुठें जातां आहां ?' त्यांपैकीं जी विधवा होती, ती जरा धीट दिसली. ती ह्मणाली 'आह्मी जातों आहों चिंचगांवला. '

"चिंचगांवला !" दादा मध्येंच उद्गारले.

"पुढें तर ऐका. मीं त्यांनां दरडावून विचारलें 'चिंचगांवला कोणाच्या घरीं जातां आहां तुम्ही ?' ती ह्मणाली 'देशपांड्यांच्या घरीं ! मी ह्मणालों 'देशपांड्यांच्या घरीं?' काय सांगतेस तूं ? साऱ्या चिंचगांवांत तर देशपांड्यांचें एकहि घर नाहीं. फसवायला पहातां काय मला ?' माझी ही दरडावणी ऐकून ती सधवा बाई तर थरथर कांपूंच लागली. ती थेरडीहि गप्प राहिली. दादासाहेब, त्यांचें हें वर्तन पाहून तर माझ्या मनांतला संशय अधिकच दुणावला. पुनः मीं त्यांनां विचारलें 'तुह्मी कोण आहां, इतक्या रात्रीं कुठें एकट्याच चाललां आहां, तें सारें खरेंखरें मला सांगा, नाहीं तर अश्शा नेऊन तुम्हांला चौकीवर डांबून टाकतों. मी कोण तें तुह्मांला ठाऊक आहे ? मी येसवा–इथल्या चौकीवरचा अंमलदार नाईक आहें, ' असें ह्मणून दोन चार पावलें मागें हटून ही माझ्या हातांतली लाठी जोरजोरानें पट्ट्याप्रमाणें फिरवूं लागलों. माझ्या या दटावणीचा अगदीं हवा तोच परिणाम झाला बरें का दादासाहेब ! ती थेरडी कांपतकांपत हात जोडून ह्मणाली ' शपथ आहे नाईकसाहेब, तुह्माला तुमच्या बायकोची ! आह्मांला मारूं नका. आमच्यावर दया करा–दया करा ! आह्मी कांहीं चोर नाहीं–दरोडेखोर नाहीं.' 'मग कोण आहां तुह्मी सटव्यांनों ? ' मीं जोरानें विचारलें. ती कांपतकांपत ह्मणाली 'आह्मी अगदीं निरपराधी आहोंत. अगदीं साव माणसें ! ' ' कोण तूं ! तुझें नांव काय ? रहातेस कुठें ? ' ती ह्मणाली ' माझें नांव टमाकाकू देशमुखीण. माझें घर कांदगांवला. ' ' अन् ही कोण ? ' ' ही चांदगांवच्या सरदेशमुखांची मुलगी कावेरी ?' "

" कावेरी ! ह्मणजे सरस्वती ! " दादा आपणाशीं पुटपुटले. दरवाज्यामागें उभ्या असलेल्या बायकांमध्येंहि या वेळीं बरीच चळवळ उडालेली दिसली. गणपतरावांनीं एक मोठा उसासा सोडून दोन्ही हातांनीं मस्तक घट्ट दाबून धरलें.

येसबा नाईक जरा संशयाच्या मुद्रेनें इकडेतिकडे पाहूं लागले. दादासाहेब ह्मणाले " हं नाईकसाहेब पुढें काय ? "

येसवा सांगूं लागले, " ती बाई पुढें ह्मणाली ' या मुलीला मी तिच्या माहेरीं घेऊन जातें आहें.' मी ह्मणालों 'तर मग मघाशीं काय मला सांगितलेंस, कीं, चिंचगांवला देशपांड्यांच्या घरीं आपण चाललों आहों ह्मणून ?' ती हात जोडून ह्मणाली ' चुकलें बाबा, चुकलें. तें मीं तुह्माला चुकून सांगितलें. बिंबवलीच्या देशपांड्यांच्या घराहून आह्मी आलों. दादा देशपांड्यांची ही धाकटी भावजय.' तिनें ही हकीगत सांगितल्यानंतर मीं त्या दोघींनां सोडून दिलें; परंतु आपणाला खरें सांगायचें दादासाहेब, ह्मणजे मनाची कसकस कांहीं माझ्या दूर झाली नाहीं. ह्मणून घरीं आल्यानंतर मनांत असा विचार आला, कीं, दादासाहेबांकडे जाऊन प्रत्यक्ष त्यांनांच एकदा विचारावें अन् मनाचा संदेह दूर करावा, ह्मणून या भलत्याच वेळीं हा मी इथें आलों."

" तें ठीक केलेंत तुह्मीं. "

" तर मग त्या सटवीनें जें मला सांगितलें, तें खरें ह्मणतां ?"

दादा एकदा खांकरले, व त्यांनीं गणपतरावांकडे पाहिलें. नंतर ते ह्मणाले "हो, बरोबर सांगितलें तिनें."

येसबा ह्मणाला "बरें तर येतों मी आतां. रामराम दादासाहेब ! "

" रामराम ! "

नाईक निघून गेल्यानंतर, आपल्या छातीवरचें एक केवढें तरी ओझें उतरलें असें वाटून घरांतील मंडळीला किंचित् समाधान वाटूं लागलें. त्यांनां हायसें झालें. तर मग गणपतरावांचा तर्क बरोबर होता ह्मणावयाचा ! सरस्वती एकंदरींत तर मग सर्वांनां फसवून नवऱ्याबरोबर त्याच्या नोकरीच्या गांवीं जावें लागेल या भयानें रातोरात माहेरीं पळून गेली !

सरस्वतीचें माहेरीं पळून जाणें खरोखरच अयोग्य होतें; परंतु तिच्याबद्दल कोणाकोणाला—विशेषतः वहिनींनां जी भयंकर—अत्यंत दारुण—शंका आली होती, त्या शंकेच्या विषयीभूत पापाशीं तुलना करतां तिचा हा अपराध शंभरपटीनें, हजारोंपटीनें गौण होता, यांत तिळप्राय संशय नाहीं. चांदगांवची ठमाकाकू ही बाई प्रसिद्ध असून देशपांड्यांच्या कुटुंबाशीं तिचा साधारण चांगल्यापैकीं परिचयहि होता. दादांच्या घरीं ती यापूर्वी पांचसात वेळ आलीहि होती. ठमाबाईबरोबर सरस्वती निघून गेली, तरी कांहीं त्यांत मोठीशी अडचण किंवा भीति नाहीं. नवऱ्याबरोबर त्याच्या नोकरीच्या गांवीं जावें लागेल या भयानें सरस्वती सासरच्या मंडळीच्या नकळत रातोरात माहेरीं पळून गेली, अशी बातमी जेव्हां गांवांत पसरेल, त्या वेळीं लोक तिची बरीच निंदा करतील, तिच्या स्वैरवर्तनाला हंसतील, 'स्वैर', 'स्वच्छंदी', 'स्वतंत्र' वगैरेवगैरे विशेषणकुसुमांनीं तिची पूजा करतील, हें कांहीं खोटें नव्हे. त्यांची ती निंदा, पूजा पुरवली. पण ज्या भयंकर निंदेचा वर्षाव होऊन कुटुंबांतील साऱ्या मंडळीला जगांत तोंड दाखवावयाला जागा राहिली नसती, ती निंदा परमेश्वराच्या कृपेनें टळली, हेंच त्याचे महदुपकार नाहींत का ? मोठ्या भयंकर प्राणसंकटांतून वांचल्यासारखें सर्वांनां वाटलें. आणि त्यांनीं सुटकेचा एक मोठा निःश्वास टाकला. सर्वांत गणपतरावांच्या मनावरचा प्रचंड बोजा उतरला. त्यांच्या साऱ्या शंका, दुर्भावना दूर होऊन त्यांनां पुनर्जन्म झाल्यासारखें वाटलें. त्यांच्या मनाला आणि शरीराला अत्यंत प्रसन्नता व प्रफुल्लता वाटूं लागली. साऱ्या जन्मांत जें समाधान त्यांनां कधीं झालें नाहीं, तें या प्रसंगीं त्यांनां वाटूं लागलें.

येसवा नाईकाच्या तोंडची बातमी ऐकून पहिल्या सपाट्याला दादांनां किंचित् बरें वाटलें खरें; परंतु मागाहून सारें गाडें उलटलें. त्यांनां सरस्वतीचें वर्तन अत्यंत अक्षम्य वाटून तिचा भारी राग आला. कानांवर हात देऊन त्यांनीं व्याख्यानाला सुरवात केली "छे छे छे छे! कुळ बुडवलेंन्—नांव बुडवलेंन् आमचें सटवीनें ! आह्मांला जगांत तोंड काढायला जागा टेवलीन् नाहीं ! आमचें सर्वांचें तोंड काळें झालें ! पहा तर खरें चांडाळणीचें एकएक कृत्य ! अगोदर मुळीं सासरली येण्यासंबंधाचाच हट्ट ! एवढी थोरली घोडी झाली, तरी माहेरीं रहायला तिला कांहीं वाटत नाहीं अन् तिच्या गधड्या आईबापांनां त्याहिपेक्षां कांहीं लज्जा नाहीं. बरें, मोठी माराकूट करून आली एकदांची स्वारी घरीं आह्मां सर्वांनां उपकाराच्या भाराखालीं मारायला, तर रहायचें तरी होतें गुण्यागोविंदानें सर्वांशीं मिळून मिसळून ! सर्वांशीं आपली हिची तेढ अन् धुसफुस ! पुढें काल तर साऱ्यावर अगदीं कळसच चढविलान् ! काय ढालगज बायको तरी ! एवढ्या रात्रीं कुणाला न कळवतां बापाच्या घरीं एकटी निघून गेली. माहेरीं जर जायचेंच होतें, तर बाई, आह्मांला सांगून सवरून तरी जायचें होतेंस.

आह्मीं कुणीं तुला हरकत केली असती, तर आमच्या थोबाडांत दहा पायपोस मारायचे होतेस! कुणाला न कळवतां माहेरीं जाण्यांत सटवीनें साधलें तरी काय? आह्मां सान्यांचा अगदीं जीव खाल्लान्–प्राण खाल्लान्! इतका वेळ आमच्या डोळ्यामध्यें अगदीं प्राण येऊन ठेपले होते. देवानें या नाईकाला पाठवलन् तेव्हां कुठें आमच्या जिवांतजीव आला एकदांचा!"

"बरं पण, गेली तरी कशी अगदीं सान्यांनांच फसवून?" वहिनींनीं हळूच रंजूक झाडली.

"मी सांगतों कशी तें." दादासाहेब ह्मणाले. "सरस्वतीनें आईला खात्रीनें इथून पत्र पाठविलें. त्यांत तिनें खूब रडगाणें गायलें असेल, आईला आणाशपथा घातल्या असतील. आपले इथें अगदीं हालहाल करताहेत, असें रडून गोंधळ करून तिनें पत्रांतून आईला कळवलें असेल. ठमाबाईला पाठवून तूं मला इथून हळूच घेऊन जा. मी तिच्याबरोबर गपचूप निघून येतें, असें तूं केलें नाहींस तर या जन्मांत माझें कांहीं तुला दर्शन व्हायचें नाहीं, असें तिनें तिला लिहिलें असेल. मी म्हणतों, सरस्वती एक लहान पोर, तिला अक्कल नाहीं, बुद्धि नाहीं, दूर दृष्टि नाहीं; पण तिची आई तर पोर नाहीं ना? सत्रा खंडी पोरें होऊन ह्मातारी झाली आहेना ती! आपली पोरगी जर अशी रात्रीं कुणाला न कळवितां सासऱ्याहून माहेरीं पळून आली, तर लोक-जन काय म्हणेल, आपली अन् तिच्या सासरच्या घराण्याची केवढी बेअब्रू होईल, याची त्या थेरडीला कांहींच का कल्पना असूं नये? छे, छे बुवा! असलें स्वैर वर्तन कोणाचें मीं नव्हतें कुठें पाहिलें. घोर कलंक! काळाकुट्ट डाग लावलान् आमच्या कुळाला चांडाळणीनें!"

दादासाहेब अगोदर फार बोलत नसत, आणि एकदां बोलूं लागले ह्मणजे त्यांचें चऱ्हाट कांहीं केल्या थांबत नसे. आज तसेंच झालें. आज ते भारीच भडकले होते. त्यांचें व्याख्यान किती वेळ तरी चाललें होतें.

वहिनी मध्येंच ह्मणाल्या "बरं आतां हवं तेवढं बोलबोलून घेतलं, ह्मणून झालेलं कांहीं परत का येणार आहे? चला, उठावं अगोदर आंघोळीला. भात केव्हांचा गार दिखील झाला असेल. भारी उशीर झाला. अन् भाऊजीं जेवून जाणार आहेत सासुरवाडीला बायकोच्या दर्शनाला!"

पुनः आग भडकली. बराच वेळ व्याख्यान झोडीत दादासाहेब आंतबाहेर आंतबाहेर करीत होते. शेवटीं एकदांचे मागीलदारीं स्नानाला गेले, आणि गणपतरावहि समोरच्या तलावाकडे निघून गेले.

गणपतराव स्नानाला गेले त्या वेळीं जवळजवळ दोन प्रहर टळून गेले होते. तलावावर आतां कोणी नव्हतें. जिकडेतिकडे अगदीं शुकशुकाट होता. बराच वेळपर्यंत गणपतराव स्नान करीत होते. स्नान करीत होते ह्मणजे मस्तकावर कळशांवर कळशा ओतीत होते, इतकेंच. त्यांचें सगळें चित्त सरस्वतीकडे लागून राहिलें होतें. त्यांच्या मनांत विचारलहरी तांडव करीत होत्या.

येसबा नाईकानें सांगितलेली हकीगत ऐकल्याबरोबर गणपतरावांच्या मनांत पहिल्या सपाट्याबरोबर आनंदाच्या लहरीची जी उसळी उसळली, ती नंतर फार वेळ टिकली नाहीं. आणि न टिकावी, हेंच निसर्गाला अनुसरून होतें. कारण, अगोदर तो आनंद ह्मणजे संकटापासून मुक्त झाल्याचा आनंद होता— एकाद्या अस्सल आनंदाच्या गोष्टीपासून उत्पन्न झालेला तो आनंद नव्हता. असा संकटमुक्तीचा आनंद फार काळ टिकणें शक्यच नसतें. गणपतराव तोंडानें काय वाटेल तें ह्मणोत, किंवा मनाची कशी हवी तशी समजूत घालण्याचा प्रयत्न करोत, जो दारुण संशय वहिनींच्या मनांत उत्पन्न झाला होता, तो जगांतील अत्यंत दुष्ट, काळाकुट्ट संशय गणपतरावांच्या मनांतहि उत्पन्न झाला असून त्यानें एकाद्या तीव्र विषारी सर्पाप्रमाणें त्यांच्या हृदयाला कडकडावून दंश करून त्यांच्या मनाची व शरीराची अगदीं आगीआग करून सोडली होती. येसबानें सांगितलेल्या हकीगतीवरून, आपली बायको ठमाबाईबरोबर माहेरींच निघून गेली असें जेव्हां त्यांनां कळलें, तेव्हां ज्या काळ्याकुट्ट कलंकानें आपलें तोंड जन्मभर काळेंच ठेवलें असतें, जन्मांत कधीं आपणाला जगांत वर तोंड करूं दिलें नसतें, अशा कलंकांतून तर आपली मुक्तता झाली, त्या दारुण अपमानांतून आणि लज्जेंतून तर आपण वांचलों, या विचारानें गणपतरावांनां निरतिशय आनंद व्हावा, हें साहजिकच होतें; परंतु नंतर दादासाहेबांनीं सरस्वतीसंबंधानें–तिच्या चरित्रासंबंधानें आणि चारित्र्यासंबंधानें–जें एक लांबलचक अश्राव्य व्याख्यान झोडलें तें सर्व त्यांनां अगदीं इच्छेविरुद्ध मुकाट्यानें ऐकून घ्यावें लागलें. विषच तें–इच्छेनें घ्या किंवा इच्छेविरुद्ध त्याचें सेवन करा–त्याचे दारुण परिणाम व्हावयाचे ते दोन्ही वेळ सारखेच व्हावयाचे. दादासाहेबांच्या

विषारी वाणीचा गणपतरावांच्या मनावर विषाप्रमाणें परिणाम होऊन त्यांच्या शरीराचा व मनाचा अत्यंत दाह होऊं लागला.

आतां गणपतरावांनां पूर्ण एकान्त मिळाल्यामुळें, त्यांच्या विचारलहरींनां त्यांच्या हृदयावर तांडव करावयाला हवातसा अवसर मिळाला होता. स्नान करीत असतां ह्मणजे शून्य मनानें मस्तकावर एकसारखें पाणी ओतीत असतां गणपतरावांचें हृदय एकसारखें खचूं लागलें–त्याला विलक्षण क्लान्ति उत्पन्न झाली. आपली ही बायको ! आपली ही अर्धांगी ! आपल्या गृहाची लक्ष्मी आणि संसाराची स्वामिनी ! आपल्या धर्मपत्नीच्या प्रेमाचा, ममतेचा, स्नेहाचा आणि कळकळीचा हा मासला ! आपल्या लग्नाच्या पतीबरोबर त्याचा संसार करण्याकरितां दूर परदेशीं जावें लागेल, ह्मणून ती बेलाशक घरांतून पळून गेली ! पळून जातांना तिनें नवऱ्याची, आप्तेष्टांची, समाजाची, जनलोकाची, जगाची, कोणाचीच लवमात्र परवा ठेविली नाहीं ! मागचापुढचा कांहीं विचार केला नाहीं ! एकाद्या ज्ञानशून्य, अदूरदृष्टि पशूप्रमाणें दावें तोडून ती सैरावरां पळत सुटली ! ही बायको कीं कुळाची दिवटी ?

अशा स्त्रीचा स्वीकार करणें तरी योग्य आहे का ? 'धर्मपत्नी' या शब्दानें ध्वनित होणाऱ्या उच्च पदवीला तिचें हें स्वैर वर्तन तिला पूर्णपणें अपात्र ठरवीत नाहीं काय ? संसाराची स्वामिनी किंवा गृहिणी व्हावयाला ही स्वैरिणी कुलटा योग्य आहे असें ह्मणणें ह्मणजे गोंदवी आणि गाई या उभयतांमध्यें कांहींच फरक नाहीं असेंच ह्मणण्यासारखें नाहीं का ? अशी स्त्री संसारांत जोडीदार ह्मणून घेण्यांत फायदा तरी काय ? तिच्यापासून साऱ्या संसाराचाच बोजवारा उडणार नाहीं का ? समजा, जुलूमजबरदस्ती करून, हातपाय बांधून अशा बायकोला आपण आपल्या संसारासाठीं बरोबर घेऊन गेलों, तरी त्यापासून आपणाला सुखाचा अंश तरी लाभेल काय ? आपला संसार पार तरी पडेल का ? संसाराची धूळधाण उडणार नाहीं का ? अशा कुलकलंक स्त्रीपासून सांसारिक सुखाची आशा करणें ह्मणजे आकाशपुष्पापासून मधुर मकरंद सेवन करण्याची इच्छा करण्यासारखेंच मूर्खपणाचें आहे. काय दुष्ट, मूर्ख बायको तरी ! मी आज येणार हें पूर्णपणें माहीत असतां, काल रातोरात ती बेलाशक पळून गेली ! माझ्या नुसत्या भेटीसाठीं देखील थांबली नाहीं ! मी ह्मणजे कोण, एकादा भयंकर राक्षस आहें, असें तिला वाटलें काय ? माझ्या बरोबर दुधईला यावयाचें तिच्या मनांत नव्हतें तर येऊं नये होतें, जन्मभर आईच्या लुगड्याच्या पदराचा आश्रय घेऊनच माहेरीं रहावयाचें होतें; परंतु इतक्या दिवसांच्या क्रूर विरहानंतर माझी एकदां तरी भेट घ्यायला तिला हरकत काय होती ? मला निदान एकवार तरी आपल्या मुखड्याचें दर्शन द्यायला तिला एवढी भीति कसली वाटली ? दुष्ट चांडाळ कुलांगार बायको !

वरून थंड पाण्याचा सारखा मारा होत असतांहि गणपतरावांचें मस्तक या वेळीं अगदीं भडकून गेलें. पाण्यानें कधींकधीं आग विझण्याऐवजीं अधिकच भडकते ह्मणतात, तें कांहीं खोटें नव्हे. अभिमानानें, क्रोधानें, गणपतरावांच्या हृदयाला नुसती आगीआग लागली होती. सासुरवाडीला जाऊन तरी आतां काय करावयाचें आहे ? असल्या बायकोच्या माहेराचा अन् आपला आतां संबंध काय ? तिचे दुष्ट आईबापच या साऱ्या अनर्थाचें कारण ! त्यांच्याच फुसलावणीवरून आपणाशीं ती इतक्या विरक्तपणानें, निष्प्रेमानें व दूरीभावानें वागूं लागली. त्यांच्यामुळेंच नवरा ह्मणजे 'कः पदार्थ' असें तिला वाटूं लागलें, आणि त्यांच्याच दुष्ट प्रेमामुळें साऱ्या जगाचा बोल आपणावर ओढून घेऊन सासऱ्याहून गुप्तपणें पळून जाण्याचें नीच कृत्य करावयालाहि ती तयार झाली ! असले नीच सासूसासरे ज्या घरांत आहेत, त्या घरीं जाऊन तरी काय करावयाचें आहे ? त्यांचें आतां दर्शनहि नको ! त्या सासूसासऱ्याशीं आणि असल्या कुळाच्या दिवटीशीं कसला–कसला ह्मणून यापुढें संपर्कहि नको ! मी तरी त्यांची आतां कशाला परवा करूं ? माझें जर त्या दुष्ट चांडाळणीला दर्शनसुद्धां नको, तर मी देखील तिचें तें काळें तोंड कधीं जन्मांतहि पहाणार नाहीं ! मला काय ? मी पुरुष आहें ! मी लाथ मारीन तेथें पाणी काढीन ! मी तिच्या नाकावर टिच्चून पुनः लग्न करीन आणि तिच्या डोळ्यांदेखत नवीन बायकोबरोबर मोठ्या थाटानें संसार करीन ! सोडतों का काय ? पहाच ह्मणावें आतां चमत्कार !

अशा तऱ्हेची विचारपरंपरा मस्तकांत थैमान घालीत असतां गणपतराव एकदांचे स्नान करून घरीं आले.

दादा केव्हांच स्नान करून आले असून संध्या, पूजा वगैरे आन्हिकें आटोपून बंधुराजांची वाट पहा

पाटावरच बसले होते. गणपतरावांची संध्या वगैरे आपली यथातथाच होती. वहिनींनीं पानें मांडलींच होतीं. झट्पट तीन आचमनें टाकून व मिनीटभर जानव्यांत हात घालून गणपतरावांनीं आपली संध्या ' के—स्तु ' केली व दोघेहि बंधु जेवावयाला बसले.

दादासाहेब आपल्याच विचारांत व्याापृत असल्या-मुळें म्हणा, किंवा वहिनीबाईंनींहि मुळींसुद्धां न बोल-ण्याची मेहेरबानी केल्यामुळें म्हणा, उभयतां बंधूंचें भोजन तर मुकाट्यानें पार पडलें. अगदीं चुकून चकार शब्दहि कोणीं काढला नाहीं.

जेवण आटोपतांच दादा मुकाट्यानें आपल्या खोलींत वामकुक्षीसाठीं गेले. गणपतरावहि ओटीवर आपला ' बिछाना ' पसरून त्यावर लवंडले. त्यांनां जरी गाडींत बहुतेक रात्रभर जागरण घडलें होतें, तरी मस्तकांतील विचारांच्या तांडवापुढें या वेळीं झोंप येणें बिलकूल अशक्य होतें. ते विचार करूं लागले—आज तर खूबच वेळ झाला या साऱ्या भानगडीमुळें ! पूर्वी ठरल्याप्रमाणें आज तर कांहीं दुधईला जाण्यासाठीं आपलें निघणें होत नाहीं—नाहीं तर नाहीं—एका दिवसानें काय होतें आहे ? उद्यांच निघूं झालें !

सरस्वतीचा जन्माचा त्याग करून, तिच्या नाकावर टिच्चून दुसरें लग्न केल्याशिवाय कांहीं झालें तरी रहावयाचें नाहींच, असा गणपतरावांनीं इतक्या अवकाशांत आपल्या मनाशीं ठाम निश्चय करून टाकला होता. कांहीं झालें तरी हा निश्चय कांहीं आतां बदलावयाचा नाहीं, असेंहि त्यांनीं ठरविलें होतें. तरी पण एकदा बायकोची शेवटची भेट घ्यावी, व आपला हा निश्चय तिच्या एकदा कानांवर घालावा; नाहीं तर आपण तिच्याशीं जरा अन्यायानें वागल्या-सारखें होईल, असेंहि त्यांनां वाटत होतें.

शेवटीं चांदगांवाला तर आज जाऊन यावेंच, असें गणपतरावांनीं ठरविलें. चांदगांवाला जाऊन सरस्वतीला भेटावें, व तिला एकदां मनखुलास सर्व कांहीं सांगावें, असें त्यांनां वाटूं लागलें. ते सरस्वतीला भेटून अगदीं स्पष्ट शब्दांत सांगणार होते—' हें बघ, तूं केलेंस तें अगदीं नीचपणाचें कृत्य, यांत अगदीं संशय नाहीं; पण तुझ्या गळ्यांत मीं एकदा लग्नाची माळ घातली आहे, धर्मपत्नी म्हणून तुला चारचौधांदेखत कबूल केलें आहे, तेव्हां तुझा एकदम त्याग मी करीत नाहीं. एवढा एकच अपराध मी तुला क्षमा करतों. इतर लोकांच्या बायका जशा गोडीगुलाबीनें, प्रेमानें, आपलेपणाच्या भावानें संसार करतात, तसा सुखानें संसार तुला करायचा असला, तर माझ्याबरोबर आजच्या आज चल. आईबापांची ही खोटी माया सोड. तुला ते कांहीं जन्माचे पुरायचे नाहींत. बरें, तुझी जर अशी इच्छा नसेल, आईबापांनां सोडून तुला जर माझ्याबरोबर यायचें नसेल, तर या वेळीं मला तसें कायतें स्पष्ट सांग. म्हणजे मागाहून उगीच कुणाची तक्रार नको. हो, आपलें आधींच स्पष्टास्पष्ट काय तें तोंडावर झालेलें बरें. तूं येत नसलीस माझ्याबरोबर, तर पहिल्याच मुहूर्तावर मी आपला दुसरें लग्न करणार, हें तुला मी स्वच्छच सांगून टाकतों ! हो, तूं एक नवरा सोड-लास, म्हणून मला तर कांहीं संसारावर नाहींना पाणी सोडतां येत ? मी दुसरें लग्न करणार, अन् त्या बायको-बरोबर सुखानें संसार करणार. 'आपणाला आगाऊ यांतलें कांहीं कळवलें नाहीं,' अशी पुढें तुला कांहीं तक्रार करायला जागा राहूं नये म्हणून हें तुला स्वच्छ सांगायलाच आज मी इथें आलों आहें—बोल, मग काय विचार आहे तुझा ?'

अशा तऱ्हेचे डोक्यांत विचार चालले असतां मध्येंच चमकल्यासारखें करून गणपतरावांनीं उठून खिशांतून घड्याळ काढून पाहिलें, तों बरोबर दोन वाजले होते. तसेच त्यांनीं आपले कपडे चढविले, आणि छत्री हातीं घेऊन ते सासुरवाडीला जावयाला निघाले. आपलें सासुरवाडीला जाणें दादांनां किंवा वहिनींनां मुळींच पसंत नाहीं, मग उगीच कशाला त्यांनां सांगावयाला जा ? मुकाट्यानें निघून जावें, असा विचार करून ते निघाले.

गणपतराव दरवाज्यापर्यंत जात आहेत, इतक्यांत कोठूनशी वेणू धांवतधांवतच तेथें आली, व आपल्या चिमुकल्या हातांनीं त्यांचा कोट धरून म्हणाली "काका—"

" काय बाळ ? "

" तुम्ही माझं एक ऐकाल ?"

ही एवढीशी पोरगी आपणाला एवढें खरावून काय विचारते आहे, हें गणपतरावांनां कळेना. त्यांनीं विस्म-यानें विचारलें " काय तें ?"

" तरी पण सांगा, ऐकाल ना ?"

गणपतराव हंसून म्हणाले "हो, ऐकेन. तुझें ऐकायचें नाहीं, तर मग ऐकायचें ग कोणाचें ? "

" तुह्मी काकूकडे जातां आहां—"

" होय."

"काका, काकूला तुह्मी फार रागं नाहींना भरणार?"

त्या दुःखाच्या प्रसंगींहि वेणूच्या या पोक्तपणाच्या वर्तनानें गणपतरावांनां हंसूं आल्यावांचून राहिलें नाहीं. ते ह्मणाले " नाहीं. तूं सांगत आहेस इतकें, तर मी फार नाहीं रागावणार. झालें ?"

काकांनीं दिलेल्या या वचनामुळें बालिकेच्या मनाचें समाधान होऊन तिच्या चेहऱ्यावर प्रसन्नता विलसूं लागली. ती ह्मणाली " अगदीं मुळींच रागवूं नका हो! काकू आमची भारीच चांगली आहे. "

वेणूचे हे शब्द गणपतरावांच्या हृदयाला अतिशय झोंबले. 'काकू चांगली आहे!' खरेंच का सरस्वती चांगली आहे ? गोड पोरगी ! तिला काय बिचारीला ठाऊक काकू खरोखरीच कशी आहे ती !

" नाहीं ना रागावणार, काका ?"

शुष्क कंठानें गणपतराव ह्मणाले " नाहीं—"

" बरं, परत कधीं याल, काका ? " गणपतरावांचा हात आपल्या चिमुकल्या हातीं धरून, त्यांच्याकडे आतुरदृष्टीनें पाहून वेणूनें विचारलें.

" येईन, उद्यांच येईन. "

" नाहीं तर आपले जाल परस्पर काकूला घेऊन. काकूला मला भेटायचं आहे बरं का, काका ! "

"ठीक आहे." असें ह्मणून, वेणूची हनुवटी हलवून, गणपतराव घरांतून बाहेर पडले.

प्रकरण चवथें.

सासुरवाडीला !

चांदगांव हा गांव कांहीं मोठा नव्हता. होता लहानच; पण मोठा टुमदार, सुंदर आणि शोभिवंत असा होता. त्याच्यांत रखरखीतपणा, किंवा रुखेपणा असा बिलकूल कोठें नसून जिकडेतिकडे रम्यता, शांति आणि मोहकपणा यांचेंच साम्राज्य चाललेलें आढळून येत असे. गांवांत जिकडेतिकडे हिरवागार रंग बघून नेत्रांनां शांतिसमाधान वाटे. गांवांतील बहुतेक जमीन चिंतामणराव देसाई नांवाच्या श्रीमंत गृहस्थांच्या मालकीची असून आसपासच्या गांवांमध्येंहि त्यांचा पुष्कळच जमीनजुमला होता. यामुळें चिंतामणरावांच्या मागें 'श्रीमंत ' व पुढें ' जहागीरदार ' किंवा ' इनामदार ' अशा पदव्या लोक साहजिकच जोडून देत.

आमच्या गणपतरावजींचे श्वशुर दामोदरपंत सरदेशमुख हे या चांदगांवचेच रहाणारे, हें वाचकांनां माहीतच आहे. दामोदरपंत घरचे खाऊनपिऊन चांगले सुखी असून त्यांची सावकारीहि साधारणपणें बरीच मोठी होती. गांवचे 'इनामदार' चिंतामणराव यांच्याशीं दामोदरपंतांचा चांगला स्नेह असून त्या दोन कुटुंबांमध्यें चांगला प्रेमभावहि होता. चिंतामणराव व दामोदरपंत यांच्यामध्यें रक्तसंबंधानेंहि कांहीं दूरचें नातें होतें.

फेब्रुआरीची दहावी तारीख ह्मणजे आमचे गणपतरावजी बिंबवलीला बायकोला नेण्यासाठीं आले तोच दिवस ! साडेतीन चार वाजण्याची वेळ ! भोजनानंतर तास दोन तास वामकुक्षी करून दामोदरपंत नुकतेच आपल्या दिवाणखान्यांत येऊन आरामखुर्चीवर पडले होते. इतक्यांत डाकेच्या शिपायानें येऊन एक मराठी वर्तमानपत्र, एक कार्ड व एक पाकीट असें ' टपाल ' त्यांच्या हातीं दिलें व तो निघून गेला.

दामोदरपंतांनीं वर्तमानपत्र व कार्ड तसेंच खालीं बैठकीवर टाकलें आणि लिफाफ्यावरील हस्ताक्षर पाहून, तोंच पहिल्यानें फोडून, त्यांतील पत्र बाहेर काढून तें वाचावयाला सुरुवात केली. पत्र कांहीं तरी महत्त्वाचें असावें असें दिसत होतें. कारण, दामूअण्णा तें अगदीं लक्ष्यपूर्वक वाचीत होते. मधुनमधून त्यांच्या कपाळाला आंठ्या पडत होत्या, व मधुनमधून त्यांच्या चेहऱ्यावर किंचित् प्रसन्नताहि दिसत होती.

दामूअण्णांचें यांप्रमाणें पत्रवाचन चाललें आहे, इतक्यांत त्यांचे शेजारी मोरोपंत नाना दप्तरदार अगदीं उघडेबोडके, खांद्यावर उपरण्याची घडी टाकून पायांतील खडावा चट्चटावीत तेथें आले.

उमरठ्याच्या आंत त्यांचा पाय पडतो न पडतो आहे तोंच त्यांनीं विचारलें "काय अण्णा, आलें का टपाल ?" पत्र वाचतांवाचतांच अण्णांनीं उत्तर दिलें "हें आतांच—"

"आहे का आम्हाला कांहीं खाय ?" हंसतहंसत नानांनीं विचारलें.

चष्म्याच्या भिंगावरून नानांकडे एकवार पाहून अण्णा किंचित् हसून म्हणाले " आहे–या नाना !"

आनंदानें आंत येऊन, खडावा काढून ठेऊन नाना जाजमावर बसले, व एकाद्या उंदरावर मांजर जशी एकदम झडप घालतें, त्याप्रमाणें, बैठकीवरच्या त्या वर्तमानपत्राच्या अंकावर नानांनीं झडप घातली. याप्रमाणें अंक एकदा हस्तगत करून घेतल्यानंतर, नेसल्या पंचाच्या कडोसरीला खोंचून आणलेलें चाळशीचें घर त्यांनीं बाहेर काढलें. नंतर तें उघडून, त्यांतून चाळशी बाहेर काढून, तिचीं दोन्ही भिंगें त्यांनीं खांद्यावरच्या उपरण्याच्या टोंकानें स्वच्छ पुसलीं. नंतर चाळशी डोळ्यांनां लावून, त्यांनीं वर्तमानपत्राचा तो अंक हातीं घेतला, आवरणावरच्या चिठीवरचा पत्ता एकदा नीट वाचला. नंतर वेष्टणाचा कागद फाडून, अंक उघडून, त्यांनीं अगदीं लक्ष्यपूर्वक तो वाचावयाला सुरुवात केली.

आमच्या मोरूनाना दप्तरदारांप्रमाणें मराठी वर्तमानपत्रांचा भुकेलेला वाचक साऱ्या नाशिकजिल्ह्यांत एकतरी असेल कीं नाहीं, याबद्दल आम्हाला जबरदस्त शंका आहे. ज्या दिवशीं 'केसरी' टपालांतून चांदगावाला येत असे, त्या दिवशीं, तीर्थस्थानावरील काकपक्ष्याप्रमाणें, अगर पारशांच्या दोखम्यावर घिरट्या घालणाऱ्या गृध्रपक्ष्याप्रमाणें, दामूअण्णांच्या केसरीच्या अंकासाठीं मोरूनाना अत्यंत उत्कंठेनें टपून बसलेले असत. टपाल येतें कधीं आणि 'केसरी'चा अंक आपल्या हातीं पडतो कधीं, असें त्यांनां होऊन जाई ! मात्र नानांची एक मोठी खुबी होती. वर्तमानपत्रें वाचण्याचा जरी त्यांनां याप्रमाणें जबरदस्त 'शोख' होता, तरी ते 'असल्या क्षुद्र नादापायीं' एक कपर्दिकाहि खर्चीत नसत. 'परस्पर पावणेतेरा' हा त्यांचा न्यायमंत्र होता ! वर्तमानपत्रें वाचल्यावांचून तर नानांना अन्न देखील सुचत नसे, पण आपला हा 'शोख' ते दुसऱ्यांच्या पैशांनीं पूर्ण करून घेत. इतरांनीं वर्गणी भरून, त्यांचे टपालमार्गे आलेले हक्काचे अंक, मालकांच्या अगोदर आपणाला वाचावयाला मिळावे, अशी नानांची अपेक्षा असे, आणि ती त्यांच्या वयोवृद्धत्वामुळें, धसकनंदनी मूर्खपणामुळें, पोक्तपणामुळें व मालकांच्या सौजन्यामुळें व तीव्र जिज्ञासेच्या अभावामुळें बहुधा पूर्णहि होत असे. दामूअण्णांचा 'केसरी' आला, कीं, नाना ताबडतोब येऊन तो बेलाशक तसाच घरीं घेऊन जावयाचे, व तो दिवस आणि दुसरा संबंध दिवस तो वाचण्यांत घालवून, वरच्या थोरल्या 'केसरी' या अक्षरांपासून तों शेवटच्या पानावरील 'छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें' येथपर्यंतच्या जाहिराती व आंतील मजकूर यांतलें अक्षर न् अक्षर हळूहळू वाचून, तिसऱ्या दिवशीं तो चुरगळलेला व मळलेला अंक घरच्या एकाद्या शेंबड्या पोरीबरोबर अण्णांकडे पाठवून द्यावयाचे. अण्णांनीं हवा असला तर आपल्या मालकीचा तो अंक नंतर खुशाल वाचावा ! नानांची त्याला कांहीं हरकत नसे !

नानांची स्मरणशक्ति अगदीं असामान्य होती. पांच किंवा दहा वर्षांपूर्वी कोणत्या शहरीं कोणत्या इमारतींनां आग लागून किती लक्ष रुपयांचें नुकसान झालें, तें ते अगदीं 'बिनचूक' आणे–पैसुद्धां नेमके सांगत ! सांप्रतच्या राज्यपद्धतींतील दोषांमुळें आमचें कसकसें आर्थिक नुकसान होत आहे, तें नाना आंकडेवारीनें सिद्ध करून देत. त्यांच्यापासून नामदार गोखले, दादाभाई नौरोजी व रमेशचंद्र दत्त यांनींहि आंकडेशास्त्रांत धडे घेण्यासारखी त्यांची योग्यता होती. त्या वेळीं चाललेल्या बोअर युद्धाच्या बातम्यांत नाना अगदीं मशगुल होऊन गेलेले असत. युद्धाच्या बातम्यांपुढें त्यांनां जेवणखाणहि कांहीं सुचत नसे, असें म्हटलें असतां अतिशयोक्ति होण्याची मुळींच भीति नाहीं. दर आठवड्याची युद्धाची बातमी वाचून ती इतरांनां समजावून सांगणें म्हणजे नानांच्या हातचा नुसता मळ होता. सारी बातमी त्यांच्या अगदीं जिव्हाग्रावर असे. आमच्या नानांच्या अंगीं 'युद्ध–संजय' त्वाचाच एक गुण होता ? छट्, बिलकूल नाहीं ! समरांगणांतील सेनानायकांच्या रणपटुत्वासंबंधीं व त्यांच्या हालचालींसंबंधीं वाटाघाट करून त्यांचे गुणावगुण व इष्टानिष्टता ठरविण्यांत नानांसारखा अंतर्दृष्टि समालोचक एकहि नसेल ! युद्धाच्या बातम्या व स्फुटें वाचतांना नाना कागद पेन्सिल (हीं दुसऱ्यांच्याच घरचीं असत !) जवळ घेऊन बसत, व दोन्ही पक्षांचीं सैन्यदळें कोठें आहेत, त्यांपैकीं कोणीं कोठपर्यंत चाल केली, कोणीं कोणतें शहर अगर किल्ला काबीज केला वगैरे साऱ्या गोष्टी ते कागदावर नकाशे काढून त्यांत नमूद करून ठेवीत. एकादा पक्ष एकाद्या युद्धांत हरला, किंवा एकादें ठिकाण एकाद्या पक्षाच्या हातून शत्रुपक्षानें हिसकावून घेतलें, तर तो पराभव कोणाच्या कोणत्या चुकीमुळें झाला, तें ठिकाण शत्रूच्या कोणत्या रणक्लृप्तीमुळें हातचें गेलें, त्याचें सूक्ष्म आलो-

चन नाना इतरांसमोर तासन्तास करीत बसत. कागदावर ठिकठिकाणीं फुल्या आणि शून्यें मांडून शोक स्वरानें ते ह्मणत "हाय हाय ! जनरल अमूक या मार्गानें न जातां जर अशा रीतीनें गेला असता, अन् त्यानें असा हल्ला चढविला असता, तर त्याचा पराभव करण्याची शत्रूची काय छाती होती ! छे बुवा ! केवढी चूक–अगदीं गाढवपणाची चूक केली ही त्यानें ? एवढी जर डोक्यांत अक्कल नाहीं, तर जनरलगिरी करतो तरी कशाला हा ? बंदूक टाकून वस्त्रा कां नाहीं घेत हातीं ! ह्मणे जनरल–सेनापति !"

आज नाना 'केसरी' वाचीत अण्णांच्या दिवाणखान्यांतच बसले. सुमारें अर्धाएक तास वाचल्यावर नाना ह्मणाले "काय अण्णा, 'युद्धसंवाद' वाचायला लागूं का आतां ?"

अण्णांनांहि युद्धाच्या बातम्या ऐकावयाचा मोठा शोक ! परंतु त्यांतील संगति त्यांनां नीटशी कळत नसल्यामुळें त्यांतील 'रम्यत्वा'चा त्यांनां चांगला आस्वाद घेतां येत नसे; यामुळें ते नानांनां 'शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम्' असें ह्मणून या बाबतींत शरण गेले होते, व नानांनींहि प्रसन्न होऊन आपल्या शिष्याला हें ज्ञान करून देण्याचें काम आपल्या शिरावर मोठ्या आनंदानें घेतलें होतें. पत्रें वाचून अण्णा आतां मोकळेच झाले होते. ते ह्मणाले "वाचा—"

तेव्हां नाना, अगदीं हळुहळू, अत्यंत गंभीरपणानें 'युद्ध–संवाद' वाचूं लागले. मधुनमधून एक दोन बातम्या वाचून झाल्या, कीं, अंक खालीं ठेवून ते कागद व पेन्सिल हातीं घेत व त्यावर खुणा करून त्याच्या साहाय्यानें अण्णांनां त्या बातम्या समजावून देण्याचा प्रयत्न करीत. मधुनमधून 'संवादा'वर ते तोंडानेंच 'मल्लिनाथी'हि करीत.

याप्रमाणें नानांचा 'युद्ध–संवाद' अगदीं ऐन रंगांत आला आहे, इतक्यांत बाहेर अंगणांत एक व्यक्ति येऊन उभी राहिली, व हातांतील उघडलेली छत्री तिनें मिटली.

अण्णा समोर पहातात, तों गणपतराव–जामात ! त्यांचा चेहरा घामानें अगदीं डवडवून निघाला असतांहि अगदीं शुष्क होऊन गेला होता. त्यांच्या अंगांतील कपडेहि घामानें ओले चिंब झाले होते–अंगहि रस्त्यांतील धूळ उडून अगदीं मलिन होऊन गेलें होतें.

गणपतराव अशा स्थितींत दृष्टीला पडतांच अण्णांनां आश्चर्य वाटल्यावांचून राहिलें नाहीं. घाईघाईनें उठून पुढें होऊन ते ह्मणाले "गणपतराव–या–या–बसा–"

दरवाज्यांत जोडा काढून ठेवून गणपतराव आंत आले, व त्यांनीं श्वशुरांनां नम्रपणें प्रणाम केला.

"काय, घरची मंडळी सारी खुशाल ?"

"हो—"

"बसा–अरे, कुणीतरी पाय धुवायला पाणी घेऊन या बरें झट्कन्. छे, काय घाम हा ! अगदीं घामाघूम झालां आहां ? पायींच आलांत वाटतें ?"

"हो—"

"इतक्या उन्हांतून पायीं कसे आलांत ? रस्त्यांत गाडी करावी होती कीं नाहीं एकादी ?"

"मधल्या वाटेनें आलों मी–सडकेनें नाहीं."

"अस्सें. दुधईहून कधीं आलांत ?"

"आज सकाळींच येऊन पोहोंचलों."

"आज सकाळींच ? मग रात्रीं जागरण झालें असेल ? त्रास झाला असेल प्रवासाचा ?"

"हो साधारण—"

"अरे, कोण तो वामन ? जा, आंत जाऊन सांग, म्हणावें गणपतराव आले आहेत. बरें झालें तुम्ही आलां तें. आलांत म्हणून भेट तरी झाली तुमची, नाहीं तर वर्षावर्षांत कांहीं भेट होण्याचा संभव नसतो–"

"खरें आहे."

"ताईला घेऊन आजच दुधईला जायचें असें ठरलें होतें नाहीं का तुमचें ? आजचाच दिवस ठरला होता ?"

"हो—"

"मग–आज नाहीं वाटतें जाणें होत ?"

आपल्या श्वशुरांनीं असा प्रश्न आपणाला कां करावा, हें गणपतरावांनां कळेना. ते गोंधळलेल्या मुद्रेनें त्यांच्याकडे पहात म्हणाले "नाहीं."

"मग कधीं जाणार ?"

"उद्यां संध्याकाळच्या गाडीनें."

"ठीक. रागावूं नका हां गणपतराव ! इतक्या आस्थेनें तुम्ही आम्हाला बिंबवलीहून मुद्दाम भेटायला आलांत, हें उत्तमच झालें. परंतु येतांना ताईलाहि बरोबर घेऊन आलां असतां, तर बरें नसतें का झालें ?"

"म्हणजे ?" गणपतराव आश्चर्यानें डोळे फाडून म्हणाले.

" म्हणजे काय ? ताई तुमच्याबरोबर आली असती तर बरें झालें असतें. आम्हां साऱ्यांनां भेटली असती. तिची आई सारखी दुःख करते आहे तिच्यासाठीं 'पोर इतक्या दूर परदेशीं जाणार—केव्हां परत येईल, किती दिवसांनीं तिची भेट होईल याचा नेमहि नाहीं. जातांना एकदां तरी भेट झाली असती तर बरें झालें असतें. मनाला रुखरुख लागून राहिली नसती !' असें तिची आई मघांशी नुकतीच म्हणाली."

श्वशुरांच्या तोंडचे हे शब्द ऐकतांच आपल्या मस्तकावर जणूं दारुण वज्राघातच झाला, असें गणपतरावांनां वाटलें. त्यांनीं दोन्ही हातांनीं डोकें घट्ट दाबून धरलें.

" काय म्हणतां ती—" एवढेच शब्द त्यांनीं कसे तरी उच्चारले.

" काय हें ?"

गणपतरावांच्या डोळ्यांसमोर भयंकर अंधारी आली. त्यांच्या नाकांतून, कानांतून, ओठांतून जणूं आगीच्या ज्वाला निघूं लागल्या. मस्तकांतून झिणझिण्यावर झिणझिण्या येऊं लागल्या. आपण आतां पडतों असें त्यांनां वाटूं लागलें.

" ताईला घेऊन—"

अण्णांचें हें वाक्य कांहीं पुरें झालें नाहीं, तों गणपतराव बेभान होऊन एकदम धाड्कन् जमिनीवर पडले.

" हें काय ? हें काय ? अरे, हें पहा काय तें—" अण्णांनीं एकदम आरोळी मारली. " अरे पाणी—पाणी—"

वामन—अण्णांच्या घरचा आश्रित मुलगा—जवळच होता, तो ही बातमी सांगावयाला धांवतच घरांत गेला. बातमी ऐकतांच घरांतून बायका वगैरे मंडळी धांवतच गडबडीनें बाहेर आली.

" पाणी—पाणी आणा !"

इकडेतिकडे एकच धांदल उडाली. कोणी पाण्यासाठीं ओरडूं लागला. कोणी ' पंखा पंखा !' म्हणून ओरडूं लागला. नाना गणपतरावांच्या अंगांतून कपडे काढूं लागले. इतक्यांत पाणीहि आलें होतें, तें घेऊन त्यांच्या तोंडावर ते त्याचे हबके मारूं लागले. नानांच्या हातून गडबडींत 'केसरी'खालीं पडला होता, तो घेऊन वामन गणपतरावांनां जोरजोरानें वारा घालूं लागला.

गणपतरावांच्या सासूबाई गोंधळून इकडेतिकडे पहात उभ्या राहिल्या. अण्णांची बहीण जामातांचें मस्तक मांडीवर घेऊन बसली, व डोळ्यांत पाणी आणून त्यांच्याकडे पहात रडतरडत म्हणाली "बाबा चांदेश्वरा, धांव रे धांव बाबा—आम्हां सगळ्यांची लाज राख. आई संकेश्वरी, धाऊन आमची लाज राख—"

सुदैवानें एक चांगले अनुभविक वैद्य जवळ रहात होते. त्यांनां बोलावणें जातांच ते त्वरेनें तेथें आले व त्यांनीं विचारलें "काय काय झालें, तें मला थोडक्यांत सांगा अगोदर—"

अण्णांनीं वैद्यराजांनां झालेली सर्व हकीगत संक्षिप्त रीतीनें सांगितली. वैद्यराज चांगले अनुभवी होते. त्यांनीं प्रसंगाला योग्य अशा त्वरेनें गणपतरावांच्या नाडीची, हृदयाची व मस्तकाची परीक्षा केली, व त्यांनां शुद्धीवर आणावयाचे घरगुती उपाय ताबडतोब सुरू केले. ते सफल झाल्याचें चिन्ह लवकरच दिसूं लागलें.

डोळे उघडून गणपतराव क्षीण दृष्टीनें इकडेतिकडे बघूं लागले. ते भांबावल्याप्रमाणें दिसत होते. आपण कोठें आहो, हें त्यांनां कळत नव्हतें, असें दिसलें.

जामातांचा हात आपल्या हातीं घेऊन अण्णांनीं विचारलें " कसें वाटतें आहे आतां, गणपतराव ? जरा बरें वाटतें आहे का ? "

गणपतराव क्षीण स्वरानें म्हणाले " काय झालें ? मी कुठें आहें ?"

" इथें—आमच्या इथें, चांदगांवाला !"

"हूः!" असें उद्गारून गणपतरावांनीं पुनः डोळे मिटले.

" गणपतराव ! गणपतरावजी—"

गणपतरावांनीं पुनः डोळे उघडले, व इकडेतिकडे पाहिलें.

"कसें काय वाटतें आहे आतां ?"

"बरें वाटतें आहे."

" बसतां येईल का ? जरा उठून बसा पाहूं—"

गणपतराव उठून बसावयाचा प्रयत्न करूं लागले; परंतु त्यांनां उठतां येईना. त्यांनां अतिशय क्लांति आली होती. सहा महिने अंथरुणाला खिळलेल्या रोग्याप्रमाणें ते अगदीं निशक्त होऊन गेले. दोघांनीं त्यांनां धरून, जवळच तयार केलेल्या बिछान्यावर नेऊन निजविलें.

त्यांचा शर्ट, गंजी फ्रॉक वगैरे कपडे पाण्यानें भिजून गेले होते. ते एकानें हळुहळू काढले, व आत्याबाईंनीं त्यांचें अंग स्वच्छ पुसलें. वामन जवळ बसून त्यांनां हळुहळू वारा घालूं लागला.

कांहीं वेळानें गणपतराव पुनः कण्हूं लागले.

" काय होतें आहे ? " अण्णांनीं विचारलें.

" भारी थंडी लागत आहे."

वामनानें वारा बंद केला. अण्णांनीं विचारलें "पांघरुण पाहिजे ?"

" होय. भारी थंडी. उहूहूहू—"

अण्णांनीं गणपतरावांवरती दोन ब्लँकेटें व एक जाड लेप आणून घातला. तरीहि त्यांची थंडी थांबेना ! सारखे आंतून वेग येत होते.

अण्णा ह्मणाले " अशा भयंकर उन्हांत, इतक्या दूर चालून आले कीं नाहीं–ह्मणून सरद–गर्मी झाली एकदम !"

गणपतराव डोळे मिटून आपणाशींच विचार करीत पडले होते. त्यांनीं मध्येंच डोळे उघडतांच आत्याबाई ह्मणाल्या " असं कां केलं ? चालत कां आलांत ? गाडी करून आलां असतां तर बरं नसतं का झालं ? सुखाचं शरीर–कधीं श्रम करायची सवय नाहीं–कोसभर चाललेलं कधीं माहीत नाहीं. मग एकदम श्रम झाले तर ते सहन कुठून होणार ?–"

" खरें आहे तुझें म्हणणें. " नाना मध्येंच म्हणाले. "जांवईबुवांनां इथें असें उघड्यावर ठेवणें कांहीं बरें नाहीं. यांनां आंत घेऊन जा–नीट अंगबिंग पुसून दुसरें धोतर, दुसरे कपडे द्या अन् निवाऱ्या अशा खोलींत खाटेवर चांगला बिछाना घालून यांनां निजवा. पहिल्यापासून नीट काळजी घेतली नाहीं, तर पुढें रोग कोणत्या थरावर जातो याचा नेम नाहीं."

बोअर–युद्धामध्यें अकल्पित रीतीनें भलतीच अडचण उपस्थित झालेली पाहून मोरूनानांच्या पायांची आग मस्तकाला गेली; परंतु करतात काय बिचारे ! जांवयाच्या आकस्मिक आजारापुढें त्यांचा 'युद्ध–संवाद' ऐकावयाला बिचाऱ्या अण्णांनां कोठें फुरसत होती ? अण्णांच्या उपेक्षेमुळें तर नाना भारीच त्रासून गेले, आणि जांवयाची ब्याद एकदांची घरांत जावो, म्हणून त्यांनीं वरीलप्रमाणें अण्णांनीं सल्ला दिली.

वैद्यबुवांनींहि, रोग्याला आंतील खोलींत नीट निजण्याविषयीं सल्ला दिली, आणि ते निघून गेले.

यावेळीं गणपतरावांनां पुष्कळच बरें वाटूं लागलें होतें. तरी त्यांचें मस्तक अजून फिरतच होतें. दोन्हीं बाजूंनीं दोघांनीं धरून त्यांनां हळुहळू आंत नेऊन निजविलें. अण्णाहि हळुहळू त्यांच्याबरोबर आंत गेले.

अण्णा जामातांनां निजवून 'युद्ध–संवाद' ऐकण्याकरितां लवकरच बाहेर येतील, अशी नानांनां आशा असल्यामुळें ते घरीं गेले नाहींत. तेथेंच बसून 'केसरीं'तील जाहिराती वाचूं लागले.

'वर्क्षास रुपये दहा !' ही पहिल्याच कॉलमांतील जाहिरात नानांनीं पुरी देखील वाचली नाहीं, तोंच बाहेर कोणी आल्याची चाहूल त्यांनां लागली. नानांनीं बाहेर पाहिलें, तों बंडोपंत बोडस अण्णांकडे येत आहेत, असें त्यांनां आढळून आलें. बंडोपंत हें चिंतामणरावांच्या घरचें एक प्रमुख थेंड होतें—त्यांचे हे दूरचे नातेवाईकहि होते.

बंडोपंत येतांच नानांनीं विचारलें " काय बंडूनाना ? काय—"

" अण्णा कुठें आहेत ?"

" हे आतांच आंत गेले—"

" थोडें काम होतें—"

" अण्णांचे जांवईबुवा आतांच आले अन् येतात न येतात तों एकाएकीं आजारी पडले ! अलीकडचीं काडीपैलवानें हीं !" असें ह्मणून नानांनीं त्यांनां सर्व वृत्तान्त सांगितला.

कांहीं वेळानें अण्णाहि बाहेर आले. नाना व बंडोपंत यांनीं दोघांनींहि विचारलें " काय–कशी आहे जांवईबुवांची तब्बेत ?"

" अंग एकसारखें गरम होतें आहे. मला वाटतें, थोड्याच वेळांत त्यांनां सडकून ताप येणार !"

इकडल्या तिकडल्या कांहीं गोष्टी झाल्यानंतर अण्णांनीं विचारलें " कायहो बंडूनाना, गंगाधराची कांहीं बातमी ?"

गंगाधर हा श्रीमंत जहागीरदारसाहेबांचा धाकटा भाऊ. काल रात्रीपासून तो नाहींसा झाला असून त्याचा कोठेंहि शोध लागत नव्हता. भावाचा शोध करावयाला चिंतामणरावांनीं चहूंकडे माणसें पाठविलीं होतीं; परंतु अजूनपर्यंत त्याचा कांहींच शोध लागला नव्हता. बंडोपंत म्हणाले " कुठें गेले बापूराव, कांहीं कळत नाहीं—"

"कांहीं थोडीबहुत देखील बातमी नाहीं लागली ?"

" अगदींच नाहीं असें नाहीं–थोडीशी लागली आहे. पण तिचा कांहीं त्यांच्या शोधाला फारसा उपयोग होत नाहीं. "

" सांगा तर खरी–" अण्णा म्हणाले.

"आम्हांला येथपर्यंत बातमी लागली आहे, कीं, काल रात्रीं-मध्यरात्र उलटून गेल्यावर, बापूराव अन् ती सटवी गांवची खरवड—"

"कोण बुवा ?"

"ती देशमुखीण ठमाकाकू हो! हीं दोघें चिंचगांवच्या बाजारपेठेकडे जातांना एकानें पाहिलीं. ही बातमी आमच्या कानांवर येतांच पहिल्या प्रथम आम्हीं त्या बयेला बोलावून आणली. आम्हीं तिला यासंबंधानें परोपरीनें विचारून पाहिलें—"

"मग झाली का कबूल ?"

"हो, होते आहे कबूल! साऱ्या मुलखाची छठ ती! तिनें कांहीं म्हणतां कांहींच कबूल केलें नाहीं. ती म्हणाली, कालच काय पण गेल्या आठ दिवसांत बापूरावाचें तोंड देखील आपण पाहिलें नाहीं—"

"मग चिंचगांवकडे ती गेली हें देखील खोटेंच का?"

"ठमाकाकू त्यासंबंधानें म्हणाली 'दहीवडीला आपला एक भाचा आहे, त्याचा काल निरोप आला, कीं, आपण भारी आजारी आहों-एकवार भेटून जा म्हणून-म्हणून काल रातोरात दहीवडीला जाऊन आज पहांटे आपण परतहि आलों ?'"

"मग चिंचगांवचा संबंध काय ?"

"चिंचगांवला जायचें म्हणजे दहीवडीच्या रस्त्यानेंच जावें लागतें, हें कांहीं खोटें नव्हे. त्या सटवीच्या बोलण्यावरून आम्हाला बापूरावांचा कांहींच पत्ता लागला नाहीं एवढें खरें. शोधासाठीं चहूंकडे माणसें रवाना झालीं आहेत-पण अजूनपर्यंत कांहींच पत्ता नाहीं. घरीं बायकामंडळींत तर एकच हलकल्लोळ उडाला आहे. वहिनीसाहेबांच्या तर डोळ्यांचें पाणी खळलें नाहीं."

अण्णा सहानुभूतीच्या स्वरानें म्हणाले "वहिनीसाहेबांच्या डोळ्यांचें पाणी न खळलें, तर त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. आमच्या घरांतल्या मंडळीला देखील गंगाधर नाहींसा झाल्याची बातमी ऐकल्यापासून चैन नाहीं बिलकूल! त्याचा पत्ता लागला अन् तो खुशाल आहे असें ऐकलें, म्हणजे गणपतीला एकवीस मोदक संकष्टीला चालायचा नवस देखील केला आहेन् ना तिनें! गंगाधराचा आमच्या घरीं म्हणजे केवढा घरोबा! नेहमीं यायचा जायचा खाय-पियायचा! आमची ही तर त्याला अगदीं पोटच्या मुलाप्रमाणें मानते ना प्रत्यक्ष! अहो, दूरचें नातें असलें म्हणून काय झालें बंडूनाना ? सगळें कांहीं मानण्यावर आहे—"

"खरें आहे-खरें आहे!" मान डोलवून बंडूनाना म्हणाले.

"कुठें गेला पोरगा-देव जाणे! चांगला सुखांत लोळत होता. वर भाऊसाहेबांचें अन् वहिनीसाहेबांचें चांगलें छत्र-कसली काळजी नाहीं कथा नाहीं! काय दुर्बुद्धीचे चाळे आठवले त्याला पहा! देव देतो न् कर्म नेतें म्हतात, तें असें! मी म्हणतों कुठें असेल तिथें सुखरूप तरी असला म्हणजे झालें! नाहीं तर मुंबईच्या त्या सोनेरी टोळीच्या सांगतात ना एकएक भयंकर गोष्टी ?"

"हं:!" सुसकारा टाकून बंडोपंत म्हणाले. "काय श्रीगजानन करील तें खरें. त्याला सर्व प्राणिमात्रांची काळजी आहेच!"

आणखीहि इकडच्या तिकडच्या गोष्टी त्यांच्यामध्यें झाल्या. नंतर संध्याकाळ झाली असें पाहून बंडोपंत व मोरूनाना आपापल्या घरीं निघून गेले. अण्णाहि आंत आले.

पहातात तों जांवईबुवा तापानें फणफणले असून अगदीं बेभान पडले आहेत! तीळमात्र देखील त्यांना शुद्धि नाहीं!

प्रकरण पांचवें.

संकट कधीं एकटें येत नाहीं!

आज अकाल दुर्दिन उद्भवलें होतें. जणूं काय अगदीं थेट पावसाळाच. अगदीं मृगालाच आरंभ झाला आहे! आकाशांत खूब मेघ जमले असून त्यांच्या छायेनें सारें काळेंकुट्ट होऊन गेलें होतें. वाराहि चांगला सडकून सुटला होता. त्यामुळें जिकडेतिकडे धूळच धूळ होऊन गेली होती. संध्याकाळपर्यंत पाऊस तरी नव्हता—परंतु तेव्हांपासून जोराच्या वृष्टीला आरंभहि झाला!

गणपतराव दुधई स्टेशनावरल्या आपल्या त्या पिंजरेवजा मकाणांत खाटेवर पसरलेल्या मळकट बिछान्यावर बसले होते, व त्यांनीं आपल्या गालाला

हाताचा टेंका दिला असून त्यांची दृष्टि खालीं जमिनीवर खिळली होती. त्यांनां कसली तरी जबरदस्त काळजी लागली असावी, किंवा त्यांच्या मनांत कसला तरी गहन विचार खेळत असावा, असें त्यांच्या एकंदर आविर्भावावरून दिसत होतें. बाहेर पडत असलेल्या जोराच्या पावसाचे कांहीं छटे वाऱ्यामुळें खिडकीच्या वाटेनें आंत येत असून त्यामुळें गणपतरावांच्या बिछान्याचा एक भाग भिजत होता. परंतु तिकडे त्यांचें बिलकूल लक्ष्यच नव्हतें. अंतःसृष्टीमध्यें जोराचें वादळ सुरू असतां बाह्यसृष्टींत चाललेल्या वादळाकडे कोणाचें लक्ष्य असणार ? त्याकडे सहानुभूतीच्या दृष्टीनें पहावयाला मन आणि मनोदृष्टि हीं तरी जागेवर असलीं पाहिजेत ना ?

आमचे गणपतराव खरोखरच अत्यंत अभागी ! त्यांच्यावर केवढी अनर्थपरंपरा कोसळली, त्यांचा अगदीं सत्यानाश कसा झाला, हें वाचकांनां आणखी सविस्तर वर्णन करूनच का आम्हीं सांगावयाला पाहिजे ? त्यांची अर्धांगी–सरस्वती हिनें घरांतून पळून जाऊन त्यांच्या तोंडाला कायमची काळोखी लावून ठेविली होती. तिच्या या पाप–कृतीमुळें बिचाऱ्या गणपतरावांनां जगांत तोंड काढावयालाहि जागा राहिली नाहीं. परंतु हाय ! एवढ्यानेंच थांबलें नाहीं ! गणपतरावांच्या निर्घृण दैवाच्या छळणुकीची सीमा अजून झाली नाहीं. 'दुःखं दुःखानुबंधि' किंवा 'संकट कधीं एकटें यावयाचें नाहीं' असें ह्मणतात तें अगदीं खरें आहे. संकट माणसांप्रमाणें आपलपोटें नाहीं. आपल्या भक्ष्यावर तें कधीं एकटेंच ताव मारावयाचें नाहीं. तसा कांहीं लगा दिसला, कीं, त्या भक्ष्यावर हल्ला करावयाला तें आपल्या भाईबंदांनां, आप्तेष्टांनां आग्रहानें निमंत्रण करून त्या मेजवानीला घेऊन जातें. त्याच्या भाईबंदांत लहानमोठ्या जितक्या म्हणून व्यक्ति असतात, तितक्या त्या भक्ष्यावर अगदीं मनापासून हल्ला करतात, व अगदीं आकंठ फाडूनफाडून खातात. आमच्या गणपतरावांवर अशा रीतीनेंच दारुण संकटपरंपरा कोसळली ! सरस्वतीनें त्यांच्या तोंडाला काळें लावून स्वतःहि काळें केल्यानंतर त्यांच्यावर अनर्थावर अनर्थ गुदरूं लागले. सासुरवाडीला आपल्या पत्नीच्या शोधाला ते गेले असतां ती तेथें आली नाहीं अशी भयंकर बातमी कळतांच ते बेभान होऊन पडले व त्यांनां सडकून ताप भरला, हें वाचकांनां ठाऊकच आहे, त्यांच्या श्वशुरांनीं व त्यांच्या घरच्या मंडळींनीं त्यांनां नीट औषधोपचार करून त्यांची शुश्रूषा उत्कृष्ट रीतीनें केल्यामुळें ते लवकरच शुद्धीवर आले, व त्यांचा तापहि लवकरच हटला. परंतु त्यांनां अशक्तता इतकी आली होती, कीं, बिछान्यावरच्या बिछान्यावर त्यांनां हलतांहि येत नव्हतें.

परंतु वेळ मोठ्या आणीबाणीची. ते रजा घेऊन आलेले नसल्यामुळें पांचसहा दिवसांनीं त्यांनां प्रवास करावयाला वैद्यबुवांनीं अगदीं नाइलाजानें–नाखुषीनें परवानगी दिली. इतक्या अवकाशांत सगळ्या कांहीं गोष्टी त्यांनां कळून आल्या. सहाव्या दिवशीं चांदगांवाहून गणपतराव बिंबवलीला आले. तेथें दुर्दैवानें त्यांच्याकरितां ताट वाढून ठेविलेंच होतें. सरस्वतीच्या पलायनाची बातमी अगदीं बायकापोरांच्या तोंडीं झाली असून तिचा अगदीं चिवडा झाला होता. सरस्वती आणि गणपतराव यांच्या निंदेचा डंका प्रत्येक घरींदारीं, बाजारहाटांत, जिकडेतिकडे अगदीं जोरानें वाजत होता. सर्वत्र त्यांची बोलबलाय चालली होती ! इतक्यांत प्रत्यक्ष गणपतरावच बिंबवलीला आले. मग काय विचारतां ! त्यांच्या आणि त्यांच्या बायकोच्या निंदेला बिंबवलींत अगदीं ऊतच आला. जो तो त्यांच्याकडे बोटें करूं लागला. कांहीं कांहीं धीट फाजील सडेसोटांनीं तर त्यांनां मुद्दाम भेटून सरस्वतीच्या पलायनाबद्दल सविस्तर हकीगत सांगण्याचा आग्रह केला. या स्थितीला आठ प्रहरांच्या आंतच गणपतराव अगदीं कंटाळून गेले–विटून गेले. बिंबवलीला कायमचा नमस्कार ठोकून ते दुसऱ्याच दिवशीं संध्याकाळच्या गाडीनें निघाले व तिसऱ्या दिवशीं सकाळीं दुधईला येऊन पोहोंचले.

तेथेंहि गणपतरावांचें दुर्दैव त्यांच्या अगोदरच येऊन त्यांचीच वाट पाहत बसलें होतें. भयंकर आजारी पडल्यामुळें गणपतरावांनां ठरल्याप्रमाणें नोकरीवर वेळेवर हजर रहातां आलें नाहीं–पांचसात दिवस अधिक लागले. इतक्या अवधींत लाइनीचे इन्स्पेक्टर साहेब दुधई-स्टेशनवर तपासणीकरतां येऊन गेले, अशी बातमी त्यांनां गाडींतून उतरतांच लागली ! आजारीपणाचें ढोंग करून गणपतराव गांवीं गेल्याची बातमी तपासामध्यें इन्स्पेक्टर साहेबांनां अर्थातच लागली. कर्मधर्मसंयोगानें इन्स्पेक्टर अगदीं नवेच असून मोठे कडवे होते. नेहमींचे इन्स्पेक्टर असते, तर त्यांनीं गणपत–

रावांच्या या 'अपराधा'कडे कानाडोळा करून कांहीं तरी थातरमातर केलें असतें. परंतु ताज्या दमाच्या या इन्पेक्टरसाहेबांनीं त्यांनां बिलकूल क्षमा केली नाहीं. गणपतरावांसंबंधानें त्यांनीं हेड ऑफिसांत खरा रिपोर्ट केला, व त्यांत त्यांनीं आपलें त्यांच्या संबंधानें अगदीं वाईट मत नमूद केलें. या रिपोर्टाचा असा परिणाम झाला, कीं, हेड ऑफिसांतून, गणपतरावांनां एक महिन्याची नोटीस देऊन नोकरीवरून काढून टाकावें,असा हुकूम आला. त्याप्रमाणें गणपतराव दुधईला येतात न येतात तों हेड ऑफीसची नोटीस त्यांच्यावर बजावण्यांत आली.

गणपतरावांनां दुधईला येऊन जवळ जवळ एक महिना होत आला होता. त्यांच्या नोटिशीचा महिनाहि बहुतेक भरत आला असून फक्त दोनच दिवस काय ते बाकी होते. या एका महिन्यांत गणपतरावांची काय विलक्षण दशा झाली होती! अगोदरच बायकोच्या पळून जाण्यानें त्यांची कमर पुरती खचली होती. त्यांतून ते तापानें आजारी पडून अतिशय अशक्त झाले होते, तों इतक्यांत त्यांच्यावर नोकरीवरून दूर केल्याची नोटीस बजावली गेली! हा नोटिशीचा महिना गणपतरावांनीं कसा काढला असेल, हें एक त्याचें त्यांनांच माहीत! सरस्वतीला आणावयाला म्हणून ते बिंबवलीला गेले, त्या दिवशींच्या आणि आजच्या त्यांच्या स्थितींत जमीन–अस्मानाचें अंतर पडलें होतें. त्या दिवशीं त्यांनां पाहिलेल्या माणसानें आज एकदम जर त्यांनां पाहिलें असतें, तर, हेच ते गणपतराव, असें त्यानें कधींहि ओळखलें नसतें. हा सबंध महिना भयंकर काळजींत, जागरणांत आणि हालांत गेल्यामुळें त्यांची अगदीं दशान् दशा होऊन गेली होती. त्यांचें शरीर अतिशयच कृश झालें असून चेहरा अगदीं पांढरा फिक्का होऊन गेला होता. डोळे खोल गेले असून त्यांच्या भोंवतालची जागा अगदीं काळीकुट्ट होऊन गेली होती.

गणपतरावांचा तो 'पिंजरा' अगदीं लहान असल्यामुळें त्याच्यांत सामानसुमानहि अगदीं बाताबेताचें होतें. एक अरुंद अशी नेवारीची खाट एका भिंतीजवळ असून तिच्यावर मळकट चादर घातलेला बिछाना पसरला होता. याच खाटेवर या वेळीं गणपतराव बसले होते. भिंतीशीं एक मोठी 'पॅकिंग केस' असून ती कशी तरी—अगदीं गैरव्यवस्थित रीतीनें ठेवण्यांत आली होती. या केसवर एक जुनी पुराणी, रंग गेलेली लहानशी ट्रंक ठेवलेली होती. एखाद्या महासागरांत दिसणाऱ्या लहानलहान बेटांप्रमाणें या ट्रंकेवर कोठें कोठें मूळच्या रंगाचे लहान 'डाग' दिसत होते, त्यावरून तिचा मूळचा रंग पिंवळा असावा, असें खात्रीपूर्वक वाटत होतें. ट्रंकेचें झांकण वांकलेलें असून त्यावर एक काळ्या रोगणाचा नवाच रंग दिलेला पत्र्याचा लहानसा झांकणाचा वाटोळा डबा होता. डब्यावर माधवबागेच्या एका सुप्रसिद्ध बुकसेलरनें प्रसिद्ध केलेल्या, वर तीन तीन रुपये किंमत असतांना तीन तीन आण्यांनां विकत घेतलेल्या, गुप्तपोलिसच्या चातुर्याच्या दोन कादंबऱ्या होत्या. त्यांचीं कव्हरें पार फाटून गेलीं होतीं. खालच्या त्या 'पॅकिंग केस' मध्यें तांब्यापितळेचीं थोडींशीं भांडीं व असेंच दुसरें कांहीं सटरफटर सामान होतें. मकाणाच्या एका कोपऱ्यांत एक लांकडी स्टूल असून त्यावर G. I. P. अशीं अक्षरें खोदलेलीं होतीं; त्यांवरून त्यावर कोणाची मालकी होती, हें उघड दिसत होतें. स्टुलावर पाण्याचा तांब्या व एक जर्मन सिल्व्हरचें उभें 'ग्लास' होतें. दुसऱ्या कोंपऱ्यांत दोन खिळ्यांनां दोन टोकें बांधलेली एक दोरी झुलत असून तिच्यावर कांहीं साधारण मळकट असे कपडे टाकलेले होते. भिंतीवर एका खिळ्यावर पेस्ट–बोर्ड टांगलेला असून, सिगारेटच्या पेट्यांतून येणारीं इंग्रजी नटींचीं व पोरींचीं लहानलहान कार्डें त्यावर गोंदानें चिकटविलेलीं होतीं. त्यांवरून खोलींतील 'भाडोत्र्या' च्या चित्रकलेसंबंधाच्या अभिरुचीचा उत्कृष्ट परिचय होत होता.

क्रमाक्रमानें पाऊस अधिकाधिक जोराचा येऊं लागला. हळुहळू दिवसाचा प्रकाशहि कमी कमी होऊं लागला, व मेघांच्या अंधकारांत तिळतिळ भरच पडूं लागली. वारा कमजास्त वेगानें वहात होता. मधुनमधून एकादवेळीं तो असा जोर करी, कीं, त्यामुळें सृष्टीचा राग चांगलाच अनुभवाला येत असे. वाऱ्याच्या सणसणाटानें वृष्टीचा शब्द अधिकच तीव्र व गाढ होई.

बाहेर सृष्टींत इतकी खळबळ सुरू होती, त्याप्रमाणें गणपतरावांच्या अंतःसृष्टींतहि प्रचंड खळबळ चालली होती. तरी ते किती वेळ तरी आपल्या त्या खाटेवर अगदीं निश्चलभावानें बसून राहिले होते. त्यांच्या चिंतेला सीमा राहिली नव्हती. हजारों विचारांनीं त्यांच्या मनांत काहूर करून सोडलें होतें. एक विचार अर्धवट रीतीनें त्यांच्या मनांत उदय पावतो आहे, तों त्याला

जुल्मानें अस्ताला जावयाला लावून दुसरा विचार त्याची जागा पटकावी; इतक्यांत तिसरा विचार दुसऱ्याची पहिल्याप्रमाणेंच अवस्था करून टाकी. याप्रमाणें गणपतरावांच्या हृदयांत विचारतरंगांचा प्रचंड कल्लोळ चालला होता.

नोटिशीचा महिना तर भरला. आतां काय ते दोनच दिवस आपल्या नोकरीचे बाकी राहिले आहेत; हे दोन दिवस निघून गेले, ह्मणजे येथें रहावयाला आपणाला बिलकूल अधिकार नाहीं—एक घटका आपणाला कोणी इथें राहूं देणार नाहींत; मग जावयाचें कोठें? करावयाचें काय? खावयाचें काय? एकच पोट खरें—पण त्याची दोन वेळ कशी तरी भरती तर केली पाहिजे. ती कशी करावयाची? पोटासाठीं उद्योग तरी कोणता करावयाचा? गणपतरावांच्या चिंतेमध्यें हेच प्रश्न निरनिराळ्या रूपांनीं पुनःपुनः उपस्थित होत होते. दुर्दैवानें अशी स्थिति प्राप्त झाली असतां लोक आपल्या घरीं जातातः आपले आईबाप, भाऊबहिणी वगैरे जे कोणी आप्तेष्ट असतील, त्यांचा, निदान कांहीं कालपर्यंत—चांगली स्थिति प्राप्त होईपर्यंत आश्रय घेतात. परंतु हा मार्गहि बिचाऱ्या गणपतरावांनां मोकळा नव्हता. त्यांनां आईबाप, भाऊबहीण कोणी नव्हतें. आणि असतें तरी, बायकोमुळें अशा तऱ्हेनें तोंडाला जन्माची काळोखी लागल्यानंतर, त्यांनां आपलें काळें तोंड दाखवावयाला जावयाचें कसें? बिंबवलीला त्यांची जी सर्व लोकांत निंदा आणि छी थू चालली होती तिला तोंड देऊन तेथेंच डोकें खुपसून रहावयाचें कसें? बरें, अगदीं लाजलज्जेवर तिलांजलि देऊन, लोकनिंदेची बिलकूल परवा न करतां घरीं जाऊनहि ते राहिले असते; परंतु दुबईला परत येण्यापूर्वी त्यांच्या वहिनी त्यांच्याशीं ज्या निष्ठुर, कठोर, दुष्ट रीतीनें वागल्या होत्या, त्याचें त्यांनां स्मरण झालें ह्मणजे घरीं जावयाची नुसती कल्पनाहि त्यांनां वृश्चिकदंशाप्रमाणें भयंकर यातना देत असे. त्यांच्यावर एवढी आपत्ति कोसळलेली, आकाश फाटलेलें, परंतु त्यांच्या भावजयेनें त्या प्रसंगांत त्यांनां तिळमरहि सहानुभूति दाखविली नव्हती! दुखण्यांतून उठून गणपतराव बिंबवलीला आले, ते सारा एकच दिवस घरीं राहिले होते. परंतु तेवढ्या अत्यल्प अवकाशांत वहिनी त्यांनां घालूनपाडून असें बोलल्या, त्यांच्या मर्मामर्मावर त्यांनीं असे चरके दिले, कीं, त्यांनां अगदीं नको हा जीव, असें होऊन गेलें.

वहिनींच्या त्या भाषणांचा थोडक्यांत आणि सरळ सारांश असा होता—'तुह्मी जर या कुलटेला आमच्या घरांत आणून ठेवली नसतीत, तर हा भयंकर अनर्थ आमच्यावर मुळीं गुदरलाच नसता, आणि आमच्या अन् आमच्या कुळाच्या नांवाला असा कलंकहि लागता ना! तुमची तर काय मजा आहे भाऊजी! तुम्ही आपले खुशाल दूर जाल, पैसे मिळवाल, पुनः नवीन लगीन कराल, अन् नवी विटी—नवं राज्य करीत, नव्या बायकोसह सुखानं, चैनीनं नवा संसार करीत बसाल! पण खरा भोग ओढवला आहे आमचा तुमच्या या कुळ—दिवटीमुळं अन् तुमच्यामुळं! तिनं आमच्या घरांतून काळं केल्यामुळं आमचं तोंड काळं झालं आहे; इथंच आह्मांला रहायचं असल्यामुळं—तुमच्यासारखं आह्मांला कांहीं पळून जायचं नाहीं आहे—साऱ्या अडचणी सोसाव्या लागायच्या त्या आह्मांला. ही आतां पोर हलूहळू झालीच लग्नाला! या कुळाच्या काळोखीमुळं पोरीला स्थळ मिळतं कसं अन् तिचं लगीन होणार कसं? बेगमेप्रमाणं पोरीला सारा जन्म आतां नवऱ्यावांचून काढावा लागणार ना? तुम्हाला काय भाऊजी! एक बायको कुणाचा हात धरून उठून गेली, तर तुम्ही दुसरीचा हात धरून घरांत घेऊन याल आणि तिच्याबरोबर आनंद कराल. खरा भोग उभा राह्यलाहे आमचा! हें सारं तुमच्यामुळं बरं भाऊजी—तुमच्यामुळं! ती दिवटी घरांत आणलीत कशाला?"

अशा प्रेमळ वहिनींचे क्षणोक्षणीं ठोंसरे खात, घालूनपाडून बोललेलीं मर्मान्तक बोलणीं मुकाट्यानें ऐकत, दादा आणि ती घालतील ते दोन घांस खाऊन कुत्र्याप्रमाणें त्यांच्या घरीं पडून रहाण्याची नुसती कल्पनाहि गणपतरावांनां सहन होत नसे. या दादा—वहिनींशिवाय त्यांनां दुसरा कोणी आप्तेष्ट नव्हता. मग या दोन दिवसांनंतर जाणार कोठें? करणार काय? खाणार काय?

आतां एकच उपाय गणपतरावांनां दिसत होता; तो मुंबईला जाऊन एकादी नोकरी पहाणें हा होय. मुंबई हें सर्वांचें मायपोट आहे, तेथें कोणीहि कधीं उपाशीं मरत नाहीं, ही गोष्ट गणपतरावांनां चांगली ठाऊक होती. मुंबईला जाऊन, एकाद्या खाणावळींत बिऱ्हाड ठोकून, कसली तरी, कोठें तरी, नोकरी पहाणें हा एकच या भयंकर अडचणींतून सुटण्याचा मार्ग होता. परंतु हा विचार मनांत येतांच त्याच्या मागोमाग गणपतरावांच्या मनांत दुसराहि एक विचार ताबडतोब येई-

आपण कांहीं तसे शिकले सवरलेले नाहीं, परीक्षा पास नाहीं, वशिल्याचा जोर नाहीं, अशा स्थितींत आपणाला नोकरी देतो कोण आणि ती मिळते कशी? आणि जोंपर्यंत आपणाला नोकरी मिळणार नाहीं, तोंपर्यंत आपल्या रहाण्याचा आणि खाण्यापिण्याचा खर्च तरी कसा निभवावा ! आणि मुंबईतला अवाढव्य खर्च तो ! पोस्ट ऑफीसच्या सेव्हिंग बँकेंत गणपतरावजींचे थोडेसे पैसे होते; परंतु त्यांचा उपयोग काय? त्यांनां याचें त्याचें इकडेतिकडे जें थोडेंसें देणें होतें, त्यांतच त्या रकमेचा पार चुराडा होऊन जाणार होता. राहिलीच तर अगदींच थोडी बचत राहिली असती. आतां रेल्वेच्या प्रॉव्हिडंट फंडांत गणपतरावांचे थोडेबहुत पैसे होते, ही गोष्ट कांहीं खोटी नव्हे. परंतु त्यांचा तरी काय उपयोग होणार होता ! कारण, गणपतरावांनीं आपण होऊन नोकरी सोडली नव्हती. त्यांनां रेल्वेनें नोटीस देऊन नोकरीवरून कमी केलें होतें. 'डिसमिस' झाल्यामुळें त्यांच्या फंडापैकीं निम्म्याच्या वर रकम रेल्वे कापून घेतल्याशिवाय रहाणार नाहीं, हें अगदीं उघड होतें. शिवाय, जी थोडीशी रकम फंडांतून त्यांनां मिळण्यासारखी होती, ती हातीं यावयालाहि तीनचार महिने सहज लागणार होते. हे तीनचार महिने काढावयाचे कसे आणि कोणत्या आधारावर, हाच तर मुख्य प्रश्न होता. शेवटीं, एकाद्या दीन अनाथाप्रमाणें उपाशीं अन्नावांचून तडफडत आपणाला मरण येणार काय?

ह्या विचार मनांत येतांच गणपतरावांच्या सर्वांगावर भयानें, विषादानें, कांटाच उभा राहिला. मेघडंबरानें आच्छादिलेल्या प्रस्तुतच्या संध्याकालाप्रमाणें आपलें जीवनहि अंधकारानें परिपूर्ण असेंच आहे, असें त्यांनां वाटूं लागलें.

दुधईला पोहोंचून नोकरीवरून दूर केल्याची 'नोटीस' हातीं पडल्यापासून प्रत्येक दिवशीं जवळजवळ चोवीस तास गणपतराव याप्रमाणें चिंता करण्यांत निमग्न होऊन गेलेले असत. नोटीस मिळाल्याला आज सत्तावीस अठ्ठावीस दिवस झाले होते; परंतु त्यांच्या काळजीची जी स्थिति पहिल्या दिवशीं होती, तीच स्थिति आज अठ्ठाविसाव्या दिवशीं होती. इतके दिवस चिंता करूनहि त्यांनां महत्त्वाचा असा एकहि प्रश्न सोडवितां आला नव्हता, किंवा पुढें अमुक एका दिशेनें जावयाचें असेंहि त्यांच्या मनानें कांहीं ठरविलें नव्हतें. त्यांच्या मनासभोंवतालचा अंधकार होता तितकाच अजूनहि गाढ होता.

गणपतरावांनीं अगदींच हातपाय गाळले होते. त्यांचा सारा धीर अगदीं नाहींसा झाला होता. आपला जन्म व्यर्थ आहे, जीवितांत कांहीं राम राहिला नाहीं, असें त्यांनां वाटूं लागलें होतें. सभोंवतालच्या भयाण अंधकारांत कोठें आशेच्या किरणाची तिरीपहि गणपतरावांनां दिसत नव्हती. आयुष्य त्यांनां तीव्र यातनामय झालें होतें. एकाद्या वेळीं चिंतेच्या भरांत जेव्हां त्यांची निराशा अगदीं कमालमर्यादा गांठी, त्या वेळीं, आत्महत्येचा विचार जरी त्यांच्या मनांत कधीं फारसा आला नाहीं, तरी, साऱ्या जगाचा, संसाराचा त्यांनां वीट आल्यावांचून रहात नसे. नको हा संसार ! संसाराचें काळें तोंडहि पहावयाला नको ! त्यापेक्षां बैरागी किंवा संन्यासी होऊन संसारापासून शंभर योजनें लांब पळालेलें बरें, असें त्यांनां वाटत असे. ' बैरागी होऊन काशीला जाईन आणि तेथील दशाश्वमेघ घाटावर गुपचूपपणें बसून राहीन. काशीला पोटापाण्याची कांहींच पंचाईत नाहीं. अनेक उदार धर्मात्म्यांच्या कृपेनें तेथें अन्नपूर्णामाईचें एकच्छत्री--अन्नछत्री--साम्राज्य चालू आहे, असें ह्मणतात. मी काशीलाच जाईन ! ' असें गणपतराव निराशेच्या प्रसंगीं मनाशीं ठरवीत.

कांहीं दिवसांपूर्वीं स्टेशनमास्तरनीं त्यांनां विचारलें " गणपतराव, ऑफिसांतून आज पत्र आलें आहे. "

" काय ? "

" कोणत्या स्टेशनचा तुम्हाला पास पाहिजे आहे, ह्मणून ऑफिसकडून चौकशी झाली आहे. "

या प्रसंगीं गणपतराव असेच निराशेच्या प्रचंड भोंवऱ्यांत सांपडले होते. ते ह्मणाले "इथून काशीला जावें असें मनांत आहे. तेथपर्यंत पास देतां आला तर द्या. नाहीं तर जेथपर्यंत देतां येईल तेवढा द्या अन् तेथपासून काशीपर्यंत पैसे लागतील ते द्यायला मी तयार आहें."

" ठीक आहे. काशीपर्यंतचा पास मिळवून द्यायची मी जरूर खटपट करीन. "

गणपतरावजींनीं काशीचा पास मागितला होता खरा; परंतु काशीला जावयाचा त्यांचा बेत अद्यापि कायम झाला नव्हता, हें येथें अवश्य सांगितलें पाहिजे. आणखी थोडा वेळ गेला. वृष्टीचा जोर आतां बराच कमी झाला होता; परंतु पावसाचीं चिन्हें बिलकूल कमी

झाली नव्हती. इतक्यांत स्टेशनावर सहांच्या गाडीची घंटा झाली.

"मास्तरसाहेब–"

"क्यों पांडेजी?" हांक मारणारे पांडे होते, हें 'मास्तरां'नीं ओळखलें.

"दियासलाई–"

गणपतरावांनीं काड्यांची पेटी त्यांच्याकडे फेंकली; त्यांनीं मकाणांतला केरोसीनचा दिवा लावला, आणि खिडकी बंद करून घेतली. नंतर ते ह्मणाले "मास्तर–सीधा—"

गणपतराव कपाळाला आंठ्या घालून ह्मणाले "रहना दो पांडेजी! आज कुछ जरूरत नहीं—"

"कुछ खानेका नहीं?"

"नहीं, भूख नहीं."

असले नोकर ह्मणजे कांहीं आई, बायको किंवा बहीण नव्हेत, तर 'भूक नाहीं' असें ह्मटल्यानंतर आग्रह करकरून बळेंच दोन घांस तरी मायेनें खाऊं घालतील! मास्तरांनां आज रात्रीं कांहीं खावयाचें नाहीं असें ऐकतांच पांडेजींनां आनंदच झाला! 'या वादळांत उगीच चुलीशीं त्रास तरी करावयाला नको–छान झालें!' असा विचार मनांत येऊन ते "अच्छा मास्तर!" असें ह्मणून निघून गेले.

संध्याकाळीं सहा वाजल्यापासून तों सकाळीं आठ वाजेपर्यंत गणपतरावांची असिस्टंट स्टेशनमास्तर या नात्यानें 'ड्यूटी' असे. तारेशीं 'खटखटी'चा कारभार करणें, तिकिटांची विक्री करणें, स्टेशनांतून गाड्या पास करणें, हीं सगळीं कामें रात्रीं त्यांनां एकट्यांनांच करावीं लागत. त्यांची 'ड्यूटी' जरी मोठी होती, तरी रात्रीं बारांच्या पुढें गणपतरावांनां फारसें काम नसे, असें ह्मटलें तरी चालेल. बारा वाजावयाच्या सुमाराला शेवटची पॅसेंजर गाडी येई, ती एकदां 'पास' केली, कीं, त्यांनां थोडी बहुत झोंप घेतां येई. तारेच्या कळेला घंटा अडकावून, बॅटरीच्या पेटीवर बिछाना पसरून, ते खुशाल झोंपीं जात.

आणखी अर्धाएक तास गेला. साडेसहा होऊन गेले तेव्हां नाइलाज होऊन गणपतराव खाटेवरून हळुहळू उठले. एक मोठा थोरला उसासा टाकून त्यांनीं जंगी आळस दिला. नंतर आपला 'ऑफिशियल' पोषाख–पांढरी पाटलून, काळा कोट–खांद्यावर टाकून व डाव्या हातीं सरकारी कंदील आणि उजव्या हातीं टोपी घेऊन ते मकाणांतून बाहेर पडले. दरवाजा लावून त्याला त्यांनीं कुलूप घातलें, व नंतर ते हळुहळू स्टेशनाकडे निघाले.

स्टेशनमास्तर आपल्या मकाणांतून किंचित् 'फलाहार' करून येऊन विडा चघळीत चघळीत विडीचा धूर सोडीत बसले होते. आणखी कांहीं वेळानें आफीसचीं पत्रें वगैरे लिहावयाला बसावें असा त्यांचा विचार होता. आठ वाजेपर्यंत हीं पत्रें वगैरे लिहिण्याचें काम करून नंतर मास्तर आपल्या बिऱ्हाडीं जात.

गणपतराव येऊन हातांतील कंदील वगैरे खालीं ठेवून बसतात, तोंच मास्तर ह्मणाले "अहो गणपतराव, तुमचा पास आला आहे आज—"

बेफिकीरपणानें गणपतरावांनीं विचारलें "कोठपर्यंतचा आहे?"

"मिळाला बुवा काशीपर्यंतचा. हा घ्या—" असें ह्मणून टेबलाच्या कप्यांतून पास बाहेर काढून मास्तरांनीं तो गणपतरावांच्या हातीं दिला.

गणपतरावांनीं तो तसाच जवळच्या टेबलावर ठेवून दिला. मास्तरांनीं विचारलें "इथून काशीलाच का जाणार?"

खालीं पहात गणपतराव ह्मणाले "हो."

"तिथेंच रहाणार वाटतें?"

"हो—कांहीं दिवस तिथें काढावे ह्मणतों."

"घरीं किती दिवसांनीं जाणार?"

"अजून कांहीं नक्की ठरविलें नाहीं." असें ह्मणून गणपतराव आपलें काम करावयाला टेबलापाशीं बसले.

प्रकरण सहावें.

देवता विरुद्ध सैतान!

हळुहळू बारा वाजावयाला आले. गणपतराव शून्य मनानें आपलें एकएक काम शांतपणें करीत होते. शेवटच्या अप् पॅसेंजरची वेळ झाली. मामच्या स्टेशन-करून गाडी सुटल्याची 'सिग्नल' झाली. घंटा वाजवून शिपाई ओरडला "चलो मुसाफिर बंबईके जानेवाले, टिकट लेओ!"

गणपतरावांनीं धाड्कन् टिकिटांची खिडकी उघडली. आज भलत्याच वेळीं वादळ उपस्थित झालेलें. पाऊसहि बराच पडत होता. अशा रात्रीं, अशा वेळीं अगदीं तशाच जरूरीच्या कामाशिवाय 'मुसाफरी' करावयाला कोण 'मुसाफिर' बाहेर पडणार आहे ? उतारू कांहीं अधिक नव्हते. दोनचार जण होते, त्यांनां गणपतरावांनीं टिकिटें दिलीं.

टिकिट विक्री पुरी करून धाड्कन् दरवाजा लावून, पाटलून, काळा कोट, टोपी वगैरे आपला 'ऑफिशियल' पोषाक चढवून, हातांत पेटलेला कंदील घेऊन गणपतरावांची स्वारी गाडी 'पास' करण्याकरितां आपल्या 'आफिस'च्या बाहेर पडली.

आकाशांतील ढग अजूनहि बिलकूल कमी झाले नव्हते. इतकेंच नव्हे, तर आतां उत्तर–पश्चिमेच्या कोंपऱ्यांत विजेचे चमकारेहि सपाट्यानें सुरू झाले होते. वारा अगदींच कांहीं पडला नव्हता. मधुनमधून त्याचाहि सन्‌सन् आवाज मोठमोठ्यानें ऐकूं येत होता. स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर दोनचार कंदिल जळत होते; परंतु त्यांचा प्रकाश अगदींच क्षीण. त्या प्रकाशानें सभोंवतालचा काळोख कमी होण्याऐवजीं अधिकच उदास व भयाण दिसत होता आणि तो अंधार उलट ते मिणमिण करणारे कंदिलच ग्रासून टाकीत आहे, असें भासत होतें.

बारा वाजून गेले. पहातांपहातां एकाद्या तीन डोळ्यांच्या प्रचंड निशाचर राक्षसाप्रमाणें गर्जना करीत करीत पॅसेंजर गाडीचें एंजिन येतांना दूर दिसूं लागलें. कांहीं क्षणांनीं गाडी येऊन हळुहळू स्टेशनांत उभीहि राहिली. आज प्लॅटफॉर्मवर मुळींच गर्दी नव्हती. पाऊस पडत असल्यामुळें 'पान–सिगारेट–मॅचिस' वाले कोणीच आले नव्हते. 'पुरी–मिठाईवाले' हि त्याच कारणाकरितां आपआपल्या मकाणांत शांतपणें निद्रासुख अनुभवीत पडले होते. गणपतराव, सिग्नलमन्, दोनतीन पोर्टर व ते तिघेचौघे उतारू एवढीच काय ती साऱ्या स्टेशनांत मंडळी होती.

गाडी स्टेशनांत थांबतांच, गाडीच्या एका सेकंड क्लासच्या डब्यांतून कांहीं विलक्षण तऱ्हेची गडबड चालल्याचा आवाज ऐकूं आला. तिकडे कांहीं तरी मोठा घोटाळा झाला असावा, असें वाटूं लागलें. तोंच त्या डब्यांतून दोघेचौघे जण उतारू झट्कन् खालीं उतरले व मोठमोठ्यानें 'मास्तर ! मास्तर ! गार्ड, गार्ड साहेब ! मास्तर–मास्तर !' असें ओरडूं लागले. ओरडून ओरडून त्यांनीं एकच गडबड उडवून दिली !

गडबड ऐकतांच, कांहींतरी मोठा घोटाळा आहे, असें वाटून गणपतराव घाईघाईनें कंदील मोठा करून त्या डब्याकडे आले व विचारूं लागले "क्या ? क्या हुवा ? हुवा क्या ?"

खालीं उतरलेले ते उतारू एकदम ह्मणाले " एक आदमी मर गया मास्तरसाहब !"

दुःखी मनःस्थितींतहि त्या शब्दांनीं गणपतरावांच्या मनाला धक्का बसल्यावांचून राहिला नाहीं " कहां— कहां ?" असें विचारीत ते त्या इन्टरमीजीएटच्या डब्याजवळ गेले.

"देखिये ना–" असें ह्मणून त्या गृहस्थांनीं डब्याच्या आंत बोट दाखविलें.

गणपतराव प्लॅटफार्मवरच उभे राहून उघडलेल्या दरवाज्यांतून आंत डोकावून पाहूं लागले. तों खरेंच ! एक अत्यंत हृदयविदारक देखावा त्यांच्या दृष्टीला पडला. गाडीच्या तळावर एक माणूस अस्ताव्यस्त पडला असून त्याची हालचाल अगदीं बंद झाली होती. त्या माणसाचा वेष इतरांप्रमाणें नसून वैराग्याप्रमाणें होता. धोतराचा रंगही फिका भगवा असून कांठ रेशमी होते. त्याच्या मस्तकावर लांब केश होते.

बैराग्याचा तो मृत देह पाहून गणपतरावांचें काळीज थरारलें. आपलें अंग कांपत आहे, असें त्यांनां वाटलें. डब्यांत जावयाला त्यांनां कांहीं केल्या धीर होईना.

एका डब्याजवळ कांहीं तरी गडबड आहे असें पाहून त्याच्या बाजूच्या दुसऱ्या डब्यांतूनहि लोक खालीं उतरून त्या डब्यापाशीं येऊं लागले. पहातांपहातां तेथें ही गर्दी जमली !

गणपतरावांनीं विचारलें " हा मेला कसा ?"

उतारूंपैकीं एकजण सांगूं लागला "सिंधवा स्टेशनापर्यंत बुवाजी अगदीं चांगले होते. आमच्याशीं चांगले हंसत खिदळत होते. आह्मांला नाना तऱ्हेच्या त्यांनीं कितीतरी गोष्टी सांगून कितीतरी हंसवलें. सिंधवा स्टेशन गाडीनें सोडलें अन् 'वेळ जात नाहीं–चिलीम तरी काढूं या' असें ह्मणून बुवाजींनीं कफनीच्या आंतून चिलीम बाहेर काढली. जवळच्या बटव्यांतून गांजा बाहेर काढीत असतां त्यांचें अंग एकाएकीं थरथर कांपूं लागलें. त्यांची दृष्टिहि चमत्कारिक होऊं लागून डोळे तांठरले. क्षणक्षणानें त्यांचें कांपरें अधिकाधिक होऊं

लागलें. अन् त्यांच्या सर्वांगाला जोराजोरानें झटके येऊं लागले. अतिशय जोराजोरानें ते हातपाय झाडूं लागले. आम्ही दोघेतिघेजण त्यांचे हातपाय धरूं लागलों; परंतु बुवांच्या झटक्यांचा जोर इतका होता, कीं, कांहीं केल्या त्यांचे हातपाय आम्हांला आवरून धरतां येईनात. अशा स्थितींत एक अर्ध मिनिट गेलें असेल नसेल, तों बुवाजींचे झटके थांबून ते एकदम खालीं फळ्यांवर पडले. त्यांच्या तोंडांतून एकसारखा फेंस निघूं लागला.शेवटीं,त्यांनीं एकदोनदां जोरानें पाय झाडले अन् एकदम सारा कारभार आटोपला. आम्ही छातीवर कान ठेवून पाहिला, नाकाशीं सूत नेऊन पाहिलें, तों सर्वच कांहीं निकाल झाला होता! पहातां पहातां बुवाजी मेले!"

गणपतरावांनीं शुष्क स्वरानें विचारलें "किती वेळ झाला या गोष्टीला?" त्यांच्या छातींतील धडकी अजून थांबली नव्हती.

"दहा एक मिनिटें झालीं असतील. कदाचित् एखाद दुसरें मिनीट अधिकहि झालें असेल!"

इतक्यांत खाड्खाड् बूट वाजवीत व हातांतील कंदीलाला झोंके देत गार्डसाहेबांची स्वारीहि तेथें येऊन ठेपली. त्यांनीं जरा रागानें विचारलें "काय गडबड आहे?"

गणपतरावांनीं सारी हकीगत त्यांनां थोडक्यांत समजावून सांगितली. गार्डनें आंत जाऊन बैराग्याचें प्रेत नीट पाहिलें. नंतर खालीं उतरून तो ह्मणाला "प्रेत उतरून घ्यायला पाहिजे तुह्माला. चलो, जलदी करो–ट्रेन बहोत खोटी हुई है."

गणपतराव आश्चर्यचकित होऊन म्हणाले "इथें प्रेत कशाला उतरून घ्यायचें?"

"म्हणजे?" गार्डसाहेबांनीं आश्चर्यानें विचारलें.

"इथें कांहींच सोय नाहीं."

"कसली सोय?"

"इथें डॉक्टर नाहीं किंवा पोलिसहि नाहीं. प्रेत कशाला उतरायचें?"

गार्ड ह्मणाला "उंः! कांहीं नसलें तरी प्रेत तुह्माला उतरून घेतलेंच पाहिजे. जलदी करो—"

"पण मिस्टर होरमसजी—"

होरमसजी ह्मणाले "मास्तर! उगीच तक्रार करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. गाडींत प्रेत ठेवायचें नाहीं, असा कंपनीचा नियम आहे,हें तुह्माला ठाऊक नाहीं काय? अशा स्थितींत पहिलें स्टेशन लागेल, तेथें प्रेत उतरून ठेवतात, समजलांत.?"

"पण इथें कोणतीच तजवीज नाहीं.डाक्टर नाहीं—"

"त्याला मी काय करूं? मास्तर गाडी लेट झाली आहे भारी–आणखी लेट करूं नका. अन् या अडचणी कसल्या सांगतां तुम्हीं मला? डाक्टर अन् पोलिस इथें नसले, तर त्यांनां 'ॲक्सिडेंट मेसेज'द्या, ह्मणजे धांवत येतील ते इथें--चला, जलदी करा—"

गणपतराव तरी आतां काय करणार? प्रेताचा आपला कांहीं संबंध नसावा, ती भानगड परस्पर दुसरीकडे जावी, ह्मणून त्यांनीं आपणाकडून खूब खटपट करून पाहिली;परंतु होरमसजी गार्डापुढें ती सफल झाली नाहीं. कंपनीच्या नियमापुढें त्यांचा कांहीं इलाज नव्हता. गाडींतून प्रेत उतरून घेणें गणपतरावांनां भागच पडलें.

गणपतरावांच्या हुकमावरून चार पोर्टर डब्यांत शिरले, व त्यांनीं तें बैराग्याचें प्रेत खालीं प्लॅटफॉर्मवर उतरून ठेवलें.

गार्डानें उतारूंनां विचारलें "बैराग्याचें कांहीं सामानसुमान आहे का बरोबर?"

"आहे, हें पहा बांकाखालींच आहे." असें ह्मणून एका गृहस्थानें बांकाखालच्या त्याच्या सामानाकडे बोट दाखविलें.

एक मोठी नवी कोरी ट्रंक, एक पितळेचा कमंडलू व एक उंची काश्मिरी जरतारी शालजोडी एवढें त्याचें सामान होतें. गार्डानें तें पोर्टरकडून खालीं काढविलें. नंतर खिशांतून नोटबूक काढून त्यांतलीं दोन पानें त्यानें टरकन् फाडलीं, व त्यांच्यावर त्या सामानाच्या त्यानें दोन याद्या लिहिल्या.एका यादीवर गणपतरावांची सही घेऊन ती त्यानें आपणाजवळ ठेविली, आणि दुसरीवर आपण सही करून ती त्यानें गणपतरावांजवळ दिली; नंतर खिशांतून घड्याळ काढून, तोंडानें 'डॅम इट!' वगैरे त्रासाचे शब्द पुटपुटत त्यानें शिटी फुंकली, आणि कंदिलाची हिरवी कांच फिरवून ते तो जोरानें मागेंपुढें हलवूं लागले.

या सर्व भानगडींत गाडीचा वीस पंचवीस मिनिटें खोळंबा झालाच. गाडी चालू होण्यापूर्वी त्या सेकंड क्लासच्या डब्यांतले सारे उतारू उतरून दुसऱ्या डब्यांत जाऊन बसले होते.

गाडी भपभप करीत चालू झाली. गणपतरावांनीं धांवत धांवत जाऊन पुढील स्टेशनला 'सिग्नल' दिली आणि ते पुनः फ्लॅटफॉर्मवर आले.

सिग्नलमन्‌ला त्यांनीं विचारलें "काय बुवा पुढें काय करावयाचें ?"

"काय ?"

"प्रेत ठेवायचें कुठें ?"

"असेना का इथेंच !"

"छट्-फ्लाटफॉर्मवर असें ठेवतां येईल ? कोल्हीं कुत्रीं येऊन फाडफाडून टाकतील याला केव्हांच !"

"मग कुठें ठेवणार ?"

"तीच तर पंचाईत आहे. गार्डाला मीं किती समजावून सांगितलें, कीं, आमच्या स्टेशनावर कसली सोय नाहीं ह्मणून, पण कांहीं केल्या तो ऐकेनाच ना ! प्रेत उतरून घ्या, ह्मणून हट्ट धरून बसला !"

सिग्नलमन्‌नें सुचविलें "पार्सलच्या गुदामांत ठेवलें तर ?"

सर्व स्टेशनांत 'पार्सल गुदामा' शिवाय या कामाला योग्य अशी जागाच नसल्यामुळें गणपतरावांनां त्याची ही सूचना मान्य झाली. ते ह्मणाले "हो–तिथेंच ठेवलें पाहिजे."

गणपतरावांनीं लगेच जाऊन गोडाउनची चावी आणली, व तेथें जाऊन कुलूप काढून त्यांनीं तें उघडून दिलें. नंतर पोर्टरांकडून त्यांनीं प्रेत आंत आणून ठेवविलें. त्याचें सारें सामानसुमानहि त्यांनीं त्यांच्या कडून त्याच्या शेजारींच आणून ठेवविलें, आणि गुदाम बंद करून कुलूप लावून ते परत 'ऑफिसां'त आले. डॉक्टर व पोलीस यांनां ही महत्त्वाची बातमी कळविणें हें त्यांचें एक अवश्य कर्तव्य होतें, म्हणून त्यांनां कळविण्यासाठीं ते 'अॅक्सिडेंट मेसेज' लिहावयाला बसले.

क्षणभरानें पोर्टर येऊन म्हणाले "मास्तर, मढ्याला आम्हीं शिवलों आहों. विटाळ झाला–आम्हाला आंघोळ केली पाहिजे. आम्ही बिन्हाडीं जातों."

गणपतराव म्हणाले " त्यांत कसला आला आहे विटाळ—"

"नाहीं–पण मास्तर—"

मास्तर हंसून म्हणाले "बरें जा—संधि सांपडली तुम्हांला."

पोर्टर निघून गेल्यावर क्षणभरानें सिग्नलमन् आला. गणपतरावांनीं त्याच्याकडे पाहून विचारलें "काय रे ?"

"हें:–हें:–मास्तर–अर्ज आहे एक—"

"काय ?"

"इतक्यांत एकादी मालगाडी आहे का मास्तर ? विचारा बरें—"

गणपतरावांनीं हातांतील कागद पेन्सील ठेवून, तारेनें दोन्ही बाजूंच्या स्टेशनांकडे चौकशी केली. कोठेंच मालगाडी नव्हती. मास्तर ह्मणाले "नाहीं रे बुवा –मालगाडी नाहीं."

सिग्नलमन् लघळपणानें ह्मणाला " हें: हें–मास्तर ! हुकूम द्याल तर बिन्हाडीं जाईन ह्मणतों—"

" कां रे ?"

" बायकोला ताप आला आहे मास्तर, सडकून तळमळते आहे बिचारी सारखी—"

" बरें जा–किती वाजतां येशील ?"

" येईन दोनएक वाजतां."

" जा–लवकर ये."

सिग्नलमन् निघून गेल्यावर गणपतरावांनीं 'मेसेज' थोडक्यांत लिहिला, व तो योग्य ठिकाणीं पाठविला. नंतर नेहमीप्रमाणें तारेच्या यंत्राला घंटा अडकावून ते बॅटरीच्या पेटीवर बिछाना पसरून त्यावर लवंडले.

अजूनहि पावसाची झिमझिम बाहेर चालूच होती. मधुनमधून वीज चमकारे मारीत होती. मेघांची अस्फुट गंभीर गर्जना मधुनमधून ऐकूं येत होती. गणपतराव बिछान्यावर पडले होते खरे, परंतु अशा परिस्थितींत आज त्यांनां झोंप येणें बिलकूल शक्य नव्हतें. नेहमींचे काळजीचे विचार त्यांच्या मस्तकांत थैमान घालीत असून, हें बैराग्याच्या मृत्यूचें प्रकरण त्यांच्यांत आणखी अधिक मिसळलें होतें. किंबहुना त्याच्या मृत्यूसंबंधींच्या विचारांनांहि हुसकून लावून त्यांची जागा आपणच पटकावली होती, असें ह्मटलें तरी चालेल.

हा बैरागी कोण असावा? याची जात कोण? हा हिंदुस्तानी, दक्षिणी, गुजराती कीं कोण असेल कोण जाणे ! गुजराती तर हा खास दिसत नाहीं. कदाचित् तो हिंदुस्तानी असेल. त्याच्या एकंदर आकारावरून, चेहऱ्याच्या ठेवणीवरून, सामानसुमानावरून तो हिंदुस्तानीच असण्याचा अधिक संभव आहे, का तो दक्षिणी असावा ? नीटसें कांहींच कळत नाहीं. बिचारा कोठून आला असेल कोणाला ठाऊक ? बुवा होता, त्यावरून त्याला बायकापोरें वगैरे नसतील हें खास !

थेट अगदीं माझ्यासारखाच ! कोणाचा कसला पाश ह्मणून त्याला उरला नसेल–अन् ह्मणूनच असा बैरागी झाला हा ! मीहि याच्याप्रमाणेंच बैरागी होणार ! बिचारा कुठें जात होता, देव जाणे ! बैरागी कुठें जाणार दुसरीकडे ! यात्राच करायला निघाला असेल. नाशिक, त्रिंबक वगैरे आटोपून असा रामेश्वराकडे जायचा त्याचा बेत असेल ! पण बेत त्याचा ! ईश्वराचा 'बेत' नेहमीं आह्मां माणसांपेक्षां निराळाच असतो, अन् तोच नेहमीं अमलांत येतो अन् ह्मणूनच तो परमेश्वर ! कशाला उगीच बैराग्याबद्दल विचार अन् तर्क करीत बसूं ? उद्यां सकाळच्या गाडीनें आपल्या मुक्कामाहून पोलीस अधिकारी येतील अन् बैराग्याबद्दल चौकशी करून एकूणएक माहिती शोधून काढतील. तेव्हां त्याच्या तिकिटावरून वगैरे तो कुठचा, कुठें जात होता, वगैरे सारी माहिती आपणाला पोलिसांबरोबर कळून येईलच ! जाऊं दे–मरूं दे तो बैरागी !

नंतर गणपतरावांच्या मस्तकांत नेहमींप्रमाणें स्वतःबद्दलचे विचार कल्लोल करूं लागले. आपण काशीचा पास तर घेतला. पण तो घेतला कशाला ? मोठी मुष्कीलच झाली म्हणायची ! काशीला कशाला आपण जाणार ? तिथें जाऊन आपण करणार तरी काय ? कुठें काशी, कुठें आपला मुलूख ! आपण कुठें हे भलतीकडेच निघालों ? काशीला, काशीच्या आसपास शंभर कोसांत 'आपलें' असें कोणी माणूस आहे का ? तिथें जाऊन काय करायचें ? कां ? बैरागी व्हावयाचें, असा तर आपल्या मनाचा निश्चय आहे. बैरागी होणार ! बैरागी होणें काय सोपें आहे ? बैराग्याचें आयुष्य म्हणजे अगदीं व्यर्थ ! जगानें ओवाळून टाकलेला माणूस बैरागी होत असतो. बैराग्याचा आयुष्यक्रम अत्यंत कठीण–अतिशय त्रासदायक ! याच बैराग्याकडे पहाना ! या बैराग्याला परदेशी मुलुखांत एकाएकीं गाडींत भयंकर मृत्यु आला. याचें आपलें असें माणूस कोणी असेल काय ? याच्या मृत्यूमुळें ज्याच्या डोळ्यांनां टिपूसभर तरी पाणी येईल, याच्या आठवणीनें जो दोन तरी आंसवें ढाळील, असा याचा एकहि कुणी आप्त नसेल ! याला भाऊ बहीण बायको–पण–पण–मला तरी कोण आहे ? माझी देखील या बैराग्याप्रमाणेंच असहाय स्थिति नाहीं का ? मी उद्यां याच्याप्रमाणेंच तडकाफडकीं मरण पावलों, तर माझ्यासाठीं तरी कोण रडणार आहे ? आई असती तर–जाऊं द्या–तो आतां विचारहि नको. या बैराग्याप्रमाणें मीं भगवीं वस्त्रें अंगावर घेतलीं नाहींत–मीं यथानियम जोग घेतला नाहीं, तरी मी वास्तविक बैरागीच नाहीं का ? फकीर, जगाशीं यत्किंचित् संबंध नसलेला फकिरच मी आहें, नाहीं तर काय ? माझें या जगांत आहे काय ? मला कोणता आणि कोणाचा आधार आहे ? वेळ आली, तर महिनाभर शांतपणानें मला दोन वेळां दोन घांस खातां येतील, असा मला उभ्या दुनियेंत कुठें आश्रय आहे ? नाहीं–तें कांहीं नाहीं. बैरागीच व्हावें हें उत्तम ! बस्स–मी काशीलाच जाणार ! तिथें अन्नपूर्णामाईचें सर्वांवर कृपाछत्र पसरलें आहे. तिथें उपासानें, अन्नाच्या अभावीं, भुकेनें कोणीहि मरत नाहीं असें ह्मणतात. काशीला जाऊन मी बैरागी होणार, हा निश्चय कायम ! पण हाय, गणपतराव ! तुझा जन्म कोणत्या कुलांत ! तुझें आजपर्यंत आयुष्य कसें गेलें अन् तूं हें आज करतो आहेस काय ? जाऊं द्या–आतां विचार ह्मणून करायचा नाहीं. बस्स–काशी अन् जोग–जोग ! बैरागी व्हावयाचें–बस्स !

गणपतरावजींचे विचार पुनः स्वतःवरून त्या बैराग्याकडे वळले. ते विचार करूं लागले—काय ? हा बैरागी माझ्याप्रमाणेंच असेल का ? जगांत माझें जसें कोणी नाहीं, त्याप्रमाणेंच याचेंहि कोणी नसेल का ? हा माझ्याप्रमाणेंच भिकारी—निष्कांचन–फकीर असेल का ? नाहीं. विचार करून पाहिलें, तर हा तसा असेल असें वाटत नाहीं. हा कांहीं थर्डक्लासांतून प्रवास करीत नव्हता ! खरेंच, मोठें आश्चर्य आहे. बैरागी असून हा दुप्पट दराच्या सेकंड क्लासांतून प्रवास करीत होता ! उत्तर हिंदुस्तानांतले लोक अगदीं मारवाडी ! भारी कंजुष ! तशीच श्रीमंती असल्याशिवाय उगीच दुप्पट भाड्यानें कोणी प्रवास करायला तयार व्हायचे नाहींत. आपण नेहमीं पहात नाहीं का ? मोठमोठे हिंदुस्तानी श्रीमंत व्यापारी अन् सावकार-खुशाल थर्डक्लासांतून गरिबागुरिबांच्या, भिकाऱ्याटोकाऱ्यांच्या मांडीला मांडी लावून प्रवास करातात ! बैराग्याचा याचा वेष असला ह्मणून काय झालें ? पुष्कळ बैरागी पैशानें चांगले मातबर अन् गबर असतात, असें आपल्या ऐकण्यांत नाहीं का ? बैरागी किंवा भगवीं वस्त्रें धारण केलेला माणूस तेवढा भिकारी—फकीर, असा कांहीं वज्रलेप नियम नाहीं. त्याचा पोषाक भगवा असला तरी साधा किंवा गरिबीचा नाहीं. त्याच्या कफनीला जरीचे कांठ आहेत.

145348

नाहीं, हा वैरागी भिकारी नाहीं—चांगला गबर असला पाहिजे. त्याच्या त्या नव्या, कोऱ्या करकरीत ट्रंकेंत कदाचित् खूब पैसे असतील ! किती पैसे असतील, एका सर्वसाक्षी परमेश्वराला ठाऊक ! शंभर, का दोनशें, का पांचशें ? हजार—दोन हजार ? कीं याहिपेक्षां खूब अधिक ? किती कां असेनात !—पण आहेत हें खास ! त्याच्या त्या ट्रंकेला टाळें अगदीं कोरें, खूब मजबूत अन् दुसऱ्या चाव्या न चालणारें असें आहे. उद्यां सकाळीं पोलीस आल्यावर त्याची ट्रंक उघडतील, तेव्हां समजेलच त्याच्यापाशीं किती रकम आहे ती ! काय होईल बरें त्याच्या पैशांचा शेवट परिणाम ? काय होणार आहे निराळा ! वास्तविक वैरागी बिनवारस, म्हणून त्याचे पैसे सारे सरकारजमा व्हायला पाहिजेत. पण ते होतील का ? कसचे होतात ! बराचसा भाग मधल्यामध्यें गडप होईल अन् थोडासा भाग सरकारच्या तिजोरींत जमा होईल.

काळोखाचें साम्राज्य. भयंकर वादळ. अशा परिस्थितींत काळजीमुळें जागृत असलेल्या माणसाच्या मनांत एकादी काळीकुट्ट कल्पना आली, तर त्यांत कांहीं नवल नाहीं. विचार करतांकरतां आमच्या गणपतरावजींच्या मनांत या वेळीं अगदीं एकाएकीं एक विलक्षण कल्पना आली. इतक्यांत आकाशांत विजेचा चमकारा होऊन देवतेची भयंकर गर्जना झाली. तो शब्द ऐकून गणपतरावांचें हृदय कांपूं लागलें–सर्वांगावर भयानें कांटा उभा राहिला.

पुनः कांहीं वेळ चहूंकडे शांत झालें. पुनः गणपतरावांच्या मनांत आपल्या असहाय, निराश्रय, दीन स्थितीचे विचार थैमान घालूं लागले. त्याबरोबरच, मघांची ती गुप्त कृष्णकल्पना त्यांच्या मस्तकांत निरनिराळ्या मार्गांनीं प्रवेश करूं लागली. शक्य तितक्या जोरानें गणपतराव तिच्या प्रवेशाला हरकत करीत होते. परंतु तिची ताकद जबरदस्त–अगदीं सैतानी ! गणपतरावांच्या निषेधाला–हरकतीला ती जुमानीना. तिनें हळुहळू त्यांच्या मस्तकाचा पूर्ण कबजा घेतला.

गणपतरावांच्या मनांत एकच विचार आतां खेळूं लागला. त्या बैराग्याच्या ट्रंकेंत जर कांहीं पैसे, किंवा डागडागिने, किंवा सोनेंनाणें असलें, तर मींच तें कां घेऊं नये ? दुसऱ्यांनां तें कां मिळावें ? सरकारच्या अखंड तिजोरींत तें कां जमा व्हावें ? केवळ मी स्वस्थ बसलों–कांहीं खटपट केली नाहीं—म्हणून ? धाडसी माणसावर लक्ष्मी प्रसन्न असते म्हणतात, तें याच प्रसंगीं खोटें कसें होईल ? माणसानें कांहींच साहस, धाडस केलें नाहीं, तर तो माणूस कसला ? अजागळ वृत्ति काय कामाची ?

सर्वत्र शांत होतें ! या वेळीं कोठें अंतर्यामी देवतेनें क्रोधानें गर्जना केली नाहीं ती ? आपल्या क्षोभाची नुसती चमकहि तिनें दाखविली नाहीं.

गणपतरावांचें मस्तक या वेळीं खूब चढून गेलें होतें. या एका पापकल्पनेभोंवतीं त्यांचेहि विचारतरंग या वेळीं पिंगा घालीत होते. ते आपल्या मनाशीं म्हणाले "या बिनवारसी बैराग्याच्या पेटींत कांहीं असलें, अन् मीं तें घेतलें तर त्यांत मोठासा दोष काय घडतो ? इतरांनीं फुकटंफाकट त्याचे पैसे लुंगावण्यापेक्षां मींच ते कां घेऊं नयेत ? मींच काय असें पाप केलें आहे ? त्या पैशांवर ज्याची खरी मालकी, त्याला तर त्यांचा कांहीं उपयोग करून घेतां येणार नाहीं ना ? ते पैसे त्याच्या कांहीं आतां उपयोगी पडत नाहींत. मीं ते पैसे घेतले, तर मीं कांहीं कोणाचें नुकसान करतों आहें, किंवा अनिष्ट करतों आहें, असें तर होत नाहीं ना ? माझ्या या कृतीनें कोणाला कसलाहि अपाय होत नाहीं; मग हें पाप-कृत्य कसें ? समजा, मी एकाद्या पहाडावर फिरायला गेलों, अन् तिथें रस्त्यावर एकादा मोठा हिरा मला आढळून आला, तर तो मीं उचलून घेणारच. कां घेऊं नये ? मीं तो उचलला नाहीं, तर माझ्यामागून येणारा माणूस तरी तो घेणारच; मग मींच तो कां घेऊं नये ? उघड्या डोळ्यांनीं माझें नुकसान मीं कां करून घ्यावें ? थेट तश्शीच गोष्ट ही आहे. बैराग्याच्या ट्रंकेंत पैसे असले तर ते मींच घेणें रास्त आहे. परमेश्वरानें या वेळीं मला उत्कृष्ट संधि आणून दिली आहे. साऱ्या स्टेशनांत या वेळीं चिटपाखरूंहि नाहीं. मीं आपण होऊन कांहीं कोणाला घालविलें नाहीं. जो तो स्वतःच निघून गेला आहे. अशा रीतीनें निर्मक्षिक करून खुद्द परमेश्वरानेंच मला ही नामी संधि आणून दिली नाहीं का ? यावरूनच बैराग्याचे पैसे मीं घ्यावे, असाच त्याचा हेतु दिसत नाहीं का ? त्याचा हेतु विफल करून मी उलट त्याच्या कोपाला पात्र होऊं काय ? छट्, ठरलें. पैसे असले तर मीच ते घेणार. पार्सलगुदामांत आतांच जाऊन बैराग्याच्या सामानाची तपासणी केली पाहिजे. त्याच्या कफनींत म्हणा, कनवटीला म्हणा, कुठें तरी त्याच्या ट्रंकेची चावी ही सांपडलीच पाहिजे !"

या वेळीं पुनः ज़ोरानें पाऊस पडावयाला सुरुवात झाली होती.स्टेशनाच्या वर घातलेल्या पत्र्यावर जोराजोरानें पावसाचे मोठाले थेंब पडून ठण्ठण् असा प्रचंड ध्वनि होऊं लागला.

सैतानानें शेवटीं देवतांवर विजय मिळविला ! गणपतराव हळुहळू बिछान्यावर उठून बसले. क्षणभरानें ते उठून उभे राहिले, व पायांत जोडा घालून गुदामाची चावी व कंदील हातीं घेऊन ऑफिसाच्या बाहेर पडले. या वेळीं त्यांच्या मनाची काय स्थिति झाली होती ती त्यांची त्यांनांच माहीत! ते एकदम गुदामाकडे गेले नाहींत. त्यांच्या हृदयांगणावर देवता पराजय पावल्या होत्या, तरी त्या अद्यापि तेथून गेल्या नव्हत्या. तेथेंच रेंगाळत होत्या. यांमुळें गणपतरावांला एकदम प्रत्यक्ष कृतीलाच हात घालवेना. स्टेशनाच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत त्यांनीं दोनतीनदां येरझारा केल्या. कोणीच कोठें नव्हतें–माणसाचें चिन्हहि कोठें दिसत नव्हतें. असा अंधकार, असें वादळ, अशी जोराची पर्जन्यवृष्टि ! निर्मक्षिक स्थान ! चोराला यापेक्षां उत्कृष्ट असा योग कधीं तरी मिळणें शक्य आहे काय ?

गणपतरावांनीं क्षणार्धांत मनामध्यें दृढ निश्चय केला. अंग झाडून दांतांनीं त्यांनीं आपला खालचा ओंठ चावला, व पाय न वाजवतां ते गुदामाकडे निघाले. दोनचार पळांच्या आंतच ते गुदामाच्या दरवाज्यापुढें येऊन उभे राहिले. हातांतील कंदील त्यांनीं जमिनीवर ठेवला, आणि टाळें उघडण्यासाठीं तें आपल्या डाव्या हातांत घेतलें; परंतु या वेळीं त्यांच्या हृदयाप्रमाणेंच त्यांचे हातहि थरथरां कांपत होते. त्यांच्या उजव्या हातांतील चाव्यांचा जुडगाहि तितक्यांत खालीं पडून त्याचा खण् असा शब्द झाला !

गणपतराव स्तंभित होऊन तसेच गुदामाच्या दरवाज्यासमोर उभे राहून आपणाशींच विचार करूं लागले. दार उघडतांच आपणाला जर असें आढळून आलें, कीं, आपल्या मनांतील वाईट हेतु कळून आल्यामुळें तो बैरागी उठून बसला आहे, तर मग कसें काय ? आपणाला चोरी करण्याच्या हेतूनें आलेले पहातांच तो जर हेटाळणीनें खदखदां हंसूं लागला, तर ? या कल्पना मनांत येतांच त्यांच्या काळजांत भयानें हुरहुर होऊं लागलें, आणि सर्वांगाला दरदरून घाम सुटला.

या वेळीं गणपतरावांचें धैर्य अगदींच खचलें. खालीं पडलेला चाव्यांचा जुडगा आणि कंदील उचलून घेऊन कांपणाऱ्या पायांनीं, शक्य तितक्या त्वरेनें ते ऑफिसांत परत आले.

येऊन त्यांनीं खुर्चीवर धाडकन् अंग टाकलें. आणखी दोनचार मिनिटें गेलीं, व त्यांचें धडधडणारें हृदयहि बरेंच शांत झालें. ते पुनः विचार करूं लागले. क्षणार्धांत त्यांच्या विचारांनीं पुरी पलट खाल्ली ! ते मनांतल्या मनांत हंसून आपणाशींच म्हणाले "हें काय मीं केलें हें ? मी का एकादें लहान पोर आहें, तर मला असें भय वाटावें ? अगर मी काय एकादी भित्री भागूबाई बायको आहें, का एकादा गांवढ्या शेतकरी कुणबी किंवा अशिक्षित कोळीमाळी आहें, तर भुताच्या भयानें मीं असें धांवत पळत यावें ? तो बैरागी मरून मढें झालेला तर प्रत्यक्ष या डोळ्यांनीं मीं पाहिला. एकदा मेलेलें माणूस कांहीं झालें तरी उठून बसेल, किंवा जिवंत माणसाकडे बघून खदखदां हंसेल, ही गोष्ट कधींकाळीं तरी संभवनीय आहे का ? परमेश्वरानें कृपाळु होऊन ही पैसे मिळविण्याची उत्कृष्ट संधि मला बिनआयासानें आणून दिली असतां कांहीं तरी मूर्खपणाच्या कल्पनांनीं किंवा भेकड भीतीमुळें ती व्यर्थ घालवून मीं जन्माचा दुःखी होऊं ? आपण होऊन चालत आलेल्या लक्ष्मीला, दरवाज्याला आंधळेपणानें आडसर घालून परत लावूं ? छट्, भलताच मूर्खपणा करून आयुष्याचा घात करून बसतां कामा नये ! नाहीं, तसें कधींहि व्हायचें नाहीं ! कसलें भूत अन् कसलें काय ! मी अस्सा जाणार अन् माझ्या अदृष्टांत काय आहे याची आतां परीक्षाच पहाणार !"

गणपतरावांनीं घड्याळाकडे पाहिलें, तों दोन वाजावयाला बावीसतेवीस मिनिटें होतीं. ही निर्मक्षिकतेची संधि तर मग अधिक वेळ टिकणार नाहीं. आणखी वीस पंचवीस मिनिटांच्या आंत सिग्नलमन येऊन टेपेल आणि मग आपल्या साऱ्या बेनाची माती होऊन जाईल ! जन्माचें नुकसान होईल !

गणपतरावांनीं पुनरपि मनांत दृढ निश्चय केला. सारे निर्बल विचार दूर फेंकून दिले, आणि पुनः चाव्या व कंदील हातीं घेऊन त्वरेनें पावलें टाकीत ते गुदामापाशीं येऊन ठेपले. आतां क्षणभरहि अधिक विचारांत न घालवतां त्यांनीं एकदम दरवाजा उघडला व गुदामांत शिरून पुनः त्यांनीं तो बंद करून घेतला आणि त्याला आंतून कडीहि लावली.

गुदामांत जिकडेतिकडे लहानमोठीं पार्सलें, मोडक्या धक्क्या टोपल्या व बास्केटें, फळ्यांचे लहान मोठे तुकडे, झांकणें उघडलेले किंवा कापलेले पत्र्याचे डबे वगैरे सामान जमिनीवर अस्ताव्यस्त रीतीनें पडलें होतें. गुदामाच्या मध्यभागीं सामान जरा दूर करून बैराग्याचें प्रेत ठेवलें होतें. त्याच्या अंगावरील ते भगवे कपडे आतां तेथील उदासपणांत व भयाणपणांत अधिकच भर टाकित होते. गणपतरावांनीं आंत येतांच हातांतील कंदीलाचा उजेड प्रेताच्या तोंडावर पाडला, व दुरूनच ते त्याच्याकडे कांहीं वेळ पहात उभे राहिले.

बैरागी शांतपणें पडला होता. त्याच्या हृदयाचें स्पंदन, पोटाची हालचाल, किंवा नाकाचा श्वास हीं सर्व अगदीं थांबलीं आहेत अशी जेव्हां गणपतरावांची खात्री झाली, तेव्हां जोडा काढून ठेवून ते हळुहळू पुढें आले.

जवळ येऊन हातांतील कंदिलाच्या प्रकाशांत गणपतराव पुनः प्रेताच्या चेहऱ्याकडे एकाग्र दृष्टीनें पाहूं लागले. बैराग्याचें वय तीसएक वर्षांचें असावें, असें दिसत होतें. त्याचा रंग काळसरच होता खरा, पण तो चांगला तेजःपुंज होता. एकंदरींत त्याची गणना सुंदर पुरुषांतच झाली असती, यांत संशय नाहीं. त्याच्या मस्तकावर लांबलचक काळेभोर केंस असून त्याच्या चांगल्या जटा बनल्या होत्या. त्याची मिशी धड मोठी नाहीं व लहान नाहीं अशी असून हनुवटी छोट्याशा दाढीनें भूषित होती. बिचाऱ्याचे दोन्ही डोळे,शेवटच्या आकस्मिक व्याधीमुळें उलटल्याप्रमाणें दिसत होते. बैराग्याचें लांबच लांब व जाड असें केशजटाजाल, अनिमिष अशी त्याची ती शून्य दृष्टि, यांकडे दिव्याच्या क्षीण प्रकाशांत पहात असतां गणपतरावांच्या हृदयांत पुनरपि कांहीं विलक्षण प्रकारच्या भयाचा संचार झाला. अंगावर सर्दिशीं कांटा उभा राहून व कपाळाला आणि छातीला दरदरून घाम सुटला. पाय लटलट कांपूं लागले.

परंतु प्राणांपलीकडचा प्रयत्न करून गणपतरावांनीं भीतीचे सारे विचार क्षणार्धांत दूर भिरकावून दिले, आणि मनाला दृढबंधन घालून, धैर्य धरून ते गुढघे टेंकून प्रेताजवळ बसले. बैराग्याच्या अंगावरची कफनी त्यांनीं दूर करून त्याच्या कमरेला हात घातला, व तेथें ते चावी शोधून पाहूं लागले. सुदैवानें त्यांचा हा पहिलाच प्रयत्न सफल झाला. बैराग्याच्या कमरेला रेशमी कापडाच्या पिशवीचा एक कमरबंद बांधलेला होता. तो सोडून त्यांतली पिशवी त्यांनीं तपासून पाहिली. पिशवींत दोन चाव्या, सेकंडक्लासचें एक टिकीट, कांहीं रुपये, चवल्यापावल्या, एवढे जिन्नस गणपतरावजींनां सांपडले.

पहिल्यानें एक चावी घेऊन गणपतरावांनीं ट्रंकेच्या कुलुपाला लावून पाहिली; परंतु ती लागली नाहीं. तेव्हां त्यांनीं दुसऱ्या चावीनें कुलूप उघडण्याचा प्रयत्न केला, आणि तो त्यांच्या सुदैवानें साध्यहि झाला. कुलूप काढून, ट्रंक उघडून, गणपतराव कंदिलाच्या प्रकाशानें आंतील जिनसांची तपासणी करूं लागले. ट्रंकेंतून एकएक विलक्षणच जिन्नस बाहेर निघूं लागले. दोन रेशमी भगव्या रंगाच्या कफन्या, दोन रेशिमकांठी लुंग्या, एक सुंदर अस्सल 'इंग्लिशमेक' उंची बिलोरी वाटोळा आरसा, सोन्याचा छडा असलेलें एक टुमदार सोन्याचें घड्याळ, भगव्या रंगाची एक उंची चादर, एक मेणबत्तीचा पुडा, काड्यांच्या दोन पेट्या, एक फराळाच्या पदार्थांनीं भरलेला मोठा चकचकीत पितळी डबा, एक हिन्दी भागवत, एक तुळशीदासजींचें रामायण, आणि सर्वांच्या खालीं एक मोठी थैली—ही गणपतरावांनां बरीच जड लागली—आणि पिंवळ्या रेशमी वस्त्रांत पोथीप्रमाणें रेशमी नाडीनें बांधलेलें दप्तरासारखें कांहीं तरी, इतके जिन्नस बुवाजींच्या ट्रंकेंतून निघाले.

ती जड लागलेली थैली व रेशमी वस्त्रांत बांधलेलें तें दप्तर एवढे दोनच जिन्नस बाहेर ठेवून बाकीचे सारे जिन्नस गणपतरावांनीं पुनः ट्रंकेंत भरून ठेवले. त्या थैलींत, गणपतरावांनां पाहिजे होता तोच जिन्नस असून चांगला खणखण खणखण असा वाजत होता. थैली हातीं घेतांच त्यांच्या मनांत असा विचार आला, कीं, यांत नुसते रुपयेच आहेत कीं सोन्याच्या गिन्याहि यांत आहेत कोण जाणे ! त्या दप्तरांत कागद असावे, हें तर वरूनच स्पर्शानें उघड समजून येत होतें. हे कसले कागद असतील ? नोटाच तर नसतील साऱ्या ? जर यांत नोटा असतील—साऱ्या नोटाच असतील, तर एकंदर रक्कम किती हजारांवर जाईल कोण जाणे !

ट्रंकेंतील सर्व जिनसा होत्या तशा नीट ठेवून गणपतरावांनीं ट्रंक बंद केली, आणि तिला कुलूप लावून त्याची चावी त्यांनीं पुनः पिशवीच्या कमरबंदांत टाकली. नंतर ते बैराग्याचें टिकीट हातीं घेऊन वाचून पाहूं लागले. त्या टिकीटावरून त्यांनां आढळून आलें, कीं, बैरागीबुवा उत्तरहिंदुस्तानांतील 'कमलभंज' नांवाच्या स्टेशनावरून निघाले असून थेट मुंबईलाच जात होते.

नंतर टिकीटहि शिवींत टाकून तो कमरबंद पूर्ववत् बैराग्याच्या कमरेला नीट बांधून गणपतरावांनीं त्याची कफनी वगैरे जशी होती तशी व्यवस्थितपणें करून ठेवली, व वगलेंत तें दप्तर आणि डाव्या हातांत थैली घेऊन ते जावयाला उठले.

जातांना उजव्या हातांतील कंदील वैराग्याच्या तोंडाशीं नेऊन गणपतराव पुनः त्याच्याकडे भयचकित दृष्टीनें पाहूं लागले, तों काय चमत्कार! हें काय हें? सर्वनाश! वैरागीबुवा तर हंसत आहेत! गणपतरावांची तर पुरीपुरी खात्री होती, कीं, बैराग्याचे दोन्ही ओंठ आपण आलों तेव्हां एकमेकांनां अगदीं चिकटून होते. परंतु आतां? आतां ते किंचित् फांकले असून त्यांतून त्याचे दोन दांत स्पष्टपणें दिसत आहेत!

गणपतरावांची भयानें गाळणच उडाली, व ते तीराच्या वेगानें दरवाज्याकडे पळत निघाले. दरवाजा उघडून, हातांनींच जोडा बाहेर टाकून ते झट्कन् बाहेर पडले, व त्यांनीं शक्य तितक्या त्वरेनें पण हळूच दरवाजा बंद केला. नंतर कांपणाऱ्या हातांनीं कसें तरी टाळें बंद करून, पाय लटलटत असतां त्यांतूनच घाई-घाईनें पावलें टाकीत ते कसेबसे एकदाचे ऑफिसच्या खोलींत येऊन पोहोचले. तेथें येतांच आपल्या टेबलाचा खण त्यांनीं झट्दिशीं उघडला, आणि पहिल्यानें ती थैली आणि दप्तर त्यांत नीट बंदोबस्तानें लपवून ठेविलें. नंतर स्टुलावरच्या तांब्यांतून फुलपात्रांत झट्दिशीं पाणी ओतून त्यांनीं तें अधाशाप्रमाणें घटाघट एका निःश्वासासरसें पिऊन टाकिलें.

या वेळीं गणपतरावजींची कांहीं चमत्कारिक व अवर्णनीय अशी स्थिति होऊन गेली होती. त्यांची मुद्रा अतिशय कावरीबावरी होऊन गेली असून दृष्टि तरळली होती. त्यांचें सर्वांग घामानें अगदीं निथळत होतें. हातांनां व पायांनां विलक्षण कंप सुटला होता. पावसामुळें हवेंत खूब थंडाई पसरली असतांहि त्यांनां ऐन उन्हाळ्याप्रमाणें वातावरण श्वासनिरोध करणारें भासत होतें.

ऑफिसची ती खोली ह्मणजे गणपतरावांनां नरकांतील यमदूतांच्या कढईप्रमाणेंच वाटत होती. तेथें उष्णतेचा अगदीं कहर झाला होता. परंतु इतकें असतांहि खोली सोडून बाहेर थोडीशी ' शतपावली ' करावयाला त्यांनां कांहीं धाडस झालें नाहीं. बाहेर दाट भयंकर अंधकार होता. आकाश मेघाच्छन्न असल्यामुळें बाहेरच्या भीषणतेंत खूबच भर पडली होती. आणखी बाहेर तो-तो-होता! तो-त्यांच्याकडे पाहून हंसून दांत बाहेर काढणारा-तो बाहेरच होता! जर तो आला—गुदामांतून बाहेर पडून या 'ऑफिसरूम'मध्यें येऊन जर तो ह्मणाला "अरे चोरा! पाजी हरामखोरा! दें माझी रुपयांची थैली—माझ्या नोटांचा बस्ता कुठें ठेवलास तो दे—बदमाष चोर कुठला! चोरी करून पळतोस नाहीं?"—तर काय करावयाचें? पळावयाचें कुठें? नाहीं-पण तो बाहेर कांहीं येऊं शकत नाहीं, हें खास! गुदामाच्या दरवाज्याला मजबूत टाळें लागलें असून गणपतरावांनीं तें दोनदोनदां ओढून नीट लागल्याबद्दल खात्री करून घेतली होती! पण-ही-ही पिशाच-योनि दरवाजे आणि टाळीं मानते का?

इतक्यांत बाहेर कोणाच्याशा पावलांचा आवाज झाला व गणपतरावांच्या छातींत धडकी भरली.

"कोण येतें आहे? येतें आहे तरी कोण?" आमच्या गणपतरावांचा चेहरा अगदीं पांढराफिका होऊन गेला! त्यांच्या छातींत जी धडकी भरली होती, तिनें क्षण दोन क्षण त्यांचा श्वासच मुळीं नाहींसा झाला! डोळे फाडून ते ऑफिसच्या उघड्या दाराकडे वळून पाहूं लागले.

तो मेलेला बैरागी नव्हे—त्याचें भूत नव्हे—स्टेशनचा सिग्नलमन् हनुमानसिंग!

सिग्नलमन् दृष्टीला पडतांच गणपतरावजींच्या जिवांत जीव आला! त्यांच्या उरांतली धडकी किंचित् थांबली. त्यांनीं विचारलें "कोण! हनुमानसिंग?"

"हां जी—"

"अरे, यायला इतका उशीर?"

हनुमान्सिंगानें ऑफिसांतील घड्याळाकडे पाहून ह्मटलें "नाहीं मास्तर-उशीर नाहीं झाला मला."

"अरे वाजले किती?"

"दोन-पांच झाले. तुम्हीं तर मला दोन वाजेपर्यंत सुट्टी दिली होती मास्तर! पांच मिनिटेंच काय तो उशीर झाला."

गणपतराव जरा त्रासिक स्वरानें ह्मणाले "सुटी दिली होती, हें खरें रे, पण विचार करावयाचा होतास कांहीं—"

"कसला विचार मास्तर?"

"अरे, शेजारीं गुदामांत एक मढें ठेवलेलें-साऱ्या स्टेशनच्या इमारतींत एकटा काय तो मी! जरा लवकर यायला नको होतें तुला? बसलास बायकोशीं गुलगुल गोष्टी करीत!"

हनुमान्‌सिंग 'हो हो' करून मोठ्यानें हंसून म्हणाला "गोष्टी नव्हतों करीत मास्तर ! जरा दवापाणी देऊन तिला झोंप लागल्यावर मी हा आलों. अन् तुह्माला का भीति वाटली मास्तर ? भय कसलें त्यांत ? जिवंत माणसानें का मेलेल्या मढ्याला भ्यायचें आहे ? कांहीं भीति नाहीं–बिलकूल भिऊं नका तुम्ही ! तुम्ही आपले खुशाल द्या तण्णावून ! "

गणपतरावांच्या सांगण्यावरून हनुमान्‌सिंग सकाळ होईपर्यंत ऑफिसरूममध्येंच तक्तपोशीवरच कांबळी आंथरून निजून राहिला.

प्रकरण सातवें.

तपास.

"तुम्ही आपले खुशाल द्या तण्णावून !" असें जरी हनुमान्‌सिंगानें गणपतरावांनां आश्वासनपूर्वक सांगितलें होतें, तरी कांबळी पसरल्यापासून सातआठ मिनिटांच्या आंतच त्याला झोंप लागून तो मोठमोठ्यानें घोरूंहि लागला. परंतु बिचाऱ्या गणपतरावांनां आज झोंप कोठली ? त्यांच्यापासून झोंप आज शंभर योजनें दूर पळाली होती. इतकेंच नव्हे, तर त्यांनां मिनीट दोन मिनीटें डोळेहि मिटून ठेवतां येत नव्हते. त्यांच्या डोळ्यांतून जणूं आगीच्या ज्वाळाच बाहेर पडत होत्या ! बॅटरीच्या पेटीवर बिछाना पसरून ते त्यावर नुसते पडले होते, परंतु विचारांच्या हलकल्लोळामुळें त्यांनां नुसतें बिछान्यावर पडून रहाणेंहि कांहीं वेळानें अशक्य झालें.

टेबलाच्या ज्या कप्यांत गणपतरावांनीं रुपयांची ती थैली व नोटांचें दप्तर ठेवलें होतें, त्याला कुलूप नसल्यामुळें त्यांनां आतां भीति वाटूं लागली. समजा, आपला सहज डोळा लागला, आणि तितक्यांतच हनुमानसिंग उठला आणि त्यानें तो टेबलाचा खण सहज म्हणून उघडला, तर केवढा अनर्थ होईल ? बरें, खणाला कुलूप लावून निश्चिंतपणें झोंप घेऊं म्हणावें, तर त्याला मुळीं कुलूपच नाहीं ! ते जिन्नस आपल्या मकाणांत ठेवून आपण आलों असतों, तरी बरें झालें असतें, असें आतां गणपतरावांनां वाटूं लागलें; परंतु त्या गोष्टीला आतां इलाज नव्हता. जिन्नस काढण्याकरितां कपा उघडतांना जर हा हनुमान् वानर जागा झाला, आणि कप्यांतून थैली बाहेर काढतांना त्यानें आपणाला पाहिलें, किंवा त्या गडबडींत थैलींतील 'जिनसां'चा झणझणाट झालेला त्यानें ऐकला तर ? तर काय, त्याला कांहीं तरी संशय आल्यावांचून राहील ?–आणि एकदां त्याला संशय आला, म्हणजे त्यापासून केवढी अनर्थपरंपरा उद्भवेल, यांचा कांहीं नियम नाहीं ! शिवाय, विशेष भीति ही होती, कीं, जेथें गणपतरावांनीं डोकें ठेवलें होतें, तेथून टेबलाचा तो खण मुळीं दिसतच नव्हता ! ही अडचण लक्ष्यांत येतांच गणपतरावांनीं चट्‌कन् पायथ्याशीं उसें केलें, व पडल्या पडल्याच ते एक दृष्टीनें त्या खणाकडे पहात राहिले.

गणपतरावांच्या मनांत नुसते विचार-विचार-विचार ! विचाराशिवाय कांहीं नाहीं ! ते मनांत म्हणूं लागले "बैराग्याच्या ट्रंकेंतून आपण जी थैली व दप्तर लांबविलें, त्यांत रुपये व नोटा बऱ्याच आहेत, यांत कांहीं संशयच नाहीं. दोन्ही मिळून एकंदर किती रुपये असतील, कोण जाणे ! थैलीचें वजन आपल्या हाताला लागलें तें जवळ जवळ आठ दहा ष्हावें, –अधिक होऊं नये. या थैलीमधील नाणें जर सगळें रुप्याचेंच असेल, जर सगळे हे रोख रुपयेच असतील, तर एकंदर रकम पांचएकशें रुपये होईल, अधिक होत नाहीं––पण दुसराहि एक त्याबरोबरच संभव आहे, कीं, कदाचित् सारेंच नाणें कांहीं रुप्याचें नसेल, कांहीं नाणें सोन्याचेंहि असेल ! आतां थैलींत जर कांहीं मोहरा असल्या–किती मोहरा एकंदर असतील, कोणाला ठाऊक ! ठीक–मी ह्मणतों, जर सर्वच मोहरा असतील,--छे, पिशवींतलें सारेंच नाणें सोन्याचें असेल, ही गोष्ट संभवनीय तरी आहे का ?--पण आहे असें धरून चालायला काय हरकत आहे ? नुसता कागदी हिशेव करावयाला तर हरकत नाहीं ? सगळें सोन्याचेंच नाणें असेल, तर रुप्याच्या नाण्याच्या पंचवीसपट किंमत होईल. पिशवीची--साडेबारा हजार रुपये ! मी ह्मणतों वीसपट--ह्मणजे दहा हजार रुपये तर खरे ! अन् त्या पोथीवजा बांधलेल्या दप्तरांत काय असेल बरें ? साऱ्या नोटाच तर नसतील ? का आपले नुसते कागदच–वाण्याच्या दुकानच्या जिन्नसांनां उपयोगीं पडण्यासारखे ? ह्मर नोटाच असतील तर त्या

किती–किती रुपयांच्या असतील, एका ईश्वराला ठाऊक! दप्तरामधील सारेच कागद नोटा असतील, तर एकंदर रकम लाखापर्यंत जावयाला तरी काय हरकत आहे? लाख रुपये—एक लाख रुपये!

याप्रमाणें शेख महंमदाचे मनोरे रचण्यांत गणपतराव अगदीं गढून गेले होते. त्यांच्या शरीरांतलें सारें रक्त गरम होऊन मस्तकाकडे चढूं लागलें. त्यांच्या मस्तकांतून जणूं अग्निज्वाला बाहेर पडूं लागल्या.

अशा स्थितींत सुमारें दीडएक तास गेला. घड्याळांत साडेतीन वाजले. पाऊस अजिबात थांबला असावा असें दिसत होतें. वाऱ्याचा सणसणाट ऐकूं येत नसून तो अगदींच पडला होता. गणपतरावांच्या डोळ्याला डोळा म्हणून कसा तो अद्यापपर्यंत लागला नव्हता. त्यांच्या मस्तकांत विचारांचा हलकल्लोळ चालला असल्यामुळें त्यांच्या शरीरालाहि स्वस्थता नव्हती. त्यांची सारखी तळमळ तळमळ चालली होती. या कुशीवरून त्या कुशीवर, त्या कुशीवरून या कुशीवर, असे एकसारखे ते लोळत होते.

ऑफिसरूममध्यें आतां अतिशयच उष्णता वाटूं लागल्यामुळें गणपतरावांनां तेथें पडून रहावेना! ते ताड्कन् बिछान्यावर उठून बसले, व खालीं उतरून बाजूची खिडकी त्यांनीं उघडली. तत्क्षणीं थंडगार वाऱ्याची झुळूक येऊन ती त्यांच्या त्रस्त चेहऱ्याला, डोळ्यांनां, कपाळाला, कानांनां शांत करूं लागली. वाऱ्याच्या झुळकीमुळें गणपतरावांनां आतां किंचित् हुषारी वाटूं लागली, आणि ते ऑफिसांतून बाहेर पडून इकडेतिकडे फिरूं लागले.

गणपतरावांनीं आकाशाकडे पाहिलें, तों तें आतां बहुतेक पूर्ण स्वच्छ झालें होतें; तरी कांहीं कांहीं ठिकाणीं लहानमोठे मेघ अजूनहि रेंगाळतच होते. आकाशांत नक्षत्रेंहि दिसूं लागलीं होतीं. परंतु रात्र सरत सरत आल्यामुळें त्यांची चमक आतां सहजच कमी झाली होती. त्या तेजोमय तारका आपल्या आजच्या कृष्णकृत्याबद्दल तुच्छतेनें हंसून आपला धिक्कारच करीत आहेत, असें गणपतरावांनां वाटूं लागलें.

स्टेशनापासून जवळच, तीं पहा–जेथें खूब अंधार जमल्याप्रमाणें दिसतो आहे कीं नाहीं, तेथें आंब्याचीं मोठमोठीं झाडें आहेत. त्यांच्या आड, त्यांनां लागूनच म्हणाना, आमच्या गणपतरावांचें मकाण उर्फ पिंजरा होता. गणपतरावांचें तिकडे लक्ष्य गेलें. आपल्या हृदयांतल्याप्रमाणें तेथेंहि खूब अंधकार आहे, असें त्यांनां आढळून आलें.

गणपतराव पुनः स्टेशनच्या व्हरांड्यांत येरझारा करूं लागले. वाऱ्याच्या शांत, मृदु, थंडगार झुळका मजेदार वहात होत्या. त्यांनीं गणपतरावांच्या सर्वांगांतील 'ताप' आपल्या शीतल प्रभावानें हळुहळू काढून टाकला. त्यांनां आतां किती तरी हुषारी वाटूं लागली. त्यांच्या मस्तकाचा भडकाहि आतां बराच शांत होऊन तें आतां ठिकाणावर आलें. लाख रुपये त्या दप्तरांत असतील, वगैरे आपल्या साऱ्या कल्पना फोल आहेत, तें शेख महंमदाचें मनोराज्य आहे, असें त्यांचें त्यांनांच आतां वाटूं लागलें. त्या दप्तरांत सटरफटर कागदांशिवाय कांहींच सांपडणार नाहीं, असें त्यांनां वाटूं लागलें. पिशवींत रुपये होते, याबद्दल कांहीं संशयच नव्हता. तींत रुपयेच आहेत, मोहरा कांहीं खास नाहींत. असेंहि त्यांनां वाटूं लागलें. फारफार तर चारपांचशें रुपये आपल्या साहसापासून आपणाला प्राप्त होईल, अधिक आशा करण्यांत कांहीं अर्थ नाहीं, असें त्यांचें अंतःकरण त्यांनां ग्वाही देऊं लागलें.

चारपांचशें रुपये मिळाले, तरी या प्रसंगीं आपणाला ते पांच हजारांच्या ठिकाणीं आहेत, असा विचार गणपतरावांच्या मनांत येऊन त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाची छाया पसरली. उद्यां नोकरीवरून सुटल्यानंतर खावयाचें काय, हा जो अतिशय भयंकर पेंच त्यांनां पडला होता, त्यांतून परमेश्वरानेंच त्यांची अचानक रीतीनें सुटका केली. जोंपर्यंत आपणाला नोकरी वगैरे मिळणार नाहीं, तोंपर्यंत निदान दोन वेळ दोन घांस मिळावयाला तरी पंचाईत पडूं नये, म्हणूनच परमेश्वरानें कृपाळूपणानें ही योजना केली असावी, असें त्यांनां वाटलें. परमेश्वर कोणाचें कधीं उणें पहात नसतो.

इतक्यांत तारेच्या यंत्राला अडकावून ठेवलेली घंटी खणखण वाजूं लागली. गणपतराव धांवतच तिकडे गेले व त्यांनीं घंटा काढून घेतली. तारेचें 'कटी–कट' सुरू झालें.

क्षणभरानें गणपतराव हांक मारूं लागले "हनुमान –ए हनुमान—"

हनुमान अजून स्वप्नांतल्या लंकेंतच होता. त्यानें ओ देखील दिली नाहीं!

"ए हनुमान–हनुमानसिंग–" त्याच्या अगदीं जवळ जाऊन गणपतराव मोठ्यानें ओरडले.

"ऊं: !" असें ह्मणून हनुमान दुसऱ्या कुशीला वळला.

"ए हनुमान–ऊठ, ऊठ ! मालगाडी सुटली–"

"कुठून ?"

"सिंधवाहून–चल ऊठ—"

हनुमान आतां पुरा जागा झाला होता. तो उठून बसला. एक मोठी थोरली जांभई देऊन, चुटकी वाजवीत तो पुटपुटला "सीताराम–सीताराम ! कोण नंबर, मास्तर ?"

"सव्वीस–ऊट ! केव्हांच सिग्नल आली आहे."

"गाडी पुढें नाहीं ना जायची ?"

"नाहीं."

"ठीक आहे.उठलोंच मी हा." असें ह्मणून,जांभया देतदेत चुटक्या वाजवीत हनुमानसिंग उठला, व डोकीवरून गळलेला फेटा पुनः बांधीतबांधीत गाडीला सिग्नल देण्यासाठीं ऑफिसमधून बाहेर पडला.

गणपतरावजी केव्हांपासून याच संधीची वाट पहात होते. हनुमानसिंगाचें पाऊल ऑफिसरूमच्या बाहेर पडलें मात्र, तों गणपतरावांनीं टेबलाचा तो कपा चट्कन् उघडला, आणि बाहेर एकवार नजर टाकून त्यांनीं ती थैली व दप्तर त्यांतून हळूच बाहेर काढलें. नंतर ते दोन्ही जिन्नस आपल्या कोटाच्या आंतल्या अंगाला लपवून गणपतराव ऑफिसांतून बाहेर पडले, व आपल्या मकाणाकडे निघाले.

शक्य तितक्या त्वरेनें ते आपल्या बिऱ्हाडीं येऊन पोहोंचले. दरवाजा उघडून, आंत येऊन त्यांनीं चट्कन फिरून दरवाजा लावला आणि त्याला घट्ट कडी घातली. नंतर खिशांतून काड्यांची पेटी काढून त्यांनीं दिवा लावला,आणि थैलीचा बंद सोडून त्यांनीं ती बिछान्यावर हळूच उपडी केली. आंतून नाणें बाहेर पडतांना अर्थात्च खळ असा शब्द झाला. पण गणपतरावांनीं विशेष काळजी घेतल्यामुळें तो बाहेर फारसा ऐकूं जाण्याजोगा नव्हता.तरी तो शब्द होतांच त्यांनीं चमकून दरवाज्याकडे पाहिलेंच !

थैलींतून खळकन् जें बाहेर पडलें तें सारें चमकदार पांढऱ्या रंगाचें ! सारा एकजात पांढरा रंग ! हळदीचा रंग त्यांत कोठेंदेखील गणपतरावजींनां आढळून आला नाहीं ! पहांटेच्या थंड वाऱ्यानें त्यांचें मस्तक कितीहि शांत झालेलें असो, शांत विचारांनीं त्यांच्या मनाची कितीहि तयारी झालेली असो, तरी थैलींतून एकहि सोन्याचें नाणें निघालें नाहीं, हें प्रत्यक्ष दृष्टीला पडतांच त्यांची तीव्र निराशा झाल्यावांचून राहिली नाहीं. त्यांनीं निराशेचा एक दीर्घ निःश्वास टाकला !

थैलीनें तर गणपतरावजींनां बरेंच–बरेंच कां, पुरें निराश केलें ! आतां त्यांची लाख रुपयांची सारी मदार काय ती त्या दप्तरावर होती. तेंहि आतां आपली अशीच निराशा करणार काय ?

बिछान्यावर पडलेल्या रुपयांच्या राशीकडे बिलकूल लक्ष्य न देतां गणपतरावांनीं तें दप्तर हातीं घेतलें, व कांपणाऱ्या हातांनीं ते त्याची नाडी सोडूं लागले. ती नाडी का त्यांनां तशी सहजासहजीं सुटणार ? एकाद–दुसरा फेरा सोडवितांच दुसऱ्या गांठीशीं गांठ पडे ! अशा रीतीनें गांठी उकलीत उकलीत गणपतरावांनीं दप्तर तर शेवटीं खुलें केलें.

. दप्तर सोडल्यानंतर त्यांत गणपतरावांच्या दृष्टीला काय पडलें ? दुसरें कांहीं नाहीं. वेड्यावांकड्या अक्षरांच्या मजकुरानें भरलेल्या कागदांच्या चवथाईचे कांहीं लहान गठ्ठे ! कुठें आहेत नोटा अन् कुठें आहेत लाख रुपये ! सारें स्वप्न ! सारें मनोराज्य !

दप्तरांत सगळे कागदच कागद होते. कांहीं नवे होते,कांहीं अगदीं जुने होते.कांहीं वर्तमानपत्रांतून कापून काढलेले लहानमोठे तुकडे होते. कांहीं चिठ्याचपाट्या होत्या.आणि सर्वांत खालीं दोन मोठाल्या जाड पानांच्या चोपड्या असून त्याला कव्हरेंहि चांगलीं जाड घातलेलीं होती.

झाडून सारे कागदपत्र मराठी भाषेंतच लिहिलेले आहेत, असें गणपतरावांनां आढळून आलें. मात्र कांहीं बालबोध लिपींत असून कांहीं मोडींत होते. वर्तमानपत्रांचे जे तुकडे होते, तेहि मराठी वर्तमानपत्रांचेच होते. वरच एक लंबा लिफाफा होता, त्यावर इंग्रजींत पुढीलप्रमाणें पत्ता लिहिला होताः—

श्री महन्त भजनानन्दगिरी,

तीन—तारा मठ,

पोस्ट—महादेवपुर.

व्हाया—कमलभंज.

यू. पी.

लिफाफ्यावरील हा मजकूर वाचतांच, गणपतराव आपणाशींच पुटपुटले " अस्सें ! बुवाजी तर मग एकूण दाक्षिणीच ! मला वाटलें होतें, कीं, असतील एखादा कलुषा कबजी, नाहीं तर हिंदुस्तानी !"

नंतर गणपतरावांनीं दप्तराच्या तळाशीं असलेल्या त्या दोन मोठ्या चोपड्या हातीं घेतल्या, व त्यांचीं पृष्ठें ते उलटूं लागले. त्या चोपड्या म्हणजे एका ग्रंथाची हस्तलिखित प्रतच होती ! त्या चोपड्यांचें उडत उडत अखेरपर्यंत निरीक्षण करून झाल्यावर गणपतराव हेटाळणीनें हंसले,व अस्फुटस्वरानें जणूं आपणाशींच म्हणाले "ओहो ! बुवाजी कांहीं असे तसे नाहींत बरें का ! बडे ग्रंथकार आहेत ! हरिभाऊ आपटेच दिसताहेत दुसरे ! ही मुंबईला कशाला चालली होती स्वारी ? आपला हा अमूल्य ग्रंथ छापवायला तर नव्हे ? हो, तिकडे कुठें आहे एखादा निर्णयसागर !"

हंसतहंसत आपणाशींच याप्रमाणें बोलत असतां गणपतरावांनीं एका चोपडीचें मुखपृष्ठ काढलें. त्यावर अगदीं कोरल्याप्रमाणें काळजीपूर्वक मोठमोठीं अक्षरें काढून लिहिलें होतें—

'आत्म—चरित्र.

भाग पहिला.

संसार.'

लगेच गणपतरावांनीं दुसऱ्या चोपडीचें पहिलें पान काढून पाहिले. त्यावरहि पहिल्या चोपडीवरील मुखपृष्ठाप्रमाणेंच कोरून लिहिलें होतें—

'आत्म—चरित्र.

भाग दुसरा.

वैराग्य.'

इतक्यांत स्टेशनावर ठणठण् असा सव्वीस नंबरच्या मालगाडीच्या दुसऱ्या घंटेचा शब्द झाला. गाडी पुढें सोडण्याकरतां 'ग्रीन' दाखवायला हनुमान आतां हुकुम मागायला येईल ! गणपतरावांनीं घाईघाईनें रुपये पुनः थैलींत भरले आणि दप्तर कसें तरी आवरण-वस्त्रांत गुंडाळून त्यांनीं ते दोन्हीं जिनस ट्रंकेंत ठेवून दिले आणि तिला कुलुप लावलें. मकाणांतून बाहेर पडून, दरवाज्याला झट्कन कुलुप लावून गणपतराव पळतपळतच स्टेशनांत आले.

"मास्तर, देऊं ग्रीन ?"

मास्तरनीं चौकशी करून गाडी सोडावयाला हुकूम दिला. हनुमान निघून जातांच ते पुनः आपल्या चिंतनांत निमग्न झाले.

हळुहळू सकाळ झाली. भैरवपुराहून पॅसेंजर गाडी सुटली. वैराग्याच्या प्रेतासंबंधीं गणपतरावांनीं पोलीस आणि डाक्टर यांनां रात्रींच केलेला 'ॲक्सिडेंट मेसज' पोहोंचून याच गाडीनें ते अधिकारी आपापल्या ठिकाणांहून दुधईला येणार होते. सकाळ होतांच एका पोर्टरला पाठवून गणपतरावांनीं थोरल्या मास्तरनां बोलावून आणविलें.

रात्रीं गाडींत एक असामी एकाएकीं मेल्यामुळें त्याचें प्रेत स्टेशनावर उतरून घ्यावें लागलें, आणि तें अजून तेथेंच आहे, ही बातमी इतक्या थोड्या अवकाशांत चहूंकडे पसरली. ती कशी पसरली, हें मोठें आश्चर्य आहे. परंतु ती खूब दूरवर पसरली, यांत मात्र कांहीं संशय नाहीं. कारण, बाजारांतून, अगदीं दुरूनदुरूनहि स्टेशनावरील हा 'तमाशा' पहाण्यासाठीं लोक येऊं लागून त्यांची हळुहळू गर्दी जमूं लागली होती.

भैरवपुराहून गाडी योग्य वेळीं दुधईला येऊन पोहोंचली,व तींतून निमंत्रित 'अधिकारी' खालीं उतरले. गाडी पुढें निघून जातांच लोकांची प्लॅटफार्मवर ही गर्दी जमली ! 'चलो हटो--चलो हटो !' अशी गर्जना करीत पोर्टर,लोकांनां स्टेशनाबाहेर घालविण्याचा प्रयत्न करूं लागले; परंतु त्यांनां का लोक ऐकतात ? स्टेशनावर क्षणोक्षणीं अधिकाधिकच गर्दी जमूं लागली.

पार्सलचें गुदाम उघडून वैराग्याचें प्रेत स्टेशनच्या व्हरांड्यांत आणून ठेवण्यांत आलें. वेटींगरूममधील खुर्च्या आणून पोर्टरनीं त्या प्रेताच्या सभोंवतीं मांडल्या. डाक्टर, पोलिस इन्स्पेक्टर, दोघेहि स्टेशन मास्तर वगैरे मंडळी हळुहळू या खुर्च्यांवर येऊन विराजमान झाली.

इन्स्पेक्टरसाहेबांनीं सूचना केल्यावरून डॉक्टर साहेबांनीं प्रेताची तपासणी करावयाला सुरुवात केली. वैराग्याच्या सर्व शरीराची, बहुधा प्रत्येक अवयवाची त्यांनीं अगदीं लक्ष्यपूर्वक तपासणी केली. कांहीं कांहीं अवयव तर त्यांनीं चारचार पांचपांच वेळ पुनःपुन तपासून पाहिले. स्टेशनावर इतकी गर्दी जमली होती परंतु या वेळीं चहूंकडे अगदीं शांत होतें. सर्वांचें लक्ष डॉक्टरसाहेबांकडे लागून राहिलें होतें.

डॉक्टरी तपासणी बराच वेळ चालली होती. प्रेताच्या अंगावर डॉक्टरांनां कोठेंहि कसलेंहि आघाताचें किंवा मारांचें चिन्ह बिलकूल आढळून आलें नाहीं.

शेवटीं ते मान हालवून ह्मणाले "नाहीं–कांहीं कुठें नाहीं."

"मग मृत्यु कसा आला ?"

"स्वाभाविकपणें—"

"संशयास्पद असें कांहीं नाहीं ना ?"

"नाहीं–संशयास्पद असें कांहीं नाहीं. कोठेंहि माराचें अगर श्वासनिरोध केल्याचें कसलेंच चिन्ह नाहीं. बैरागी अगदीं स्वाभाविकपणेंच मेला."

"तर मग तसें सर्टिफिकीट द्या लिहून."

ऑफिसांतून शाई व कागद आणवून डॉक्टरनीं 'स्वाभाविक कारणांनींच मृतव्यक्ति मरण पावली; तिच्या मृत्यूंत संदेहजनक असें कांहींच आढळून आलें नाहीं,' असें सर्टिफिकेट लिहून तें इन्स्पेक्टरांच्या स्वाधीन केलें.

नंतर इन्स्पेक्टर बरोबरच्या एका शिपायाला ह्मणाले "अरे, याची ही ट्रंक उघडून पहा बरें आतां. चावी कुठें तरी याच्या कफनीच्या खिशांत वगैरे असेल."

शिपायांनीं खिसे वगैरे शोधून पाहिले. त्यांत चावी नव्हती. नंतर कमरेचा कसा सोडून तो त्यांनीं तपासून पाहिला, तों त्यांत दोन चाव्या त्यांनां आढळून आल्या. एका चावीनें कुलूप काढून त्यांनीं ट्रंक उघडली.

इन्स्पेक्टरसाहेबांच्या हुकुमावरून शिपायांनीं ट्रंकेंतील सर्व जिन्नस हलुहलू बाहेर काढले, व त्यांची अगदीं कसून तपासणी केली. स्वतः इन्स्पेक्टरांनींहि सर्व जिन्नस नीट तपासले; परंतु त्यांवरून, बैराग्याच्या नांवाचा किंवा पत्त्याचा कांहींच शोध लागला नाहीं ! त्याच्या कमरेच्या कशांत रेल्वेचें जें टिकीट सांपडलें, त्यावरून एवढेंच कळून आलें, कीं, बैरागी कमलभंजला गाडींत बसला, व तो मुंबईला चालला होता ! बस्स ! त्याच्याबद्दल काय माहिती मिळाली ती एवढीच ! कशांतून तिकिटाशिवाय अकरा रुपये पावणे बारा आण्यांचे पैसेहि रोख निघाले.

पैसे निघालेले पाहून इन्स्पेक्टरसाहेब ह्मणाले "हें फार चांगलें झालें बुवा !"

डॉक्टरनीं विचारलें "तें कसें काय ?"

इन्स्पेक्टर हंसून ह्मणाले "यांनीं याच्या दहनाची तरी तजवीज होईल. नाहीं तर याला सरकारी खर्चानें जाळावा लागला असता, अन् दुसऱ्याच्या धर्मानें जळल्यावर याला स्वर्गप्राप्ति कशी होणार ?" असें ह्मणून, 'केवढा प्रचंड विनोद आपण केला हा !' असें दर्शविणारी विजयी मुद्रा करून ते हलुहलू सभोंवार हंसतहंसत पाहूं लागले.

सर्व काम आटोपलें. तेव्हां, प्रेताला अग्नि देणार कोण, असा प्रश्न साहजिकच निघाला. इन्स्पेक्टरसाहेबांनीं सर्वांनां विचारलें "बुवाजी जातीनें कोण असावे, अन् कुठले रहिवासी असावे, असें तुह्मांला वाटतें ?"

इन्स्पेक्टरसाहेबांचा हा प्रश्न पुरा होतो न होतो, तोंच गणपतराव चट्कन् ह्मणाले "दक्षिणी !"

इन्स्पेक्टरसाहेब व सारेजण गणपतरावांकडे पाहूं लागले. त्यांनां भयानें अगदीं मेल्याहूनहि मेल्यासारखें झालें. ते खालीं पहात स्वतःशींच ह्मणाले "अरेरे ! कशाला बोललों हें मी उगीच ? माझ्यावर हकनाहक कांहीं तरी संशय यायचा लोकांचा ! एकच शब्द बोलून, पोलिसचा संशय आपल्यावर उगीच ओढून घेतल्यासारखें मीं केलें–अगदींच गाढवपणा कसा झाला हा माझ्या हातून ?"

इन्स्पेक्टरसाहेब गणपतरावांकडे तीव्र दृष्टीनें पाहून ह्मणाले "दक्षिणीच, असें नेमकें कसें तुह्मीं ओळखलेंत ?"

गणपतराव आंवढे गिळीत अस्पष्ट स्वरानें ह्मणाले "काय कीं बुवा ! परंतु याचा चेहरा पहातांच मला आपलें असें वाटूं लागलें, कीं, बुवाजी दक्षिणीच असावेत. हा दक्षिणी तऱ्हेचा चेहरा आहे, असें मला वाटतें."

"तो कसा ?"

"तें कांहीं मला सांगतां नाहीं येणार–पण आपलें वाटतें मनाला—"

हा संवाद चालू असतां जमलेल्या साऱ्या मंडळीचें लक्ष्य बैराग्याच्या चेहऱ्याकडे लागावें, यांत कांहीं नवल नव्हतें. बाजारांतील एक दुकानदार रामखेलन साव एकदम मध्येंच ह्मणाला "हा बैरागी आमच्या छोट्या स्टेशनमास्तरांचा भाऊ तर नव्हे ?"

सर्वजण रामखेलनकडे पाहूं लागले. इन्स्पेक्टरसाहेबांनीं कौतुकानें विचारलें "तें कसें काय बुवा ?"

रामखेलन ह्मणाला "दोघांचे चेहरे तर अगदीं ठीक जुळतात !"

सर्वजण एकदां गणपतरावांच्या चेहऱ्याकडे व एकदां त्या बैराग्याच्या चेहऱ्याकडे कुतूहलानें पाहूं लागले. कांहीं क्षणांनीं दुसरा एक दुकानदार ह्मणाला

" ठीक बोललांत तुह्मी सावजी ! बुवाजीच्या डोकीवर जटा अन् हनुवटीला दाढी जर नसती, तर या बैराग्यांत अन् आमच्या छोट्या मास्तरांत अगदीं कांहींच तफावत आढळून आली नसती !"

स्टेशनमास्तर पुनःपुनः दोघांकडे पाहून ह्मणाले " दोघांचेंहि वय, शरीराचा रंग जवळजवळ अगदीं एक ! चेहऱ्यांची ठेवणहि पुष्कळच जमते आहे ! भले शाबास गणपतरावजी !"

डॉक्टरसाहेबहि हंसत हंसत ह्मणाले " हो—चेहरे तर बराबर जुळतात. कपाळ, भिवया, नाक, हींदेखील दोघांची बहुतेक सारखीं—बिलकूल तफावत नाहीं. ओंठांत मात्र थोडा फरक आहे दोघांच्या. पुनः हनुवटीचे हे भागहि दोघांचे सारखेच आहेत ! आश्चर्य आहे बुवा मोठें !"

इन्स्पेक्टरसाहेब हो हो करून मोठमोठ्यानें हंसून ह्मणाले " मास्तर, हा बैरागी जर आपला भाऊच ठरतो आहे, तर त्याला अग्नि द्यायचें काम तुमच्यावरच येऊन पडतें आहे आपोआपच ! तुह्मीच घ्या ना हा सगळा चार्ज आपल्यावर ! आणखी लोक शोधीत अन त्यांचीं आर्जवें करीत कुठें बसूं मी ?"

बहुतेक लोक हो हो करीत मोठमोठ्यानें हंसूं लागले. डॉक्टरहि ह्मणाले " मास्तर, हें पुण्याचें काम तुह्मालाच केलें पाहिजे. "

" छे छे, कांहीं जरूर नाहीं !" असें ह्मणून, लाजून खालीं पहात गणपतराव तेथून घाईघाईनें दुसरीकडे निघून गेले.

प्रकरण आठवें.

अवतार—समाप्ति !

प्रेताचा पोलिसतपास होऊन, तें जाळावयाला हुकूम मिळेपर्यंत बराच वेळ लागला. गणपतरावांनां आपल्या 'भावा' चें दहनकार्य करावें लागलें नाहीं. इन्स्पेक्टरांच्या सांगण्यावरून रामखेलन सावानें तें काम आपल्या अंगावर घेतलें, आणि आपल्या भाईबंदांच्या व स्नेहीसोबत्यांच्या मदतीनें तें पारहि पाडलें. सर्व व्यवस्था नीट झाल्यानंतर डॉक्टरसाहेब व इन्स्पेक्टरसाहेब मिळालेल्या पहिल्याच गाडीनें आपापल्या ठिकाणीं निघून गेले.

पोलीसतपास पुरा होऊन इन्स्पेक्टर स्टेशनावरून निघून जाईपर्यंत गणपतरावांच्या जिवांत जीव कसा तो नव्हता. मध्येंच कांहीं तरी अनपेक्षित रीतीनें एकादें चिन्ह उपस्थित होऊन, आपण काल रात्रीं पार पाडलेल्या कृत्याचा कांहीं सुगावा पोलिसला लागतो कीं काय, अशी त्यांनां क्षणोक्षणीं, पदोपदीं भीति वाटत होती. जर बरें दिसतें, तर चौकशीच्या ठिकाणावरून त्यांनीं केव्हांच पोबारा केला असता; परंतु तसें कांहीं करणें ह्मणजे पोलिसची दृष्टि आपोआप आपणाकडे ओढून घेणें होय, असा विचार करून गणपतराव कसेबसे तेथें राहिले होते. त्यांचें सारें लक्ष्य इन्स्पेक्टरसाहेबांच्या हालचालींकडे लागून राहिलें होतें.

परंतु परमेश्वरकृपेनें विशेष कांहीं न होतां पोलिसतपास सुयंत्रित पार पडून प्रेत जाळावयाला परवानगी मिळाली, व कांहीं वेळानें सर्व अधिकारी वगैरे आपापल्या ठिकाणीं निघूनहि गेले. तेव्हां कोठें गणपतरावांनां हायसें वाटून त्यांनीं मुक्ततेचा निःश्वास सोडला. प्रत्यक्ष परमेश्वरहि आतां आपलें कांहीं करू शकत नाहीं, असें त्यांनां वाटलें.

या साऱ्या भानगडींमुळें स्नान वगैरे आटोपावयाला गणपतरावांनां नेहमींपेक्षां थोडाबहुत उशीर झाला. नेहमीप्रमाणें पांडेजींनीं येऊन त्यांनीं ' डाळरोटी ' वाढली, व ते निघून गेले. भोजन आटोपल्यावर नेहमींच्या नोकरानें येऊन त्यांची ताटवाटी काढून नेली, व ती घांसूनपुसून परत आणून ठेवून तोहि निघून गेला.

आतां कोणी आपल्या मकाणांत यावयाचा संभव नाहीं असें पाहून गणपतरावांनीं दरवाज्याला आंतून कडी घातली, व मकाणाची थोरली खिडकीहि लावून घेतली. नंतर आपली ट्रंक उघडून तिच्यांतून त्यांनीं बैराग्याची थैली बाहेर काढली. बिलकूल शब्द होणार नाहीं अशा रीतीनें, अतिशय सावधपणानें थैलींतले रुपये बिछान्यावर ओतून ते ते मोजूं लागले. वीसवीस रुपयांची एकएक थप्पी करून ते ती बिछान्यावर ठेवूं लागले. थोड्याच वेळांत अशा रीतीनें पंचवीस थप्प्या त्यांनीं लावून ठेवल्या. थैलींत एकंदर पांचशें रुपये होते. आपलें अनुमान बरोबर होतें, असें त्यांनां आढळून आलें.

आज पुष्कळ दिवसांनीं गणपतरावजींनां खरोखर ' सोन्या'चा दिवस उगवला होता. नेहमीं छळणाऱ्या दारुण चिंतांपैकीं आज त्यांच्या बऱ्याचशा चिंता नाहींशा झाल्या होत्या. आज त्यांचें मन बरेंच प्रसन्न आणि शांत होतें.

गणपतराव आपणाशींच ह्मणाले " लाखबीख रुपयांचें तें आपलें एक सुखस्वप्न अन् महमदी मनोराज्यच होतें ह्मणा ! पण भयंकर संकटाच्या वेळीं परमेश्वरानें हे पांचशें रुपये मला पाठवून दिले, हे कांहीं त्याचे माझ्यावर कमी उपकार झाले, असें नाहीं. आतां कांहीं मी डरत नाहीं. हे पांचशें रुपये, पोस्ट ऑफिसांत जें कांहीं माझें सेव्हिंग आहे तें, अन् 'प्रॉव्हिडंट' फंडापैकीं जें कांहीं हातीं येईल तें, मिळून तीनचार वर्षें आपणाला आतां सुखानें अन् स्वच्छंदानें काढतां येतील. पोटासाठीं कोणाच्या तोंडाकडे मला आतां पहायला नको किंवा त्या चांडाळणीचीं घालूनपाडून मर्मावर डाग देणारीं भाषणेंहि मला ऐकून घ्यायला नकोत. चक्क अगोदर हातानें पैसे मोजीन अन् मग ' मला जेवायला घाल ! ' ह्मणून कोणाला तरी ह्मणेन. अजागळाप्रमाणें दोन घांस अन्नासाठीं कोणाच्या दारांत जाऊन मला कोणाला दादाबाबा करायला नको आहे. आतां मला काशीला जायला नको अन् तिथल्या दशाश्वमेध घाटावर बैरागी होऊन भिक्षेसाठीं अनेक ढोंगेंसोंगेंहि करायला नकोत. इतके पैसे मला चांगले तीनचार वर्षें पुरतील. तीनचार वर्षें ह्मणजे कमी का अवधि झाला? इतक्या दीर्घावधींत मला कुठें नोकरीचाकरी मिळवितां यायची नाहीं? हां हां ह्मणतां आतां मला सहज नोकरी लागेल. किंवा नोकरीचाकरी कुठें नाहींच मिळत असें लक्षण दिसलें, तर मला या भांडवलावर एखादें लहानसें दुकान नाहीं का कुठें घालतां येणार? दुकान–दुकान! पण दुकान घातलें तर चांगलें होईल का एकंदरींत? दुकान नाहीं चाललें, मालाला बूड आली, इतर दुकानदारांनीं मला फसविलें, तर दुकानापरी दुकान जाऊन हें माझें अस्सल भांडवलहि जायचें पार होऊन! छे बुवा! नकोच तें दुकान! दुकानदारीची आपणाला कांहींसुद्धां माहिती नाहीं. बरें, दुकानाचें एक राहिलें; पण या भांडवलावर दुसरा असाच कांहीं एखादा धंदा नाहीं का मला चालवितां येणार? धंदा दुसऱ्यावर फारसा अवलंबून नसका! ह्मणजे झालें कांहींतरी दलालीचा किंवा असाच कांहींतरी धंदा! हेंच घ्याना–या दुधईच्या आसपास उत्तम ताजें तूप मिळतें, अन् तें इतर ठिकाणच्या मानानें पाहूं गेलें, तर बरेंच स्वस्तहि पडतें. समजा, हाच धंदा आपण केला तर? हजारएक रुपयांचें उत्कृष्ट तूप येथें खरेदी करून मुंबईला घेऊन जावें. तिथें तुपाची काय आटाआटी चालते तें मला माहीत आहे! पैसा असूनहि चांगलें तूप तिथें मिळायला केवढी मारामार पडते! अशा स्थितींत आपलें उत्तम तूप तिथें थोडाच नफा ठेवून खपवायचा जर प्रयत्न केला, तर तें हां हां ह्मणतां खपेल! एकदां आपल्या तुपाच्या उत्कृष्टपणाबद्दल अन् माफक किंमतीबद्दल आपली ख्याति झाली, म्हणजे आपल्या मालावर नुसत्या उड्या पडतील उड्या! हजार रुपयांच्या भांडवलांत, माफक नफा ठेवूनहि मला दर खेपेला खर्चवेंच जाऊन दोनशें रुपये निवळ नफा नाहीं उरायचा? नाहीं उरला तर मग धंदा तरी करायचा कशाला? अशा उपरी धंद्यांत दुकानदारीपेक्षां नफा कमी होईल हें खरें आहे; परंतु यांत ऐन भांडवलच गडप व्हायचा संभव नाहीं! स्वतःच खरेदी करून स्वतःच माल विकायचा असल्यामुळें दुसऱ्यावर अवलंबून रहायला नको, अन् दुसऱ्यांनीं डोळ्यांत धुळ टाकून आपणाला फसवायलाहि नको. बरें, हा धंदा मनाला नाहीं तितका पटला, दगदग भारी वाटली यांत, तर दुसरे असेच धंदे का कमी आहेत जगांत? माणसाला अक्कल मात्र पाहिजे. नागपुराकडे जाऊन खुशाल कोळशाच्या खाणींत जाऊन पहिल्यानें लहान लहान अन् नंतर पचतील तशीं मोठमोठीं कंत्राटें घ्यावीं. असल्या लहान लहान कंत्राटांत खूब नफा मिळतो ह्मणे! बरें, यांतहि भीति वाटली, तर कोणीं आजवर केला नाहीं, असा नवीनच धंदा करावा. लुगडीं, खण, चिटें, पातळें, धोतरें वगैरे कापडमाल घेऊन यावें मुंबईहून अन् असें दूर लायनीवर फिरावें. भुसावळच्या अलीकडे स्टेशनास्टेशनाला उतरून, एक एक दिवस प्रत्येक ठिकाणीं घालवावा, कीं, हवी तेवढी विक्री! नफा काय हवा तेवढा मिळवावा असल्या धंद्यांत! सचोटीनें अन् बीनआळशीपणानें उद्योग करायला हवा माणसानें, कीं, पैसा अगदीं रगड मिळायचा त्याला! भुसावळच्या अलीकडे लहान लहान स्टेशनांवर जी दक्षिणी मंडळी आहेत आमची, त्यांनां असला हा कापडमाल मनाजोगा मिळायला मोठी पंचाईत पडते. जवळच्या दुका-

नांत असला माल नसतो त्यामुळें स्टेशनमास्तरांच्या बायकांनां तर खण न् लुगडीं हा माल मनपसंत असा कधींच मिळत नाहीं. मुंबईहून मागवावा, तेव्हां कुठें माल यायचा. अन् तो कांहीं तरी गचाळ यायचा. मनाजोगा कांहीं यायचा नाहीं. पुनः टपालाचा किंवा रेल्वेचा चार्ज आणखी उरावर बसायचा! अन् पाठ-विणार चे उपकार वर! हा धंदा केला, तर प्रत्येक स्टेशनावर हवा तेवढा माल खपायची अगदीं खात्री! नफाहि रगड अन् स्वतंत्र धंदा!"

हा विचार गणपतरावांच्या मनांत येतांच त्यांनां जणूं दैवी स्फूर्तिच उत्पन्न झाली! बस्स! व्यापार करावयाचा–नोकरी म्हणून अतःपर करावयाची नाहीं, असें त्यांनीं ठरविलें. नोकरी म्हणजे कांहीं झालें तरी पारतंत्र्य! कितीहि मन लावून नोकरी करा–धन्याच्या मनाला म्हणून ती यावयाची नाहीं. धन्यासाठीं नोकरानें प्रसंगीं जीव दिला असला, तरी प्रसंग येतांच, मागचें सर्व विसरून तो त्याच्या जीवाची परवा न करतां त्याला लाथ मारून हांकून दिल्याखेरीज रहावयाचा नाहीं. शिवाय, इतकेंहि करून नोकरींत तशी कांहीं प्राप्ति तरी असती, तर एक असो. नोकरी करून कधीं कोणी मोठा मनुष्य झाला आहे, असें एकतरी उदाहरण दाखवितां येईल का? तेंच व्यापारधंद्याचें पहा. शंभरांत पन्नास माणसें त्यांच्या परिस्थितीच्या मानानें मोठींच झालेलीं आढळून येतील. गणपतरावांच्या मनामध्यें या वेळीं अशा तऱ्हेचे विचारतरंग उसळून राहिले होते.

गणपतरावांनीं पुनः एकदां प्रत्येक थडींतले रुपये मोजून ते वीसवीसच आहेत, अशी मनाची खात्री करून घेतली, व एकामागून एक सर्व रुपये त्यांनीं थैलींत भरले. भरतांना होतां होईल तों त्यांचा आवाज होऊं नये, अशी ते खबरदारी घेत होते. थैलींत रुपये भरून त्यांनीं ती ट्रंकेंत ठेवली, व तिला कुलूप लावून ते बिछान्यावर पडून झोंपेचा प्रयत्न करूं लागले.

काल सबंध रात्रींत गणपतरावांच्या डोळ्याला डोळा म्हणून कसा तो लागला नव्हता. इतकेंच नाहीं, तर विचारांच्या अतिरेकानें त्यांच्या मनाला अत्यंत भयंकर त्रास झाला होता; यामुळें आज ते अगदींच थकून गेले होते. त्यांच्या शरीराला व मनाला विश्रांतीची अत्यंत आवश्यकता वाटत होती. त्यांचें मनहि या वेळीं बरेंच शांत व प्रसन्न झालें होतें. यामुळें दोन तीन तास सणसणीत झोंप काढून आलेली सारी क्लान्ति नाहींशी करून टाकावी, या उद्देशानें गणपतराव बिछान्यावर पडले.

झोंप घेण्याच्या हेतूनें गणपतराव बिछान्यावर डोळे मिटून पडले खरे, परंतु त्यांनां कांहीं केल्या झोंप येईना. आपलें मस्तक शांत झालें आहे, असें त्यांनां वाटत होतें; परंतु त्यांची ती कल्पना अगदीं चुकीची होती. काल रात्रीं त्यांच्या मनांत भयाच्या व भावी विपत्कालाच्या विचारांनीं कल्लोल करून सोडला होता, तर आज त्यांच्या ऐवजीं समाधानाच्या व भावि वैभवाच्या विचारांनीं तेथें नृत्य करावयाला आरंभ केला होता. मिळून, कालच्या व आजच्या त्यांच्या मस्तकाच्या स्थितींत फारसा फरक नव्हता.

गतपतराव डोळे मिटून स्वस्थपणें बिछान्यावर पडले होते; परंतु त्यांच्या मनाला स्वस्थता नव्हती. व्यापारांत खरी उन्नति होते, तेव्हां अतःपर आपण व्यापारधंदाच करावयाचा, असा मघांपासून त्यांचा ठाम निश्चय झालाच होता. हळुहळू आपला व्यापार-धंदा जोमानें चालूं लागून त्यांत आपली क्रमाक्रमानें उन्नति कशी होत जाईल, याविषयींचीं सुंदर, भव्य व मनोहर चित्रें ते आपल्या मनःपटावर रंगवूं लागले. त्यांची 'शेखमहमदी' जोरानें सुरू झाली. या मानसिक कारकीर्दीला, लायनीवर खण विकण्याच्या व्यापारापासून त्यांनीं प्रारंभ केला, तों ते सुमारें पांच दहा मिनिटांच्या आंतच, व्यापारांत लाखों रुपये मिळवून गांवच्या गांव विकत घेऊन त्यांची इनाम-दारीहि पटकावून मोकळे झाले! एकाद्या व्यापारी व्यक्तीनें व्यापारांत खूब पैसे मिळवून एकादें राज्य खरेदी केल्याचें गणपतरावजींनीं कोठें ऐकलें नव्हतें म्हणून, नाहीं तर राज्याची खरेदी करावयाला त्यांनीं कधींहि मागेंपुढें पाहिलें नसतें! बाकी आपल्या या इनामदारींत गांवोगांव त्यांनीं तीन तीन चार चार मजल्यांचे वाडे, प्रचंड बागा, टुमदार बंगले वगैरे किती तरी उठवून दिले. मोठमोठ्या शेतजमिनी लावून त्यांत धान्याधून्याचें व बागमळ्यांतून फळझाडांचें खूब उत्पन्न घेतलें. गणपतरावांच्या तोंडाला कायमचा काळोख फांसून सरस्वती जरी कोठें पळून गेली होती, तरी आपल्या या भव्य मनोराज्यांत त्यांनां अर्धांगी-पासून कमी सुखप्राप्ति झाली असें नाहीं. एका श्रीमंत, उच्च कुलांतील इनामदाराच्या एका तरुण, अतुल

रूपसंपन्न, सद्गुणांचें केवळ भांडारच अशा मुलीशीं त्यांचें लवकरच लग्न झालें. या पत्नीवर गणपतरावांचें प्राणांपलीकडे प्रेम असून तिचेंहि त्यांच्यावर तसेंच निरतिशय प्रेम होतें. या रूपगुणसंपन्न तरुण अर्धांगीच्या समागमांत शांतिसौख्यामध्यें गणपतरावांनीं किती तरी वर्षें काढलीं. निदान या विवाहापासून तरी त्यांचे पत्नीसौख्यासंबंधाचे सर्व हेतु पूर्ण झाले. गुणवती व सुंदर स्त्रीला मुलेंहि तशींच गुणवान् व सुंदर व्हावयाचींच; तशींच तीं गणपतरावजींच्या मनोमय पत्नीलाहि झालीं, आणि त्यांच्यापासूनहि त्यांनां अतिशय सुखलाभ झाला.

इतक्यांत स्टेशनामध्यें गाडीची एक खूब मोठी शिटी होऊन त्यांच्या या साऱ्या सुखस्वप्नांचा भंग झाला, आणि पुनरपि ते या दुष्ट, स्वार्थी व पापी मर्त्य जगांत अवतरले.

गणपतरावांचें मस्तक विचारांनीं अतिशय गरम झालें होतें. सुमारें तासभर जरी ते निद्रादेवीची प्रार्थना करीत होते, तरी ती कांहीं त्यांच्यावर प्रसन्न झाली नाहीं. आतां आपणाला कांहीं झोंप येणार नाहीं, अशी त्यांची खात्री झाली, व बिछान्यावर ते उठून बसले. आपल्या शेखमहमदी मनोराज्याची कल्पना मनांत येऊन गणपतराव आपल्याशींच किंचित् हंसले. त्यांनां त्याच्याबद्दल अतिशय शरम वाटूं लागली.

बिछान्यावरून ते उठले, आणि तांब्यांतून फुलपात्रांत पाणी ओतून त्यांनीं आपलें डोकें, तोंड व कान चांगले धुऊन काढले, व ते परत बिछान्यावर येऊन बसले. खिशांतून विडी व काड्यांची पेटी काढून, एक काडी फरकन् पेटवून, विडी शिलगावून तिचा धूर सोडीत ते कांहीं क्षण स्वस्थ पडले. कांहीं तरी एकादें पुस्तकबिस्तक वाचावें, म्हणजे कदाचित् झोंप आली तर येईलहि, असा विचार करून एक गुप्त-पोलिस-चातुर्य-दर्शक कादंबरी त्यांनीं हातीं घेतली, व ती ते वाचूं लागले.

परंतु गणपतरावांनीं तें पुस्तक तीन चार वेळ वाचलें होतें. तें त्यांनां आतां बरें कसें वाटणार? एका अर्ध्या पानांतच त्यांनां त्याचा कंटाळा आला, व त्यांनीं तें पुस्तक उशाशीं तसेंच ठेवून दिलें. इतक्यांत बैरागी-बुवांच्या 'आत्म-चरित्रा'ची त्यांनां आठवण झाली, व असलीं वाचलेलींच पुस्तकें पुनःपुनः वाचण्यापेक्षां हें बुवाजींचें 'आत्म-चरित्र' तरी पाहूंया काय आहे तें; मनुष्य कोण, कसा काय होता, तें तरी समजेल, अन् मनाची आयती करमणूकहि होईल, असा विचार करून गणपतरावांनीं ट्रंकेंतून तें दप्तर बाहेर काढलें, व तें सोडून त्यांतल्या त्या दोन लठ्ठ वह्या काढून ठेवल्या, व सहज कौतुकानें ते तें दप्तर चाळूं लागले.

एका थोरल्या लिफाफ्यांत नुसतीं पत्रेंच ठेविलीं होतीं: तीं बाहेर काढून गणपतराव पाहूं लागले. तीं सर्व हिंदी भाषेंत असल्यामुळें तीं मुद्दाम वाचण्याच्या भानगडींत ते पडले नाहींत. पुनः लिफाफ्यांत सर्व पत्रें भरून त्यांनीं तो तसाच ठेवून दिला.

नंतर वर्तमानपत्रांच्या कापलेल्या तुकड्यांचा दस्ता हातीं घेऊन, गणपतरावांनीं वरची सुतळ सोडली, व कव्हर बाजूला काढून ठेवून ते तुकडे ते चाळूं लागले. इतक्यांत सभोंवतालीं लाल शाईच्या रेघा मारलेला एक तुकडा त्यांच्या दृष्टीला पडला. 'बाहेरगांवचीं बातमीपत्रें' या सदराखालीं दिलेल्या सारांशांतील तो मजकूर आहे, असें गणपतरावांनां आढळून आलें.

गणपतराव वाचूं लागले:—

"बाणथडी—आम्हाला कळविण्याला अत्यंत दुःख वाटतें, कीं, गेल्या महिन्याच्या २७ तारखेला बाणथडीचे विख्यात इनामदार श्रीमंत गोपाळराव यज्ञेश्वर ऊर्फ भाऊसाहेब पटवर्धन यांनां पक्षघाताच्या विकारानें देवाज्ञा झाली. भाऊसाहेबांचा जन्म गरीब आईबापांच्या पोटीं झाला," तरी अविश्रांत उद्योगानें, धाडसानें व अत्यंत हुषारीनें त्यांनीं परदेशांशीं व्यापार करून प्रचंड संपत्ति मिळविली, व शेवटीं व्यापाराचा खटाटोप आटोपून बाणथडी व त्याच्या आसपासचे गांव त्यांनीं विकत घेतले, आणि आपल्या आयुष्याचा शेवटचा काल शांतींत घालविण्याच्या हेतूनें त्यांनीं ही 'इनामदारी' गळ्यांत घेतली. उद्योगानें व बुद्धिप्रभावानें सामान्य मनुष्याला काय करतां येतें, याचें भाऊसाहेब हे मूर्तिमंत उदाहरण होतें. गेल्या आठ तारखेला भाऊसाहेबांच्या और्ध्वदेहिकाची मोठ्या थाटानें सांगता झाली. भाऊसाहेबांचे ज्येष्ठ चिरंजीव आज पुष्कळ वर्षें परागंदा झालेले असल्यामुळें त्यांचें सारें और्ध्वदेहिक त्यांचे धाकटे चिरंजीव

श्रीमंत बापूसाहेब यांनीं पार पाडलें. भाऊसाहेबांच्या थोर नांवलौकिकाला, धार्मिक स्वभावाला व औदार्याला साजेल अशाच थाटानें त्यांचें और्ध्वदेहिकहि पार पडलें, हें कळविण्याला आह्मांला आनंद वाटतो. ठिकठिकाणाहून विद्वान् ब्राह्मण व शास्त्री पंडित बाणथडीला आले असून त्यांनां विपुल दक्षिणा व इतर योग्य पदार्थ देऊन संतुष्ट करण्यांत आलें. बापूसाहेबांनां या प्रसंगीं गरीबगुरिबांचीहि विस्मृति पडली नाहीं, ही मोठ्या संतोषाची गोष्ट होय. दोन दिवस गरिबांनां व अनाथअपंगांनां यथेष्ट अन्नदान करण्यांत येऊन बऱ्याच गरिबांनां घोंगड्या, धोतरें वगैरे वस्त्रेंहि देण्यांत आलीं. आपल्या परमपूज्य वडिलांच्या नांवानें बापूसाहेबांनीं ठिकठिकाणच्या कित्येक लोकोपयुक्त संस्थांनांहि अनेक लहानमोठ्या देणग्या दिल्या, ही गोष्ट तर त्यांतल्यात्यांत अत्यंत संतोषजनक होय. श्रीमंत बापूसाहेब आपल्या वडिलांप्रमाणेंच आपलाहि नांवलौकिक दिगंतव्यापी करतील, अशी आह्मांला पूर्ण उमेद आहे."

गणपतरावांनीं वर्तमानपत्राची तारीख तपासून पाहिली. दोन वर्षांपूर्वींच्या एका अंकांतील हा उतारा होता.

गणपतरावांचें कुतूहल किंचित् वृद्धिंगत झालें, व ते वर्तमानपत्रांचे दुसरे तुकडे मोठ्या उत्साहानें चाळूं लागले. इतक्यांत वरील उताऱ्याप्रमाणेंच ज्याच्या भोंवतीं लाल शाईच्या जाड रेघा मारल्या आहेत, असा एक उतारा गणपतरावांच्या दृष्टीला पडला. हा उतारा 'केसरी'च्या एका जुन्या अंकांतील जाहिरातींतील होताः—

"बक्षीस रुपये पांचशें !

बुधवार, ता० १३ जानेवारी रोजीं आमचा वडील मुलगा धुंडिराज ऊर्फ नानासाहेब, हा घरांतून नाहींसा झाला असून त्याचा आजपर्यंत पत्ता लागलेला नाहीं. मुलाचें वय १४ वर्षांचें असून तो रंगानें काळा, अंगानें साधारण सडपातळच आहे. चेहरा साधारण वाटोळा असून रूपानें सुंदर आहे. डोकीवर संजाब व मोठी शेंडी आहे. अंगांत पिवळा रेशमी कोट, नेसावयाला रेशमी करवतीकांठी धोतर, डोकीला काळी मखमाली जरीची टोपी, पायांत पुणेरी जोडा असा त्याचा पोषाख आहे. मुलाचा पत्ता लागत नसल्यामुळें घरांतील आह्मी सर्व मंडळी अतिशय काळजींत आहों. जर कोणाला आमच्या मुलाचा पत्ता लागला, तर कृपा करून त्यानें आम्हाला कळवावें, ह्मणजे आह्मी त्याला वर लिहिलेलें बक्षीस अत्यंत संतोषानें देऊं, व मनुष्य पाठवून मुलाला घेऊन यावयाची तजवीज करूं. स्वतःच मुलाला आणून पोहोंचविल्यास जाण्यायेण्याचा खर्च देऊन आणखीहि आनंदानें कांहीं जादा इनाम देऊं.

गोपाळ यज्ञेश्वर ऊर्फ भाऊसाहेब पटवर्धन,
इनामदार–बाणथडी,
एस. एम्. सी."

गणपतरावजींचें कुतूहल या जाहिरातीनें तर अतिशय वृद्धिंगत झालें. त्यांनीं तारीख वगैरेचा शोध लागतो का पाहिलें, तों तो उतारा सोळा वर्षांपूर्वींच्या 'केसरी' पत्राच्या एका अंकांतला आहे. असें त्यांनां आढळून आलें.

मनांतल्या मनांत किंचित् हंसून ते ह्मणाले "अस्सें ! एकूण लहानपणींच बुवाजींनीं घरांतून पोबारा केला अन् मग हा पेषा स्वीकारला, असें दिसतें. वाः ! बुवाजी तर मग खूब श्रीमंत आहेत. अगदीं बडे बापके बेटे ! इतक्या दिवसांनीं–दिवसांनीं कसचें ? किती तरी वर्षांनीं स्वारी घरीं चालली होती, असें दिसतें. कशाला चालला होता बरें हा घरीं ? वडिलांची इनामदारी अन् संपत्ति हाताखालीं घालण्याकरितां, असेंच दिसतें. मोठी मौज दिसते आहे बुवा ! बुवाजींचें हें 'आत्मचरित्र' मोठें वाचण्यासारखें आहे असें दिसतें. जरा काळजीपूर्वक वाचलें पाहिजे."

आळसाआळसानेंच, पडल्यापडल्याच गणपतराव बुवाजींच्या 'आत्मचरित्रा'चीं पानें चाळूं लागले. चरित्राचा पहिला भाग हकीगतीच्या किंवा इतिवृत्ताच्या रूपानें लिहिला असून दुसरा भाग रोजनिशीच्या रूपानें लिहिलेला आहे, असें त्यांनां आढळून आलें. मात्र दुसऱ्या भागांतील रोजनिशी प्रत्येक दिवसाची नव्हती–मध्येंमध्यें बरेच खंड पडले होते. महत्त्वाचा कांहीं मजकूर असेल, तर तेवढाच त्या त्या तारखेला नमूद केलेला आहे, असें गणपतरावांनां दिसून आलें.

चोपड्यांचीं पानें उलटीत, विडीचा धूर सोडीत, गणपतराव आपणाशींच किंचित् हंसून ह्मणाले "अरे बापरे ! हें तर एक प्रचंड महाभारतच दिसतें आहे ! बुवाजींनीं हें भारूड लिहिण्यांत तिळमात्र आळस किंवा कसूर केलेली दिसत नाहीं. हें एवढें चऱ्हाट वाचायचें कुणीं बुवा ? तरी त्यांतल्या त्यांत काळजीपूर्वक सुवाच्य तरी लिहिलें आहे, हे तरी कांहीं कमी उपकार नाहीं करून ठेवले आमच्यासारख्या वाचकांवर बुवाजींनीं ! चला, आतां शेवटीं पाहूंया बरें काय बुवा लिहितात तें. स्वारी कोणत्या उद्देशानें मुंबईला चालली होती, तें कदाचित् कळून येईल शेवटीं !"

असें ह्मणून, मधलीं बरींच पानें सोडून गणपतराव दुसऱ्या भागाच्या शेवटचा शेवटचा भाग वाचूं लागले. सुमारें एक महिन्यापूर्वीच्या एका तारखेच्या खालीं खालील मजकूर लिहिला होताः—

"शेवटीं, आज मनाचा अगदीं पूर्ण निश्चय केला, कीं, या खोट्या वैराग्याचा त्याग करून पुनः गृहस्थाश्रमाचा स्वीकार करावयाचा. बस्स झाला हा सारा दांभिकपणा ! वैराग्याचा त्याग करून गृहस्थाश्रमी व्हावयाचें हें तर ठरलेंच. परंतु एकदम घाई करून उपयोगीं नाहीं. काय करावयाचें तें अगदीं सावधपणानें व काळजीपूर्वक केलें पाहिजे. मुख्य सावधपणाची गोष्ट करावयाची ती ही, कीं, माझी धर्मपत्नी अजून जीवंत आहे कीं नाहीं, याचा शोध करावयाचा, आणि जर यदाकदाचित् ती जीवंत असलीच, तर ती कोणत्या स्थितींत कशी आहे, याचाहि काळजीपूर्वक तपास करावयाचा. घर सोडून जेव्हां मी निघालों, तेव्हां ती सारी आठ वर्षांची पोर होती. आतां ती जीवंत असलीच तर तिला हें चोविसावें वर्ष असून ती पूर्ण यौवनावस्थेंत असेल. मध्यें सबंध सोळा वर्षांचा दीर्घ काल गेला आहे. इतक्या दीर्घावधींत तिनें आपलें शारीरिक व मानसिक पावित्र्य अगदीं पूर्णपणें कायम ठेवलें असेल कीं नाहीं, हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न असून त्याचाच अगदीं कसून शोध केला पाहिजे. पावित्र्य कायम राहिलें असेल, असा फारसा संभव दिसत नाहीं. ह्मणून, घरीं तर जावयाचेंच, परंतु भलत्याच एकाद्या वेषानें गुप्तपणें जाऊन, गांवांत कांहीं दिवस राहून, तेथें हिंडून फिरून या गोष्टीसंबंधानें नीट शोध करावा, असा मीं मनाशीं निश्चय केला आहे. माझी पत्नी जीवंत असली, व पवित्र स्थितींतच तिनें इतकी अवधि घालविला आहे असें जरी आढळून आलें, तरी संपूर्ण वैधव्यवेषाचा जर तिनें स्वीकार केला असला तर ? तरी विशेष काय हरकत आहे ? बहुधा वपन तर ती करणार नाहींच. चांगल्या शिकल्यासवरल्या आईबापांची ती मुलगी आहे, आणि बहुतेक चालीरीतींत बाबा जरी जुन्या मताचे होते, तरी केशवपनासंबंधानें त्यांना अतिशय चीड असे. या गोष्टीचाहि माझ्या स्त्रीच्या मनावर परिणाम झाल्याशिवाय रहाणार नाहीं, असें वाटतें. आणि विपरीत गोष्ट कांहीं झाली असलीच, तरी ती ह्मणजे कांहीं मोठीशी महत्त्वाची बाब आहे असें नाहीं. जावयाचें तर ठरविलें, पण मठाची व्यवस्था काय करावी, हें अजून कांहीं केल्या ठरत नाहीं."

हा मजकूर वाचून गणपतराव कांहीं वेळ आश्चर्यानें स्तब्धच झाले. वाचनाचें काम बंद ठेवून, बिछान्यावर किंचित् उंच होऊन, उशीवर हाताचा भार देऊन व तळहातावर मस्तक ठेवून ते आपणाशींच विचार करण्यांत अगदीं निमग्न होऊन गेले. निरनिराळ्या विचारांचा उदय व अस्त त्यांच्या मनामध्यें प्रतिक्षणीं या वेळीं होत होता.

अशा स्थितींत सुमारें दहाबारा मिनिटें गेलीं, तरी गणपतराव विचारांतच गढून गेले होते. नंतर एक मोठा निःश्वास टाकून ते आळसानें कांहीं वेळ बिछान्यावर अस्ताव्यस्त पडून राहिले.

कांहीं वेळानें गणपतराव उठले, व त्यांनीं एक विडी पेटविली. ती ओढीत ओढीत ते पुनः 'आत्म–चरित्र' चाळूं लागले. दुसऱ्या भागामध्यें एके ठिकाणीं एकाएकीं पुढील मजकूर त्यांच्या दृष्टीला पडला.

"आज 'वार्तासागरा'चा अंक आला. त्यांत पाहिलें तों, गृहस्थाश्रमांत माझे जे वडील होते, ते स्वर्गस्थ झाल्याची बातमी मला आढळून आली. मोठ्या थाटामाटानें त्यांचें और्ध्वदेहिक पार पडलें, असाहि त्यांत मजकूर आहे.

"ही बातमी वाचतांच माझ्या अंतःकरणाला खरोखरच अनेकवृश्चिकदंशाच्या यातना झाल्या. वैराग्य घेतल्यानंतर असें कां व्हावें, असा जरी महत्त्वाचा प्रश्न उपस्थित झाला, तरी वडिलांच्या मृत्यूनें माझ्या मनाला अतिशय दुःख झालें, ही गोष्ट मला नाकबूल करतां येत नाहीं. आज बाळपणापासूनच्या सर्व गोष्टी

एकामागून एक मला पुनः डोळ्यांसमोर दिसूं लागल्या आहेत, व त्यांनीं माझें अंतःकरण विदीर्ण होत आहे.

"गृहस्थाश्रमाचा त्याग करून मी हा असा बैरागी झालों, हें मीं एकंदरींत बरें केलें काय, हा प्रश्न मला वारंवार ताप देत असतो. आजहि या प्रश्नानें पुनः भारीच उचल खाल्ली आहे. संसार सोडून वैराग्य घेतल्यानें, माझी पूर्ण आध्यात्मिक उन्नति होईल, असा जो मला भरंवसा वाटत होता, तो पूर्णपणें विफल ठरला आहे, यांत मात्र तिळप्राय संशय नाहीं. आजपर्यंतच्या दीर्घ अवधींत माझ्या आत्म्याची एक केंसभरहि उन्नति झालेली नाहीं. वैराग्य घेऊन मला कसला लाभ झाला? मीं केलें तरी काय? मी पूर्णपणें विषयी आणि संसारी बनलों, याशिवाय मीं काय केलें आहे? माझा परमार्थचिंतनांत सबंध दिवसापैकीं कितीसा वेळ जातो? मठाच्या पैशाच्या व्यवस्थेंतच प्रत्येक दिवसापैकीं माझे पांचसहा प्रहर जात नाहींत काय? माझें चारित्र्य तरी निष्कलंक ठेवण्याविषयीं मीं कधीं प्रयत्न केला आहे काय? वैराग्य घेतल्यानंतर तरी नीतीनें आयुःक्रमण करण्याची जबाबदारी माझ्यावर नव्हती काय? ती जबाबदारी मीं कितीशी पार पाडली? तर मग मीं वैराग्यांत शिरून केलें तरी काय? माझें कोणतें हित मीं साधलें? आजवर या मृगजलाच्या मागें मी कां लागलों? या व्यर्थ वैराग्याचा भार माझ्या शिरावर आजपर्यंत मीं कां वाहिला? षड्रिपूंपैकीं एकाहि रिपूचें दमन करण्याचें सामर्थ्य वैराग्यानें मजमध्यें उत्पन्न झालें नाहीं; किंवा तें दमन मीं आजवर कधीं केलेंहि नाहीं. त्या दिवशीं, गांजाची चिलीम तयार करून द्यावयाला नोकरानें जरासा कोठें वेळ लावला, तर रागानें अंध होऊन, भान विसरून, मीं त्याच्या मस्तकावर जोरानें खडावा फेंकून मारली! काय माझ्या वैराग्याचा जोर हा! गेल्या वर्षीं मठाच्या इस्टेटीच्या वहिवाटदारानें मठाच्या पैशांतून हजार रुपये गडप करून 'यःपलायते' केलें, त्या वेळीं त्या क्षुल्लक हजार रुपयांबद्दल मीं किती शोक केला, ती गोष्ट मीं मनाला किती लावून घेतली! त्या शोकानें पंधरा दिवस मला झोंप आली नाहीं, आणि महिनाभर मला चांगलें जेवणहि गेलें नाहीं! उत्तम सुगंधी आंबेमोहर तांदुळांचा भात, आणि उत्कृष्ट ताजें लोणकढें गाईचें तूप याशिवाय माझें भोजन होत नाहीं, उत्तमोत्तम किंमती फळांशिवाय माझी मुखशुद्धि होत नाहीं, माझ्या उपासाला नेहमींच्या भोजनाच्या पांचपट खर्च येतो! तीन शेर दूधाचें आटवून एकशेर दूध करून, त्यावर सारा दिवसभर जी मलई येते तिच्यांत उत्तम खडीसाखरेचें वस्त्रगाळ चूर्ण मिसळून, जो मजेदार रुचकर पदार्थ तयार होतो, त्यानें कोठें माझ्या मधल्या वेळच्या फराळाची भूक भागते! मी महन्त काय? वैराग्याचा कोणत्या भागाचा मजमध्यें उत्कर्ष झाला आहे, म्हणून 'महन्त' या पदवीचा मला लाभ झाला? माझ्या मागें माझ्या 'भजनानंद' या नांवाचा विपर्यास करून लोक 'भोजनानंद' या नांवानें माझा उपहास करितात, तो ऐकून माझ्या रागाला सीमा रहात नाहीं; परंतु त्यांचा उपहास खोटा असतो काय? खरें म्हटलें तर त्याला मी पूर्णपणें पात्र नाहीं काय? स्त्रियांसंबंधानें तरी माझी नजर साफ आहे काय? धर्माच्या अभिलाषानें कित्येक मीनाक्षींनां मोहाच्या जाळ्यांत पकडून मीं त्यांचा सर्वनाश केला नाहीं काय? कोर्टांत खोट्या साक्षी तर मीं दिल्या, मठाचे खटले जिंकण्याकरितां खोटे कागद तर मीं माझ्या नजरेखालीं तयार करून घेतले, प्रतिक्षणीं खोटी गोष्ट बोलावयाला, खोटी गोष्ट करावयाला माझें मन बिलकूल कचरत नाहीं. वचनभंग, विश्वासघात इत्यादि गोष्टी तर पदोपदीं माझ्या हातून होतात. हाय! मनुष्याला शक्य असणारें कोणतें पातक माझ्या हातून व्हावयाचें राहिलें आहे? धिक्कार—शतधा धिक्कार असो मला, माझ्या वैराग्याला आणि माझ्या पापी जीविताला!"

गणपतरावांचें मन वाचनांत अगदीं रंगून गेलें. ते जरी एकसारखे वाचीत नव्हते, तरी त्यांनां तें 'चरित्र' हातून खालीं ठेवावेंसें वाटेना! मधलेमधले उतारे ते लक्ष्यपूर्वक वाचूं लागले. मठांतील आयुःक्रमाचा बुवाजींनां अतिशय तिटकारा येत चालला असून, शेवटींशेवटीं तर तो अगदीं कमालीच्या सीमेपर्यंत येऊन ठेपला होता, असें गणपतरावांनां आढळून आलें.

'महन्त' भजनानंदानें शेवटीं शेवटीं आपल्या 'रोजनिशीं'त पुढीलप्रमाणें उद्गार काढले होते:—

"आज 'वार्तासागर'चा अंक आला. 'वार्तासागर' येतांच 'ठिकठिकाणचीं बातमीपत्रें' या सदराखालीं बाणथडीची बातमी कांहीं आहे कीं काय, हें मी प्रथम पहात असतों; त्याप्रमाणें, आजच्या अंकांतहि तिकडची कांहीं बातमी आहे कीं काय, हेंच मीं पहिल्यानें पाहिलें. बातमी होती, आणि ती अत्यंत

हृदयविदारक होती. हाय ! माझा धाकटा भाऊ श्रीराम ऊर्फ बापू स्वर्गवासी झाल्याची त्यांत बातमी होती. मी जेव्हां घर सोडून पळून आलों, त्या वेळीं बापू सारा एक वर्षाचा होता. त्या वेळीं माझ्या मनांत हाच एक विचार प्रमुखपणें वावरत होता, कीं, मी जरी घर सोडून निघून गेलों, तरी बापू तर माझ्यामागें आहे ! बाबांनां आणि आईला म्हातारपणीं तोच आधार होऊन राहील, आमच्या वंशाचा विस्तार तोच करील, आणि बाबांनीं एवढ्या परिश्रमानें, धाडसानें व हुषारीनें संपादन केलेल्या संपत्तीचेंहि तोच संरक्षण करील. तो माझा प्रियबंधु तर सर्वांच्या मायेचा त्याग करून स्वर्गलोकीं निघून गेला. आतां माझ्या वृद्ध मातेचें सांत्वन कोण करील ? बाबांच्या संसाराच्या अफाट पसाऱ्याकडे कोण पाहील ?बाबांच्या विशाल संपत्तीचा–जिचें वर्षाचेंच उत्पन्न जवळजवळ एक लाख रुपये आहे तिचा–उपभोग कोण घेईल ? सुदैवानें बापूचें लग्न तरी झालें नव्हतें, नाहीं तर तो एक जबरदस्त धोंडा आईच्या मस्तकावर तिच्या मृत्यूपर्यंत राहिला असता. या घाणेरड्या मठांत बसून, गांजाच्या चिलमी फुंकीत, मी माझें हें सारें किळसवाणें आयुष्य घालवूं काय ? कोठें आहे वैराग्य ? कोठें आहेत जपतप, धर्म-साधन, भजन ? केवळ विषय–विषय–विषयाचें चिंतन ! जिव्हेच्या तृप्तीसाठीं धडपड आणि इंद्रियांच्या लालसा पुरविण्याचा खटाटोप ! या मातीच्या देहाचे हजारों चोंचले पुरविण्यासाठीं,त्याला नानाविध प्रकारें सुख कसें प्राप्त होईल त्याची तजवीज करण्यासाठीं, माझे आणि माझ्या माणसांचे अहोरात्र, अष्टौप्रहर प्रयत्न चाललेले असतात. असत्य,दंभ व दुर्वर्तन यांत माझें सारें आयुष्य जात आहे. जर या साऱ्या घाणेरड्या गोष्टींत आणि विषयपरिपूर्तींत आयुष्य घालवावयाचें, तर बाबांनीं मिळवून ठेवलेल्या विशाल संपत्तीनें–जी या मठाच्या संपत्तीच्या निदान वीसपटीनें तरी अधिक आहे तिनें –माझा काय अपराध केला आहे ? काय करूं ? काय करूं ? माझ्या मनाला हीच एक दारुण चिंता लागून राहिली आहे. हा भिकार मठ सोडून मी जाऊं का ? बाणथडीला जाऊन पुनः संसारांत खरोखरच मी प्रवेश करूं का ? वैराग्याच्या या दिखाऊ सोंगाचा त्याग करूं का ? माझ्या हक्काच्या संपत्तीचा व धर्मपत्नीचा पुनरपि मी स्वीकार करूं का ? तर मग मीं घर तरी कां सोडलें ? बाबांनां म्हातारपणीं ताप कां दिला ? त्यांनां पुत्रशोकांत वृद्धपण घालवावयाला लावून शांतपणें देह ठेवण्याचें सौख्य उपभोगूं कां दिलें नाहीं ? वृद्ध मातेची मला आजवर कींव कां आली नाहीं ? पुत्रशोकाच्या भयंकर अग्निज्वालांत मीं तिला आजवर जळत कां ठेवली ? अग्नि-ब्राह्मणांसमोर जिला मीं 'नातिचरामि' अशी त्रिवार शपथ दिली, त्या माझ्या धर्मपत्नीचा, माझ्या जन्माचा सोबतिणीचा मीं त्याग कां केला ? यौवनोन्मादांत कदाचित् तिचें वांकडें पाऊल पडलें असलें, तर त्या पातकाला प्रत्यक्ष कारण मी कां झालों ? तिचें पावित्र्य कदाचित् अजूनहि कायम असलें तर तिला जीवंतपणींच पति-विरहाच्या नरकयातनांची शिक्षा जन्मभर भोगावयाला मीं कां लावली ? वैराग्यांत शिरून त्या परमपवित्र संस्थेची विडंबना मीं कां केली ? मठाच्या देवतांची, स्थापकांची, गुरूंची, सेवकांची, भक्तांची, मीं आजवर भयंकर प्रतारणा कां केली ? त्या परमपवित्र स्थानाला माझ्या वसतीनें प्रत्यक्ष नरकाचें स्वरूप आणावयाला मी कारण कां झालों ? हाय ! काय करूं ? कोठें जाऊं ? कोणत्या मार्गाचें अवलंबन करूं ? आज सारा दिवस याच प्रश्नांनीं माझ्या मस्तकाच्या चिंधड्या उडत आहेत. दीनदयाघना, प्रभो, या पाप्याला तूंच काय तो योग्य आणि धर्माचा मार्ग दाखीव !"

हा मजकूर दोन महिन्यांपूर्वी एका तारखेला बुवाजींनीं लिहिला होता. यानंतर दोन तारखांखालीं मजकूर असून तेथेंच ग्रंथाची असंपूर्णपणें समाप्ति झाली होती. शेवटच्या मजकुरांतहि, आपल्या पत्नीच्या पावित्र्याची कसोशीनें परीक्षा करण्यासाठीं गांवीं जावयाचें व छद्मवेषानें कांहीं दिवस तेथें राहून आपलें कार्य करावयाचें, असा आपला निश्चय बुवाजींनीं पुनः नमूद केला होता.

चोपडी बंद करून गणपतराव बिछान्यावरून उठले, व मकाणाच्या त्या एवढ्याशा जागेंत इकडून तिकडे येरझारा करूं लागले. त्यांच्या मस्तकामध्यें व हृदयामध्यें प्रचंड क्षोभ झाला होता. विचारांनीं काहूर करून सोडलें होतें. फिरतांफिरतां मध्येंच ते उघड्या खिडकीपाशीं उभे राहून बाहेरच्या देखाव्याकडे दृष्टि फेंकीत; परंतु त्यांच्या त्या दृष्टीला बाहेर कांहींच दिसत नसे ! एकवार त्यांच्या चेहऱ्यावर विषादाची घनघोर छाया पडे,आणि दुसऱ्या क्षणीं ती म्हाहींशी होऊन तेथें आनंदाची प्रफुल्लता पसरे ! पुनः कांहीं तरी दारुण शंकेमुळें

त्यांचा चेहरा काळवंडे; पुनः बेपर्वाईचें व तुच्छतेचें हास्य त्यांच्या मुखावर दिसे !

अशा स्थितींत, जवळजवळ एक तास गणपतराव येरझारा घालीत होते. नंतर पुनः ते बिछान्यावर बसले, दोन्ही हातांनीं त्यांनीं आपलें मस्तक घट्ट दाबून धरलें, व ते मनाशींच ह्मणाले " मी जाणार–जाणार ! या भयंकर मोहाचा त्याग करण्याची माझ्या दुर्बल मनाला शक्ति नाहीं. एक लाख वार्षिक उत्पन्नाची इनामदारी, आणि सुंदर तरुण स्त्री यांचा जन्मभर लाभ, केवळ एका खोट्या भाषणानें होण्यासारखा असतां, माझ्यानें हा मोह दूर सारवत नाहीं ! इतक्या वेळांत ज्याची जळून तीन चिमट्या राख झाली असेल, त्याचें वय, अंगाची काठी, रंग, चेहरा सगळें कांहीं हुबेहूब अगदीं माझ्यासारखें होतें, असें सर्वजण सांगतात. मलाहि तसेंच वाटतें. सोळा वर्षांच्या दीर्घावधींत हा एकदांहि आपल्या गांवीं गेलेला नाहीं. पत्र नाहीं, चिठ्ठीचपाटी नाहीं ! इतक्या वर्षांनंतर माझी लबाडी कोणालाहि–प्रत्यक्ष परमेश्वरालाहि आतां उमगणें शक्य नाहीं ! या माणसाचें 'आत्म–चरित्र' माझ्या हातांत आहे. त्यांत प्रत्येक अगदीं लहानसहान गोष्टींचेंहि यथास्थित वर्णन दिलेलें आहे. त्याचा अगदीं बारकाईनें अभ्यास केल्यावर, त्या साऱ्या गोष्टी अगदीं तोंडपाठ केल्यानंतर माझ्याविषयीं संशय घेणें ब्रह्मदेवाच्या बापालाहि शक्य नाहीं. गणपतराव ! तुह्मी आतां मरून आपला अवतार पार संपवा, अन् या नानासाहेब इनामदाराच्या रूपानें पुनः जन्माला येऊन विपुल संपत्ति अन् तरुण सुंदर स्त्री यांचे स्वामी व्हा ! "

खंड दुसरें.

प्रकरण पहिलें.

सुवर्णमालिनी !

एप्रिल महिन्याला प्रारंभ होऊन थोडेच दिवस झाले होते; परंतु इतक्यांतच मुंबईत उष्म्याची जवळजवळ परमावधि झाली होती ! अगोदर मुंबईचा उन्हाळा तो ! नुसत्या घामानेंच माणसांचा जीव अगदीं गुदमरल्यासारखा होतो, त्यांत आणि या वर्षी कमालीचा उष्मा पडला होता. तेव्हां मुंबईचे रहिवासी पाण्याच्या बाहेर पडलेल्या माशाप्रमाणें तडफडत असले, तर त्यांत कांहीं नवल नाहीं.

सकाळीं दहा–सवादहा वाजण्याचा सुमार असेल. अजून कांहीं सूर्यनारायणानें आपला प्रबल प्रताप तितक्या प्रमाणांत दाखवावयाला सुरुवात केली नव्हती; तरी भर दुपारीं आपण काय करणार आहों, त्याची चांगलीच चुणूक तो या वेळापासूनच दाखवूं लागला होता. अशा वेळीं मुंबईत फ्रेंच पुलाकडील मोठ्या रस्त्यानें ऐटदार मुठीची सुंदर रेशमी छत्री उघडून एक तरुण हळुहळू चालला होता.

तरुण अतिशय ह्मणजे खरोखरच फार सुंदर होता. त्याचा वर्ण उज्ज्वल व लिंबाच्या कांतीचा असून तो चांगला गोरागोरा पान होता. त्याचा चेहरा धड लंबोत्तर नाहीं आणि धड वाटोळाहि नाहीं, अशा ठेवणीचा असून त्यावर तेज तर नुसतें सांडून राहिलें होतें. त्याच्या चेहऱ्यावर जनानी मार्दव व मर्दानी काठिन्य यांचें मनोहर मिश्रण दृग्गोचर होत असून त्याच्या दर्शनानेंच कोणालाहि त्या तरुणाविषयीं सप्रेम आदर वाटण्यासारखा होता. त्याचें कपाळ चांगलें रुंद असून भुंवया काळ्याभोर, रेखीव व कमानदार होत्या. दोन भिंवयांच्या अगदीं मधोमध, जरा वर, त्यानें तकतकणाऱ्या तांबड्या गंधाचा एक–धड मोठा नाहीं व धड बारीक नाहीं, असा–टिळा ऐटदार रीतीनें ठेवून दिला होता. त्या तिलकानें त्याच्या अगोदरच्या सुंदर चेहऱ्याच्या रमणीयतेंत अधिकच भर पडली होती. त्याचें नाक सरळ व मध्यमाकृति असून डोळेहि चांगले काळेभोर, विशाल आणि पाणीदार होते. आपल्या डोळ्यांचें पाणी अधिक दिसून आपल्या चेहऱ्याच्या सौंदर्याची वृद्धि व्हावी ह्मणूनच कीं काय कोण जाणे, त्यानें सोन्याच्या फ्रेमीचा चकचकीत चष्मा ऐटीनें लावला होता. नाहीं तर अशा पाणीदार डोळ्यांनां वास्तविक कांचेच्या साहाय्याची तादृश अपेक्षा दिसत नव्हती. त्याच्या सुंदर ओंठांवरून तो अत्यंत बुद्धिमान् असावा, असें तज्ज्ञ माणसांच्या तेव्हांच लक्ष्यांत येण्यासारखें होतें. त्याच्या मिशा मोठ्या नसून बारीक पण चांगल्या काळ्याभोर होत्या. अशा सर्वतोपरि सुंदर तरुणानें डोकीवर ऐटदार केंस ठेवले होते, हें निराळें सांगणें ह्मणजे स्वतःला हास्यास्पद करून घेणें होय.

त्या तरुणाच्या पोषाकाच्या वर्णनांत आमच्या क्षुद्र संग्रहांतील सौंदर्यवाचक सारेच शब्द खपून जाऊन आमचें भांडवलच संपुष्टांत येण्यासारखें असल्यामुळें त्या भानगडींत फारसें न पडणें हेंच श्रेयस्कर होय, असें आह्माला वाटतें. त्यानें अतिशय उंची व झकास काळ्या अलपाकाचा पार्शी–पार्शीच, का त्या फॅशनला दुसरें कांहीं नांव आहे हें आह्माला ठाऊक नाहीं–कोट घातला असून तो त्याच्या गुडघ्यांच्या खालीं चारसहा बोटें आला होता. अतिशय तलम असें निळ्या रेशमी बारीक किनारीचें धोतर तो नेसला असून त्याचे सोगे पायघोळ होते, हे निराळें सांगण्याची जरूरी नाहीं. त्याच्या पायांत अतिशय चकचकीत पॉलिश केलेले काळे पम्पशू असून त्यांनां रबरी सोल मारले होते. कोटाचीं सारीं बटनें त्यानें लावलीं होतीं, तरी छातीजवळ उघड्या असलेल्या भागांतून आंतलें कोटाशीं सर्व बाबतींत पूर्ण साम्य असलेलें सुंदर जाकीट आणि बंगाली तऱ्हेचा, चुण्या चुण्यांची रुंद छाती असलेला खमीस त्याच्या हिऱ्याच्या बटणांसह दिसून येत होता. शर्ट–कफ् किंचित् बाहेर दिसत असून त्याचीं मोठालीं

सोन्याचीं बटणें कोणाहि फॅशनच्या भक्ताला पूर्ण मोह पाडण्यासारखीं होतीं. त्याचा सुंदर अस्मानी रंगाचा रेशमी रुमाल डाव्या हाताच्या कफमध्यें खोंचलेला होता. डोक्याला गुजराती तऱ्हेची काळी, उंच दिवाळची भारी किंमतीची टोपी होती.

या तरुणाचें नांव वसन्तराव तांबे. याचें वय कांहीं फार नव्हतें. त्याची तिशी नुकतीच उलटली होती. वसन्तरावांचे वडील डॉक्टर सदाशिवराव तांबे यांचें नांव मुंबईंत कोणाला माहीत नाहीं ? डॉक्टर तांबे हे मुंबईतील अत्यंत लोकप्रिय डॉक्टर असून त्यांच्या चिकित्सापटुत्वाबद्दल, गोड स्वभावाबद्दल, विशेषतः गोरगरिबांविषयींच्या कनवाळूपणाबद्दल अजूनहि त्यांचें नांव चारचौघांत योग्य प्रसंगीं निघाल्यावांचून रहात नाहीं. त्यांच्याबद्दल पुष्कळ आख्यायिका अजूनहि ऐकूं येतात. डॉक्टरसाहेबांचा धंदा मुंबईंत अतिशय जोरानें चालत असल्यामुळें व तोहि त्यांनीं पुष्कळ वर्षें केल्यामुळें त्यांनीं खूब माया करून ठेवावी यांत कांहीं नवल नव्हतें. मरतांना डॉक्टरसाहेबांजवळ तीनचार लाख रुपयांची पुंजी निघाली ह्मणतात. अशा श्रीमंत, लोकप्रिय व विख्यात डॉक्टरांचे वसंतराव हे एकुलते एक चिरंजीव.डॉक्टरसाहेबांनां एकंदर अपत्यें पुष्कळ झालीं; परंतु त्यांत या वसंतरावांखेरीज कोणीच वांचलें नाहीं. या कारणामुळें व ते रुपानें सुंदर आणि स्वभावानें चलाख व हुषार असल्यामुळें त्यांच्या वडिलांचे ते अतिशय लाडके होते. अशा लाडांचा व्हावयाचा तोच परिणाम झाला.वसंतरावांचें शिक्षण थोडक्यांत आटोपलें, आणि त्यांची सारी हुषारी आणि चतुराई भलत्याच दिशेनें वाहूं लागली. आपल्या या चिरंजीवांचे प्रताप पहावयाला डॉक्टरसाहेब फार दिवस जीवंत राहिले नाहींत. चिरंजीवांच्या काळजीनेंच त्यांचा झुरून अंत झाला, आणि त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या एवढ्या थोरल्या संपत्तीचे वसंतराव एकच्छत्री मालक झाले.

वय तरुण, हातीं संपत्ति विपुल आणि संगति वाईट, या सर्वांचा परिपाक बहुधा एकच व्हावयाचा, आणि आमच्या वसंतरावांच्या बाबतींत तो झालाहि! वाईट संगतीमुळें वसंतरावांच्या अगाध संपत्तीला वहावयाला शेंकडों मोठमोठीं भगदाडें पडलीं, आणि त्यांतून त्यांची संपत्ति अहोरात्र बाराहि महिने बाहेर पडून जोरानें वाहूं लागली. डॉक्टरसाहेबांनीं इतक्या परिश्रमांनीं मिळविलेल्या प्रचंड संपत्तीचें वसंतरावांनीं अवघ्या दहा वर्षांत पुरें वाटोळें करून टाकलें !

वसंतरावांची सारी संपत्ति गेली; इतकेंच नाहीं, तर वरती त्यांनां आतां किती तरी कर्ज झालें होतें. साध्या भाषेनें बोलावयाचें ह्मणजे वसंतराव सध्यां अगदीं भणंग बनलेले होते. त्यांचा सारा झकपक पोषाक ह्मणजे मुंबईच्या सोकाजीपणाच्या पलीकडे कांहीं नव्हतें. खिशांत पै नसतां, किंबहुना कर्जाच्या बुजबुजाटांत वावरावें लागत असतां, मिशांनां तूप लावून श्रीमंतीचा डौल दाखविणारे 'सोकाजीराव' मुंबईंत हवेतेवढे आढळतात, आणि आमचे वसंतरावजी त्यांच्यापैकींच एक होते, एवढें सांगितलें असतां पुरे आहे. विपुल संपत्ति जवळ असतां, उघड्या डोळ्यांनीं, लोटून लोटून तिला बळजबरीनें घराबाहेर घालवावयाचें, आणि नंतर, कफल्लक बनून अक्काबाईच्या पूर्ण ताब्यांत गेल्यानंतर कांहीं तरी अचाट कल्पें करून पुनः संपत्तीला खेंचून आणावयाच्या प्रयत्नांत आणखीहि खोलखोल चिखलांत रुतत जावयाचें, असा ज्यांचा उलटा 'कार्यक्रम' असतो, अशा हरीच्या लालांपैकींच आमचे वसंतरावजीहि होते. वडिलांच्या अलोट संपत्तीचा खग्रास केल्यानंतर हे 'अचाट बुद्धि चालवावी आणि बळेंच लक्ष्मी मेळवावी,' या लोकवचनाच्या नादीं लागले. एकदम एक लाख रुपयांचें भांडवल कर्जाऊ काढून वसंतरावांनीं 'न भूतो न भविष्यति' अशी एक नाटकमंडळी काढली. गुजराती नाटक कंपन्या मोठमोठ्या भांडवलांवर उभारलेल्या असल्यामुळें त्या मुंबईंत कायमच्या राहून हजारों, लाखों रुपये मिळवीत असतात, तसेच आपल्या दक्षिणी कंपन्यांनां पैसे कां कमावतां येऊं नयेत, हा तर्कवाद वसंतरावांच्या या साहसमंदिराचा पाया. गुजराती, पार्शी कंपन्यांप्रमाणें त्यांनीं खूब भांडवल तर या धंद्यांत घातलें, (कसें, कोठून तें त्यांचें त्यांनां ठाऊक !) खूब भपक्याची सीनसीनरी तयार केली, स्त्रीपात्रांसाठीं एक दोन सुंदर गायिका विश्वयोषिताहि कंपनींत ठेवल्या, व धूमधडाक्यानें नाटकें सुरू केलीं. गुजराती कंपन्यांप्रमाणें ही सारी बाह्यरचना वसंतरावांनीं ठीक केली; परंतु त्या कंपन्यांप्रमाणें त्यांच्या कंपनीला पैसे मात्र मिळत ना ! पहिल्या वर्षं सहा महिन्यांच्या अवधींत त्यांनां थोडेबहुत पैसे मिळाले, परंतु पुढें जी त्यांनां बूड लागली ती विलक्षणच ! दर महिन्याला कंपनीला

आठआठ दहा-दहा हजारांची ठोकर बसूं लागली. वसंतराव आपल्या नाटककंपनीचें हें भडकलेलें तारूं आवरण्याची आपणाकडून शिकस्त करूं लागले. लांड्यालबाड्या करून किंवा सरळ रीतीनें जिकडून पैसे मिळतील तिकडून आणून या तारवामध्यें ते त्याची भरताड करूं लागले; परंतु कांहीं केल्या तारूं आवरेना! भोंकेंच तारवाला जबरदस्त पडलेलीं! त्यांतून भराभर पाणी आंत भरूं लागून, लवकरच एका मोठ्या खडकावर तारूं आपटलें, आणि त्यानें हांहां ह्मणतां जलसमाधि घेतली. अशा रीतीनें वसंतराव या कारभारांत आपल्या कांहीं भोळसट मित्रांसह सफै बुडाले, आणि लक्ष्मीदेवीनें त्यांच्या जुलूमजबरदस्तींतून आपली कायमची सुटका करून घेतली.

वसंतरावांची स्थिति आतां अर्थात्च पूर्वीपेक्षांहि वाईट झाली, आणि त्यांची जी कांहीं थोडीबहुत पत होती तीहि गेली. कोणताहि सावकार त्यांनां आतां दाराशीं उभा करीना! पांच दहा रुपयांनांहि ते आतां महाग झाले. वसंतराव एका रात्रीं नायकिणीच्या एका गाण्याच्या बैठकीला पांचपांचशें हजार हजार रुपये बिनदिक्कत खर्च करीत; परंतु आतां त्यांनां पांच पैशांनां कोणी विचारीना! पूर्वीच्या या साऱ्या चैनी वसंतरावजींनां आतां स्वप्नवत् वाटूं लागल्या. पैसेच जवळ नसल्यामुळें त्यांच्या साऱ्या चैनींनां अर्थात्च आळा पडला, आणि याच कारणामुळें,-पश्चात्ताप वगैरे होऊन नव्हे,-त्यांचीं बरींच दुर्व्यसनें सुटून ते आतां मोठे सभ्य आणि सच्चरित्र बनले होते. परंतु त्यांच्या मनाला मात्र शांति नव्हती. पैसा पैसा! हवा तेवढा पैसा थोडक्या श्रमांनीं आपणाला कसा मिळवितां येईल, या एकाच विवंचनेंत ते नेहमीं असत. संपत्तीच्या लालसेनें त्यांनां अगदीं वेड लागून राहिलें होतें. श्रीमंत व्हावयाचा अगदीं सोपा व छोटा असा मार्ग ते शोधीत होते, आणि तो त्यांनां कांहीं केल्या सांपडत नव्हता. त्यांचे सावकार तर त्यांनां पदोपदीं छळीत होते, आणि त्यांनां तोंड चुकवतां चुकवतां वसंतरावांनां अगदीं पुरे पुरे होऊन जात होतें. त्यांच्या कपड्याच्या वरच्या भपक्यानें त्यांच्या हृदयांत धडधडणाऱ्या चिंतावन्हीची कल्पना कोणाला येण्यासारखी नव्हती. अशा परिस्थितींत ते जीवंत तरी कसे राहिले होते, हें त्यांचें त्यांनां किंवा त्यांच्या एका निर्लज्ज हृदयाला माहीत!

शेवटीं कसेंहि करून एकादें बडें घबाड मारावयाचा वसंतरावांनीं निश्चय केला. गेल्या वर्षीं एक मोठें भयंकर कारस्थान करून आपल्या कांहीं गुजराती मित्रांच्या साहाय्यानें नॅशनल बँकेंतून दोन लाख रुपये गिळंकृत करण्याचा प्रयत्न त्यांनीं केला. तो बहुतेक साधत आला होता. परंतु बँकेचें नशीब शिकंदर, ह्मणून या भामट्यांच्या टोळीच्या भागीदारांत ऐनवेळीं भांडणें सुरू झालीं, आणि वसंतरावांचा डाव अगदीं हातातोंडाशीं येऊन फसला. सारी टोळीच्या टोळी बिनहरकत ऐनजिनसीं पकडली गेली, तींत आमचे वसंतरावजीहि सांपडले. पोलीस कोर्टांत जंगी खटला सुरू झाला, आणि टोळीविरुद्ध संगीन पुरावा मिळाल्यामुळें मॅजिस्ट्रेटसाहेबांनीं साऱ्या आरोपींनां सेशनकमिटहि केलें. सेशनांत बहुतेक सर्व आरोपींनां दोन, पांच, सात वर्षें, अशा शिक्षाहि झाल्या; परंतु वसंतरावांच्या वडिलांची पुण्याईच जबर; त्यांनीं केलेली दीनदुबळ्यांची धर्मसेवा त्यांच्या या कुलदीपक मुलाच्या उपयोगीं पडली, आणि कांहीं संशयाचा फायदा मिळून वसंतराव मोठ्या कष्टानें एकदांचे या लिगाडांतून सुटले. त्यांचा अगदीं पुनर्जन्मच झाला! परमेश्वरा! तुझ्या गूढ कलांचें रहस्य आह्मां पामर मानवांनां काय कळून येणार? परंतु थोर सच्चरित्र पित्यांच्या उदरीं बहुधा हलकट, दुष्ट आणि असच्चरित्र अशाच मुलांची योजना तूं कां करतोस? त्याप्रमाणेंच ज्याचें बहिरंग तूं इतकें सुन्दर आणि मनोहर निर्माण करतोस, त्याचेंच अंतरंग इतकें घाणेरडें, सडकें आणि किळसवाणें तयार करण्यांत तुझा हेतु तरी काय असतो?

फ्रेंच ब्रिजच्या सदर रस्त्यानें कांहीं वेळ चालल्यावर वसंतराव एका नाक्यावर उजव्या हाताला वळले, व पुनः कांहीं अंतरावर एका गल्लीच्या तोंडाशीं जाऊन उभे राहिले. वर तोंड करून त्यांनीं गल्लीच्या नांवाची पाटी वाचली, व ते आंत शिरले. त्यांनीं आपल्या खिशांतून एक कागद काढला, आणि तो वाचून ते इकडेतिकडे पाहूं लागले. नंतर कांहीं पावलें पुढें जाऊन, इकडेतिकडे वर खालीं नजर टाकीत, ते एका पिवळा रंग दिलेल्या दुमजली टुमदार बंगलीच्या समोर आले. नंतर क्षणभर उभें राहून खिशांतून मघांचा तो कागद बाहेर काढून तो वाचून त्यांनीं सभोंवार नजर टाकली, आणि संतोषानें किंचित् मान तुकवून त्यांनीं त्या बंगलीच्या दरवाज्यावर थाप दिली.

परंतु वसंतरावांच्या थापेला कांहीं उत्तर मिळालें नाहीं; तेव्हां आपणाशींच कांहीं पुटपुटून त्यांनीं पुनः दारावर दोनचार वेळ जोरानें आघात केला.

इतक्यांत आंतून कोणीं विचारलें "कोण आहे ?"

वसंतराव ह्मणाले " दरवाजा उघड ह्मणजे आपोआप दिसेल—"

" पण सांगा ना कोण तें ?"

" दरवाजा उघड अगोदर—"

क्षणार्धांत दरवाजा उघडला गेला, आणि एक काळी-सांवळी पण तरतरीत बाई दरवाज्याशीं येऊन उभी राहिली. तिच्या पोषाखाच्या एकंदर नोकझोंकावरून आणि चालण्याबोलण्याच्या ढबीवरून ही बाई कुलीन नसावी, असा कोणाचाहि सहज तर्क होण्याजोगा होता.

दरवाज्यांतून ती स्त्री वसंतरावांच्या चेहऱ्याकडे क्षणभर पहातच राहिली. खरोखरच त्यांचा चेहरा कोणालाहि मोह पाडणारा होता. तोंडांत करांगुलि घालून, किंचित् वक्र दृष्टीनें वसंतरावांकडे पहात क्षणभरानें तिनें विचारलें "कोण पाहिजे आपणाला ?"

" चंपाबाई इथें रहातात का ?"

थोडेंसें हंसून त्या स्त्रीनें विचारलें " कोण चंपाबाई ?"

कपाळाला आठ्या चढवून वसंतरावांनीं उत्तर दिलें " चंपाबाई म्हापसेकर—"

वसंतरावांच्या प्रश्नाचें कांहींच उत्तर न देतां त्या स्त्रीनें उलट प्रश्न केला " आपण कोण ? आपलं—"

वसंतराव किंचित् रागावून ह्मणाले "मी कोणी कां असेना ! पण चंपाबाई इथेंच रहातात का ?"

" हो—"

अधिक कांहीं न बोलतां वसंतराव चट्कन् घरांत शिरले, व समोरच दादर दिसत होता, तिकडे जाऊं लागले. त्यांचें हें 'असभ्य' वर्तन त्या 'सभ्य' स्त्रीला रुचलें नसावें असें दिसलें. ती जरा दरडावणीच्या स्वरानें ह्मणाली " हां–थांबा–जाऊं नका पुढं."

वसंतराव थबकून ह्मणाले " कां ? "

" आपण कोण, आपलं बाईशीं काय काम आहे, तें अगोदर सांगितल्याशिवाय आपणाला पुढं नाहीं जातां यायचं !"

" मी कोण, काय, कशासाठीं आलों, हें खुद्द मी तुझ्या मालकिणीपाशींच सांगेन." असें ह्मणून वसंतराव वर जाण्यासाठीं दोन पावलें पुढेंहि सरले.

परंतु त्वरेनें पुढें होऊन त्या स्त्रीनें त्यांनां अडवून धरलें, व ती ह्मणाली " हां हां–वर जायचं नाहीं अगोदर—"

" कां बुवा ?" त्रासिक स्वरानें वसंतराव ह्मणाले.

" मला बाईचा तसा हुकूम आहे. "

" मी नांव सांगत नाहीं—"

ती स्त्री वसंतरावांकडे पहातच राहिली. क्षणभरानें ती ह्मणाली "मग आपणाला वर कसं बरं जातां येईल ? पण दम धरा क्षणभर इथं. मी वर जाऊन त्यांनां खबर देऊन येतें–पण नांव काय सांगूं ? "

आपणाशींच कसलासा विचार करीत वसंतराव क्षणभर उभे राहिले; नंतर कपाळाला आंठ्या घालून ते ह्मणाले " नांव सांगितल्याशिवाय मला वर नाहींच जातां येणार ? "

" नाहीं—"

" अन् गेलों तर ?"

तीव्र स्वरानें ती स्त्री ह्मणाली " जाऊन पहा—"

वसंतराव हेटाळणीनें किंचित् हंसले, व ह्मणाले " वा ! तर मग तुझी धनीण अलीकडे मोठी मेम–साहेब किंवा संस्थानिकीणच बनली आहे ह्मणायची ! वर्दी दिल्याशिवाय कांहीं बाईसाहेबांनां कोणाला भेटायला जायची सोय नाहीं ह्मणतेस ?"

" नाहीं–नाहीं–नाहीं ! किती वेळ सांगूं ? नांव नसेलच सांगायचं तर पुढं जाण्यापेक्षां आपण मागंच कां वळत नाहीं ?"

" मागें जायचें असतें तर इतका पुढें मी आलोंच नसतों !" खिन्नतेनें हंसून वसंतराव पुटपुटले.

" मग नांव—"

" जा, आपल्या धनिणीला सांग–' सुवर्णमालिनी ' आले आहेत !"

वसंतरावांच्या तोंडचें हें अतिशय चमत्कारिक नांव ऐकून ती स्त्री पुढें जात होती ती जागच्याजागीं थबकली. पुरुषासारखा पुरुष तर दिसतो आहे हा, आणि याचें नांव काय, तर ह्मणे ' सुवर्णमालिनी ' ! पुरुषाचें स्त्रीवाचक नांव ! मोठाच चमत्कार !

वसंतरावांकडे पायांपासून मस्तकापर्यंत पाहून किंचित् हंसून ती स्त्री ह्मणाली "काय ह्मणालांत आपलं नांव ?"

" ' सुवर्णमालिनी '–जा, जाऊन झट्कन् वर्दी दे अगोदर बेगमसाहेबांनां तुझ्या—"

" सुवर्णमालिनी, हेंच नांव आपलं ? याच नांवानं वर्दी देऊं आपली बाईनां ?"

त्या स्त्रीची गोंधळलेली स्थिति पाहून वसंतराव किंचित् हंसले, व ह्मणाले " होय–हेंच माझें नांव. एकाकाळीं एका मंडळींत मी याच नांवानें प्रसिद्ध होतों. हेंच नांव माझें सांगितलेंस तर तुझी धनीण मला चट्कन् ओळखील. "

वरून सुस्वर हार्मोनियमच्या स्वरलहरी फांकून चहूंकडे रम्य, श्रुतिमनोहर वातावरण निर्माण करीत होत्या, त्यावरून बंगल्याची मालकीण मोठी रसिक व वादनकलाप्रवीण असावी, असें दिसत होतें. खालीं एक लहानसें वाटोळें मेज व त्या शेजारीं दोन खुर्च्या मांडलेल्या होत्या. त्यांपैकीं एक पुढें करून त्या स्त्रीनें वसंतरावांनां तेथें बसावयाला सांगितलें, व ती वर गेली. वसंतराव खुर्चीवर बसले नाहींत. वरून येणाऱ्या हार्मोनियमच्या स्वरलहरींशीं आपलाहि स्वर मिळवून ते आपल्याशींच गुणगुणत इकडेतिकडे फिरूं लागले. हार्मोनियमवर वाजविली जाणारी चीज सुप्रसिद्ध असल्यामुळें वसंतरावांनां ती परिचित होतीच, व ह्मणूनच ते ती या वेळीं आपणाशीं गुणगुणूं लागले.

परंतु कांहीं क्षणांनीं मुळीं वरचें हार्मोनियमवादनच बंद झालें. त्याबरोबर आमच्या 'सुवर्णमालिनी वसंता'चेंहि गायन थांबलें !

ती स्त्री खालीं येऊन वसंतरावांनां ह्मणाली " चला वर—"

वसंतरावांनीं किंचित् हंसून विचारलें " काय– मिळाली का बेगमसाहेबांची परवानगी ? पटली का ओळख ?"

" तें मला कसं कळणार बाई ? बाई ह्मणाल्या 'जा त्यांनां वर घेऊन ये'—"

त्या स्त्रीच्या मागोमाग वसंतराव वर गेले. वरचा दिवाणखाना लहानच, पण टुमदार होता. जिकडेतिकडे स्वच्छता दिसत होती. दिवाणखान्यांत सामानसुमान वगैरे थोडेंच होतें, पण तें अतिशय नीटनेटकें असून व्यवस्थेशीर मांडलेलें होतें. भिंतीवर टांगलेल्या तसबिरा सुंदर असून सुंदर अभिरुचीच्या दर्शक होत्या.

वसंतराव दिवाणखान्यांत आले, तोंच भिंतीजवळ ठेवलेल्या हार्मोनियमच्या समोर खुर्चीवर बसलेली एक स्त्री चट्कन् उठून उभी राहिली. तिनें नुकतेंच स्नान केल्याचें दिसत असून तिचे केश तिच्या पाठीवर लोळत होते. केशांच्या शेवटीं एक बारीकशी वेणी घालून ते एके ठिकाणीं अडकवून ठेवले होते. ती स्त्री तरुण असून अंगापिंडानें चांगली भरदार होती. रंगानें जरी ती किंचित् काळीसांवळीच होती, तरी तिची गणना सुंदर स्त्रियांत सहज होण्यासारखी होती. ती या वेळीं शुभ्र पांढरें तलम पातळ नेसली असून तिच्या अंगांत गुलाबी पोल्का होता. गळ्यांतल्या टपोऱ्या दाण्यांच्या माळेशिवाय तिच्या अंगावर या वेळीं कांहींदेखील अलंकार नव्हता. ती अलंकारहीनता व साधा पोषाक हीं तिच्या सहज सौंदर्याला खुलून दिसत होतीं. तिच्या पाणीदार डोळ्यांवरून आणि तरतरीत चेहऱ्यावरून ती स्त्री अतिशय हुषार दिसत होती.

वसंतराव दृष्टीला पडतांच ती एक पाऊलभर पुढें जाऊन व किंचित् वांकून अभिवादन केल्यासारखें करून हंसत हंसत ह्मणाली "यावं यावं ! आज आमचं भाग्यच ह्मणायचं मोठं, कीं, इतक्या दिवसांनीं साहेबांचं आह्मांला दर्शन झालं !"

" अन् बेगमसाहेबांचें आह्मालाहि ! " वसन्तराव हंसत हंसत ह्मणाले.

भृकुटि किंचित् वक्र करून, ओंठांशीं अंगुलि नेऊन चंपा ह्मणाली "बेगमसाहेब ! हें काय नवंच नांव दिलंत मला?"

" हो, बेगमसाहेबच नाहीं तर काय ? तुझं नुसतं दर्शन व्हायला जर हजार परवानग्या अन् रुखवानग्या लागायला लागल्या, तर तुला हें नांव आह्मीं कां देऊं नये ? भोपाळच्या बेगमेची भेट घ्यायला देखील इतके श्रम पडत नसतील कोणाला ! "

चंपा हंसून ह्मणाली "अंः ! आमची काशी आहे थोडी धांदरट ! कुणाशीं कसं वागावं हें तिला मुळींच कळत नाहीं. इतरांनां वर्दी दिल्यावांचून वर सोडूं नको ह्मणून मीं जरी तिला सांगितलं असलं, तरी तुह्माला देखील का तिनं खालीं अडकवून ठेवावं ?–अचरट मेली !"

" पण तिला तरी काय ठाऊक मी कोण तो—"

" हो, तेंहि खरंच आहे ह्मणा. पण उभे कां आपण ? बसा. गरिबांच्या घरीं बसलांत तरी चालेल. अगदीं उभ्या उभ्यांनींच कांहीं भेटून जायाला पाहिजे असं नाहीं."

एका तक्क्याशीं वसंतराव बसले, व त्यांच्यापासून कांहीं अंतरावर, जवळचा रुप्याचा पानसुपारीचा डबा अलीकडे ओढून चंपाहि बसली.

" कसं काय आहे ? खुशाल ?"

" हो खुशाल ! तुझें कसें काय चाललें आहे ? "

"खरं आहे तुमच्यासारख्यांच्या कृपेनं. पण वसंतराव, मुंबईत अलीकडे आमचा हा गाण्याचा धंदा एकंदरींत भारीच मंदावला आहे—"

वसंतरावांनीं खिशांतून एक मध्यमाकृति सिगारेट–केस काढली. केस रुप्याची असून तिच्यावर सोन्याचा मुलामा चढविलेला होता. तिच्यावर अतिशय सुंदर असें नकशीकामहि केलेलें होतें. केस उघडून वसंतरावांनीं एक सिगारेट काढली, व ती चंपेच्या पुढें केली. तिनें ती घेतल्यावर आपणहि एक काढून दांतांत धरली, आणि खिशांतून अंगारपेटी काढून तींतली एक काडी फरकन् ओढून तिनें प्रथम चंपेची व नंतर आपलीहि सिगारेट पेटविली.

सिगारेटचा धूर सोडीत सोडीत दोघेंहि मुंबईतील भयंकर उष्मा, रोगराई, म्युनिसिपालिटीची गैरव्यवस्था वगैरे सामान्य विषयांवर बोलूं लागलीं. कांहीं वेळानें वसन्तराव ह्मणाले "चंपे, तूं आतांशीं करतेस काय?"

"ह्मणजे ?" चंपेनें आश्चर्यानें विचारलें.

"ह्मणजे, तुझा गाण्याचा धंदा आहे, हें मलाहि माहीत आहे. पण तो कमला ग घेऊन बसली आहेस कां? मुंबईच्या या सोकाजींजवळ त्राण काय उरलें आहे, तर ते तुमचीं गाणीं करवतील ? मारवाड्यांनीं त्यांचीं मोठमोठीं घरें केव्हांच काबीज केलीं. अन् मारवाडी ते मारवाडीच ! खायच्या तांदुळांसाठीं पैसे गांठचे सोडायला त्यांची तयारी नसते, ते गाणींबिणीं कसलीं करवतात ?"

"मग ह्मणणें काय तुमचें ?"

"गाण्याबिण्यापासून विशेष फलप्राप्ति नाहीं—"

"हें मला ठाऊक आहे अन् त्या धंद्यावर मी फारशी विसंबूनहि नाहीं. तुमची कंपनी सुटल्यानंतर मी त्या खंडेरावाच्या नव्या कंपनींत राहिलें, हें तुह्मांला ठाऊक असेलच ?"

"हो आहे—"

"दोनतीन महिने झाले, ती कंपनीहि मीं सोडली."

"खरें कीं काय ? मग सध्यां—"

"बेकारच घरीं बसून आहें." चंपा हंसत हंसत ह्मणाली. "तेव्हांपासून सारं एक गाणं झालं माझं."

"तुला खरें सांगायचें ह्मणजे खंडेरावाची कंपनी तूं सोडलीस, हें मला त्या भास्कररावाकडून केव्हांच कळलें. पण काय ग ! खंडेरावापाशीं पैसे हवे तेवढे—तुलाहि रगड पगार मिळत होता. कंपनीला उत्पन्नाच्या नांवानें शंखध्वनिच असला, तरी तुझ्या महिन्याच्या छं–छंला तर कांहीं खंड नव्हता ना ? मग तूं कंपनी कां सोडलीस ती ?"

"खंडेरावाशींच खुद्द माझं भांडण झालं !"

"खंडेरावाशीं ? काय–झालें तरी काय ?"

"माती न् धोंडे ! ती एक मोठी मौजच आहे वसंतराव ! तुह्मी ऐकाल तर तुह्मीदिखील पोट धरधरून हंसाल !"

"असें ह्मणतेस ? काय झालें ग ?"

"झालं काय ? खंडेरावांनीं चढाओढ करून खूब पैसे देऊन शेवटीं प्रभाकरपंतांचं नवं नाटक मिळवलं–"

"कोणतें ?"

"देवयानी."

"कसें काय आहे ?"

"खरोखरच फार सुंदर आहे—"

"बरें मग ?—"

"लगेच आमच्या तालमीहि सुरू झाल्या. माझ्याकडे काम होतं देवयानीचं. शेवटीं देवयानी जेव्हां शर्मिष्ठेसंबंधानं आपल्या पतीवर–ययातीवर–खूब रागावली आहे, तेव्हां तो तिची समजूत करायची आपणाकडून शिकस्तीचा प्रयत्न करतो आहे, असा एक नाटकांत प्रवेश आहे. प्रवेश खरोखरच फार सुंदर आहे वसंतराव ! त्या प्रवेशांत ययाति देवयानीला ह्मणतो 'देवयानि, मजवर व्यर्थ राग करणें खरोखरच तुला उचित नाहीं. बिचारी शर्मिष्ठा ! तिच्याकडे लवभरहि दोष नाहीं. तुझ्या भीतीनें ती आपल्या 'देवमंदिर' राजवाड्यांत अहोरात्र कोंडून राहिल्याप्रमाणें असते. हा संगमरवरी सुंदर वाडा मीं कोणत्या आशेनें बांधला अन् झालें काय ! त्याच्याशीं अनेक शोकस्मृति संलग्न आहेत ! हा स्फटिकनिर्मित दीर्घ निःश्वास–'देवमंदिर' वाडा पहा–' वसंतराव, ययातीच्या या भाषणांत कवीनें त्या राजवाड्याचंच 'स्फटिकनिर्मित दीर्घ निःश्वास' या शब्दांनीं वर्णन केलं आहे कीं नाहीं ?"

वसंतराव मान डोलवून ह्मणाले "उघडच आहे. इंग्रजींत देखील 'ताजमहाला'चें 'संगमरवरी दगडांचें स्वप्न' असेंच एका कवीनें वर्णन केलें आहे."

"होय ना ? त्याच कल्पनेचं अनुकरण करून, हृदयभावनेला अधिक रंग चढावा ह्मणून प्रभाकरपंतांनीं ययातीच्या वाड्याला 'स्फटिकनिर्मित दीर्घ निःश्वास' असं म्हटलं–नाहीं का ? जणूं काय त्या वाड्याच्या रूपानं

शोकच मूर्तिमान् अवतरला आहे! फार सुंदर आहे नाहीं ही कल्पना? ”

“ फार गोड! फार सुंदर!” मान डोलवून वसंतराव म्हणाले.

“ पुढं झालं काय, आहे ठाऊक? नाटकाची कॉपी कांहीं प्रभाकरपंतांच्या हातची नव्हती. कंपनीच्याच कुणींतरी माणसानं ती उतरून घेतलेली होती. ती घेतांना त्यानं ‘ दीर्घ निःश्वास ’ या शब्दांच्या मागं अन् पुढं कंस दिले ठेवून, अन् त्यांनां केलं ‘ स्टेज–डायरेक्शन्! ’ ‘तरवार उपसून ’ किंवा ‘धांवत येऊन’ याप्रमाणं ते शब्द असावेत, अशी त्या अशिक्षित धवडाची कल्पना! तालमी घ्यायला प्रभाकरपंतांनां कांहीं वेळ नसल्यामुळं खुद्द मालकसाहेब–खंडेराक्च–त्या घेत होते. हा प्रसंग आला, तेव्हां ते ययातीला शिकवूं लागले, ‘ स्फटिकनिर्मित’ हा शब्द म्हटल्यानंतर खूब जोरानें ‘ हाशहुश ’ असा एक मोठा सुस्कारा टाकायचा, अन् नंतर मग ‘ देवमंदिर वाडा पहा ’ वगैरे भाषण सुरू करायचं! वसंतराव, महामूर्खपणा नाहीं का हा?”

“ उघडच आहे. प्रभाकरपंत असते, तर त्यांनीं या वेळीं मालकसाहेबांचें मुस्कटच रंगवलें असतें!”

“ माझा मोठा अपराध जो काय झाला वसंतराव, तो हा, कीं, मीं मालकसाहेबांची ही चूक काढली; माझ्या तोंडून हे शब्द बाहेर पडतात न पडतात, तों मालकसाहेब माझ्यावर रागानं लालबुंद झाले! ‘काय एवढं मोठं धारिष्ट दीडदमडीच्या ××च्या अंगीं? मला ‘मूर्ख’ म्हणतेस? ’ असं म्हणून माझ्यावर त्यांनीं शिव्यांची नुसती लाखोली वाहिली! वसंतराव, माझा स्वभाव कसा आहे तो तुम्हाला ठाऊकच आहे. मालक श्रीमंत, थोर, म्हणून त्यांची लाळ घोटीत ‘हांजी हांजी’ करणं माझ्याकडून कधीं झालं नाहीं न् पुढं कधीं व्हायचं नाहीं! मींहि त्या गाढवाची अशी कांहीं करून टाकिली आहे, कीं, सात जन्म तो माझी आठवण विसरायचा नाहीं मेला! तत्क्षणीं नोकरीवर लाथ मारून मीं कंपनी सोडली, अन् घरीं येऊन बसलें.”

“शाबास! तुझ्यासारख्या तेजस्वी बायका फार थोड्या! बरें, पुढें काय झालें?”

“ पुढं काय व्हायचं आहे? मालकसाहेबांचे डोळे लवकरच उघडले. नाटकावर इतका विलक्षण खर्च झालेला अन् माझ्यामुळं तें बंदच पडायची वेळ आली! मग माणसांवर माणसं माझ्याकडे पाठवायला लागले; शेवटीं खुद्द मालकसाहेबांची स्वारीहि मजकडे येऊन माझ्या पायां पडली. पगार वाढविण्याचं आमिष त्यांनीं मला खूब दाखविलं—”

“पण तूं कांहीं गेली नाहींस ना?”

“कसलाहि माझ्या मनावर परिणाम झाला नाहीं! हिमालयाप्रमाणं मी गंभीर, अचल अन् अढळ होऊन बसून राहिलें आहें! ‘महावात सूटला म्हणुनि कां कंप येत भूधरा?’ ”

असें म्हणून, त्या नाट्यकुशल नटीनें आपला चेहरा अत्यंत गंभीर केला, डोळे मिटून घेतले, आणि कांहीं क्षण ती भगवान् बुद्धाप्रमाणें शांत निश्चल भावानें बसून राहिली! नंतर हा क्षणिक अभिनय दाखवून ती ‘हो हो’ करून मोठमोठ्यानें हंसूं लागली.

वसंतरावांनांहि चंपेचें मोठें कौतुक वाटलें, आणि तेहि तिच्याबरोबर अंतःकरणपूर्वक हंसूं लागले.

हंशाचा ओघ थांबल्यावर चंपा म्हणाली “ बरं, ही झाली माझी हकीगत. आतां आपली, साहेब? ”

“ माझी काय असायची आहे निराळी, चंपाबाई?” असें म्हणून वसंतरावांनीं एक उसासा सोडला.

“ काय हेतु मनांत धरून इकडे आलांत? मला वाटतं, जवळ जवळ दोन वर्षांनीं आपली ही भेट होते आहे. ”

“ खरें आहे. मला मुळीं फावलेंच नाहीं, चंपे! ”

“ तर तर! कामंच भारी अन् महत्त्वाचीं! साऱ्या जगाची जबाबदारी मुळीं तुमच्यावरच येऊन पडली होती! नाहीं का? ”

“ जगाची नसली, तरी माझ्यावर एक अतिशय मोठी अन् महत्त्वाची जबाबदारी येऊन पडली आहे, हें कांहीं खोटें नव्हे. ”

“ तें असो मेलं! पण माझ्याकडे काम काय आहे तें सांगा अगोदर—”

“ कसलें काम! म्हटलें यावें भेटून तुला! ”

“नांवच सोडा, साहेब!” चंपा हंसत हंसत म्हणाली. “ तसं यायचं असतं, तर या दोन वर्षांत नसतां का आलां मला तुम्ही भेटायला? कांहीं तरी भानगड आहे, अन् तिच्यांत माझी तुम्हाला जरूर असल्यामुळं तुम्ही आज इकडे आलां आहां! असं नसलं, तर माझं ‘चंपा’ हें नांव बदलीन, साहेब! ”

वसंतराव हंसून ह्मणाले " त्याच हेतूनें मी आलों आहें, चंपे! तुझें नांवच बदलायचें आहे मला!"

"ह्मणजे? माझ्या नाहीं कांहीं लक्ष्यांत येत!" चंपा आश्चर्यचकित होऊन ह्मणाली.

"तुझ्यापाशीं खरोखरच माझें काम आहे. एका उत्कृष्ट ॲक्ट्रेसची मला गरज आहे."

उल्हसित वृत्तीनें चंपेनें विचारलें "काय ॲक्ट्रेस?"

"होय—"

"पुनः कंपनी काढणार वाटतं?"

वसंतराव खिन्नपणें हंसले, व ह्मणाले "पुनः मीं कंपनी काढली, तर तूं येशील का कंपनींत?"

उत्साहानें चंपा ह्मणाली "येईन–जरूर येईन! कां नाहीं येणार? आपण कंपनी काढलीत, तर पहिला अर्ज माझा, वसंतराव! आपल्या कंपनींत तर मीं या धंद्याचा श्रीगणेशा शिकलें. त्यावेळीं माझं नांव दिखील कुणाला ठाऊक नव्हतं. पुढं जें नांव अन् पैसा मीं कमावला त्याला कारण तुह्मी; हें जर मीं विसरलें, तर माझ्यासारखं कृतघ्न माणूस साऱ्या दुनियेंत नाहीं, असं वाटून माझंच मन मला खायला लागेल."

आपल्यासंबंधानें चांगलें मत असलेलें एक तरी माणूस जगांत आहे, हें कळून येतांच वसंतरावांच्या हृदयाला त्यांतल्या त्यांत अत्यंत समाधान वाटूं लागलें. कृतज्ञतेच्या दृष्टीनें ते चंपेकडे पाहूं लागले.

"मग काढतां आहां का खरंच कंपनी?"

किंचित् हंसून वसंतराव ह्मणाले "कंपनी तर काढायची–पण त्यांत अधिक ॲक्टर्स घ्यायचे नाहींत!"

"ह्मणजे?" चंपेनें आश्चर्यानें विचारलें.

"माझ्या नव्या कंपनींत ॲक्टर्स दोन. एक तूं अन् दुसरा मी!"

लज्जेमुळें चंपेच्या गालांवर किंचित् लाली चढली, व ती खालीं पाहूं लागली. वसंतरावांच्या मनांत आहे तरी काय, हें तिला समजेना. क्षणभरानें तिनें त्यांनां विचारलें "आतां हें उखाण्याचं बोलणं पुरे झालं, वसंतराव! स्पष्ट काय तें मला सांगा–"

"खरेंच मी तुला सांगतों, चंपा! एक कंपनीच मी काढणार आहें. पण नाटककंपनी मात्र नाहीं!"

"तर मग?"

"दुसरीच आहे कंपनी ती! पैसे खूब ह्मणजे खूबच मिळतील त्या धंद्यांत आपल्या कंपनीला!"

"मग ॲक्ट्रेस कशाला शोधतां आहां तुम्ही? नाटककाच्या धंद्याशिवाय दुसरीकडे कुठं ॲक्टर किंवा ॲक्ट्रेसची जरूरी लागत असेल, असं नाहीं बाई मला वाटत."

"अगदीं चुकते आहेस तूं, चंपा! असे पुष्कळ धंदे आहेत जगांत, कीं, त्यांत नटांची अन् नटींची अतिशय आवश्यकता लागते. किंबहुना जगांतील प्रत्येक धंदाच तसा आहे. मी ह्मणतों, जग हेंच मुळीं नाटक असून त्यांत नट अन् नटी यांशिवाय दुसरें कुणीच नाहीं!"

चंपा जरा तीव्र स्वरानें ह्मणाली "आजतर तुम्ही बऱ्या तत्त्वज्ञानांत अन् काव्यांत शिरलां आहां, वसंतराव! हे जगासंबंधाचे शिळे सिद्धान्त मला शिकवायलाच का तुम्ही आज इकडे आलां आहां? मग मला वाटतं, दोन वर्षं तुमची न् माझी भेट झाली नाहीं, तें एका अर्थीं फार बरं!"

वसंतराव गंभीरपणानें ह्मणाले "रागावूं नकोस, चंपा! सर्व हकीगत मीं तुला सांगितली, ह्मणजे मी ह्मणतों यांत एक अक्षरहि खोटें नाहीं, अशी तुझी खात्री होईल. मी जें कांहीं योजून आलों आहें, त्या कामांत तुझ्यासारख्या उत्कृष्ट नटीची खरोखर भारीच जरूर आहे."

"वसंतराव, उगीच लांबण लावूं नका. झटकन् काय तें सांगा."

"माझी ही लांबण, ह्मणजे माझ्या कामाच्या सिद्धीसाठीं शांतपणा, स्थिरता अन् चिकाटी हे जे गुण अत्यंत आवश्यक आहेत, ते तुझ्या ठिकाणीं किती उत्कटतेनें वास करीत आहेत, त्याची एक परीक्षाच आहे ह्मणेनास!" वसंतराव खोखो हंसून ह्मणाले.

चंपा कांहींच बोलली नाहीं, कपाळाला आंठ्या चढवून ती खालीं पहात स्तब्धपणें बसून राहिली.

"कां–बोलत कां नाहींस?"

"आपल्या परीक्षेला उतरतें आहें!"

किंचित् हंसून वसंतराव ह्मणाले "छान टोला हाणलास, चंपे! परंतु माझें ह्मणणें तुला एकदां समजलें–"

चंपा मध्येंच ह्मणाली "पण या जन्मांत तें समजेल, अशी मला तर कांहीं आशा नाहीं–"

वसंतराव शांतपणें ह्मणाले "मी एक काम योजून तुझ्याकडे आलों आहें. मला साहाय्य करशील?"

"हें काय विचारतां, वसंतराव? साहाय्य करणं मला शक्य असलं, तर अवश्य करीन."

"तूं बेकार घरीं बसून आहेस, असें मीं भास्कररावाकडून ऐकलें, ह्मणून तुलाहि झाली तर मदत करावी, हाहि इथें येण्यांत माझा हेतु आहेच!"

"मग तुमचा खरा हेतु कोणता? आपणाला मजकडून साहाय्य करून घ्यावं हा, का मला आपण मदत करावी, हा?"

"दोन्ही! आपण दोघेंहि परस्परांच्या उपयोगीं पडून दोघांचेंहि परस्परांच्या मदतीनें हित व्हावें, अशीच माझी योजना आहे. माझें हें काम बरेच दिवस चालणार आहे. जोंपर्यंत तूं माझ्या या कामावर असशील, तोंपर्यंत दरमहाच्या दरमहा अमूक एक रक्कम तुला द्यावी, असा माझा विचार आहे. बोल, तू काय पगार घेणार?"

"वसंतराव, तुह्मी खरोखर अगदीं अव्यावहारिक माणूस आहां, अन् ह्मणूनच मला वाटतं, तुमची इतक्या चांगल्या रीतीनं चाललेली नाटक कंपनी डुबली! कसे भलभलते प्रश्न तुह्मी मला विचारतां हे?"

"काय बुवा भलते प्रश्न विचारले मीं तुला?"

"तुमच्या कामाचं स्वरूप मला ठाऊक नाहीं, त्यांत माझा तुह्माला काय उपयोग होणार आहे, मजकडून तुमचं काम होणं शक्य आहे कीं नाहीं, याची मला कल्पना नाहीं. अन् तुह्मी मला विचारतां, कीं, तूं काय पगार घेणार ह्मणून?"

"तुला या साऱ्या गोष्टींची कल्पना नाहीं; परंतु चंपा, मला ती सारी कल्पना पूर्ण आहे, अन् ह्मणूनच तर दुसरीकडे कुठेंहि न जातां मी तुझ्याकडे पहिल्यानें आलों. मीच तुला सांगतों, जोंपर्यंत तूं माझ्या नोकरींत असशील, तोंपर्यंत मी तुला दरमहा दीडशें रुपये देत जाईन."

दरमहा 'दीडशें रुपये' हा आंकडा ऐकून चंपाला आंतून गुदगुल्या झाल्यावांचून राहिल्या नाहींत. तिला नाटक कंपन्यांत पाऊणशें शंभरापेक्षां कांहीं आजवर अधिक पगार मिळाला नव्हता. तिला मनांतून खूब आनंद झाला; परंतु तो वसंतरावांनां दिसूं दिला, तर सारेंच गाडें उलटेल, अशी भीति तिला वाटत असल्यामुळें, तिनें आनंदाचें चिन्ह चेहऱ्यावर बिलकूल दिसूं दिलें नाहीं. ती कुतूहलाच्या मुद्रेनें वसंतरावांकडे नुसती पहात राहिली.

वसंतराव ह्मणाले "चंपा, दीडशें रुपये दरमहा ह्मणजे कांहीं कमी रक्कम नाहीं. तुला नाटक कंपन्या काय देतात, तें मला माहित आहे. तुला तिथें मिळणाऱ्या पगाराच्या दीडपट दुप्पट तरी ही रक्कम आहे; परंतु माझ्या कामांत तुझा तसाच उपयोग होणार असल्यामुळें मीं खुषीनें आपण होऊन तुला हा एवढा मोठा दरमहा प्रथमच कबूल केला. शिवाय दुसराहि तुला एक मोठा फायदा माझ्याकडून होणार आहे–"

प्रश्नसूचक दृष्टीनें चंपेनें वसंतरावांकडे पाहिलें.

"चंपा, दुसरेंहि तुला मी एक वचन देतों. माझें काम जर तूं यशस्वी करून दिलेंस–अन् तूं देशील ही माझी पक्की खात्री आहे–तर तुला कल्पना नाहीं असें जंगी बक्षीस मी तुला मोठ्या आनंदानें देईन."

चंपेचें आश्चर्य दुणावलें. दरमहा दीडशें रुपये पगार आणि कार्यसिद्धि झाली तर वर आणखी मोठें बक्षीस, हा खरोखरच मोठा 'लग्गा' आहे, असें वाटून तिच्या तोंडाला अधिकच पाणी सुटलें. आपण आणखी थोडावेळ गप्प बसलों तर वसंतरावांच्या या देणग्यांची संख्या अजूनहि वाढेल असें तिला वाटलें, आणि ती गप्प बसली.

वसंतराव ह्मणाले "काय, मग बोल चंपा? पटतो का तुला आमचा हा सौदा?"

"तुमचा सगळा कारभार मुळीं एका बाजूकडचा होतो आहे, तेव्हां मला त्याबद्दल असं नाहीं तसं कांहींच बोलतां येत नाहीं."

"काय ह्मणतेस तूं?"

"तुम्हीं हा आमिषांचा वर्षाव माझ्यावर चालविला आहेत खरा, परंतु यांत तुमची बाजू तेवढी स्पष्टपणं तुम्हीं मांडलीत. पण माझं कसं काय?"

"तुझेंच तर मीं सांगितलें–"

"मला काय करायला हवं? काम कोणत्या प्रकारचं आहे?"

"काम अगदीं सोपें! कांहीं करायला नको सवरायला नको; नुसते चैनींत दिवस घालवायचे!" असें ह्मणून वसंतराव किंचित् हंसले.

वसंतराव आपली थट्टा करीत आहेत, असें चंपाला वाटलें. दीडशें रुपये दरमहा आणि वर मोठें थोरलें बक्षीस हें सारें मृगजलच होय, अशी तिची कल्पना होऊन, त्याचा लाभ आपणाला होणें आतां शक्य नाहीं, असें तिला वाटलें, आणि तिची तीव्र निराशा झाली.

ती तीव्र स्वरानें ह्मणाली " वसंतराव, तुमच्यावर माझा इतका विश्वास अन् तुम्हीं मला असं फसवावं ?"

" काय फसवलें बुवा मीं तुला ?"

" हा दरमहा न् बक्षिसी यांची आशा मला कां दाखवलीत ? मोठमोठ्या आशा दाखवून शेवटीं असं मला तोंडघशीं कां पाडलंत ?"

" अग पण वेडे, असें मीं केलें तरी काय ?"

" भलतीन् सलती थट्टा केलीत ! तुमच्याकडून तरी असं वर्तन होईल, अशी माझी कल्पना नव्हती, वसंतराव ! "

चंपा असें कां ह्मणते आहे, हें वसंतरावांच्या आतां लक्ष्यांत आलें. ते मोठ्यानें हंसून ह्मणाले "समजलों आतां तूं असें कां ह्मणते आहेस तें ! पण तुझी समजूत खरोखरच अगदीं चुकीची आहे. मीं तुझी थट्टा केली नाहीं. मीं आतांपर्यंत तुला सांगितलें त्यांतलें अक्षर न् अक्षर अगदीं सत्य आहे. "

"हो, सत्य आहे ! मी कांहीं अगदीं बोळ्यानं दूध पिणारं कुकुलं बाळ आहें, असं का वाटतं तुह्माला ? दरमहा दीडशें रुपये पगार, वर थोरली बक्षिसी अन् काम काय, तर ह्मणे नुसतं चैनींत पडून रहायचं. उपजल्या पोराला तरी हें खरं वाटेल ?"

"उपजल्या पोराला खरें वाटलें नाहीं, तरी तें खरें आहे. माझ्यावर तुझा विश्वास नाहीं का, चंपा ?"

"अजूनपर्यंत होता—पण खरं सांगायचं तर आतां तो डळमळूं लागला आहे. "

"चंपा, उगीच भलत्या न् सलत्या कांहीं कल्पना करीत बसूं नकोस. तुझ्या कामाची मी तुला कल्पना आणून देतों. मुंबई सोडून तुला बाहेर दूर खेडेगांवीं जाऊन रहावें लागेल—"

"मुंबई सोडायची ? किती दिवस ?"

"कांहीं महिने. मुंबई सोडायचें तुझ्या जिवावर येईल, हें मला ठाऊक आहे, अन् ह्मणूनच एवढें थोरलें आमिष मीं तुझ्यापुढें धरलें आहे."

जरा विचार करून चंपा ह्मणाली "ठीक आहे. मुंबई सोडून कांहीं महिने बाहेरगांवीं रहायला मी तयार आहें. पण माझं काम काय ?"

"एका श्रीमंत इनामदार घराण्यांतल्या एका बाईची सहचरी होऊन रहायचें."

"सहचरी ? सहचरी तें काय बाई ?"

"सहचरी ह्मणजे बरोबरीची मैत्रीण. इंग्रजींत तिला 'कंपॅनियन्' ह्मणतात."

"मैत्रीण व्हायचं ! अजब नोकरी आहे बाई ही ! कुणाची मैत्रीण व्हायचं ? आहे तरी काय प्रकरण हें, वसंतराव ?"

चंपा अत्यंत आश्चर्यव्याकुल झाली होती, आणि तो विकार तिच्या चेहऱ्यावर आतां स्पष्टपणें दिसूं लागला होता.

" चंपाताई, घाबरूं नका. मी तुह्माला बिलकूल फसवीत नाहीं. मी ह्मणतों त्याला हा पहा प्रत्यक्ष पुरावा." असें ह्मणून वसंतरावांनीं आपल्या कोटाच्या खिशांतून एक वर्तमानपत्राचा अंक बाहेर काढला.

प्रकरण दुसरें.

सहचरी.

आश्चर्यचकित मुद्रेनें चंपा वसंतरावांकडे पहात होती. वसंतराव कांहीं आपणाला फसवीत नाहींत, अशी हळुहळू तिची खात्री होऊं लागली.

वसंतरावांनीं वर्तमानपत्राचा तो अंक उलगडला आणि त्याच्या जाहिरातीच्या पहिल्याच पृष्ठावरील एक जाहिरात चंपेला दाखवून त्यांनीं ती तिला वाचावयाला सांगितलें.

जाहिरात अशी होतीः—

पाहिजे.

दक्षिण महाराष्ट्रांतील बाणथडी गांवच्या इनामदार घराण्यांतील मुख्य यजमानिणीसाठीं एक सहचरी (कंपॅनियन्) पाहिजे आहे. तिच्यासंबंधानें मुख्य अट ही आहे, कीं

ती सत्कुळांतीच असली पाहिजे. तिला मराठी भाषेचें उत्कृष्ट ज्ञान असून उत्तम रीतीनें लिहितां वाचतां येणें अवश्य आहे. बाईसाहेबांच्या मनोरंजनार्थ तिला गायनवादनाचें ज्ञान असणेंहि जरूर आहे. हे गुण अंगीं असलेल्या, जुन्या चालीच्या तरुण ब्राह्मण स्त्रीला (अपत्य नसलेली विधवा असल्यास अधिक चांगलें.) जरूर पसंत केलें जाईल. तिच्या खाण्यापिण्याची व रहाण्याची सोय येथेंच होईल. तिच्या दानधर्मादिकांचीहि व्यवस्था चांगली केली जाईल. याशिवाय, वरच्या खर्चासाठीं ह्मणून तिला दरमहा पंचवीस रुपये मिळतील. इच्छा असणाऱ्या तरुण कुलीन स्त्रियांनीं दोन सभ्य गृहस्थांच्या दाखल्यासह लवकर अर्ज करावे.

गुंडो नारायण पटवर्धन,
कारभारी, इनामदार—बाणथडी,
(दक्षिण महाराष्ट्र.)

चंपेनें ही जाहिरात अगदीं लक्ष्यपूर्वक वाचली. वाचीत असतां तिच्या मुखावर आश्चर्य, कुतूहल वगैरे विकार दृग्गोचर होत होते. शेवटीं ती म्हणाली " वः! मोठी नामी जाहिरात आहे बाई!"

वसंतराव ह्मणाले " आतां तरी तुझी खात्री झाली ना, कीं, मी थट्टा करीत नाहीं ह्मणून?"

" हो, मी काय करूं, सांगा—"

" तूं या जागेसाठीं अर्ज करावास, अशी माझी इच्छा आहे. अन् तुझा अर्ज मंजूर झाल्यावर बाणथडीला जाऊन तेथल्या यजमानणीची सहचरी होऊन कांहीं महिने तूं तेथें रहा. "

भृकुटी वक्र करून चंपा ह्मणाली " वसंतराव, तुह्मी हें काय ह्मणतां आहां? मी या जागेसाठीं अर्ज करूं? याचा अर्थ तरी काय?"

वसंतराव हंसून ह्मणाले, " तूं आपली मुकाट्यानें मी सांगतों तसें कर. "

" पण वसंतराव, माझ्या अर्जाचा उपयोग काय होणार? मला ही जागा मिळेल, असं तुह्माला वाटतं का?"

" वाटतें— नाहीं तर मी तुझ्याकडे कशाला आलों असतों? "

" तुमचा यांत उद्देश तरी काय आहे? बाणथडीची ही इनामदारीण तुमची कुणी होते काय? "

वसंतराव हंसून ह्मणाले " ती माझी कुणी होत नाहीं; पण व्हावी अशी माझी इच्छा आहे अन् ह्मणूनच तर माझी इतकी खटपट चालली आहे. ती माझी झाली, तर माझ्या जन्माचीच सारी ददात मिटणार आहे! "

" मी काय करूं? "

वसंतराव फिरून हंसून ह्मणाले " ही इनामदारीण माझी बायको होईल, असें कर. ही बाई विधवा आहे. तिच्याशीं माझें लग्न—पुनर्विवाह होईल, असें केलेंस तर तुला अशी 'मध्यस्थी' मिळेल, कीं, तुझीहि जन्माचीच ददात मिटेल, चंपाताई! "

गालाशीं बोट नेऊन किंचित् हंसून चंपा ह्मणाली " काय? तुह्मी पुनर्विवाह करणार, वसन्तराव? इतके दिवस अविवाहित राहून शेवटीं असा पाट लावून बाटणार? जातीबाहेर जाणार? वसंतराव, हे भिकेचे डोहाळे तुह्माला कधींपासून सुचूं लागले?"

"चंपा, इनामदारीण बायको मिळविणें हे भिकेचे डोहाळे वाटतें? मग श्रीमंतीचें बाळंतपण कोणतें तें तरी सांग." असें ह्मणून वसंतराव मोठमोठ्यानें हंसूं लागले.

"ही बाई दिसण्यांत अतिशय सुंदर आहे वाटतं?"

"कुणाला ठाऊक! मीं तर तिला साऱ्या जन्मांत बघितली नाहीं."

"ह्मणजे? याचा अर्थ तरी काय बाई?"

"अर्थ, हाच त्याचा अर्थ! मीं तिला खरोखरच कधीं पाहिली नाहीं!"

"अन् ती काळी कुळकुळीत जगदंबा असली तर?"

"असली तर त्यांत काय मोठेंसें बिघडलें? काळ्या कुरूप मुलींचीं लग्नें जगांत कुठें होतच नाहींत वाटतें?"

ओंठांशीं करांगळी नेऊन चंपा खालीं पहात कांहीं वेळ स्तब्ध बसली होती. नंतर वर पाहून हंसतहंसत तिनें विचारलें "खूब पैसे आहेत वाटतं तिच्याजवळ? आलं सारं आतां ध्यानांत! बडं घबाड मारायचा विचार दिसतो आहे आपला, साहेब!"

वसंतराव हंसून ह्मणाले " वेडी कुठली! अग मी का त्या तऱ्हेचा माणूस आहे, चंपा? पुनर्विवाह लावून

महाराष्ट्राला सुधारणेचा चांगला धडा घालून द्यावा, सुधारणेच्या कार्याला तोंडानें नव्हे, कृतीनें चांगली मदत करावी, एवढ्याच पवित्र हेतूनें मीं या कामाला प्रवृत्त झालों आहें. अन् ह्मणे घबाड मारतों आहें !"

"तर तर तर !" मान मुरकून खो खो हंसत चंपा ह्मणाली. "महाराष्ट्राची, सुधारकांची न् सुधारणेची केवढी तरी काळजी आपणाला बाई ! तिच्यामुळं रात्रीच्या-रात्री आपल्या डोळ्याला डोळा ह्मणून कसा तो लागत नाहीं ! बरं आतां खरं सांगा, ही बाई का बाणथडीच्या इनामदारीची मालकीण ?"

" अगदीं पुरी-सोळा आण्यांची ! तिच्या सासऱ्यानें ही इनामत विकत घेतली, अन् मृत्युपत्र करून आपली सारी स्वसंपादित मिळकत आपल्या या सुनेला दिली. त्यामुळें ही बाईच पूर्ण मालक झाली आहे त्या इनामतीला. "

" उत्पन्न किती आहे ? "

" अगदीं थोडें ! वर्षाला लाख एक रुपये ! "

विजयी मुद्रेनें वसंतरावांकडे पाहून चंपा हंसत हंसत ह्मणाली " तरीच एवढा तुमचा सारा खटाटोप ! आतां आली बरं ध्यानांत माझ्या तुमची सारी कारवाई ! पण वसंतराव ! या साऱ्या प्रकरणांत अडचणी इतक्या आहेत, कीं, त्या साऱ्या दूर करतां करतां तुमच्या अगदीं नाकीं नव येतील !"

" कोणत्या त्या ? ऐकूं दे तरी–"

" ब्राह्मण कुळांतली–त्यांतून श्रीमंत कुटुंबांतली विधवा ती ! अशी चुटकीसरशीं पाट लावायला ती तयार होईल का ?"

" चुटकीसरशीं पुनर्विवाह करायला जर ती तयार होती, तर मी तुझ्या दारांत आलों असतों कशाला ? मीं माझा सारा व्यूह तुला आतां सांगतों. या जाहिरातीप्रमाणें अर्ज करून तूं ही 'सहचरी'ची जागा मिळवायची. नंतर बाणथडीला जाऊन, या बाईची मैत्रीण होऊन, हलुहलू तिची मर्जी सुप्रसन्न करून घेऊन तूं तिच्या मनावर अधिकार मिळवायचा. चंपा, हें काम सोपें नाहीं बरें–अतिशय कठीण आहे. मोठ्या सावधपणानें हलुहलू तुला या कामांत एकएक पाऊल टाकलें पाहिजे. तिच्या मनाच्या दोऱ्या हलुहलू एकएक हातीं आल्यानंतर हळूच पुनर्विवाहाच्या इष्टतेच्या, धर्मसंमतीच्या अन् त्यानें होणाऱ्या देशाच्या अन् समाजाच्या सुधारणेच्या प्रगतींच्या एकएक गोष्टी तुला तिच्या मनावर युक्तियुक्तीनें ठसवायला हव्यात. पुनर्विवाहाची इष्टता प्रतिपादन करणाऱ्या कादंबऱ्या अन् नाटकें–उदाहरणार्थ सुप्रसिद्ध 'गणपतराव' ही कादंबरी अन् 'सौभाग्यरमा' वगैरे नाटकें हीं पुनः-पुनः तूं तिच्याकडून वाचून घेतलीं पाहिजेत. वेळ: प्रसंग पाहून, तिची वृत्ति प्रसन्न असतां, पुनर्विवाह हा विषय अत्यंत उठावदार रंगांत तिच्यापुढें रंगवून तूं मांडीत जा. तिच्या मनावर या विषयाचीं उदात्त, सुंदर, रमणीय चित्रें जेणेंकरून अधिकाधिक चित्रित होतील, अन् कायम रहातील असेंच तूं कर. विष्णुशास्त्री पंडित, ईश्वरचंद्र विद्यासागर, रावबहादुर महादेव गोविंद रानडे, डॉक्टर भांडारकर, आगरकर इत्यादि थोर थोर अन् खरी देशहितेच्छु अन् समाजहितेच्छु मंडळी पुनर्विवाहाच्या इष्टतेचें समर्थन करून त्याचा प्रचार देशांत अधिकाधिक व्हावा ह्मणून कशी खटपट करीत आले, न् अजूनहि करीत आहेत, तें निरनिराळ्या युक्तींच्या गोष्टी सांगून तूं तिच्या मनावर ठसव. अशा तऱ्हेच्या अनेक कौशल्याच्या युक्त्या लढवून, हलुहलू अगदीं तिळतिळ तिळतिळ तिच्या प्रतिकूल मनाला पुनर्विवाहाला अनुकूल करून घेणें हें तुझें मुख्य काम, समजलीस चंपा ? हें काम अतिशय महत्त्वाचें असल्यामुळें तें सांगायाला मीं इतका वेळ घेतला. हें काम अतिशय कठीण आहे, यांत यश मिळणें भारी दुरापास्त आहे, अन् असलें काम पहिल्या दर्ज्याच्या 'आर्टिस्ट' माणसाशिवाय दुसऱ्या कुणाकडून साध्य होणें केवळ अशक्य आहे, अशी माझी खात्री असल्यामुळेंच, चंपा, मी आज तुझ्याकडे आलों आहें. मला तारणार किंवा मारणार आतां तूंच आहेस, चंपा !"

वसंतरावांच्या तोंडचे हे शब्द ऐकून आपल्या कर्तृत्वाविषयीं आणि उच्च कलाकुशलतेविषयीं चंपेला अतिशय अभिमान वाटूं लागला. स्तुतीनें कोण भुलत नाहीं ? कोणाला आत्मगौरव वाटत नाहीं ?

कांहीं क्षण विचारांत घालवून ती 'कलावती' ह्मणाली "ठीक आहे. मी तुमच्या ह्मणण्याप्रमाणं प्रयत्न करून पहातें. पण या कामामुळं माझ्यावर एकादं कज्याल यायचा तर संभव नाहीं ना, वसंतराव ?"

" कसलें कज्याल अन् कसलें किचाट ! तुला कांहीं कुणाचा खून करावा लागणार नाहीं, किंवा चोरीहि करावी लागणार नाहीं. खोटे दस्तैवजहि तुला करायला

मी सांगत नाहीं. मग तुझ्यावर संकट तरी कसलें येणार ? 'गोष्टी सांगेन युक्तीच्या चार' याच्यापलीकडे कांहीं तुला करावें लागणार नाहीं. त्या बाईचें मन प्रथम पुनर्विवाहाला अनुकूल करून घेऊन, नंतर तें माझ्यावरच बसेल असें करणें, एवढेंच तुझें ध्येय ! माझ्या दुर्दैवानें हें काम फसलेंच, तुला यश नाहींच आलें,तरी तुझें वाईट वाईट तें काय होणार आहे ? फार फार तर तुझ्यावर असंतुष्ट होऊन तुला आपल्या घरांतून ती घालवून लावील ! याच्यापलीकडे तुझें अनिष्ट काय होणार आहे ? यश आलेंच, तर दरमहाच्या दरमहा एवढा थोरला पगार मिळून वर जंगी बक्षीस मिळेल अन् नाहींच आलें, तर केल्या सेवेचा मेहनताना पदरांत पडून, घरीं परत यावें लागेल. एवढेंच ना कायतें ?"

चंपा विचार करीत स्तब्ध बसली. सिगारेट-केस बाहेर काढून त्यांतली एक सिगारेट वसंतरावांनीं चंपेला दिली, व आपणहि एक घेतली. नंतर त्या दोन्ही शिलगावून ते लीलेनें धुराकडे पहात बसले.

सुमारें तीनचार मिनिटें अशा स्थितींत गेलीं. नंतर चंपेनें विचारलें "तिचें वय काय आहे, वसंतराव ?"

"तेवीस-चोवीस. मीं तो सारा शोध केला आहे."

"विधवा होऊन किती दिवस झाले तिला ?"

"खरें बोलायचें तर ती जन्म-विधवा आहे, असेंच म्हटलें पाहिजे. ती आठ वर्षांची असतां तिचें लग्न झालें. लग्नानंतर फक्त दोनच महिन्यांनीं तिचा छोटा नवरा घरांतून पळून जाऊन परागंदा झाला. यानंतर चौदा वर्षें कुंकू वगैरे लावून सवाष्णीच्या वेषानेंच तिनें काढलीं. दोन वर्षें झालीं, तिचा सासरा-म्हणजे ज्यानें बाणथडी गांव विकत घेतला तो-वारला. त्याच्या उत्तरक्रियेसाठीं मोठमोठे शास्त्रिपंडित गांवोगावांहून आले होते. त्यांनीं एकमतानें निकाल दिला म्हणे, कीं, ज्या व्यक्तीचा चौदा वर्षें बिलकूल ठावठिकाणा नाहीं, ती मृत झाली, असेंच धरलें पाहिजे, असा शास्त्रार्थ आहे. दर्भांचा पुतळा करून, त्याची सारी अंत्येष्टिक्रिया केली पाहिजे, असें त्यांचें म्हणणें पडलें, अन् त्याप्रमाणें सारें झालेंहि. त्या दिवसापासून, म्हणजे आज दोन वर्षें, तिच्या कपाळीं कुंकू नाहीं."

"मस्तकावरून पोलादी फणी फिरली आहे का ?"

"नाहीं. भाग्यानें तेवढें अद्याप झालें नाहीं. तिचा सासरा या गोष्टीच्या भारी विरुद्ध होता म्हणे. त्यामुळेंच एवढा हा सोहाळा तिचा व्हायचा राहिला. नाहीं तर आमच्या भटांनीं—"

"बरें कुटुंबांत आणखी कोण कोण मंडळी आहेत?"

"कुटुंबांत एका म्हातान्या सासूशिवाय दुसरें कुणीहि नाहीं. एक धाकटा दीर होता, तोहि लग्न न होतां मरण पावला. घरांत दुसरें कुणी नाहीं, एकटीनेंच सान्या घरांत रहाणें तिला कष्टमय झालें आहे, म्हणूनच तर तिच्यासाठीं मैत्रिणीची दिवाणजींनीं ही जाहिरात दिली आहे. तिच्या सोबतींत तरी आपलें कष्टमय जिणें कसेंबसें कंठतां येईल, असें तिला वाटत असावें."

जवळ पडलेला वर्तमानपत्राचा तो अंक घेऊन चंपेनें त्यांतील ती जाहिरात पुनः एकदां वाचली. नंतर ती हंसून म्हणाली "वसंतराव, या जाहिरातींत ज्या प्रकारची बाई पाहिजे आहे असं म्हटलं आहे, त्याच्या अगदीं थेट उलट अशी मी आहें."

"तें कसें ?"

"सहचरी सत्कुळची पाहिजे, ही त्यांची मुख्य अट आहे. जुन्या चालीची ब्राह्मण विधवा पाहिजे आहे यांनां—"

"या भलत्याच शंका आतां तूं काढीत बसूं नको. उत्कृष्ट नाट्यकलापटु नटीची मला जरूर आहे ती कां मग ? अन् मी तुझ्याकडेच कां आलों नेमका ?"

"बरं समजा, सत्कुळच्या अन् जुन्या चालीच्या ब्राह्मण विधवेचा पार्ट मला चांगला वठवतां आला- तशी विधवा बनून मीं या गुंडोकडे अर्ज केला, तर मलाच नेमकी ती जागा मिळेल, याची काय खात्री ?"

"खात्री अर्थातच नाहीं ! परंतु तुलाच ती जागा मिळेल, असा संभव मात्र खूब आहे. जर त्यांनां नव्या चालीची, सुधारक कुटुंबांतली, किंवा दुसन्या कोणत्याहि जातींतील तरुण स्त्री पाहिजे असती, तर चांगलें लिहितां वाचतां येणारी, गाण्याबजावण्याची माहिती असणारी अन् गरीब कुटुंबांतली चांगली बाई मिळणें विशेष कठीण गेलें नसतें; परंतु जुन्या चालीची अन् ब्राह्मण जातीची तरुण विधवा तर पाहिजे, अन् तिच्या अंगीं लिहिणेंवाचणें अन् गाणेंबजावणें या गुणांची तर अपेक्षा करायची ! अशी अल्पमोली, बहुगुणी, आंखुडशिंगी गाई सांपडणें अगदीं अशक्य आहे. म्हणून म्हणतों, चंपा, तूं जर या जागेसाठीं अर्ज केलास, तर तुलाच ती मिळेल, अशी माझी पूर्ण खात्री आहे."

" बरं, पंचवीस रुपये वरखर्चाला मिळतील, असं या जाहिरातींत झटलं आहे, तें कां ?"

" 'पगार' झटलें तर तें या बाबतींत वाईट अन् किंचित् असभ्यहि दिसेल झणून. सत्कुळची जुन्या चालीची ब्राह्मण विधवा ' पगार ' कशी घेईल ?"

"दोन सभ्य गृहस्थांचा दाखला पाहिजे, असंहि यांत झटलं आहे; तो दाखला कसा मिळणार मला ? सभ्य गृहस्थ तर आजवर कुणी माझ्या दाराशीं आलाच नाहीं!" असें झणून चंपा वसंतरावांकडे पाहून मोठमोठ्यानें हंसूं लागली.

" मी त्याची सर्व व्यवस्था करीन. त्याच्यासाठीं काळजी करण्याचें तुला कांहीं कारण नाहीं. "

" बरं, अर्ज कधीं करायला हवा ?"

" शक्य तितक्या लवकर. नाहीं तर सारेंच ओम्फस व्हायचें ! मीं अर्जाचा एक मसुदासुद्धां तयार करून आणला आहे. तुझी सारी काळजी मला आहे. अग, मी तुझा भाऊ ना आतां?" असें झणून हंसत हंसत वसंतरावांनीं एक मोठा थोरला फुलिस्कॅप कागद खिशाबाहेर काढला. त्याच्या चारहि बाजू मजकुरानें भरलेल्या होत्या.

तो कागद हातीं घेऊन चंपा वाचूं लागली. वाचतां वाचतां मधुनमधून ती खूब हंसत होती. मध्येंच एकदोनदां ती हंसतहंसत झणाली "अरे बापरे, वसंतराव ! तुझी तर बडे कादंबरीकार आहांत. केवढाल्या खोट्या गोष्टी लिहिल्या आहेत तुझीं यांत ? साऱ्या थापा निव्वळ ! "

चंपेनें चारही बाजू वाचल्यानंतर वसंतरावांनीं विचारलें " बोल, तूं तयार आहेस माझ्या झणण्याप्रमाणें करायला ? "

चंपा गंभीर स्वरानें झणाली " आजचा दिवस मला मुदत द्या. साऱ्या गोष्टींचा साधकबाधक रीतीनें मी आज विचार करतें, अन् संध्याकाळीं कळवतें तुझाला माझा काय निश्चय झाला तो. "

वसंतरावांनीं आपलें डावें मनगट किंचित् कोटाच्या बाहीच्या बाहेर काढून पाहिलें—त्यावरच्या सोन्याच्या सुंदर चिमुकल्या 'रिस्टवॉच 'मध्यें जवळ जवळ साडेअकरा झाले होते. चट्कन् उठून उभे राहून ते झणाले " ठीक आहे. हा मसुदा तूं आपणापाशीं ठेवून दे. नीट विचार करून पहा. जर अर्ज करावा असा तुझा निश्चय झाला, तर आपल्या हातानें याची एक चांगली नक्कल करून ठेव. संध्याकाळीं येऊन मी तुला भेटेन—"

चंपाहि उठून उभी राहिली. नंतर हंसतहंसत ती झणाली " ठीक आहे मी विचार करतें. पण हो बाई ! वसंतराव, चहा घेतल्याशिवायच निघालांत तुझी ? मी बरी तशी तुम्हाला जाऊं देईन ? बसा बसा—"

" या अशा उन्हाळ्यांत या वेळीं चहा ? "

चंपा हंसून झणाली, " तुझां चहाखोरांना कसला उन्हाळा अन् वेळ ? बरं चहा नको असला, तर कोल्ड-ड्रिंकचा एक ग्लास आणवतें थंडगार छान ! काशी—अग काशी ! एक कोल्डड्रिंक घेऊन ये बरं लवकर. बरं वसंतराव, हें काम हातीं घेऊन जर मीं तुझाला त्यांत यशहि मिळवून दिलं,तर तुमच्या या लग्नाची 'मध्यस्थी' तुझी मला काय देणार ? "

" तूंच सांग—"

अधर दांतांनीं किंचित् दाबून चंपा हंसून झणाली " वीस हजार एकरकमी रोख, अन् मुंबईंत एक चांगलंसं घर. "

" कबूल ! मग तर झालें ? "

कांहीं क्षण दोघेंहि स्तब्ध होतीं. इतक्यांत काशी कोल्डड्रिंकचा ग्लास घेऊन आली. तो घेऊन वसंतरावांनीं तें हळुहळू पिऊन टाकलें.

चंपा झणाली " माझं डोकं अगदीं गरम होऊन गेलं आहे. एक सिगारेट तर द्या, वसंतराव ! "

केस काढून वसंतरावांनीं एक सिगारेट तिला दिली, व आपणहि एक पेटवली. क्षणभरानें तिचा निरोप घेऊन ते निघून गेले.

दुपारीं एक दोन ठिकाणीं जाऊन वसंतरावांनीं जरूर असलेले दाखले मिळवून आणले, व संध्याकाळीं सात एक वाजतां ते पुनः चंपेकडे आले.

चंपेनें अर्जाची सुंदर नक्कल करून ठेविली होती, ती तिनें त्यांनां दिली. वसंतराव झणाले "बरें, आमचा अस्सल कागद ?"

चंपा हंसून झणाली "तो राहीना माझ्याजवळ ?"

"तूं ठेवून काय करणार आहेस तो ?"

"मी ठेवीन तो नीट जपून."

वसंतराव किंचित् हंसले, व झणाले "समजलों, चंपा ! जर बेमान होऊन तुझी 'मध्यस्थी' मी वशांत टाकली, तर माझ्या हातचा लेख माझ्याविरुद्ध पुरावा

असावा, ह्मणून तूं ठेवून देते आहेस तो आपणाजवळ, हो ना ? उगीच नको आतां—”

चंपा मध्येंच हंसतहंसत ह्मणाली “छे छे, वसंतराव, तसा कांहीं माझा हेतु नाहीं हो ! तुमच्या हातचं कांहीं तरी स्मरण–चिन्ह मजपाशीं असावं, ह्मणून ठेवतें आहें मी तो.”

“ठेव ठेव ! चंपा, तूं अगदीं मुळींसुद्धां भिऊं नकोस. तुला मी तिळभर देखील फसवायचा नाहीं,समजलीस? चोरा–चोरांमध्यें देखील ‘विश्वास’नांवाचा कांहीं जिन्नस असतोच ! नाहीं तर त्यांचा तरी धंदा चालेल कसा, चंपा ?”

असें ह्मणून वसन्तराव हंसतहंसत तेथून निघून गेले.

प्रकरण तिसरें.

ही कोण ?

प्रिय वाचक, आपणाला आतां मुंबई सोडून एकदम दूर–बाणथडीला गेलें पाहिजे. चला तर आमच्या बरोबर.

बाणथडी हा गांव चांगला मोठा व सुंदर होता. तो व त्याच्या भोंवतालचे कांहीं गांव विकत घेतल्यानंतर भाऊसाहेबांनीं गांवामध्यें एका बाजूला नदीच्या कांठीं आपल्यासाठीं एक सुंदर,टुमदार व भव्य वाडा बांधविला होता. वाड्याच्या मागें व पुढें दोन मोठमोठे सुंदर बगीचे होते; त्यांतल्या त्यांत मागचा बगीचा बराच मोठा व अधिक सुंदर होता. त्यांत अनेक तऱ्हेचीं लहानमोठीं सुंदर फळझाडें व फुलझाडें होतीं. बहुतेक सारीं झाडें देशीच होतीं; पण बरींच नवीन व ‘विलायती’हि होतीं. ठिकठिकाणीं झाडांवरून निरनिराळ्या जातींच्या लताहि सोडण्यांत आल्या असून मधुनमधून सुंदरसुंदर निरनिराळ्या आकारांचे लतामंडपहि तयार करण्यांत आले होते. मागच्या बागेचा विस्तार तर थेट अगदीं नदीच्या कांठापर्यंत पसरला होता. फळझाडें व फुलझाडें यांशिवाय दुसरींहि अनेक तऱ्हेचीं झाडें या बगीच्यांत असून नदीच्या जवळ तर असल्या झाडांची विशेष गर्दी होती. बागेंत मधुनमधून वृक्षांखालीं व उघड्यावरहि संगमरवरी व इतर दगडांचीं बांकें व सुखासनें ठेवलीं होतीं.

पहांट उलटून झुंजुंमुंजूं दिसूं लागलें होतें. अशा वेळीं वाड्याच्या मागील भागाचा मोठा दरवाजा उघडला जाऊन त्यांतून एक तरुणी बागेंत आली.

ती एक पांढरें शुभ्रवस्त्र नेसली होती. तिच्या मस्तकावर केशकलाप होता; परंतु त्याची विशेष निगा राखण्यांत येत नसावी, असें स्पष्ट दिसत होतें. तिचा तो भव्य भालप्रदेश अगदीं पांढरा फटफटीत असून त्यावर स्त्रियांनां मंगलनिधान, त्यांचें शुभसारसर्वस्व असा कुंकुमतिलक नव्हता ! ती करुणरसाची मूर्तिमती देवीच दिसत होती.

तरुणीच्या मुखमंडलावर प्रभातकालचा आरक्त प्रकाश पडून तिची कमनीय मूर्ति अधिकच कमनीय दिसूं लागली. तिच्या उजव्या हातांत फुलांची परडी असून डावा हात रिकामाच होता.तिच्या अंगावर,हातांतील दोन दोन सोन्याच्या बांगड्या व कानांतील पाणीदार हिऱ्यांचीं कुडीं, गळ्यांतली एक टपोऱ्या मोत्यांची मोहनमाळ, यांशिवाय एकहि अलंकार नव्हता. ही तरुणी दुसरी कोणी नसून, बाणथडीच्या इनामतीचे मालक भाऊसाहेब पटवर्धन यांची सून अन्नपूर्णा.सर्वजण हिला ‘वहिनीसाहेब’ ह्मणत असत. भाऊसाहेबांच्या मागें या वहिनीसाहेबांकडेच त्यांच्या विशाल संपत्तीचा सारा वारसा व अधिकार आला होता.

वहिनीसाहेबांच्या मागोमाग त्यांची प्रौढ वयाची दासी बायजाहि बाहेर पडली. तिच्या हातांत वहिनीसाहेबांचें पातळ, अंगपुसणें वगैरे वस्त्रें होतीं.

वहिनीसाहेब हळुहळू बागेंतून बाहेर पडून नदीच्या घाटाकडे येऊं लागल्या. बायजाहि त्यांच्या मागोमाग येत होती. वहिनीसाहेब गंभीर गतीनें चालत असून त्या आपल्या दासीशीं चकार शब्दहि बोलत नव्हत्या. बायजाहि मुकाट्यानेंच चालली होती. बागेंतील शेंकडों वृक्षांवर हजारों पक्षी उल्लसित वृत्तीनें, मधुर कंठानें आपल्या ‘भुपाळ्या’ ह्मणंत परमेश्वराला आळवीत होते. फुलांचा सुवास घेऊन वायूच्या मृदुमंद लहरी चहूंकडे हळुहळू भ्रमण करीत होत्या.

बागेच्या शेवटीं, अर्थात् नदीला लागून, एकमेकांनां जोडलेले असे दोन सुन्दर घांट भाऊसाहेबांनीं घरच्या

मंडळीसाठीं मुद्दाम बांधविले होते. एक घाट घरच्या पुरुषांसाठीं असून दुसरा फक्त बायकांकरितां होता. दोन्ही घाट संगमरवरी दगडांनीं बांधले असून त्यांच्या पायऱ्या अगदीं नदीच्या प्रवाहाच्या आंतपर्यंत गेलेल्या होत्या. दोन्ही घांटांच्या मधोमध संगमरवरी दगडांचीच एक साधारण उंच अशी भिंत होती.

वहिनीसाहेब घांटाशीं येऊन पोहोंचल्या, त्या वेळीं प्रकाश अगदीं अस्पष्ट होता. भोंवतालचे पदार्थ अजून कांहीं चांगलेसे दिसूं लागले नव्हते. वहिनीसाहेब घांटावर उभ्या राहून पाहूं लागल्या, तों पाण्यापासून दुसऱ्या तिसऱ्या पायरीवर कांहींएक पदार्थ पडला आहे, असें त्यांनां आढळून आलें. तें माणूस आहे, का दुसरा कांहीं प्राणी आहे, का लांकूड आहे, हें चांगलेंसें दिसेना. तें पाहून वहिनीसाहेब थोड्या भ्याल्याहि. जागच्याजागीं उभ्या राहून, तोंड फिरवून त्या हांक मारूं लागल्या "बायजा, बायजा, लवकर ये—"

बायजा त्यांच्यापासून आठ दहा हात अंतरावर होती. ती त्यांच्या हांकेसरशी धांवतच त्यांच्याजवळ येऊन घाबऱ्याघाबऱ्या ह्मणाली "कां ? काय झालं वहिनीसाहेब ?"

त्या पदार्थाकडे बोट दाखवून वहिनीसाहेब ह्मणाल्या "तें पाहिलंस, बायजा ? काय पडलं आहे बरं तें ?"

बायजेच्या वयाला पन्नाशी पार उलटून गली होती. तरुण वहिनीसाहेबांनां जें स्पष्टपणें दिसत नव्हतें, तें बायजाला काय दिसणार ? कांहीं तरी काळें आणि लांबलचक असें घांटावर पडलें असावें, असा तिला भास झाला.

ती ह्मणाली "खरंच हो बाई, खरंच ! काय बरं असावं तें, वहिनीसाहेब ?"

"वा: ! तूंच का उलट मला विचारते आहेस, बायजा ? जा बरं, जवळ जाऊन पहा काय पडलं आहे तिथं तें !"

भयानें डोळे फाडून बायजा ह्मणाली "नाहीं वहिनीसाहेब, मी नाहीं बाई जायची ! चावलंबिवलं तर काइकन् ?"

वहिनीसाहेबांनां बायजेचें हें वर्तन आवडलें नाहीं. कपाळाला आंठ्या घालून किंचित् खिन्न स्वरानें त्या ह्मणाल्या "तुझं आपलं कांहींच्या बाहींच, बायजा ! ह्मणे चावलं तर ! चावेल कशाला ! चावायला तें वाघ आहे का अस्वल आहे का, साप आहे ?"

"तर मग तें आहे तरी काय ?"

"तूं उगीच नसत्या चौकशी करूं नकोस, बायजा ! तुला जायचं नसलं तर मीच जातें कशी !" असें ह्मणून वहिनीसाहेब घांटाच्या पायऱ्या उतरावयाला लागल्या.

बायजेनें जाऊन झट्कन् वहिनीसाहेबांचा पदर धरला, व केविलवाण्या स्वरानें ती त्यांनां ह्मणाली "जाऊं नका वहिनीसाहेब, जाऊं नका !"

"कां ग ? तें कांहीं चावायचं नाहीं मला."

"चावेल वहिनीसाहेब ! तें कांहीं तरी जनावर नदीच्या पाण्यांतून वहातवहात आलं आहे. कदाचित् एखादी सुसरबिसर आली असेल लांबून अन् आपली पाठ सुकवायला येऊन निजली असेल तिथं. वहिनीसाहेब, सुसर चावलीबिवली तर मांणसाचा प्राण जातो बरं !"

वहिनीसाहेबांनीं तिच्या मूर्खपणाकडे लक्ष्य न देतां आपला पदर झट्कन् तिच्या हातून सोडवून घेतला, आणि त्या सावधपणानें घांटाच्या पायऱ्या हळूहळू उतरूं लागल्या. बायजाहि त्यांच्या मागोमाग तीनचार हातांच्या अंतरावरून पायऱ्या उतरूं लागली.

वहिनीसाहेब जसजशा एकएक पायरी उतरूं लागल्या, तसतसा तो पदार्थ त्यांनां स्पष्ट स्पष्ट दिसूं लागून, शेवटीं, तें माणूसच आहे, असें त्यांनां आढळून आलें. त्या त्याच्या अगदीं जवळ जाऊन पहातात, तों ती एक स्त्री. तिचे केंस मोकळे सुटले असून ते तिच्या तोंडावर व छातीवर विखुरले होते.

वहिनीसाहेबांनीं प्रेमळ मृदु स्वरांत हांक मारून ह्मटलें "कोण ? कोण आहेस तूं ?"

परंतु त्यांनां कांहींच उत्तर मिळालें नाहीं.

इतक्यांत बायजाहि तेथपर्यंत येऊन पोहोंचली होती. कंपित स्वरानें ती ह्मणाली "अगबाई ! माझ्या मनांत आलं होतं तेंच अगदीं !"

वहिनीसाहेब तिच्याकडे पाहूं लागल्या, तों ती ह्मणाली "वहिनीसाहेब ! शिवूं नका तिला ! मढं आहे तें—पाण्यांतून वहात वहात आलं आहे. हाडकपाळी चांडाळणी ! नदींतून जमिनीवर येऊन लागायला तुला दुसरी जागाच का नाहीं सांपडली ? शेवटीं आमच्याच घांटावर लागायला तुझं आह्मीं कांहीं कर्ज का घेतलं होतं ?"

वहिनीसाहेब त्या स्त्रीच्याजवळ जाऊन, तिच्याकडे वांकून पाहून ह्मणाल्या "बायजा, अजून ही जिवंत

आहेसं मला वाटतं. हें पाहिलंस का, हिच्या छातीवर पडलेले केंस थोडथोडे वर होताहेत खालीं- जाताहेत. छातींत अजून थोडी धुगधुगी खास आहे हिच्या !"

बायजाची दृष्टि कोठें इतकी तीक्ष्ण होती, तर तिला तें सूक्ष्म स्पंदन दिसेल ? नाक उडवून ती ह्मणाली "वहिनीसाहेबांचं आपलं कांहीं तरी ! जिवंत असते आहे मेली !"

वहिनीसाहेब त्या स्त्रीच्या अगदीं जवळ जाऊन बसल्या, आणि तिच्या कपाळावरचे व छातीवरचे केंस दूर करून हातानें त्या तिची प्राण–परीक्षा करूं लागल्या. तिच्या शरीरांत थोडी उष्णता अजूनहि आहे, असा त्यांनां भास झाला. तिच्या छातींत अजूनहि धडधड होत होतें.

त्या ह्मणाल्या "बायजा, अजून ही जिवंत आहे. जा, वटवट केल्यावांचून अश्शी अगदीं धांवतच वाड्यांत जा, अन् हिला घेऊन जाण्याकरतां दोघेचौघे नोकर बोलावून घेऊन ये चट्कन्. अन् दुसऱ्या कुणाला तरी ताबडतोब वैद्यबुवांनां बोलावून आणायला धाड. धांवतच जा ह्मणावं त्याला. जा–पळ, जा–जितकं धांववेल तितकी धांव."

बायजा तोंडानें "काय ग बाई एकएक अरिष्ट तरी !" असें पुटपुटत पायऱ्या चढून वर आली, आणि शक्य तितक्या त्वरेनें बागेंतून वाड्याकडे पळतच निघाली.

बायजेनें बरोबर आणलेलीं वस्त्रें घांटावरच ठेविलीं होतीं. वहिनीसाहेबांनीं वर येऊन तीं घेऊन त्या पुनः खालीं आल्या, व मोठ्या कष्टांनीं त्या स्त्रीचें नेसतें भिजलेलें वस्त्र त्यांनीं हळूच सोडवून काढून घेतलें. नंतर आपल्या अंग पुसण्याच्या वस्त्रानें त्यांनीं तिचें सर्वांग पुसून शक्य तितकें कोरडें केलें, व आपलें पातळ त्यांनीं तिला नेसविलें. नंतर आपल्या वस्त्राच्या पदरानें वहिनीसाहेब तिचें शरीर घांसूं लागल्या.

इतक्या अवधींत चांगलें दिसूं लागलें होतें. वहिनीसाहेब करुणेनें प्रेरित होऊन त्या स्त्रीचें सर्वांग नीट बारकाईनें पाहूं लागल्या. तों तिच्या मानेच्या पाठीमागें माळेच्या आकाराचा एक लालभडक मोठा थोरला डाग पडला आहे, असें त्यांनां आढळून आलें. तेथें कातडीवर ठिकठिकाणीं बारीक बारीक क्षतें पडून त्यांतून रक्तस्राव होत होता. वहिनीसाहेबांनीं वस्त्र ओलें करून हळुहळू तें रक्त पुसून काढलें, व त्याचीच एक धांदोटी टरकावून ती पाण्यांत भिजवून तिच्या गळ्याभोंवतीं बांधली. त्या वारंवार तिच्या नाकाशीं व छातीशीं कान नेऊन पहात होत्या.

इतक्यांत वाड्यांतून चौघे नोकर मेणा घेऊन धांवत धांवतच तेथें येऊन पोहोंचले. त्यांपैकीं एकाला वहिनीसाहेबांनीं विचारलें "वैद्यबुवांकडे कोण गेला? ".

"सखाराम."

नंतर वहिनीसाहेबांच्या आज्ञेनें, त्या मृतप्राय स्त्रीला मेण्यांत हळूच उचलून ठेवून तो घेऊन ते नोकर वाड्याकडे निघाले. वहिनीसाहेबहि त्यांच्या मागोमाग त्वरेनें तिकडे गेल्या.

प्रकरण चवथें.

हतभागिनी.

मागील प्रकरणांत सांगितलेली गोष्ट घडून आल्याला एक आठवडा लोटला आहे.

संध्याकाळ–पांच एक वाजण्याचा सुमार. वाड्याच्या मागील बाजूच्या बागेमध्यें एका बकुळीच्या झाडाच्या खालीं, संगमरवरी दगडाच्या सुखासनावर, मागील प्रकरणांत निर्दिष्ट केलेली स्त्री बसली होती. वहिनीसाहेबांना ती घांटावर सांपडल्यापासून पांचसहा दिवस ती तापानें खूब आजारी होती; परंतु कालपासून तिचा ताप अजीबात ओसरून तिला बरेंच बरें वाटूं लागलें होतें. आज तर तिला खूब हुषारी वाटूं लागली होती; ह्मणून वहिनीसाहेबांनीं तिला या वेळीं मोकळ्या हवेवर बागेंत पाठवून दिलें होतें. मोकळ्या हवेनें तिला चांगली हुषारी वाटूं लागेल, व त्यामुळें तिचें दुःखी, कोंडलेलें मनहि प्रसन्न व मोकळें होईल, असा वहिनीसाहेबांचा अंदाज होता.

त्या स्त्रीचें वय सुमारें वीसएक वर्षांचें असावें. नुकत्याच भोगलेल्या दुखण्यामुळें असो, किंवा दुसऱ्या कांहीं कारणामुळें असो, तिचा चेहरा अगदीं पांढराफिकट दिसत असून त्यावर विषादाची घन छाया पसरली होती. तिचे डोळे एकसारखे जमिनीकडे लाग-

ठेले असून ते पाण्यानें डबडबलेले होते. तिच्या चेहऱ्याकडे पहातांच, ती स्त्री अत्यंत दुःखी असून अगदीं उतू येणारें रडें मोठ्या कष्टांनीं कसें तरी आवरून धरण्याचा ती प्रयत्न करीत आहे, असें कोणालाहि सहज कळून येण्यासारखें होतें. ती एक अगदीं साधें असें पांढरें पातळ नेसली असून तिच्या अंगांत पिवळसर रंगाची चोळी होती. हातांत दोन दोन सोन्याच्या साध्या बांगड्या असून कांचेच्याहि दोन दोन राजवर्खी बांगड्या होत्या. कपाळावर सौभाग्याचें ठळठळीत चिन्ह विराजमान होतें, त्यावरून वैधव्य हें तिच्या दुःखाचें कारण नसावें, असें स्पष्ट दिसत होतें.

त्या वेळीं मंदमंद वायूच्या लहरी सुटल्या होत्या. त्यांनीं वरच्या वकुळीचीं दोनदोन चारचार फुलें त्या तरुणीच्या कधीं आसपास, कधीं अंगावर पडून तिचें आसन ह्मणजे एक सुंदर पुष्पशय्या बनलें होतें! अंगावर पडलेलें एखादें फूल ती मधुनमधून हातीं घेई, व तसेंच तें हातीं धरून आपल्याच विचारांत निमग्न होऊन राही. नंतर कांहीं क्षणांनीं त्याचा हळूच वास घेई, व विमनस्कपणें तें जमिनीवर सोडून देई. याप्रमाणें स्वतःला नकळतच तिची 'पुष्प-क्रीडा' चालली होती!

बसूनबसून ती तरुणी कंटाळली. कांहीं वेळानें, त्या थंडगार दगडी आसनावर ती लवंडली; परंतु त्या स्थितींत तिच्यानें फार वेळ रहावलें नाहीं, असें दिसलें. कांहीं वेळानें ती उठून बसली, व तळहातावर गाल ठेवून ती फिरून आपल्या विचारांत निमग्न होऊन गेली. ती कोणत्या दुःखद विचारांत इतकी गढून गेली होती कोणाला ठाऊक! पण ते अतिशय दुःखद असावे, असें तिच्या चेहऱ्यावरून दिसत होतें. मधुनमधून ती एकदम अंग थरारल्याप्रमाणें करी; वक्षःस्थल कांपवून मधुनमधून लांबलचक उसासे सोडी. खरोखरीच ती अत्यंत हतभागिनी असावी, यांत शंका नाहीं!

आणखी थोडा वेळ गेला. कांहीं वेळानें वाड्याच्या मागील भागांतून एक दासी तिच्याजवळ येऊन ठेपली. तिच्या डाव्या काखोटीला एक गालिच्याची वळकटी आणि एक सुंदर, मऊ उशी असून उजव्या हातांत गरम दुधानें भरलेलें एक रुप्याचें फुलपात्र होतें.

जवळ येऊन, गालिचा व उशी आसनावर ठेवून दासी ह्मणाली "घ्या बरं एवढं हें दूध-"

तिच्याकडे पाहून तरुणी ह्मणाली "दूध? आतां कशाळाबरं दूध, साळू?"

"वहिनीसाहेबांनीं मुद्दाम हें पाठवून दिलं आहे तुमच्याकरतां. त्या ह्मणाल्या 'बाईंनां बरंच कोयनेल घ्यावं लागलं आहे, तेव्हां दुधाचा खूब मारा व्हायला हवा. नाहीं तर पित्त भडकेल, अन् माथं फिरूं लागेल सारखं-' तुह्माला हें दूध घ्यायलाच हवं बरं का-नाहीं तर वहिनीसाहेब रागावतील मला! तुह्मी दूध पितां आहां, तोंवर तुह्माला हा गालिचा पसरून देतें मी."

साळूच्या हातांतून दुधाचें फुलपात्र घेऊन तरुणी ह्मणाली "साळू, कशाला बरं मुद्दाम हें अंथरुण आणायला गेलीस? मी कांहीं मोठी तालेवार नाहीं बरं लागून गेलें. या दगडांवरच निजलें असतें झालं! छान थंडगार लागतं चांगलं!"

"वहिनीसाहेब मला ह्मणाल्या 'बसूनबसून बाईंनां भारीच त्रास होत असेल. तूं जा गालिचा न् उशी घेऊन अन् त्या सांगतील तिथं त्यांना तो पसरून देऊन ये नीट. थोड्या वेळांत मीहि तिकडे येतेंच."

साळूनें आणलेल्या दुधाचे घोट घेतघेत ती तरुणी ह्मणाली "तुमच्या वहिनीसाहेब कांहीं माणूस नाहींत बरं, साळू! त्या प्रत्यक्ष स्वर्गांतल्या देवी आहेत!"

साळूनें यावर कांहींच उत्तर दिलें नाहीं; परंतु सावधपणानें एक दोन वेळ इकडेतिकडे पाहून तिनें हळूच विचारलें "काय हो बाई, विचारलं ह्मणून राग येऊं देऊं नका हो-पण तुमचं घर कुठं?"

हा प्रश्न विचारतांना साळूनें सावधपणानें इकडेतिकडे पाहिलें, याचें तसेंच कारण होतें. हा प्रश्न त्या तरुणीला विचारून तिनें वहिनीसाहेबांच्या एका आज्ञेचें उल्लंघन केलें होतें. त्या दिवशीं नदीच्या तीरावरील घाटावरून या तरुणीला वहिनीसाहेबांनीं वाड्यांत नेवविल्यावर घाईघाईनें वैद्य आणविण्यांत आला, हें वाचकांनां ठाऊकच आहे. मोठ्या कष्टांनीं, खूब खटपट करून वैद्यबुवांनीं तिला कांहीं वेळानें शुद्धीवर तर आणलें. परंतु थोड्याच वेळानें तिच्या अंगांत जो ताप भरला तो कांहीं विलक्षणच! वहिनीसाहेबांच्याच देखरेखीखालीं औषधोपचार व शुश्रूषा हीं होत असल्यामुळें तापाचें प्रकरण अगदीं निकरावर गेलें नाहीं, इतकेंच; परंतु तापानें त्या बिचारीला खूब जेरीला आणलें, यांत संशय नाहीं. दुसऱ्या दिवशीं ताप थोडासा काढून तिला किंचित् बरें वाटूं लागतांच, वहिनीसाहेबांनीं साहजिकपणें तिला

तिचें नांव विचारलें. परंतु पहिल्या सपाट्याला तिनें त्यांनां कांहींच उत्तर दिलें नाहीं. राहूनराहून वहिनी-साहेबांनीं तोच तोच प्रश्न दोनतीनदां विचारल्यानंतर, मोठ्या सावधगिरीनें नीट विचार केल्यासारखें करून त्या तरुणीनें त्यांनां उत्तर दिलें 'माझं नांव यमुना.' 'तुमची जात कोण ?' असा वहिनीसाहेबांनीं तिला प्रश्न करतांच पुनः कांहीं क्षण विचारांत पडल्यासारखें करून तिनें मोठ्या सावधपणानें उत्तर दिलें 'माझी जात ब्राह्मण.' हीं प्रश्नोत्तरें झाल्यावर वहिनीसाहेबांनीं अर्थात्च 'तुमचं माहेर कुठं ?' 'सासर कुठं ?' 'माहेरचं आडनांव काय?' 'सासऱ्याचं नांव काय?' इत्यादि प्रश्न सहजच तिला विचारले. या प्रश्नांचीं तिनें कांहीं उत्तरें तर त्यांनां दिलीं नाहींतच, परंतु खालीं मान घालून ती एकसारखी रडूं लागली. हा चमत्कार पाहून, वहिनीसाहेब अगदीं गोंधळूनच गेल्या. या बाईला कोठून आपण हे प्रश्न विचारण्याच्या भानगडींत पडलों, असें बिचाऱ्या वहिनीसाहेबांनां होऊन गेलें, व थोडक्या वेळानें, कांहीं तरी निमित्तानें त्या तेथून निघून गेल्या. दुसऱ्या दिवशीं, वहिनीसाहेब जवळ नसतां, त्यांच्या सासूबाईंनीं—आईसाहेबांनींहि त्या तरुणीला हेच प्रश्न साहजिकपणें विचारले, व त्या वेळींहि आदल्या दिवसाप्रमाणेंच तिची एकंदर स्थिति झाली. आईसाहेबांच्या प्रश्नांचीं कांहीं उत्तरें न देतां ती मुकाट्यानें अश्रुविसर्जन करूं लागली, व हिला हे प्रश्न विचारण्याच्या भानगडींत आपण उगीच पडलों, असें आईसाहेबांनांहि होऊन त्याहि तेथून निघून गेल्या. आईसाहेबांसमोर घडलेली ही हकीगत थोड्याच अवकाशांत वहिनीसाहेबांच्या कानांवर गेली. त्यावरून त्यांची खात्री झाली, कीं, या तरुण स्त्रीच्या माहेरच्या किंवा सासरच्या कोणत्या ना कोणत्या तरी गोष्टींत अतिशय दुःखाचा भाग आहे, व त्याच्या नुसत्या आठवणीनेंहि तिच्या मनाला अत्यंत क्लेश होत असावे, असा विचार करून, अत्यंत सदय अंतःकरणाच्या वहिनीसाहेबांनीं त्या तरुणीला, तिच्या इतिहासापैकीं कोणताच प्रश्न विचारावयाचा नाहीं, असा मनाशीं निश्चय केला. त्यांची ही गोष्ट झाली; परंतु वाड्यांतील सर्वच माणसांनां त्यांच्याप्रमाणें सदय अंतःकरण व दुसऱ्याविषयीं सहानुभूतिपर दृष्टि परमेश्वरानें दिलेली नव्हती. ही नदींतून वहात आलेली तरुण स्त्री कोण असावी, तिचा इतिहास काय, ती नदींतून वहात कशी आली, इत्यादि हकीगत समजून घ्यावयाला वाड्यांतील दासदासींनां अत्यंत तीव्र उत्कंठा उत्पन्न झाली होती; व त्या प्रखर जिज्ञासेचें दमन करावयाला क्षणोक्षणीं ती मंडळी अधिकाधिक असमर्थ होत चालली होती. दासदासींची तीव्र जिज्ञासा वहिनीसाहेबांच्या लक्ष्यांत आल्याशिवाय राहिली नाहीं, व त्यांनीं, 'या तरुण स्त्रीला तिची हकीगत कोणींहि विचारतां कामा नये,' असा वाड्यांतील सर्व दासदासींनां हुकूम सोडला होता.

परंतु वहिनीसाहेबांच्या या हुकुमानें त्या मंडळीच्या कौतुकवृत्तीला विशेष उत्तेजन मात्र आलें. कधीं एकदां त्या तरुणीची हकीगत आपणाला समजते, असें त्यांनां होऊन गेलें. आमच्या साळूबाईंनां तर त्या जिज्ञासेपुढें तहानभूकहि सुचेनाशी झाली; आणि म्हणूनच, या वेळीं चांगली एकान्तशी संधि पाहून, तिनें इकडेतिकडे पाहून, मोठ्या सावधगिरीनें यमुनेला प्रश्न विचारला "तुमचं घर कुठं हो बाई ?"

यमुनेनें साळूच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष्यच केल्यासारखें केलें; परंतु ती का तिला तशी सोडणार ? तिनें फिरून इकडेतिकडे पाहून पुनः विचारलें "काय हो यमुताई, तुमचं घर कुठं हो ?"

आतां प्रश्नाचें कांहींतरी उत्तर दिल्याखेरीज यमुनेला सुटकाच नव्हती. तिनें खिन्नपणें उत्तर दिलें "माझं घर मसणांत बरं, साळू!"

असें कांहीं भलतेंच उत्तर यमुनेसारख्या शांत-स्वभाव सुशील स्त्रीकडून आपणाला मिळेल, अशी साळूची कल्पना नसल्यामुळें, तिच्या तोंडचे हे शब्द ऐकतांच ती किंचित् चमकली, व यमुनेच्या क्षीण, जर्जर देहदृष्टीकडे स्थिर दृष्टीनें ती वेड्यासारखी पहातच राहिली. कांहीं क्षणांनीं ती यमुनेच्या चेहऱ्याकडे पाहूं लागली. याच वेळीं, सूर्य किंचित् खालीं उतरल्यामुळें यमुनेच्या अंगावर ऊन पडूं लागलें होतें.

साळू मान हालवून म्हणाली "नाहीं यमुताई, तुम्ही कांहीं त्यांपैकीं खास नाहीं."

ती काय म्हणते, हें यमुनेच्या लक्ष्यांत येईना. ती विस्मयाच्या स्वरानें म्हणाली "काय म्हणतेस तूं साळू ? मी त्यांपैकीं नाहीं—म्हणजे कशापैकीं ग ?"

"तुम्हीं काय म्हटलंत तरी त्यांपैकीं तुम्ही खास नाहीं ! तें पहा, तुमच्या मागं तुमचं बाहुलं पडलं आहे उनामुळं !"

मनाच्या अत्यंत दुःखित स्थितीमध्येंहि साळूच्या या उत्तरामुळें यमुनेला हंसें आल्याखेरीज राहिलें नाहीं.

ती किंचित् हंसून ह्मणाली "होय साळू, तूं ह्मणतेस तें खरं आहे. मी कांहीं मसणांत रहाणारं एकादं भूत नाहीं. माझी छाया पडते, अन् हे पहा माझे पायहि सुलटेच आहेत–उलटे नाहींत कांहीं. अगदीं तुझ्या-सारखीच मीदिखील माणूसच आहें हो !"

आपली कल्पना बरोबर आहे, असें पाहून साळूलाहि आनंद झाला. आपल्या प्रश्नाचें उत्तर यमुनेकडून मिळणें शक्य नाहीं, असें पाहून ती पुनः त्या भानगडींत पडली नाहीं. गालिचा आंथरून झाल्यावर तिनें यमुनेला त्यावर नीट निजविलें, व उशी तिच्या मानेखालीं दिली. "वहिनीसाहेब काय करताहेत तें मी पहातें अं ?" असें ह्मणून साळू तेथून हळुहळू वाड्याकडे निघून गेली. परंतु जातांना, यमुनेकडे तिरस्काराचा एक कटाक्ष टाकल्याखेरीज ती राहिली नाहीं.

आणखी कांहीं वेळ गेला. यमुना आपल्याच दुःखविचारांत चूर होऊन राहिली होती. कांहीं वेळानें तिनें वाड्याकडे सहज नजर टाकली, तों वहिनीसाहेब आपल्याकडेच येत आहेत, असें तिच्या दृष्टीला पडलें. त्या जवळ येतांच यमुना जरा कष्टानें उठून बसली.

वहिनीसाहेब किंचित् हंसून ह्मणाल्या " अहं–उठूं नका–उठूं नका. तुह्मी आपल्या निजूनच रहा."

यमुना ह्मणाली " नाहीं–मला उठून बसायला आतां कांहीं तितका त्रास नाहीं पडत ! इतका वेळ तरी मी बसूनच होतें. आतांच जरा मी पडलें."

"म्हणूनच ह्मणतें, तुह्मी बसूं नका–निजा. तुह्मी आजारी माणूस. नुकतंच कुठं तुह्माला बरं वाटायला लागलं आहे. बसूनबसून तुह्माला त्रास होईल बरं भारी. तुह्मी आपल्या निजा. मी तुमच्याजवळ बसतें. मग तर झालं ?" असें म्हणून वहिनीसाहेब गालिच्याच्या एका टोंकाला; यमुनेजवळ हळूच बसल्या, व तिच्या खांद्यावर हंसतहंसत हात ठेवून, त्यांनीं यमुनेला हळुहळू गालिच्यावर पडावयाला लावलें.

यमुनेला हें बरें वाटलें नाहीं. खिन्न दृष्टीनें तिनें कांहीं वेळ वहिनीसाहेबांच्या चेहऱ्याकडे नजर लावली, व नंतर ती म्हणाली "आपण जवळ बसल्या असतां मी अशी निजतें, हें कांहीं मला बरं नाहीं वाटत !"

" कां बरं बरं नाहीं वाटत ?" वहिनीसाहेब हंसून ह्मणाल्या. "त्यांत एवढं मोठं झालं काय ? तुह्मी आजारी –मी कांहीं आजारी नाहीं; अन् इकडे पहा यमुताई, तुमचा कीं नाहीं मला मोठा राग आला आहे."

बिचारी यमुना वहिनीसाहेबांच्या या शब्दांनीं घाबरून त्यांच्या चेहऱ्याकडे टकमकां पहातच राहिली. आपल्या हातून वहिनीसाहेबांचा काय अपराध झाला, हें तिला न कळल्यामुळें ती अगदींच गोंधळून गेली.

यमुनेची ती गोंधळलेली स्थिति पाहून वहिनीसाहेबांनां कौतुक वाटलें. खदखदां हंसून त्या ह्मणाल्या "ओहोहो ! यमुताई, इतकं कांहीं अगदीं रडकुंडीला नको हो यायला. मला तुमचा राग इतक्याचसाठीं आला, कीं, मी तुम्हाला 'तुह्मी' म्हणून म्हणतें अन् तुम्ही मात्र मला 'आपण' म्हणून बहुमान देतां, हें कांहीं मला आवडत नाहीं, बाई !"

वहिनीसाहेबांच्या तोंडचे हे प्रेमळ शब्द ऐकून यमुनेच्या डोळ्यांत उभे राहिलेले अश्रुबिंदु टपटपोंच खालीं झरझरां झरूं लागले. ती गद्गद स्वरानें ह्मणाली "आपलं मन थोर. आपली माझ्यावर मायाहि मोठी. ह्मणून आपण असं ह्मणतां आहां. वहिनीसाहेब, कुठं आपली थोर योग्यता अन् कुठं मी अभागी यःकश्चित् बायको ! आपण थोर राजघराण्यांतल्या मी रस्त्यावरची भणंग भिकारीण–आपल्या दासीचीहि दासी होण्याची माझी योग्यता नाहीं ! असं असतांहि, आपण दोघांच्या योग्यतेमधलं हें जमीन–अस्मानाचं अंतर ध्यानांतहि न घेतां, माझ्या आजारीपणांत आपण –आपण स्वतः रात्रंदिवस अत्यंत कष्ट घेऊन या अभागिनीची जी सेवाचाकरी केली, तशी माझ्या सख्या आईबहिणींकडूनसुद्धां झाली असती कीं नाहीं, याबद्दल मला शंका आहे. पण वहिनीसाहेब, या हतभागिनीची अशी सेवाशुश्रूषा करून आपण तिला यमपुरीहून ओढून इकडे आणलं नसतं तर फार–फार चांगलं झालं असतं !"

यमुनेच्या हृदयाची या क्षणापर्यंत वहिनीसाहेबांनां चांगली ओळख पटली होती. आजच पहिल्यानं नव्हे –आज कित्येक दिवस वहिनींच्या हें पूर्णपणें लक्ष्यांत आलें होतें, कीं, आपण दुखण्यांतून उठल्याबद्दल यमुनेला अत्यंत दुःख होत असून त्याबद्दल ती आपल्या दैवाला अतिशय दोष देत असते ! यमुनेची हकीकत काय, ती कोण, कोठली, यासंबंधानें तर वहिनीसाहेबांनां अजूनपर्यंत कांहीं थांग पत्ताहि लागला नव्हता. –तिला इतकें दुःख कां होत असावें, याचें कारणहि अजूनपर्यंत त्यांनां कांहींच कळून आलें नव्हतें. आज-पर्यंत यमुना वाड्यांतील महालांत आजारीच पडून असल्यामुळें तिच्याशीं दोन हितगुजाच्या गोष्टी बोल-

ण्याची तशी संधि वहिनीसाहेबांनां अजूनपर्यंत मिळालीच नव्हती. ती वाड्यांत आल्यापासून आजच काय ती तिच्याशीं एकान्त संभाषण करण्याची संधि वहिनीसाहेबांनां आली होती. या हतभागिनीच्या दारुण दुःखाचें कारण समजावून घेण्यासाठीं आणि शक्य असल्यास,आपल्या हातीं असल्यास तें दूर करण्यासाठीं–निदान त्याचा कांहीं अंश तरी दूर करण्यासाठीं–वहिनीसाहेबांचें फुलाप्रमाणें कोमल असें हृदय अगदीं उत्सुक होऊन राहिलें होतें. तसें करावयाला आपण काय करावें, हें त्यांनां सुचत नव्हतें.

वहिनीसाहेब ह्मणाल्या " मीच मुळीं आतां आरंभ करतें. आपण दोघी अगदीं मैत्रिणी झालों आहों–तुह्माला आजपासून मी 'तूं' या एकेरी नांवानंच हांक मारणार—"

" वहिनीसाहेब, आपल्या या निश्चयानं मला किती आनंद झाला ह्मणून सांगूं! या अभागिनीवर आपले भारी उपकार–" यमुनेच्या रुद्ध कंठांतून शब्दच फुटेना!

" हें–हें मात्र माझ्या नाहीं हो कामीं पडायचं, यमुताई! मी मात्र तुला 'तूं' ह्मणावं अन् तूं मात्र मला पूर्वीप्रमाणं 'आपण–आपण' असंच ह्मणावं, हें मला अगदीं नाहीं पसंत! बरं, काय ह्मणतेस तूं? तुला वांचवायचे मीं प्रयत्न केले, तें बरं केलं नाहीं, असं तुझं ह्मणणं एकूण?"

यमुना खालीं पहात जड खरानें ह्मणाली " माझ्यासारख्या हतभागिनीला मरणच योग्य, वहिनीसाहेब!"

यमुनेच्या अंगावरून प्रेमभरानें हात फिरवीत वहिनीसाहेब सहानुभूतीच्या कोमल स्वरानें ह्मणाल्या " छी छी! यमुताई, असं वेड्यासारखं वेडंविद्रं कांहीं तरी बोलावं का माणसानं? आपल्या मरणाची इच्छा स्वतःच करणं हें देवाच्या घरीं मोठ्या पातकांत जमा होतं बरं, यमुताई! देवानं आपणाला हा दुर्लभ मनुष्यजन्म दिला, ही त्याची थोर दया. या त्याच्या महादानाला तुलनाच नाहीं! आपल्या जीवाला तुच्छ समजून त्याची अशी हेळसांड करणं, त्याच्याविषयीं निष्काळजी रहाणं, हें देवाचा घोर अपमान करण्यासारखं आहे. याच्यासारखं घोर पातक एकहि नाहीं, यमुताई!"

यमुना खिन्न स्वरानें ह्मणाली " देवानं माणसाचा जन्म दिला हें ठीक केलं; पण–त्या जन्माबरोबर इतकं असह्य दुःखहि त्यानं द्यावं, हें त्याच्या सदयपणाचंच लक्षण का?"

" यमुताई, देवाच्या गूढ हेतूंची आपणासारख्या क्षुद्र कीटकांनां काय कल्पना होणार? त्याला जें बरं वाटतं, तेंच तो करतो. माणसाचं हित, त्याचं मंगलच तो नेहमीं करतो. त्याच्या कृतींत दोष बघणं, त्याच्या हेतूंमध्यें दुष्टाईची स्थापना करणं, हें का आपणाला शोभतं बरं, यमुताई? त्यानं दूरदृष्टीनं जें दुःख आपल्या भोगीं दिलं, तें मुकाट्यानं, त्याला बिलकूल कांहीं दोष न देतां, मस्तकावर वहाणं हेंच आपणा माणसांचं कर्तव्य! देवाला दोष द्यायला आपण कोणत्या झाडाचा पाला, यमुताई?"

यमुना कांहींच न बोलतां दुसऱ्या बाजूला शून्य दृष्टीनें पाहूं लागली. सूर्यनारायण अस्ताला जाऊन बराच वेळ झाला होता. संधिकालचा तांबुस प्रकाशहि बराच मंदमंद होत आला होता. बागेंतल्या झाडांवर वसती करणारे जे सारे पक्षी पोटापाण्याच्या उद्योगाला दूरदूर दिवसभर गेले होते, ते हळुहळू परत येऊं लागले असून त्यांच्या गोड किलबिलाटानें सारें आकाश व्यापून गेलें होतें.

यमुना कांहींच बोलत नाहीं, असें पाहून कांहीं वेळानें वहिनीसाहेबच पुढें ह्मणाल्या "यमुताई, तुझ्या मनाला इतकं दुःख कसलं होतं आहे, हें मला तूं सांगणार नाहींस गडे?" असें ह्मणून त्यांनीं यमुनेचा एक हात प्रेमभरानें हळूच आपल्या हातीं घेतला.

परंतु यमुनेनें त्यांनां कांहींच उत्तर दिलें नाहीं. आतांपर्यंत तिनें मोठ्या कष्टानें अश्रूंनां थोपवून धरलें होतें; परंतु धैर्याचा आणि विवेकाचा बांध फोडून ते आतां प्रबल वेगानें वाहूं लागले. तिचा पदर अगदीं भिजून ओलाचिंब होऊन गेला!

तिच्या अश्रुवर्षावानें वहिनीसाहेबांचें कोमल हृदय अगदींच गळून गेलें. त्या स्नेहार्द्र स्वरानें ह्मणाल्या " रडूं नको–यमुताई! रडूं नको गडे! असं काय बरं करावं? थांब–रडूं नको. त्या गोष्टी मनांत येतांच जर तुला इतकं दुःख होत असेल, तर मला त्या ऐकण्याची मुळींच जरूर नाहीं. माझ्या या प्रश्नानं तुझी इतकी स्थिति होईल, अशी मला कल्पना नव्हती हो–ह्मणून मीं तुला तसं ह्मटलं–यमुताई, मला त्याबद्दल क्षमा कर. पुनः मजकडून अशी चूक व्हायची नाहीं. शेवटचा एकच प्रश्न तुला मी विचारतें–विचारूं का?"

यमुनेनें आपले पाण्यानें डबडबलेले डोळे वहिनीसाहेबांच्या चेहऱ्याकडे लावून मूकभाषेनें 'तो प्रश्न कोणता?' असें विचारलें.

वहिनीसाहेबांनीं आपल्या लुगड्याच्या पदरानें अगोदर यमुनेचे डोळे व अश्रुप्रवाहानें भिजलेले गाल हलुहळू पुसून काढले. नंतर त्या मृदुस्वरानें ह्मणाल्या "यमुताई, तुझे आप्त इष्टमित्र कुणी कुठं आहेत कीं नाहींत, तें आह्मांला माहीत नाहीं, अन् माहीत असणंहि संभवनीय नाहीं. बरं, तूंहि त्याबद्दल कांहीं आह्मांला सांगत नाहींस. आज आठ दिवस तूं आमच्याजवळ आहेस, तुझी हकीगत पुढं काय झाली, त्याबद्दल कांहींच न कळल्यामुळं ते अतिशय काळजींत असतील,नाहीं बरं? त्यांनां, तुझ्याबद्दल बातमी देणं बरं नाहीं का? निदान तूं आमच्या इथं सुखरूप आहेस, इतकं तरी त्यांनां कळविणं योग्य आहे, असं मला वाटतं. तूं इथं सुरक्षित आहेस,असं कळतांच,इथं येऊन ते तुला घेऊन जातील."

हें ऐकतांच यमुना ताबडतोब उठून बसली, व रडत रडत ह्मणाली "वहिनीसाहेब माझं—या अभागिनीचं—असं जगांत कुणी नाहीं, कीं, माझी बातमी न लागल्यामुळं जें अगदीं काळजींत पडेल! मी इथं जिवंत आहें, असं ऐकून ज्याला आनंद होईल, किंवा इथं येऊन मला घेऊन जाईल, असा माझा आप्त इष्टमित्र जगांत एकहि नाहीं हो! वहिनीसाहेब! मी मोठी हतभागी आहें—माझ्या दुर्दैवाला सीमा नाहीं. आपणाला मीं आजवर मी कोण, काय, कुठली, हें सांगितलं नाहीं, याबद्दल आपण मला मोठी चमत्कारीक समजून मोठा दोष देत असाल; पण माझ्या या दारुण दुर्दैवामुळंच मीं आपणाला माझा कांहीं परिचय करून दिला नाहीं. मीं आपणाला मजसंबधानं जें कांहीं थोडंबहुत सांगितलं, तें सारं काल्पनिक—खरं नव्हे. हेंतरी आपणापाशीं कबूल करायचं कारण इतकंच, कीं, आपणाजवळ ही चतुरता लढविण्याचं जें काम मीं केलं, तें भारी अन्यायाचं अन् कृतघ्नपणाचं होतं,असं माझं मनच मला खाऊं लागलं,हें होय. वहिनीसाहेब, वहिनीसाहेब, आपण माझे प्राण वांचविलेत, मला जीवदान दिलंत; आणखीहि आपण मजवर उपकार करावे, अशी मी निर्लज्जपणानं आपणाला प्रार्थना करतें." असें ह्मणून, उठून यमुनेनें वहिनीसाहेबांचे पाय धरले, व त्यांवर ती एकसारखा अश्रुवर्षाव करूं लागली.

"अग, हें काय? हें तूं काय करते आहेस, यमुताई? तुला वेड तर नाहीं ना लागलं?" असें ह्मणून वहिनीसाहेबांनीं यमुनेचे हात धरून, तिला वर उठविलें, व आपल्या शेजारीं बसवून त्या तिच्या केंसावरून स्नेहभरानें हात फिरवूं लागल्या.

"वहिनीसाहेब!" यमुना गद्गद स्वरानें ह्मणाली "आपणापाशीं माझी एक नम्र प्रार्थना आहे—"

"सांग तुला काय सांगायचं आहे तें—"

"वहिनीसाहेब! माझी ही विनंति ऐकून माझा हतभागिनीचा आपण तिरस्कार मात्र करूं नका. देवानं कृपावंत होऊन आपणाला राजासारखं मोठं वैभव दिलं आहे. आपणाला कशाचा कशाचा ह्मणून तोटा नाहीं. आपण मला जीवदान दिलंत, तसाच मला पुढं आपल्या पायांचा आश्रयहि द्या. जोंपर्यंत माझ्या या अभागी देहांत जीव आहे, तोंपर्यंत आपल्या या संसारांत मला स्थान द्या, इतकंच माझं अभागिनीचं आपणापाशीं हात जोडून मागणं आहे. किती दासदासींचं—नोकरमोलकरणींचं आपण पालन करतां आहां—हाच एक एवढासा जीव आपणाला जड होणार आहे असं नाहीं. एखाद्या दासीप्रमाणंच मला आपल्या पायांपाशीं आश्रय द्या—निष्ठुर अंतःकरण करून मला आपल्या पायांपासून दूर लोटूं नका!"

यमुनेच्या तोंडचा प्रत्येक शब्द वहिनीसाहेबांच्या कोमल अंतःकरणाचे तुकडेतुकडे करीत होता. त्यांच्या हृदयांत अगदीं भडभडून आलें. कांहीं वेळपर्यंत आपणाशींच सुन्न होऊन त्या स्तब्ध बसून राहिल्या. नंतर त्यांनीं हळूच एकवार आपले डोळे पुसून पुनः यमुनेचेहि पुसले, व त्या रुद्ध स्वरानें ह्मणाल्या "हीच ना तुझी विनंति, यमुताई? अन् या क्षुल्लक गोष्टीसाठीं तूं आपल्या जिवाला इतके कष्ट करून घेतलेस? यमुताई, मला तूं इतकी निष्ठुर, पाषाणहृदयाची का समजतेस वेडे? तूं त्याबद्दल मुळींसुद्धां, अगदीं तिळभर दिखील काळजी करूं नको, समजलीस? तुझ्यापाशीं मीं ही गोष्ट काढली, ती तुला इथून कांहीं तरी निमित्तानं घालवून द्यावी ह्मणून का? अगदींच वेडी तूं! तुझा मी कध्धीं—कध्धीं दिखील त्याग करणार नाहीं बरं! हें घे वचन! मी तुला इथं, माझ्याजवळ ठेवीन. तुला कुठं कुठं ह्मणून जाऊं देणार नाहीं, मग तर झालं ना? मनांत कसला ह्मणून तूं किंतु आणूं नकोस. कां? कांबरं फिरून ते डोळे डबडबले पाण्यानं? अगदीं शांत हो, मुळींसुद्धां रडायचं नाहीं—अगदीं चूप!"

वहिनीसाहेबांनीं कितीहि 'चूप' रहायला सांगितलें, तरी यमुनेचे हट्टी डोळे त्यांची ती आज्ञा ऐकेनात.

ड्यांतून एकसारखा अश्रुवर्षाव होऊं लागला. वहिनीसाहेबांनीं पुष्कळ समजावणी करून, अगदीं बाबापुता केल्यावर यमुनेच्या शोकाची भरती कांहींशी ओसरली. संध्याकाळ उलटून रात्रीचा अंमलहि सुरू झाला, तेव्हां कांहीं वेळानें दोघीहि उठून वाड्याकडे जावयाला निघाल्या; परंतु वाड्यापर्यंतचें अंतरहि एका दमानें झेंपण्यासारखें यमुच्या अंगीं अद्यापि सामर्थ्य आलें नव्हतें कांहीं पावलें चालल्यानंतर ती बरीच दमली आहे असें पाहून वहिनीसाहेबांनीं तिला एका बांकावर बसविलें. दम टाकीत बांकाच्या पाठीवर डोकें टाकून ती पडली.

वहिनीसाहेबहि यमुनेच्या शेजारीं बांकावर बसल्या. आकाशांत त्या वेळीं एकाददुसरी तारका लुकलुकूं लागली होती. दोघांमध्यें हळुहळू संभाषण सुरू झालें.

वहिनीसाहेब ह्मणाल्या "यमुताई, गडे, माझ्या मनांत काय विचार आला आहे, तें आहे तुला ठाऊक? मी इथं अगदीं एकटी आहें–माझ्याबरोबरची मैत्रीण किंवा जिवाभावाची सखी अशी हितगुजाच्या गोष्टी बोलायला मला एकहि नाहीं. यामुळं मला एकटीला इथं मुलींसुद्धां करमत नाहीं. ह्मणून आमच्या दिवाणांनीं—आह्मी त्यांनां 'काका' ह्मणतों–माझ्यासाठीं अशी मैत्रीण मिळविण्याकरितां वर्तमानपत्रांत जाहिरात दिली आहे. मला असं वाटूं लागलं आहे, कीं, जाहिरातीनं आणलेली अशी बाहेरची सखी आपल्या काय उपयोगीं पडणार आहे? त्यापेक्षां देवानं दया करून तुलाच इथं पाठवून दिली आहे, तर तुलाच आपली मैत्रीण ह्मणून ठेवून मी कां घेऊं नये? यमुताई, तूंच माझी मैत्रीण होऊन रहा. इथं–तुला मी माझी धाकटी बहीणच समजतें. मीं काकांनां सांगतें असं! काय यावर तुझं ह्मणणं आहे? सांग–मनांत कांहींदिखील किंतु नको ठेवूं—"

यमुना कृतज्ञतेच्या गद्गद स्वरानें ह्मणाली "वहिनीसाहेब, मी अधिक काय सांगूं? आपली ही दया मी जन्मोजन्मीं विसरणार नाहीं."

नंतर त्या दोघीजणी उठून वाड्याकडे निघाल्या. दोघींच्याहि मनांत त्या वेळीं विचारांनीं काहूर करून सोडलें होतें.

प्रकरण पांचवें.

जागेचा अर्ज.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं, प्रातःस्नान, पूजा व नेहमीचें जपजाप्य आटोपल्यावर, दिवाणजींनां बोलावून आणावयाची वहिनीसाहेब व्यवस्था करीत आहेत, तोंच दिवाणजी स्वतःच वहिनीसाहेबांची भेट घेण्यासाठीं आले असून, त्यांच्या हुकुमाची वाट पहात बाहेर उभे आहेत, अशी बायजेनें त्यांनां वर्दी दिली.

राजमान्य राजश्री गुंडो नारायण ऊर्फ काकासाहेब पटवर्धन हे या बाणथडीच्या इनामतीचे कारभारी होते. ज्यांनीं बाणथडीची इनामत विकत घेतली होती, त्या भाऊसाहेब पटवर्धनांचे हे निकटचे आप्त असून लहानपणापासून त्या उभयतांत दाट स्नेहभाव चालत आला होता. काकासाहेबांच्या वयाला साठी उलटून गेली होती; तरीहि त्यांची चपलता, हुषारी व कार्यतत्परता एखाद्या तरुणानेंहि अनुकरण करण्यासारखी होती. काकांची देहयष्टि ठेंगू असून त्यांचा रंगहि काळसरच होता. अंगपिंड मजबूत नसला, तरी रुंद व कारभाऱ्याला योग्य असा स्थूल होता. 'लंबोदर तुंदिलतनु' असें त्यांचें थोडक्यांत वर्णन करतां येईल. भाऊसाहेबांचा काकांवर अतोनात विश्वास! इतका, कीं, ते ह्मणतील ती पूर्वदिशा, असेंच भाऊसाहेबांनां वाटत असे. काकाहि धन्याच्या विश्वासाला पूर्णपणें उपयुक्त असेच होते. त्यांनीं त्यांच्या विश्वासाचा कधींहि गैरउपयोग केला नाहीं. भाऊसाहेब व त्यांची सर्व मंडळी काकांनां आपल्या कुटुंबापैकींच एक मानीत असून त्यांच्या ठिकाणीं त्या सर्वांची अत्यंत निष्ठा व भक्ति असे. वहिनीसाहेब त्यांनां प्रत्यक्ष वडिलांप्रमाणेंच मानीत व त्यांनां 'काका' ह्मणत असत, हें मागें सांगितलेंच आहे.

भाऊसाहेबांच्या वाड्यांतील मागच्या–बायकांच्या भागामधील एक मोठी खोली, इनामतीच्या एकट्याच अधिकारी अन्नपूर्णाबाई ऊर्फ वहिनीसाहेब यांचें 'ऑफिस' ह्मणून तयार करण्यांत आली होती. त्या 'कचेरीं'त सुंदर मेज, खुर्च्या, कपाटें, झुलता पंखा वगैरे सर्व योग्य सरंजाम असून ती उत्तम तऱ्हेनें सज्ज केलेली होती. कोणत्याहि गोष्टीसंबंधानें वहिनीसाहेबांची सल्ला घ्यावयाची असली किंवा

कोणत्याहि कागदपत्रावर त्यांची सही वगैरे घ्यावयाची असली ह्मणजे कारभारी आंत येत असत. त्या वेळीं त्यांनां याच 'कचेरी'च्या खोलींत बसविण्यांत येऊन येथेंच वहिनीसाहेब त्यांची भेट घेत असत. वहिनीसाहेब बाणथडीसारख्या श्रीमंत, वैभवशाली इनामदारीच्या एकव्याच अधिकारी असल्या, तरी शेवटीं त्या एक हिंदु स्त्रीच होत्या. आर्यस्त्रीसुलभ लज्जेमुळें काकासाहेबांसमोर त्या कधींहि खुर्चीवर वगैरे बसत नसत. आपल्या दासींसह येऊन त्या काकांनां प्रथम नमस्कार करीत, व त्यांच्यापासून कांहीं अंतरावर विनयानें उभ्या रहात.

बायजेनें काकांनां या कचेरीच्या खोलींत आणून बसवून ठेवल्यानंतर ती वर्दी देण्याकरितां वहिनीसाहेबांकडे गेली. थोड्याच वेळांत वहिनीसाहेब तेथें आल्या. त्या येतांच दिवाणजी उठून उभे राहिले; पण त्यांनां भक्तिपूर्वक वंदन करून 'बसा–काका, बसा.' असें त्या ह्मणाल्या.

दिवाणजी खालीं बसले, व वहिनीसाहेब त्यांच्यापासून कांहीं अंतरावर उभ्या राहिल्या.

"आपली प्रकृति तर ठीक आहे ?"

"हो काका ! माझी प्रकृति उत्तम आहे. आपली प्रकृति कशी आहे ? आपली सारी मंडळी तर ठीक आहे ?"

"हो, वहिनीसाहेब, आह्मी सारीं खुशाल आहों. बरें, सातआठ दिवसांपूर्वी नदीच्या घाटावर जी मुलगी आपणाला आढळली, ती कोण, काय, कुठली, हें कांहीं आपणाला कळून आलें का ?"

"नाहीं. तें अजून आह्मांला कुणालाच कांहीं कळलं नाहीं. ती स्वतः त्याबद्दल कुणाला कांहींच सांगत नाहीं अन् तिच्याकडून कांहीं कळेल, अशी मला आतां आशाहि वाटत नाहीं."

"मग तिच्यासंबंधानें पोलिसांत खबर देऊन ठेवणें बरें, असें नाहीं का वहिनीसाहेबांनां वाटत ? कुठून कोण आली कुणाला ठाऊक ! शेवटीं तिच्यासंबंधीं कांहीं भानगड नाहीं उपस्थित झाली ह्मणजे झालें ! हो, नाहीं तर धर्म करतां कर्म उभें रहायचें !

"त्या बिचारीसाठीं उगीच पोलिस अन् ठाणंअंमलदार या भानगडी हव्या आहेत कशाला काका ? ती एक अनाथ, निराश्रित बायको आहे–दुसरं कांहीं नाहीं. कुठं तरीबिरींतून जातांना नदींत पडून वहात येऊन लागली झालं आपल्या घाटाला ! बिचारीला आश्रय देऊन इथं माझ्याजवळ ठेवली आहे. तिची काय भानगड उपस्थित होणार आहे, काका ? मला माणसाची नीट पारख आहे, काका ! ती खरोखरच एक निराश्रित गरीब बायको आहे. पोलिसांत तिची खबरबिबर कांहीं देऊं नका. पोलिस येऊन, नांवगांव, ठावठिकाण विचारून तिला अगदीं जीव नकोसा करून टाकतील. नका, काका, पोलिसाच्या भानगडींत तुह्मी मुळींच पडूं नका. मला ती भानगड नको—"

कांहीं क्षण आपणाशींच विचार करीत दिवाणजी स्तब्ध होते. नंतर ते ह्मणाले "त्यासाठीं नाहीं. पण माझ्या ऐकण्यांत असें आलें आहे, कीं, तिच्या गळ्याभोंवतीं दोरीचा एक भक्कम करकोचा आहे. कदाचित् कुणीं तिला ठारबीर मारण्याचा प्रयत्न केला असेल किंवा कदाचित् ती आत्महत्या करायच्या प्रयत्नांत असून कांहीं कारणामुळें तो फसला असेल. दोन्ही गोष्टींपैकीं कोणतीहि असली, तरी ती पोलिसच्या चौकशीला योग्य अशीच आहे, असें मला वाटतें. पण आपली तशी इच्छाच नाहीं, तेव्हां मी पोलिसांत नाहीं खबर देत. तूर्त राहूं द्या तें. तिच्या गळ्याचा तो करकोचा अजूनहि तसाच का आहे ?"

"असला तरी अगदींच थोडा आहे. आणखी चार दोन दिवसांत तो पार नाहींसा होऊन जाईल, असं वाटतं."

"मग कांहीं हरकत नाहीं. बाकी, मी कांहीं आज त्यासाठीं आलों नव्हतों. आपल्या 'सखी' साठीं वर्तमान पत्रांत जी मीं जाहिरात दिली होती, त्यासंबंधानें मी आलों होतों."

"काय झालं त्या जाहिरातीचं ?"

"त्या जाहिरातीवरून हे कित्येक अर्ज माझ्याकडे आले आहेत." असें ह्मणून दिवाणजींनीं हातांतील पत्रें मोजून ह्मटलें "हे एकंदर पांच अर्ज त्या जागेसाठीं आले आहेत."

'कशाला हव्यात त्या बाहेरच्या मैत्रिणी ? त्या दिवशीं घाटावर सांपडलेली ती यमुनाच मी माझी सहचरी करतें,' असे शब्द दिवाणजींनां सांगण्यासाठीं वहिनीसाहेबांच्या अगदीं ओंठापर्यंत आले होते; परंतु स्त्रीसहज लज्जा आणि संकोच यांच्यामुळें, सांगूं सांगूं ह्मणत असतांहि, त्यांनां ते दिवाणजींना सांगण्याचें धैर्य झालें नाहीं. त्यांनीं मनांत असा विचार केला, कीं,

आलेले अर्ज कोणाकडून, कसे, काय आले आहेत, तें तर अगोदर पाहूं. मग प्रसंगाप्रमाणें आपल्या मनांतील गोष्ट दिवाजींनां सांगून टाकूं.

हातांतील कागद दोनतीन वेळ उलटेसुलटे करून काकासाहेब ह्मणाले " यांतले चार अर्ज कांहीं तितके आपल्या उपयोगीं पडण्यासारखे नाहींत असें मला वाटतें. उरलेल्या पांचव्या अर्जाची बाई मात्र आपणाला हवी तशी आहेसें दिसतें. हे सगळे अर्ज मी वहिनीसाहेबांनां वाचून दाखवूं काय ?"

" ठीक आहे–दाखवा वाचून."

दिवाणजींनीं पहिला अर्ज काढून तो वाचावयाला सुरुवात केली. तो अर्ज मुंबईहून एका प्रौढ विधवेकडून आला होता. रामायण, महाभारत वगैरे मराठी पुस्तकें वाचून त्यांचा भावार्थ आपणाला समजावून देतां येईल, परंतु संगीतादि विषयांत आपणाला फारसें गम्य नाहीं, असें तिनें लिहिलें होतें. आपणाला मूलबाळ वगैरे कांहीं नाहीं. धाकट्या दिराजवळ आपण असतों; परंतु अगदीं आपल्या बायकोच्या मुठींत असल्यामुळें तो आपणाला चांगलें वागवीत नाहीं, त्यामुळें नरसोबाची वाडी, नाशिक, त्र्यंबक वगैरे एकाद्या क्षेत्रीं जाऊन रहाण्याच्या खटपटींत आपण आहों. जर जाहिरातींतील जागा आपणाला देण्यांत येईल, तर तीर्थयात्रा तहकूब ठेवावयाला आपली पूर्ण तयारी आहे, असें तिनें त्या अर्जांत आणखीहि लिहिलें होतें.

अर्ज वाचल्यानंतर दिवाणजी ह्मणाले " आपण जशी मैत्रीण शोधीत आहों, त्याच तऱ्हेची ही आहे, असें आपणाला वाटतें काय ? वयानें आपल्या बरोबरीची, जिच्याबरोबर विश्वासानें हितगुज करतां येऊन तिच्या सहवासांत आपणाला आनंदानें अन् मनाच्या प्रफुल्लतेनें काळ कंठतां येईल, अशाच सहचरीची आपणाला आवश्यकता आहे. काय वहिनीसाहेब, आपलें काय मत ?"

वहिनीसाहेबांनां उत्तर द्यावयाला संकोच वाटूं लागला. तरी त्या शेवटीं ह्मणाल्या " हो–त–संच."

त्यानंतर दिवाणजींनीं दुसरा अर्ज वाचावयाला सुरुवात केली. या अर्जदाराला लिहितांवाचतां कांहीं येत नव्हतें; परंतु 'मुद्रिका,' 'अभिमन्यु,' 'सावित्री,' वगैरे जुनीं बायकांचीं प्रेमळ गाणीं, तुकारामाचे कांहीं अभंग, शिवलीलामृत, हरिविजय, पांडवप्रताप वगैरेमधील कांहीं ओव्यांचा भाग वगैरे आपणाला तोंडपाठ येत असून त्यांनीं आपण धनिणीचें उत्कृष्ट मनोरंजन करूं, असें तिचें ह्मणणें होतें. याहि बाईचें बरेंच वय झालें असून स्वयंपाक व इतर गृहकृत्यें यांत आपण अत्यंत निपुण आहों, असें तिनें आपलें वर्णन केलें होतें. हा अर्जहि दिवाणजींनीं त्याच कारणासाठीं नामंजूर केला.

तिसरा आणि चवथा अर्ज हेहि याच कारणांसाठीं दिवाणजींकडून नामंजूर झाले. नंतर डोळ्यांवरून चाळशी काढून, तिचीं भिंगें उपरण्याच्या टोकानें साफ पुसून व पुनः तो स्थानापन्न करून दिवाणजींनीं पांचवा अर्ज हातीं घेतला व किंचित् हंसून ते ह्मणाले " या बाईला लिहितांवाचतां उत्तम येत आहे, अशी या अर्जाच्या सुंदर अक्षरावरून कुणाचीहि तत्काळ खात्री होईल. अर्जाची भाषा अन् रचनाहि भारी गोड आहे."

"असें का ? मग वाचा लवकर—"

दिवाणजी पांचवा अर्ज वाचूं लागले. अर्ज असा होताः—

मुंबई, ता०—

राजमान्य राजश्री गुंडो नारायण पटवर्धन,
कारभारी, बाणथडी, दक्षिण महाराष्ट्र,
यांच्या सेवेसीं—

आपण गेल्या 'केसरी' पत्राच्या अंकांत 'पाहिजे' या सदराखालीं जी जाहिरात दिली आहे, ती वाचून माझा हा अर्ज आपणाकडे पाठविण्याचें धाडस मी करीत आहें. हा माझा अर्ज आपण समग्र वाचण्याची कृपा करून मला आजन्म उपकारी करून ठेवावें, अशी आपणाला नम्र विनंति आहे.

माझ्या कैलासवासी वडिलांचें नांव यशवंतराव तांबे. माझ्या वडिलांचें मूळ गांव वऱ्हाडांतील भणगांव नांवाचें खेडें. मराठी वाङ्मयाचें मीं चांगलें अध्ययन केलें आहे. रामायण, महाभारत वगैरे जुन्या काव्यांपासून तों हल्लींचे नामांकित जीवंत कवि, नाटककार व कादंबरीकार यांच्या बहुतेक ग्रंथांशीं माझा उत्तम परिचय आहे. मीं स्वतः एक नाटक व एक कादंबरी लिहिली असून पैशाच्या अभावामुळें, तीं मला अद्यापि छापून प्रसिद्ध करतां आलीं नाहींत. गायनवादन विद्येच्या अध्ययनांतहि मीं कांहीं काल घालविला असून त्यांत माझी बरीच गति झाली आहे. त्या कालांतील नामांकित वस्तादांपासून मला त्या कलांचें शिक्षण प्राप्त झालें आहे. त्यांचें शिक्षण घेतल्यानंतर मी स्वतःहि घरींच या कलांवर पुष्कळ मेहनत घेतली असून आतां त्यांमध्यें मला बरीच पारंगतता आली आहे, असें मला वाटतें. शिवाय,

हार्मोनियम, सतार, सारंगी व तबला हीं वाद्यें वाजवावयाला मी शिकलें होतें; परंतु दारिद्र्यामुळें हीं सर्व वाद्यें मला जवळ बाळगतां येत नसल्यामुळें माझा हा वादनाचा अभ्यास कांहींसा मलिन झाला आहे; परंतु कांहीं दिवस पुनः या वादनांचा अभ्यास करावयाची संधि मला मिळेल, तर हीं सर्व वाद्यें पुनः मला उत्कृष्ट रीतीनें वाजवितां येतील, अशी माझी खात्री आहे. अत्यंत उच्च अशा दक्षिणी ब्राह्मण कुळांत माझा जन्म झाला असून जुन्या चालीच्या आणि बालबोध रीतीभातीच्या ब्राह्मण कुलांत माझ्या वैवाहिक आयुष्याचीं कांहीं वर्षे मीं घालविलीं आहेत. हल्लीं या भ्रष्ट बकाली मुंबई-शहरांत एका अनाथ हिंदु विधवेला जुने आचार-विचार जितके पाळतां येणें शक्य आहे, तितके मी पाळीत आहें. 'जितके पाळतां येणें शक्य आहे,' असें लिहिण्याचें कारण इतकेंच, कीं, मुंबईत नळाचें पाणी पिणें मला भागच पडत आहे. दुरून एखाद्या विहिरीचें पाणी मुद्दाम आणावयाला ब्राह्मण ठेवण्याचें मला सामर्थ्य नसल्यामुळें मला नळाचें पाणी प्यावें लागतें, त्याला माझा नाइलाज आहे.

मी एक सामान्य हिंदु ब्राह्मण विधवा असतां, वर लिहिल्याप्रमाणें विद्या-कला मला कशा साध्य करून घेतां आल्या, तें आपणाला समजावें म्हणून माझ्या आयुष्याची हकीगत आपणाला मला कळवावी लागत आहे, याबद्दल आपण मला क्षमा करावी.

वीस वर्षांपूर्वी वऱ्हाडांत भणगांव येथें माझा जन्म झाला. माझ्या आजोबांनीं थोडासा जमीनजुमला आपल्या पाठीमागें ठेवला होता; माझे वडील व दोघे चुलते यांनीं त्याचे तीन सारखे हिस्से करून घेतले. परंतु ते पृथक् नसून एके ठिकाणींच होते. मी सात वर्षांची झाल्यावर मला व माझ्या पंधरा वर्षांच्या वडील बंधूला मागें ठेवून, माझ्या मातुःश्रीनें स्वर्गाला प्रयाण केलें. आई वारल्यानंतर माझे वडील घरीं फारसे रहात नसत. बहुतेक ते मुंबईलाच असत. कांहीं महिन्यांनीं तीनशें रुपये दर-महावर एका इंग्रजी व्यापारी कंपनींत त्यांची कॅशिअर म्हणून नेमणूक झाली. ही जागा मिळण्यासाठीं, जी कांहीं वडिलार्जित संपत्ति होती, ती सारी बाबांनां गहाण टाकावी लागली. नोकरी लागल्यानंतर आम्हा दोघां बहीणभावंडांनां घेऊन बाबा मुंबईला आले, व त्यांनीं बिऱ्हाडहि केलें. आमची एक वृद्ध आत्याहि आमच्याबरोबर मुंबईला आली होती.

मुंबईला रहात असतां बाबांच्या धार्मिक आणि सामाजिक मतांमध्यें बरेच फरक झाले होते; परंतु त्यांनीं कधींहि परधर्मग्रहण केलें नाहीं. ते अखेरपर्यंत हिंदुसमाजांतच होते. दादा हायस्कुलांत जाऊन आपला अभ्यास करूं लागला आणि मला लेखन-वाचन, शिवणें-टिपणें आणि गायन-वादन यांचें शिक्षण देण्यासाठीं निरनिराळ्या हुषार शिक्षकांची योजना बाबांनीं केली. मी दहाअकरा वर्षांची झालें असेननसेन तोंच आमची वृद्ध आत्याबाई आणि गांवची आप्तमंडळी यांनीं माझें लग्न करून टाकण्याबद्दल बाबांचा सारखा पिच्छा पुरविला, परंतु बाबा आपले त्या सर्वांनां एकच उत्तर देत-'इतक्या लहान मुलीचें लग्न करायला मी तयार नाहीं. अजून तिला स्वतःच्या चोळीपरकराचीहि काळजी घेतां येत नाहीं, तिला एव्हांपासून दुसऱ्यांच्या घरीं तिसऱ्याच्या खस्ता खायला मी पाठवूं? हें तिचें शिकण्याचें वय-तिला हवें तेवढें शिकूं द्या-मी तिला वाटेल तोंवर शिकवीन. सतराअठरा वर्षांची होऊन तिचें तिलाच हिताहित कळूं लागलें, म्हणजे योग्य वर पाहून तिचें मी लग्न करून देईन.' याप्रमाणें माझ्या लग्नाच्या बाबतींत बाबांचा कृतनिश्चय असल्यामुळें, माझें लिहिणें-वाचणें, आणि गायनवादन यांचें शिक्षण अगदीं अखंडित रीतीनें चालू होतीं.

अशा स्थितींत मला चौदावें वर्ष लागलें आणि आमच्या कुटुंबावर मोठा अनर्थ कोसळला. आमच्या बाबांवरती या वेळीं एक मोठें कुभ्याल आलें. बाबांच्या हाताखालच्या एका अधिकाऱ्याच्या दोषामुळें कंपनीच्या खजिन्यांतून बरीच रकम नाहींशी झाली, आणि त्याबद्दलची सर्व जबाबदारी अगदीं निरपराध अशा आमच्या वडिलांवर येऊन पडली. या भानगडींत त्यांची नोकरी गेली आणि पैशांची भरपाई करण्यांत त्यांनां आपली सर्व चीजवस्त पार विकूनटिकून टाकावी लागली. बाबांनां दैवाचा हा तडाका सहन झाला नाहीं. त्यांनीं लगेच शोकानें अंथरुण धरलें आणि सहा महिन्यांच्या आंत आम्हां सर्वांनां शोकसागरांत लोटून ते स्वर्गाला निघून गेले. बाबांच्या मृत्यूनंतर देशाहून आमचे काका मुंबईला आले, आणि मला लगेच तिकडे घेऊन गेले. तिकडे जातांच पहिल्यानें त्यांनीं कांहीं कृत्य केलें असेल तर तें माझें तडकाफडकी लग्न करून टाकण्याचें.

विवाहाला योग्य असें वय! मी केव्हांच ओलांडून गेलें आहें, अशी त्यांची ठाम समजूत असल्यामुळें त्यांनीं चहूंकडे धांवाधांव करून माझ्याकरितां एक स्थळ शोधून काढलें व मला एकदां हातावेगळी करून टाकली. ज्या घरीं मी पडलें, तें कुलशीलानें मोठें, परंतु द्रव्यदृष्टीनें अतिशय कमी दर्ज्याचें होतें.माझे वडील श्रीमंत असून मजवर त्यांचें अत्यंत प्रेम असल्यामुळें माझे त्यांनीं अतिशय कोडकौतुक पुरविलें,व त्यांच्या प्रेमादरांत मी लहानाची मोठी झालें;परंतु आतां दरिद्रावस्थेंत आल्यानंतरहि मी माझ्या पतींची व घरांतील इतर वडील माणसांची अगदीं मनःपूर्वक आदरानें सेवाशुश्रूषा करूं लागलें. माहेरीं असतां धुण्याचे दोन घाव घालणेंहि मला कधीं ठाऊक नव्हते; तीच मी सासरीं येऊन, मोठमोठ्या कळशाघागरी घेऊन दुरदुरून पाणी आणावयाला आणि दुवक्ता स्वयंपाकाचीं तपेलींच्या तपेलीं उतरावयाला हंसतमुखानें व आनंदानें सिद्ध झालें. परंतु पूर्वजन्मीं माझ्या हातून कांहींतरी मोठें पातक घडलें होतें, यांत शंका नाहीं—ह्मणूनच माझा अभागिनीचा सौभाग्यसूर्य अकालीं अस्त पावला. एके दिवशीं पटकीनें माझ्या कपाळावरचा सौभाग्यतिलक पुसून टाकला व मी अशी अनाथ गतधवा झालें. या गोष्टीला आज तीन वर्षें झालीं.

माझ्या सासरची मंडळी पैशानें अगदीं लंगडी,हें मीं वर लिहिलेंच आहे. अन्नवस्त्रादिकांच्या अभावामुळें, मनाच्या अगदीं इच्छेविरुद्ध,मला अत्यन्त प्रिय असलेलें तें घर शेवटीं मला सोडावें लागलें, व मी माझ्या वडील बंधूच्या आश्रयाला आलें. माझा दादा या मुंबईशहरांत चाळीस रुपये दरमहावर एका शाळेंत शिक्षकाची नोकरी पत्करून लॉ–क्लासांत टर्म भरीत होता. दादाच्या या चाळीस रुपयांवर सारा भार टाकून आह्मी तीन प्राणी मोठ्या कष्टानें एकएक दिवस काढूं लागलों. गेल्या डिसेंबर महिन्यांत आह्माला नांवाला ह्मणून आधार वाटत असलेली आमची आत्याबाईहि आह्माला सोडून गेली, व आह्मी दोघें बहीणभावंडें उघडीं पडलों. ईश्वरकृपेनें दादा या वर्षी एलएल्. बी. ची परीक्षा उत्तीर्ण झाला आहे. वऱ्हाडांत अगर निजामशाहींत कोठल्या तरी एखाद्या चांगल्या ठिकाणीं जाऊन वकिलीस सुरवात करावी, अशी दादाची इच्छा आहे. परंतु माझ्यासंबंधानें तो मोठ्या संकटांत पडला आहे. मला एकटीला मुंबईंत ठेवूनहि त्याला कोठें जातां येत नाहीं किंवा धंद्याचा नीट जम बसेपर्यंत मला बरोबर कोठें नेतांहि येत नाहीं. दादाचें अजून लग्न झालें नाहीं, परदेशीं जाऊन, दादा कोर्टकचेरींत गेल्यावर मी घरांत एकटी कशी राहूं, हाहि एक मोठा प्रश्नच आहे. या सर्व कारणांमुळें दादाला अजून मुंबई सोडतां येत नाहीं आणि त्याच्या उन्नतीच्या मार्गामध्यें या प्रकारें मी एक मोठी थोरली धोंडच होऊन बसलें आहें. इतक्यांत आपण वर्तमानपत्रांत दिलेली जाहिरात वाचून दयाळु परमेश्वरानेंच या संकटांत हा उपाय आपणाला दाखविला, असें वाटून मनाला एका प्रकारची हुषारी वाटूं लागली आहे.

आपण जर ही जागा मला द्यावयाची कृपा कराल, तर एका अनाथ ब्राह्मणकन्येला मोठ्या संकटांतून मुक्त केल्याचें श्रेय आपणाला मिळून मजवर आणि माझ्या बंधूवर आपले अतिशय उपकार होणार आहेत. बाईसाहेबांचें—माझ्या मैत्रिणीचें उत्कृष्ट तऱ्हेनें मनोरंजन करण्याची मी सदासर्वदा आपणाकडून अगदीं पराकाष्ठा करीन. माझ्यावर ही दया करण्याचें जर आपण व आपल्या बाईसाहेबांनीं निश्चित केलें, तर दादाला बरोबर घेऊन बाणथडीला येऊन मी ताबडतोब नोकरीवर हजर होईन.

अनुकूल उत्तराची मी चातकीसारखी मार्गप्रतीक्षा करीत आहें.

कळावें, ही विनंति.

आपली नम्र,

यशोदाबाई पंडित.

हें पत्र वाचून झाल्यावर दिवाणजी ह्मणाले " याच मुलीला बोलवावें, असें मला वाटूं लागलें आहे. वहिनीसाहेबांचें काय ह्मणणें आहे ? "

दिवाणजी पत्र वाचीत असतां, त्यांतील यशोदाबाईच्या दुःखजनक, हृदयविदारक वृत्तान्तानें वहिनीसाहेबांच्या कोमल हृदयाला अतिशय वेदना होऊं लागल्या. त्या अर्जदार बाईबद्दल त्यांच्या मनांत एकदम करुणा उत्पन्न झाली. त्या आपणाशींच ह्मणाल्या "ठीक आहे ! याच बाईला येऊं द्या.ही येऊं द्या अन् यमुताईहि इथंच राहूं द्या. देवाच्या दयेनं, आपणाला तर कांहीं कमी नाहीं ! " नंतर त्या दिवाणजींना ह्मणाल्या " ठीक आहे. आपणाला जें योग्य दिसेल तें आपण करा. याच बाईला बोलवा आपण. "

"मग आजच लिहितों हिला पत्र."

वहिनीसाहेब कांहीं वेळ स्तब्ध राहून ह्मणाल्या "पण काका,–" एवढेंच बोलून त्या थांबल्या.

"काय वहिनीसाहेब ?"

"काका, या बाईला खर्चाला ह्मणून अगोदर थोडी-बहुत रकम पाठवायला नको का ? मला आपलं—"

दिवाणजी हंसून ह्मणाले "खर्चाला ? वहिनीसाहेब, जागेवर रुजू होण्यासाठीं जे अर्जदार येतात, त्यांनां आपल्याच खर्चानें यावें लागतें, असाच चहूंकडे शिरस्ता आहे."

जरा काकुळतीच्या स्वरानें वहिनीसाहेब ह्मणाल्या "तसा शिरस्ता असेल–मी नाहीं ह्मणत नाहीं काका ! पण ही बायको माणूस आहे अन् त्यांतूनहि हिची घरची स्थिति—"

दिवाणजी पुनः गालांतल्या गालांत हंसले, व ह्मणाले "ठीक आहे. आपण ह्मणतां त्याप्रमाणें तिला पत्रा-बरोबरच थोडीशी रक्कम प्रवासखर्चाला ह्मणून पाठवून देऊं."

वहिनीसाहेबांनां दिवाणजींच्या बोलण्यांतील हिशेबी खोंच कळली नाहीं असें नाहीं. परंतु त्यांचें हृदय अत्यंत कोमल, त्याप्रमाणेंच फार उदार होतें. त्या ह्मणाल्या "काका, प्रवासखर्चापुरतीच का रकम पाठविणार ?"

"मग ?"

"लुगडींबिगडीं, कापडचोपड वगैरे आवश्यक लागणाऱ्या वस्तूंसाठींहि तिला कांहीं पाठवायला नको का ? पत्रांत तर तिनें आपली दरिद्रावस्था स्पष्ट स्पष्ट लिहिली आहे. त्यावरून लुगडीं, कपडे वगैरे आवश्यक जिनसा तिच्याजवळ मुबलक असतील, असं नाहीं मला वाटत."

दिवाणजी उठून उभे राहिले, व ह्मणाले "हो, आपलें ह्मणणें खरें दिसतें. कपड्याबिपड्यांसाठींहि थोडीशी रकम तिला पाठवून देऊं."

"किती रुपये पाठवतां, काका ?"

दिवाणजींनीं हंसून विचारलें "आपण किती रुपये पाठवावे ह्मणतां, वहिनीसाहेब ?"

"लुगड्याबिगड्यांकरितां ह्मणून पन्नास रुपये अन् प्रवासाला काय लागतील ते निराळे पैसे, एवढी रकम तिला ताबडतोब पाठवावी, असं मला वाटतं. मग आपणाला योग्य वाटेल ती रकम आपण पाठवा."

"ठीक आहे. आपल्या मर्जीप्रमाणें रकम मी पाठ-वून देतों. वहिनीसाहेब, खरोखरच आपण दयेच्या देवी आहां !" असें ह्मणून प्रसन्न अंतःकरणानें दिवा-णजी तेथून निघून गेले.

प्रकरण सहावें.

वगले वकील !

योग्य वेळीं काकासाहेबांनीं 'यशोदाबाई पंडितां'च्या पत्त्यावर, जागेवर ताबडतोब रुजू होण्याचें हुकूम-पत्र पाठवून पाऊणशें रुपयेहि मनीऑरडरनें पाठवून दिले. कांहीं दिवसांनीं आपल्या 'दादा'ला बरोबर घेऊन यशोदाबाईहि वाणथडीला येऊन पोहोंचल्या. यशोदाबाईंचे हे 'दादा' दुसरे कोणी नसून आपल्या पूर्ण परिचयाचे 'सुवर्णमालिनी' ऊर्फ 'वसंतराव तांबे' हेच होत.

गाडींतून उतरतांच वसंतराव बैठकखान्यांत आले. यशोदाबाईंनां मागें बायकांच्या भागाकडे नेण्यांत आलें.

वसंतरावांचें 'मदनाप्रमाणें' सुंदर रूप पाहून सर्व लोक अगदीं आश्चर्यचकित होऊन गेले. 'असा सुंदर पुरुष बाणथडीमध्येंच काय; पण आसपासच्या शंभर कोसांत एकहि नसेल–फार काय, असा सुंदर पुरुष कधीं कोणीं कोठें पाहिला असेल कीं नाहीं याबद्दल शंका आहे,' असें जो तो आपापसांत कुजबुजूं लागला. सर्वजण एकमेकांच्या कानांशीं लागून ह्मणूं लागले "हा जर इतका सुंदर आहे, तर याची जी बहीण वहिनी-साहेबांची मैत्रीण ह्मणून रहाण्याकरितां आली आहे, ती किती सुंदर असेल ! बहुतकरून ती स्वर्गांतील रंभा–ऊर्वशीप्रमाणें असावी !"

प्रातर्विधि आटोपून, चहाशिरा वगैरे चापून, वसंतराव बैठकखान्यांत बसले होते. इतक्यांत काकासाहेब तेथें आले. नमस्कारचमत्कार, कुशल प्रश्नहि झाल्यानंतर काकासाहेब वसंतरावांनां घेऊन आपल्या 'कचेरी'च्या खोलींत गेले. जवळच्या खुर्च्

चादर घातलेल्या सुंदर बैठकीवर त्यांनां बसवून, 'रस्त्यांत गाडीचा वगैरे कांहीं त्रास झाला काय ?' 'मुंबईला आणखी किती दिवस रहाणार ?', 'वऱ्हाडांत कुठल्या जिल्ह्यांत जाऊन वकिली सुरू करणार ?' 'तेथें जमिन-जुमला असल्याबद्दलचा सरकारांत कांहीं दाखला वगैरे पटवला आहे काय ?' इत्यादि इत्यादि प्रश्नांचा मारा दिवाणजींनीं वसंतरावांवर सुरू केला.

करावी या भोळसर खेडवळ म्हाताऱ्याची कांहीं तरी गंमत, असा विचार करून वसंतराव म्हणाले "मी जर वऱ्हाडांत जायचा विचार सोडून आपल्या जिल्हा-कोर्टालाच येऊन प्रॅक्टिस सुरू केली, तर आपल्या इनामतीचे मोकद्दमे मला मिळतील का ?"

आपल्या चाळिशीच्या भिंगांवरून तीव्र दृष्टीनें वसंत-रावांकडे पहात काकासाहेब म्हणाले "आमच्या इना-मतीचे मोकद्दमे आम्ही फारसे लढतच नाहीं.त्या भानगडी कांहीं फारशा लाभाला येत नाहींत, असाच आमचा अनुभव आहे. तशीच कांहीं भानगड उपस्थित झाली, तर आपसांत वाद मिटवून टाकण्याचाच आम्ही पहिल्या-पासून प्रयत्न करतों, अन् तितक्यावर न निभावून कोर्टापर्यंत जायचा प्रसंग आलाच, तर ठिकठिकाणीं आमचे ठरलेले वकील आहेतच. त्यांच्याकडेच अर्थात् आमचे मोकद्दमे जातात."

हें दिवाणजींचें उत्तर ऐकून वसंतराव मनांतल्या मनांत हंसले व स्वतःशींच म्हणाले "म्हातारा अगदींच कांहीं बावळट नाहीं.पण हा मला झाडून टाकतो आहे, तितक्या सहज मी झाडला जायचा नाहीं.या खेडवळ बुड्ढ्याला का मी हार जाणार आहें ? आणखी थोडीशी याची मजा करून पहायला काय हरकत आहे ?"

असा विचार करून वसंतराव म्हणाले"आपले ठरलेले वकील तर असतीलच-त्यांत कांहीं शंका नाहीं.पण मोक-द्दमे जेव्हां मोठे असतात,तेव्हां एकाच वकिलावर कांहीं भागत नाहीं–दुसराहि वकील मुख्य वकिलाला मदतनीस म्हणून लागतोच. अशा वेळीं जरी जूनिअर वकील म्हणून आपल्या खटल्यांत मला वकीलपत्र देण्याचें आश्वासन दिलेंत, तरी वऱ्हाडचा विचार सोडून मी आपल्या जिल्ह्याला जरूर येईन.जरी मी नवीन वकील आहें,तरी या कायद्यांचा अभ्यास मीं अगदीं कसून, बारकाईनें अन् मेहनतीनें केलेला आहे. स्वतःच्याच तोंडानें स्वतःची प्रशंसा मींच करणें रास्त नाहीं. पण आपण जर मला तशी संधि द्याल, तर आपणाला माझी खरी योग्यता कळून येणार आहे." असें म्हणून चेहरा गंभीर करून वसंतराव दिवाणजींच्या चेहऱ्याकडे बारीक नजरेनें पाहूं लागले.

कांहीं वेळ दिवाणजी आपणाशींच विचार करीत स्तब्ध राहिले. नंतर ते म्हणाले "मीं कामाची मनांतल्या मनांत साधारण चाळणी करून पाहिली– पण एखादी मोठीशी 'केस'लवकर उपस्थित होण्याचे चिन्ह मला कांहीं कुठेंच दिसत नाहीं बुवा ! परंतु माझ्या स्वतःच्या इस्टेटीसंबंधानें एक मोठी केस लवकरच उपस्थित होणार आहे, असा रंग दिसूं लागला आहे. देशांत माझे भाईबंद आहेत, तेच माझ्या इस्टे-टीची सारी व्यवस्था तूर्त पहात आहेत. आपण त्यासंबं-धाची हकीगत ऐकून घेतां का जरा ?"

वसन्तराव उल्हासानें म्हणाले "सांगा–सांगा आपण– माझें लक्ष्य आहे."

काकासाहेब त्यांच्याकडे तीव्र दृष्टीनें पाहून म्हणाले "केस आहे बरीच भानगडीची ! अगदीं मन लावून ऐकायला पाहिजे. ती ऐकल्यानंतर आपलें काय मत पडतें तें पाहूं या. यासंबंधानें आमच्या मुख्यमुख्य जिल्हावकिलांचें मत मीं घेतलें आहे अन् मुंबईच्या दोनचार मोठ्या हायकोर्टवकिलांचेंहि मत मीं मागवलें होतें. पण आमच्या जिल्हावकिलांच्या मताशीं मुंबईच्या वकिलांचें मत मुळींच जुळत नाहीं. पाहूं–आपण या बाबतींत काय मत देतां तें."

काकासाहेबांच्या या भाषणानें वसंतराव पंचायतींत पडले. मोकद्दम्याची हकीगत ऐकून, त्यासंबंधानें आप-णाला कायदेशीर मत द्यावें लागेल, अशी पहिल्यानें 'म्हाताऱ्याची सहज गंमत' करण्याच्या वेळीं, त्यांना कल्पनाहि नव्हती; आणि त्यांत दिवाणजी पुनः बजावून सांगत आहेत, कीं, 'केस आहे बरीच भानगडीची !'

काकासाहेब आमच्या या तोतया बगल्या वकिलांना आपला खटला सांगूं लागले.एका श्रीमंत मनुष्याला कांहीं अपत्य झालेलें नाहीं.परंतु मृत्युपत्र करून त्यानें आपल्या स्त्रीला दत्तक घेण्याचा अधिकार दिला आहे. त्या अधिकारालाहि त्यानें बऱ्याच शर्ती, विरोध आणि अटी घातल्या आहेत. बायको जर दत्तक घेण्यापूर्वीच मरण पावली किंवा दत्तक घेतलेला मुलगा कायदेशीर रीतीनें दत्तक ठरला नाहीं, तर पुढें काय करावयाचें; दत्तक घेतलेल्या मुलाला मुलगा होण्यापूर्वींच जर तो मरण पावला, तर आपल्या संपत्तीची व्यवस्था काय करा-

वयाची; रामभाऊ आणि कृष्णराव या दोन बंधूंनां त्यानें आपल्या मृत्युपत्राचे ट्रस्टी नेमले असून, कोणकोणती परिस्थिति उत्पन्न झाली असतां ती संपत्ति या दोघां भावांनां मिळावयाची; इत्यादि इत्यादि अपरंपार गोष्टी दिवाणजी रंगांत येऊन वसन्तरावांनां सांगूं लागले आणि मधुनमधून त्यांनां " काय, आलें का लक्ष्यांत?" असें खडसून विचारूं लागले.

वसंतरावांनां त्यांपैकीं कांहींच भानगड बिलकूल कळत नसतां, मान हलवून ते आपणाला सर्व कांहीं कळत आहे, असें स्पष्टपणें दाखवीत होते. वसंतरावांचें मन कोठल्याहि मुद्द्यावर स्थिर होत नव्हतें किंवा त्यांतल्या खाचाखोंचाहि त्यांनां कांहीं कळत नव्हत्या. दिवाणजींची बडबड मधुनमधून ते ऐकत व पुनः मनाशींच विचार करूं लागत ' काय या म्हाताऱ्याला आतां सांगूं? कसलें बोडक्याचें मत देऊं मी आपलें यांत? छान पेंचांत येऊन पडलों आहें मी! जें तोंडाला येईल तें बोलून टाकण्याखेरीज आतां गत्यंतरच उरलें नाहीं. अन् म्हातारा जर मीं दिलेल्या मताच्या समर्थनार्थ कायद्याचे पुरावे मागूं लागला तर? तर मग पक्का बेवकूब बनण्याखेरीज दुसरा कांहीं मार्गच नाहीं आपणाला! म्हाताऱ्याची गंमत करतांना आपलीच पुरी गंमत होणार खास! कशाला या भलत्याच भानगडींत मी पडलों!'–अशा प्रकारचे विचार मनांत चालले असतां वसन्तराव मोकद्दम्याचें कथासूत्र घालवून बसत. आपण ओढून आणलेल्या, परंतु अगदीं गळ्याशीं येऊन बिलगलेल्या या संकटाचा विचार करीत असतां बिचाऱ्या वसंतरावांचा गौरवर्ण चेहरा लाल होऊन त्यावर घामाचे थेंब जमून त्यांचा ओघळहि हळुहळू टपाटप खालीं गळूं लागला. त्यांची टाळू सुकली आणि जीभ कोरडी पडली. कोणत्या युक्तीनें या पेंचांतून सुटावें हें त्यांनां सुचेना!

आपल्या 'केस'ची हकीगत पूर्ण करून दिवाणजींनीं वसंतरावांनां विचारलें " मग आपलें काय मत आहे? रामभाऊच्या अन् कृष्णरावांच्या मुलींनां जी ही इष्टेट मिळणार, ती 'अध्यावहनिक' या सदरांत येते, का, 'यौतक' या सदरांत येते?"

"हे 'अध्यावहनिक' व 'यौतक' शब्द आमच्या बगले वकीलसाहेबांच्या कानांवर साऱ्या जन्मांत आजच पहिल्यानें पडले. वसंतरावांचे वडील मोठे श्रीमंत खरे; परंतु त्यांचा सर्व व्यवहार बँका आणि शेअर्स यांमध्येंच. त्यांनां कायदा, वारसा, वगैरेंच्या भानगडी मुळींच कधीं पडल्या नाहींत. अर्थात् वसंतरावांनां त्यासंबंधीं कांहीं माहिती असणें सुतराम् संभवनीय नव्हतें. या वेळीं म्हाताऱ्याला काय उत्तर द्यावें हें त्यांनां सुचेना. कांहींतरी उत्तर देणें आणि तेंहि अगदीं ताबडतोब, अगदीं आवश्यकच होतें. तेव्हां, दैवावर हवाला ठेवून त्यांनीं ठांसून सांगितलें "अर्थात् 'यौतक'!"

काकासाहेब म्हणाले " काय यौतक? तर मग हायकोर्टाच्या वकिलांशीं तुमचें मत जुळतें. तेहि असेंच म्हणतात."

त्यांचे हे शब्द ऐकतांच वसंतरावांची छाती गर्वानें दोन हात रुंद झाली. "एः! मूर्ख बेटे जिल्हावकील! प्रत्यक्ष मुंबईच्या प्रमुख कायदेपंडितांच्या मताशीं आपलें मत जुळलें! शाबास आपली! कशी आपण बहादुरी केली. आपल्या चतुराईसमोर या गांवढळ लोकांची का डाळ शिजणार आहे? त्यांनां हार खावी लागणारच आपल्यापुढें!"

परंतु दुर्दैव! वसंतरावांचा हा गर्व अगदींच क्षणभंगुर ठरला! त्यांचा हा विजय दैवाला सहन झाला नाहीं असें दिसलें. कारण क्षणभरानें दिवाणजींनीं पुनः विचारलें " ठीक आहे. संपत्ति 'यौतक' जर खरी, तर ती पुढें मिळायची कुणाला? धोंडोपंताला, कीं, सांवळ्याला?"

काय उत्तर देणार या प्रश्नाला? आणि देऊन तरी आपली सुटका कशी होणार? दिवाणजी मोकद्दम्याची हकीगत सांगत असतां, 'धोंडोपंत' आणि 'सांवळ्या' हीं दोन नांवें मधुनमधून घेत असून तीं बगल्यांच्या कानांवरहि आदळत होतीं; पण हे दोघे कोण आणि ऐन मोकद्दम्याशीं त्यांचा संबंध काय, यासंबंधानें वसंतरावांच्या एक अक्षरहि लक्ष्यांत नव्हतें. परंतु उत्तर न देऊनहि चालण्यासारखें नव्हतें. कपाळावरील घाम पुशीत कंपित स्वरानें त्यांनीं उत्तर दिलें "अर्थात् दोघांनांहि मिळेल! दोघांचाहि अगदीं निमानिम भाग!"

हें उत्तर ऐकून दिवाणजी अगदीं हतबुद्ध झाल्यासारखे होऊन, 'आ'करून आमच्या या बगल्यावकीलसाहेबांच्या चेहऱ्याकडे टकमकां पहातच राहिले. कोठलाहि वकील किंवा मुखत्यार तर राहोच; पण साधारण कायद्याची माहित असलेला मनुष्य अशी

अगदींच असंबद्ध उत्तर देणार नाहीं, अशी कल्पना मनांत आल्यामुळें दिवाणजींनीं वकीलसाहेबांची गणना अगदीं लंबकर्णांत केली !

दिवाणजींच्या चेहऱ्यावरील विलक्षण विकार पाहून वसंतरावांनां तत्काळ कळून चुकलें, कीं, आपलें उत्तर सपशेल चुकीचें असून कांहींतरी घोंटाळा उडाला आहे हें खास ! तेव्हां ते चट्‌कन् ह्मणाले "कायद्याचीं पुस्तकें अन् हायकोर्टाचे ठराव पाहिल्याखेरीज खरें ह्मटलें तर या बाबतींत कांहींच मत देणें इष्ट नाहीं. एका कागदावर मोकद्दम्याच्या मुख्य मुख्य मुद्द्यांचें क्षपा करून आपण मला टांचण करून द्या ह्मणजे मुंबईला गेल्यानंतर बुकेंबिकें पाहून मीं माझें मत आपणाला जरूर कळवीन."

काकासाहेब अत्यंत तिरस्काराच्या व हेटाळणीच्या दृष्टीनें वसंतरावांकडे पहातच राहिले. नंतर ते ह्मणाले "राहूं द्या. आपणाला या बाबतींत मी उगीच कष्ट देऊं इच्छीत नाहीं."

बिचारे वसंतराव लज्जेनें खालीं मान घालून मुकाट्यानें बसून राहिले.

काकासाहेब एका नोकराला हांक मारून ह्मणाले "अरे देऊ, यांच्या स्नानाविनाची व्यवस्था कर पाहूं अगोदर—"

देऊ ह्मणाला "चला रावसाहेब—"

'रावसाहेब' उठले व स्नानाला गेले. जोंपर्यंत वसंतराव बाणथडीला होते, तोंपर्यंत ते काकासाहेबांच्या चौसीमेंत कधींहि गेले नाहींत. त्यांची त्यांनीं अगदींच धास्तीच घेतली !

प्रकरण सातवें.

नवीन मसलत !

मुंबईहून येतांना चंपा व वसंतराव यांची अशी मसलत ठरली होती, कीं, बाणथडीला आल्यानंतर, काय वाटेल तो प्रयत्न करून, वसंतरावांनीं कांहीं तरी निमित्तानें वहिनीसाहेबांची गांठ घ्यावयाची. चंपेनें त्यांनां आश्वासन दिलें होतें "जर ती एकवार आपला चेहरा पाहील तर माझें काम आपोआपच अगदीं सुलभ होणार आहे." चंपेच्या मनाची अशी पक्की खात्री होती, कीं, वसंतरावांनां जी जी ह्मणून स्त्री पाहील, ती ती त्यांचा लाभ होण्यासाठीं अगदीं झुरणीला लागलीच पाहिजे !

परंतु बाणथडीला आल्यानंतर एक दिवस गेला, दोन गेले, तीन गेले, तरी वहिनीसाहेबांशीं प्रत्यक्ष भेट होण्याचा योग वसंतरावांनां एकदांसुद्धां आला नाहीं. चंपा येतांच, अर्थातच, तिचा बायकांमध्यें सहजच प्रवेश झाला आणि बिचारे वसंतराव बाहेरच्या बैठकखान्यांतच रात्रंदिवस डांबून राहिले. जेवणाखाणाला ते फक्त दोनदां आंत जात खरे, पण वाढपरांधपाचा सर्वच भार घटिंगण बल्लवाचार्यांवर असल्यामुळें वसंतरावांनां वाड्यांतील बायकांचें नखसुद्धां दृष्टीला पडत नसे. वस्तुतः वाड्याच्या बाहेरचा व आंतला भाग अगदीं पृथक् असून ते निरनिराळे दोन वाडे होते, असें ह्मटलें तरी चालेल. दोन वाड्यांच्यामध्यें एक चांगली उंच दगडी भिंत होती. आंतल्या वाड्याची गच्ची बाहेरून दिसे खरी; परंतु बाहेरच्या वाड्याकडील तिचा भाग गर्द वेलींनीं अगदीं पूर्ण आच्छादून गेलेला असल्यामुळें, निदान बाहेरच्या माणसाला तरी गच्चीवर कोणी माणूस आहे कीं नाहीं, हें बिलकूल कांहींच कळत नसे. गच्चीवरील माणसांनां मात्र वेलीच्या जाळ्यांतून बाहेरचीं माणसें चांगलीं दिसत असत. बाणथडीला आल्यापासून, वहिनीसाहेब वर गच्चीवर आल्यावर आपण कधीं त्यांच्या दृष्टीला पडलों असूं किंवा नाहीं, याबद्दल वसंतरावांनां अगदीं चिंताच लागून राहिली होती. गच्चीवर आलेल्या माणसाला, बाहेरच्या ज्या ज्या भागांतील माणसें स्पष्टपणें दृष्टीला पडण्याचा संभव होता, तेथेंतेथें संध्याकाळीं कोणत्या ना कोणत्या तरी निमित्तानें फिरण्याचा वसंतरावांनीं उपक्रम सुरू केला होता. आपण बाणथडीला आल्यापासून वहिनीसाहेबांनीं कधीं आपणाला एकदां तरी पाहिलें कीं नाहीं, आणि पाहिलें असलें तरी, आपल्या मदनसुंदर रूपाचा छाप त्यांच्या मनावर कांहींतरी उमटला आहे कीं नाहीं, याविषयीं परस्परविरोधी अनुमानें करीत असतां वसंतरावांची खात्री अगदीं जेरीला आली.

चवथ्या दिवशीं स्नानाच्या पूर्वीं दुय्यम कारभाऱ्यांनां मुद्दाम भेटून वसंतराव ह्मणाले "गोविंदरावजी, इथें आल्यापासून माझी न् माझ्या वहिणीची गांठ नाहीं

मला तिच्याशीं कांहीं बोलायचें आहे. तिची गांठ मला घेतां येईल का ?"

गोविंदराव ह्मणाले " ठीक आहे. वहिनीसाहेबांकडे मी निरोप पाठवतों. त्यांचा हुकूम होतांच, आपण आंत जा ह्मणजे आपल्या वहिणीची आपणाला भेट घेतां येईल."

वसंतराव मनांत ह्मणाले " अरे बापरे ! काय हा द्राविडी प्राणायाम ! निरोप पाठवायचा, त्याचें उत्तर यायचें, मालकिणीनें परवानगी द्यायची अन् मग भावा-वहिणींची गांठ पडायची. भारीच कडक दिसतो आहे कारभार इथला !"

आपलें हें मत त्यांनीं गोविंदरावांच्याहि कानांवर घातलें. गोविंदराव ह्मणाले " आपण ह्मणतां तें खरें आहे. श्रीमंत भाऊसाहेब वारल्यानंतर घरचें पुरुषमाणूस कुणीच राहिलें नाहीं. तेव्हां वहिनीसाहेबांनींच हा सारा बंदोबस्त करून ठेवला आहे. त्यांचा त्यांत कांहीं हेतु असेल !"

गोविंदरावांनीं आंत निरोप पाठविला. हुकूम आला, कीं, ' आज दोनप्रहरीं वसंतरावांनां आपल्या वहिणीची आंत जाऊन भेट घेतां येईल. '

भोजन चाललें असतां वसंतराव दररोज बारीक नजरेनें हळूच इकडेतिकडे पहात; त्याप्रमाणें आजहि त्यांनीं पाहिलें. परंतु वाढपी आणि आचारी या वर्गिंगणांखेरीज त्यांनां कोणीच कोठें दिसलें नाहीं. भोजनोत्तर त्यांनीं आपले सुंदर, कुरळे, काळेभोर केंस, पुनः विंचरून, तेलपोमेटम् लावून साफसूफ केले, मिशांचे बारीक आंकडे मेण लावून वळविले, दोन भ्रुकुटींच्या मध्यें एक बारिकशी गंधाची टिकली ठेवून दिली. नंतर त्यांनीं एक लख्ख परीटघडीचा कडकडीत इस्त्रीचा सुंदर शर्ट अंगांत चढविला व शॅमॉय लेदरनें चष्म्याची सोनेरी फ्रेम लख्ख करून तो नीटनेटका डोळ्यांवर चढविला. धोतर अगदीं चापूनचोपून नेसण्यांत व त्याचे सोगे अगदीं पायाशीं लोळण घेतील अशी व्यवस्था करण्यांत त्यांनीं सुमारें अर्धा तास खर्च केला. हो, आज आपणाला आंत जाण्याची 'सुवर्ण-संधि' प्राप्त व्हावयाची; कदाचित् वहिनीसाहेबांच्या आपण दृष्टीला पडलोंच तर !

ठरलेल्या वेळीं, एका नोकरानें येऊन वसंतरावांनां आंत नेलें. दोनतीन दिवाणखाने ओलांडल्यानंतर ते एका सुसज्जित खोलींत येऊन पोहोंचले. तेथें त्यांनां बसावयाला सांगून तो नोकर तेथून निघून गेला व जातांना ह्मणाला "आपली बहीण इतक्यांत येईल इथें."

वसंतराव तेथें बसून खोलीमधील सुंदर सरंजामाचें सूक्ष्मपणें अवलोकन करूं लागले. वहिनीसाहेबांच्या 'कचेरी'चीच खोली ही. थोड्याच वेळांत चंपा तेथें येऊन पोहोंचली.

ती येतांच सहास्यमुखानें वसंतराव ह्मणाले " कसें काय, चंपाताई ?"

जवळची एक खुर्ची ओढून घेऊन चंपा वसंतरावांसमोर बसली व हंसत ह्मणाली "ठीक आहे हो दादा ! बरं, तुमचं कसं काय आहे ?" असें ह्मणून पुनः ती गालांतल्या गालांत खुदकन् हंसली. पुनः चट्कन् ती उठली, व दरवाज्याबाहेर डोकावून चहूंकडे पाहूं लागली. नाहीं—कोणीहि कोठें नाहीं !

दादा व ताई यांमध्यें अगदीं खालच्या स्वरांत संभाषण सुरू झालें. वसंतरावांनीं विचारलें "काय ग चंपे, तुझ्या वहिनीसाहेब कशा काय आहेत ?"

" कशा काय ह्मणजे ? रूपानं ह्मणतां ? अगदीं 'ओहोहो—प्राण चालला' अशापैकीं नाहींत किंवा 'थुंकी दिखील टाकायला नको' अशापैकींहि नाहींत !"

वसंतराव जरा त्रासून ह्मणाले " नाहीं ग. मीं तुला तिच्या रूपासंबंधानें नाहीं विचारलें—"

" तर मग ?"

" ती स्वभावानें कशी काय आहे ? भोळीभाबडी आहे का हुषार, धीट, चतुर आहे ?"

" नाहीं—भोळीभाबडी बिलकूल नाहीं. अतिशय हुषार, चपळ, धीट, चतुर आहे चांगली. वसंतराव, खेडेगांवच्या मुली ह्मणजे काय एक एक गायह्मैसच, अशी जी आपली कल्पना होती, ती साफ चुकीची आहे बरं. वहिनीसाहेब, हुषारींत शहरच्याच लाख पोरींनाहि त्या हार खायला लावतील."

वसंतराव हंसून ह्मणाले " गाईह्मशींतही हुषार गाईह्मशी असतातच कीं नाहीं ? बरें पण तुझ्याशीं ती कशी काय वागते ?"

" चांगली—फार चांगली वागते. वैभवानं अन् श्रीमंतीनं ती इतकी मोठी ना ! पण जरा तरी गर्व किंवा दिमाख असायचा होता बिचारीला ! अगदीं मातीप्रमाणें भुसभुशीत ! आपण मोठी धनीण अन् मी ह्मणजे तिची नोकर, ही जाणीव दिखील तिला नाहीं.

असं तिच्या माझ्याशीं वागणुकीवरून स्पष्ट दिसतं. या दोनचार दिवसांत आमचं दोघांचं बेशखासं मेतकूट जमलं आहे !"

"ऐकूं दे तरी कसें काय तें ?"

बाणथडीला येऊन, वहिनीसाहेबांची गांठ पडल्यापासून त्या वेळपर्यंत जें जें म्हणून कांहीं घडलें, वहिनीसाहेबांच्या आणि तिच्यामध्यें ज्या कांहीं गोष्टी किंवा संभाषणें झालीं, त्यांचें आद्योपांत सविस्तर वर्णन करून चंपा म्हणाली "खरंच वसंतराव ! या वहिनीसाहेब म्हणजे एक मोठं अजब माणूस आहे. त्यांचा स्वभाव खरोखरीच भारी उमदा-न्-गोड आहे. तसं वाहेरवाहेरून पाहिलं तर त्या चालीरीतीनं आपल्या इतर दहाजणींसारख्याच जुन्या चालीच्या दिसतात. नवीन चालींचा किंवा फॅशनचा गंधदिखील नाहीं दिसत. पण, दादासाहेब, ध्यानांत ठेवा, कीं, या चंपेनं त्यांना हातीं धरलं आहे; त्यांनां हळुहळू 'माणूस' केल्याखेरीज कांहीं मी रहात नाहीं !" असें म्हणून ती हळूच हंसली.

"तें कसें काय ? वहिनीसाहेब जुन्या चालीच्या आहेत म्हणतेस, तें कसें काय ?"

"तसं विशेष कांहीं नाहीं. पण त्यांच्या जागीं जर पुण्यामुंबईकडील एखादी मुलगी असती, तर तिनं कांहीं निराळाच थाट दिला असता उडवून ! इथं येतांच, तावडतोब माझ्या लक्ष्यांत आलं, कीं, इतकी श्रीमंत वैभवशाली इनामदारीण बाई ही, पण बसाउठायला, कपडे करायला, विश्रांति घ्यायला योग्य अशी एकहि खोली साऱ्या वाड्यांत तिच्यासाठीं तयार केलेली नाहीं ! फार काय सांगूं तुम्हाला वसंतराव ! अहो, निजायची दिखील स्वतंत्र अशी खोली तिला नाहीं. आपल्या म्हाताऱ्या सासूबाईबरोबर एका लहानशा खोलींत ती निजते ! आहे का नाहीं ?"

"यांत गैर. तें काय आहे, चंपाताई ?"

"तें कांहीं असो. एवढ्या थोरल्या इनामदारणीला स्वतःकरितां बसाउठायला तरी निदान एक खोली तरी हवी कीं नाहीं ? जितक्या म्हणून आंतल्या वाड्यांत खोल्या आहेत, त्या सर्वांत वाटेल त्यानं यावं जावं ! आवजाव घर तुमारा, त्यांतला कारभार सगळा ! हें कांहीं मला नाहीं बाई पसंत. म्हणून मागच्या बाजूची एक सुंदरशी खोली मीं पसंत केली आहे, ती मीं वहिनीसाहेबांची खासगी बसाउठायची खोली म्हणून शृंगारून लखफक तयार करून घ्यायचं ठरवलं आहे."

वसंतरावांनीं व्यंग्योक्तीनें विचारलें "पण वहिनीसाहेबांनां निरोप पाठवलास का ? त्यांची परवानगी घेतलीस का ? निरोप, परवानग्या न् रसवानग्यांखेरीज या वाड्यांत पान देखील हलायचें नाहीं म्हणे !"

"हो, हो, परवानगी घेतली आहे म्हणजे ? वहिनीसाहेब म्हणाल्या ' ठीक आहे. तुम्ही यादी करून मला द्या—म्हणजे काकांनां सांगून त्या यादीप्रमाणं सर्व जिन्नस मी तुम्हाला मुंबईहून आणवून देतें—मग तुमच्या मनाला येईल त्याप्रमाणं ती खोली सजवा. वहिनीसाहेबांची आज्ञा मिळतांच, मी जरूरीच्या जिन्नसांची यादी तयार करायला लागलें आहें. फॅशनेबल किंवा शोखाची वस्तु अशी या घरांत एकहि नाहीं, हा मोठा चमत्कार नव्हे ? नाहीं म्हणायला एक रामाच्या काळचा जुनापुराणा हार्मोनियम आहे बाई ! त्याचे एकुणएक सूर बेसूर वाजतात !"

"हार्मोनियम वाजवायला तरी येतो का तिला ?"

"हरेराम ! सारीगम दिखील माहिती नाहीं !"

"गायला तरी ?"

"येतं म्हणायचं कसंबसं ! इथं आल्यापासून दररोज मी तिला गाणीं ऐकवतें आहें. काल मी तिच्या अगदीं खनपटीलाच बसलें मुळीं—'वहिनीसाहेब ! आज तुम्हाला एखादं गाणं तरी म्हणून दाखवायलाच हवं !' ती म्हणाली ' अहो, तुमच्यासारखं का मी गायला शिकलें आहें म्हणून मला गातां येईल ? मला काय थोडींबहुत येताहेत तीं जुनीं गाणीं !' त्यावर मी म्हणालें 'वा—म्हणजे जुनीं गाणीं का वाईट ! त्यांत जी मजा आहे ती दुसऱ्या कशांत नाहीं ! "धांवे,' 'गोपी—गाऱ्हाणीं,' 'मुद्रिका,' 'अभिमन्यु' असलीं गोड सुंदर गाणीं दुसरीकडे कुठं ऐकायला तरी मिळतील का ?' असं म्हणून मीं तिला गाणं म्हणायचा खूब आग्रह केला, तेव्हां म्हटलंन् एक शेवटीं ! तुम्हीं त्या वेळीं नव्हतां वसंतराव, तिथं—नाहीं तर खूब मजेदार गाणं ऐकायला सांपडलं असतं तुम्हाला ! दवडलीत झालं जन्माची संधि ! " असें म्हणून, तोंड वेडेंवांकडें करून, माना वेळावून, डोळे मिचकावीत मिचकावीत चंपा गाऊं लागली:—

"तव चरण धरी प्रिया तुझी घन—नीळा !
मम पुरविं मनींचा आळा !
त्या कनकमृगा धरुनी वेगें आणी—
सांगते तुझी तुज राणी !"

हे चरण वेड्यावांकड्या रीतीनें दोनतीनदां घोळविल्यानंतर, तोंडाला पदर लावून चंपा एकसारखी हंसूं लागली. शेवटीं ती ह्मणाली "दादासाहेब, मी हंसतें आहें तीं आपणासमोरच हो! वहिनीसाहेबांच्या समोर मीं हंसूं अगदीं दाबून ठेवलं होतं. वसंतराव, सुदैवानं मी 'ॲक्ट्रेस' होतें ह्मणून बरं झालं. वहिनीसाहेबांचं तें वेडंवांकडं बेसूर गाणं ऐकूनहि, आपण अगदीं खूष होऊन गेलों, असा भाव मीं चेहऱ्यावर आणला होता. माझ्या जागीं दुसरं कुणी असतं, तर त्या वेळीं हंसूं दाबतांदाबतां त्याच्या नाकीं अगदीं नऊ आले असते!" असें ह्मणून चंपा पुनः वेडींवांकडीं तोंडें करून गाऊं लागली—

" त्या कनकमृगा धरुनी वेगें आणी—
सांगते तुझी तुज राणी!"

वसंतराव मृदुपणें हंसत हंसत म्हणाले "सुवर्णमृग धरून आणायला सांगत होती ना ती? ईश्वराचें स्मरण करून मला खरें खरें सांग."

दाराकडे चट्कन् नजर टाकून, पुनः स्वर खालवून, चंपा हंसत हंसत म्हणाली " कल्पना कांहीं नवीन नाहीं वसंतराव! वहिनीसाहेबांच्या तोंडांतून हे शब्द बाहेर पडतांच, पहिल्यानं हीच कल्पना मला आठवली. मनांतल्यामनांत मीं म्हटलं, 'सोन्याचा हरिण तुला पाहिजे आहे ना? तो कांहीं नाहीं—पण 'सुवर्णमालिनी—वसंत' आहे आमच्यापाशीं! तें औषध तुला द्यायलाच तर आह्मी इकडे आलों आहों. हं सुवर्णमालिनी तुला पचलं, तर आमच्या कपाळीं सोनं! नाहीं तर सारीच रांखरांगोळी!"

दोघेंहि खालच्या स्वरांत मनमुराद हंसूं लागलीं. त्याचा भर ओसरल्यावर वसंतरावांनीं विचारलें "बरें, तूं काय गायलीस, चंपे?"

"मीं पहिल्यानं तुमच्या 'प्रार्थना—संगीतां'तलीं एकदोन पदं दिलीं धडकावून. तीं ऐकून बाई भारीच खूष झाल्या. म्हणाल्या 'छान आहेत हो गाणीं तुझीं!' नंतर मी कबीराचं एक वैराग्यपर पद ह्मटलं, तें ऐकून तिला भारीच आनंद झाला. दुसऱ्या दिवशीं वहिनीसाहेबांनीं मला विचारलं 'तुह्माला नाटकाबिटकांतलीं पदं नाहीं वाटतं येत?' मीं म्हटलं 'येतात—तींहि येतात दोनचार!"

वसंतराव हंसतहंसत म्हणाले "दोनचारच ना? अधिक नाहीं ना येत?"

कृत्रिम कोधकटाक्ष फेंकून चंपा ह्मणाली " वसंतराव, माझं नांव असं बद्दू करूं नका—नाहीं तर डिफमेशनची फिर्याद ठोकीन. मी एक जुन्या चालीची धर्मपरायण ब्राह्मण विधवा आहें, हें तुह्माला माहीत आहे ना?"

"वाः तर! संतसखूचा तूं अवतार! बरें पुढें काय?"

"हो, काय बरं सांगत होतें? हं—मींहि झट्कन् नाटकांतलं एक पद केलं सुरू. मुद्दाम, इच्छापूर्वक, खूब रसरशीत शृंगाराचं पद निवडून काढूनच, तें मी ह्मटलं. असं करण्यांत, एकदां गळ तरी टाकून पहावा, असा माझा उद्देश होता. पण अगबाई! तें संगीत पद ऐकतांच वहिनीबाईचा चेहरा अगदीं लालबुंद होऊन गेला. त्या खूब चिडून रागावल्या असाव्या, असं स्पष्ट दिसत होतं. मला त्यांनीं विचारलं 'हीं सगळीं गाणीं तुह्मी शिकलां कुठं?' मीं बावळेपणाचं सोंग घेऊन ह्मटलं 'कां बरं? नाटकं बघून शिकलें मी. आपण तर नाटकांतलं एकादं पद ह्मणायला सांगितलं मला. मी लहानपणीं बाबांबरोबर मधूनमधून नाटकं पहायला जात असें, तेव्हां कानांवर आलेलीं पदं अजून मला येताहेत.' वहिनीसाहेब ह्मणाल्या 'मीतर ऐकत होतें, कीं, मुंबईला पुष्कळ चांगलीं नाटकं होतात ह्मणून. पण आतां तुम्हीं ह्मटलेलं हें जर नाटकांतलं पद असेल, तर माझ्याजवळ असलीं संगीत नाटकी पदं मुळींच म्हणूं नका. इश्श ग बाई! असलीं घाणेरडीं पदं ऐकायला सभ्य गृहस्थांच्या बायका न् मुली नाटकाला जातात का?' मीं म्हटलं 'हो, जातात तर काय झालं! त्यांनां हीं पदं इतकीं नाहीं वाईट वाटत.' त्या म्हणाल्या 'असेल बाई! सगळ्यांच्याच रुचि कुठं सारख्या असतात? तुम्ही आपलं दुसरं एकादं चांगलंसं गाणं म्हणा म्हणजे माझे अपवित्र झालेले कान पवित्र होतील.' मीं 'विनायक' कवीचं 'जोहार' हें गाणं त्यांनां ह्मणून दाखविलं. तें ऐकून त्या अगदीं नागासारख्या डोलूं लागल्या अन् म्हणाल्या 'वः! भारी सुंदर गाणं! मला अशा तऱ्हेचीं गाणीं आवडतात."

वसंतरावांनीं मनगटावरील 'वॉच'कडे एकवार पाहून म्हटलें "तें असो म्हणा! पण जी मसलत करून आपण इथें आलों त्याचं काय झालें? चंपाताई, वहिनीसाहेबांची प्रत्यक्ष भेट, गांठ तर दूरच—पण नुसतें त्यांचें दर्शन देखील आम्हाला झालें नाहीं. कायम चंपे, तिनें मला पाहिलें का कधीं एकाद वेळ तरी गच्चीविचीवरून?"

"छेग बाई !"

"म्हणजे ?"

"म्हणजे काय? तिनं तुम्हाला अद्याप बघितलं नाहीं!"

"गच्चीवर येतच नाहीं वाटतें कधीं ?

"नाहीं. मी आल्यापासून तरी नाहीं."

"काय ? खात्रीनं नाहीं ?"

"अगदीं खात्रीनं नाहीं !"

"अरेरे ! केवढी निराशा केलीस तूं माझी, चंपे ! मी इथें आल्यापासून तर गच्चीवरून स्पष्ट दिसेल अशा ठिकाणीं दररोज इकडून तिकडे येरझारा घालतों आहें सारखा ! मनांत हेतु हा, कीं, कदाचित् तिला घेऊन तूं गच्चीवर येशील अन् मला तिच्या दृष्टीला पाडशील!"

चंपा हंसतहंसत म्हणाली "वः ! वसन्तराव, तुमच्या या काव्यमय आशावर्णनानं, तुम्हीं तर 'मालती-माधवां'तला तो 'सीन'च दृष्टीपुढं उभा केलात माझ्या! मालती वर गच्चीवर आपल्या प्रियकराचं चिंतन करीत, तळहातावर गाल ठेवून उभी आहे अन् जरतारी मंदिल अगर लप्फेबाज फेटा न् लहलह मोत्यांचीं पेंदीं घातलेला माधव खालीं दीर्घ निःश्वास सोडीत उभा आहे. मकरंद त्याला चलायला सारखा आग्रह करतोच आहे. पण तो वेडा कांहीं केल्या ऐकत नाहीं ! अगदीं थेट अस्सा देखावा दिलात उठवून !"

हें ऐकून वसंतरावहि हंसूं लागले. हंसतहंसत ते म्हणाले "माझा जरतारी मंदिलहि नाहीं, किंवा लप्फेबाज फेटा अगर लह मोत्यांचीं पेंदींहि मजपाशीं नाहींत. आहे काय ह्मणून विचारशील, तर आम्हा दोघांचं मधुर-मीलन घडवून आणणारी तूं कामंदकी मात्र आहेस माझ्यापाशीं ! काय वाटेल तें करून, जय माते कामंदकी, एवढा आमचा संगम घडवून आण !"

"अहो, दादासाहेब, मला काय ठाऊक तुम्ही प्रेमानं बेहोष होऊन असे गच्चीच्या टप्प्यांत सारखे वणवण हिंडत रहाल म्हणून ? मला का हें स्वप्न पडलं होतं? बरं—ठीक आहे. आजपासून मी वहिनीसाहेबांनां घेऊन रोज संध्याकाळीं गच्चीवर येत जाईन. पण मला वाटतं, तुम्हाला कांहीं वहिनीसाहेब दिसायच्या नाहींत मुळींसुद्धां खालून. वेलींच्या जाळ्यांतून आपणाकडे वहिनीसाहेबांनीं मधुनमधून पहावं, अशी कांहींतरी व्यवस्था मी हटकून घडवून आणीन. पण खबरदार हं दादासाहेब ! तुम्ही अगदींसुद्धां वर गच्चीकडे नजरहि टाकतां कामा नये. नाहीं तर वहिनीसाहेबांनां वाटायचं, कीं, माणूस कांहीं भला नाहीं—डँबिस आहे ! नाहींतर बायकांच्या गच्चीकडे हा मधुनमधून चोरटी नजर कां टाकतो आहे अशी ?"

"ठीक आहे, नाहीं मी गच्चीकडे पहाणार."

नंतर कांहीं वेळ आपणाशींच विचार करीत चंपा स्तब्ध राहिली होती. कांहीं वेळानें ती ह्मणाली "दुसराहि एक उपाय मला सुचला आहे."

"काय तो ?"

"तुह्मी जेवणासाठीं ह्मणून दररोज आंत दोन वेळां येतांच, त्याप्रमाणंच आणखीहि मधुनमधून कांहीं तरी निमित्तानं यायचं जमलं तर पहा. तसं झालं ह्मणजे कधींना कधीं तरी तुमची नजरानजर होण्याचा योग येईलच, निदान वहिनी तरी तुह्मांला पहातील. जेवणाच्या वेळीं त्या जवळपास असतच नाहींत ह्मणून त्यावेळीं हा योग साधायचा नाहीं. नाहीं तर मी असं करतें—" असें ह्मणून भृकुटि वक्र करून चंपा आपणाशींच विचार करूं लागली.

तिच्या तोंडाकडे पहात वसंतराव बसून राहिले. शेवटीं ती ह्मणाली "उद्यां अगदीं याच वेळेला मला जबरदस्त फिट येणार आहे बरं का दादासाहेब ! तसं झालं ह्मणजे साऱ्यांची धांदल होऊन, कुणी माझ्या डोकीवर, कुणी तोंडावर पाण्याचे हबके मारूं लागतील कोणी मला वारा घालूं लागेल; अशा तऱ्हेनें मला शुद्धीवर आणायचे सर्वजण प्रयत्न करूं लागतील. शेवटीं अर्धवट डोळे उघडून कण्हतकण्हत मी क्षीण स्वरानें ह्मणूं लागेन—'दादा—दादा ! माझा दादा कुठं आहे ? माझ्या दादाची न् माझी शेवटची एकदां भेट करवा.' अर्थात् माझी ही विनंति त्यांनां मान्य करावी लागून तुह्माला मजपाशीं बोलावून आणणं त्यांनां भाग पडेल. पुनः तुह्मी जेव्हां इथून एकदोन दिवसांत जाल त्या वेळीं पुनः आपण माझी भेट घ्यायला आंत यालच. जातांना आपण कुणातरी दासीबिसीला ह्मणा 'अग मी तर आज किंवा उद्यां बाणथडीहून चाललों. माझी बहीण माझ्या मागें इथें एकटी रहाणार. आजवर ती घर सोडून दूर राहिली नाहीं. तेव्हां जातांना तिच्यासंबंधानें दोन शब्द वहिनीसाहेबांनां सांगून जावें असें मनांत आहे. जा त्यांनां विचारून ये.' बहुतकरून त्या वेळीं आपली भेट घ्यायला त्या परवानगी देतील. कदाचित् त्या तुमच्याशीं बोलणार नाहींत. परंतु तुमचा मुख्य हेतु पार पडेल ना ? तुमचं रूप पाहून, तुमचा कंठस्वर ऐकून, तुमचा नाटकी

विनय पाहून, वहिनीसाहेबांचं तुमच्याबद्दल बरंचसं अनुकूल मत होईल यांत संशय नाहीं. एकदां किल्ल्याच्या तटाला खिंडार पडल्यानंतर तो सर करायला कितीसा अवकाश ? मग मी आहें अन् वहिनीसाहेब आहेत. पाहून घेऊं. ”

वसंतराव हंसतहंसत म्हणाले “ चंपे, युक्त्या काढण्यांत तर तूं मोठी पटाईत आहेस—”

“ अन् त्या पार पाडण्यांतहि, दादासाहेब–”

“ ठीक आहे. तूं म्हणतेस तसें करीन. बरें, हे तीन वाजले. आतां मला गेलेंच पाहिजे. नाहीं तर लोक म्हणतील, या बहीणभावंडांच्या हितगुजाच्या गोष्टींनां अंतच नाहीं !”

चंपा उठून म्हणाली “ ठीक आहे. जा तुम्ही–हो, पण एक तुम्हाला सांगायचं राहिलंच बोलण्याच्या नादांत—”

“ काय तें ?”

“ काल रात्रीं अंथरुणावर पडल्यावर माझ्या मनांत कल्पना आली. तुम्ही मुंबईला गेल्यानंतर, तुम्ही आपला एक फक्कडसा फोटोग्राफ मुद्दाम काढवून माझ्याक[डे] पाठवा. दीनदयाळ नाहीं तर व्हॅनॉनकडूनच काढून घ्[या] हं–नाहीं तर काळबादेवीवरचा एखादा भिकार फोट[ो]ग्राफर पकडाल, तर तें नाहीं कामीं यायचं ! वहिनी[]साहेबांसाठीं जी खोली मी शृंगारणार आहें, त्या खोलीं[त] इतर तसबिरींबरोबर तुमचाहि फोटो टांगण्याची म[ी] व्यवस्था करणार आहें. काहीन कांहीं तरी युक्ति[नें] त्यांच्या खोलींत तुमचा फोटो टांगतां आला, तर त्यामु[ळें] माझें काम किती तरी हलकें होणार आहे.”

“ ठीक आहे–देईन पाठवून—”

“ पण अगदीं उत्तम फोटो अं ? नाहीं तर पाठवाल एखादा भिकारडा !”

“ नाहीं ग–अगदीं व्हॅनॉनकडून काढवून पाठवतों. तूं मुळींच काळजी नको करूं. दीनदयाळ देखील मला नाहीं इतका पसंत. ठीक आहे तर–मी येतों आतां. आतां भेट कधीं ?”

“ पाहूं, माझ्या युक्त्या सफल होण्यावर आहे तें.”

चंपेनें एका दासीला हांक मारली. तिच्याबरोबर वसंतराव बाहेर निघून गेले.

प्रकरण आठवें.

वसंतरावांचें पत्र.

यानंतर एक महिना लोटला आहे. एके दिवशीं, संध्याकाळ होऊन गेल्यानंतर, मागील वाड्याच्या एका सुंदर शृंगारलेल्या खोलींत वहिनीसाहेब आणि चंपा बसल्या होत्या.

वहिनीसाहेबांच्या बसण्याउठण्याकरितां, विश्रांतीकरितां चंपेनें ही खोली आपल्या इच्छेप्रमाणें सामानसुमान मुद्दाम मुंबईहून आणवून शृंगारून तयार केली होती. खोलीच्या भिंतींवर सुंदरसुंदर सृष्टीच्या देखाव्यांच्या देशी व विलायती अनेक तसबिरा आणि नाशिक, त्र्यंबक, काशी इत्यादि तीर्थस्थानांतील देवळांचे व देवतांचे फोटोग्राफ टांगलेले होते. त्याच फोटोंमध्यें, सुंदर नक्षीचें काम केलेल्या रुप्याच्या चकचकीत फ्रेममध्यें बसविलेला, मुंबईच्या सुप्रसिद्ध व्हॅनॉन कंपनीनें काढलेला वसन्तरावांचा फोटोहि टांगलेला दिसत होता. वसंतरावांनीं कबूल केल्याप्रमाणें, मुंबईला जातांच, हा फोटो काढवून ताबडतोब आपल्या ‘वहिणी’ला पाठवून दिला होता. तो येतांच, वहिनीसाहेबांच्या खोलींत तो ठेवण्यासाठीं चंपेनें जेव्हां त्यांची अनुमति विचारली, तेव्हां त्यांनीं पहिल्या सपाट्याला तिला नकारच दिला. त्या म्हणाल्या “ माई, (याच नांवानें चंपा वाड्यांत संबोधिली जात होती.) तुमच्या दादाचा हा फोटो तुमच्याच खोलींत असलेला बरा नव्हे ? तिथंच टांगा तो. ” यावर, अत्यंत दुःख झाल्यासारखें दाखवून चंपा म्हणाली “ माझ्या खोलींत टांगण्यांत काय अर्थ वहिनीसाहेब ? सारा दिवस मी असणार आपणाबरोबर या खोलींत. मला आपण जी खोली दिली आहे, तिच्यांत रात्रीं मी निजतें, इतकंच काय तें. दादाचा फोटो रात्रीं अंधारांत का पाहूं मी? इथं तो टांगला, तर सारा दिवस तो माझ्या दृष्टीला तरी पडेल. मला आई नाहीं, बाप नाहीं, कुणी नाहीं ! साऱ्या जगांत दादाशिवाय मला अभागिनीला आतां कोण राहिलं आहे ?” असें म्हणून त्या छद्मवेषधारी नटीनें आपल्या डोळ्यांनां ताबडतोब पाणी आणलें. तिचा गळा अगदीं दाटून आला. तोंडांतून शब्द फुटेना ! बिचाऱ्या वहिनीसाहेब ! अगदींच भोळ्या–

भावड्या ! त्या नटीच्या या कपटनाटकानें त्या पूर्णपणें फसल्या. त्यांनीं चंपेच्या 'दादा'चा फोटो आपल्या खोलींत टांगावयाला तिला अनुमति दिली.

खोलीमध्यें जमिनीवर येथूनतेथून एकच हैदराबादी सुंदर गालिचा पसरला होता.त्यावर मधुनमधून हिरव्या मखमलीनें आच्छादिलेलीं दोनचार झगझगीत पॉलिशचीं कोचें व खुर्च्या ठेवल्या होत्या. मुंबईच्या प्रख्यात 'साउंडी कंपनी'च्या दुकानांतून एक कोरा करकरीत मोठा हारमोनियम आला होता; तो चकचकीत पॉलिश केलेल्या फ्रेमच्या कांचेच्या कपाटांत उभा करून ठेवलेला होता. खोलींत तीनचार मोठमोठे बिलोरी आरसे लावलेलीं सुंदर कपाटें ठिकठिकाणीं ठेवण्यांत आलीं असून एके ठिकाणीं मोहागनी लांकडाचें,पुस्तकांसाठींच तयार केलेलें सुंदर कपाट उभें केलेलें होतें, त्याच्या कांचेच्या दरवाज्यांतून सुंदर सुंदर बाइंडिंगचीं कांहीं कोरीं करकरीत मराठी पुस्तकें दिसत होतीं.पुस्तकांकडे लक्ष्यपूर्वक पाहिलें तर त्यांत बहुतेक कादंबऱ्या आणि नाटकें यांचाच भरणा विशेष दिसत असून, काव्यें, इतिहास, चरित्रें व प्रवासवर्णनात्मक पुस्तकेंहि मधुनमधून डोकावत होतीं. जवळच एका तीनचार खणांच्या झगझगीत,सुंदर रॅकवर निरनिराळ्या सचित्र व साध्या मासिक पुस्तकांचे अंक नीटनेटके ठेवण्यांत आले होते. जवळच्या टेबलावर 'करमणूक,' 'केसरी,' 'वार्तासागर' वगैरे वर्तमानपत्रांच्या पुठ्ठ्यांत अडकावलेल्या फाइलीहि ठेवल्या होत्या. एका खिडकीजवळ कागदपत्रें लिहिण्यासाठीं एक मध्यमाकृति सुंदर मेज असून त्यावर लिहिण्याचें वेंचक सामान व्यवस्थित रीतीनें मांडलें होतें. टेबलाजवळच्या भिंतीला टेंकून निरनिराळ्या आकारांचे व रंगांचे नोटपेपर, लिफाफे, कार्डें वगैरे लेखन-सामग्रीनें भरलेली फॅशनेबल पेटी ठेवलेली होती. समोरासमोरच्या दोन भिंतींना दोन बिलवरी 'झाडें' असून प्रत्येक झाडाच्या चार शाखांमध्यें एकएक मेणबत्ती तेवत होती.त्या मेणबत्त्यांच्या मंद व शांत प्रकाशांत त्या सुसज्जित खोलीची शोभा अतिशयच खुलून दिसत होती. खोलीच्या मध्यभागीं, निळ्या रेशमी झुलीचा एक सुंदर पंखा कडीपाटाला टांगण्यांत आला असून, भिंतीला अडकावलेल्या पितळेच्या चाकांतून,खोलीबाहेर नेलेल्या दोरीनें,बाहेर बसलेला छोकरा अदृश्य रीतीनें तो हलुहळू ओढीत होता. ही खोली वाड्याच्या अगदीं एका टोंकाला असून, तिच्यानंतर लगेच बाग लागत होता. बागेच्या बाजूला असलेल्या खोलीच्या तीनहि खिडक्यांतून बागेची शांत शोभा चांगली दिसत होती. खरोखर आमच्या चंपाजी भारी हुषार आणि 'कलावन्त!' त्यांनीं या खोलीला भारीच रमणीय आणि मनोहर स्वरूप आणलें होतें, यांत शंका नाहीं.

चंपेच्या कलेनें त्या खोलीमध्यें असें विलक्षण परिवर्तन झालें होतें खरें; परंतु वहिनीसाहेबांच्या वेषांत कांहींहि फरक दिसत नव्हता. त्या एक पांढरें शुभ्र मलमलीचें पातळ नेसल्या असून त्यांच्या अंगांत अगदीं साध्या,पण किंमती खणाची चोळी होती. त्यांचे केंस त्यांच्या पाठीवर या वेळीं मोकळेच होते. संध्याकाळीं स्नान करून त्या नुकत्याच आल्या होत्या. वहिनीसाहेब दररोज दोनदां स्नान करीत. चंपाजींचा वेषहि विशेष नव्हता. त्या एक रेशीमकांठी गुलाबी पातळ नेसल्या असून त्यांच्या अंगांत पुऱ्या हातांचा निळ्या रंगाचा पोलका होता. केंसांचा ब्राह्मणी तऱ्हेचा साधाच अंबाडा बांधला असून त्यांत एक लहान खरोखरचें गुलाबाचें फूल खोंचलें होतें. कपाळाला अर्थात्च कुंकुमतिलक नव्हता.

खिडक्यांतून वायूच्या मृदु मंद लहरी झुळुझुळू आंत येत होत्या; त्यांनीं दोघांच्याहि वस्त्रांचे पदर किंचित् हालत होते.

वहिनीसाहेब म्हणाल्या "माई, खालीं जायला कुणाला सांगाना ? यदु अगदीं दमून गेला असेल पंखा ओढतांना—पुरे म्हणावं त्याला."

माई हंसून म्हणाली "पुरे कशाला ? ओढीना का मेला ? फुकट का करतो आहे काम ? महिन्याला छन् छन् मोजून घेतो तेव्हां रोख ? मग मेहनत करायला नको का ?"

"म्हणून काय झालं हो माई ? केव्हांपासून पंखा ओढायला लावला आहे तुम्हीं यदूला ! मेला कमी का जड येणार आहे एवढा थोरला हा पंखा ? ओढून ओढून यदूचे हात दुखून आले असतील. छान कसा बाहेरून येतो आहे हा वारा ! आतां हवा आहे कशाला मुळीं पंखा ? जा माई, बायजेला नाहींतर कुणाला तरी सांगा—म्हणावं यदूला पंखा बंद करायला सांगून ये खालीं."

"पण वहिनीसाहेब—"

"नाहीं—तुम्ही याच सांगून—नाहीं तर मीच उठतें—बसा तुम्ही."

चंपाजींचा नाइलाज झाला. त्यांनां बाहेर जाऊन पंखा बंद करण्याविषयीं यदूला निरोप पाठवावाच लागला.

खाणथडीला आल्यानंतर, दोन दिवसांच्या परिचयानंतर वसंतरावांसमोर चंपेनें वहिनीसाहेबांचें ' मातीसारखें भुसभुशीत माणूस' असें वर्णन केलें होतें. परंतु एक महिन्याच्या अवधींत चंपेला आढळून आलें, कीं, आपलें वर्णन वस्तुस्थितीला धरून नाहीं. वहिनीसाहेबांनां धनवैभवाचा गर्व बिलकूल नसल्यामुळें या एका दृष्टीनें जरी त्यांनां ' मातीसारखें भुसभुशीत माणूस' असें म्हणतां आलें, तरी त्या मातींत खूब चिकटपणा आणि दृढता आहे हें खास ! स्वतः सांगोपांग विचार करून वहिनीसाहेब स्वतःसाठीं जें स्थान एकदां पसंत करून घेत, त्या स्थानावरून नंतर त्यांनां केंसभरहि इकडेतिकडे हलविणें कोणालाहि साध्य नसे ! वहिनी-साहेबांनीं एखाद्याला एखादी आज्ञा केली, तर ती नरम भाषेंतल्या विनंतीप्रमाणें भासे; परंतु तिच्यांत एक प्रकारचा असा कांहीं कडकपणा असे, कीं, ती अमान्य करणें कोणालाहि अगदीं अशक्यच वाटावें !

शुद्ध पक्षांतील दशमीची रात्र. आपल्या विमल चंद्रिकेनें चंद्रमा पृथ्वीला नाहूं घालीत होता. पूर्वेकडील खिडक्यांतून खोलीमध्यें छान चांदणें पडलें होतें.

स्निग्ध दृष्टीनें बाहेर पाहून वहिनीसाहेब ह्मणाल्या " माई, आजची रात्र भारीच सुंदर, नाहीं हो ?"

" हें काय विचारावं, वहिनीसाहेब ?"

" तर मग एखादं सुंदरसं गाणं म्हणा गडे !"

" कसलं बरं म्हणूं ?"

" तुमच्या मनाला येईल तें. पण संगीत नाटकां-तलं नको बाई ! तुमच्या ' विनायका'चं, नाहीं तर 'केशवसुता'चं चंद्रासंबंधीं एखादं नाहीं का सुंदरसं गाणं? मला त्यांचीं गाणीं भारीच आवडतात बाई !"

आठवल्यासारखें करून चंपा म्हणाली " त्यांचं दोघांचंहि कांहीं चांदण्याचं गाणं मला येत नाहीं बाई !"

"मग दुसरं एखादं तसंच ह्मणा. तुह्माला कितीतरी येताहेत."

"बरं, पहातें आठवून एखादं." असें ह्मणून चंपा हार्मोनियमजवळ गेली. कपाटाचीं दारें उघडून ती झाडांकडे पाहून ह्मणाली "या मेणवत्त्या टाकूं का माल-वून साऱ्या? या मेल्यांचा प्रकाश चंद्रप्रकाशाची जणूं हेटाळणीच करतो आहे!"

"हं, मालवा !"

चंपेनें भराभरा साऱ्या मेणवत्त्या मालवून टाकल्या. तत्क्षणीं भुईवर पडलेलें चांदणें जणूं काय आनंदानें अधि-कच हंसूं लागलें ! हार्मोनियमजवळ बसून, त्याच्या सुराशीं आपल्या सुराचा एकजीव करून चंपा गाऊं लागली—

"विकर विकर निज हास्य सुधाकर ! सुरम्य अवनीवरी,
हास्यें दिग्वलयातें भरीं !
हरपुनि गेलें होतें कोठें हृदययुग्म अजवरी !
भेटती हृदयें तीं अजि परी !
महासागरीं घोर तिमिरिं वा भयाण, ज्या दुरिदुरी,
होत्या भटकत दुःखोदरीं—
सुवर्णनौका आल्या दोन्ही बघ त्या तीरावरी !
चंद्रा ! हांस हांस लौकरी !
मीलन बघण्या सुंदर कुतुकें ये वायुहि भिरिभिरी !
फुलेंही धांवति नानापरी !
विकर विकर निज हास्य सुधाकर ! सुरम्य अवनीवरी,
हास्यें दिग्वलयातें भरीं ! "

गाणें पुरें होतांच, चंपेनें वहिनीसाहेबांकडे पाहिलें, तों त्या डाव्या तळहातावर गाल टेंकून खिडकीजवळच्या कोंचावर बसल्या असून शून्यदृष्टीनें बाहेर पहात आहेत, असें तिला आढळून आलें. खुर्चीवरून उठून, वहिनीसाहेबांजवळ जाऊन चंपेनें विचारलें " कसला इतका विचार चालला आहे ? "

चमकल्यासारख्या होऊन वहिनीसाहेब म्हणाल्या " माझ्या मनांत या वेळीं अशा कल्पना येत आहेत, कीं, हें गाणं गाऊन अगर ऐकून आपणांला खरोखर कांहीं लाभ आहे का ? आमची ' सुवर्ण-नौका ' कांहीं कधींकाळींदिखील तीराला लागायची आशा नाहीं—तुमचीहि नाहीं अन् माझीहि नाहीं ! "

चंपेनें एक मोठा उसासा सोडला, व ती म्हणाली " कोण जाणे बाई ! " तिच्या या उत्तरानें वहिनी-साहेबांनां अत्यंत आश्चर्य वाटलें.

त्या म्हणाल्या " म्हणजे ? याचा अर्थ तरी काय, माई ? "

चंपा कांहींहि न बोलतां खालीं मान घालून स्तब्ध उभी राहिली. तिच्या या चमत्कारिक वर्तनाचा वहिनी-साहेबांनां कांहींच उलगडा होईना ! त्यांनीं विचारलें " माई, काय झालं ?"

चंपेनें पुनः एक मोठा थोरला उसासा टाकला, व ती म्हणाली " वहिनीसाहेब, मी अगदीं हतभागी आहें. " चंपेचा गळा अगदीं दाटून आला होता. तिनें डोळ्यांवरून पदकन् हात फिरविला.

तिच्याकडे पाहून वहिनीसाहेबांनां तिचा अगदीं कळवळा आला. तिचा हात आपल्या हातीं घेऊन स्नेहार्द्र स्वरानें त्यांनीं विचारलें "माई, हें काय बरं हें असं? काय झालं तें तरी सांगा नीट!"

ती नाटकी नटी कांहींच बोलेना! वहिनीसाहेब तिला कारण सांगण्याचा एकसारखा आग्रह करूं लागल्या. त्या ह्मणाल्या "माई, मुंबईहून आज तुम्हाला पत्र आल्यापासून तुमची अगदीं चमत्कारिक स्थिति झाली आहे, असं मला दिसतं आहे. सांगा मला, सांगा अगोदर—तुमचे दादा तर सुखरूप आहेत ना?"

"हो आहे."

"मग तुह्मी अशा कां बरं? माई, तुमच्या मनाला आज असं वाईट कां वाटतं आहे, याचं कारण मला सांगायला तुह्माला खरोखरच जर कांहीं हरकत वाटत असेल, तर तें ऐकण्याची माझी मुळींच इच्छा नाहीं; पण तुमचं दुःख जर असंच कांहीं असेल, कीं, त्याचा प्रतिकार करण्याचं सामर्थ्य मला असेल, तर त्याचा मी जरूर प्रतिकार करीन."

चंपा खालीं पहात ह्मणाली "दादाचं पत्र आल्यापासून मी मोठ्या संकटांत पडलें आहें."

"कसलं संकट? मला तें सांगण्यासारखं आहे का? कांहीं हरकत असेल तर नका सांगू."

"हरकत कसली? उलट, आपल्या कानांवर ती गोष्ट घालून, आपला सल्ला काय पडतो तो पहाण्याविषयींच दादानं पत्रांत मला लिहिलं आहे. पत्र आणून आपणाला वाचूनच दाखवतें." असें ह्मणून चंपा आपल्या खोलींत गेली, व लगेच पत्र घेऊन परत आली. नंतर जवळची मेणबत्ती पेटवून, तिनें तें पत्र वहिनीसाहेबांच्या हातीं दिलें.

पत्र हातीं घेऊन, तें वाचावें कीं नाहीं, याबद्दल विचार करीत वहिनीसाहेब कांहीं वेळ तशाच बसून राहिल्या. नंतर लिफाफ्यांतून तें बाहेर काढून, तें त्या वाचूं लागल्या. पत्र असें होतें:—

"मुंबई, ता०—

अनेक आशीर्वाद विशेष—

तुझें पत्र कालच मिळालें. तुझी प्रकृति बरी असून तूं चांगली आनंदांत आहेस, वहिनीसाहेब तुला अगदीं सख्ख्या बहिणीप्रमाणें प्रेमादरानें वागवतात, तुला कसलें दुःख तिळमात्रहि होऊं नये ह्मणून भारी जपतात, हें वाचून मला अतिशय आनंद झाला. आनंद कां बरें होणार नाहीं? तुझ्या वहिनीसाहेब मनुष्य नाहींत; प्रत्यक्ष स्वर्गांतील देवी आहेत! चंपुताई, खरोखरच तुझें मोठें भाग्य, कीं, वहिनीसाहेबांसारख्या उदार हृदयाच्या, सुशिक्षित, सर्वगुणसंपन्न अशा स्त्रीचा तुला आश्रय मिळाला. तुझ्याबद्दल त्यांनां इतकें प्रेम वाटतें, तुझ्याबद्दल त्या अतोनात काळजी घेतात, या त्यांच्या उदार कृतीसंबंधानें मला त्यांच्याबद्दल किती कृतज्ञता वाटत आहे, ती मला पत्रांत लिहितां येणें शक्य नाहीं. मला तर वारंवार असें वाटतें, कीं, पूर्वजन्मीं वहिनीसाहेब माझ्या कोणीतरी निकटच्या आप्तसंबंधी असाव्या!

वऱ्हाडांत जावयाचें अजूनहि मला नक्की करतां येत नाहीं. अजून तिकडचा माझा कांहींच जम बसत नाहीं. शिवाय, हल्लीं तिकडे उन्हाळा भारीच भयंकर असतो ह्मणतात. पावसाळ्यांत तिकडे जाण्याचें कांहीं तरी जमेल, असें वाटत आहे. पाहूं कसें काय जमतें तें.

या साऱ्या भाकड गोष्टींविषयीं मी अधिक लिहीत नाहीं. जो उद्देश मनांत धरून आज तुला हें पत्र लिहावयाला मी बसलों आहें, त्याचसंबंधानें आतां लिहितों.

चंपुताई, अगदीं लहानपणापासून तुझ्यावर माझें किती गाढ प्रेम आहे, याची तुला माहिती किंवा जाणीव पूर्णपणें आहेच. आपण बालपणांतच मातृसुखाला आंचवलों—केवळ सात वर्षांच्या वयांतच तुझी आई तुला नाहींशी झाली. आई नसल्यामुळें, तुझ्या मनाला भारी कष्ट होतील, असें जाणून, लहानपणापासूनच तुझ्या मनाला बरें वाटावें, तुझें योग्य मनोरंजन व्हावें, याबद्दल मी अतिशय काळजी घेत आलों असून त्यासंबंधानें माझे सतत प्रयत्न आजतागायत चालू आहेत. आपले बाबाहि जेव्हां गेले, तेव्हां त्यांनीं तुला माझ्या पदरीं टाकून स्वर्गाचा रस्ता धरला. अभागी चंपूताई, केवढ्या आशा हृदयाशीं धरून आह्मीं चांगल्या वराशीं तुझें लग्न करून दिलें; पण आमच्या दुर्दैवानें, त्या साऱ्या व्यर्थ होऊन, तीन वर्षे जातात न जातात तों तुझ्यावर वैधव्याचा दारुण वज्राघात झाला. ताई, तूं वैधव्याच्या वेषानें पहिल्यानें जेव्हां माझ्या घरांत पाऊल टाकलेंस, त्या वेळीं माझ्या हृदयांत जो आगीचा डोंब उसळला, तो अजूनहि शांत झाला नसून प्रतिक्षणाला त्याच्या भयंकर ज्वालांमध्यें मी एकसारखा होरपळत आहें. मी अद्यापि लग्नाच्या भानगडींत पडलों नाहीं, त्याचें एक मुख्य कारण तुझ्यासंबंधाचें

हा तीव्र शोकच होय. ताई, तुझा वैधव्याच्या दुःखानें पांडरा फटफटीत झालेला चेहरा जेव्हांजेव्हां माझ्या दृष्टीला पडतो, तेव्हांतेव्हां संसारसुखांत पडण्याची माझी इच्छा पार जळून जाते ! माझ्या प्रेमाचें एकच स्थान जी माझी बहीण, ती अशी वैधव्याच्या भयंकर आगींत रात्रंदिवस जळत असतां, मी विवाह करून संसारसुख भोगावें, ही कल्पना तरी मला कशी सहन होईल ?

हाय ! किती कोंवळें तुझें वय ! एवढ्या तरुण वयांत वैधव्याचें वज्र तुजवर पडून तुला पुनः विवाह करून संसारसुख उपभोगितां येऊं नये, असला रानटी, जुलमी, पक्षपाती अन्याय आमच्या या हतभाग्य हिंदुस्तान देशाशिवाय दुसऱ्या कोणत्याहि देशांत आढळून यावयाचा नाहीं. ताई, हा सामाजिक महदन्याय केवळ जुलमी रूढीचा आहे. आपल्या उदार पूर्वजांची या अन्यायाला तिळमात्रहि संमति नाहीं. आपल्या दूरदृष्टि, उदात्त, उदार हृदयाच्या धर्मप्रणेत्यांनीं विधवापुनर्विवाहाला स्पष्ट स्पष्ट संमति दिली आहे, हें विष्णुशास्त्री पंडित, न्यायमूर्ति रानडे, डॉक्टर भांडारकर, गोपाळराव आगरकर, पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर वगैरे थोरथोर विद्वानांनीं अगदीं निःसंशय प्रमाणें देऊन सिद्ध केलें आहे. पुनर्विवाह हा केवळ लोकाचार अगर रूढि यांच्याच काय तो विरुद्ध आहे. विधवेनें जर पुनः विवाह केला, तर तिच्या धर्माची यत्किंचितहि हानि होत नाहीं, हें अगदीं निर्विवाद आहे. दुष्ट लोकाचार अगर रूढि यांचें उल्लंघन करण्यांत कसलेंहि पाप नाहीं. ह्मणून ताई, माझा तुला अगदीं आग्रह आहे, कीं, तूं जरूर पुनर्विवाह करून संसारसुखाचा निर्दोष उपभोग घे. पहिल्या पहिल्यानें एखादा पुनर्विवाह होतांच, समाजांत मोठी खळबळ उडून जात असे, पुनरूढ दांपत्याला अतिशय निंदाप्रवाद आणि छळ सोसावा लागत असे. आतां त्यांपैकीं कांहींसुद्धां उरलें नाहीं. आतां पुष्कळ मोठमोठे लोक-वैभव, संपत्ति, मानमरातब, विद्या-कला यांमध्यें जे उच्च दर्जाचे आहेत ते समाजाच्या शीर्षस्थानीं असलेले लोकहि खुशालखुशाल पुनर्विवाह करीत आहेत, किंवा आपल्या विधवा कन्यादिकांचीं लग्नें करून देत आहेत. समाजाचा त्यांनां कांहींसुद्धां बागुलबोवा वाटत नाहीं, आणि तो बागुलबोवा त्यांचा आतां कांहींसुद्धां वाकडें करूं शकत नाहीं. चंपुताई, आपण तरी या बागुलबोवाला उगीच कां भ्यावें ? या सामाजिक महदन्यायाला आपणहि पायांखालीं तुडवूंया !

ही गोष्ट मीं तुझ्याजवळ यापूर्वी दोनचार वेळ काढली होती; परंतु, पुनर्विवाह केल्यानें आपण धर्माला मुकूं, या भयानें ती तूं मनावर घेतली नाहींस; परंतु पुनर्विवाहानें बिलकूल कसलीच धर्महानि होत नाहीं, हें मी तुला पुनः लिहितों. माझेंच हें मत आहे असें नाहीं; तर समाजाला सर्वतोपरी वंद्य असलेल्या मोठमोठ्या विद्वानांचेंहि असेंच मत आहे. आजच्या डाकेनें तुला मीं दोन पुस्तकें पाठविलीं आहेत. तीं तूं लक्ष्यपूर्वक वाच, ह्मणजे, विधवाविवाहाला हिंदुधर्माची संपूर्णपणें अनुकूलता आहे, अशी तुझ्या मनाची पुरी खात्री होईल. या पुस्तकांतील सर्वच मजकूर तुला पुरा समजेल असें नाहीं. जेथेंजेथें तुला समजणार नाहीं, तेथेंतेथें तूं वहिनीसाहेबांनां विचार. त्या चांगल्या सुशिक्षित, बुद्धिमान् आणि बहुश्रुत आहेत. त्या तुला सर्व अडचणी नीट समजावून देतील, अशी माझी खात्री आहे.

आमच्या शेजारचे वासुदेवराव देशमुख पुष्कळ दिवसांपासून तुझ्याशीं पुनर्विवाह करून तुला आपल्या श्रीमंत संसाराची अधिष्ठात्री देवता करावयाला तयार आहेत, ही गोष्ट तुला ठाऊक नाहीं असें नाहीं. वासुदेवरावांसारखा थोर मनाचा, उदार मतांचा, सच्चरित्र, सत्कुलचा, श्रीमंत, तरुण, सुंदर, सुविद्य पुरुष शोधूनहि सांपडणें कठीण आहे, हें मीं तुला सांगावयाला पाहिजे असें नाहीं. ताई, माझी तर अशी अत्यंत उत्कट इच्छा आहे, कीं, या वासुदेवरावांशीं तुझा विवाह करून देऊन तुला पूर्ण संसारसुखांत असलेली पहावी. वासुदेवरावांनीं अशी प्रतिज्ञाच केली आहे, कीं, जर चंपुताई आपली अर्धांगी होईल, तरच आपण विवाह करूं, नाहीं तर सर्व जन्म तसाच भणंग फकीर होऊन काढूं !

ताई, विचार कर-विचार कर. सारें वीस वर्षांचें तुझें कोवळें वय. सर्व आयुष्याचें विशाल मैदान तुझ्या समोर मोकळें पसरलेलें आहे. खोट्या, भ्रान्त, बावळ्या, समाजाला घट्ट उराशीं धरून आपल्या साऱ्या आयुष्याचा अगदीं नाश करून टाकणें हें मूर्ख मनुष्याशिवाय कोण करील ? अशा रीतीनें आयुष्याचा नाश करणें हें मूर्ख समाजाच्या मंद दृष्टीला काय वाटेल तें दिसो, परंतु दयामय, प्रेममय परमेश्वराच्या दृष्टीनें हें महत्पाप आहे, यांत तिळप्राय संशय नाहीं. शुष्क अशा पृथ्वी-

देशाला सुख आणि शोभा देण्याकरितां, फुलें, फळें, धान्यें देण्याकरितां ज्यानें नदनदी वगैरे पाण्याचीं प्रचंड साधनें निर्माण केलीं, यथाकालीं आकाशांतून विपुल पर्जन्य पडावा अशी ज्यानें योजना केली, तोच दया-प्रेम-मय परमेश्वर, मनुष्यानें आपल्या सुंदर जीवन-भूमीचें जर आपण होऊन ओसाड रेताड मैदान बनविलें, तर त्याला कधीं तरी क्षमा करील काय? त्याला तो पूर्ण पापी नाहीं का समजणार?

चंपुताई, प्रिय भगिनि, माझी एवढी विनंति मान्य कर. विवाह करून घ्यायला संमति देच. तुझ्या शुष्क झालेल्या तरुण हृदयांत पुनः सुखाचे कल्लोल उसळतांना पाहून मला आपल्या आयुष्याचें सार्थक झालें, असें वाटूं दे. पुनर्विवाहांत कांहीं दोष नाहीं, कांहीं पाप नाहीं. माझ्या सांगण्यावर जर तुझा विश्वास बसत नसेल, तर प्रत्यक्ष तूं वहिनीसाहेबांनांच विचार. त्यांचा तुझ्यावर इतका लोभ जडला आहे, त्यांचें तुझ्यावर इतकें प्रेम आहे, तर त्या तरी, आपल्या आयुष्याचें वैराण मैदान स्वेच्छेनें करून घ्यावयाला तुला सल्ला कशा देतील? मीं आज पाठविलेलीं दोन्ही पुस्तकें लक्ष्यपूर्वक वाचल्यानंतर, या कार्यांत तिळमात्र कांहीं पाप नाहीं, असेंच त्यांचेंहि मत होईल, असा माझा दृढ विश्वास आहे. वहिनीसाहेब उदार हृदयाच्या, बुद्धिमान् आणि सुशिक्षित आहेत; तेव्हां, विवाह करून सुखी होण्याचीच त्या तुला सल्ला देतील, अशी माझी पूर्ण खात्री आहे.

माझी प्रकृति बरी आहे. वहिनीसाहेबांनां विचारून त्यांचें मत या बाबतींत काय आहे, तें मला शक्य तितक्या लवकर कळव. तुझ्या पत्राची मी अगदीं आतुरतेनें वाट पहात आहें.

हे आशीर्वाद.

तुला केवळ प्राण मानणारा

तुझा दादा."

वहिनीसाहेब हें पत्र वाचीत असतां, चंपा त्यांच्या चेहऱ्याकडे मधुनमधून अगदीं लक्ष्यपूर्वक पहात होती; परंतु, त्यांच्या चेहऱ्यावर क्रमाक्रमानें, अप्रसन्नतेची छाया घनदाट होत चालली आहे, असेंच तिला आढळून आलें.

पत्र वाचून पुरें झालें, त्यावेळीं वहिनीसाहेबांच्या भुंवया अगदीं वक्र झाल्या असून त्यांच्या डोळ्यांतून तिरस्कार व तुच्छता या भावनांच्या ज्वाला वेगानें बाहेर पडत आहेत, असें चंपेला वाटलें.

कंपित हृदयानें व कांपणाऱ्या हातानें चंपेनें तीं दोन पुस्तकें वहिनीसाहेबांजवळ ठेवलीं, व ती ह्मणाली "हीं दोन पुस्तकं दादाकडून आज आलीं—"

वहिनीसाहेबांनीं तिरस्कारानें तें पत्र जवळच्या मेजावर फेकून दिलें. नंतर त्या पुस्तकांकडे तीव्र दृष्टीनें पाहून त्यांनीं विचारलें "हीं पुस्तकं?"

"हो."

कांहीं न बोलतां, वहिनीसाहेबांनीं तीं पुस्तकें हातांत घेतलीं, व जवळच्या खिडकींतून तीं दूर बागेंत भिरकावून दिलीं, आणि उठून त्या झट्कन् दरवाज्याकडे निघाल्या.

चंपेनें भयभीत होऊन विचारलें "कुठं जातां?"

वहिनीसाहेब तीव्र स्वरानें ह्मणाल्या "देवघराकडे. देवाच्या तीर्थानं हात धुवायला जातें. माझे हात अगदीं अपवित्र झाले आहेत."

चंपेकडे दृष्टिक्षेपहि न करतां वहिनीसाहेब तेथून वेगानें निघून गेल्या.

प्रकरण नववें.

पहांटेचें स्वप्न.

रात्रीं, फराळ वगैरे होऊन झोंपण्यासाठीं अंथरुणावर पडल्यानंतर वहिनीसाहेब संध्याकाळच्या घटनेसंबंधानें आपणाशींच विचार करूं लागल्या.

त्यांची ही झोंपावयाची खोली, त्यांच्यासाठीं चंपेनें नवीनच तयार केलेल्या पूर्वोल्लेखित खोलीच्या शेजारींच होती. खोलींत दोन बाजूंला दोन नेवारीचे साधे पलंग होते. एकावर वहिनीसाहेब पडल्या असून दुसऱ्यावर त्यांची वृद्ध सासू-आईसाहेब पडल्या होत्या. समोरच्या तीनहि मोठाल्या खिडक्या सताड उघड्या असून त्यांतून वायूच्या मंद लहरी व अस्पष्ट असा क्षीण चन्द्रप्रकाश आंत येत होता.

दहा वाजावयाच्या सुमाराला वहिनीसाहेब आणि आईसाहेब झोंपण्याकरितां या खोलींत आल्या होत्या. आतां नुकतेच अकरा वाजून गेले होते. आईसाहेबांनां

मधांच झोंप लागली असून मधुनमधून त्या किंचित् घोरूंहि लागल्या होत्या; परंतु वहिनीसाहेबांनां कांहीं केल्या झोंपच लागेना ! वसन्तरावांच्या पत्राबद्दल त्यांच्या मनांत फारसे विचार येत नव्हते. त्यांच्या मनाला विशेष टोंचीत होतें तें त्यांचें संध्याकाळचें वर्तन! अरेरे ! बिचाऱ्या माईशीं आज आपण किती निष्ठुरपणानें, रानटीपणानें वागलों ! बिचारीच्या मनाला त्यामुळें अतिशय यातना होत असतील !

वहिनीसाहेब प्रकृतीनें अगदीं शांत. त्या कधीं रागानें बेफाम व्हावयाच्या नाहींत; पण आज रागानें त्या अगदीं बेफाम होऊन गेल्या.आत्मसंयमन आपण पूर्णपणें विसरून गेलों, आपल्या मनावरचा आपला ताबा आज नाहींसा झाला, हें पाहून वहिनीसाहेबांनां अतिशय लाज वाटूं लागली. आपलाच त्यांनां अतिशय राग आला.त्यांचें मन क्षुब्ध होऊन त्यांनांच खाऊं लागलें. आत्मसंयमनाची आपणाला आजच एकाएकीं अशी विस्मृति कां पडावी, याचें त्या निरभिमानतेनें कारण शोधूं लागल्या,व थोड्याच वेळांत तें त्यांनां सांपडलेंहि. 'चंपूताईच्या दादानें आपल्या पत्रांत जें गृहीत धरलें आहे, कीं, आपणहि त्याच्याच मताचें समर्थन करूं, पुनर्विवाहाच्या तिरस्करणीय मताला आपण अंतःकरणपूर्वक संमति देऊं.' त्यामुळें आपण एकाएकीं इतक्या रागावून बेफाम झालों. आपल्या मनावरचा ताबा पार उडाला ! या क्षणिक उत्तेजनामुळें आपण ही साधी गोष्ट पार विसरून गेलों, कीं, जगांतील साऱ्याच माणसांचीं मतें, शिक्षण, पूर्वसंस्कार, ध्येयें, आदर्श, इच्छा, आकांक्षा हीं एकच प्रकारचीं कधींहि असूं शकणार नाहींत. तसें असतें तर पृथ्वीवर भिन्नता अगर वैचित्र्य हीं कधींच दिसलीं नसतीं.मतभिन्नतेला आणि आदर्शवैचित्र्याला जगांत हवी तेवढी जागा आहे.माझ्या मताशीं दुसऱ्याचें मत जुळत नाहीं–त्याचें माझें ध्येय एक नाहीं-आदर्श एक नाहीं, ह्मणून रागानें बेफाम होऊन आपल्या मनावरचाहि मीं ताबा घालवावा–आणि त्याच्या मस्तकांत मुसळ घालावयाला जावें, हा कोणता न्याय ? हें आपल्या माणुसकीला तरी शोभण्यासारखें आहे का ? छीः ! मोठ्या दिलगिरीची–शरमेची गोष्ट !

वहिनीसाहेबांचें विचारभ्रमण चालू असतां,आपल्या मनाची अशी स्थिति होण्याचें आणखीहि एक अधिक गंभीर आणि सूक्ष्मतर कारण त्यांनां सांपडलें;तें हें:–आज कित्येक दिवसांपासून चंपाताईवरची त्यांची श्रद्धा हळूहळू अगदीं उडत चालली होती. याला चंपाताईची कोणती अमुक एक कृति कारण झाली होती असें नाहीं. क्रमाक्रमानें, थोडथोडें, अगदीं तिळतिळ प्रमाणानें वहिनीसाहेबांच्या असें लक्ष्यांत येऊं लागलें होतें, कीं,चंपाताईच्या अंतःकरणांत, तिच्या मृतपतीबद्दल भावभक्ति यत्किंचित्सुद्धां वसत नाहीं. तिच्या ठिकाणीं खऱ्या पतिनिष्ठेचा बराच अभाव आहे.वहिनीसाहेबांच्या माहितीप्रमाणें, चंपाताई चौदा वर्षांची असतां तिचा विवाह झाला. नंतर पतिसमवेत सासरीं तीन वर्षें राहिल्यानंतर तिच्यावर वैधव्य कोसळलें होतें. अशा वयांत, ज्या स्त्रीला पतीच्या समागमाचा लाभ तीन वर्षें झाला, तिच्यामध्यें साध्वी–पतिव्रता–हिंदुस्त्रीच्या हृदयांतर्भागीं वसणारी ती दिव्य ज्योति दिसूं नये, ह्मणजे महदाश्चर्य नव्हे काय ? खाण्यापिण्यांत, वस्त्रप्रावरणांत, आचरणांत चंपाताई बाह्य पावित्र्याचा आणि निष्ठेचा अभिनय कितीहि करो–परंतु तिच्या अंतर्भागीं त्या अस्सल वस्तूचा पूर्ण अभाव आहे, ही गोष्ट वहिनीसाहेबांच्या लक्ष्यांत केव्हांच येऊन चुकली होती ! अशा स्थितींत, चंपाताईचा 'दादा' तिचा पुनर्विवाह करण्याविषयीं तिला अतिशय आग्रह करीत आहे, आणि तीहि त्याच बाजूला किंचित् झुकत आहे, असें जेव्हां वहिनीसाहेबांनां कळून आलें, तेव्हां त्यांनां आत्मसंयमन करतां आलें नाहीं. मनावरचा ताबा सुटून क्रोधानें त्या अनिवार भडकल्या !

शेजारच्या खोलींतील मोठ्या घड्याळांत अर्ध्या तासाचा ठोका पडला–साडे अकरा ! सर्व पृथ्वी शांत–निद्रासुखाचा अनुभव घेत पडली होती. चंपाताईच्या गोष्टींवरून हळुहळू वहिनीसाहेब स्वतःचें पर्यालोचन करूं लागल्या. मनांतल्या मनांत आपल्याशीं चंपाताईची तुलना करण्यांत त्या निमग्न झाल्या. पहिल्यानें सून ह्मणून जेव्हां वहिनीसाहेबांनीं या घरांत पाऊल टाकलें, त्यावेळीं त्यांचें वय सातआठ वर्षांचें असून त्यांचे पतिराज चौदा वर्षांचे होते. त्या आठ दिवसच काय त्या सासरीं राहिल्या.परंतु त्या एका आठवड्यांत पतीच्या चेहऱ्याकडे नीट लक्ष्यपूर्वक निरखून पहाण्याचा सुयोग त्यांनां एकदांहि आला नाहीं. पतीचें ओझरतें दर्शन घडलें तरी लज्जेमुळें त्याच्या चेहऱ्याकडे पहाणें त्यांनां शक्यच नव्हतें. बाकी, त्यांचे पतिराज कांहीं कसे नव्हते. तितक्या थोड्या अवकाशांतहि त्यांनीं

आपल्या बायकोची गांठ एकदां चोरून एकीकडे घेत-लेच. त्यावेळीं त्यांच्या पतीनें त्यांच्याशीं जें चोरटें 'संभाषण' केलें, त्यांतलीं दोनचार वाक्यें, त्यांनां अजूनहि चांगलीं आठवत होतीं. परंतु त्याच्या चेहऱ्याची आठवण अगदींच अस्पष्ट होऊन गेली होती–बहुतेक संपूर्णपणें ती बुझाली होती, असें ह्मटलें तरी चालेल. पहिल्या खेपेनंतर वहिनी माहेरीं गेल्यानंतर दोनच महिन्यांनीं, आपला पति परागंदा झाल्याची बातमी त्यांच्या कानांवर आली. तेव्हांपासून क्रमानें जसजसें त्यांचें वय वाढूं लागलें आणि जसजसें त्यांचें ज्ञानहि अधिकाधिक वृद्धिंगत होऊं लागलें, तसतसें त्यांचें सारें लक्ष्य नाहींसा झालेल्या आपल्या पतीकडेच लागून राहिलें. वहिनीसाहेब एकसारख्या आपल्या परागंदा पतीचा चेहरा आठवून त्याची रूपरेषा मनासमोर आणण्याचा प्रयत्न करीत. जोंपर्यंत त्यांनां आशा होती, कीं, कदाचित् आपले पति अजूनहि जीवंत असतील, कदाचित् अजूनहि ते एखाद्या दिवशीं घरीं परत येतील, तोंपर्यंत वहिनीसाहेब आपल्या पतिराजांचें पृथ्वीवरील मनुष्यरूपानेंच चिंतन करीत असत. या खोलींत आपले पति निजत असत, या जागीं बसून ते भोजन करीत, ही त्यांच्या अभ्यासाची खोली होती, या ठिकाणीं त्यांचीं आवडतीं कबुतरें होतीं, या बागेंत एक दिवस आपल्या कुत्र्याबरोबर ते शर्यत लावून धांवत होते, नदींत पोहून डुंबून बागेंतील या रस्त्यानें ते वाड्याकडे येत असत, असेच विचार नेहमीं वहिनीसाहेबांच्या मनांत खेळत; परंतु हळुहळू वर्षामागून वर्ष उलटून जाऊं लागलें, तरीहि जेव्हां त्यांच्या पतीचा कोठेंच कांहीं पत्ता लागेना, सर्वजण त्याच्या शोधासंबंधानें अगदीं निराश होऊन गेले, प्रत्यक्ष त्याचे आईबापहि ह्मणूं लागले, कीं, "नाहीं, आमचा बाळ या जगांत खास नाहीं–असता तर इतक्या वर्षांत एखाद्या दिवशीं तरी त्याचा थांगसुगावा नसता का लागला?"–तेव्हांपासून, आपल्या पतीची पृथ्वीवरील मनुष्य या रूपानें कल्पना करण्याचें वहिनीसाहेबांनीं अजिबात सोडून दिलें. आपल्या मानसचक्षूंनीं या खोलींत, या बागेंत त्याला आतां त्या पाहीनाशा झाल्या; परंतु स्वर्गांत–जेथें देवता आणि देहान्तानंतर पुण्यवान् आत्मे जाऊन वास करतात, ज्या अमरपुरीचें रामायण–महाभारतादि पवित्र ग्रंथांत इतकें सुंदर वर्णन आहे, तेथें–त्या पुरींत, आपले पतिराज विराजमान झाले आहेत, असेंच वहिनीसाहेबांनां तेव्हांपासून दिसूं लागलें! त्यांच्या मस्तकावर दिव्य तेजोमय मुकुट असून, त्यांच्या सर्वांगांतून, परम पवित्र, स्निग्ध अशा उज्ज्वल प्रकाशरेखा चहूंकडे फांकत आहेत; सकाळीं उठून आपले पति मंदाकिनीच्या पवित्र प्रवाहांत स्नान करून, नंदनवनांतील फुलें तोडून आणून वैकुंठाला जातात व तेथें श्रीलक्ष्मीनारायणांचें पादवंदन करून, त्यांचें भक्तिभावानें पूजन करतात, अशीं चलचित्रें वहिनीसाहेबांच्या मानसपटावर दिसूं लागत. त्या मनोहर अमरपुरींत आपले पति आपली वाट पहात राहिले आहेत; योग्य वेळीं या पृथ्वीवरून आपणाला तिकडे जावयाला परवानगी मिळेल; प्रस्तुतच्या दीर्घ विरहाची समाप्ति होईल, त्या वेळीं, आपले पति आपल्या विपुल पुण्यसंचयाच्या जोरावर आपणाला तिकडे घेऊन जातील, आणि तेथें दोघांचें अक्षय्य पुनर्मीलन होईल, असें त्यांनां नेहमीं वाटे.

आपल्या पतीविषयीं वहिनीसाहेबांच्या मनांत असे विचार घोळत असतां त्या अगदीं तन्मय होऊन गेल्या, आणि चंपाताई वगैरेंच्या गोष्टी त्यांच्या मनांतून अजीबात नाहींशा झाल्या. त्यांच्या हृदयांत यावेळीं अगदीं अवर्णनीय अशी निर्मल शांति तुडुंब भरून राहिली. याच स्थितींत हळुहळू वहिनीसाहेबांनां तंद्रा आली. थोड्याच वेळांत शेजारच्या खोलींतील घड्याळांत ठण्-ठण् असे दोन ठोके पडले, त्यांच्या आवाजानें त्या एकदम धसक्यानें जाग्या झाल्या, आणि त्यांनीं झट्-कन् डोळे उघडले. खिडकींतून त्या बाहेर पाहूं लागल्या, तों दशमीचा चंद्र नदीपलीकडील वनरेखेला येऊन अगदीं भिडला आहे, असें त्यांनां आढळून आलें. पुनः त्यांनीं डोळे मिटले. मधुर फुलांच्या सुवासानें भरलेला वायु बागेंतून येऊन त्यांनां हळुहळू वारा घालूं लागला. कांहीं क्षणांनीं वहिनीसाहेबांनां शांत, गाढ झोंप लागली.

सकाळीं झोंपेंतून जाग्या होऊन वहिनीसाहेब पहातात, तों दररोजच्यापेक्षां उठावयाला आपणाला किती तरी उशीर झाला आहे, असें त्यांनां आढळून आलें. सूर्य बराच वर आला होता.

हें पाहून, झट्कन् त्या पलंगावरून खालीं उतरल्या, व प्रातर्विधि आटोपून नदीवर स्नानाकरितां जावयाच्या तयारीला लागल्या. इतक्यांत बायजा तेथें आली. तिला त्यांनीं विचारलें "कायग, आईसाहेब कुठं आहेत ?"

"त्या केव्हांच गेल्या नदीवर आंघोळीला."

" मला कां नाहीं उठवलंस बरं, बायजे ? आज एकादशी. आज सूर्योदयापूर्वीच स्नान व्हायला हवं होतं !"

"मी उठवीत होतें–पण आईसाहेबच नको म्हणाल्या 'निजली आहे बिचारी–निजूं दे.' "

" आईसाहेबांबरोबर कोण गेलं आहे ग ?"

" काकूबाई न् माई. "

माई ऊर्फ चंपाताईचें नांव कानांवर पडतांच, वहिनीसाहेबांच्या मनाला अप्रसन्नता वाटूं लागली, आणि ती त्यांच्या चेहऱ्यावरहि दिसूं लागली. त्यांच्या मनांत असाहि विचार आला, कीं, दररोज चंपाताई आपणाबरोबर स्नानाला येते. आज आपण तिच्या संगतींतून आयत्याच सुटलों, हें फार बरें झालें.

इतक्यांत, याच वेळीं, वस्त्रें हातांत घेऊन यमुना बाहेरच्या ग्यालरींतून चालली होती, तिच्याकडे वहिनीसाहेबांचें लक्ष्य गेलें, आणि त्यांनीं हांक मारली " यमुताई—"

दरवाज्याजवळ येऊन यमुना किंचित् संकोचानें म्हणाली " काय वहिनीसाहेब ?"

" आंघोळीला का चालली आहेस नदीवर ? "

" हो—"

" चल तर मीहि येतें तुझ्याबरोबर. "

नदींतून वहात येऊन वाड्याच्या घाटांला लागल्या दिवसापासून आजपर्यंत वहिनीसाहेबांबरोबर नदीवर स्नानाला एकत्र जाण्याचा सुयोग यमुनेला एकदांहि प्राप्त झाला नव्हता. तिला आपला खरा परिचय करून द्यावयाची इच्छा नाहीं, असें पाहून वहिनीसाहेब आपण होऊन तिच्याशीं फारसा बोलत नसत. कदाचित् यमुनेला त्यामुळें फार संकोच वाटेल, आणि वाड्यांत रहाणेंहि जड होईल, असें त्यांनां वाटे. यमुनेच्या दुःखामुळें वहिनीसाहेबांनां अगदीं मनापासून दुःख वाटे, आणि तें तिचें दुःख दूर करण्याचें कांहींच साधन आपल्या हातीं नाहीं, या विचारानें तर तें त्यांचें दुःख द्विगुणित होई. शिवाय, उलटपक्षीं, वहिनीसाहेब यमुताईशीं अत्यंत सदयतेनें आणि सहानुभूतीनें, प्रेमानें वागत असतांहि, यमुना होताहोईल तों आपणच त्यांच्यापासून दूरदूर रहात असे. वाड्यांत यमुनेच्या पाउलांची चाहूल किंवा तोंडचा शब्द फारसा कधीं ऐकूं येत नसे. जणूं काय एखादा मोठा अपराध तिच्या हातून झाला आहे, अशा रीतीनें ती सदोदित मिऊन मिऊन, अगदीं संकोचवृत्तीनें वागत असे.

वहिनीसाहेबांनीं आपण होऊन यमुताईबरोबर नदीवर जाण्याची गोष्ट काढल्यामुळें तिला अतिशय कृतार्थता वाटूं लागली. तिनें त्यांनां विचारलें "आपल्या बरोबर येऊं मी ?"

वहिनीसाहेबांनीं किंचित् हंसून यमुताईकडे वक्र दृष्टीनें पाहिलें. त्याबरोबर चट्कन् खालीं मान घालून किंचित् हंसून ती म्हणाली "तुमच्याबरोबर येऊं मी?"

वहिनीसाहेबांनीं यमुनेला आपणाला ' आपण ' या भारी थोर संबोधनानें न संबोधितां ' तूं ' असेंच संबोधण्याबद्दल वारंवार बजावलें असतांहि तिची मजल ' तुम्ही'च्या पलीकडे कधींच गेली नाहीं. तरीहि मधून-मधून तिच्या तोंडीं ' आपण ' ' आपल्या ' हे शब्द विस्मरणानें घुसतच असत !

वहिनीसाहेब म्हणाल्या " होय, तुझ्याबरोबर येतें मी. चल, आपण दोघीजणी बरोबरच जाऊं. " असें म्हणून त्यांनीं खिडकींतून बाहेर बागेंत पाहिलें, तों आईसाहेब, चंपाताई, व काकूबाई (या एक भाऊसाहेबांच्या दूरच्या नातेवाईक असून त्या कांहीं दिवस पाहुण्या म्हणून वाड्यांत रहावयाला आल्या होत्या.) अशा तिघीजणी स्नान करून परत येत आहेत, असें त्यांच्या दृष्टीला पडलें.

दोघीहि खालीं येऊन बागेंत शिरल्या. इतक्यांत त्या तिघींची व या दोघींची भेट झाली. चंपा किंचित् हंसून म्हणाली " आपल्याला उठायला आज भारीच उशीर झाला, वहिनीसाहेब !"

" हो–जरा झाला खरा. पहांटेस पुनः डोळा लागला, त्यामुळं वेळेवर जागीच नाहीं झालें. "

" आपणाला उठायला उशीर होणार, असें समजून मी आईसाहेबांबरोबरच गेलें नदीवर. "

" ठीक केलंत. " असें म्हणून वहिनीसाहेब चंपेकडे पाहून हंसल्या–मुद्दाम चेहऱ्यावर प्रसन्नतेची भावना दाखविण्याचा प्रयत्न करून हंसल्या. ' तुमच्याबद्दल माझ्या मनांत काल रात्रीं जो तिरस्कार उत्पन्न झाला होता, तो आतां पूर्णपणें गेला. तुमच्याबद्दल माझें मन आतां अगदीं साफ झालें आहे,' असेंच आपल्या त्या प्रसन्न हास्यानें चंपाताईला समजाविण्याचा वहिनीसाहेबांचा उद्देश होता. काल उमीचच्या उमीन

या निरपराध स्त्रीला आपण दुखविलें, या विचारानें अजूनहि त्यांच्या मनाला पश्चात्ताप होत होता.

त्या दोघींचीं नेसावयाचीं लुगडीं वगैरे घेऊन बायजा घांटावर बसून राहिली, व या दोघीजणी स्नान करण्याकरितां नदीच्या पाण्यांत उतरल्या. सकाळचें ऊन पडून नदीची पाणसपाटी झगझग झगझग करीत होती. दूर कांहीं अंतरावर तरीची होडी चाललेली दिसत असून वल्हीं मारीत तींतले दोघे नावाडी 'तूं चांदनी, मी चांद सई' हें लावणीचें कडवें उंच सुरानें गात होते, तें येथपर्यंत स्पष्ट ऐकूं येत होतें. मनःप्रसन्नतेमुळें असो अगर दुसऱ्या कांहीं कारणामुळें असो, आज वहिनीसाहेब बराच वेळ स्नान करीत होत्या.

आज वहिनीसाहेब पुष्कळच बोलत होत्या. यमुना वाड्यांत आल्यापासून त्या आजपर्यंत तिच्याशीं इतकें कधींच बोलल्या नव्हत्या. एकाएकीं मध्येंच त्यांनीं विचारलें "यमुताई, तुला पोंहायला येतं का ग ?"

यमुना किंचित् हंसून ह्मणाली "मला पोहायला येतं ना, तर आ—तुमचे पाय मला कधीं तरी लाभले असते का ?"

"ह्मणजे ? तूं पोहतपोहत का या घाटाला येऊन लागलीस ?"

"हो—"

"कुणीं शिकवलं पोह्यायला तुला ?"

"बाबांनीं—लहानपणीं."

इतक्यांत वहिनीसाहेबांच्या झट्दिशीं लक्ष्यांत आलें, कीं, यमुनेपाशीं ही गोष्ट आपण काढली, हें बरें झालें नाहीं. ही गोष्ट आणि यमुनेचें दुःखपूर्ण हृदय, यांमध्यें अगदींच थोडें अंतर आहे, असें त्यांच्या आतां लक्ष्यांत आलें. भाषणाचा प्रवाह फिरविण्यासाठीं त्यांनीं यमुनेला कांहीं तरी प्रश्न केला "यमुताई, तुला रात्रीं कधीं स्वप्नं पडतात का ग ?"

"हो, पडतात तर काय झालं !"

"अगदीं दररोज पडतात का ?"

"तसा कांहीं अगदीं नेमच नाहीं," यमुना हंसून ह्मणाली. "पण मधुनमधून पडतात आपलीं कधीं तरी !"

"हो, तें बरोबरच आहे." वहिनीसाहेब ह्मणाल्या, "पण काय ग यमुताई, तुला पडलेलीं स्वप्नं कधीं खरीं झालीं आहेत काय ग ?"

"पहांटेच्या वेळीं पडलेलीं स्वप्नं खरीं होतात, असं ह्मणतात बाई !" यमुना हंसून ह्मणाली.

"लोकांचं नकोस सांगूं—तुझं एखादं स्वप्न कधीं खरं झालं आहे का ?"

"हो, झालं आहे एकदां."

"अस्सं ? तें कसं काय, सांग पाहूं."

"मी एकवार माहेरीं असतां पहांटेपहांटे मला स्वप्न पडलं, कीं, डांकेच्या शिपायानं येऊन माझ्या हातीं पत्र दिलं—त्याप्रमाणं, दुसऱ्या दिवशीं खरंच मला एक पत्र आलं—"

"कुणाचं ग ?"

क्षणभर स्तब्ध राहून खालीं पहात यमुताई ह्मणाली "तिकडचं—पहाटेचीं स्वप्नं खरीं होतात, वहिनीसाहेब !"

"हूं—" असा खेदोद्गार काढून वहिनीसाहेब पलीकडच्या तीरावरील वृक्षराजींकडे पहात स्तब्ध राहिल्या.

यमुनेनें विचारलें "तुम्हाला पडतात कधीं स्वप्नं?"

यमुनेकडे तोंड फिरवून वहिनीसाहेब उत्तरल्या "पडतात कधींकधीं. आज पहांटेला पडलं एक स्वप्न मला."

"तर मग तें खरं होणार अगदीं."

एक मोठा उसासा टाकून वहिनीसाहेब ह्मणाल्या "होईल खरं ! पण त्याला फार—वेळ लागणार यमुताई ! तुझं स्वप्न जसं ताबडतोब खरं झालं, तसं माझं होणार नाहीं—बराच वेळ लागेल."

"काय बरं पडलं स्वप्न तुह्मांला ?"

"सांगेन—आतां नाहीं सांगत. आज दुपारीं सांगेन तुला. पण यमुताई, माझा सारा वृत्तान्त तूं ऐकला आहेस का ?"

यमुनेनें हृदयव्यथा सुचविणारा एक मोठा उसासा टाकला व खिन्न स्वरानें ती ह्मणाली "ऐकला आहे. वहिनीसाहेब, देवानं तुह्मांला इतके गुण दिले, इतकी तीव्र बुद्धि दिली, राजासारखं इतकं मोठं वैभव दिलं, पण त्याबरोबरच इतकं भयंकर दुःखहि त्यानं तुह्मांला कां द्यावं, याचं समाधानकारक उत्तर मला सांपडत नाहीं. देवानं मला दुर्दैवी केलं, माझ्या कपाळीं इतकं दुःख लिहिलं, त्यांत तसाच कांहीं तरी त्याचा हेतु आहे. त्यांत देवाचा कांहीं अन्याय झाला, असं निदान मी तरी ह्मणणार नाहीं—पण वहिनीसाहेब, तुमचं हें दुःख—"

वहिनीसाहेब मध्येंच ह्मणाल्या "नाहीं यमुताई—त्यानं मलाहि इतकं दुःख देण्यांत कांहींदिखील अन्याय

केला नाहीं. यमुताई, देव दयाळु आहे, त्याप्रमाणंच अगदीं न्यायी आहे, हा मोठा चमत्कार नव्हे का? अन्यायानं तो कधीं कुणाला व्यर्थ दुःखयातना देईल, हें कधींतरी संभवनीय आहे का? आपणाला जेव्हां दुःख प्राप्त होतं, तेव्हां परमेश्वर अगदीं न्यायाच्या कांट्यानं तोलूनच तें आपल्या पदरीं घालतो, हें माणसानं नेहमीं ध्यानांत ठेवावं. आतां पुष्कळ वेळां, परमेश्वराच्या मनांतील न्यायी हेतु आपणाला कळत नाहीं अगर आपण समजूनहि त्याकडे डोळेझांक करून उगीच 'अन्याय-अन्याय' म्हणून ओरडतों, ही गोष्ट निराळी! यमुताई, परमेश्वर अन्यायानं कधींहि कुणाला दुःख देत नाहीं, हें जितकं खरं आहे, तितकंच हेंहि खरं आहे, कीं, त्या दुःखकष्टांचं शेवटीं फळहि त्याला चांगलंच मिळतं."

वहिनीसाहेबांचें तें अमृतोपम भाषण ऐकून यमुताईचें हृदय अगदीं भरून आलें. त्या देवतेच्या तेजःपुंज मुखमंडलाकडे ती स्थित दृष्टीनें पहातच राहिली. हें पाहून खिन्नतेनें किंचित् हंसून वहिनी म्हणाल्या "काय यमुताई, विचार कसला करते आहेस?"

"मी हाच विचार करतें आहें, कीं, तुमच्याप्रमाणं मलाहि जर परमेश्वरावर इतक्या दृढतेनं विश्वास ठेवतां आला असता, तर माझ्या मनाला इतक्या यातना भोगाव्या लागल्या ना. मलाहि आपल्याप्रमाणं अपूर्व शांतिसमाधान प्राप्त झालं असतं!"

कांहीं न बोलतां करुणादृष्टीनें वहिनीसाहेब अभागी यमुनेकडे पहात राहिल्या. कांहीं विचारावें, तर यमुनेच्या हृदयाची स्थिति यावेळीं अगदीं विलक्षण होऊन गेली होती. एका प्रश्नाच्या आघातानेंच तिच्या हृदयाचा पार चुरा होऊन गेला असता! त्या हतभागिनीचें दुःख हलकें करण्याचें कांहींहि साधन आपल्या हातीं नाहीं, या विचारानेंहि त्या थोर स्त्रीचें मन या वेळीं अत्यंत व्याकुल होऊन गेलें होतें!

प्रकरण दहावें.

निर्जळी एकादशी!

तें कांहीं विचारूं नका—आज दोन प्रहरपासून आमच्या चंपाताईचें जें कांहीं माथें धरलें होतें, तें कांहीं विलक्षणच! एकादशीच्या दिवशीं, चंपूताईचें कपाळ भयंकर दुखावयाचें, ही गोष्ट अगदीं ठरल्यासारखीच झाली होती! वहिनीसाहेबांनां हेंच कारण सांगून, त्यांच्यापासून 'सुटी' घेऊन, चंपा आपल्या खोलींत येऊन पडली होती. खोलीच्या खिडक्या घट्ट बंद करून, त्या अंधारांत तीनचार घंटे स्वस्थपणें पडल्यावर तिचें कपाळ बरेंच उतरत असे. बाणथडीला आल्यापासून प्रत्येक एकादशीला बिचाऱ्या चंपाताईची अशी शोचनीय स्थिति होत असे; आणि असें झालें तर त्यांत आश्चर्य काय आहे? एकादशीच्या दिवसापासून, माणसांच्या शरीरांतील रस वृद्धिंगत होऊं लागतात, आणि त्यामुळें वातरोग्यांचा वातहि वाढतो, असा आपल्या पूर्वजांनींच शोध लावला आहेना? त्याच शोधाला अनुसरून, प्रतिएकादशीला आमच्या चंपूताईच्या शरीरांतील रसांची वृद्धि होऊन, त्यांचें डोकें अतिशय दुखूं लागे!

वहिनीसाहेब व आईसाहेब या दोघीहि एकादशी अगदीं निर्जळी करीत, आणि त्यामुळें वाड्यांतील सर्वच बायकांनां लाजेकाजेनें तरी तसें करावें लागे, एवढी एकच गोष्ट येथें सांगणें अवश्य वाटतें.

वहिनीसाहेबांची परवानगी घेऊन चंपा आपल्या खोलींत आली, व तिनें दरवाजा बंद करून आंतून कडी लावून घेतली. नंतर खोलीच्या सर्व खिडक्या बंद करून तिनें खोलींत काळोख गुडूप केला, आणि ती आपल्या खाटेवर येऊन पडली.

चंपेला स्वस्थ पडूनहि रहावेना. बिछान्यावर पडून इकडूनतिकडे, तिकडूनइकडे, अशी तिची सारखी चळवळ चळवळ चालली होती. डोकें भयंकर दुखत असतां, कधीं कोणाला शांतपणें पडून रहावेल काय? त्याला गाढ झोंप लागेल?

याप्रमाणें बिछान्यावर चंपा तळमळ तळमळ करीत असतां, सुमारें एक तास गेला असेल. एक वाजून गेला. अजून वाड्यांतील सर्व लोकांचीं—नोकरचाकरांचीं जेवणें अगर फराळ झाले नव्हते. अजूनहि बाहेरच्या ग्यालरींतून आणि व्हरांड्यांतून लोक जात येत असून त्यांच्या पावलांच्या दणदणाटानें बिचाऱ्या चंपेचें डोकें मात्र अधिक भडकत होतें!

हळुहळू बाहेरची गडबड कमीकमी होत आली. आणखीहि अर्धाएक तास गेला. नाहीं—आतां कोणाच्या पावलांची चाहूलहि नाहीं ऐकूं येत. सर्वांची पोटभरती होऊन ते विश्रांति घ्यावयाला गेले असावे !

ऐका ! काय बरें हें ? चंपेच्या खोलींत, गुडूप अंधारांत हा शब्द कसला बरें ऐकूं येतो आहे ? कोणी तरी, अगदीं सावधपणानें, अगदीं हळुहळू, पायांच्या आंगठ्यांवर चालत आहे, असें नाहीं तुम्हाला वाटत ? अं:! दुसरें कोण असणार आहे ? असेल एखादी वाऱ्यांत सोकावलेली, गलेलठ्ठ मनीमावशी ! चंपा तर बिछान्यावर तळमळत पडली आहे !

कट्—कट्—कटांग !—अं ? हा कसला चमत्कारिक शब्द ? ट्रंक उघडल्याप्रमाणें शब्द वाटतो आहे बुवा हा! छे, एखादे उंदीरमामा कांहीं तरी कुरतडीत असतील झालें !

नाहीं—खण्कन् भांड्याचें झांकणहि वाजलें. कोणीं डबाबिबा उघडला ? पुन: डबा घट्ट लावल्याप्रमाणें आवाज झाला. ऐका—पहा—तिकडे पुन: 'चकांव् चकांव्' असा अस्पष्ट शब्द होऊं लागला. कोणी लाडूबिडू खातें आहे खास खोलींत ! अगदीं थेट तस्सा आवाज होतो आहे, असें नाहीं तुम्हाला वाटत ? अशा भरदुपारीं, अंधार असलेल्या या खोलींत डबा उघडून लाडू चापणारा हा प्राणी आहे तरी कोण ? चंपेशिवाय खोलींत दुसरें कोणीहि नाहीं. दुसरें हेंहि आपण पक्कें लक्ष्यांत ठेवा, कीं, आज एकादशी असून चंपाताई जुन्या चालीच्या, आचारनिष्ठ ब्राह्मणविधवा आहेत. मुंबईमध्यें नळाचें पाणीदेखील त्या मोठ्या कष्टानें पीत असत. वहिनीसाहेबांप्रमाणेंच एकादशीचें उपोषण त्या अगदीं कडकडीत करीत ! अगदीं पाणीदेखील तोंडांत घालावयाचें नाहीं—अगदीं निर्जळी एकादशी त्यांची ! तर मग हा लाडू चापण्याचा आवाज असणेंच मुळीं शक्य नाहीं. तर मग मनीमावशीबाईंनीं उंदीर धरला असून त्याच्यावर त्या एकादशी भागवीत आहेत, असें वाटतें.

आणखी हें काय दुसरें ? घागरींतून कोणी पाणी ओतल्याप्रमाणें नाहीं तुम्हाला वाटत ? अगदीं हुबेहूब थेट तस्सा आवाज—धक्—धक्—धक् ! या वेळीं अंधारांत घागरींतून पाणी ओतून कोण पिणार आहे? मनुताई उंदीर मटकावून झोंपीं गेल्या वाटतें ? आकंठ तृप्त होऊन पूर्ण संतोष झाला, असें सुचविणारा हा त्यांच्या घोरण्याचा आवाज आहे !

नाहीं अं ! तशी भलतीच कांहीं शंका देखील मनांत आणूं नका. चंपाताईसारख्या निष्ठावान् ब्राह्मण विधवे-संबंधानें अशी शंका घेतलीत, तर देव तुम्हाला पाप लावल्याखेरीज कधीं सोडणार नाहीं. आम्ही पुन: ठासून सांगतों, कीं, चंपाताईंची वहिनीसाहेबांप्रमाणेंच अगदीं निर्जळी एकादशी असते. लाडू आणि थालीपिठें यांनीं तास भरून, आज त्यांच्या खोलींत कोणीं आणून ठेवलें नव्हतें !

काय म्हणतां ? दररोज चंपाताईंनां लाडू, कडबोळीं वगैरेचें फराळाचें जें मिळे, त्यांतून थोडथोडें निराळें ठेवून, त्यांनीं एकादशीसाठीं दूरदृष्टीनें हें पोटाचें भांडवल जमवलें ? हो—कदाचित्—नाहीं, पण तुम्ही म्हणतां हें आम्हाला संभवनीय नाहीं बुवा वाटत !

चंपाताईंच्या खाटेवर कोणी बसल्याचा आवाज झाला पुन: ! अरेरे, बिचारीच्या डोक्यानें अजून तिला सोडलें नाहीं बरें का ? म्हणून इकडून तिकडे, तिकडून इकडे तिची सारखी तळमळ चालली आहे. एकादशीच्या रसवातवृद्धीची माथेदुखी का अशी थोडक्यांत थांबणार आहे ?

चारांचे ठोके पडल्यानंतर बऱ्याच वेळानें चंपा जागी झाली, व उठून तिनें खोलीच्या खिडक्या उघडल्या. नंतर दरवाजा उघडून डोळे चोळीत चोळीत ती बाहेर आली, तों बायजाच तिला समोर दिसली.

"वहिनीसाहेब कुठं आहेत ग ?"

"बागेंत—"

"कुठंशा आहेत ?"

"आंब्याच्या मोठ्या झाडाखालीं गालिचा पसरून सावलींत पडल्या आहेत. कायसं ऐकताहेत—"

"अन् वाचतं आहे कोण ?"

"यमुताई."

"आणखी आहे का कुणी तिथं ?"

"नाहीं. आणखी नाहीं कुणी. गालिचा पसरून द्यायला मीच गेलें होतें. पहिल्यानं कांहीं वेळ मी जवळ उभी होतें. वहिनीसाहेब मला म्हणाल्या 'बाय, तूं जा. जरूर लागली तर तुला हांक मारीन.' "

"किती वेळ झाला जाऊन त्यांनां ?"

"झाल्या असतील दोनतीन घटका."

"इतका वेळ झाला का ?"

"हो–तीन सवातीन वाजतां गेल्या असतील वहिनी-साहेब तिकडे. माई, तुमचं डोकं कसं आहे ?"

डोकें चोळीत माई ह्मणाल्या "बरंच बरं आहे आतां. पण मघाशीं काय ठणकत होतं ग बाई ! नुसते घणाचे घाव बसत होते सारखे !"

"उपास नसेल सोसत ! नाहीं सहन होत एखा-द्याला !" असें ह्मणून बायजा तेथून निघून गेली.

चंपेनें पुनः आंत येऊन खोलीचा दरवाजा बंद करून घेतला व लिहिण्याचें सामान घेऊन, आपल्या 'बंधुराजां'नां पत्र लिहावयाला त्यांनीं सुरवात केली.

प्रकरण अकरावें.

आनंदीआनंद !

वाड्याच्या मागच्या बागेंत एका थोरल्या आम्र-वृक्षाच्या छायेंत वहिनीसाहेब आणि यमुना बसल्या होत्या. बायजा तेथून नुकतीच निघून गेली होती.

यमुना ह्मणाली " वहिनीसाहेब, दुपारीं सांगणार होतां ना ?"

" काय ग ?"

" काल पहांटे तुह्माला पडलेलं स्वप्न. कसलं असलं स्वप्न आज पडलं तुह्माला ?"

वहिनीसाहेब गालिच्यावर, उशीवर कोंपर व हाता-वर मस्तक, अशा स्थितींत अर्धवट पडल्या होत्या. त्यांनीं उत्तर दिलें "ऐकणारच तूं ? मला तिकडच्या-बद्दलच स्वप्न पडलं."

" काय तें ?"

वहिनीसाहेब उठून बसल्या, व त्यांनीं मागची उशी आपल्या पोटाशीं घेतली. नंतर त्या सांगूं लागल्या "यमुताई, कांहीं कारणावरून माझं मन काल रात्रीं अतिशय खराब होऊन गेलं होतं. दहा वाजायच्या सुमाराला मी न् आईसाहेब नित्याप्रमाणं आपल्या खोलींत निजायाला गेलों न् आपापल्या जागीं जाऊन पडलों. थोड्याच वेळांत पहातें तर आईसाहेबांनां गाढ झोंपहि लागली; परंतु मला मात्र कांहीं केल्या झोंपच येईना. पडल्यापडल्या माझ्या मनांत विचारांनीं नुसता कल्लोळ करून सोडला. पुष्कळ पुष्कळ गोष्टी माझ्या मनांत आल्या न् गेल्या. हळुहळू माझं मन तिकडच्याबद्दल विचार करूं लागलं. पुष्कळ वेळपर्यंत तिकडच्याबद्दलच मी सारखा विचार करीत होतें. तिकडचा विचार चालला असतां माझ्या मनाला, खरो-खर सांगतें, कांहीं विलक्षण शांति वाटूं लागली. अशा स्थितींत हळुहळू बारा– एक–दोनहि वाजून गेले."

" अग्गबाई ! इतकावेळ आपण जाग्या होतां ?"

" होय, यमुताई ! तिकडच्याबद्दल विचार करीत असतां मला मुळीं झोंपच येईना. बऱ्याच वेळानं मला झोंप लागली. गाढ झोंप नाहीं–पण तंद्रा आली. त्या तंद्रेंत मीं एक बाई, भारीच विलक्षण स्वप्न पाहिलं."

" काय तें ?"

" मी एक पिवळं वस्त्र नेसलें होतें. माझ्या हातीं हिरव्या बांगड्या–लगनचुडा होता. गळ्यांत सरी, नाकांत नथ असून नुकतीच नहाल्यामुळं माझे ओलसर केंस माझ्या खांद्यांवरून लोळत होते. साऱ्या अंगाला–विशेषतः तोंडाला हळद लागली होती. डोकीला मोत्यांच्या न् फुलांच्या न् धान्यांच्या मुंडावळ्या बांधल्या होत्या. सारांश, लग्नाच्या वेळीं ज्या वेषांत मी होतें, त्याच वेषांत कालच्या स्वप्नांतहि होतें—"

" लग्नाच्या–अगबाई ! काय करीत होतां तुह्मी ?"

" आमच्या–ह्मणजे बाबांच्या घरच्या देवघरांत मी गौरीहर पूजीत बसलें होतें. माझ्याभोंवतीं कितीतरी लहानमोठ्या तरुण मुलीमैत्रिणींचा मेळा मला घेरून बसला होता. कितीतरी आनंदानं त्या साऱ्याजणी माझी गोड थट्टा करीत होत्या. नाकांतली नथ सांवरीत मीहि चिडल्यासारखं करून मधुनमधून त्यांनां तसंच कांहींतरी उत्तर देत होतें. इतक्यांत संध्याकाळ झाली. बाहेर मांडवांतलीं अन् आंत घरांतलीं सारीं चिराख-दानं लागून चहूंकडे कसं लख्ख झालं. आनंदानं सारं घरदार गजबजून गेलं–काय तो आनंद ! काय ती गडबडींतली शांति !"

" खरंच गडे, खरंच ! बरं पुढं काय झालं ?"

" इतक्यांत बाहेर 'वर आला–वर आला !' असा चहूंकडे एकच पुकारा झाला. चहूंकडे एकच आनंदाचा गोंधळ उडाला. तासे चौघडे धडाडून वाजूं लागून त्यांतच मधुर अशा सनयांच्या तानपलटीहि

सुरू झाल्या. ” असें ह्मणून वहिनीसाहेबांनीं चट्कन् डोळे पुसले व त्या स्तब्ध राहिल्या.

“ बरं पुढं काय झालं ? ”

“ त्या आवाजांत मी अभागी एकदम जागीच झालें. बाहेर खिडकींतून पहातें, तर चहूंकडे दिशा उजळूं लागल्या असून पूर्वेकडे शुक्राची चांदणीहि चमचम करूं लागली होती. ”

यमुनेच्या मुखमंडलावर विषाद आणि आनंद या विकारांची मिश्र छाया स्पष्टपणें दृग्गोचर होत होती. तिच्या ओंठावरहि किंचित् हास्यरेखा विलसत होती. मान खालीं करून ती उद्गारली “ अहाहा ! भारी गोड स्वप्न-भारीच गोड, नाहीं ?” असें ह्मणून तिनें वहिनीसाहेबांच्या चेहऱ्याकडे पाहिलें, तों, त्यांची दृष्टि दूर आकाशाकडे लागली असून डोळे पाण्यानें अगदीं भरून आले आहेत, असें तिला आढळून आलें.

वहिनीसाहेबांनीं आकाशाकडे खिळलेली आपली दृष्टि खालीं केली नाहीं. तिकडेच पहात त्या ह्मणाल्या “ खरंच यमुताई, भारीच गोड स्वप्न ! साऱ्या जन्मांत मी या स्वप्नाची आठवण कधींहि विसरणार नाहीं. ”

“ तसंच आहे तें मुळीं !”

“ अन् या सगळ्या गोड स्वप्नांत सर्वांत गोड मला काय वाटलं असेल, सांग बघूं यमुताई !”

क्षणभर थांबून यमुनेनें विचारलें “ काय हो ?- तुह्मीच सांगा. ”

“ तासेढोलांच्या दणदणाटांतली सनईची गोड, अत्यंत मधुर तान ! यमुताई, आपल्या रामाच्या देवळांत दररोज दोन वेळ सनई वाजलेली आपण ऐकतों. पण स्वप्नांत जी सनई मीं ऐकली, तशी गोड-अगदीं गोड सनई साऱ्या जन्मांत मीं कधीं एकदांहि ऐकली नाहीं. काय सांगूं तुला यमुताई, स्वप्नांतल्या त्या सनईनं माझ्या कानांत जणूं अमृतच ओतलं बाई !”

खालीं दृष्टि लावून यमुना आपल्याशींच विचार करूं लागली. नंतर एक मोठा उसासा सोडून ती ह्मणाली “ पहांटेचीं स्वप्नं खरीं होतात खरीं, पण हें गोड स्वप्न खरं कसं होणार, वहिनीसाहेब ?”

वहिनीसाहेब आवेशानें ह्मणाल्या “ होईल होईल- हें स्वप्नदिखील खरं होईल.कां होणार नाहीं यमुताई? आतां-या जन्मांत तें खरं नाहीं व्हायचं, हें उघडच आहे. अन् ह्मणूनच तर सकाळीं मीं तुला ह्मटलं, कीं, माझ्या स्वप्नाचं फळ ताबडतोब मिळण्यासारखं नाहीं. तें खरं व्हायला अवकाश आहे, या जन्मीं तें खरं व्हायचं नाहीं. ”

“तर मग कधीं ? पुढच्या जन्मीं ?”

“नाहीं, इतकाहि वेळ नाहीं लागायचा-”

“तर मग ?”

“परलोकीं जातांच माझं हें स्वप्न अगदीं खरं होईल, यमुताई ! त्यांत इतकादिखील संशय नाहीं. माझे पति ज्या ठिकाणीं आहेत, त्या ठिकाणीं-स्वर्गांत, हें स्वप्न पूर्णपणें खरं होईल. स्वर्गलोकीं प्रवेश मिळण्यासारखं माझ्या पदरीं तितकं पुण्य नाहीं हें खरं-पण स्वारी का मला आपल्या चरणांपाशीं घेऊन जाणार नाहीं ? त्यांत संशय कशाला ? स्वारी मला आपल्या चरणांपाशीं खास घेऊन जाईल-तिकडचं मन किती कोमल आहे, याची तुला कल्पना नाहीं, यमुताई ! मी जेव्हां तिकडे जाईन, माझे दयामूर्ति पति मला तिकडे नेतील, त्या वेळीं, तिथल्या रीतीप्रमाणं पुनः आह्मां दोघांचं तिथं लग्न लागेल. पुनः मला अष्टपुत्री, लगनचुडा वगैरे वधूचा वेष चढवून स्वर्गांतला गौरीहर पूजीत बसावं लागेल. वरवेषानं, मुंडावळ्या बांधून, गाल बोट लावून ऐरावतावर बसून स्वारीलाहि लग्नासाठीं यावं लागेल अन् त्यावेळीं स्वर्गांतल्या सर्व वाद्यांच्या प्रचंड कडकडांत ती मधुर सनई गोड-गोड-अतिशय गोड अशी आपली तानपलट घेत राहील !”

यमुनेनें चकित दृष्टिनें वहिनीसाहेबांच्या मुखाकडे पाहिलें, तों, त्यांनीं नुकतेंच वर्णन केलेल्या पहांटेच्या शुक्राच्या चांदणीप्रमाणें, त्यांचेंहि तेजःपुंज मुखमंडल, आशेनें आनंदानें,चमचम करूं लागलें आहे,असें तिला आढळून आलें. विस्मयानें थक्क होऊन,आ करून यमुना त्या सतीच्या उज्ज्वल मुखज्योतीकडे पाहूं लागली- तिच्या तोंडून शब्द फुटेना. तिची कांहीं चमत्कारिक स्थिति होऊन गेली.

अशा स्थितींत कांहींवेळ-सुमारें मिनिट दीड मिनिट गेलें. दोघीहि स्तब्ध होत्या. नंतर वहिनीसाहेब ह्मणाल्या “यमुताई, माझं पहाटेचं स्वप्न जर खरं होणार नसेल तर सनईचा तो शब्द मला इतका मधुर कसा लागला ? माझ्या कानांत त्या शब्दानं स्वर्गीचं अमृतच ओतलं असं मला कां वाटतं ? स्वर्गांतली सनई खास इतकीच मधुर असेल-स्वर्गांतलीच ती !”

उल्लसित स्वरानें यमुना ह्मणाली “ तसंच होतो ! दयामय परमेश्वर तुमच्यासारख्या साध्वी पतिव्रतेचें

मंगल स्वप्न जर खरं करणार नाहीं, तर तो मुळीं परमेश्वरच नाहीं. परमेश्वर तुमची दोघांची पुनः कधींहि न तुटणारी अशी गांठ स्वर्गांत घालील अन् तिथं तुह्मी अक्षय पतिसुख भोगाल !"

"तुलाहि असं वाटतं ?"

यमुना आवेशानें ह्मणाली "वाटतं–खात्रीनं वाटतं. पतिव्रतेचा मनोभंग करायला परमेश्वराला तरी काय अधिकार आहे ? वहिनीसाहेब, मलाहि आपण आशीर्वाद द्या, कीं, मलाहि अभागिनीला त्या सुखाचा–दिव्य सुखाचा–पुनरपि लाभ होवो !" असें ह्मणून, यमुनेनें वहिनीसाहेबांच्या पायांवर मस्तक ठेवलें.

वहिनीसाहेबांची सारी तंद्री या वेळीं पूर्णपणें आपल्या 'स्वर्गस्थ' पतिदेवाकडे लागली होती. यमुनेच्या मस्तकाचा त्यांच्या पायांला स्पर्श होतांच त्यांच्या त्या समाधीचा एकदम भंग झाला–त्या पुनः या मातीच्या मृत्युलोकीं आल्या. यमुना आपल्या पायांवर मस्तक ठेवून राहिली आहे, असें दृष्टीला पडतांच त्या गडबडीनें ह्मणाल्या "यमुताई, हें तूं काय करते आहेस ? ऊठ ऊठ अगोदर."

यमुना ह्मणाली "वहिनीसाहेब, तुह्मी मनानं थोर ह्मणूनच आजपर्यंत माझ्या चरित्रासंबंधानं चुकून एक शब्दहि विचारला नाहींत. माझ्या हतभाग्याची कहाणी मी तुह्माला एक दिवस सर्व सांगेन. त्यावरून तुमची खात्री होईल, कीं, तुमच्या पायांच्या धुळीच्या एका कणाचीहि माझी योग्यता नाहीं."

वहिनीसाहेब ह्मणाल्या "असं भलतंच कांहीं बोलूं नये, यमुताई ! देव दयेचा सागर आहे. तो तुझं मंगलच करील !"

कांहीं वेळ दोघीहि स्तब्ध होत्या. नंतर जवळ पडलेलें 'महाभारता'चें पुस्तक जवळ घेऊन वहिनीसाहेब त्याचीं सहज पानें चाळूं लागल्या. क्षणभरानें त्या ह्मणाल्या "यमुताई, आपण ज्यासाटीं इथं आलों त्यापैकीं कांहींच झालं नाहीं—"

प्रश्नसूचक मुद्रेनें यमुना त्यांच्याकडे पाहूं लागली.

"भारतापैकीं अक्षरहि आपण वाचलं नाहीं."

"हो खरंच ! आपल्याच गोष्टी आपण बोलत होतों–"

पुस्तक यमुनेच्या हातीं देऊन वहिनीसाहेब ह्मणाल्या "आतां तरी वाच–थोडं कां होईना—"

"कोणता भाग वाचूं ?"

वहिनीसाहेब क्षणभर विचार करून ह्मणाल्या "वनपर्व काढ. त्यांतील 'दमयंती—स्वयंवरा'चा भाग वाच."

वनपर्व काढून यमुना दमयंती–स्वयंवराचा अध्याय वाचूं लागली. हळुहळू सूर्यनारायण पश्चिमेला खालीं खालीं उतरूं लागला. यमुना वाचण्यांत व वहिनीसाहेब तें ऐकण्यांत अगदीं रंगून गेल्या होत्या. क्वचित् एखाद्या दुसऱ्या स्थळीं, दमयंतीच्या कथेसंबंधानें त्या उभयतांमध्यें थोडथोडें संभाषणहि होत होतें.

क्रमाक्रमानें सूर्यकिरण लालसर रंगाचे झाले. सूर्यास्ताला आतां फारसा विलंब नव्हता.

यमुनेचें भारत–वाचन रंगांत चाललें होतें. सूर्यास्ताच्या वेळीं ती वाचीत असलेला अध्यायहि संपला.

इतक्यांत वाड्याकडून कांहीं विलक्षण ध्वनि ऐकूं येऊं लागला. आनंदाच्या मिश्र कोलाहलाचा तो ध्वनि होता. त्यांत भयाचा अंशहि नाहीं, असें स्पष्ट दिसत होतें. क्षणोक्षणीं तो ध्वनि वाढूं लागला.

वहिनीसाहेब आणि यमुना त्या ध्वनीकडे कान देऊन लक्ष्यपूर्वक ऐकूं लागल्या. मनांत त्या बऱ्याच भांबावल्या–थोड्या भ्याल्याहि.

"यमुताई, काय बरं हें ?"

"काय कीं बाई !"

इतक्यांत वाड्यांत सनई व चौघडा सुरू झाला. वहिनीसाहेब व यमुना आश्चर्यचकित होऊन परस्परांच्या गोंधळलेल्या चेहऱ्यांकडे पाहूं लागल्या. झट्कन् उठून, वहिनीसाहेबांनीं भारताचें पुस्तक हातीं घेतलें, व त्या त्वरेनें वाड्याकडे निघाल्या. यमुनाहि त्यांच्या मागोमाग जाऊं लागली.

जातांना दोघांच्याहि तोंडून एक शब्दहि आला नाहीं. दोघीहि झपाझप् पाय उचलीत होत्या.

वाड्याच्या मागील अंगणांत त्या पाऊल टाकीत आहेत, तों बायजा–आनंदानें बेहोष झालेली बायजा–वेड्याप्रमाणें धांवतच तेथें आली, व वहिनीसाहेबांच्या डोकीवर काड्कन् बोटें मोडून, दोनतीनदां खालींवर हात करून असंबद्धपणें बरळूं लागली "वहिनीसाहेब, अहो वहिनीसाहेब ! काय, सागूं तरी काय तुह्माला ? अहो, मी सांगत होतें तस्सं-तस्संच अगदीं झालं ना ! अहो, या बायजेला सगळं कांहीं दूरचं दिसतं–अगदीं सगळं दिसतं–फक्त दिसत नाहीं तिला तिचं मरण !"

"बायजा, तूं हें काय चालवलं आहेस ?

" कांहीं नाहीं हो वहिनीसाहेब, कांहीं नाहीं ! ज्ञाताऱ्यांच्या तोंडांत आपला देव येऊन बोलतो वहिनीसाहेब ! मी कशाला सागूं ? सगळें सांगतील जनलोक–माझंच ह्मातारीचं ह्मणणं खरं झालं कीं नाहीं शेवटीं तें ! पण बोला अगोदर–या बायजेला बक्षीस काय द्याल तें सांगा ? त्यावेळीं कोण विचारतं बायजेला ? बायजा मूर्ख–बायजा खुळी! पण कशी आहे ही खुळी बायजा?"

इतक्यांत, शेजारच्या सखूताई, हातांत कुंकवाचा रुप्याचा डबा घेऊन धांवतच तेथें आल्या, व धापा टाकीत ह्मणाल्या "अखंड सौभाग्यवती हो बाई ! नानासाहेब जिवंत आहेत. त्यांचं पत्र आलं !" असें ह्मणून कांपणाऱ्या हातानें त्यांनीं वहिनीसाहेबांच्या कपाळाला कुंकवाचा मोठा थोरला मळवट भरला !

वहिनीसाहेब, हतबुद्ध होऊन, नदीच्या प्रवाहांतील वेत्रलतेप्रमाणें थरथरां कांपत होत्या. यमुनेनें मागाहून त्यांनां घट्ट धरलें नसतें तर त्या अंगणांत धाड्कन् पडल्या असत्या,व त्यांनां कोठें तरी खास खोंक पडली असती. त्यांचें मूर्च्छित, मृतप्राय शरीर सांवरीत सांवरीत यमुताई व सखुताई यांनीं त्यांनां कसें तरी आंत नेलें.

त्यांच्याकडे लक्ष्यहि न देतां, पदर घट्ट सांवरून बायजा आनंदातिशयानें नृत्य करीत ओरडूं लागली " मीं सांगितलं होतं ना ? हजार वेळ सांगितलं, कीं, नानासाहेबांचं श्राद्ध करूं नका–पण ऐकतो कोण ? पण झालं कीं नाहीं माझंच खरं !"

खंड तिसरें.

प्रकरण पहिलें.

प्रयागतीर्थ.

चला, प्रियवाचक, दुधई स्टेशनवर जाऊन आपले प्रिय मित्र गणपतरावजी देशपांडे यांचा आपण समाचार घेऊं.

क्रमाक्रमानें, रेल्वेनें दिलेल्या नोटिशीचे दिवस संपून, गणपतरावांच्या नोकरीचा शेवटचा दिवस येऊन ठेपला. नोकरी सोडतांना, मोठ्या वैभवाच्या केवढ्याहि आशा जरी त्यांच्यापुढें स्पष्ट उभ्या होत्या, तरी त्यांनां ऐन वेळीं वाईट वाटणें हें मनुष्यस्वभावाला धरूनच होतें.

दुधई स्टेशनवरचा गणपतरावांचा कामकाज करणारा नोकर आणि स्वयंपाक करून घालणारे त्यांचे 'अन्नदाते' पांडेजी यांचा झाल्या दिवसांचा पगार चुकवून आणि त्यांनां थोडें बक्षीस देऊन बाजारच्या आपल्या देण्याघेण्याचाहि हिशेब त्यांनीं आदल्या दिवशींच चुकता केला होता. आसपासच्या ओळखीदेखीच्या लोकांनां भेटूनसवरून त्यांनीं त्यांचे 'शेवट'चे निरोप केव्हांच घेऊन ठेवले होते. वासलात लावतां येईल अशा आपल्या सर्व जिन्नसांची त्यांनीं केव्हांच विकून-टिकून ती लावून टाकली होती, व अगदीं जरूरीचे असे थोडेसे जिन्नस मात्र त्यांनीं बरोबर ट्रंकांतून वगैरे घेतले होते. सरळ व वांकड्या रीतींनीं कमावलेली सर्व 'माया' नीट बंदोबस्तानें बरोबर घ्यावयाला गणपतरावजी अर्थातच विसरले नव्हते.

नोकरीची मुदत संपली, त्याच्या दुसऱ्या दिवशीं गणपतरावांनीं 'अप्' पेसेंजरमध्यें आरोहण केलें. दुधईचे स्टेशनमास्तरसाहेब खरोखरच भारी सज्जन. फारशी चुकी नसतां, गणपतरावांवर तोंडचें अन्न जावयाची पाळी यावी, याबद्दल त्यांनां अतिशय वाईट वाटत होतें; पण झाल्यागेल्या गोष्टींपुढें त्यांचा कांहींच उपाय नव्हता. त्या दिवशीं त्यांनीं मुद्दाम गणपतरावांनां आपल्या 'मकाणां'त जेवावयाला बोलावून त्यांच्याविषयींची आपली दुःखसहानुभूति व्यक्त केली. स्टेशनमास्तरांच्या कुटुंबालाहि गणपतरावांवरच्या प्रसंगानें अतिशय वाईट वाटत होतें; परंतु या गोष्टीला कोणाचाच इलाज नव्हता.

गणपतरावजी गाडींत बसल्यावर स्टेशनमास्तरसाहेब त्यांच्याजवळ प्लॅटफॉर्मवर उभे राहून ह्मणाले "काय गणपतराव, चाललांत ?" त्यांचे डोळे यावेळीं अगदीं डबडबून आले होते.

"हो—देवाची मर्जी !" असें ह्मणून गणपतरावांनीं एक दीर्घ निःश्वास टाकला.

"गणपतराव, तुमच्या जाण्यामुळें आह्मांला किती वाईट वाटतें आहे, याची तुह्मांला कल्पनाहि नसेल."

"वः ! कल्पना नसायला काय झालें, मास्तरसाहेब ! आपल्या कृपेबद्दल मी आपला अतिशय आभारी आहें. दुधई स्टेशनवरचे दिवस अन् आपणा दोघांचें मजवरचें प्रेम, याचा साऱ्या जन्मांत कधीं मला विसर पडणार नाहीं. माईंनां माझे जरूर नमस्कार सांगा."

"बरें, काशीहून परत जातांना याच लाईननें जाणार ना तुह्मी ? जातांना दुधईला उतरा, दोनचार दिवस रहा. चार दिवस सगळींजणें एके ठिकाणीं गमतीनें घालवूं अन् मग आपल्या गांवीं जा."

"ठीक आहे. जगलोंवांचलों तर परत जातांना दुधईला मी जरूर उतरेन—बरें येतों—नमस्कार !"

"नमस्कार !"

भप् भप् करीत गाडीनें दुधई स्टेशन सोडलें.

गाडी चालू झाली, तरी स्टेशन जोंपर्यंत दिसत होतें तोंपर्यंत गणपतराव त्याच्याकडे अनिमिष दृष्टीनें पहात होते. नंतर, तें दिसेनासें झाल्यावर, एक मोठा उसासा टाकून ते त्याच खिडकीशीं बसले.

गणपतराव आपणाशींच विचार करूं लागले. "काय सांगितलें मीं मास्तरांनां ? 'जगलोंवांचलों तर जातांना मी अवश्य दुधईला उतरेन' ह्मणून ! पण 'जगलोंवांचलों तर' ही माझी शर्त केवढी जबरदस्त आहे, याची त्या बिचाऱ्यांनां कल्पनाहि नसेल ! हा गणपतराव देशपांडे आतां वांचणार आहे

किती दिवस ? दिवस कसले ? तासच ह्मणायचे ! आणखी कांहीं स्टेशनें जाईपर्यंतच माझें आयुष्य आहे. मला ओळखणारे लोक आणखी दोन तीन तासपर्यंतच मला भेटतील. त्यांची माझी नजरानजर झाली तर ते मला ‘ मिस्टर देशपांडे ’ या नांवानें ओळखतील– हांका मारतील ! आणखीं पांच दहा–दहा पंधरा स्टेशनें गेलीं, कीं, मला ओळखणारा एकहि प्राणी भेटायचा नाहीं. तेवढीं स्टेशनें गेलीं, कीं, हा गणपतराव मरून त्याचा पुनर्जन्म झालाच असें समजा ! मग मी बिंबवली नांवाच्या खेड्यांतला गणेश सदाशिव देशपांडे–हत-भागी गणपतराव–नाहीं. दक्षिण महाराष्ट्रांतल्या आणथडी नांवाच्या इनामगांवचा वैभवशाली इनामदार सुंदिरावजीत ऊर्फ नानासाहेब पटवर्धन ! पंचवीस रुपयांच्या दरमहावर रखडणारा हा असिस्टंट स्टेशन मास्तररूपी हमाल, आतां ज्याचें वार्षिक उत्पन्न एक लक्षावर आहे असा एक वैभवशाली श्रीमंत इनामदार लवकरच होणार आहे. या पृथ्वीवरून गणपतराव देश-पांड्यांचें नांव आतां नामशेष होणार. त्या नांवाचें आयुष्य आतां कांहीं तासच काय तें राहिलें आहे !”

गणपतरावांचे याप्रमाणें आत्मगत विचार चालले असतां, गाडी साधारण वेगानें चालली होती. ‘ साधारण वेगानें ’ असें ह्मणावयाचें कारण इतकेंच, कीं, ती गाडी मेल नसून पॅसेंजरच होती. प्रत्येक स्टेशनावर–मग तें किती का छोटें अगर भिकार असेना–ती आपली थांबावयाचीच ! दुधईनंतर कित्येक स्टेशनें जाईपर्यंत बहुधा प्रत्येक स्टेशनावर गणपतरावांच्या ओळखीचा एखादा ना एखादा तरी माणूस–स्टेशनमास्तर अगर असिस्टंट स्टेशनमास्तर अगर तारमास्तर, त्यांना पाहून त्यांच्या डब्याजवळ येई, व सहानुभूतीच्या स्वरानें त्यांनां विचारी ‘ ओहो–मिस्टर देश-पांडे ? काय हो, असें एकदम झालें तरी काय ?’ ‘ मिस्टर देशपांडे का ? अरेरे, चाकरी गेली ह्मणतात तुमची ! हें ऐकून आह्माला किती दुःख झालें आहे ह्मणतां ! हे उपरी लोक भारी दुष्ट, मिस्टर देशपांडे ! काय दिमाख बेट्यांचा ! त्यांनां जणूं अधिकारामुळें अस्मान ठेंगणें होऊन जातें !’ ‘ओहो, मिस्टर देशपांडे! एवढ्याशा चुकीबद्दल चाकरीवरून एकदम डिसमिस अं ? अन्याय–भारी अन्याय ! कांहीं हरकत नाहीं. सगळी लाइन मिळून ट्रॅफिक मॅनेजरला–छे छे–अगदीं एजंटला एकदम अर्ज देऊं धडकावून ! या खालच्या ऑफिसरांच्या मिजाशी भारीच वाढत चालल्या बघा ! चांगलें नाक ठेंचलें पाहिजे यांचें एजंटाकडून. सर्वांचाच अर्ज गेल्यावर एजंट तरी काय करतो बेटा ! मुकाट्यानें तुमची नोकरी तुह्माला देईल ! तुह्मी कांहींसुद्धां काळजी करूं नका ! ’ कित्येक स्टेशनांवरील लोकांनां गणपतरावांची नोकरी गेल्याच्या बातमीचा गंध देखील नव्हता. ते गणपतराव दृष्टीला पडतांच, आश्चर्यानें ह्मणत ‘ ओहो ! मिस्टर देशपांडे ! इकडे कुठें बुवा उलटी उडी ? फिराबिरायला निघालां वाटतें ?’, ‘काय देशपांडे, दुधईहून बदलीबिदली झाली कीं काय ? कुठें नेऊन घातलें एकदम तुह्माला ?’, ‘देशपांडे, सुटीबिटी घेतली आहे कीं काय ? कुठपर्यंत पास घेतला आहे ?’ गणपतरावांच्या तोंडून खरी हकीगत कळून येतांच, चेहरा दुःखी करून ते ह्मणत ‘ काय ह्मणतां देशपांडे ? नोकरी गेली ? ह्मणतां तरी काय ? आह्मीं नाहीं बुवा कुठें कांहीं ऐकलें !’ ‘ अरेरे ! भारी वाईट गोष्ट झाली, मिस्टर देशपांडे ! अहो या रेल्वेवरची नोकरी ह्मणजे शुद्ध अळवावरचें पाणी ! क्षणांत आहे–क्षणांत नाहीं ! मग पुढचा विचार ?’

या सर्व प्रश्नांनां थोडक्यांत उत्तरें देतांदेतां बिचाऱ्या गणपतरावांचा जीव अगदीं मेटाकुटीला आला. परंतु कोणावरहि न रागावतां किंवा न चिडतां सर्वांनां त्यांनीं थोडक्यांत योग्य उत्तरें व माहिती दिली. सर्वांनां खरोखरच त्यांच्याबद्दल अंतःकरणपूर्वक सहानुभूति वाटत होती.

स्टेशन सोडून गाडी चालूं लागली, ह्मणजे गणपतराव मनांतल्या मनांत हंसत, आणि आपल्या भावि आयुष्यासंबंधानें निरनिराळ्या कल्पना करण्यांत अगदीं दंग होऊन जात. काशीला जावें, असाच गणपतरावांचा पहिल्यापासून बेत होता, व त्याच हेतूनें त्यांनीं काशी-चाच ‘पास’ मागविला होता; परंतु पुष्कळ विचार केल्यानंतर काशीपेक्षां प्रयागाला जाणेंच श्रेयस्कर आहे, असें गणपतरावांनीं ठरविलें.

योग्य वेळीं गणपतराव अलाहाबादला पोहोंचले, व स्टेशनाजवळच्या एका धर्मशाळेंत त्यांनीं तळ दिला. स्टेशनापासूनच त्यांच्या मागें ‘पंडे ऊर्फ प्रयागवळ ’ यांची एक झुंडच्या झुंड लागली ! गणपत-रावांच्या मागून ते एकसारखे धांवत येत होते. त्यांनीं त्यांनां आरडूनओरडून, ‘ मी तीर्थयात्रेला आलों नाहीं, केवळ अलाहाबाद शहर पहायला आलों आहें. मला

धार्मिक विधि कांहींदेखील करायचे नाहींत, मला तुमची बिलकूल गरज नाहीं ! ' असें पुष्कळ सांगितलें —पण ते लोक कांहींकेल्या त्यांचें ऐकूनच घेईनात ! ' आह्मी तुह्मांला तुमची यात्रा उत्तम सफळ करून देऊं - तुमचं नांव सांगा. ' असा त्यांनीं एकच गिल्ला करून सोडला.

आमचे गणपतरावहि पुरते खमंग होते. त्यांची कांहीं डाळ शिजूं द्यावयाची नाहीं, असा मनाशीं निश्चय करून, गणपतरावांनीं मोठ्या कष्टांनीं त्या सर्वांनां एकदांचें हांकून लाविलें; परंतु एक पांडेजी मात्र कांहीं झालें तरी त्यांच्याजवळून हलेनात ! ते ह्मणत " मी हलायचा नाहीं. अहो, माझें नांव आहे बोलूनचालून ' एकवचनी ' पांडा ! तुमच्या पुण्यामुंबई-कडे काय न् गुजरातेंत काय न् बंगाल्यांत काय—साऱ्या पृथ्वीवर माझें हें नांव नुसतें गाजून राहिलें आहे ना ! बस्स ! ' एकवचनी ' पांडे ! हीं पहा महाराज, माझीं ' सरटिकटें ! ' "

असें ह्मणून पांडेजींनीं गणपतरावांच्या हातांत, मराठी भाषेंत छापलेली एक लहानशी जाहिरात दिली. ती वाचतांच, गणपतरावांनां कळून चुकलें, कीं, हे ' एकवचनी ' पांडेजी ह्मणजे कलियुगांतील रामचन्द्र अथवा धर्मराज यांचे अवतारच असून सर्व भरतखंडांत त्यांच्या इतका सच्छील अगर धर्मनिष्ठ माणूस एकहि नाहीं ! या पांडेजींनां कोठूनहि तार करावयाची असल्यास ' एकवचनी—अलाहाबाद ' एवढाच पत्ता लिहिला कीं बस्स ! तार आपली त्यांनां हटकून पोहोंचावयाचीच ! ही जाहिरात वाचतांच बऱ्याच श्रद्धाळू लोकांची अगदीं खात्रीच होऊन जात असे, कीं, हे एकवचनी प्रयागवळ ह्मणजे कांहीं सामान्य व्यक्ति नाहीं ! सरकारदरबारांत त्यांची मानमान्यता मोठीच असली पाहिजे; त्याशिवाय नुसत्या एका शब्दाच्या पत्यावर त्यांनां नेमकी तार पोहोंचते ! प्रयागवळांतील ते नुसते सूर्यनारायण आहेत !

परंतु पांडेजींची ही चलाखी आमच्या गणपतरावजीं जवळ मुळींच चालली नाहीं; कारण, सहा महिन्यांला पांच रुपये, अशी फी दिली कीं टेलिग्राफ ऑफिसमध्यें कोणताहि सांकेतिक पत्ता वाटेल त्याला रजिस्टर करतां येतो. जाहिरात वाचूनहि गणपतरावजींच्या मनावर कांहींच परिणाम होत नाहीं, अशी जेव्हां 'एकवचनी' पांडेजींची खात्री झाली, तेव्हां ते अगदीं गयावया करून ह्मणाले " महाराज, आपण कितीहि नास्तिक असलां, तरी शेवटीं हिंदू तर खरे? हिंदुधर्म आपण अजून कांहीं सोडला नाहीं. प्रयागाला येऊन, नुसतें शहर पाहून जाणें हें कोणत्याहि हिंदूला शोभत नाहीं. नुसतें प्रयाग पाहून जाणें हें काय बोलणें झालें महाराज ? अहो, शास्त्रांतच लिहिलें ना मुळीं—

"प्रयागीं मुंडितां माथा, पापराशी जळती तत्त्वतां !
एकदां विधि हा होतां, मरण येवो खुशाल !"

इथें येऊन आपण एकदां माथें मुंडलें, कीं, साऱ्या जन्मांत आपणाला कसली मग काळजीच राहिली नाहीं असें समजा ! आपणाला मग कुठेंहि, कधींहि मरण येवो—काळजीच नाहींना मुळींच कसली ! मरावें अन् इथल्या पुण्याईच्या बळावर थेट आपलें वैकुंठीं जावें ! बस्स ! मध्यें कुणाला विचारूं नये—पुसूं नये ! यमदूतांच्या तोंडावर थुंकून, उघडलेल्या दरवाजांतून वैकुंठांत शिरावें !—"

गणपतराव हंसून ह्मणाले " अन् कुणीं दरवाजावर अडवून—'तिकीट बताव' ह्मणून ह्मटलें तर ?"

"अहो, या 'एकवचनी' प्रयागवळाचें नांव [illegible] बेलाशक तुह्मीं त्याला—माझें नांव ह्मणजे वैकुंठाचें तिकीट आहे ना प्रत्यक्ष ? अहो, शास्त्रांतच जर मुळीं या गोष्टी लिहिल्या आहेत, तर त्या खोट्या होणार कशा ? [illegible] जाऊं द्या तें, मी गाडी ठरवून आणतों. त्रेणीघाटावर चला. काय क्रियाकर्म, नेमधर्म आपणाला करायचे असतील ते मी सारे आपणाला अगदीं उत्कृष्ट रीतीनें पार पाडून देतों. त्याबद्दल आपणाला मुळींसुद्धां कसली काळजी नको. बस्स—अधिक नाहीं. आपली [illegible] यात्रा मी सव्वा—पांच रुपयांत उरकून देतों—[illegible] एक वचन—पांच रुपये चार आणे ! आपल्या[illegible] जर मीं पांच रुपये सव्वाचार आणे घेतले, तर [illegible] बेलाशक माझ्या तोंडावर सांगा—तूं एकवचनी [illegible] नाहींस ! तूं दोनवचनी आहेस ! अन् माझे दोन [illegible] धरून दोन्ही गालांवर दोन लखलखावा चांगल्या [illegible] तर कांहीं ह्मणणें नाहीं आपलें ?"

कांहीं क्षण आपणांशींच विचार करून गण[illegible] ह्मणाले "ठीक आहे—आणा गाडी."

पांडेजींनीं लगेच गाडी ठरवून आणली, व [illegible] सामानासह गणपतराव तींत बसले. 'एकवच[illegible] त्यांच्या शेजारीं बसले. गाडींतून जातांजातां [illegible] गणपतरावांनां एकसारखें प्रयागमाहात्म्य व [illegible]

माहात्म्य ऐकवीत होते; परंतु गणपतरावजींचें त्यांच्या त्या बडबडीकडे मुळींसुद्धां लक्ष्य नव्हतें. ते आपल्या मनाशींच विचार करीत होते. उद्यांच्या उद्यां आपणाला बैराग्याचा वेष चढविला पाहिजे. नाहीं तर अलाहाबादला जर आपल्या ओळखीचा एखादा मनुष्य भेटला तर तो आपणाला ओळखील, आणि तें आपल्या पुढच्या बेताला विघ्नकारक होईल. बैराग्याचा वेष चढविल्यावर आपणाला कोणी सहजासहजीं अर्थात्च ओळखणार नाहीं.

स्नान आणि पितृतर्पण या धार्मिक कृत्यांतच गणपतरावजींचे, सव्वा-पांचांच्या ठिकाणीं सहासात रुपये खर्च झाले! तरी ते पांडेजींनां कांहीं बोलले नाहींत.

धर्मशाळेंत परत आल्यानंतर पांडेजी गणपतरावांनां ह्मणाले "महाराज, मला काय दक्षणा द्यायची ती द्या आतां."

गणपतराव त्यांनां ह्मणाले "पांडेजी, 'सव्वापांच रुपयांपेक्षां एक पैसा अधिक लागायचा नाहीं' असें तुह्मीं मला सांगितलेंत अन् प्रत्यक्ष खर्च करायच्या वेळीं माझ्याकडून सात रुपये खर्च करविलेत. आणखी दक्षणेकरितां पुनः हात पसरायलाहि तुमची तयारी आहेच! पांडेजी, तुमचा एकवचनीपणा गेला कुठें?"

'हें: हें:' असा हास्यध्वनि काढून, नम्रपणें हात जोडून, 'एकवचनी' ह्मणाले "महाराज, आपलें एकवचन पाळावें, असा खरोखरच माझा अगदीं मनापासून हेतु असतो; पण हें पोट तो हेतु कांहीं मानीतच नाहीं ना? हें दीडवीत पोट एकवचनाचीं दोन वचनें करायला मला भागच पाडतें! त्यापुढें माझा अगदीं इलाजच चालत नाहीं!" असें ह्मणून पुनः ते हंसले.

गणपतराव मनांतल्यामनांत ह्मणाले "गड्या, दीडवीत पोटासाठीं दोन वचनें सांगणारा माणूस जगांत तूंच कांहीं एकटा नाहींस. बहुतेक सारींच माणसें दोनवचनी अन् दोनतोंडी आहेत!" असें ह्मणून त्यांनीं हंसतहंसत पांडेजींच्या हातावर दोन रुपये ठेवले. ते घेऊन, संतुष्ट चित्तानें त्यांनां आशीर्वाद देऊन एकवचनी पांडेजी हंसतहंसत त्यांचा निरोप घेऊन गेले.

रेल्वेचा कष्टदायक प्रवास, रात्रीचें जागरण आणि सकाळपासून एक वाजेपर्यंतचा हा धर्मविधींचा त्रास, यांमुळें गणपतरावजी अगदीं मरगळीला आले. धर्मशाळेच्या एका नोकराला बोलावून आणून, त्याच्याकडून त्यांनीं दुकानांतून कांहीं खाण्याचे पदार्थ आणविले, आणि ते कसेबसे घशाखालीं कोंबून, वर दोनचार फुलपात्रें पाणी झोंकून, गणपतराव तत्काल झोंपीं गेले.

पांचएक वाजतां गणपतराव जागे झाले, त्या वेळीं त्यांनां चांगली हुषारी वाटूं लागली होती. उठून, तोंड धुऊन, गाडी आणवून, ते बाजारांत गेले. धोतरांसाठीं एक धुवट ठाण, पटक्यांच्या जोडीसाठीं थोडीशी मलमल, चार मोठ्या कफन्या आणि दोन अंगरखे यांच्याकरितां लागणारें लाँगक्लॉथ, दोन चांगल्या उत्तम विलायती कांबळ्या आणि कांहीं वार इतर कापड त्यांनीं दोनतीन दुकानांतून मिळून खरेदी केलें. कफन्या आणि अंगरखे यांचीं मापें देऊन, तें कापड शिंप्याच्या स्वाधीन करून, बाकीचे जिन्नस बरोबर घेऊन गणपतरावजी धर्मशाळेंत परत आले. त्या वेळीं संध्याकाळ उलटून रात्र पडूं लागली होती.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठून, मुखप्रक्षालन वगैरे प्रातःकृत्यें आटोपल्यानंतर गणपतरावांनीं धर्मशाळेच्या नोकराला बोलावून आणून विचारलें "काय रे, इथें चांगली कावेची माती मिळेल विकत?"

"हो-मिळेल तर काय झालें!"

"बरें, तुला मी पैसे देतों. चांगली काव विकत आणून, हे माझे नवीन कपडेबिपडे कावेनें रंगवून देशील चांगले?"

"देईन तर काय-झालें? पण कशाला, रावसाहेब?"

"आतां साधे कपडे घालायचे नाहींत असा मीं निश्चय केला आहे."

"ह्मणजे?"

"ह्मणजे काय? संसार सोडून मी आतां बैरागी होणार.!"

गणपतरावांच्या तोंडून हें अनपेक्षित भाषण ऐकतांच, तो बिचारा नोकर विस्मित होऊन त्यांच्या तोंडाकडे टकमकां पहातच राहिला. कालपासून त्या नोकराच्या ही गोष्ट चांगलीच ध्यानांत येऊन चुकली होती, कीं, खर्चाच्या बाबतींत आणि बक्षिसेंबिक्षिसें देण्यांत रावसाहेबांची स्वारी खूबच सढळ आहे! त्या नोकराचा आपला एकच समज होता, आणि तो अगदींच खोटा होता असें नाहीं-कीं, ज्याला पोटापाण्याची विशेष पंचाईत असते, रहावयाला आश्रयस्थान नसतें, लक्ष्मीदेवीनें रागावून ज्याच्याकडे पाठ केलेली असते,

तोच बहुधा संसाराला रामराम ठोकून संन्यासी अथवा वैरागी होतो. संन्यासी अथवा बैरागी झाल्यानें, लाज-लज्जेवर सहजच तिलांजलि देतां येऊन,वाटेल त्याच्या-समोर हक्कानें हात पसरावयाला त्याला कायदेशीर सनदच मिळते ! आणि अशा रीतीनें, कोठें ना कोठें कांहीं ना कांहीं तरी लग्गा साधून,त्याची पोटाची पंचाईत हां हां ह्मणतां दूर होते. त्याच्याकरितां मोठमोठ्या दया-शील,परंतु अदूरदृष्टि महात्म्यांनीं अन्नसत्रें स्थापन केलेलीं असतात, त्यांचा त्याला उघडपणें लाभ घेतां येतो. धर्मशाळांतून, देवळांतून, ओऱ्यांतून त्याची रहावयाची व पडावयाची मुबलक सोय होते. हलुहलू त्याच्याभोंवतीं निरनिराळ्या इच्छा असणाऱ्या भक्त–भक्तिणींचा घोळका जमूं लागून त्याच्या सर्व इच्छा थोड्याच काळांत पूर्णपणें फलद्रूप होतात ! अशा, दरिद्री फटिंग माणसांनीं संसार सोडून वैराग्य घेणें हें एक रास्त आहे; परंतु हा चांगला श्रीमंत, पैसेवाला दिसणारा मनुष्य वैराग्य कां घेत आहे, याचा त्या बिचाऱ्या नोकराला कांहीं केल्या उलगडा होईना. याला असें दुःख किंवा अभाव तरी कोणता असावा, याविषयीं तो आपल्या मनाशीं विचार करूं लागला.

तो स्तब्ध उभा आहे, असें पाहून गणपतरावांनीं त्याला विचारलें "हे कपडे रंगवायला किती पैशांची काव लागेल रे ?"

" कांहीं नक्की नाहीं सांगतां येत."

" बरें ही अधेली घे अन् हवी तेवढी काव आण अन् हे कपडे रंगवून दे." असें ह्मणून गणपतरावांनीं एक अधेली काढून त्याच्याकडे फेंकली.

त्या नोकरानें स्नेहार्द्र स्वरानें विचारलें "रावसाहेब, संसार सोडून बैरागी व्हायचा आपला खरोखरच का निश्चय झाला आहे ?"

" हो–कायम झाला आहे."

" आपल्या मुलाबाळांची मग काय स्थिति होईल, याचा कांहीं विचार मनांत आणा—"

किंचित् हंसून गणपतराव ह्मणाले " तूं ह्मणतोस तें ठीक आहे. पण मला मुळीं मूलबाळच नाहीं !"

" मुलें नसलीं, तरी बायको असेलच कीं नाहीं ? तिची तरी काय स्थिति होईल—"

" मला बायकोहि नाहीं." हे शब्द उच्चारतांना गणपतरावांच्या सर्वांगावर गतगोष्टींच्या स्मृतीनें रोमांच उभे राहिले.

" बरें, आईबाप तरी ?"

" तेहि केव्हांच वारले !"

" तरी आपणाला भाऊ–बहिणी असतीलच ?"

" कुणी नाहीं. मी वैरागी होऊन, तीर्थयात्रा करीत सर्व हिंदुस्तानभर भटकत रहाणार अन् परमेश्वराचें नामस्मरण करीत, आयुष्याचीं जितकीं वर्षें अजून राहिलीं असतील, तितकीं सुखानें कंठणार !" असें ह्मणून गणपतरावांनीं त्याच्याकडे हंसतहंसत पाहिलें.

गणपतरावांच्या तोंडची ही माहिती ऐकून त्या नोकराच्या मनाचें बरेंच समाधान झालें असावें, असें दिसलें. तो ह्मणाला " असें असेल तर मग अगदीं निराळी गोष्ट आहे. आपल्या मागें कसला पाशच राहिला नाहीं, त्यामुळें आपण वैतागानें बैरागी व्हावें, हेंच योग्य आहे. देवाचें नांव घेतल्यानेंच आपल्या आयुष्याचें खरें सार्थक होणार आहे."

" तें ठीक आहे–पण काव आणतोस ना ?"

नोकर मान हलवून ह्मणाला " नाहीं रावसाहेब, कावेचा रंग तितकासा चांगला नाहीं होणार—"

" मग काय ह्मणतोस ?"

" रामरसाचा रंग करा."

" रामरस तें काय बुवा ?"

" तो एक प्रकारचा रंग आहे–वाण्याच्या दुकानीं मिळतो. त्यानें कपड्यांनां उत्तम रंग चढतो. रंग होतो भगवाच–पण अगदीं पक्का अन् त्याबरोबरच पिंवळ्या रंगाची सुंदर झांकहि मारते. तोच रंग आणून, आपले सारे कपडे रंगवून देतों तावडतोब." असें ह्मणून त्यानें ती अधेली उचलून घेतली.

" ठीक आहे. तुझ्या या रामरसाबद्दल मला कांहींच माहिती नाहीं; पण तुझी रंगाबद्दल पक्की खात्री आहे ना ?"

"अगदीं पक्की."

" तर मग तोच आणून आजच्याआज मला हे कपडे रंगवून दे. पण इकडे पहा–रंग जरा अधिकच घेऊन ये. आज संध्याकाळीं शिंपी येऊन कांहीं कफन्या, बंड्या न् अंगरखे देऊन जाईल. तेहि सारे उद्यां त्याच रंगानें रंगवून टाकायचे आहेत. अन् कायरे, मला स्वयं-पाकाला एखादा चांगला ब्राह्मण देतोस का पाहून ? आज दोनतीन दिवसांत भाताचे दोन घांस देखील माझ्या पोटांत गेले नाहींत. आज पोटभर जेवीन तरी !"

"अं: ! त्याबद्दल आपण नका कांहीं काळजी करूं. ब्राह्मण जवळच आहे आपणाला हवातसा अगदीं. पण जरा पैसे जास्त द्यावे लागतील त्याला.आणूं बोलावून?"

"आण—पैशांची फिकीर नाहीं. पण चांगला पाहिजे."

नोकरानें ब्राह्मण आणला. त्याच्या हातची सुंदर 'रसोई' खात, दोन दिवस प्रयागांत काढून, नवीं रंगविलेलीं भगवीं वस्त्रें परिधान करून तिसऱ्या दिवशीं गणपतराव काशीला निघून गेले. त्यांचे जुने कपडे आणि बिछाना त्या नोकराला मिळाला आणि कांहीं वस्त्रें व दुसरे कांहीं जिन्नस धर्मशाळेंतील दुसऱ्या नोकरांनीं आपसांत वांटून घेतले.

प्रकरण दुसरें.

'नानासाहेबांचें पत्र !

योग्य वेळीं गणपतराव काशीला येऊन दाखल झाले, परंतु या वेळीं त्यांनां कोणींहि गंगापुत्रानें तिळमात्र त्रास दिला नाहीं. त्यांचीं भगवीं वस्त्रें पाहून, पुष्कळांनीं त्यांनां नमस्कारच केला.

स्टेशनाबाहेर येऊन गणपतरावांनीं एक गाडी ठरविली, व तींत बसून ते दशाश्वमेध घांटावर आले. दशाश्वमेध घांटाच्या आसपास यात्रेकरूंनां सोयिस्कर अशीं पुष्कळ घरें मिळतात,असें त्यांच्या ऐकण्यांत आलें होतें. तेथें जाऊन अशा एका घराचा त्यांनीं पत्ता काढला, व त्याच्या मालकाकडे जाऊन त्या घरांतील एक भाग भाड्यानें घेतला, आणि त्यांत आपलें बिऱ्हाड थाटलें.

दोनएक महिने तरी काशीमध्यें रहावें, असा गणपतरावांचा पहिल्यापासूनच बेत होता. काशीमध्यें राहून नवीन आयुःक्रमाची कसून तयारी करणें त्यांनां अत्यंत आवश्यक होतें. त्यांनीं जो बेत मनामध्यें योजला होता, तो यशस्वी रीतीनें पार पाडण्याकरितां, त्यांनां काशीसारख्या ठिकाणीं रहाणें अतिशय जरूरीचें होतें. "मी सोळा वर्षें बैरागी होतों," असें नुसतें तोंडानें ह्मणून बिलकूल भागण्यासारखें नव्हतें. बैरागी कसे असतात, त्यांचा आयुःक्रम काय असतो, त्यांच्या आयुर्मार्गांतले खांचखळगे काय असतात, त्यांच्या संवयी, त्यांच्या रीतभाती काय असतात, इत्यादिकांसंबंधानें, अगदीं संपूर्णपणें जरी नाहीं, तरी बरीचशी माहिती मिळवून ठेवणें गणपतरावांनां अत्यंत जरूरीचें वाटत होतें. नाहीं तर, आपण जी नाट्यभूमिका घेणार आहों, ती हां हां ह्मणतां उघडकीला येईल, आणि तसें झालें ह्मणजे मात्र आपल्या फजितीला पारावार नाहीं, असें त्यांनां खात्रीपूर्वक वाटत होतें.काय वाटेल तो प्रयत्न करून बैराग्यांच्या मेळ्यांत मिसळून त्यांच्या रीतिभाती, बोलण्याचालण्याची ढब इत्यादिकांची माहिती करून घेणें, ही आपल्या भूमिकेची पूर्वतयारी किंवा पाया असून ही तयारी जितकी पूर्ण होईल, तितकें पूर्ण यश आपणाला मिळेल, असें गणपतरावांचें मन त्यांनां सांगत होतें. त्यांच्या धर्मग्रंथांचें अगर पठनग्रंथांचें थोडेंबहुत अध्ययन करणेंहि आपणाला आवश्यक आहे, असें त्यांचें मत होतें; आणि हे सारे हेतु पूर्णपणें सिद्धीला जावयाला पाहिजेत तर काशीला बरेच दिवस वास्तव्य करून राहिलें पाहिजे, हेंहि अगदीं निश्चित होतें. काशीशिवाय, दुसऱ्या कोणत्याहि ठिकाणीं, या कार्यसिद्धीला आवश्यक असलेल्या सोयी सांपडण्यासारख्या नव्हत्या.

आपल्या बिऱ्हाडांत दोनएक दिवस काढल्यावर गणपतरावांनां आढळून आलें, कीं, ही जागा आपणासारख्यांनां रहावयाला बिलकूल योग्य नाहीं. तेथें नेहमीं फार गडबड असावयाची. जुने यात्रेकरू जाऊन नवीन नवीन यात्रेकरू येणें, हा कारभार तेथें दरघडीला चालत असे. स्वयंपाकाचीहि त्या ठिकाणीं अतिशय गैरसोय होते, असाहि गणपतरावजींनां अनुभव आला. ह्मणून, आपणाला रहावयाला एखादें स्वतंत्र घरच घेणें आवश्यक आहे, असें त्यांनां वाटूं लागलें, व तशा घराच्या शोधाला ते ताबडतोब लागले.मानसरोवरावर कनाईसा मुदीचें एक घर आपणाला अगदीं हवें तसें आहे, असें, शोध केल्यावर गणपतरावजींनां आढळून आलें. मालकाला भेटून, दहा रुपये दरमहा भाड्याचा त्याच्यापाशीं करार करून, त्यांनीं तें घर आपल्या ताब्यांत घेतलें, व आपलें सामानसुमान नेऊन त्यांनीं आपलें नवीन बिऱ्हाडबाजलें तेथें थाटलें. घरकामासाठीं एक नोकर व स्वयंपाकासाठीं एक ब्राह्मण मिळवून गणपतराव या घरांत राहूं लागले.

येथें राहूं लागल्यानंतर गणपतरावांनीं आपला नवीन कार्यक्रम आंखून तो पूर्णपणें अमलांत आणला. त्यांच्या

कार्यक्रमांत एकच गोष्ट प्रामुख्येंकरून होती. सकाळ-पासून सुमारें अकरा साडेअकरा वाजेपर्यंत आणि सायंकाळीं साडेचार पांच वाजल्यापासून तों प्रहररात्र उलटेपर्यंत दशाश्वमेध घांटावर जाऊन साधुसंन्यासी, बैरागी यांच्या मेळ्यांत ते बसत असत. त्यांचीं निरर्गल भाषणें, शिव्याशाप, उपदेश मुकाट्यानें ऐकत, मधुनमधून एखाद्या दुसऱ्या साधूला अगर बैराग्याला आपल्या घरीं आदरपूर्वक निमंत्रण करून नेऊन, त्याला उत्तमोत्तम खाद्य, भोज्य, पेय, चोष्य पदार्थ देऊन व यथाशक्ति दक्षिणाहि अर्पण करून ते त्याला संतुष्ट करीत. कोणीं त्यांचें नांव वगैरे विचारलें, तर गणपतराव बेलाशक आपलें नांव धुंडिराज ऊर्फ नानासाहेब पटवर्धन असें धडकावून सांगत. 'तुमचें घर कोठें ?' 'इकडे कां आलां ?' 'बैरागी केव्हां झालां ?' वगैरे प्रश्न त्यांनां कोणीं विचारले, तर कांहींच उत्तर न देतां ते गप्प रहात. बैराग्यांपैकीं 'गिरि' नामक संप्रदायाच्या बैराग्यांमध्यें ते विशेष मिसळत असत. त्यांच्याबरोबर हिंडत फिरत; त्यांच्या सांप्रदायाच्या विशिष्ट चालीरीति, बोलीचाली यांचें लक्ष्यपूर्वक निरीक्षण करून, त्यांचा आपल्या मस्तकांत नीट संग्रह करून ठेवीत. 'गिरि' संप्रदायाचीं धार्मिक अगर पाठ्य पुस्तकें त्या बैराग्यांपासून मागून अगर विकत आणून तीं सर्वदा ते लक्ष्यपूर्वक वाचीत– त्यांचा कसून अभ्यास करीत. प्रत्येक दिवशीं रात्रीं, भोजन वगैरे आटोपल्यानंतर, एकान्तामध्यें ते नाना-साहेबांचें 'आत्मचरित्र' अगदीं लक्ष्यपूर्वक वाचीत. त्या हस्तलिखित पुस्तकाचा आज पुष्कळ दिवस गणपतराव अगदीं कसून अभ्यास करीत असल्यामुळें त्यांतील बहुतेक सर्व गोष्टी त्यांनां अगदीं मुखोद्गत झाल्या होत्या. नानासाहेबांच्या चरित्रांतील एकूणएक गोष्टी, त्यांच्या सर्व गुणदोषांसह गणपतरावजींनीं पूर्णपणें 'हस्तगत' करून घेतल्या, असें झटलें असतां बिलकूल अतिशयोक्ति होणार नाहीं.

अशा रीतीनें महिन्यापेक्षांहि कांहीं अधिक दिवस गेले. मुद्दाम तसाच प्रयत्न केल्यामुळें गणपतरावांच्या मस्तकावरील केसांच्या जटा होऊं लागल्या, आणि हनु-वटीवर व गालावर दाढीहि बरीच तयार झाली. या वेळीं त्यांच्या मनांत असा विचार आला, कीं, बाण-थडीला जाऊन, तेथील सर्व परिस्थिति स्वतःच्या डोळ्यांनीं पाहून येणें अत्यंत आवश्यक आहे. तेथील रस्ते, नदी, घांट, देवळें, प्रमुख प्रमुख लोकांचीं नांवें, घरें आणि हकीगती, आसपासचे गांव, आणि विशेषतः इनामदारांचा वाडा व बाग आणि वाड्यांतील प्रमुख मंडळी या सर्वांचा 'प्रत्यक्ष' परिचय करून घेणें अतिशय जरूरीचें असून, या माहितीवरच आपणाला पुढें यश मिळणार आहे, असें त्यांनां खात्रीपूर्वक वाटूं लागलें. बाणथडीला जाऊन तेथली ही सारी माहिति जर आपण प्रत्यक्ष मिळवून आलों नाहीं, तर आपलें सारें कारस्थान केव्हांच फसून हां हां ह्मणतां आपली बिनभाड्याच्या घरांत रवानगी होईल, अशी त्यांची खात्री होती. बाणथडीला जाणें बऱ्याच धाडसाचें असलें, तरी अत्यंत आवश्यक होतें. तेथें जाण्याशिवाय गत्यन्तर नाहीं हें खरें; पण जावयाचें कसें आणि कोणत्या वेषानें, याचा गणपत-रावजींनां मोठा विचार पडला. या बैराग्याच्या वेषांत तर जाणें बिलकूल योग्य नव्हतें. कारण पुढें योग्य वेळीं याच वेषानें नानासाहेब ह्मणून बाणथडीला त्यांनां प्रकट व्हावयाचें होतें. साधा गृहस्थवेष घेऊनहि तेथें जाऊन भागण्यासारखें नव्हतें; कारण, बाणथडी ह्मणजे कांहीं अफाट शहर नव्हतें–साधारण मोठेंसें खेडें. तेथें सर्व लोक परस्परांच्या पूर्ण माहितीचे असल्यामुळें, एखादा नवखा गृहस्थ तेथें गेल्यास, खेडेगांवचे उटाठेवी लोक त्याचा 'कोण–काय' केल्याशिवाय कधींहि स्वस्थ रहाणार नाहींत, हें उघड होतें. तेव्हां तो वेषहि निरुपयोगी ठरला.

गणपतराव या विचारांत अगदीं निमग्न होऊन गेले होते. इतक्यांत समोरच एक मुसलमान फकीर भिक्षा मागत जात असलेला त्यांच्या दृष्टीला पडला. तत्क्षणीं त्यांच्या मस्तकांत एकदम अशी कल्पना चमकली, कीं, सर्वांपेक्षां हा फकीराचा छद्मवेषच या कामीं आपल्या अगदीं उत्कृष्ट उपयोगीं पडेल. या वेषांत संकटें येण्याचा संभव कांहींच नसून उलट फायदा मात्र किती तरी होण्यासारखा होता.

ही कल्पना मनांत येतांच गणपतरावांनां अतिशय आनंद झाला. त्यासंबंधानें मनांतल्या मनांत आणखीहि पुष्कळ 'भवति न भवति' करून, फकीराच्याच वेषानें बाणथडीला एकदां जाऊन यावें, असा त्यांनीं मनाशीं निश्चय केला, व त्या उद्योगाला ते लागले.

मुसलमानी तऱ्हेची एक कफनी गणपतरावांनीं ताबड-तोब शिवावयाला दिली. नागर जोडे, फकीरी टोपी इत्यादि जिन्नसा त्यांनीं बाजारांतून विकत घेतल्या. आतां रहातां राहिले एक स्फटिकांची माळ, किशता आणि एक

चौकडी लाठी, हे जिन्नस. हे जिन्नस बाजारांतून विकत घेण्यासाठीं गणपतरावांनीं पुष्कळ प्रयत्न केला, परंतु ते त्यांनां मिळाले नाहींत.

परंतु 'पैशानें वाघिणीचें दूध मिळतें,' अशी ह्मण आहे, ती बिलकूल खोटी नाहीं.पैशाच्या जोरावर गणपतरावजींनां हे तीनहि आवश्यक पदार्थ ताबडतोब मिळवितां आले! एका मुसलमान फकीराला, आदरपूर्वक निमंत्रण देऊन, त्यांनीं आपल्या घरीं बोलावून आणलें, व त्याला खाद्यपेयादिकांनीं संतुष्ट करून, बरीच किंमत देऊन गणपतरावांनीं युक्तीनें त्याच्यापासून हे तीनहि जिन्नस मिळविले!

त्याच दिवशीं, संध्याकाळ उलटून रात्र पडण्याच्या सुमाराला,फकीराचा वेष धारण करून गणपतराव घराबाहेर पडले. त्यांचा हा नवीनच पोषाक पाहून त्यांचा नोकर व स्वयंपाकी आश्चर्यचकित होऊन गेले.एकमेकांमध्यें ते हळूच ह्मणूं लागले "धनीसाहेब बैरागी नाहींत अन् फकीरहि नाहींत. खात्रीनें हे छुप्या पोलिसांतले कुणी तरी बडे अधिकारी आहेत. कांहीं तरी खुनाबिनाच्या खटल्यासंबंधानें माहिती मिळवायला हे काशीला आले असावेत."

फकीरी कफनी, टोपी, जोडे हीं सारीं मळून त्यांचा कोराकरकरीतपणा नाहींसा झाल्यावर, घराला कुलूप लावून, गणपतरावजी एक दिवस बाणथडीला जावयाला निघाले. योग्य वेळीं त्या गांवीं पोहोंचल्यानंतर, रस्तोरस्तीं फिरून ते भिक्षा मागूं लागले. कोणी मूठपसा तांदूळ, कोणी पैसाअधेला भिक्षा घातली, ह्मणजे मोठा आवाज काढून 'अल्ला आबाद राखे' असा आशीर्वाद दोनहि हात वर करून ते देत असत. बाणथडी आणि त्याच्या आसपासचे गांव, यांमध्यें याप्रमाणें फिरून भटकून, जें कांहीं पहाणें जरूर होतें तें पाहून, त्यांनीं माहिती करून घेण्याजोग्या गोष्टींची चांगली माहिती करून घेतली. नानासाहेबांच्या 'आत्मचरित्रां'त जे कारभारी,जुने चाकरनोकर वगैरेंचीं नांवें व उल्लेख आला होता, त्या सर्वांनां नीट पाहून, त्यांची त्यांनीं युक्तीनें पूर्ण माहिती मिळविली.

याप्रमाणें बाणथडी व त्याच्या आसपासचे गांव यांमध्यें आठदहा दिवस घालवून, पाहिजे होती ती सर्व माहिती मिळवून, गणपतराव काशीला परत आले. फकीराचे कपडे व जिन्नस, एका फकीराला घरीं बोलावून आणून त्यांनीं त्याला दान करून टाकले.

या वेळीं काशीमध्यें चांगलाच उष्मा पडावयाला सुरुवात झाली होती. रात्रीं, भोजनवगैरे आटोपल्यावर उघड्या गच्चीवर अंथरुणावर पडून गणपतराव किती वेळपर्यंत तरी निरनिराळ्या गोष्टींसंबंधानें विचार करीत. बाणथडीला नानासाहेब ह्मणून आपण केव्हां प्रकट व्हावें? आणखी असे किती दिवस आपण विचारांत घालविले, तरी त्यापासून खरोखर कांहीं लाभ होणार का? बाणथडीला जाऊन एकदम प्रकट व्हावें, का अगोदर पत्र पाठवून आपल्या आगमनाची सूचना देऊन नंतर तेथें जाणें इष्ट होईल? इत्यादि इत्यादि अनेक प्रश्न त्यांनां भंडावून सोडीत, व रात्रीच्या रात्री त्यांच्या अगदीं झोंपेवांचून जात.

बाणथडीला अगोदर पत्र पाठवावें कीं नाहीं, या प्रश्नाचा गणपतरावजींनां चांगला समाधानकारक उलगडा होईना. पत्र हातीं येतांच, येणारी व्यक्ति खरोखरच नानासाहेब आहे किंवा कोणी तरी तोतया बनून येत आहे, अशी शंका तेथील मंडळीच्या मनांत उपस्थित होणें अगदीं संभवनीय होतें. पुष्कळ वर्षें बेपत्ता असलेल्या व्यक्तींचे तोतये उपस्थित झाल्याच्या अनेक गोष्टी त्यांनां वाचलेल्या व ऐकलेल्या आठवूं लागल्या, आणि त्या त्या व्यक्तींचे झालेले शोचनीय परिणाम डोळ्यांसमोर उमे राहून गणपतरावांच्या हृदयाचा थरकांप होऊं लागला. सुप्रसिद्ध भाऊसाहेब पेशव्यांचा तोतया सुखनिधान याचें चरित्र व शोचनीय अंत गणपतरावांनां धगधगीत आकृतींनीं डोळ्यांसमोर दिसूं लागला. पत्र लिहिण्याचें ठरलें समजा, तरी तें पाठवावयाचें कोठून? त्यांत कोणता ना कोणता तरी पत्ता लिहिणें आवश्यकच होतें. काशीचा हा पत्ता त्या पत्रांत आपण लिहिला, आणि तिकडून कोणीं तरी गुप्तपणें येऊन आपला बारकाईनें तलास काढून आपणाला उघडकीला आणलें तर? त्यापेक्षां अगोदर पत्र लिहूंच नये हा उत्तम मार्ग! एकदम जाऊन दत्त ह्मणून उभें रहावें, आणि सांगावें, "हा मी आलों आहें नानासाहेब!"

गणपतरावांच्या मनांत अशा प्रकारचा गोंधळ चालला असतां आणखीहि कांहीं दिवस गेले. तरी पत्रासंबंधानें काय करावें, याचा निश्चित निकाल कांहींच लागेना. पत्र न पाठवितांच बाणथडीला एकदम आकाशांतून उतरल्याप्रमाणें हजर होणेंहि त्यांनां प्रशस्त वाटेना! पत्र पाठवावें तरी कठीण, न पाठवावें तरीहि चमत्कारिकच! पत्र न पाठवितां एकदम तेथें गेल्यास, तेथल्या

मंडळीला पहिल्यापासूनच आपल्याबद्दल संशय याव-याचा, आणि एकदां संशयाचा चष्मा डोळ्यांवर चढला ह्मणजे मग काय? आपल्या प्रत्येक कृतीकडे, प्रत्येक पावलाकडे, प्रत्येक भाषणाकडे ते संशयानेंच पहावयाचे! अशा स्थितींत, प्रत्यक्ष खरा माणूसहि तोतया ठरावयाचा; मग तोतयाचा तेथें कसा निभाव लागणार? छेः! तें कांहीं नाहीं. पत्र न पाठवितांच बाणथडीला आपण गेलों, तर प्रत्येक पावलाला आपणाला भयंकर अग्निदिव्यांतून पार पडावें लागेल! आणि तें तर सुतराम् शक्य नाहीं.

त्यापेक्षां अशी युक्ति केली तर? आपण असें एक पत्र तेथल्या मंडळीला पाठवावें, कीं, जें केवळ खऱ्या-खुऱ्या नानासाहेबालाच फक्त लिहितां येणें शक्य आहे. इतक्या वर्षांनीं जर कोणी नानासाहेबांचा तोतया ह्मणून उभा राहिला, तर असें पत्र त्याला लिहितांच येऊं नये, अशाच कांहीं गोष्टींचा उल्लेख त्यांत असावा. अशा कांहीं मक्खीच्या गोष्टींचा पत्रांत उल्लेख करून जर आपण बाणथडीला पत्र पाठविलें, तर तें अस्सल नानासाहेबांकडूनच आलें, असा विश्वास तेथें आपणाला सहज उत्पन्न करतां येईल, आणि अशी एखादी गोष्ट आपणाला पत्रांत लिहिणें बिलकूल अशक्य नाहीं.

दुसरीहि एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. असें पत्र तयार करून पोस्टांत टाकल्यानंतर एकदोन दिवसांच्या आंतच काशीहून निघून आपण बाणथडीला जाऊन हजर व्हावें; ह्मणजे पत्र पोहोंचून, आपल्या शोधाला तेथून इकडे कोणाला यावयाला मध्यें अवकाशच सांपडूं नये! पत्राच्या मागोमाग एकदोन दिवसांतच बाणथडीला आपण जावें, असाच शेवटीं पुष्कळ विचार करून गणपतरावांनीं निश्चय केला.

या दोन महत्त्वाच्या गोष्टींचा अशा रीतीनें निकाल लावल्यावर गणपतराव तावडतोब तें पत्र लिहावयाला बसले. याच पत्रावर त्यांची सारी मदार असल्यामुळें तें सर्वतोपरी उत्तम वठणें अगदीं जरूर होतें. कांहीं ओळी लिहाव्या, पण त्या मनाला न पटल्यामुळें कागद फाडून टाकावा, पुनः दुसरा कागद घेऊन कांहीं मजकूर लिहावा, तोहि मनाला नापसंत वाटून त्याहि कागदाची पुनः तीच वाट करून टाकावी, अशा रीतीनें गणपतरावांनीं सात आठ कागद फाडले, पत्र लिहिणें आज कांहीं आपणाला जमत नाहीं, असें पाहून त्यांनीं तो नादच सोडला.

पत्र लिहिण्याकरितां नानासाहेबांच्या 'आत्मचरित्रा'चें पुनरपि सूक्ष्म अवलोकन करणें जरूर आहे, असें गणपतरावांनां वाटूं लागलें. तत्क्षणीं अगदीं पहिल्यापासून त्या चरित्राचें लक्ष्यपूर्वक पारायण करावयाला त्यांनीं सुरुवात केली व तें हळुहळू संपविलें.

दोन दिवसांनीं, अत्यंत परिश्रमांनीं गणपतरावजींनीं एकदांचें तें पत्र पुरें केलें. पत्र याप्रमाणें तयार झालेंः—

"ॐ नमः शिवाय।

श्रीक्षेत्र काशी,
वैशाख शुद्ध अष्टमी,—

परमपूजनीय श्रीमंत सकलगुणालंकृत राजमान्य राजश्री गोपाळ यज्ञेश्वर ऊर्फ भाऊसाहेब पटवर्धन, मौजे बाणथडी—वडिलांचे सेवेशीं—अपत्यें बालकें धुंडिराजानें त्रिकालचरणीं मस्तक ठेवून कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार विनंति विशेष—

बाबा, आज अतिशय दीर्घकालानंतर, आपला हा पापी, अधमाधम पुत्र, आपल्या सर्व जन्माच्या अपराधांबद्दल व दुष्कृत्यांबद्दल अतिशय पश्चात्ताप होऊन आपल्या परम परमपूज्य चरणांच्या आश्रयाला येत आहे. मीं आपल्या चरणांचा आश्रय व घर यांचा त्याग केला, त्याला आज सोळा वर्षें झालीं; परंतु या सोळा वर्षांच्या अत्यंत दीर्घ अवधींत मीं दुष्ट अधमानें आपणाला नुसत्या खुशालीचेंसुद्धां एकहि पत्र पाठविलें नाहीं! आपण माझ्या पत्राची पहा पहा वाट पाहिली असेल, आणि शेवटीं, या जगांतच मी नाहीं, अशीच आपणां सर्वांची खात्री झाली असेल. मी मरण पावलों, या समजुतीनें आपणाला, ती० सौ० मातुःश्रीला आणि सर्वांनांच अतिशय दारुण दुःख झालें असेल आणि इतकीं वर्षें त्या भयंकर शोकाग्नींत आपण जळत असतां मी आपणाला खुशालीचें एक बोटभर पत्रहि पाठविलें नाहीं!

बाबा, माझ्यासारखा अधम, नीच, दुष्ट, चांडाळ या साऱ्या पृथ्वीवर एकहि नसेल. पहिल्यानें घर सोडून मी बाहेर पडलों, तो तडक प्रयागाला आलों. तेथें असतां मी नाहींसा झाल्याची आपण 'वार्तासागर' वर्तमानपत्रांत दिलेली जाहिरात माझ्या दृष्टीला पडली; परंतु, ती जाहिरात वाचलेला अलाहाबादचा एखादा दक्षिणी माणूस मला पाहून बक्षिसाच्या आशेनें आपणाला माझा पत्ता कळवील; या भयानें मी एकदम त्याच दिवशीं तेथून पळालों, आणि जेथें एकहि दक्षिणी मनुष्य दिसणें

असंभवनीय, अशा एका ठिकाणीं जाऊन मी राहिलों. घटनाक्रमानें, कनखलतीर्थाला मी गेलों असतां, तेथील तीनतारा मठाचे महन्त बलवंतगिरीमहाराज यांच्या कृपादृष्टीला मी पात्र झालों आणि त्यांची माझ्यावर अतिशय मर्जी बसली. त्यांनीं दीक्षा देऊन मला आपला चेला केलें, व मी त्यांच्या चरणांची सेवा करीत त्याच मठांत राहिलों. महन्त महाराजांचा काळ झाल्यावर, त्यांची गादी मला प्राप्त झाली आणि आजपर्यंत त्या मठाचा महन्त या नात्यानें मी तेथेंच राहिलों होतों.

परंतु अलीकडे अलीकडे, त्या जीवितक्रमाचा मला अत्यंत तिट्कारा वाटूं लागून, आपल्या व्यर्थ झालेल्या जीवनाचाहि मी धिक्कार करूं लागलों होतों. आज जवळ-जवळ दोन वर्षें, मी, आज घरीं जाऊं, उद्यां जाऊं, याच विचारांत आहें; परंतु कांहीं केल्या माझी बुद्धि स्थिर होईना आणि इतक्या वर्षांनीं घरीं परत जाव-याला मनाला एक प्रकारचा विलक्षण संकोच आणि भीतिहि वाटत होती, हें आपल्या पूज्य चरणांजवळ मला कबूल केलेंच पाहिजे.

दोन महिन्यांपूर्वीं मला एक स्वप्न पडलें, त्यांत मीं आपणाला पाहिलें. मी घरांतून पळून आलों, त्याच्यापूर्वीं थोडेच दिवस आपले डोळे आल्यामुळें आपण निळा चष्मा लावीत होतां तोच चष्मा लावून आणि हातांत त्या वेळच्याप्रमाणेंच हळदीचा रुमाल घेऊन आपण माझ्या स्वप्नांत आलांत आणि प्रेमार्द्र करुण स्वरानें मला म्हणालांत "राजू, चल, घरीं जाऊं ये बाबा ! आमच्या-वर कां रागावला आहेस उगी ?" मी तत्क्षणीं जागा होऊन पहातों, तों आपण जवळ नाहीं ! त्याबरोबर आपल्या स्मरणानें माझी कांहीं चमत्कारिक स्थिति होऊन गेली, आणि मला एकदम रडूंच कोसळलें. दुस-ऱ्याच दिवशीं मीं गुप्तपणें मठ सोडला. तरी घरीं एक-दम यावयाला मला संकोच वाटतच होता. तीर्थयात्रा करीत करीत मी काशीला आलों आहें. इकडलीं जग-न्नाथपुरी, व महाराष्ट्रांतलीं नाशीक, त्र्यंबक, व दक्षिणें-तलीं रामेश्वर वगैरे सर्व तीर्थें फिरून येऊन मग ज्येष्ठ-महिन्याच्या अखेरीला बाणथडीला आपल्या चरणांपाशीं कायमचें येऊन रहावें, असा मनाचा हेतु होता; परंतु आपल्या दर्शनाची इच्छा आतां अत्यंत प्रबल झाली असून हृदय अगदीं व्याकुल होऊन गेलें आहे. येत्या द्वादशीच्या दिवशीं येथून निघून पौर्णिमेला मी बाण-थडीला पोहोंचेन.

माझ्या अक्षम्य कोटि कोटि अपराधांबद्दल मी पुनः-पुनः आपल्या पूज्य चरणांवर मस्तक ठेवून आपली क्षमा मागतों. वडिलांशिवाय मुलाचे अपराध पोटीं घालावयाला कोण समर्थ आहे ? तीर्थरूप वज्रचूडेमंडित सौभाग्यवती मातुश्रीच्या चरणींहि माझे साष्टांग नमस्कार. चिरंजीव बापूला माझे प्रेमपूर्वक आशीर्वाद सांगावे. इतर सर्व लहानथोर मंडळीला माझे यथायोग्य नमस्कार व आशीर्वाद प्रविष्ट करावे.

आपला अधमाधम पुत्र

नाना."

याप्रमाणें पत्राचा मसुदा तयार करून गणपतराव तो वारंवार वाचूं लागले. प्रत्येक वेळीं त्यांत फिरवा-फिरव आणि कमीअधिक शब्दयोजना ते करीतच होते. शेवटीं मसुदा अगदीं कायम झाला, तेव्हां त्या-प्रमाणें त्यांनीं पत्र लिहून तयार केलें. मसुद्यावरून नक्कल केली आहे, असें दिसूं नये म्हणून पत्रांत दोनवार ठिकाणीं खोडाखोड करून नवा मजकूर घातल्या-प्रमाणें दाखविण्यास गणपतरावजी विसरले नाहींत !

पत्र लिहून पुरें झाल्यावर गणपतरावांनीं खालीं एक 'ताजाकलम' जोडलाः—

"येथें आल्यावर गंगा–पुऱ्यांत आपले क्षेत्रोपाध्ये वेद-मूर्ति राजश्री काशीनाथभट्टजी देवधर यांची मीं चौकशी केली; परंतु दोन वर्षांपूर्वींच ते कैलासवासी झाल्याचें कळलें.

नाना."

पत्र पुनः पुनः पांचपन्नास वेळ वाचून, तें बंद करून पाकिटावर नीट पत्ता लिहून गणपतरावांनीं तें स्वतः 'पोस्ट' केलें.

हें पत्र बाणथडीला पोहोंचल्याची हकीगत प्रिय-वाचकांना पूर्वीच कळली आहे.

प्रकरण तिसरें.

मोठीच पंचाईत !

तीनप्रहर दिवस उलटून गेला होता. 'कचेरी'च्या आपल्या खोलींत, स्वच्छ चादर घातलेल्या गादीवर पांढरा शुभ्र अभ्रा घातलेल्या तक्क्याला टेंकून दिवाणजी काकासाहेब पटवर्धन बसले होते. त्यांच्या पुढच्या

बैठ्या टेबलावर, व जवळ बऱ्याच लठ्ठलठ्ठ वह्या, कागदांचीं पुडकीं, व रुमालाचीं गाठोडीं–उघडीं व बांधलेलीं–पडलेलीं दिसत होतीं. नाकाच्या बोंडीवर चष्मा चढवून दिवाणजी कागदपत्र व हिशेब तपासण्यांत गढून गेले होते.

दिवाणजींच्या उजव्या बाजूला, जाजमावर, लोड–तक्क्यांनां टेंकून, दिवाणजींपासून कांहीं अंतरावर, केशवराव गर्गे, व्यंकटराव कुळकर्णी व हरिभाऊ बापट हे गांवांतले रिकामटेंकडे, प्रौढ व आपणाला मोठे 'व्यवहारज्ञ' म्हणून म्हणविणारे तिघे गांवगुंड बसले असून ते आपसांत हलक्या स्वरानें गप्पा मारीत होते. व्यंकटरावांच्या हातीं एक भरलेली चिलमी असून ते आळीपाळीनें तिघेहि ओढीत होते. त्यांच्यासमोर पानसुपारीचें, स्वच्छ असें पितळेचें जाड तबक, पानपुडा, चुना, तंबाकूची मोठी डबी व कातगोळ्यांची एक जर्मन सिल्व्हरची मोठी डबी असें सामान असून जवळच थुंकण्यासाठीं एक उंच तस्त ठेवलें होतें. दिवाणजी आपलें काम तर करीत होतेच; पण मधुनमधून या तिघांच्या रिकामटेंकड्या गप्पाष्टकांमधील आपला भागहि तत्परतेनें उचलीत होते ! जवळच भिंतीला एक मोठें थोरलें गोलाकार घड्याळ असून त्याचा 'टकटकाट' हळुहळू चालला होता.

गप्पाष्टकांत रंगून गेलेल्या त्या त्रयींत केशवरावच सर्वांत वयानें मोठे होते. बोलतां बोलतां ते मध्येंच म्हणाले," काका, हें ऐकलेंत तुम्हीं ?"

लिहितांलिहितां काकांनीं विचारलें " काय ?"

" मुंबईंत एक प्रकारची नवी विलायती गाडी आली आहे, तिला म्हणे घोड्यांची बिलकूल गरज नाहीं. कळ दाबतांच रस्त्यानें ती आपली धडधड धांवूं लागते !"

हें ऐकतांच आश्चर्यानें अगदीं थक्क होऊन हरिभाऊ उद्गारले " आं ! म्हणतां तरी काय ? रस्त्यांतून यंत्राच्या गाड्या धांवूं लागल्या आहेत ?"

केशवराव किंचित् वेडावल्यासारखें करून म्हणाले " होय, रस्त्यांतून नाहीं तर काय घरांतून गाड्या धांवतात ?"

व्यंकटरावांनीं दिवाणजींनां विचारलें " होय, काका ?" त्या सर्वांत व्यंकटराव लहान होते.

समोरच्या वहींतील हिशेब तपाशीत तपाशीत दिवाणजी म्हणाले " होय, गोष्ट खरी आहे. असल्या गाड्या मुंबईंत येऊन सुमार एक वर्ष झालें असेल. कदाचित् सवा दीड दोन वर्षें झालीं असतील–यापेक्षां कांहीं अधिक नाहीं हें खास !"

" अस्सें !" व्यंकटराव उद्गारले.

" या गाडीला 'मोटार गाडी' म्हणतात. " दिवाणजी म्हणाले.

हरिभाऊ चिलमीचा एक दम मारून म्हणाले "गेल्या दिवाळीला मी मुंबईला गेलों होतों–पण अशी एखादी गाडी नाहीं बुवा आपण कुठें पाहिली."

व्यंकटराव हंसून म्हणाले "तुम्ही घरकोंबडे बिऱ्हाडांतून बाहेर पडाल तेव्हां ना ! बसलां असाल चुलीजवळ काकूंचा पदर धरून ?"

त्यांच्या थट्टेकडे लक्ष्य न देतां हरिभाऊंनीं विचारलें " तुम्हीं पाहिली आहे हो मोटारगाडी, काका ?"

" नाहीं." चष्म्याच्या भिंगांवरून हरिभाऊंकडे पहात दिवाणजी म्हणाले. " मीं प्रत्यक्ष कांहीं नाहीं पाहिली. पण वर्तमानपत्रांत वाचलें आहे. अजून मुंबईंत देखील असल्या गाड्या फार आल्या नाहींत—"

" किती आल्या असतील ?"

" पंधरा वीस–अधिक नाहीं."

केशवराव मान हलवून खिन्न स्वरानें म्हणाले " गेलें काका, पार गेलें ! पार गेलें—"

" काय गेलें ?"

" घोड्यांचें अन्न पार गेलें ! हे विलायतवाले व्यापारी एकएक कळीचीं यंत्रें पाठवून एकेकाचें अन्न बंद करताहेत ! "

दिवाणजी हंसून म्हणाले " घोड्यांचें अन्न जायला अजून पुष्कळ अवकाश आहे, केशवराव !"

" कां बरें ? अहो, या गाड्या जिकडेतिकडे झाल्या म्हणजे मग घोड्यांच्या गाड्यांनां विचारतो कोण ?"

" गाड्यांचा तसा सुळसुळाट इतक्यांतच जिकडेतिकडे होईलसें दिसत नाहीं."

" कां बरें ? काय हरकत, आहे तसें व्हायला ?"

" मुख्य हरकत ही आहे, कीं, या असल्या कळीच्या मोटारगाड्यांनां जबरदस्त किंमत पडते."

व्यंकटरावांनीं मुलाला शोभणाऱ्या उत्सुकतेनें विचारलें " जबरदस्त किंमत पडते म्हणतां ? किती रुपये किंमत पडत असेल एकेकीला ? बाकी पडली तर काय आश्चर्य आहे ?"

"दोन एक महिने झाले असतील, मी पुण्याला गेलों होतों. तेथल्या एका श्रीमंत गुजराची न् माझी भेट

झाली होती. त्याचा मुंबईला अन् पुण्याला मोठा व्यापार आहे. त्यानें नुकतीच मुंबईला एक मोटार थेट विलायतेहून आणवली होती.–”

“किती किंमत पडली तिला ?”

“सात हजार रुपये !”

“सात हजार रुपये !” तोंडावर हात देऊन हरिभाऊ ह्मणाले. “गाडीची किंमत सात हजार रुपये !”

दिवाणजी हंसून ह्मणाले “त्याची ती गाडी लहानच आहे हरिभाऊ ! मोठ्या मोटारला याच्यापेक्षां कितीतरी अधिक किंमत पडेल !”

“किती पडत असेल ?” व्यंकटरावांनीं विचारलें.

“पंधरा हजार–वीस हजार !”

“अरे बापरे !” हरिभाऊ उद्गारले. “वीस हजार रुपये गाडीची किंमत ! तुम्ही ह्मणतां तरी काय, काका ?”

“खोटें नाहीं मी सांगत.” काकासाहेब हंसून ह्मणाले.

केशवराव पानांच्या शिरा काढीत ह्मणाले “या यंत्रांनीं न् कळांनीं विलायतवाल्यांनीं सारा देश भरून टाकला अगदीं ! जिकडे बघावें तिकडे कळा न् यंत्रें ! काका, घोड्यांचें अन्न जायला पुष्कळ अवकाश आहे, असें तुह्मी ह्मणतां. पण मला नाहीं तें खरें वाटत ! या कळा न् यंत्रें जेव्हां नवीन येतात इकडे, त्या वेळीं त्यांच्या किंमती अशा मोठमोठाल्या असतात खऱ्या; पण हळुहळू त्यांच्या किंमती उतरत जातात अन् मग चहूंकडे त्यांचा अगदीं सुळसुळाट होऊन जातो ! नाहीं काका, घोड्यांची एकंदर स्थिति मला कांहीं ठीक दिसत नाहीं !”

हरिभाऊ ह्मणाले “घोड्यांचीच कां ह्मणतां केशवराव ? घोड्यांच्याबरोबर कोचमन अन् सैस यांच्याहि तोंडचें अन्न नाहीं का काढून घेणार ही कळेची मोटार गाडी ? या यंत्रांनीं न् कळांनीं देशांतील किती लोकांच्या तोंडांतलें अन्न काढून नेलें असेल, तें एका देवाला माहिती !” असें ह्मणून, अगदीं निराश झाल्याप्रमाणें करून, हरिभाऊ कपाळाला हात लावून बसले. जणूं काय मोटारच्या आगमनानें त्यांच्या स्वतःच्या तोंडांतला घांसच हिरावला जात होता !

इतक्यांत, केशवरावांनां चिलमीची तलफ आली आणि जवळच्या डबड्यांत तर अगदींच थोडा तमाखू होता. तलफ दाबणें तर कालत्रयीं त्यांनां शक्य नव्हतें. तेव्हां तोंड आंबट करून ते ह्मणाले “ काका, तमाखू मागवा बरें जरा–अगदींच संपला.”

काकांनीं एका नोकराला बोलावून, तमाखूचें डबडें नीट भरून न ठेवल्याबद्दल त्याची नीट कानउघाडणी करून त्याला तमाखू आणावयाला हुकूम केला. तमाखू आल्यावर, केशवरावांनीं पुनः चिलीम भरली, व त्या तिघांत तिचीं पुनः पुनः आवर्तनें होऊं लागलीं.

दिवाणजी पुनः आपल्या समोरच्या वह्यांतील हिशेब तपासावयाला सुरवात करीत आहेत, इतक्यांत पोस्टाचा शिपाई कृष्णा गुरव तेथें येऊन हजर झाला, व त्यानें पहिल्यानें दिवाणजींनां व नंतर इतर मंडळीला लवून रामराम केला. हातांतील पुष्टिपत्रामधील आठदहा पत्रें काढून, एकेकावरील पत्ता नीट वाचून त्यानें तीं दिवाणजींच्या पुढील टेबलावर ठेवलीं; नंतर आपली बॅग उघडीत तो ह्मणाला “आज एक चमत्कारिक पत्र आलें आहे.”

“ चमत्कारिक म्हणजे ?” दिवाणजींनीं विचारलें.

“ भाऊसाहेबांच्या नांवचें एक रजिस्टर पत्र आहे.”

काका आश्चर्यानें म्हणाले “ भाऊसाहेबांच्या ?”

“ होय.” असें ह्मणून, कृष्णानें लाखेचीं पांच शिलें असलेलें एक पत्र काढून दिवाणजींसमोर ठेवलें.

तें आपल्या हातीं घेऊन, मागेंपुढें उलटून पहात काकासाहेब अत्याश्चर्यव्यंजक स्वरानें ह्मणाले “ भाऊसाहेबांच्या नांवानें पत्र पाठवणारा हा कोण प्राणी बुवा ? भाऊसाहेबांनां जाऊन आज दोन वर्षें झालीं अन् इतक्या दिवसांनीं त्यांनां कोणीं धाडलें हें पत्र ?”

व्यंकटराव किंचित् पुढें झुकून ह्मणाले “ छाप पहा पोस्टाचा–ह्मणजे कळेल कुठून आलें तें—”

दिवाणजींनीं पत्रावरील छाप इकडून तिकडून नीट लक्ष्यपूर्वक पाहून ह्मटलें “बनारस सिटी ! ओः! आलें आतां ध्यानांत—”

व्यंकटरावांनीं विचारलें “कुणाकडून हो ?”

“काशींत आमचे क्षेत्रोपाध्ये आहेत कीं नाहींत, त्यांच्याकडून आलेलें दिसतें आहे हें ! कधीं कधीं, दोन तीन वर्षांनीं, त्यांचें भाऊसाहेबांनां पत्र येत असे खरें. कांहीं कार्यबीर्य उपस्थित झालें असलें तर पैशांबियशांची थोडीबहुत मदत मागितली असेल, दुसरें काय ? बरें कृष्णा, मीच सही करून देतों.” असें ह्मणून दिवाणजींनीं पिंवळ्या रंगाच्या रिसीटीच्या तुकड्यावर सही करून तो कृष्णाच्या हातीं दिला. पुनः नम्रपणें रामराम करून कृष्णा तेथून निघून गेला.

दिवाणजी एक एक पत्र फोडून वाचूं लागले. मधुन-मधून एकाददुसऱ्या पत्रावर व कार्डावर झरझर एकदोन हुकुमाच्या ओळी लिहून तीं ते निराळीं ठेवीत. अशा रीतीनें सर्व पत्रें वाचून झाल्यावर, त्यांनीं एका नोकराला हांक मारून, तीं सर्व पत्रें गोविंदरावांकडे नेऊन द्यावयाला सांगितलें. नंतर हातीं कात्री घेऊन दिवाणजींनीं तें रजिस्टर कव्हर फोडलें व आंतून पत्र बाहेर काढलें.

वरच्या एकदोन ओळी वाचतांच त्यांनीं पत्र उलटून पत्र कोणाकडून आलें आहे हें पहाण्याकरितां, पत्रलेखकाची सही पाहिली. तत्क्षणीं ते एकदम आश्चर्यानें स्तंभित होऊन उद्गारले "आं ! हें काय ?"

दिवाणजींचा चेहरा पांढराफटफटीत झाला. हातपाय थरथरा कांपूं लागले. आपणाला मूर्च्छा येते कीं काय, असें त्यांनां वाटूं लागलें.

व्यंकटराव व हरिभाऊ एकदम ओरडले "काय हो, काय झालें, काका ?"

केशवरावांनीं विचारलें "कांहीं वाईट तर नाहीं ना बातमी ? कुणाचें पत्र, काका ?"

इतक्या अवकाशांत दिवाणजींनीं मोठ्या शिकस्तीनें आत्मसंयमन केलें होतें. त्या तिघांहि रिकामटेंकड्यांनां कांहीं उत्तर न देतां, त्यांचे आश्चर्योद्गार आपणाला जणूं ऐकूंच आले नाहींत असें दाखवून दिवाणजी मनांतल्या मनांत पत्र पुढें वाचूं लागले.

दिवाणजींनीं त्या तिघांकडे कांहीं लक्ष्य दिलें नाहीं खरें; परंतु त्या बिचाऱ्यांची स्थिति त्यामुळें अगदींच शोचनीय होऊन गेली. कुतूहलानें व उत्कट जिज्ञासेनें त्यांचे प्राण जावयाची वेळ आली. कधीं एकदां आपणांला त्या पत्रांतला मजकूर समजतो,असें त्यांनां होऊन गेलें. त्यांनीं मनांतल्या मनांत काकासाहेबांनां शिव्या द्यावयालाहि सुरवात केली.

दिवाणजी पत्र वाचीत असतां, या तिघांचें लक्ष्य अगदीं बारकाईनें त्यांच्या चेहऱ्याकडे लागून राहिलें होतें. त्यांच्या चेहऱ्यावर कोणकोणते विचार दिसत आहेत, याचें ते अगदीं सूक्ष्मपणें निरीक्षण करूं लागले. पत्र वाचीत असतां क्षणोक्षणीं दिवाणजींच्या चेहऱ्यावर निरनिराळ्या विकारांच्या छाया प्रकट होत आहेत, असें त्यांनां आढळून आलें. एका क्षणाला त्यांच्या चेहऱ्यावर उत्कट आनंदाचें तेज प्रकट होत आहे, तर दुसऱ्या क्षणीं, तीव्र संशयामुळें त्यांच्या भ्रुकुटि अगदीं आकुंचित होत आहेत,तिसऱ्या पळाला रागामुळें त्यांच्या चेहऱ्यावर लाली चढून त्यांचे ओंठ थरथरां कांपूं लागले आहेत, इतक्यांत तो क्रोधाचा विकारहि पार नाहींसा होऊन पुनः आनंदानें त्यांच्या डोळ्यांत पाणी चमकत आहे, तोंच एकदम तेथें म्लानता दिसत आहे, अशा तऱ्हेचे भिन्नभिन्न चमत्कारिक देखावे, अगदीं थोड्या अवकाशांत, त्या तिघां गांवगुंडांच्या दृष्टीला पडले. हे चमत्कार दृष्टीला पडत असतां त्यांचा जीव कुतूहलाच्या तीव्रतेमुळें एकसारखा खालींवर होत होता.

शेवटपर्यंत पत्र वाचल्यावर तरी काका आपणांला त्या पत्रांतील रहस्य कळवितील, अशी त्या तिघांनां फार आशा होती; परंतु ती पूर्णपणें विफल करून टाकावयाला दिवाणजींनीं मुळींसुद्धां वेळ लावला नाहीं. एकदां शेवटपर्यंत पत्र वाचल्यावर, दिवाणजींनीं तें पुनः पहिल्यापासून वाचावयाला सुरुवात केली ! हाय! केवढा हा घनघोर निराशेचा प्रसंग त्या बिचाऱ्या तीन अनाथ प्राण्यांवर ! साऱ्या जन्मांत त्यांची कधीं इतकी तीव्र निराशा झाली नव्हती.

दिवाणजींनां तें पत्र पुनः वाचावयाला अर्थातच पहिल्या इतका वेळ लागला नाहीं. परंतु जो थोडा लागला तोच या गांवगुंडांनां अत्यंत दीर्घ वाटून अगदीं असह्य झाला. पत्र वाचून झाल्यावर दिवाणजींनीं तें परत लिफाफ्यांत घालून तें समोरच्या टेबलाच्या खणांत ठेवून, तो खण कुलूप लावून बंद केला. नंतर त्यांनीं एक मोठा उसासा सोडला, व ते शून्य दृष्टीनें बाहेरच्या दिंडीकडे पाहूं लागले.

दिवाणजींची ही कृति पाहून ते तिघे हताश होऊन परस्परांच्या चेहऱ्यांकडे टकमकां पाहूं लागले. केशवरावांच्यानें तर आतां अगदीं धीर निघेना. त्यांनीं, एकवार खांकरून गळा साफ करून म्हटलें "काशीच्या क्षेत्रोपाध्यांचेंच का पत्र, काका ?"

"नाहीं." असें म्हणून दिवाणजी उठून उभे राहिले.

व्यंकटरावांनीं विचारलें "कुठें निघालांत ?"

दिवाणजी क्षीण, खिन्न स्वरानें म्हणाले "काम आहे एक जरूरीचें. आज एकादशी, नव्हे ?"

केशवराव अगदीं कमालीच्या निराशेनें म्हणाले, "हो; बरें तर आम्हीहि येतों आतां."

ते 'येतों,' म्हणून म्हणाले खरे; पण तेथून ते हलले मात्र नाहींत. अवशिष्ट आशेनें, ते पुनः चिलीम भरूं लागले आणि ती भरून झाल्यावर त्यांनीं धाईधाईनें

(कारण, दिवाणजी अगदीं निघालेच !) पांच सात शेवटचे दम मारून घेतले.

हरिभाऊ व व्यंकटराव यांनां चिलमीची या वेळीं फारशी गरज भासली नाहीं. ते निराशेच्या भरांत उठून दरवाजापर्यंत गेले होते.

"काय, येतां कीं नाहीं, केशवराव ?" हरिभाऊंनीं विचारलें.

"आलों आलों—"

परंतु त्यांची वाट न पहातां ते दोघे निघूनहि गेले. दिवाणजी तर खोलीबाहेर पडून दरवाजा लावण्यासाठीं तिष्ठत उभे राहिले होते. इतक्यांत शेवटचा दम मारून केशवरावहि घाईघाईनें बाहेर आले.

दिंडींतून बाहेर पडून हरिभाऊ व व्यंकटराव केशवरावांची वाट पहात उभे होते, त्यांनां क्षणभरानें ते जाऊन मिळाले. झालेल्या प्रकाराबद्दल आश्चर्य प्रगट करून, खर्जाच्या सुरांत त्याबद्दल त्या तिघांची चर्चा सुरू झाली.

"काय हो हरिभाऊ, काय तर्क तुमचा ?" केशवरावांनीं विचारलें.

"आपले आतां तर्कच लढवायचे झालें !"

"पण सांगा तर खरे !"

"कांहीं तरी अतिशय महत्त्वाची अशी गोष्ट असली पाहिजे !"

"मोठेंच सांगितलेंत अगदीं !" केशवराव किंचित् रागानें ह्मणाले.

"केशवराव, तुह्मी कां नाहीं हो स्पष्ट विचारलेंत काकांनां ?" हरिभाऊंनीं किंचित् हंसून विचारलें.

"जरूर मला ?" तुच्छतेनें केशवराव ह्मणाले. "चला, चला, इथें उभे नका राहूं." असें ह्मणून ते घाईघाईनें दोन पावलें पुढें झाले. त्यांच्या मागोमाग त्यांचे पारिपार्श्वकहि निघाले.

दोन्ही बाजूंनां निबिड लतादिकांनीं व्यापलेलीं कुंपणें, अशा अरुंद पाऊलवाटेनें ते चालूं लागले. कांहीं वेळ तिघेहि स्तब्ध होते.

कांहीं अंतरावर गेल्यावर, इकडेतिकडे पाहून खालच्या स्वरांत व्यंकटराव ह्मणाले "मीं एक तर्क काढला आहे."

हरिभाऊ जागच्याजागीं थांबून ह्मणाले "काय तो, ऐकूं या तरी—"

केशवराव चिडल्यासारखें करून ह्मणाले "पण थांबलांत कशाला ? चालतां चालतां व्यंकटरावांचा 'तर्क' तुह्माला ऐकूं नाहीं वाटतें येणार ? कानांला गुड्या बसतील का काय वाऱ्यानें ?"

बिचारे हरिभाऊ आणि व्यंकटराव त्यांच्या मागोमाग चालूं लागले. पुनः हरिभाऊंनीं विचारलें "हं, व्यंकटराव, काय तर्क आहे तुमचा ? कुणाचें असावें तें पत्र ?"

"मी पुढें किंचित् वांकलों, तेव्हां पत्रांतले कांहीं थोडे शब्द माझ्या दृष्टीला पडले बुवा."

"काय ह्मणतां ? सांगा, सांगा काय ते—"

"पत्रांत एका ठिकाणीं लिहिलेलें आहे 'आपल्या स्मरणानें माझी कांहीं चमत्कारिक स्थिति होऊन गेली, आणि मला एकदम रडूंच कोसळलें !' इतके शब्द तर मीं अगदीं स्पष्ट स्पष्ट वाचले."

केशवराव व्यंग्य स्वरानें ह्मणाले "काय उगीच बाता मारतां आहां, व्यंकटराव ! इतक्या दुरून तुह्माला पत्रांतले शब्द वाचायला येताहेत !"

"अहो, मी मुद्दामच पान घ्यायच्या निमित्तानें बांकलों होतों ना ?"

"ह्मणून काय झालें ?"

"खरोखरच मला हे शब्द स्पष्ट दिसले 'आपल्या स्मरणानें माझी कांहीं चमत्कारिक स्थिति होऊन गेली—' "

"कां उगीच आह्मांला मूर्खांत काढतां, व्यंकोबा ? आह्मांला कुणाला कांहीं दिसलें नाहीं अन् तुह्मालाच तेवढे ते शब्द दिसले. मीदेखील पानांचें तबक घ्यायला पुढें झालों होतों. तुमची नजर मोठी दिव्य ह्मणायची अगदीं ! किती वर्षें झालीं हो तुह्माला, व्यंकोबा ?"

"एकोणचाळीसावें वर्ष मला आहे हें. अजून कांहीं मला चाळशी लावावी लागत नाहीं—"

"हो, एकोणचाळीस !" केशवराव हेटाळणीनें हंसून नाक मुरडून ह्मणाले, "माझी ही पन्नाशी उलटायला आली अन् तुह्माला तेवढें एकोणचाळीसावेंच वर्ष ! काय गप्पा मारतां व्यंकोबा ?" असें ह्मणून, आडव्या रस्त्याला फिरून ते आपल्या घराकडे निघाले.

कांहीं पावलें चालून हरिभाऊ चालतां चालतां उभे राहिले, व ह्मणाले "अस्सें काय ? एकूण अशी कांहीं तरी गुपित गोष्ट आहे ह्मणायची ! 'आपल्या स्मरणानें माझी कांहीं चमत्कारिक स्थिति होऊन गेली !'"

हें तर बाबा कांहीं इनामदारीचें पत्र नाहीं."असें झणून दांतांनीं ओंठ दावून धरून ते एकसारखें डोकें हलवूं लागले.

" हरिभाऊ, तुह्मी बोलणार तर नाहीं कुठें ?"

" नाहीं–काय झणतां ?"

इकडेतिकडे पाहून व्यंकटराव झणाले " मला तर असें वाटतें हरिभाऊ, हा काका वरून कितीहि चांगुलपणाचा डौल आणो–पण खरोखर आंत–" असें झणून ते शोधक दृष्टीनें इकडेतिकडे पाहूं लागले.

" नाहीं, कुणी नाहीं कुठें–सांगा."

व्यंकटरावांनीं हरिभाऊंच्या कानाशीं तोंड नेऊन, हळूच कांहीं फिसफिस केलें. नंतर किंचित् दूर होऊन, स्वाभाविक स्वरांत त्यांनीं विचारलें " काय ? तुह्माला काय वाटतें, हरिभाऊ ?"

हरिभाऊ किंचित् ठांसून झणाले " मलाहि तसेंच वाटतें."

दोघेहि परस्परांच्या चेहऱ्यांकडे पाहूं लागले, व नंतर दोघेहि हंसले, आणि पुनः रस्त्यानें चालूं लागले.

कांहीं वेळ चालल्यानंतर हरिभाऊ चालतां चालतां पुनः थांबले, व मान हलवून झणाले "नाहीं–तसें नाहीं."

व्यंकटरावहि थांवून झणाले " काय तसें नाहीं ?"

" तुमचा तर्क साफ चुकला आहे."

" झणजे ? कशावरून ?"

" अगदीं उघडाउघड आहे. तुमच्या आमच्या लक्ष्यांत ही गोष्ट ताबडतोब कशी आली नाहीं, याचेंच मला मोठें नवल वाटतें."

" पण कसें तें सांगाल तर खरें ?"

" अहो, दिवाणजी कांहीं फंदांत होते, असा आपण तर्क केला–पण तें निव्वळ तर्कट ! तें पत्र कांहीं दिवाणजींच्या नांवानें आलेलें नाहीं ! निवळ आपण दिवाणे !" असें झणून हरिभाऊ मोठमोठ्यानें हंसूं लागले.

" अरे हो ! अरे हो ! खरें तें–पत्र त्यांनां आलेलें नाहीं !" असें झणून व्यंकटराव चेहरा आंबट करून उभे राहिले. आपण एवढे मोठे तर्कवाले, पण अगदींच आपली कशी फसगत झाली ही, असें वाटून त्यांनां अगदीं अपरंपार दुःख झालें.

हरिभाऊ मान हलवून, चिंतातुरतेनें झणाले "नाहीं, हाहि आपला तर्क फुकट गेला अगदीं ! मग आहे तरी काय प्रकरण हें ? अगदीं कांहींच मति चालेनाशी झाली बुवा !"

मान हालवून अत्यंत खिन्नतेनें व्यंकटराव झणाले " कांहींच तर्क नाहीं चालत आपलासुद्धां ! " असें झणून पूर्ण हताश होऊन, दोघेहि पुनः रस्त्यानें चालूं लागले !

इकडे दिवाणजी, आंत वाड्यांत जावें, या उद्देशानें 'कचेरीं'तून बाहेर निघाले, व त्यांनीं दरवाजाहि लावून घेतला; परंतु दरवाज्यापाशींच उभे राहून ते विचारांत निमग्न होऊन गेले, व कांहीं वेळानें दरवाजा उघडून ते पुनः कचेरींत शिरले आणि आपल्या जागेवर जाऊन बसले. ते आपल्या मनाशीं झणाले "मोठीच पंचाईत येऊन पडली ! काय करावें ? या प्रसंगीं करावें तरी काय ? घरांत ही बातमी जाऊन सांगूं, कीं, तूर्त ही जागच्याजागीं दाबून टाकूं ? आतांच्या आतां आंत जर मीं ही खबर दिली, तर आनंदानें सारी मंडळी अगदीं वेडी होऊन जाईल ! आणि परवां तो इथें येऊन पोहोंचल्यावर, तो जर खरा नाना नसून, त्याचा कोणी तरी तोतया, असेंच समजून आलें, तर मग तितकीच भयंकर निराशा होऊन, तिनेंच सर्वांनां वेड लागेल, अन् तेंहि अगदीं कायमचें ! मग तो अनर्थ मात्र अत्यंत भयंकर–नाहीं, त्याची नुसती कल्पनाहि करवत नाहीं. अरेरे ! तसें होईल तर त्या दोघां साध्वींच्यावरती तो निष्कारण दारुण वज्राघात होईल ! मला वाटतें, त्यापेक्षां तूर्त आपण या बाबतींत गप्पच रहावें हें फार चांगलें. आतां ही गोष्ट अगदीं उघडच आहे, कीं, ज्याला आपण सोळा वर्षांत एकदांहि बघितलें नाहीं, त्या माणसाच्या नुसत्या चेहऱ्याकडे पाहून त्याला तोच झणून ठरविणें हें काम अतिशय बिकट, त्याचप्रमाणें विलक्षण जबाबदारीचेंहि आहे. काय करावें ? हा येणारा माणूस जर खरा नाना नसून तोतयाच असेल, तर बोलण्याचालण्यांत,कशांत ना कशांत तरी चट्कन् फसून सांपडेल, यांत शंका नाहीं. मग तो खरा कोण हें शोधून काढायला कितीसा अवकाश ? बरेचसे उत्तम मध्यम तडाके दिल्यावर तो आपोआप वठणीवर येऊन होतो आहे कबूल चट्कन् ! मग द्यावा त्याला पोलिसांत ! अन् येणारा इसम जर खरोखरच नाना असेल तर ? अन् तो तसा आहे, अशीच सर्वांची खात्री पटली तर ? अहाहा ! तसें होईल तर त्यापेक्षां जगांत आनंदाची दुसरी गोष्ट तरी कोणती आहे ? परंतु देवा,असें घडून येणें शक्य तरी आहे का ? पण देवाची लीला अगदीं अगाध, अतर्क्य आहे !"

असें आपल्याशींच ह्मणून दिवाणजींनीं जानव्याच्या किल्लीनें टेबलाचा तो खण उघडला, व तें पत्र बाहेर काढलें. नंतर त्यांनीं तें अगदीं लक्ष्यपूर्वक, सूक्ष्म दृष्टीनें हळुहळू पुनः वाचावयाला आरंभ केला.

पत्र पुनरपि पूर्णपणें वाचून झाल्यावर ते पुनः विचार करूं लागले "असें हें पत्र लिहिणारा इसम तोतया असेल काय ? हें संभवनीय तरी कसें असेल ? इतक्या साऱ्या बारीकसारीक पण अगदीं पूर्णपणें खऱ्या गोष्टी, इतक्या वर्षांनीं दुसऱ्याला कळून तरी येणार कशा ? अहाहा, जर हा खरोखरीच अगदीं खराखुरा नानासाहेब असेल,—अहा—त्या ब्रह्मानंदाला पारावार नाहीं !"

त्या वेळीं घड्याळांत पावणेसहा वाजले होते. पुनः तें पत्र लिफाफ्यांत घालून काकासाहेबांनीं त्या खणांत ठेवलें, व ते उठून उभे राहिले. विचाराच्या भरांत खोलींतल्याखोलींत ते इकडूनतिकडे येरझारा घालूं लागले. मध्येंच चालतांचालतां थबकून ते एखाद्या खिडकीशीं उभे रहात, व शून्य दृष्टीनें कांहीं वेळ मोकळ्या आकाशाकडे पहात रहात, आणि विचारांची तीव्रता वाढतांच ते पुनः वेगानें येरझारा करूं लागत. अशा स्थितींत घड्याळांत सहांचे ठोके पडले.

हळुहळू दिवाणजींच्या मनांत याप्रमाणें विचारमालिका सुरू झाली "जर परवां हा इसम आल्यानंतर, तो खराखुरा नानासाहेबच आहे असें निःशंक रीतीनें सर्वांच्या मतानें ठरलें, तर कोणत्या ना कोणत्या तरी वाईट हेतूनें मुद्दामच ही अत्यंत आनंदाची बातमी मीं सर्वांपासून दोन दिवस गुप्त ठेवली, असा किंतु घरच्या साऱ्या मंडळीच्या मनांत साहजिकच येणार. त्यांच्या मनांत कदाचित् असाहि संशय उपस्थित होईल, कीं, नानासाहेब परत घरीं येणार, या बातमीनें मला अगदीं मरणप्राय दुःख झालें; आणि ह्मणूनच ही अत्यंत आनंददायक बातमी मीं मुद्दाम दाबून टाकली. या प्रचंड इनामतीचा कारभार माझ्या हातांत—वस्तुतः मीच खरा कर्ता इनामदार होऊन बसलों होतों, तो माझा अधिकार नाहींसा होईल, माझ्या वैभवाचा नानासाहेबांच्या आगमनानें लोप होईल, ह्मणून माझ्या पोटांत दुखूं लागून, मीं ही बातमी घरांतून चोरून ठेवली, असा माझ्यावर अगदीं उघड रीतीनें जरी नाहीं तरी मनांतल्या मनांत घरची मंडळी आरोप करतील. ही बातमी गुप्त ठेवण्यांत माझा खरा हेतु काय आहे, केवढ्या प्रचंड महत्त्वाचे नाजूक प्रश्न या वेळीं माझ्यासमोर दत्त ह्मणून उभे राहिले आहेत, याची त्या वेळीं कोणाला कल्पना येणार ? मीं कितीहि घसेफोड करून सांगितलें तरी मजवर कोणाचा विश्वास बसणार आहे ? काय करूं ? मोठा चमत्कारिक पेंच आहे हा ! यांतून मी आपली सुटका कोणत्या मार्गानें करून घेऊं ? करूं तरी काय ? आज पुनः एकादशी ! दोघीहि बायांनीं आज सकाळपासून पाण्याचा एक थेंबहि तोंडांत घातला नसेल. त्या अगदीं या वेळीं उपासानें थकून गेल्या असतील—निःशक्ततेनें अगदीं गळून गेल्या असतील. अशा स्थितींत या विलक्षण, अकल्पित, अचिंत्य आनंदातिशयाचा महाप्रबल आवेग त्या दोघींनां सहन तरी होईल काय ? आणि या बातमीमुळें कांहीं विलक्षणच परिणाम घडून आला तर ? राहूं द्या झालें आज ही बातमी ! उद्यां सकाळीं, पाणीबिणी तोंडांत घालून, त्या जरा सावध झाल्या, ह्मणजे प्रसंग पाहून हळूच सांगावी हवी तर ही गोष्ट त्यांनां !"

सूर्यास्ताला आतां फारसा अवकाश नव्हता. आणखीहि कांहीं वेळ दिवाणजी इकडूनतिकडे येरझारा घालीत राहिले. पुनः ते आपल्या मनाशीं ह्मणाले "छे ! तसें बिलकूल उपयोगीं नाहीं. आपला निश्चय अगदीं कुचकामाचा ! इतकी विलक्षण, इतकी मोठी बातमी, एक रात्र कां होईना, गुप्त राखून ठेवण्याचा अधिकार मला बिलकूल नाहीं—नाहीं. मी कां ह्मणून त्या दोघी अनाथ अबलांनां या ब्रह्मानंदापासून एक रात्र तरी दूर ठेवावें ? मी केवळ त्यांचा एक क्षुद्र नोकर—मला हा अधिकार नाहीं. जावें—आईसाहेबांनां तरी ही बातमी सांगितलीच पाहिजे; परंतु त्याबरोबरच त्यांनां एवढें तरी सावध करून ठेवलें पाहिजे, कीं, जणूं एकदम आकाशांतील चंद्रच आपल्या हातीं आला आहे, असा मात्र त्यांचा अगदीं दृढ समज होऊं नये. नाहीं तर एक करतां व्हायचें भलतेंच ! मोठ्या लोकांच्या प्रचंड संपत्तीच्या लोभानें मधुनमधून दुष्ट डांबीस लोक अशा रीतीनें तोतयेगिऱ्या कशा करतात, त्याबद्दलच्या कांहीं गोष्टीहि आईसाहेबांच्या कानांवर घालून ठेवल्या पाहिजेत. पेशवाईंतील भाऊसाहेबांच्या तोतयाची अन् त्याच्यामुळें भोळ्या बिचाऱ्या साध्वी पार्वतीबाईंच्या झालेल्या करुण स्थितीची सारी हकीगत त्यांनां नीट समजावून दिली पाहिजे. येणारा इसम हा खरा नानासाहेब नव्हे, तो त्यांच्या प्रचंड विषयसंपत्तीच्या लोभानें

कुणीतरी भामटा त्यांचें सोंग घेऊन आला आहे, असें धरूनच पहिल्यापासून चालणें कसें इष्ट आहे, तेंहि त्यांच्या मनावर मला उत्कृष्ट रीतीनें बिंबवून ठेवलें पाहिजे. देवा, तूंच आतां या वेळीं आमचा वाली आहेस!"

शेवटीं, हाच निश्चय कायम करून दिवाणजी वाड्यांत गेले, व त्यांनीं आईसाहेबांची एकीकडे भेट घेतली.

अतिशय सावधपणानें, नीट काळजी घेऊन दिवाणजींनीं नानासाहेबांच्या पत्राची गोष्ट हळूच आईसाहेबांपाशीं काढली.

ती ऐकतांच आईसाहेबांची जी स्थिति झाली, तिचें यथार्थ वर्णन करण्याचें सामर्थ्य आमच्या दुर्बल लेखणींत नाहीं. त्यांनां आनंदाच्या अतिरेकानें वेड लागण्याची पाळी आली. ह्मातारी एकदम हंसूं काय लागली, फुलून फुलून रडूं काय लागली, वेडे वेडे चाळे काय करूं लागली! आईसाहेबांनां आवरतां आवरतां दिवाणजींच्या नाकीं नऊ आले. या विलक्षण प्रसंगीं काय करावें, हें त्यांनां सुचेना. संशय सूचित करणाऱ्या दोन-चार गोष्टी आईसाहेबांनां सांगण्याचा काकांनीं पांच सात वेळ प्रयत्न केला—परंतु त्या आतां त्यांची कोणतीहि गोष्ट मुळीं ऐकूनच घेईनात! पावसाळ्यांतील नदीच्या प्रचंड लोंढ्यापुढें असहाय गवताचे पुंजके जसे कोठच्या कोठें प्रबल वेगानें वहात जातात, तशा आईसाहेबांच्या आनंदातिशयापुढें दिवाणजींच्या संशयमूलक गोष्टी कोठच्या कोठें पार वाहून गेल्या. आनंदातिशयाच्या अवर्णनीय आवेगानें सर्व वाडा जणूं हादरून गेला! इतक्यांत एकानें जाऊन एकदम रामाच्या देवळांतील मंगल सनईचौघड्याला सुरवात करविली!

त्या सनईच्या मधुर तानपलटेनें बागेंत वहिनीसाहेबांची काय स्थिति करून सोडली, त्याचें वर्णन आह्मीं मागील खंडाच्या शेवटच्या प्रकरणांत केलेंच आहे.

प्रकरण चवथें.

काकासाहेबांची सावधगिरी.

त्या दिवशीं रात्रीं वाड्यांतील एकाहि माणसाचा डोळ्याला डोळा कसा तो लागला नाहीं. आमच्या काकासाहेबांची तर गोष्टच पुसूं नका. त्यांच्या मस्तकामध्यें विचारांनीं नुसतें काहूर करून सोडलें होतें. या साऱ्या गोष्टींचा परिणाम तरी काय होणार आहे, याचा त्यांनां कांहीं केल्या अंदाजच लागेना!

दुसऱ्या दिवशीं जवळजवळ अगदीं अरुणोदयापासून दिवाणजींच्या घरीं लोकांची वर्दळ सुरू झाली. काल दोन घटका रात्रींच्या आंतच बाणवडींतील साऱ्या माणसांनां आणि पशुपक्ष्यांनां नानासाहेबांच्या भावि आगमनाची बातमी कळून चुकली होती. जो तो दिवाणजींच्या घरीं येऊन, ऐकलेली बातमी खरी कीं खोटी, याबद्दल त्यांनां हडसून खडसून प्रश्न विचारूं लागला. सर्वांनां काका गंभीरपणें एकच उत्तर देत होते—"गोष्ट खरी कीं खोटी तें सर्वांनां दोन दिवसांमध्यें कळून येणारच आहे!" हें एकच उत्तर दिवाणजी सर्वांनां देत खरे; पण तेंच देतांदेतां त्या ह्मातान्याचा प्राण अगदीं कंठाशीं आला!

शेवटीं लोकांच्या चौकशीच्या सरबत्तीपुढें दिवाणजींना पूर्ण पराभव होऊन ते घरांत पळून गेले, व त्यांनीं आपल्या गड्याला हुकूम केला—'कुणीहि आला, तरी त्याला आंत सोडूं नकोस. प्रत्येकाला सांग, काका आजारी आहेत—कुणालाहि भेटायचे नाहींत!'

स्नानसंध्या वगैरे नैमित्तिक कर्में आटोपून, थोडा फराळ करून, साडेआठ वाजण्याच्या सुमाराला काकासाहेबांची स्वारी आपल्या 'कचेरीं'त येऊन दाखल झाली. वाड्यांत नोकर पाठवून चौकशी करतां त्यांनां असें कळून आलें, कीं, आईसाहेबांची पूजा व जपजाप्य वगैरे आन्हिक आटोपलें असून, थोड्याच वेळांत ब्राह्मणाला उदक सोडून, भोजनाला बसावयाच्या त्या तयारींत आहेत.

आणखी अर्धाएक तास दिवाणजींनीं कचेरींतच इकडचीं तिकडचीं कामें पहाण्यांत घालविला, व अगोदर वर्दी पाठवून ते वाड्यांत आईसाहेबांच्या भेटीला आले. पूर्वीं आईसाहेब दिवाणजींशीं फारशा कधीं बोलत नसत; परंतु भाऊसाहेबांच्या मरणाच्या पूर्वीं दोनएक महिने ते आजारी पडून अंथरुणाला खिळले, तेव्हांपासून त्या दिवाणजींशीं बऱ्याच बोलूं चालूं लागल्या. काकासाहेबांबद्दल सर्वांप्रमाणेंच आईसाहेबांनांहि अत्यंत आदर असे, आणि आपल्या घराण्याचे ते खरे हित-

चिंतक व विश्वासू सेवक आहेत, याविषयीं त्यांची पक्की खात्री होती.

वहिनीसाहेबांच्या 'कचेरीं'त काकासाहेबांनां येऊन कांहीं फार वेळ झाला नाहीं, तोंच आईसाहेब तेथें येऊन ठेपल्या. दिवाणजींनीं त्यांच्या चेहऱ्याकडे निरखून पाहिलें, तेव्हां त्यांनां असें आढळून आलें, कीं, तेथें आदल्या दिवसाच्या आनंदातिशयाचें लवमात्रहि चिन्ह नसून, उलट एका प्रकारच्या तीव्र निराशेची घनछाया मात्र तेथें दाट दिसूं लागली आहे!

आईसाहेब येतांच काकासाहेबांनीं उठून त्यांनां नम्रपणें अभिवादन केलें, व ते झणाले "आईसाहेबांचें भोजन झालें ना?"

"हो, झालं. आतां नुकतीच जेऊन उठलें मी." असें ह्मणून आईसाहेब तेथील बैठकीवर लोडाच्या बाजूला त्यावर हात ठेवून बसल्या. त्यांचे डोळे या वेळीं खालीं लागले होते.

आईसाहेब आपण होऊनच, आपल्या मनांतील गोष्टीचा कांहीं उपक्रम करतील, या आशेनें दिवाणजींनीं कांहीं क्षण स्तब्ध बसून वाट पाहिली; परंतु आईसाहेब कांहीं बोलेनात किंवा वर डोळेहि करून पाहीनात!

तेव्हां दिवाणजींनीं आपण होऊनच बोलावयाला सुरुवात केली. त्यांनीं विचारलें "वहिनीसाहेबांची तब्बेत कशी आहे?"

"बरी आहे."

"रात्रीं पुनः फिटबिट आली होती का कांहीं?"

"नाहीं."

हें संभाषणहि अगदीं जितक्यास तितकें झालें. आईसाहेब आपण होऊन कांहीं अधिक बोलतील अशी आशा काकासाहेबांनां दिसेना.

पुनः कांहीं वेळ दोघेंहि अगदीं स्तब्ध होतीं. आदल्या दिवशीं, या येणाऱ्या 'नानासाहेबां'संबंधानें आईसाहेबांसमोर संशय प्रकट करण्याची कांहींच सोय नव्हती. आनंदाच्या अतिरेकानें त्या अगदीं वेड्या होऊन गेल्या होत्या; परंतु आज स्थिति निराळी होती. त्यांच्या हृदयवृत्ति आतां पुष्कळ स्थिरावल्या असून संशयाच्या गोष्टींचा उल्लेख ग्रहण करण्यापुरती तरी त्यांच्या ठिकाणीं आतां क्षमता उत्पन्न झाली होती. आतां, आपल्या मनांतील संशय आईसाहेबांजवळ प्रकट करावा; मग आपणाविषयीं त्यांच्या मनांत काय यावयाचें असेल तें येवो, असा दिवाणजींनीं आपल्या मनाशीं निश्चय केला. हो, कदाचित् हा येणारा इसम जर खोटा असला, आणि त्याचा तोतयेपणा सिद्ध व्हावयाला कांहीं काळ गेला, तर बाणथडीच्या इनामदारांच्या निर्मल कुलाच्या शुभ्र शीलावर कधींहि धुतला न जाण्याजोगा कलंक अगदीं कायमचा चिकटून बसेल! आईसाहेबांसमोर या संशयाचा उल्लेख करणें ही गोष्ट अतिशय कठीण आणि भयंकर तर खरीच; पण आपण जर ही गोष्ट त्यांनां सांगितली नाहीं, तर दुसरा कोण सांगेल? हें कठिण कार्य करावयाला आपणाशिवाय दुसऱ्या कोणाला साध्य आहे? आपलें हित कशांत आहे, अहित कशांत आहे, हें जाणावयाला तूर्त या मंडळीला ज्ञानशक्तिच नाहींशी झाली आहे. या आनंदातिरेकाच्या प्रसंगीं,पुढील सर्व परिणाम नीट पाहूं शकेल, इतकी तीव्र दृष्टि यांची तूर्त असणें शक्यच नाहीं. आपणहि डोळेझांक करून, कोठल्याहि भीतीनें, कोठल्याहि आशंकेनें आपणाला दिसणाऱ्या संशयाच्या गोष्टी जर आतां आईसाहेबांनां सांगितल्या नाहींत आणि तसेंच मूग गिळून स्वस्थ राहिलों किंवा यांच्या आनंदांत सामील झालों, तर आपण आपलें कर्तव्य नीट बजावलें नाहीं असें होईल—तो महा अधर्म होईल. अशा तऱ्हेनें दिवाणजींच्या मनांत विचारांनीं कल्लोल करून सोडला, व शेवटीं त्यांनीं आपला संशय आईसाहेबांनां सांगावयाचा निश्चय करून हळूच तशी गोष्ट काढली.

दिवाणजी ह्मणाले "आईसाहेब, मी एक गोष्ट— आपणाला सांगायचा काल पुष्कळ प्रयत्न केला—पण आपण ती मुळीं ऐकूनच घेतली नाहीं."

"कोणती ती गोष्ट?"

"आपल्या मनाला जर दुःख होणार नसेल तर सांगतों. ती गोष्ट आपण अवश्य ऐकून घेतली पाहिजे, अशीच आहे."

आईसाहेब कांहींच न बोलतां दिवाणजींकडे पहात राहिल्या.

"आईसाहेब, आपण माझ्यावर रागावूं नका, अशी हात जोडून आपणाला माझी विनंति आहे. मीं जर माझ्या मनांत आलेले विचार आपणाला या प्रसंगीं कळविले नाहींत, तर मी आपल्या कर्तव्याला चुकलों, खाल्ल्या अन्नाला जागलों नाहीं, असें होईल."

क्षणभर थांबून, एक दीर्घ निःश्वास सोडून आईसाहेब ह्मणाल्या "भाऊजी, मला काय सांगण्याविषयीं

तुह्माला इतकी आंच लागून राहिली आहे; तें माझ्या लक्ष्यांत आलं आहे. माझ्या मनांतहि त्या साऱ्या गोष्टी आल्या—पण जरा उशिरां आल्या, इतकंच. अन् त्यामुळंच, काल साऱ्या रात्रींत माझ्या डोळ्याला डोळा ह्मणून कसा तो लागला नाहीं—काल रात्रीं माझ्या डोक्यांत विचारांचा नुसता डोंब उठला होता! निरनिराळ्या विचारांनीं न् कल्पनांनीं मला इतकं भंडावून सोडलं, कीं, त्या यातना सोसण्यापेक्षां तळ्यांत जाऊन जीव द्यावा, असं मला वाटूं लागलं. माझ्या मनाची अशी भयंकर स्थिति झाली असतां, पहांटेच्या सुमाराला, मुलीच्या तोंडची एक गोष्ट मीं ऐकली अन् तेव्हांपासून मनाला किंचित् उसंत वाटूं लागला आहे."

वहिनीसाहेबांनीं आपल्या सासूबाईंनां अशी कोणती गोष्ट सांगितली, तें समजून घेण्याकरतां काकासाहेबांनां तीव्र उत्कंठा वाटूं लागली. ते ह्मणाले "काय सांगितलें आपणाला वहिनीसाहेबांनीं?"

गेल्याच्या आदल्या दिवशीं जें स्वप्न पडल्याचा वृत्तांत वहिनीसाहेबांनीं आदल्या दिवशीं यमुनेला सांगितला होता; तोच वृत्तान्त त्यांनीं पहांटेला आपल्या सासूबाईनां सांगितला होता. आईसाहेबांनीं हळुहळू तें स्वप्न काकासाहेबांच्या कानांवर घातलें.

तो वृत्तान्त ऐकून दिवाणजी आपणाशींच विचार करीत कांहीं क्षण स्तब्ध बसले. नंतर ते गंभीरतेनें ह्मणाले "आईसाहेब, किती झालें तरी हें एक स्वप्न आहे. स्वप्नावरच सर्व विश्वास ठेवून सत्यसृष्टींत मनुष्यानें त्याप्रमाणें वर्तन ठेवणें हें शहाणपणाचें होईल का? या अनिश्चित गोष्टीवरच भार टाकून आपणाला निश्चिंत कसें रहातां येईल, आईसाहेब?"

आईसाहेब ह्मणाल्या "तुह्मी ह्मणतां तें कांहीं खोटं नाहीं, भाऊजी! नुसत्या स्वप्नांवर अवलंबून कसं भागेल? पण करायचं कसं, तें तर मला सांगा—"

"मीहि त्याच विचारांत आहें कालपासून—"

"नीट चौकशी करतां आली असती तर फार चांगलं झालं असतं. पण ती करायला वेळ आहे कुठं? हा 'तीन-तारा' मठ आहे कुठंसा, भाऊजी, आहे तुह्माला ठाऊक?"

"मला कांहीं ठाऊक नाहीं. पण उत्तरहिंदुस्तानांत जाऊन त्याच्याबद्दलची माहिती मिळविणें शक्य आहे."

"अं:!" आईसाहेब चिंतातुर स्वरानें ह्मणाल्या. "तिकडे जाऊन चौकशी करून यायला किती-किती तरी वेळ लागेल अन् इतक्या अवकाशांत काय होईल न् काय नाहीं, त्याचा नेम का आहे, भाऊजी?"

"आपण ह्मणतां, तें खोटें नव्हे." दिवाणजी ह्मणाले.

"इथं आल्यानंतर, त्याला असं तर आपणाला ह्मणतां नाहीं येणार, कीं, 'हां, थांब बाबा! तुझ्या खरेपणाबद्दल आह्मांला संशय आहे. आह्मी तुझ्याबद्दल नीट चौकशी करतों—तोंपर्यंत हवा तर तूं पाहुणा ह्मणून रहा पंधरा दिवस. वाड्यांत खायला तुला मिळेल, पण तुला बाहेर रहावं लागेल!' भाऊजी, दुसरीहि एक गोष्ट लक्ष्यांत घेतली पाहिजे आपणांला—"

"काय ती?"

"समजा, तो खरंच आपला नाना असला, तर काय होईल? या अपमानानं भडकून जाऊन तो पुनः नाहींसा होईल. नाना किती अभिमानी मुलगा आहे, तें तुह्माला ठाऊकच आहे, भाऊजी!"

"हो, तें मला ठाऊक आहे." दिवाणजी चिंतातुर स्वरानें ह्मणाले. "आठएक दिवस तरी जर ही बातमी आपणांला आगाऊ कळली असती, तर निदान काशीला जाऊन तरी त्याच्याबद्दल गुप्तपणें आपणांला चौकशी करतां आली असती."

"तो काशीहून कधीं निघणार आहे?"

"आज. कालची एकादशी काशींत करून, ते आज तिथून निघणार. परवां सकाळीं ते मुंबईला बोरीबंदरवर उतरतील, अन् लगेच निघून ते तेरवां इथें येऊन पोहोंचतील."

क्षणभर स्तब्ध राहून आईसाहेब ह्मणाल्या "तर मग तुम्ही असं करा ना भाऊजी—"

"काय करूं?"

"आजच्या आज निघून तुम्ही उद्यां मुंबईला जा अन् काय वाटेल ती युक्ति करून तुम्ही त्याची गांठ घ्या. तुम्हाला जर त्याची कशी ना कशी तरी ओळख पटली, त्याच्याबरोबर कांहीं वेळतरी बोलण्याची संधि तुम्हाला मिळाली, तर वाटेल त्या रीतीनें तुह्माला त्याची परीक्षा करतां येऊन तो खरा कीं खोटा, हें हां हां ह्मणतां ठरवितां येईल."

आपली ही युक्ति पोक्त दिवाणजींनां तेव्हांच पटेल, असें आईसाहेबांनां वाटलें होतें; परंतु तसें कांहींच दिसलें नाहीं. दिवाणजी त्यांचें भाषण ऐकून कांहींच उल्हास न दाखवितां स्तब्ध बसले.

"काय वाटतं तुम्हाला, भाऊजी?"

"इतक्या लोकांच्या गर्दींत नेमकें त्यांनां कसें ओळखून काढतां येईल ? अन् नेमक्या अमूकच एका गाडीला ते बोरीबंदर स्टेशनावरच उतरतील असें थोडेंच आहे!"

"होय, तुम्ही ह्मणतां तें कांहीं अगदींच खोटं नाहीं."

यानंतर, बराच वेळपर्यंत या विषयासंबंधानें त्या उभयतांमध्यें चर्चा चालली होती.

आईसाहेब ह्मणाल्या "भाऊजी, जर हा खरा नाना नसून कुणी तोतया असता, तर इतक्या जुन्या काळच्या बारीकसारीक गोष्टी त्याला कशा कळून आल्या असत्या ? नानाचं लहानपणापासूनच 'नाना' हें नांव सर्वतोमुखी होतं; परंतु तिकडे मात्र, अगदीं प्रेमाच्या प्रसंगीं त्याच्या 'धुंडिराज' या नांवाच्या शेवटच्या अक्षरांवरून त्याला 'राज' ह्मणून हांका मारायला होई. ही गोष्ट फार थोड्यांनां माहिती असेल—"

"हो, तें मला माहीत आहे."

"अन्, तो नाहींसा होण्यापूर्वी खरोखरच स्वारीचे डोळे आले होते, हेंहि तुम्हाला आठवत असेल भाऊजी. त्या वेळीं तिकडे निळ्या रंगाची आरशी लावायला होत असे अन् हळदीचा रुमालहि नेहमीं डोळे पुसण्याकरितां हातांत असे तिकडच्या—आठवतं तुम्हाला ?"

मान डोलवून दिवाणजी म्हणाले "हो, आठवतें म्हणजे ? नानासाहेब जेव्हां नाहींसे झाले अन् त्यांचा कुठें पत्ताच लागेना—एक दिवस गेला, दोन गेले, तीन गेले, तरीसुद्धां जेव्हां त्यांचा कुठें थांग मिळेना—तेव्हां रडूनरडून भाऊसाहेबांचें बरें होत आलेलें डोळ्यांचें दुखणें पुनः उलटल्यासारखें झालें. कचेरीच्या खोलींत माझ्या शेजारीं बसून, डोळ्यांच्या असह्य यातनांमुळें ते जेव्हां 'हाय-हाय' करीत विवळूं लागत, तेव्हां मीं त्यांनां एकदोनदां म्हटलें 'भाऊसाहेब, रडूनरडून आपले अगोदरच दुखरे झालेले डोळे कायमचे देखील जातील हो!' तेव्हां, ते मला रडतरडत म्हणाले 'गुंडोबा, माझ्या डोळ्यांचा प्रकाशच मुळीं नाहींसा झाल्यावर या डोळ्यांच्या खाचांची मला जरूर तरी काय आहे ?' असें म्हणून, ते माझे दोन्ही हात आपल्या हातांत धरून हामसाहामसीं रडूं लागले." बोलतां बोलतां दिवाणजींचा गळा अगदीं दाटून येऊन त्यांच्या डोळ्यांतून झरझरां आसवें गळूं लागलीं. आईसाहेबांनां तर रडतां भुई थोडी झाली!

कांहीं वेळानें, पहिल्यानें दिवाणजींचें व नंतर आईसाहेबांचें रडूं थांबलें, आणि त्यांच्यांत पुनरपि त्याच गोष्टीसंबंधानें चर्चा सुरू झाली. 'वार्तासागर' वर्तमानपत्रांतील जाहिरातीची हकीगत, काशींतील क्षेत्रोपाध्ये काशीनाथभटजी देवधर यांच्याबद्दलचा उल्लेख, इत्यादिकांसंबंधानेंहि त्या उभयतांमध्यें बरीच चर्चा झाली.

शेवटीं, दिवाणजी म्हणाले "खरोखरच नानासाहेब असावेत, असें मलाहि खात्रीपूर्वक वाटतें. मग पुढें आमचें सर्वांचें नशीब!"

आईसाहेब म्हणाल्या "भाऊजी, परमेश्वरावरच आपण भरंवसा ठेवून राहूं या—"

"तोच आमचा आतां त्राता!"

"जर तो आमचा नाना खरोखरच नसेल—कुणी तोतया असेल, तर कोणत्या ना कोणत्या तरी साधनानें त्याची लुच्चेगिरी उघडकीला आणल्यावांचून परमेश्वर रहाणार नाहीं, हें खास समजा. तसें जर तो करणार नाहीं, तर भयंकर अनर्थ होईल—आमचा सर्वांचा, आमच्या घरादाराचा, आमच्या कुळाधर्माचा पार सत्यानाश होऊन जाईल—! भाऊजी, देव दयेचा सागर आहे—आम्हीं कुणाचं साऱ्या जन्मांत तिळभरहि कांहीं नुकसान केलं नाहीं. जाणूनसवरून एकहि अकार्य आमच्या हातून झालं नाहीं. आमच्या धर्माप्रमाणं, देवाला स्मरून, सत्याला स्मरून, आम्ही या क्षणापर्यंत वागत आलों आहों. आमचा असा सत्यानाश करायला देवाला तरी काय अधिकार आहे ? नाहीं भाऊजी, नाहीं. आपल्या धर्माच्या राज्यांत तो कधींहि असा अधर्म, अनाचार माजूं देणार नाहीं—"

बोलतांबोलतां आईसाहेबांचा स्वर उंचावत गेला, आणि त्यांच्या डोळ्यांत ईश्वरी तेज चमकूं लागलें. तें पाहून आईसाहेबांबद्दलची दिवाणसाहेबांची आदरबुद्धि दसपटीनें वृद्धिंगत झाली.

शेवटीं, आईसाहेबांनींच दिवाणजींनां तावडतोब मुंबईला जाण्याची सूचना केली. न जाण्यापेक्षां जाण्यानेंच कांहीं तरी फायदा होईल, असें त्यांनीं ध्वनित केलें. त्या शेवटीं म्हणाल्या "भाऊजी, तुम्ही व्यवहारचतुर आहां—आमच्या घराण्याबद्दल अन् तिकडच्याबद्दल तुम्हाला अत्यंत अभिमान, भक्ति अन् आदर आहे. अमूक एक रीतीनं मुंबईला जाऊन वागा, असं मी तुम्हाला सांगत नाहीं अन् सांगणंहि शक्य नाहीं,

तुम्ही तिथं जाऊन सुचेल तें करा अन् हर उपायानं त्याला गांठून त्याची कसून परीक्षा करा–"

आईसाहेबांचा निरोप घेऊन दिवाणजी उठले. त्याच दिवशीं ते मुंबईला रवाना झाले.

* * *

तिसऱ्या दिवशीं दुपारीं दोन वाजतां, आईसाहेबांच्या नांवानें एक अर्जंट टेलिग्राम येऊन थडकला. त्यांत पुढीलप्रमाणें मजकूर होताः—

"मुंबई, ता.—

नानासाहेबांनां घेऊन तिहींच्या पूना मेलनें निघत आहें. उद्यां त्या गाडीच्या वेळीं स्टेशनावर गाडी व लोक पाठवावे. आपण कसलीहि चिंता करण्याचें कारण नाहीं. देवानें आपणांवर पूर्ण दया केली आहे.

गुंडो नारायण पटवर्धन."

तार वाचतांच आईसाहेबांच्या डोळ्यांतून झरझरां अश्रुपात सुरू झाला. त्यांनीं तेथें परमेश्वराला साष्टांग नमस्कार घालून त्याला सहस्रशः धन्यवाद दिले.

चहूंकडे एकच आनंदीआनंद झाला !

* * *

दुसऱ्या दिवशीं सकाळीं, इनामदारांच्या वाड्याच्या तबेल्यांतून भाऊसाहेबांची मोठी थोरली गाडी निघाली. तिचे दोन घोडे थाटानें पावलें टाकीत स्टेशनकडे चालले. बरोबर वाड्यांतील बरेच नोकरचाकर स्टेशनाकडे जाऊं लागले. मोठ्या गाडीबरोबर धाकटी बैलांची गाडीहि तिकडे रवाना झाली.

आज बाणथडीच्या आनंदीआनंदाला सीमा नव्हती! वाड्यांतील नोकरांनां–कचेरीच्या कारकूनमंडळीला आज अर्थातच आनंदाची सुटी होती. गांवचे लोकहि आनंदानें आज अगदीं फुलून गेले होते. बरीच मंडळी गाडीच्या मागोमाग स्टेशनकडेहि जावयाला निघाली. पुष्कळ लोकांनीं तर आपसांत असा विचार ठरविला, कीं, गांवाच्या बाहेर जाऊन बसावें आणि इनामदारसाहेबांची गाडी येतांच, त्यांचें मोठ्या थाटानें स्वागत करून त्यांनां वाजतगाजत मिरवीत त्यांच्या वाड्यांत आणून पोहोंचवावें.

आज आईसाहेब म्हणजे मूर्तिमंत आनंदच बनल्या होत्या ! सारा वाडा आज आनंदानें हंसूं उडूं लागला होता ! गांवांतल्या सर्व बायका वाड्यांत जमून,आपल्या प्रचंड, पण सुमधुर हास्यानें त्यांनीं सारा वाडाच जणूं आपल्या डोकीवर घेतला होता ! वाड्यांतले नोकर-चाकर, दासीमोलकरणी यांनीं आनंदातिशयानें आपला सणासुदीचा पोषाक चढविला असून मारे फलकारे मारीत ती मंडळी इकडूनतिकडे उगीच भटकत होती.

आज किती तरी दिवसांनीं, यमुनेच्या चेहऱ्यावर लोकांनीं हास्यच्छटा विराजमान झालेली पाहिली. आज तिचा आनंद गगनांत मावत नव्हता. ती आज उंची लुगडें नेसली असून, आईसाहेबांनीं दिलेले दोनचार ठळक ठळक दागिनेहि तिनें अंगावर चढविले होते.

आणि आमच्या चंपाताई ? आतां आपली नोकरी खास जाणार, असें आज त्यांनां दोनतीन दिवस खात्रीपूर्वक वाटूं लागलें होतें. हो, वहिनीसाहेबांचे खरेखुरे यजमान आल्यावर, त्यांची 'सहचरी' म्हणून आपणाला येथें उगीच नोकरीवर कोण ठेवतो, आणि आपल्या 'दादा'चा हेतु अशा रीतीनें पूर्ण विफल झाल्यानंतर तो तरी आपणाला येथें कसचा राहूं देतो, असें चंपेला वाटूं लागलें होतें; परंतु तीहि आजच्या प्रचंड आनंदोत्सवांत अगदीं मोकळ्या मनानें, उल्लासपूर्वक मिसळली होती. तिच्या अंतर्भागीं गायनाच्या लहरींवर लहरी उसळून राहिल्या होत्या; परंतु तिच्यासारख्या 'निष्ठावान् ब्राह्मण विधवे'नें ताना झोडणें, या अत्यानंदाच्या प्रसंगींहि आमच्या समाजानें अत्यंत गर्हणीय मानलें असतें आणि म्हणूनच तिचा या बाबतींत कांहीं उपाय चालण्यासारखा नव्हता. म्हणून ती आंतल्याआंत छट्फट् करीत, पण अगदीं हळूच आपणापाशीं संगीत पदें गुणगुणत इकडूनतिकडे फिरत होती.

आणि आमच्या हतभागी वहिनीसाहेब ? त्यांची इच्छा नसतांहि त्यांनां आज बहुमूल्य वस्त्राभरणांनीं नख–केशान्त थाटमाटानें नटणें भाग पडलें होतें. एका एकीकडच्या खोलींत दरवाज्याला कडी लावून त्या व यमुना बसल्या असून, यमुना वहिनीसाहेबांची पांचपेडी वेणी घालीत होती. त्यांच्या केशांनां लावलेल्या सुगंधी तेलाच्या घमघमाटानें सारी खोली अगदीं दरवळून गेली होती. शेजारच्या खोलींत, गांवांतील कांहीं तरुण तरुण मुली बसून, माळा गुंफीत होत्या. त्या खोलींत निरनिराळ्या जातींच्या सुंदर सुंदर सुगंधी फुलांच्या राशीच्या राशी विखुरल्या होत्या.

सुमारें दहा वाजण्याच्या सुमाराला गांवच्या सीमेवरून वाद्यांचा ध्वनि ऐकूं येऊं लागला.

थोड्या वेळांत बैलांची धमनी, खुळखुळ व घडघड असा मिश्र आवाज करीत, कचेरीच्या समोर येऊन उभी राहिली. गाडींतून काकासाहेब खालीं उतरले, व तसेच घाईघाईनें तडक आंत वाड्यांत गेले.

आईसाहेब कित्येक प्रौढ व तरुण स्त्रियांसह वाड्याच्या दरवाज्याशींच उभ्या होत्या. आईसाहेबांच्या हृदयाची या वेळीं काय स्थिति झाली होती, त्याचें यथार्थ वर्णन करण्याचें सामर्थ्य आमच्या लेखनीमध्यें नाहीं.

आईसाहेब दृष्टीला पडतांच, दिवाणजी त्यांनां अभिवादन करून धांपा टाकीत टाकीत म्हणाले "आईसाहेब, नानासाहेब आले—"

"कुठें आहे, कुठें आहे माझा बाबा ?" आईसाहेबांचा गळा अगदीं दाटून आला, तोंडून शब्द फुटेना.

"त्यांची गाडी अन् सारे लोक, श्रीगजाननाच्या देवळांत आहेत. नानासाहेब म्हणाले, 'वाड्यांत जायच्यापूर्वीं अगोदर कुलस्वामीचें दर्शन घेऊन जाऊं.' आईसाहेब, बाणथडीचे न् भोंवतालच्या दोनचार गांवचे लोक तेथें जमले आहेत. श्रीगजाननाच्या पायां पडून नानासाहेब आपल्या दर्शनाला येतील. आपणाला खबर देण्यासाठीं मी घाईघाईनें पुढें धांवत आलों."

आईसाहेब रडतरडत म्हणाल्या "भाऊजी, माझ्या बाबाला यायला अजून कितीसा अवकाश लागेल हो ?"

"नाहीं–फार वेळ नाहीं आतां त्यांनां यायला."

पदरानें डोळे पुसून आईसाहेब कांहीं क्षण स्तब्ध राहिल्या. नंतर त्या गद्गद स्वरानें म्हणाल्या "भाऊजी, त्याची भेट कशी काय झाली हो ? कांहीं भय किंवा घोटाळाबिटाळा तर नाहीं ना ?"

दिवाणजी आवेशानें म्हणाले "नाहीं आईसाहेब, देवाच्या दयेनें कांहीं भय नाहीं न् घोटाळाहि नाहीं. अगदीं खरेखुरे आपले नानासाहेबच !"

"होय ना ? देवा—"

"मी काल सकाळींच नागपूरमेलला बोरीबंदर स्टेशनवर गेलों. प्रत्येक गाडीला स्टेशनवर जायचा मीं निश्चयच केला होता. पहिल्याच गाडीला नानासाहेब येतील, अन् आले तरी त्यांची माझी भेट होईल, अशी मला कल्पनाहि नव्हती. मी आपला उगीच स्टेशनावर जाऊन राहिलों होतों, इतकेंच. ठरल्या वेळापेक्षां अर्धा तास उशिरानें गाडी काल स्टेशनांत आली. शेंकडों लोक गाडींतून उतरले अन् एकच गर्दी उडाली. मी आपला प्लॅटफॉर्मवर, साधारण मध्यभागीं उभा राहून श्रीगजाननाचें नामस्मरण करीत जवळून येईल जाईल त्याच्या तोंडाकडे पहात होतों. इतक्यांत, भगवीं वस्त्रें परिधान केलेला एक तरुण, माझ्याजवळून जातांजातां माझ्या चेहऱ्याकडे पाहून एकदम चमकून थबकून उभा राहिला अन् मला त्यानें विचारलें 'माफ करा अं-आपण कुठचे ?' मीं उत्तर दिलें 'बाणथडी माझा गांव.' माझें हें उत्तर ऐकतांच, तो माझ्या तोंडाकडे किती तरी वेळ एकसारखी निश्चल दृष्टि लावून उभा राहिला अन् शेवटीं मला म्हणाला 'आपण गुंडोपंत काकासाहेब कारभारी काय ?'–आनंदानें माझें हृदय अगदीं भरून येऊन मीं म्हटलें "आपण नानासाहेब काय ?" "होय, तोच मी !" असें त्यांनीं म्हणतांच, आपण काय करतों आहों, याचें भान मला न राहून मीं त्यांनां तेथल्या तेथें हृदयाशीं घट्ट आवळून धरलें. आईसाहेब, त्या वेळीं आम्हां दोघांची जी स्थिति झाली, ती काय सांगूं आपणाला ? ते स्फुंदूनस्फुंदून रडूं लागले–मीहि तसाच रडूं लागलों. आमच्या दोघांच्या भोंवतीं हां हां म्हणतां ही गर्दी जमली !–अहो बकाली मुंबई ती ! तेव्हां कुठें आम्ही थोडे शुद्धीवर आलों."

आईसाहेबहि हें ऐकून पुनः रडूं लागल्या. थोड्या वेळानें डोळे पुसून त्या म्हणाल्या "भाऊजी, अजूनहि भगवींच का वस्त्रं आहेत त्याचीं ?"

"हो."

"अजून कां नाहीं बाई टाकलीं त्यानं तीं ?"

दिवाणजी म्हणाले "त्यांनां दुसरीं वस्त्रें मिळणार कुठें न् ते तीं अंगावर घेणार तरी कुठें ? इथें घरीं आल्यावर तीं वस्त्रें नानासाहेब फेंकून देतील; नाहीं तर आम्ही तीं त्यांनां टाकायला लावूं."

इतक्यांत वाद्यांचा ध्वनि त्यांनां दुरून ऐकूं येऊं लागला. त्याबरोबर आईसाहेबांच्या हृदयाला कांहीं विलक्षण भावनांचा अनुभव येऊं लागला. हळुहळू वाद्यध्वनि जवळ जवळ ऐकूं येऊं लागला. हळुहळू लोकसमुदायाच्या आनंदाचा जयध्वनिहि स्पष्ट ऐकूं येऊं लागला.

थोड्याच वेळांत ती सारी मिरवणूक कचेरीच्या पुढील प्रशस्त पटांगणांत येऊन थडकली. गाडीहि कचेरीच्या दरवाजाशीं येऊन उभी राहिली.

इतक्यांत दिवाणजी आंतून धांवतधांवत येऊन म्हणाले "अरे, गाडी त्या दरवाजाशीं नेऊन उभी करा. एकदम आंत जायची स्वारी, समजलांत ?"

वाड्यांतली नोकरमंडळी एकदम ओरडूं लागली "चला, व्हा बाजूला, गर्दी मोडा—गाडी तिकडे जायची—"

'नानासाहेबकी जय!' सर्व लोक एकदम ओरडले.

गाडी दरवाजाजवळ जातांच, गणपतराव खालीं उतरले. त्यांचा हात धरून दिवाणजी त्यांनां तडक आंत घेऊन गेले.

गणपतराव दृष्टीला पडतांच आईसाहेब वेड्याप्रमाणें त्यांच्याकडे धांवत जाऊन रडतरडत ओरडल्या "आलास–माझ्या बाबा!" असें म्हणून त्यांनीं त्याला हृदयाशीं घट्ट आंवळून धरलें.

प्रचंड वाद्यध्वनीनें, लोकांच्या गडबडीनें व जयजयकारांनीं आणि वाड्यांतील जमलेल्या बायकांच्या आनंदशब्दानें, सारा बाणथडी गांवच हादरून गेला!

प्रकरण पांचवें.

'लोक काय बोलतात!'

गणपतरावांनां, अर्थात्च आपला पुत्र समजून, आईसाहेबांनीं हृदयाशीं घट्ट धरून आंत नेलें.

कचेरीच्या समोरील विस्तृत अंगणांत लोकसमुद्राला सारखी भरती भरत होती. गाडीच्या मिरवणुकीबरोबर जितके लोक आले होते, त्यापेक्षां त्यांच्यांत आतां केवढी तरी प्रचंड भर पडली होती. हळुहळू, प्रतिक्षणीं तो लोकसमुदाय आणखीहि वाढतच होता. सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद आणि तीव्र कुतूहल हे विकार स्पष्टपणें दिसत होते. मिरवणुकीला कोणत्या ना कोणत्या तरी कारणानें मुकून, जे लोक मागाहून तेथें येऊन पोहोंचले होते, ते, अगोदर आलेल्या लोकांनां प्रश्नांवर प्रश्न विचारीत होते, व तेहि त्यांच्या प्रश्नाच्या माऱ्याला तोंड देतांदेतां अगदीं जेरीला येत चालले होते.

मिरवणुकीबरोबर जे गांवचे आणि परगांवचे सभ्य आणि थोरथोर आणि वयस्क लोक आले होते, त्यांनां दिवाणजी, गोविंदराव वगैरे मंडळी आदरपूर्वक नेऊन थोरल्या दिवाणखान्यांत बसवीत होती. मागाहून येणारे 'थोर' लोकहि गोविंदराव तेथेंच आणून बसवीत होते. वाड्यांतील कित्येक मंडळी त्यांनां पानसुपारी व अत्तरगुलाब देण्यांत व साखर वांटण्यांत गढून गेली होती.

आमचे दिवाणजी काकासाहेब दिवाणखान्यांत शिष्टमंडळीच्या चौकशीच्या अनेक प्रश्नांला 'तोंड देण्यां'त दंग होऊन गेले होते. मुंबईला बोरीबंदर स्टेशनवर नानासाहेबांची पहिली दृष्टिभेट झाल्यापासून तों चालू क्षणापर्यंतची सर्व हकीगत ते थोडथोडी थोडथोडी उत्तरांच्या रूपानें लक्ष्यांत ठेवून सर्वांनां हळुहळू सांगत होते. मुंबईला आल्यानंतर, वडील व बंधु वारल्याची शोकजनक बातमी आपण नानासाहेबांच्या कानांवर कशी युक्तियुक्तीनें घातली, ती ऐकतांच त्यांची दुःखानें एकदम कमर खचून त्यांनीं रडूनरडून कसा शोक केला, त्यांचें समाधान करून त्यांनां शांत करावयाला आपणाला किती विलक्षण कष्ट पडले, गाडींत वारंवार नानासाहेबांच्या शोकसागराला मधुनमधून एकसारखी कशी भरती येत होती, ती हटवतां हटवतां आपल्या नाकीं नऊ कसे येत होते, इत्यादि इत्यादि सर्व हकीगत दिवाणजी तेथील शिष्ट मंडळीला सांगण्यांत अगदीं रंगून गेले होते.

इतक्यांत, त्यांनां कसलीशी आठवण होऊन, जवळच बसलेल्या रामभटजींकडे–इनामदारांच्या उपाध्यांकडे वळून ते ह्मणाले "भटजी, नानासाहेब तर काशीला विश्वेश्वराच्या चरणांपाशीं बरेच दिवस होते न् त्यांनां गंगेचीं स्नानेंहि किती तरी घडलीं आहेत. आतां पितृनिधनाच्या अशौचांतून त्यांची 'स्नानात् शुद्धिः' नाहीं का? शिवाय काल बातमी सांगितल्यावर मुंबईला त्यांनां पुनः मी गंगोदकस्नान घालण्याची व्यवस्था केली होती."

रामभटजी ह्मणाले "भाऊसाहेबांनां जाऊन दोन वर्षें–नाहीं, दोन वर्षें नाहीं झालीं–"

"नाहीं. दोन वर्षें पुरीं व्हायला थोडे दिवस आहेत अजून. ज्येष्ठांत श्राद्ध त्यांचें—"

मान हालवून भटजी म्हणाले "मग नाहीं बुवा! सद्यःशौच नाहीं–स्नानात् शुद्धि नाहीं!"

"मग?" दिवाणजी किंचित् भिऊन म्हणाले.

"दुसरा कुणी सपिंड असता तर 'स्नानात् शुद्धिः!' पण हें पडले नानासाहेबांचे वडील न् महागुरु. तेव्हां पक्षिणी तरी हवीच हवी! बाकी काशीविश्वेश्वराच्या

दर्शनानें न् गंगामाईच्या स्नानानें त्यांचें अशौच केव्हांच नाहींसें झालें आहे म्हणा. तरी पण लोकाचार आहे. तेव्हां थोडा तरी पाळला पाहिजे." असें म्हणून 'हेः हेः' करीत भटजींनीं नाकपुड्यांच्या जोडगोळींत तपकिरीची दारू ठांसून भरली !

"असें ह्मणतां ? तर मग थोडी चुकी झाली आमची. मुंबईच्या एका शास्त्र्यांनीं आह्माला सांगितलें, कीं, ' गंगास्नानात् शुद्धिः !' "

" हेः हेः ! इंग्रजी शास्त्री असेल कुणी तरी !"

" तर मग नानासाहेबांनां हें सांगितलें पाहिजे. "

इतक्यांत आंतून एक नोकर येऊन म्हणाला "काकासाहेब, गाडीचा कोचमन् न् सैस, अन् बरोबर गेलेली नोकरमंडळी बक्षिसासाठीं अडून बसली आहे आईसाहेबांजवळ !"

" मग आईसाहेब काय म्हणतात ?"

" त्यांनीं सांगितलें आहे, कीं, 'त्यांपैकीं प्रत्येकाला एकेक गिनी द्या' म्हणून–अन् एकेक धोतरहि द्यायला सांगितलें आहे त्यांनीं. "

" नानासाहेबांच्या आज प्रत्यक्ष उपयोगीं पडलेली किती मंडळी आहेत ?"

क्षणभर विचार करून नोकर म्हणाला " दहा. "

" तर मग त्यांनांच हें बक्षीस मिळेल. बाकीच्यांची व्यवस्था मी मागाहून करीन. "

असें म्हणून दिवाणजी तेथून उठून कचेरींत गेले, व तेथील लोखंडी तिजोरी उघडून त्यांतील एका कप्प्यांतून त्यांनीं दहा चकचकीत गिन्या बाहेर काढल्या, आणि त्या तीनतीनदां नीट मोजल्या. नंतर बाहेर येऊन, त्या दहा नोकरांनां बोलावून आणून, आईसाहेबांचा हुकूम त्यांनां सांगून ते म्हणाले "ही एकएक गिनी आजच्या आनंदाच्या प्रसंगीं आईसाहेब तुम्हांला बक्षीस देताहेत. एकएक धोतराचें पान तुम्हांला द्यायलाहि त्यांनीं मला हुकूम केला आहे. पण धोतरें विकत घेऊन ठेवलेलीं नसल्यामुळें आज तीं तुम्हांला देतां येत नाहींत. उद्यां तुह्मांला धोतरें देण्याची व्यवस्था होईल. बाकी सर्व नोकरांनांहि योग्य बक्षिसें आईसाहेबांकडून देण्यांत येतील. तूर्त ही एकएक गिनी तुह्मी घ्या."

हा देखावा पाहून सर्व मंडळी आनंदानें 'नानासाहेबकी जय ! आईसाहेबकी जय !' असा जयध्वनि करूं लागली. ती नोकरमंडळी तर आनंदाच्या भरांत नृत्यच करूं लागली.

हा देखावा पाहून व दिवाणजींनीं नोकरांनां उद्देशून केलेलें भाषण ऐकून लोक एकमेकांच्या कानांशीं लागून बोलूं लागले " आले ते आपलेच चिरंजीव, अशी आईसाहेबांनांहि पुरी ओळख पटलेली दिसते. नाहींतर नोकरांनां एकेक गिनी बक्षीस द्यायला त्यांनीं हुकूम दिला नसता."

आईसाहेबांच्या हुकुमाची तामीली करून दिवाणजी पुनः दिवाणखान्यांतील शिष्टमंडळींत येऊन बसले. गोष्टी निघतांनिघतां मध्येंच पत्राचीहि गोष्ट निघाली.

दिवाणजी ह्मणाले " तें रजिस्टर पत्र आलें, तेव्हां केशवराव, हरिभाऊ न् हे व्यंकटराव तर माझ्याजवळ बसले होते."

जवळच्या एका शिष्टाला आपलें कुतूहल कांहीं केल्या दाबतां येईना, तेव्हां त्यानें झट्कन् विचारलें " काय लिहिलें होतें त्या पत्रांत ?"

दिवाणजींनीं उत्तर दिलें "आज आपण बाणथडीला येऊन पोहोंचूं, असें नानासाहेबांनीं त्या पत्रांत लिहिलें होतें. कुठें गेलें बरें तें पत्र ? हो–या आंतल्या खिशांतच तर तें मीं ठेविलें होतें.–हो–हें आहेच कीं तें–" असें ह्मणून खिशांतून पत्र काढून तें ते वाचावयाचा प्रयत्न करूं लागले; परंतु चष्म्याशिवाय तें वाचण्याचा त्यांचा तो अट्टाहास व्यर्थ गेला ! शेवटीं ते किंचित् हंसून ह्मणाले " चाळशी विसरलों वाटतें मी आफिसांत. तुह्मीच वाचा ना हें व्यंकटराव ! जरा मोठ्यानेंच वाचा, ह्मणजे सर्वांनांच आपलें एकदम ऐकूं जाईल."

'तें' पत्र वाचावयाची व्यंकटरावांनां किती उत्कंठा लागून राहिली होती, ती एक त्यांनां स्वतःला व थोडी बहुत आमच्या प्रिय वाचकबंधुभगिनींनां ठाऊक ! तें झट्कन् दिवाणजींच्या हातून ओढून घेऊन व्यंकटरावांनीं मोठ्यानें वाचावयाला सुरुवात केली. तें पत्र व्यंकटरावांनां वाचावयाला सांगण्यांत केवळ त्या मंडळीची जिज्ञासा तृप्त व्हावी, एवढाच दिवाणजींचा उद्देश नव्हता. नानासाहेबांच्या व्यक्तित्वाबद्दल त्या सर्वांच्या सर्व शंकांचें समाधान व्हावें, आणि पत्रांतील मजकूर, या शतमुखी तारायंत्रानें सर्व गांवभर ताबडतोब पसरावा, हीच वास्तविक त्या धोरणी, स्वामिभक्त ह्मातान्याची अंतर्यामींची खरी इच्छा होती.

व्यंकटरावांचें पत्र–वाचन पुरें होतें न होतें, तोंच आंतून एक नोकर येऊन म्हणाला " काकासाहेब,

आपणाला आईसाहेब तावडतोब येऊन जायला सांगताहेत."

इतक्यांत एक दोघां शिष्टांनीं त्या नोकराला प्रश्न केला " काय रे, नानासाहेब काय करताहेत ?"

" आतांच हातपाय धुऊन ते वर जाऊन बसले आहेत."

" बाहेर येणार आहेत का ते ?"

"तें कुणाला ठाऊक !" असें ह्मणून, दिवाणजींकडे पाहून, तो तेथून निघून गेला.

काका जवळच्या शिष्ट–विशिष्टांनां उद्देशून ह्मणाले. " तर मग मी जरा जाऊन येतों आईसाहेबांकडून. आपण बसा—"

कोणी कोणी त्यांनां ह्मणूं लागले " काय हो काकासाहेब, नानासाहेब आतां बाहेर येण्याचा कांहीं संभव आहे का ? येत असले तर बसतों आम्ही–नाहीं तर–"

कपाळावर हात चोळीत दिवाणजी ह्मणाले "त्यांनां, खरें सांगायचें तर, प्रवासाचे इतके श्रम झाले आहेत, कीं, कांहीं विचारूं नका ! मला वाटतें ते पडले असतील–इतक्यांत इकडे येतील असें मला नाहीं बुवा वाटत. उद्यां आपण आलांत तर जरूर आपली भेट होईल. "

हरिभाऊ ह्मणाले " तर मग आम्ही उठतोंच आतां. पोटांत कावळेहि कोकावूं लागले आहेत आमच्या सपाटून. काकासाहेब, आम्ही त्यांच्यासाठीं बाहेर बराच वेळ बसून राहिलों होतों, असें जरूर सांगा बरें का नानासाहेबांनां ?"

" अगदीं नांवें घेऊन सांगा–" केशवराव म्हणाले.

" सांगेन, जरून सांगेन. बरें मंडळी, जाऊन येतों मी आंतून " असें ह्मणून, त्या शिष्टांच्या विशेष परवानगीची वाट न पहातां काकासाहेब तेथून निघून गेले.

दिवाणजी निघून जातांच दिवाणखान्यांतील सर्व मंडळीहि उठली व अंगणांत जाऊन पहातात, तों आंतून आलेल्या एका नोकराभोंवतीं लोकांचा हा घोळका जमला असून तो सांगत असलेली हकीगत ते मोठ्या उत्सुकतेनें ऐकत आहेत.

नोकर सांगत होता " आईसाहेब तर एकसारख्या रडत आहेत. त्या नानासाहेबांनां ह्मणत आहेत 'बाबा, आलास घरीं हें चांगलेंच झालें; पण जर दोन वर्षें अगोदर येतास तर तिकडे शांतपणें समाधानांत तुझ्या मांडीवर डोकें ठेवून जायला झालें असतें.' आईसाहेबांनां याप्रमाणें रडतांना पाहून नानासाहेबहि स्फुंदस्फुंदून रडताहेत एकसारखे. "

दिवाणखान्यांत जमलेली शिष्टमंडळी निघालेली पाहून, पटांगणांत जमलेली मंडळीहि फांकावयाला प्रारंभ झाला. लोकांचे लहानमोठे थवे बनून रस्त्यानें सर्वांचे निरनिराळे तर्कवितर्क सुरू झाले. ज्या दुकानांत, ओसरीवर, पडवींत, देवळांत पांचसातजण जमून पानतंबाखू आणि चिलमी फस्त करीत, तेथें दोनदोन वाजल्यापासून ती मंडळी जमूं लागून एकमेकांमध्यें हलुहलू फुसफुस करूं लागली. सर्व ठिकाणीं, वादविवादाचा, तर्कवितर्कांचा, फुसफुशीचा विषय एक–'जो आज आला आहे, तो खराखुरा नानासाहेब इनामदार आहे का कोणी त्यांची प्रचंड संपत्ति लाटण्याकरितां तोतया उभा राहिला आहे ?' या वादविवाद करणाऱ्या मंडळीकडे जर सूक्ष्मपणें कोणीं पाहिलें असतें, तर त्याला असें आढळून आलें असतें, कीं, ती बहुतेक मंडळी काळ्या केसांची आहे–पांढरे केंसवाल्यांपैकीं कोणी फारसें या भानगडींत उघडपणें तरी पडलें नाहीं. या कृष्णकेशांपैकीं बऱ्याच मंडळीचें मत असें होतें, कीं, आलेला इसम नानासाहेब नाहीं–पक्का तोतया आहे कोणी तरी !–कोणी कोणी या मताचें खंडन करतांनाहि आढळून येत–अगदींच नाहीं असें नाहीं. ज्यांचे केंस साधारण पांढरे झाले होते, ते 'हो' किंवा 'नाहीं' हें स्पष्टपणें कांहींच बोलत नव्हते. ज्यांची अगदींच अंबाडी बनली होती, त्यांपैकीं बरेचसे ह्मणत होते–" आलेला इसम खात्रीनें नानासाहेबच असला पाहिजे. दिवाणजीसारख्या हुषार, चाणाक्ष माणसाच्या अन् प्रत्यक्ष आईसाहेबांच्या डोळ्यांत धूळ फेंकणें, तोतयाच्या बापाला तरी शक्य आहे का ?"

आपल्या परिचयाचे श्रीयुत हरिभाऊ बापट, यांची ओसरी ह्मणजे बाणथडी गांवांतील एक अत्यंत प्रसिद्ध अड्डा होता. अडीचतीन वाजावयाच्या सुमाराला तेथें हलुहलू ' क्लब'चे मेंबरलोक जमूं लागले, व थोड्याच अवकाशांत पूर्ण ' कोरम् ' भरलें.

त्या सर्वांनां बसवून हरिभाऊ हळूच ' औषध ' घेण्याच्या निमित्तानें ह्मणून आंत–स्वयंपाकघरांत आले. चहाचा प्रसार जरी खेड्यापाड्यांतून त्या काळीं फारसा झाला नव्हता, तरी हरिभाऊंनीं मुंबई-पुण्याहून ही कमाई करून आणली असून, त्यांच्या विधवा भावजयेनें ती घरांत अगदीं कायमचीं करून टाकिली होती.

मंडळीला चहा देण्याच्या भानगडींत हरिभाऊ सहसा कधींच पडत नसत, परंतु ते मंडळींत बसलेले असले, आणि त्यांची चहाची वेळ तितक्यांत झाली तर ‘औषध’ अगर ‘काढा घेऊन येतों,’ असें निमित्त मंडळीला सांगून ते आंत जाऊन गुपचूपपणें तें पेय गिळंकृत करून तोंड वेडेंवांकडें करीत परत येत !

सुमारें पंधरावीस मिनिटांनीं हरिभाऊ ओसरीकडे येत आहेत, तों मंडळीचा वादविवाद अगदीं ऐनरंगांत आला आहे, असें त्यांनां आढळून आलें. दरवाज्यामागें काळोखांत हळूच उभे राहून ते तो मुकाट्यानें ऐकूं लागले.

राघूनाना परांजपे (बहुतेक केंस पिकलेले–‘अंबाडी’ या सदराखालीं येणारे) ह्मणत होते “ठीक आहे; जर तो खरोखरचा नानासाहेब नाहीं, तर मग बोरीबंदर स्टेशनवर, शेंकडों लोकांमध्यें, त्यानें दिवाणजींनां अगदीं नेमकें कसें हो ओळखलें ?”

व्यंकटराव कुळकर्णी हात हलवीत प्रचंड आवेशानें ह्मणाले “ राघूनाना, इतकें देखील कसें हो तुमच्या लक्ष्यांत येत नाहीं ? अहो, जो बडा लफंगा माणूस एवढी मोठी संपत्ति हाताखालीं घालण्याच्या विचारानें इतकें धाडस करून इथपर्यंत आला, तो एवढें धोरण बांधल्याशिवाय किंवा सारी माहिती मिळविल्याशिवाय का आला असेल ? अहो, अगोदरपासूनच त्यानें दिवाणजींनां नीट पाहून त्याच्या साऱ्या खाणाखुणा पक्क्या लक्ष्यांत धरून ठेवल्या असतील ! शंकाच नको त्याबद्दल अगदीं, राघूनाना !”

राघूनाना ह्मणाले “कांहीं तरी आहे आपलें तुमचें तर्कट ! सोळावर्षांपूर्वी भाऊसाहेबांचे डोळे आले होते अन् हळदीचा रुमाल त्यावेळीं त्यांच्या हातांत असे, इतक्या बारीक गोष्टी, हा तोतया असता, तर त्याला कशा हो कळल्या असत्या ? त्याचें हें पत्र तर तुह्मीं प्रत्यक्ष वाचलेंत ना, व्यंकटराव ?”

“त्याला या गोष्टी कशा कळल्या ह्मणून विचारतां ? अहो, कळायला एक सोडून शंभर साधनें आहेत !”

“हें काय बोलणें झालें, व्यंकटराव ? कसलीं बोडक्याचीं आलीं आहेत साधनें अन् तींहि ह्मणे शंभर !”

“अहो, उदाहरणार्थ तुह्मी असें पहा–हा दिवाणजी कामानिमित्त कितीतरी ठिकाणीं जातो–सांगली, मिरज, कोल्हापुर, सातारा, पुणें, मुंबई इत्यादि इत्यादि ठिकाणीं कामानिमित्त हा वारंवार जातो,–तेथल्या कितीतरी लोकांच्या न् याच्या गांठीभेटी होतात; त्यांच्याशीं हा वाचाळपणें हवेंतसें बडबडतो. कुठेंहि कधीं कुणाजवळ त्यानें ही गोष्ट सांगितली असेल अन् तिचा या अट्टल भामट्यानें चांगला उपयोग करून घेतला आपल्या या कामासाठीं ! नाहीं तर मुद्दाम ही गोष्ट आपल्या पत्रांत लिहायची काय जरूर होती हो त्याला ? अशी कांहीं तरी एखादी बारीकसारीक अन् खुबीची गोष्ट पत्रांत कोणत्या ना कोणता तरी संबंध आणून दडपून दिली ह्मणजे आपणावर हां हां ह्मणतां लोकांचा विश्वास बसेल, असें पक्कें जाणून, ही गोष्ट त्यानें या पत्रांत नीट विचार करून मुद्दाम लिहिली. अहो, लोक किती भोळे आहेत, त्यांनां अशा कांहीं तरी गोष्टीनें झुलवणें किती सोपें आहे, याची त्या सोद्याला पूर्ण कल्पना असली पाहिजे. त्याशिवाय का तुमच्यासारखे ज्ञातारे ज्ञातारे अनुभवी ह्मणून ह्मणविणारे लोकसुद्धां ‘ हाच नानासाहेब ’ असें ह्मणताहेत ते ?”

मान हालवून राघूनाना ह्मणाले “तुम्ही काय वाटेल तें म्हणा, व्यंकटराव. मला तर अगदीं पक्कें वाटतें, कीं, आज आलेला हा इसम अगदीं खराखुरा नानासाहेब इनामदार आहे. अहो, अशा गोष्टी नुसत्या ऐकून का कुणीं एवढें धाडस करायचा प्रयत्न करील ? फट्दिशीं गळ्याशीं येईल प्रकरण, याची त्याला भीतिच नाहीं वाटतें कांहीं ! अगदीं खरा नानासाहेब आहे हा !”

व्यंकटराव आवेशानें ह्मणाले “ आहे पुण्याचा भामटा अन् दिल्लीचा ठग ! ”

दरवाज्यामागें उभे राहून हरिभाऊ ओसरीवर चाललेला हा कडाक्याचा वादविवाद मुकाट्यानें ऐकत होते; ते ओसरीवर न जातां परत आंत गेले व आपल्या मुलाला बाहेर पाठवून त्यांनीं व्यंकटराव कुळकर्ण्यांनां बैठकींतून आंत बोलावून नेलें.

व्यंकटराव येतांच, हरिभाऊंनीं त्यांनां आपल्या निजावयाच्या खोलींत नेलें, व ते त्यांनां तीव्रस्वरानें ह्मणाले “ व्यंकटराव ! इतकें तुझें वय झालें, चांगले केंस पिकायची तुझी वेळ आली; पण तुला अजून काडीची दिखील अक्कल कशी ती नाहीं ! ”

हरिभाऊंनीं मुलगा पाठवून ज्याअर्थी आपणाला मुद्दाम आंत बोलावून आणलें, त्याअर्थी आपणांला कांहीं तरी चहा, फोडणीचे पोहे वगैरे तावडावयाला मिळणार, अशीच व्यंकटरावांची ओसरीवरून निघतांना

कल्पना होती. हरिभाऊंचें 'औषध' काय तें त्यांनां माहीत होतें, आणि हरिभाऊंची त्यांच्यावर बरीच मेहरबानी असल्यामुळें ते व्यंकटरावांना मधुनमधून आपलें 'औषध' पाजीत असल्यामुळें त्यांची अशी कल्पना होणें साहजिक होतें; परंतु आंत येतांच, कधीं न होणारी ही मेजवानी हरिभाऊंकडून अचानक झालेली पाहून बिचारे व्यंकटराव तर अगदीं हतबुद्धच होऊन गेले! गांगरून जाऊन ते कंपितस्वरानें ह्मणाले "कां बुवा? काय-झालें तरी काय असें?"

"आपणाला तुह्मी मोठे हुषार, धोरणी न् अक्कलवान् समजतां; मग आतां कुठें गेली तुमची अक्कल शेण खायला?"

"अहो, पण असें झालें तरी काय, हरिभाऊ?"

"इतक्या लोकांमध्यें तुह्मी नानासाहेब ह्मणून आलेल्या इसमाला 'भामटा, ठग, सोदा,' असें उघड ह्मणतां याचा अर्थ तरी काय? ज्यांचा नानासाहेब अगदीं जवळचा आप्तसंबंधी-अगदीं हाडारक्ताचा संबंधी, ते त्याला नानासाहेब ह्मणून ओळखतात, कबूल करतात, त्याचा त्याप्रमाणें स्वीकारहि करतात. दिवाणजीसारख्या भाऊसाहेबांच्या घराण्याच्या हितचिंतकाचा त्याच्यावर विश्वास बसतो, प्रत्यक्ष आईसाहेब-ह्मणजे नानासाहेबांनां जन्म देणारी त्यांची आई-हाच आपला मुलगा ह्मणून कबूल करतात अन् त्याला लुच्चा हरामखोर पाजी ठग ह्मणायला तुह्माला धाडस तरी कसें होतें?"

व्यंकटराव रागानें ह्मणाले "ह्मणजे? जर मला खरोखरच वाटत असेल, कीं, आलेला हा इसम सोदा ठग आहे ह्मणून, तर मीं तसें ह्मणू नये?"

हरिभाऊ अधिकाराच्या स्वरानें ह्मणाले "ह्मणायचें असलें तर खुशाल ह्मणा; तुमचें मुस्कुट धरायला कुणाचें अडलें आहे एवढें?"

"झालें तर मग! मला जें वाटतें तें मी उघड उघड ह्मणणार! कुणाच्या बापाची मला भीति नाहीं."

"ह्मणणार तर खुशाल ह्मणा. पण आपल्या घरीं, आपल्या चौफळ्यावर बसून ह्मणा. माझ्या ओसरीवर असें भलतेंसलतें भकायला तुह्माला मिळायचें नाहीं, समजलांत ना शहाणे?"

हरिभाऊंच्या या शब्दांनीं 'शहाणे' व्यंकटराव बरेच शुद्धीवर आले. हरिभाऊंच्या गहजबाचें कारण काय असावें, हें त्यांच्या आतां लक्ष्यांत आलें. स्वर खर्जावून ते ह्मणाले "तुह्मी सांगतां तर नाहीं बोलणार बापडा तुमच्या ओसरीवर—"

हरिभाऊंनांहि आपल्या कठोरपणाबद्दल आतां वाईट वाटूं लागलें होतें. तेहि आपला स्वर यथासाध्य कोमल करून म्हणाले "हें पहा व्यंकटराव! तुम्ही सर्व गोष्टी नीट नजरेंत नाहीं आणीत. तुम्हाला दूरदृष्टि नाहीं."

व्यंकटराव त्यांच्याकडे पहातच राहिले.

"आलेला इसम अस्सल नानासाहेब असो, अगर कुणी सोदा ठग भामटा तोतया असो; तो आज लाख रुपये वार्षिक उत्पन्नाच्या संपत्तीचा मालक अन् या गांवचा इनामदार झाला आहे. तुम्ही त्याला चारचौघांत 'ठग भामटा' म्हणतां, ही गोष्ट कशीना कशी तरी त्याच्या कानांवर गेल्यावांचून राहील का? आणि त्याच्या कानांवर हें गेलें, तर तो तुम्हाला आपल्या गांवांत धडपणें राहूं देईल, असें तुम्हाला वाटतें? अन् व्यंकटराव, तुह्माला माणसाची पारख अगदींच कशी नाहीं? हा ह्मातारा राघूनाना ह्मणजे चालतेंबोलतें वर्तमानपत्र आहे. उद्यां सकाळीं त्या नानासाहेबांनां जाऊन सगळें तिखटमीठ लावून सांगेल—"

हरिभाऊंचे हे शब्द ऐकून व्यंकटरावांनां भय वाटूं लागलें; हरिभाऊ ह्मणतात त्यांत पुष्कळ तथ्य आहे, असें त्यांचें मनच त्यांनां सांगूं लागलें. "हो खरें आहे तें!" असें ह्मणून दृष्टि जमिनीकडे लावून ते उभे राहिले.

हरिभाऊ क्षणभर थांबून पुढें बोलूं लागले "अन् व्यंकटराव, हा जर खरोखरच तोतया असला, तर मग काम अधिकच कठिण आहे. जे जे आपणाला कोणी तोतया ह्मणून ह्मणत आहेत, तेच आपले शत्रु आहेत, असें तो समजेल अन् त्यांचा समूळ उच्छेद करण्याचा तो प्रयत्न करील. अहो, गांवचा मालक तो, त्याच्यापुढें का तुमचें आमचें गरिबांचें कांहीं चालणार आहे?"

व्यंकटराव ह्मणाले "हो, तें तर उघडच आहे."

"हें जर उघड आहे, तर इतक्या जोराजोरानें या गोष्टीबद्दल शिरा ताणायचें तुह्माला काय कारण आहे तें मला कळत नाहीं. तो खरा नानासाहेब असो नाहीं तर दिल्लीचा ठग असो, तुह्माला त्याच्याशीं करायचें आहे काय? त्याच्या मुलाला तुमची ठकी द्यायची नाहीं आहे, किंवा त्याची मुलगी तुह्मी आपल्या रामभूलाहि करून घेत नाहीं आहां. मग ही चर्चाच करायचें कारण काय, विचारतों मी? अस्सल असो, अगर नक्कल असो,

तें खरें खोटें ठरवून घ्यायचें काम आईसाहेबांचें आहे, वहिनीसाहेबांचें आहे. तुह्मालाआह्मांला त्या गोष्टी-संबंधानें व्यर्थ माथेफोड करून घ्यायचें कांहीं कारण नाहीं. खा प्या न् तबला कुटा-दुसऱ्याच्या कटकटी हव्यात कशाला आपणांला ? बरें, बोलल्याबद्दल कांहीं राग धरूं नका हो मनांत, व्यंकटराव."

"नाहीं, राग कसला–"

"तुह्मी आतां बाहेर जाऊन बसा मंडळींत. मी हा आलोंच थोड्या वेळानें."

खालीं पहातपहात व्यंकटराव तेथून जड पावलांनीं हळुहळू निघून गेले. पांच सात मिनिटांनीं हरिभाऊहि विडा चघळीत चघळीत आंतून येऊन मंडळीमध्यें विराजमान झाले. त्यांच्याबरोबरच, बाणथडीचे एक प्रख्यात गांवगुंड–श्रीयुत वामनराव ढेंकळेहि 'क्लबां'त आले.

आंत येतांच वामनराव ह्मणाले "अहो, ही ऐकलीत बातमी तुह्मीं ?"

सर्वांनीं उत्सुकतेनें विचारलें "कोणती-कोणती बुवा?"

"आमची आई नुकतीच आली वाड्यांतून. आज जेवाखायला देखील ती तिथेंच होती. आईनें येऊन ज्या चार दोन गोष्टी सांगितल्या, त्यावरून तर बुवा अगदीं निःसंशय रीतीनें ठरतें, कीं, हे अस्सल नानासाहेबच आहेत–तोतये नव्हेत."

सर्वांची उत्सुकता अगदीं 'बॉइलिंग पॉइंट' पर्यंत येऊन थडकली. चहूंकडून 'काय ? काय वामनराव–सांगा तरी !' असा एकच ध्वनि झाला.

तेव्हां वामनराव एकदोनदां खांकरून, नीट बैठक वगैरे सांवरून सांगूं लागले "सगळीच हकीगत सांगतों मी–ह्मणजे तुमची खात्री होईल. नानासाहेब गाडींतून उतरतांच, त्यांनां उराशीं घट्ट धरून आईसाहेब त्यांनां घेऊन आंत गेल्या, हें सर्वांनीं पाहिलेंच. आंतल्या वाड्यांत, व्हरांड्यांतच हातपाय धुवायला मोठें पितळी घंगाळ न् रुप्याच्या फुल्यांचा मोठा पाट मांडून ठेवला होता. पोषाक उतरून नानासाहेब पाय धुण्यासाठीं त्या पाटावर येऊन बसले. इतक्यांत खांद्यावर टुवाल टाकून वाड्यांतला दाजीबा शागीर्द त्यांच्याजवळ येऊन उभा राहिला अन् त्यानें त्यांनां नमस्कार केला. त्याच्या तोंडाकडे कांहीं वेळ पाहून नानासाहेबांनीं एकदम विचारलें 'दाजिबा ना रे ?' त्यांनीं ओळखलेलें पहातांच दाजिबा स्फुंदस्फुंदून रडूं लागला !"

हरिभाऊ ह्मणाले "असें ह्मणतां ? तर मग हे नानासाहेबच अगदीं खात्रीनें. त्यांत कांहीं आतां शंकाच नाहीं उरली ! दाजिबा ह्मणजे वाड्यांतला अगदीं जुना शागीर्द. त्याला पहातांच नानासाहेबांनीं त्याला एकदम ओळखला, यांत नवल नाहीं."

इतक्यांत दोघेतिघे एकदम ओरडून ह्मणाले "बरें, पुढें काय झालें ?"

वामनराव सांगूं लागले "हें पहातांच आईसाहेब दाजीबाला ह्मणाल्या 'बघितलंस दाजिबा ? तूं ह्मणत होतास ना, कीं, इतक्या वर्षांनीं नानासाहेब मला कसचे ओळखतात म्हणून ? पण बघितलंस ना ? एका क्षणांत ओळखलंन् तुला नानानं ! अरे, याला तूं जर हाताखांद्यांवर बाळगून लहानाचा मोठा केला आहेस, तर तुला का हा ओळखणार नाहीं ?' हें ऐकून नानासाहेब हंसून म्हणाले 'मीं जर दाजीबावर जन्माची खूण करून ठेविली आहे, तर त्याला का मी ओळखणार नाहीं ?' आईसाहेबांनीं विचारलें 'कसली खूण ?' नानासाहेब म्हणाले 'दाजीबालाच विचारीनास आई ? तोच सांगेल.' दाजिबा आपल्या कपाळाच्या डाव्या भागावर हात फिरवूं लागला. हें पाहून नानासाहेब हंसून म्हणाले 'आई, ज्या वर्षी माझी मुंज झाली, त्याच वर्षी असेल–एके दिवशीं संध्याकाळीं मी अन् शेजारच्या देवलांचा विनू, त्यानें आणलेलीं बिस्कूटें हळूच खात, शाळेजवळच्या तळ्याच्या कांठीं बसलों होतों. विनूचा कॉलेजांत असलेला मामेभाऊ त्याच दिवशीं मुंबईहून त्याच्या घरीं आला होता, त्यानें तीं बिस्किटें मुंबईहून आणलीं होतीं. इतक्यांत हा दाजिबा कशालासा तिकडून जात होता, तो हळूच आमच्या मागें येऊन उभा राहिला अन् क्षणभरानें म्हणाला 'हां नानासाहेब ! इथें येऊन चोरून भिस्किटें खातां काय ? किरिस्तांव झालांत तुम्ही अगदीं ! दम धरा भाऊसाहेबांनां जाऊन सांगतों अस्साच !' हें ऐकतांच, रागावून जवळचा एक लहानसा विटेचा तुकडा घेऊन मीं दाजिबाकडे जोरानें भिरकावला; तो ताड्कन् याच्या कपाळाच्या डाव्या बाजूला बसून, तेथें खोंक पडून त्यांतून झरझर रक्त वाहूं लागलें. 'अरे बापरे !' असें ओरडून दाजिबा तर तिथल्या तिथेंच पडला ! मग मात्र मी खूप भ्यालों. मग मी न् विनू मिळून याला उचलून तळ्याच्या खालच्या पायरीशीं नेलें, अन् पाण्यानें याची जखम नीट धुऊन काढली अन् विनूच्या धोत-

राची टारकन् एक मोठी थोरली चिंधी फाडून ती पाण्यांत भिजवून,त्या जंखमेवर ती घट्ट बांधून टाकली. तेव्हां कुठें याला थोडेंसें बरें वाटलें अन् हा कपाळावर हात ठेवून कसा तरी घरीं आला !' हें ऐकून आईसाहेब हंसून म्हणाल्या 'हो हो, आठवतं खरं. एकदां दाजिबाच्या डोकीला पट्टी असे खरी कांहीं दिवस ! पण आम्हीं विचारलं,तेव्हां यानं आम्हांला सांगितलन्, कीं, 'पेरू पाडायला गेलों न् झाडावरून पडलों; त्यामुळं ही जखम झाली डोक्याला !' तेव्हां दाजिबा म्हणाला "होय आईसाहेब, मीं आपणाला त्या वेळीं तसंच सांगितलें होतें. नाहीं तर भाऊसाहेबांनीं नानासाहेबांनां खूब बडवबडव बडवलें असतें रागानें. म्हणून मीं असें कांहींतरी खोटें रचून सांगितलें.' आईसाहेब म्हणाल्या "असा होतास बरं नाना, लहानपणीं तूं भारी खोडकर !' हें ऐकून नानासाहेब हंसले मात्र !"

हरिभाऊंच्या ओसरीवर जमलेले 'क्लबा'चे एकूण एक सभासद, जणूंकाय जादूनें अगदीं भारून गेल्याप्रमाणें वामनराव सांगत असलेली ही हकीगत ऐकत होते. वामनराव बोलावयाचे थांबतांच, सर्वजण मिनीट दीड मिनीट अगदीं स्तब्ध बसले होते. नंतर पुनः वादविवादाला सुरुवात झाली. कित्येक ह्मणाले "आतां तर मुळीं कसलाच संशय उरला नाहीं–अगदीं खास नानासाहेबच हे !" दुसरे ह्मणाले "अहो, आह्मी तर पहिल्यापासूनच सांगतों आहों, कीं, काम अस्सल आहे–नक्कल नव्हे ! पण हेच संशयी !"

राघूनाना व्यंकटरावांकडे पाहून विजयगर्वानें ह्मणाले "काय हो व्यंकटरावसाहेब ? आपण नाहीं कांहीं बोलत आतां ?"

खालीं मान घालून व्यंकटराव ह्मणाले "नाहीं राघूनाना ! आह्मी कबूल करतों, कीं, आमची आपली चूक झाली ! अहो, तुम्हीं ज्ञातारे माणूस, तुमची नजर किती बारीक ! तुम्हाला अनुभव किती आलेले–जगाच्या घडामोडी पहातांपहातां तुमचे केंस पांढरे झाले.तुह्मी जें ह्मणत होतां राघूनाना, त्यापैकीं अक्षर न् अक्षर पटलें पहा आपणाला !"

व्यंकटरावांकडे पाहून हरिभाऊ ह्मणाले "अहो, कुणाला कसल्याहि प्रश्नासंबंधानें सल्लामसत घ्यायची झाली,तर याच गांवचे नाहीं,तर आसपासच्या पंचक्रोशींतल्या गांवचे लोक या राघूनानांकडे नेहमीं येतात ! कां येतात-सांगा हो व्यंकटराव ? तुमच्याकडे कां येत नाहींत किंवा माझ्याकडे कां येत नाहींत, सांगा पाहूं ? नेमके राघूनानांकडेच कां जातात ?"

हरिभाऊंच्या या प्रश्नाचें उत्तर व्यंकटरावांनीं किंवा कोणींच दिलें नाहीं. सर्वांकडे प्रसन्न मुद्रेनें पाहून राघूनाना मात्र गंभीरपणें मान हालवूं लागले. यानंतर, लहानपणीं नानासाहेबांनां आपण कोठें पाहिलें, कधीं पाहिलें, काय करीत असतांना पाहिलें, त्या वेळीं ते काय बोलत होते, कोणाशीं बोलत होते, इत्यादि इत्यादि गोष्टी, आपल्या स्मरणाचा समुद्र घुसळून घुसळून, प्रत्येकजण इतरांनां सांगूं लागला. सर्वजण नानासाहेबांच्या गोष्टींत अगदीं रंगून गेले होते.

याप्रमाणें मंडळीच्या गप्पागोष्टी चालल्या असतां, सूर्य मावळून रात्र केव्हां पडली, याचें कोणाला भानहि राहिलें नाहीं. घटका दोन घटका रात्र झाली, हरिभाऊ 'सायंसंध्या' करावयाला ह्मणून उठले,तेव्हां कोठें मंडळी गप्पाष्टकांच्या नशेंतून शुद्धीवर आली, आणि उठून आपापल्या घराकडे जावयास निघाली.

चांदणें स्वच्छ पडलें होतें. अजूनहि रस्त्यांतून आज लोकांची वर्दळ सुरूच होती. मधुनमधून पोक्त सधवा व विधवा स्त्रियाहि वाड्याकडून येतांना रस्त्यांतून दिसत होत्या. अर्थातच या सर्वजणी आपापल्या घरच्या मालकिणी असून, त्यांनां उशिराबद्दल जाब विचारणारें घरीं कोणी नव्हतें आणि त्यांच्या हाताखालच्या तरुण सासुरवासिनी केव्हांच स्वयंपाकाला लागल्यामुळें 'फराळ'ला बसण्याशिवाय त्यांच्याकडे तादृश कांहीं कामहि नव्हतें.

व्यंकटराव रस्त्यानें कोणाशीं कांहीं न बोलतां घरीं गेले, व हातपाय धुऊन झट्पट संध्या आटोपून, फराळाला बसले. त्यांच्या 'सहचारिणी' अंबाबाई वाढतां वाढतां पतिराजांनां ह्मणाल्या "आज बोलायचंसं नाहीं अगदीं मघांपासून ?"

"नाहीं बुवा, उगीच !"

"हो उगीच ! काय झालं आहे ? सांगावं ना–"

"हो उगीच–कांहीं नाहीं. थोडें कपाळ दुखतें आहे."

"मग सुंठ देतें उगाळून. हो, बरी आठवण झाली. उद्यां संध्याकाळीं वाड्यांत जेवायला जायचं आहे आपणाला. गोविंदराव बोलवायला आले होते मघांशीं."

"जेवायला ? ह्मणजे ?"

"उद्यां वाड्यांत आहे कडाक्याचा सत्यनारायण. बरींच मेव्हणं आहेत गांवांतलीं. आपलंहि एक–"

जोरानें मान हलवून व्यंकटराव ह्मणाले "सत्यनारायण होऊंदे, नाहीं तर वाटेल तें होऊंदे—आपणाला जायचें नाहीं—"

पतिराजांच्या तोंडचें हें अगदींच अनपेक्षित उत्तर ऐकतांच, अंबाबाई आश्चर्यचकित होऊन गेल्या. वाढतां वाढतां हात जेथल्या तेथें थांबवून त्या ह्मणाल्या "जायचं नाहीं ह्मणजे ? तें कां बाई ?"

व्यंकटराव इकडेतिकडे पाहून, स्वर खालवून म्हणाले " कुठला एक भामटा आला आहे नानासाहेबांचें सोंग घेऊन काशीहून—त्याची जात कोण, कुळ कोण, गोत्र कोण, याचा नाहीं कुणाला थांगपत्ता ! न् सर्वच गेले आहेत आपले हुरळून ! अरे आहे काय ? नानासाहेब काय न् त्याचा एवढा जयजयकार कसला ? अशा जातहि माहीत नसणाऱ्याच्या घरीं जाऊन आपण आपली जात घालवून बसायचें कीं काय ? "

अंबाबाई आश्चर्यव्यंजक स्वरानें ह्मणाल्या "ह्मणजे? भलतंच काय म्हणायचं हें बाई ?"

" भलतेंच काय ह्मणतों मी ? त्या भामट्याची जातगोत काय तें आहे तुला ठाऊक ? ह्मणे भलतेंच म्हणायचें !"

" काय तरी बाई हें ! ते भामटे का आहेत ?—"

" शुद्ध ठग—सोदा—चोर—दरोडेखोर !"

"असं म्हणूं तरी नये हो ! ठग काय न् चोर काय? सारींजणं म्हणतात, ते खरे नानासाहेब आहेत म्हणून, तें कां खोटं ?"

खूब चिडून व्यंकटराव ओरडून म्हणाले " ठीक आहे—उत्तम आहे. सारींजणें म्हणतात तें जर तुलाहि खरें वाटत असेल—तो पाजी दरोडेखोर खरा नानासाहेब आहे, असाच तुझाहि जर विश्वास बसला असेल, तर तूं जा गिळायला वाड्यांत ! वहिनीबाईंच्या पानांतलें उष्टें अन्नप्रसाद म्हणूनहि खाऊन ये—मग वटसावित्रीचें न् हरताळकेचें व्रत करायची तुला जरूरी नाहीं उरणार !"

" हो, वहिनीसाहेब आहेतच मुळीं सती सावित्री ! कां नाहीं ? नाहीं तर सोळा वर्सं थांग नाहीं—पत्ता नाहीं, असा त्यांचा नवरा त्यांच्याकडे परत कसा आला असता ? वहिनीसाहेबांचं पुण्य थोर, म्हणूनच ना घडून आलं हें ? या कलियुगांतल्या त्या सावित्री न् सीमंतिनीच आहेत हो !"

मान हलवून व्यंकटराव व्यंग्योक्तीनें ह्मणाले " हो आहे बुवा सावित्री खरी ! आजपासून सावित्रीची जागा हिसकावून घेणार खरी तुझी वहिनीसाहेब ! अन् तिच्या पुण्याईनें तिला सत्यवान्हि भला चांगला मिळाला आहे !"

अंबाबाई मानेला हिसडा देऊन ह्मणाल्या " अगदींच नास्तिक बाई स्वभाव इकडचा ! असा भलतान् सलता संशय घेतला, तर इकडे पाप लागेल हो ! सती साध्वी पतिव्रतांची निंदा केली तर देवाचा कोप होतो!"

" अग हो, आहे ठाऊक—मोठी पतिव्रता लागून गेली आहे अगदीं ! सीता तारा मंदोदरीच कीं नाहीं ?"

" भलताच संशय घेऊं नये. आणखी सहा महिने नानासाहेबांची न् वहिनीसाहेबांची फारशी दृष्टभेट दिखील व्हायची नाहीं ह्मणे !"

" नाहीं ह्मणे—कोण म्हणे ? " वेडावून व्यंकटराव म्हणाले.

" म्हणजे ?"

" दृष्टभेट देखील व्हायची नाहीं म्हणजे ? कां ? कोणती हरकत आहे ? सोन्यासारखी बायको न् राजासारखी संपत्ति लाटायलाच जर मुळीं आला आहे तो लङ्ख्या—"

" म्हणजे इकडे ऐकलंच नाहीं वाटतं अजून ?"

" नाहीं—काय झालें आहे ?"

अंबाबाई आनंदाच्या स्वरानें सांगूं लागल्या "शेजारच्या गोपकाकाकू नुकत्याच आल्या वाड्यांतून—त्याच सांगत होत्या—"

" मरोत रे या साऱ्या उठाठेवी बाया ! हं—काय सांगत होती सटवी ?—"

" उगीच काय निंदावं असं दुसऱ्यांनां ? गोपकाकाकू सांगत होत्या, कीं, नानासाहेब बायकोशीं कांहीं दिखील संबंध ठेवणार नाहीं आहेत !"

" ह्मणजे ?" भृकुटी चढवून, व्यंकटराव आश्चर्यानें उद्गारले.

" ते निजणार आहेत दिखील कचेरीच्या दुसऱ्या मजल्यावर. आंतला संबंध देखील नको त्यांनां किंचित् दिखील !"

" कां बरें ?

" नानासाहेब कुठल्याशा त्या मठांतले मुख्य बैरागी झालेले होते ना ? त्या मठांत असतांना त्यांनीं कसलंसं एक व्रत घेतलं आहे. त्याची मुदत आहे म्हणे सात वर्षांची !"

" सात वर्षें अजून ? अरे बापरे !"

अंबाबाई हंसून म्हणाल्या " आजपासून सात वर्सं नाहीं कांहीं—"

" मग ?"

" साडेसहा वर्सं झालीं त्यांनां हें व्रत करायला लागून. आणखी सहाच महिने राहिले आहेत सारे!"

"अस्सें–" व्यंकटरावजींचें कुतूहल अतिशय वाढलें. त्यांनीं विचारलें " बरें, पुढें ?"

"आणखीं सहा महिन्यांनीं त्या व्रताची मुदत भरते. त्याचं उद्यापन करून मग नानासाहेब संसारांत शिरणार आहेत—"

" अन् तोंपर्यंत ?"

" तोंपर्यंत ते बैराग्याच्या वेषांतच रहाणार आहेत. हें ऐकून आईसाहेब म्हणतात खूब रडल्या कढल्या. त्यांनीं पुष्कळ हरकती उपस्थित केल्या. त्या म्हणाल्या 'आज सोळा वर्सं तर बैरागी होऊन तूं पुष्कळ जपतप केलंस, होमहवनं केलींस, किती व्रतं केलींस, मग हें एवढं व्रत नाहीं तुझ्या हातून पुरं झालं, तर त्यांत काय एवढं मोठंसं ? जाईल मेलं एक व्रत मोडून ! त्यानं तुझं कितीसं पुण्य होणार आहे कमी ? नाहीं–नाना, आतां तुझ्या अंगावरचीं हीं भगवीं वस्त्रं माझ्या डोळ्यांनां पहावत नाहींत. या म्हाताऱ्या आईकरितां तरी एवढं ऐक–नाहीं म्हणूं नकोस ! मोड एवढं हें व्रत !' "

व्यंकटराव आपल्या अर्धांगीच्या तोंडच्या या कहाणींत बरेच रंगून गेले होते. त्यांनीं उत्सुकतेनें विचारलें " मग तो काय म्हणाला ?"

" नानासाहेब त्यांनां अगदीं गयावया करून म्हणाले 'आई, हें व्रत जर माझ्या हातून पूर्ण झालं तर मला एकशेंवीस वर्सांचं आयुष्य लाभणार आहे. सबंध साडेसहा वर्सं कष्ट केल्यानंतर थोड्यासाठीं एवढा थोरला लाभ हातांतला घालवायचा ? जास्त नाहीं आई–इतकीं वर्सं गेलीं तसे आणखीं सहा महिने–त्यानं काय होणार आहे अगदीं ?' मुलाचं आयुष्य एकशेंवीस वर्सांचं होणार, हें ऐकून आईसाहेब मुलाच्या म्हणण्याला मुकाट्यानं कबूल झाल्या."

" मोठें आश्चर्य आहे बुवा ! हें व्रत तो करणार, म्हणजे करणार तरी काय ?" व्यंकटरावाच्या संदेहविषलहरी उतरूं लागल्याचीं स्पष्ट चिन्हें आतां दिसूं लागलीं होतीं.

" भगवीं वस्त्रंच नेसणार न् अंगावर घेणार–कसलंसं होमहवन करणार अन् सहा महिनेपर्यंत बायकोला शिवणारहि नाहींत ! "

व्यंकटरावाचें भोजन संपून ते आंचवावयाला उठले. ऐकलेल्या हकीगतीसंबंधानें त्यांनीं आपल्या अर्धांगीजवळ कोणतेंच मतामत प्रकट केलें नाहीं. आंचवतांना ते आपल्याशींच म्हणाले " तर मग खरोखरच हा नानासाहेब काय ? कांहीं कळत नाहीं - दिसतो तर तसा ! मग खरेंखोटें परमेश्वरालाच माहीत !"

प्रकरण सहावें.

कांहीं नवीनच !

रात्रीं भोजनवगैरे आटोपल्यानंतर, कांहीं वेळ आईसाहेबांजवळ बसून गप्पागोष्टींत वेळ घालविल्यावर गणपतराव म्हणाले " आई, मी जातों आतां–निजतों–भारी दमलों आज–"

क्षणभर आपल्याशींच कांहीं विचार करून आईसाहेब म्हणाल्या " बाळा, माझ्या मनांत तुला कांहीं सांगायचं आहे. बोलूं ? ऐकशील ? "

" काय आई ? "

" मुलीची एकदां भेट घे. तुझं व्रत असेल–मी नाहीं म्हणत नाहीं; पण बायकोचं अगदीं दर्शनदिखील घेऊं नये या व्रतांत, असं कांहीं शास्त्रांत खास लिहिलेलं नसेल. नुसती तिची भेट घ्यायला काय हरकत आहे?"

आईसाहेबांच्या या प्रस्तावानें गणपतराव मोठ्या संकटांत पडल्यासारखे झाले. आपण सात वर्षांचें आयुर्वर्धक व्रत घेतलें आहे, असा जो त्यांनीं पुकारा केला होता, त्याचें कारण दुसरें कांहीं नव्हतें–वहिनीसाहेबांची भेट घेणें शक्य तितकें लांबणीवर टाकावें, एवढा एकच यांत त्यांचा उद्देश होता. त्यांच्या सर्व भूमिकेंत एवढें एक स्थान अत्यंत नाजूक असून या ठिकाणीं गणपतरावांच्या मनाला अतिशय संकोच वाटत होता. सैतानी लोभाच्या प्रबल मोहजालांत सांपडून ते जरी हें निंद्य कर्म करावयाला तयार झाले होते, तरी ते कांहीं अंतःकरणाचे दुष्ट किंवा निढावलेले 'डांबीस,' पापी–नव्हते. त्यांच्या मातुःश्रीच्या धर्मशील आचर-

च्याचा आणि उपदेशाचा त्यांच्या मनावर लहानपणापासून अतिशय परिणाम झाला असल्यामुळें, या अत्यंत नाजूक अशा ठिकाणीं गणपतरावांच्या बुद्धीला कर्तव्य-मूढता व जडता यावी, यांत कांहींच नवल नव्हतें. आतां ज्याअर्थीं नानासाहेबांची भूमिका घेऊन, त्या भूमिकेची येथपर्यंत मजल त्यांनीं आणून पोहोंचविली होती, त्याअर्थीं त्यांनां ती भूमिका सर्व बाजूंनीं अत्यंत कुशलतेनें पार पाडणें अगदीं अवश्य होतें–कोठल्याहि बाबतींत त्यांनां माघार घेऊन चालण्यासारखें नव्हतें; नाहीं तर प्रकरण केव्हांच त्यांच्या गळ्यापर्यंत येऊन पोहोंचलें असतें ! परंतु आणखी कांहीं दिवस लोटतां आले तर लोटूंया–या विचारानें गणपतरावजींनीं हें व्रतवैकल्याचें बुजगावणें मध्येंच उभें केलें होतें. थंडीचा अगदीं कहर पडला असतां, स्नान करण्यासाठीं तयार होऊन आलेला माणूस पाण्याच्या प्रवाहांत बसूनहि, डोकीवरून तें थंडगार पाणी घ्यावयाला ज्याप्रमाणें थोडातरी विलंब करीत असतो, त्या प्रकारचीच या प्रसंगीं आमच्या गणपतरावजींची मनोभावना होती.

आपला मुलगा कांहींच बोलत नाहीं, यावरून त्याचें मन आपण विचारलेल्या प्रश्नाच्या बाबतींत द्विधा झालें आहे, असें ओळखून, आईसाहेब गणपतरावांनां म्हणाल्या "नाना, सुनबाई आमची लक्ष्मी आहे बरं, साक्षात् लक्ष्मी आहे! मोठमोठ्या नामांकित पतिव्रतांनीं दिखील तिच्या पायांची धूळ मस्तकीं लावावी, अशीच तिची योग्यता आहे. आज सात आठ वर्सं तिला कळायला लागल्यापासून, तिची जी काय स्थिति झाली आहे, ती पाहून मन अगदीं दुभंग होऊन जातं. बिचाऱ्या माउलीनं कधीं एक दिवसहि आपल्या मनाच्या यातना कुणापाशीं चकारशब्दानंहि उघड्या करून दाखविल्या नाहींत. पण नाना, आम्ही तरी माणसंच आहोंत ना? या तरण्याताठ्या, शहाण्यासुरत्या मुलीच्या अंतःकरणांत दुःखाचा केवढा वणवा पेटून राहिला असेल, याची आम्हांला कल्पना दिखील का नसेल? मुलीच्या पांढऱ्या फटफटीत चेहऱ्याकडे पाहिलं, कीं, आंतडीं कशीं तटातट तुटूं लागतात ! नाना, सोळा वर्सांनीं आज तूं घरीं आलास, यानं तुझा त्याप्रमाणं आह्मां साऱ्यांचा अगदीं पुनर्जन्म झाला. सर्व नोकरचाकरांच्या न् गांवच्या जनलोकांचा आनंद आज गगनांत मावेनासा झाला आहे. अन् आज, तूं जर मुलीची नुसती भेटहि घेतली नाहींस, तर तें तिच्या नाजूक अंतःकरणाचे तिळतिळ तुकडे करील ! नाना, या गोष्टी आम्हीं का तुला शिकवल्या पाहिजेत? तूं शहाणा आहेस, जाणता आहेत, तुला या नाजूक गोष्टी कळत का नसतील?"

गणपतराव एक मोठा उसासा टाकून ह्मणाले "आई, जोंपर्यंत या व्रताची सांगता झाली नाहीं, तोंपर्यंत ही–ही गोष्ट योग्य आहे का, हें मी तुलाच विचारतों."

"नाहीं–त्यांत कोणताहि दोष नाहीं." आईसाहेब आवेशानें ह्मणाल्या. "साध्वी स्त्रीला दुःख द्यावं, असं कोणतंहि शास्त्र कधींहि सांगायचं नाहीं. सतीच्या मनाला यातना–संताप देणारं व्रत, तें व्रतच नव्हे न् तो धर्महि नव्हे—"

"पण आई—"

"तूं मघां ह्मणालास, कीं, या व्रतांत बायकोचा स्पर्शहि होतां कामा नये. नको–हवं तर तूं बायकोला शिवूंहि नकोस–ती सहा महिने तुझ्या जवळहि येणार नाहीं. दूर राहून, तोंडानं नुसत्या तिच्याशीं गोष्टी बोलायला तरी तुला काय हरकत आहे?"

आईसाहेबांच्या या आग्रहापुढें गणपतरावांचें कांहींच चालेना, आणि त्यांचें अंतःकरणहि आतां पुष्कळ ढुलें झालें होतें. वहिनीसाहेबांची भेट घ्यायला त्यांच्या मनाला कांहींच उत्सुकता नव्हती, असें कांहीं आम्हाला खात्रीनें सांगतां येणार नाहीं.

"मग काय, नाना?"

"बरें, तुझ्या इच्छेप्रमाणेंच कां होईना, आई!"

"किती आनंद झाला ह्मणून सांगूं मला हें ऐकून ! थांब, इथंच देतें मुलीला धाडून." असें म्हणून आईसाहेब तेथून त्वरेनें निघून गेल्या.

ही खोली गणपतरावांसाठींच मुद्दाम आज तयार करण्यांत आली होती. वहिनीसाहेबांच्या नवीनच तयार केलेल्या खोलींतून कांहीं, खुर्च्या, कोच, तसबिरी, पुस्तकें-वगैरे सामान ही खोली सजविण्याकरतां आणिलें होतें.

आईसाहेब निघून गेल्यानंतर गणपतराव जागेवरून उठले, व त्यांनीं तेथल्या मोठ्या थोरल्या झगझगीत दिव्याची वात आंणखीहि थोडीशी मोठी केली. या वेळीं त्यांच्या हृदयांत ज्या विचार–विकार–लहरी नृत्य करीत होत्या, त्यांचें यथार्थ वर्णन करावयाला कोणाच्याहि अंगीं सामर्थ्य असेल अशी आमची कल्पना होत नाहीं.

गणपतरावांनां आपल्या 'अर्धांगी'ची कांहीं फार वेळ वाट पहावी लागली नाहीं. थोड्याच वेळांत, सुंदर

नाजूक, असा रेशमी लुगड्याचा खसखस शब्द आणि अलंकारांचें मृदु मधुर सिंजन यांचा संमिश्र ध्वनि ऐकून गणपतरावांचें लक्ष्य तावडतोब दरवाज्याकडे गेलें.

क्षणार्धांत खालीं नजर लावलेली एका तरुणीची सुंदर मूर्ति दरवाज्यांत येऊन उभी राहिली. तिनें एक सुंदर गुलाबी रेशमी जरतारी वस्त्र परिधान केलें असून तिच्या सर्वांगावर नानाविध सोन्या–मोत्यां–रत्नांचे अलंकार होते. ती आंत येतांच, जणूं तिच्या सद्गुणांच्या सुगंधानेंच, ती खोली अगदीं दरवळून गेली.

त्या वेळीं गणपतरावजी एका खुर्चीवर बसले होते. वहिनीसाहेब येतांच, ते उठून उभे राहिले, व कंपित स्वरानें म्हणाले "ये—"

तरीहि वहिनीसाहेब जागच्याजागीं खालीं मान घालून, हातानें पदराच्या टोंकाची गुंडाळी करीत उभ्याच राहिल्या.

"ये ये–लाजूं नकोस."

मृदु मंद पदें टाकीत वहिनीसाहेब थोड्या पुढें आल्या. गणपतरावांजवळ येतांच, क्षणभर विचार करीत उभ्या राहून, त्यांनीं हात जोडले, व त्या किंचित् खालीं वांकल्या.

ही आपल्या पायांवर मस्तक ठेवावयाला वांकली आहे, हें गणपतरावांच्या चट्कन् लक्ष्यांत आलें. दोन पावलें मागें सरून गडबडीनें ते म्हणाले "हां हां, माझ्या पायां पडूं नकोस. मला आज सुतक आहे. दोषी माणसाला प्रणाम करूं नये, असें शास्त्र आहे."

काय करावें हें न सुचून, वहिनीसाहेबांच्या मनाची या वेळीं कांहीं चमत्कारिक स्थिति होऊन गेली. त्यांनां असें वाटलें, अगदीं उत्कट इच्छा झाली, कीं, 'कोणत्याच स्थितींत आपण मला कधीं दोषी वाटत नाहीं,' असें आपल्या पतिदेवाला म्हणावें. तितक्या अवकाशांत हे शब्द त्यांच्या अगदीं ओंठांपर्यंत येऊन पांच सात वेळ परतले; परंतु ते शब्द उच्चारावयाला त्या ललितलज्जावतीला धीरच झाला नाहीं.

...रावांच्या चेहऱ्याकडे एकवार पाहून "असूं द्या–" एवढे दोनच शब्द कसे तरी उच्चारून तिनें त्यांच्यापुढें नम्रतेनें प्रणाम केला.

गणपतरावांनीं त्या पतिव्रतेचा पवित्र, निर्मल, शुचि कंठस्वर ऐकला, आणि अश्रुजलस्नानानें पवित्र झालेले ते तिचे कांहींसे मंदज्योति नेत्रहि पाहिले. तत्क्षणीं त्यांच्या जटाधारी मस्तकापासून तों पायांच्या अग्रापर्यंत कांहीं अवर्णनीय असा एक विजेचा झटका थरारून गेला.

"उठ–उठ–"

वहिनीसाहेब उठून उभ्या राहिल्या. समोरच... सुंदर कोचाकडे बोट दाखवून गणपतराव म्हणाले "बस–बस इथें." असें म्हणून ते आपल्या खुर्चीवर पुनः बसले.

वहिनीसाहेबांचा धीरहि आतां बराच चेपल्यासारखा झाला होता. कांहीं आढेवेढे न घेतां, गणपतरावांनीं दाखविलेल्या जागेवर त्या बसल्या.

गणपतरावांनीं विचारलें "कसें काय... ची तब्येत कशी आहे, तें सांग मला अगोदर."

मृदु मंजुल स्वरानें उत्तर आलें "चांगली आहे."

सुमारें दोनअडीच मिनिटेंपर्यंत दोघेंहि अगदीं स्तब्ध बसलीं होतीं. वहिनीसाहेब खालीं पहात असून गणपतरावांची दृष्टि त्यांच्या चेहऱ्याकडे अगदीं खिळून राहिली होती.

कांहीं वेळानें ती शांत निस्तब्धता गणपतरावांनां असह्य झाली. त्यांनीं विचारलें "माझी आठवण आहे का ?"

खालीं पाहातच वहिनीसाहेबांनीं उत्तर दिलें "हो, आहे."

पुनः तीं दोघें कांहीं वेळ स्तब्ध बसलीं होतीं. रात्रीची शांत वेळ होती. आंत बाहेर कोठें कसलाहि शब्द होत नव्हता. इतक्यांत घड्याळामध्यें पहिल्यानें खर्खर् असा शब्द होऊन अकरा ठोके पडले.

ठोके पडणें थांबल्यावर गणपतरावांनीं विचारलें "सर्व हकीगत कळली का तुला ?"

वहिनीसाहेबांनीं पूर्वीप्रमाणेंच उत्तर दिलें "हो, कळली."

"माझ्या व्रताचीहि हकीगत कळली असेल ?"

"हो."

"आजपासून सहा महिने मला अशा रीतीनेंच काढणें भाग आहे." या वेळीं गणपतरावांनीं असा कांहीं स्वर काढला, कीं, त्यांची अत्यंत निराशा झाली असून त्यांच्या दुःखाला सीमाच नाहींशी झाली आहे असेंच श्रोत्याला वाटावें.

हे शब्द ऐकून वहिनीसाहेबांचे दोन्ही ओंठ किंचित् हलल्याप्रमाणें गणपतरावांनां भास झाला–जणूं काय, कांहीं तरी बोलावें–बोलावेंच, असें त्यांनां वाटत असून ओंठांपर्यंत शब्द येऊन ते नाइलाजानें परत जात होते! पदराचें एक टोंक हातीं धरून, त्यावरील जरीच्या

ांचें आपण बारीक नजरेनें निरीक्षण करण्यांत दीं गढून गेलों आहोंत, असें वहिनीसाहेब दर्शवीत या.

पुनः गणपतरावांनींच शांततेचा भंग करून बोलाव-ा आरंभ केला. त्यांनीं विचारलें "पण यामुळें या मनाला कांहीं दुःख तर नाहीं होणार ?"

या वेळीं वहिनीसाहेबांनीं तोंड वर केलें. किंचित् ात करून, गणपतरावांकडे पाहून, त्यांनीं मृदु स्वरानें "कां बरं ?"

वहिनीसाहेबांची सुंदर दृष्टि या वेळीं दुसऱ्यानें ापतरावांच्या मुखमंडलावर स्थापन झाली. पहिल्यानें व्हां त्यांनीं त्यांच्याकडे पाहिलें, तेव्हां त्यांची दृष्टि श्रुजलानें नहात असल्यामुळें पवित्र होती, तर आतां स्याच्या उज्ज्वल दीप्तीनें ती प्रकाशित झाली होती. हेनीसाहेबांची ती हास्योज्ज्वल दृष्टि गणपतरावजींच्या ह्ऱ्याकडे लागतांच त्यांचें मस्तक फिरूं लागलें. ापणाला मूर्च्छा येते, असें त्यांनां वाटून त्यांनीं दोन्ही तांनीं मस्तक घट्ट दाबून धरलें.

आपले 'पतिराज' कांहींच बोलत नाहींत, असें ाहून वहिनीसाहेबांनीं मृदु स्वरानें विचारलें "डोकं ा दुखतं आहे ?"

"ना–नाहीं. तसें नाहीं कांहीं. मग माझ्या प्रश्नाचें उत्तर नाहीं कांहीं दिलेंस तें नीटसें ?"

खालीं पहात वहिनीसाहेब हळुहळू म्हणाल्या आपलं आयुष्य वाढविणाऱ्या व्रताच्या आड मी ाशी बरं येऊं ? दररोज एकदां तरी आपलं दर्शन मला ाालं म्हणजे मला ब्रह्मानंद वाटेल."

गणपतरावांनीं पाहिलें, निर्मलता, पवित्रता, प्रेम, ायाळूपणा, सरलता इत्यादि अनेक दैवी गुणांच्या दैव्य प्रकाशानें वहिनीसाहेबांचें मुखमंडल झगमग करीत आहे. कोणत्याहि स्त्रीच्या चेहऱ्यावर अशा प्रकारचें दिव्य पवित्रतेचें तेज त्यांनीं कधींच पाहिलें नव्हतें. स्त्रीजनांमध्यें इतकी उत्कट कोमलता, मृदुता, प्रेम आणि भक्ति हीं त्यांच्या आजच पहिल्याप्रथम दृष्टीला पडलीं.

आतां, हिच्याशीं गोष्टी तरी कोणत्या विषयावर बोलाव्या, याबद्दल गणपतराव काळजींत पडले. त्यांनां बोलण्याजोगा विषय आतां एकहि आढळून येईना ! यावेळीं त्यांनां असें वाटूं लागलें, कीं, आतां जर आप-णाला 'सुट्टी' मिळेल तरच कांहीं आपला तरणोपाय आहे; परंतु हिला सरळपणें 'जा' असें तर सांगतां येत नाहीं. तसें कांहीं तरी तिला सुचविणें जरूर होतें.

गणपतराव असे पंचायतींत पडले आहेत, इतक्यांत वहिनीसाहेबच मृदु स्वरानें म्हणाल्या "अगदीं दमून गेल्यासारखं दिसायचं–रात्रहि बरीच झाली आहे. आपण जाऊन आतां निजावं स्वस्थपणीं."

सुटले एकदांचे बिचारे गणपतराव ! ते म्हणाले "हो, पण उद्यां पुनः भेट झाली पाहिजे अं अशीच ?"

"हो. पण इकडे राहील ना आठवण ?"

"वा ! हें का विचारणें झालें ?"

वहिनीसाहेबांनीं जातांना आपल्या हास्यभरित दृष्टीनें पुनः एकदां गणपतरावांकडे पाहिलें. त्या गेल्या-वर गणपतरावहि तेथून उठून बाहेर आले व बाहेरच्या वाड्यांतील दुसऱ्या मजल्यावर त्यांच्यासाठीं तयार केलेल्या खोलींत जाऊन पलंगावरील सुकोमल शुभ्र शय्येवर पडले.

त्यांनां आज लवकर झोंप येणें शक्य नव्हतें, आणि ती आलीहि नाहीं. वहिनीसाहेबांचें स्नेहकोमल उज्ज्वल मुखमंडल त्यांच्या दृष्टिसमोरून कांहीं केल्या हलेना ! आज 'कांहीं नवीनच' असें आपण पाहिलें, असें गण-पतरावांनां वाटूं लागलें.

प्रकरण सातवें.

काकांचा उपदेश.

गणपतरावांनां खरोखरच प्रवासाचा व इतर त्रास भारी झाला होता, म्हणून त्यांनां जरी उशिरां झोंप लागली तरी गाढ लागली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं ते जागे झाले, तों चांगलीं उन्हें पडलीं होतीं. खोलीच्या तीन भिंतींनां प्रत्येकीं दोन दोन अशा एकंदर सहा मोठाल्या खिडक्या असून त्या सर्वहि उघडलेल्या होत्या. बिछान्यावर पडल्यापडल्याच, खिडक्यांमधून ते बाहेर पाहूं लागले. आंबे, पेरू, जांब, जांभूळ वगैरे निरनिराळ्या जातींचीं पुष्कळ झाडें त्यांनां दिसत होतीं. आंब्यांच्या झाडांना, डहाळ्यांवरून लहान मोठे आणि मध्यम जातीचे हजारों आंबे लागले होते--त्यांपैकीं अजून बरेचसे कच्चेच होते–तरीहि कांहींकांहीं पिका-

वयाला लागून पिंवळे पडतहि चालले होते. पेरू वगैरे झाडांवरहि कांहीं फळें दिसत होतीं; परंतु आंब्यांपुढें त्यांच्याकडे कोणाचें फारसें लक्ष्यहि जाणें शक्य नव्हतें. हिरव्या व पिंवळ्या आंब्यांवर सूर्यकिरणें पडून त्यांची कांहीं मनोहर अशी शोभा दिसत होती. बिछान्यावर पडल्यापडल्याच गणपतराव या झाडांकडे पहात होते, व मनांत विचार करीत होते–हीं सारीं आतां माझीं आहेत-सारीं माझीं आहेत!

ज्या खोलींत गणपतराव झोंपले होते, ती त्यांनीं गेल्या रात्रीं नीटशी पाहिली नव्हती. आतां ती ते नीट पाहूं लागले. किंमती सामानसुमानानें ती सजविली आहे, असें त्यांनां दिसून आलें. थोड्या अंतरावर एक मोठें थोरलें वाटोळें मेज असून त्याचा वरचा भाग संगमवरी दगडाचा होता. त्याच्या पलीकडे भिंतीला लागून एक मध्यमाकृति, पण अतिशय सुंदर, काळ्या रंगाचें कपाट असून त्याचा दरवाजा संबंध बिलोरी आरशाचाच होता. बाजूच्या दोन्ही भिंतींला दोन खिडक्यांच्या मध्यभागीं दोन प्रचंड पुरुषभर उंचीचे सुंदर आरसे टांगले होते. खोलींत मखमाली आसनांचीं, भारी किंमतीचीं दोन कोचें असून त्यांवर मऊ मऊ रेशमी आवरणवस्त्रांनीं आच्छादिलेल्या उशाहि मधुनमधून ठेवल्या होत्या. गणपतराव ज्यावर निजले होते, तो पलंग मोहगनी लांकडाचा असून अतिशय सुंदर होता. त्याची किंमत काय असावी, याची जन्मदरिद्री गणपतरावांनां नुसती कल्पनाहि करतां येईना! भिंतींनां लहानमोठ्या अनेक तसबिरी टांगल्या होत्या; परंतु त्यांपैकीं बहुतेक होत्या विलायतीच–दोन चारच काय त्या चित्रशाळेपैकीं होत्या. या तसबिरींच्या या आरशांच्या फ्रेमी फार उंची असून सारख्या झगझगत होत्या. दोनचार फोटोहि भिंतींनां टांगलेले दिसत होते. त्यांच्या साऱ्या फ्रेमी सारख्याच होत्या.

हें सर्व किंमती सामान पाहून, गणपतराव धन्यतेनें आपणांशींच उद्गारले "हें सारें माझें आहे–सारें माझें आहे!"

कांहीं वेळानें उठून बसून गणपतरावांनीं अंगाला खूब आळोखेपिळोखे दिले, व ते पलंगावरून खालीं उतरले. दरवाजा उघडतांच दोन नोकरांनीं उठून त्यांनां नम्रपणें प्रणाम केला. मुखप्रक्षालनादि कार्यांसाठीं एकानें त्यांनां त्या बाजूकडे नेलें व दुसरा नानासाहेबांच्या शयनगृहावर पहारा करण्यासाठीं राहिला.

कांहीं वेळानें गणपतराव तेथें येऊन पहातात तों काकासाहेब तेथें येऊन आपलीच वाट पहात बसले आहेत, असें त्यांनां आढळून आलें. ते येतांच काका म्हणाले "चला, आज अगोदर क्षौर वगैरे उरकून घेतलें पाहिजे. न्हावी आला आहे–"

गणपतरावांनीं कांहीं न बोलतां, जणूं वडिलांच्या स्मरणानें आपणाला अत्यंत दुःख झालें आहे, असा योग्य अभिनय केला.

बाहेरच्या व्हरांड्यांत शागीर्दानें एक खुर्ची आणून ठेविली. तिच्यावर बसून गणपतरावजींनीं नापितराजांच्या हातीं आपलें मस्तक अर्पण केलें.

क्षौर, स्नान वगैरे विधि पूर्ण व्हावयाला आठ वाजून गेले. गणपतरावजींनां देवघरांत सोडून दिवाणजी बाहेर जावयाला निघाले, हें पाहून गणपतराव म्हणाले "काका, जातां कुठें? इथेंच स्नानबीन करून फराळ करा झालें."

दिवाणजी म्हणाले "नको–नको, नानासाहेब! अजून किती तरी कामें उरकायचीं आहेत मला. तेवढीं उरकून मी घरींच जाऊन स्नानपूजा करीन. मी बाहेर कचेरींत जाऊन कामें पहात बसतों. आपण फराळ वगैरे आटोपून तिकडेच या."

मान हलवून गणपतराव म्हणाले "नाहीं काका, कचेरींत माझी नका वाट पाहूं-असेच घरीं जा अन् स्नानबीन उरकून, फराळ करून लवकर या दुपारीं. आज वाड्यांतच पंक्तीला असलें पाहिजे, काका!"

"ठीक आहे– आपली मर्जी!" असें म्हणून दिवाणजी तेथून निघून गेले. गणपतराव देवघरांत जाऊन त्यांच्यासाठीं मांडलेल्या आसनावर जाऊन बसले. आईसाहेब तेथें अगोदरच येऊन चंदन उगाळीत बसल्या होत्या.

आईसाहेब तेथें असल्यामुळें आमचे गणपतरावजी मोठ्या संकटांत पडले. ब्राह्मणकुळांत जन्मच त्यांनां दिलेला होता; त्यामुळें गायत्री मंत्र तेवढा ते साफ विसरले नव्हते, इतकेंच. परंतु संध्येपैकीं एक अक्षरहि त्यांनां येत नव्हतें. त्यांची मुंज झाली, त्यानंतर सुमारें एक वर्षभर त्यांनीं संध्या नीट केली–परंतु त्यानंतर त्यांनीं संध्येला जी रजा दिली, ती कायमची! यामुळें आचमनें कधीं घ्यावयाचीं, नाकाला हात कधीं लावावयाचा, कान कधीं धरावयाचे, कुडच्यांत पाणी घेऊन तें जमिनीवर कधीं आपटावयाचें, अर्घ्यप्रदान

कधीं करावयाचें, जानव्यांत हात घालून डोळे मिटून ध्यानस्थ कधीं बसावयाचें, वर खालीं हात करून सभोंवतीं कधीं फिरावयाचें, या साऱ्या कवायतीचें गणपतरावांनां आतां कांहींच स्मरण राहिलें नव्हतें !–तिच्या अनुक्रमासंबंधानें तर त्यांच्या मस्तकांत अगदीं घोंटाळा उडाला. आईसाहेबांच्या समोर संध्या करण्याचें जर आपण ढोंग करूं लागलों, तर कदाचित् आपलें खरें स्वरूप चटकन् त्यांच्या ध्यानांत येईल, अशी त्यांनां भीति वाटूं लागली.

तेव्हां जरा विचार करून गणपतरावांनीं आपल्या सुपीक मस्तकांतून या संकटावर एक तोड काढली. ते आसनावर जाऊन बसले, व त्यांनीं सहा आचमनें घेऊन एकदम जानव्यांतच हात घातला, आणि एकशें आठ वेळ गायत्रीमंत्राचा मनांत उच्चार करून ते आसनावरून उठूं लागले.

हें पाहून आईसाहेबांनीं विचारलें "झाली का तुझी संध्या ?"

"हो झालीच. आम्हाला सारी संध्या नाहीं करायची आई—"

"मग ?"

"नुसत्या एकशेंआठ शिवगायत्री, बस्स ! आमच्या सांप्रदायाची संध्या एवढीच !"

"अस्सं ? बरं चल, फराळ करून घे थोडा—"

आईसाहेबांनीं जवळ बसून मुलाला प्रेमानें खाऊं घातलें. फराळ आटोपून गणपतराव वर येऊन आपल्या बसण्याच्या खोलींत सिगारेट ओढीत बसले. त्यांनां वाटत होतें, कीं, बहुतकरून वहिनीसाहेब आपणाला भेटल्याखेरीज रहाणार नाहींत. म्हणून मधुनमधून उत्सुक नेत्रांनीं ते दरवाज्याकडे आशाळभूतपणानें पाहूं लागले.

परंतु वहिनीसाहेब कांहीं आल्या नाहींत–आला एक धटिंगण नोकर ! तो येऊन नम्रपणें प्रणाम करून म्हणाला "दिवाणजींनीं पाठवलें आहे मला—"

"कशाला रे ?"

"हुजुरांची भेट घ्यायला गांवची बरीच मंडळी बाहेर जमली आहे. त्यांची भेट हुजुरांनीं आतां घेतली तर बरें होईल, असें हुजुरांनां सांगायला दिवाणजींनीं मला इकडे पाठविलें आहे."

क्षणभर विचार करून, गंभीरतेनें गणपतराव म्हणाले "ठीक आहे–काकांनां सांग–थोड्या वेळानें येतों मी म्हणावें."

आज गांवचे पुष्कळ लोक आपणाला भेटावयाला येतील, असें गणपतरावांनीं केव्हांच अनुमान करून ठेवलें होतें. या प्रसंगीं आपण कसें वागावें, हेंहि त्यांनीं आगाऊच निश्चित करून ठेविलें होतें. ही वेळ म्हणजे गणपतरावांच्या 'भयंकर दिव्या'ची होती. या अग्निपरीक्षेंत आपण तावूनसुलाखून कसे बाहेर पडतों, याची त्यांनां अतिशय काळजी वाटत होती. गांवांतील जी मंडळी आपणाला आतां भेटावयाला आली असेल, त्यांपैकीं कित्येक असेहि असतील, कीं, त्यांच्याशीं अस्सल नानासाहेबांचा कदाचित् अत्यंत स्नेहसंबंध असेल आणि त्यांच्यासंबंधानें त्यांच्या 'आत्मचरित्रां'त कांहीं उल्लेखहि नसेल ! अशा लोकांशीं कसें वागावयाचें, हा मोठाच प्रश्न गणपतरावांनां येऊन पडला होता.

परंतु लोकांच्या भेटीला बाहेर गेल्याशिवाय गणपतरावांनां कांहीं गत्यंतरच नव्हतें. नानासाहेबांच्या भूमिकेपैकीं अभिनयाला अतिशय कठीण असा हा भाग होता; परंतु सारें नाटक यथासांग पार पाडावयाला हा प्रवेशहि उत्कृष्ट रीतीनें पार पाडणें अत्यंत आवश्यक होतें.

गणपतराव कपाळ चोळीतचोळीत उठले, आणि बाहेर येऊन आलेल्या शिष्टमंडळींत जाऊन बसले. अतिशय सावधपणानें, एकएक शब्द तोलून ते बोलूं लागले.

मधुनमधून दिवाणजी एकादुसऱ्या शिष्टाचा गणपतरावांनां परिचय करून देत, व तेहि त्याच्याशीं अगदीं सावधपणानें दोन शब्द बोलत. नानासाहेबांच्या 'आत्मचरित्रा'ची जेथेंजेथें त्यांनां जितकी मदत घेतां आली, तितकी मदत तेथेंतेथें घ्यावयाला त्यांनीं बिलकूल कसूर केली नाहीं. आत्मचरित्राचा उत्कृष्ट उपयोग करून घ्यावयाला त्यांनीं या प्रसंगीं मुळींच मागेंपुढें पाहिलें नाहीं.

गणपतरावांच्या सुदैवानें आज गांवच्या शाळेचे हेडमास्तर आले असून ते बाहेरगांवचे आणि नवीनच आलेले असल्यामुळें या वेळीं ते त्यांच्या फार उपयोगीं पडले. त्यांच्याबरोबरच विशेष बोलावयाचें धोरण गणपतरावांनीं या वेळीं ठेवलें होतें. शाळेची सांप्रतची स्थिति कशी काय आहे, शाळेंत तूर्त विद्यार्थ्यांची संख्या किती आहे, ब्राम्हणांशिवाय दुसऱ्या कोणत्या जातीचे विद्यार्थी शाळेंत अधिक आहेत, वार्षिक परीक्षेचा 'परिणाम' कसा व कितपत झाला, पास झालेल्या विद्यार्थ्यांचें शेंकडा प्रमाण

काय पडलें, इत्यादि इत्यादि प्रश्न हेडमास्तरांनां करून, त्यांचीं उत्तरें ऐकण्यांत आपण अगदीं लक्ष्यपूर्वक गढून गेलों आहों, असा अभिनय ते करीत होते. आपण विद्योत्साही आहों, गांवच्या शिक्षणाकडे आपलें विशेष लक्ष्य राहील, असें ते गांवकरी मंडळीला विशेष रीतीनें भासवीत होते. लवकरच आपण शाळेला येऊन भेट देऊं, असें त्यांनीं हेडमास्तरांनां वचन दिलें.

अशा रीतीनें अर्धाएक तास गेला. वेळ अधिक होत चालला आहे, असें पाहून, एक एक शिष्ट हळूहळू उठूं लागला, व इनामदारसाहेबांनां प्रणाम करून, त्यांचा निरोप घेऊन जाऊं लागला. हें पाहून गणपतरावांनां 'सुटलों एकदांचे आपण !' असें वाटूं लागलें.

सर्व मंडळी निघून गेल्यानंतर दिवाणजी गणपतरावांनां म्हणाले "नानासाहेब, आपणापाशीं मला कांहीं बोलावयाचें आहे—"

"बोला, खुशाल बोला."

"भाऊसाहेबांनां जाऊन आज दोन वर्षें झालीं. ते होते तोंपर्यंत इनामदारीचा सर्व कारभार माझ्या मदतीनें तेच पहात होते; पण त्यांच्या मागें सर्व कारभार मला एकट्यालाच पहावा लागत होता. मला मदत अशी फारशी कुणाची नव्हती. नानासाहेब, मी आतां म्हातारा झालों आहें. वयोमानाप्रमाणें माझ्या साऱ्या शक्ति कमी झाल्या आहेत; त्यामुळें कारभारांत माझ्या हातून कांहीं भुलचुक्या झाल्या असतील. तेव्हां, भाऊसाहेब गेल्यानंतर जो कारभार गेल्या दोन वर्षांत माझ्या हातून झाला, त्याचे सारे कागदपत्र, हिशेबठिशेब एकदां आपल्या नजरेखालून गेले म्हणजे बरें—"

गणपतराव किंचित् हंसून म्हणाले "काका, काय बोलतां हें तुम्ही ? तुमचे कागदपत्र न् हिशेब मीं का तपासून पहायचे ? अन् मला तरी त्यांत समजतें काय अन् मला या कारभाराची माहिती तरी काय असणार ? आपण बाबांचे पूर्ण हितचिंतक होतां अन् त्यांचा आपणावर अतिशय भरंवसा होता, हें मला ठाऊक आहे. आपण जें कांहीं आजवर करीत होतां तेंच प्रमाण म्हणून ठरलें आहे अन् यापुढेंहि आपण जें कराल तेंच प्रमाण म्हणून ठरेल. त्याबद्दल आपल्या मनांत कांहींदेखील शंका आणूं नका—"

दिवाणजी संतुष्ट मुद्रेनें म्हणाले "हो, आपण म्हणतां कांहीं खोटें नाहीं. मी या इस्टेटीचा कारभार आज कितीतरी वर्षें करतों आहें. भाऊसाहेबांनीं ही इनामत विकत घेतली, तेव्हांपासून मीच हिचा कारभार करीत आलों आहें; पण नानासाहेब, माणसाच्या हातून चुकभूल होतेच आहे. त्यांतून मी म्हातारा. माझ्या हातून चुक्या थोड्याफार झाल्याहि असतील. तेव्हां यजमानांनीं एकदां हिशेबपत्रें नजरेखालीं घातलीं म्हणजे बरें, असें मला वाटतें."

गणपतराव हंसून म्हणाले "काका, आपण मला हिशेबाठिशेबांत जेवढा मोठा पंडित म्हणून समजतां आहां, तेवढा मी मुळींच नाहीं हो ! मला तुमच्या जमाखर्चाची अन् याची न् त्याची खरोखरच कांहीं माहिती नाहीं. अन् असती माहिती, तरी काय काका ? मी का तुमचे हिशेब तपासायचे ? नाहीं हो, इतका कृतघ्न मी नाहीं अन् माणसाची खरी किंमत मला पूर्णपणें समजते. आपली इमानदारी—"

काका मध्येंच म्हणाले. "पण आपली नजरचूक आपल्या नजरेंत तितकी येत नाहीं. दुसऱ्याला ती तेव्हांच आढळून येते."

"कसल्या चुकभुलीच्या गोष्टी सांगतां काका ?" हंसून गणपतराव म्हणाले. "अन् मी म्हणतों, कांहीं चुक्या झाल्या असल्या तर त्या तशाच राहूं देत. आपली नजर चुकवून जर त्या झाल्या असतील, तर मलाहि त्या सांपडायच्या नाहींत. कधीं त्या आढळून यायच्या असतील तर आपणालाच आढळून येतील !"

परंतु दिवाणजी कांहीं केल्या आपला आग्रह सोडीनात. ते म्हणाले "नानासाहेब, माणसाची दृष्टि का नेहमीं सारखीच असते? वयाप्रमाणें ती मंदमंद होत यायचीच. मला ही साठी उलटून गेली नानासाहेब ! आपण एकदां सारा कारभार समजून घ्याच. आपण एकदां कागदपत्र नीट पाहिलेत, कीं, माझ्या मनाला निश्चिंत वाटेल. पैसा हा जिन्नस फारसा बरा नाहीं बरें, नानासाहेब !"

गणपतराव हंसून म्हणाले "उघडच आहे काका ! पैसा जिन्नस अगदीं खराब ! त्यासाठींच तर मी घरांतून पळून गेलों होतों ना ? पण घर सोडून दूर रहायला मी समर्थ झालों का ? आपणां सर्वांनां विसरून जाणें मला शक्य झालें नाहीं काकासाहेब ! शेवटीं—"

काका मान हलवून म्हणाले "हो-खरेंच तें—"

"काका, ज्याअर्थी मी संसाराच्या जाळ्यांत पुनः पकडला गेलों आहें, त्याअर्थी हातापायांत मला या सोन्यारुप्याच्या सांखळ्या घालून घेतल्याच पाहिजेत; पण काका, बंदिवान् व्हायला मन थोडें कांकू करायचेंच–दोन दिवस जात ना कां आणखी आजवर गेले तसेच!"

काकासाहेबांवर आपल्या निर्लोभतेची छाप पाडण्याकरितां, तोंडानें गणपतराव हें बोलले खरे; पण त्यांच्या अंतःकरणांत मात्र या वेळीं अगदीं उलट विचार खेळत होते. इनामदारीचें नक्की उत्पन्न काय, स्थावर जंगम, इस्टेट काय आहे, रोख रकम जथ्थेबंद किती शिल्लक आहे, या साऱ्या गोष्टी आपणाला समजाव्या, म्हणून त्यांच्या मनाची सारखी धडपड चालली होती; परंतु ती दिवाणजींपाशीं प्रकट करणें मूर्खपणाचें होईल, ही गोष्ट त्यांनां चांगली कळत होती.

काका म्हणाले "हां, तें एक ठीक आहे. दोन दिवस गेले म्हणून कांहीं हरकत नाहीं मोठीशी. आजच म्हणजे मी आपणाला इनामतीचे कागदपत्र दाखवायला आरंभ करतों आहें असें नाहीं कांहीं. भाऊसाहेबांचें वार्षिक श्राद्ध आलें आहे जवळच–तें होऊन जाऊं द्या. त्यानंतर पहिलें काम म्हणजे कलेक्टरसाहेबांकडे कागदपत्रांतून नांवेंबिवें बदलण्यासंबंधानें अर्ज करणें, अन् जरूरीचीं सर्टिफिकिटें वगैरे मिळविणें. आतां सरकारी रोखे जे आहेत, त्यांसंबंधानें बिलकूल कांहींच धास्ती नाहीं; पण बँकांतून वगैरे जे पैसे जमा आहेत, त्यांच्यासाठीं सर्टिफिकिटाची जरूर लागेल असें दिसतें."

पैशाबद्दल आपणाला विशेषसा लोभ नाहीं, असें दाखविण्याचा शक्य तितका प्रयत्न करून गणपतराव म्हणाले "बँकांतून किती आहे रकम एकंदर, काका?"

"ऐंशीं एक हजार–"

"अन् सरकारी रोखे?"

"सहा लाखांचे सरासरी."

सहालाख ऐंशीं हजार रुपये रोख!–एवढ्या या प्रचंड रकमा दिवाणजींच्या तोंडून ऐकतांच, मोठ्या कष्टानें पंचवीस रुपड्या दरमहा कमावणाऱ्या या माजी रेल्वे कारकुनाचें माथें भिरभिरूं लागून त्याचे डोळे पांढरे होण्याची वेळ आली. गणपतराव मनांत वारंवार उच्चारूं लागले 'सहा लाख ऐंशीं हजार! सहा लाख ऐंशीं हजार!'

गणपतराव मनाशीं विचार करूं लागले 'हे वरचे नगद रुपये माझ्या हातीं लागले म्हणजे मला आणखीं कसलीच जरूरी नाहीं! हा इनामदारीचा कारभार एकंदरींत कठीण अन् भारी दगदगीचा! त्या कारभाराखालींच आपणासारख्याला मरायला होईल! त्या वसुल्या न् फिर्यादी न् मारामाऱ्या! नकोरे नको बाबा! त्यापेक्षां हा म्हाताराच मरेना त्या बोजाखालीं! आपण एवढें प्रचंड साहस करून, डोकीवर तीव्र धारेची तरवार लोंबती ठेवून, इनामदार होऊन जे येथें आलों, ते इनामदारीचें वैभव अन् सुख भोगण्याकरितां–या कारभाराच्या ओझ्याखालीं मरण्याकरितां नव्हे!'

गणपतराव स्वर किंचित् खालावून म्हणाले "काका, बैरागी झालेला मी जरी पुनः गृहस्थाश्रमांत परत आलों आहें, तरी माझा स्वभाव पहिल्यापासून कसा आहे हें आपणाला ठाऊकच आहे. पैसाअडका न् विषयसंपत्ति यांकडे माझा पहिल्यापासूनच विशेष ओढा नाहीं. हा कारभार पहाणें म्हणजे माझ्यावर एक मोठा बोजाच पडणार आहे काका! अन् तें काम मनापासून तितकें अडण्यासारखेंहि नाहीं. हा सर्व कारभार, कागदपत्रें न् हिशेब पहाण्यांत माझा जो वेळ जाणार तो जर पूजाअर्चा, जपजाप्य, शास्त्राभ्यास, तीर्थयात्रा इत्यादिकांत मला घालवतां येईल, तर माझ्या मनाला भारी शांतिसमाधान न् आनंद वाटेल, काका!"

दिवाणजी मान हलवून म्हणाले "वा: असें म्हणून कसें चालेल, नानासाहेब? असें कधीं तरी होईल? आपली इस्टेट, आपला कारभार, आपण जर पहाणार नाहीं, तर कोण पाहील? मी हा असा म्हातारा होत चाललों; मी पिकलें पान, केव्हां गळेन याचा नेम नाहीं अगदीं! आपण घरीं आलां, या वेळीं जर भाऊसाहेब जीवंत असते, तर आपणाला सर्व कारभार समजावून देऊन अन् आपणावर सारा भार टाकून आम्ही दोघे म्हातारे कुठें तरी काशीबिशीला जाऊन खुशाल 'हरिहरि' म्हणत बसलों असतों!" बोलतां बोलतां दिवाणजींचा गळा अगदीं दाटून येऊन, शब्द जड झाला. त्यांनीं आपलें उपरणें डोळ्यांनां लावलें, व क्षणभर ते स्तब्ध राहिले. नंतर ते म्हणाले, "पण देवानें तसें कांहींच आम्हांला करूं दिलें नाहीं. मला मागें ठेवून भाऊसाहेब विश्रांति घ्यायला एकटेच पुढें गेले–मी मात्र अभागी हा मागें राहिलों!"

दिवाणजींचा हा अन्तःकरणपूर्वक शोक पाहून गणपतरावांनींहि आपला चेहरा शक्य तितका दुःखी आणि विषण्ण करण्याचा प्रयत्न केला. कांहीं वेळ दृष्टि खालीं लावून ते सुस्कारे सोडीत स्तब्ध बसले.

शेवटीं ते म्हणाले " काका, तुझी धर्माचरणांत, देव-पूजेंत, जपजाप्यांत आपलें राहिलें आयुष्य घालवून परलोकचें साधन करून ठेवणार. त्यांत हरकती उपस्थित करण्याइतका नास्तिक न् पाषंड मी नाहीं. माझें म्हणणें इतकेंच होतें, कीं, माझ्याहि मनाची प्रवृत्ति तिकडेच आहे. धनमानवैभवाकडे नाहीं. तेव्हां मी संपत्तीच्या कर्दमांत कायमचा रुतून जाऊं नये—"

दिवाणजी म्हणाले " हो हो, तें तर उघडच आहे अगदीं. नानासाहेब, आपलें वय जेव्हां तितकें होईल, तेव्हां आपणहि त्या मार्गाला अवश्यमेव लागा. आपणाला मग कोण हरकत करणार ? पण आपलें हें वय वैराग्यसाधनाला योग्य नाहीं—अनुकूल नाहीं. या वेळीं, वयाला योग्य अशा संसारधर्माचेंच आपणाला आचरण केलें पाहिजे. वहिनीसाहेबांबरोबर राज्यैश्वर्य भोगीत आपण सुखानें संसार करा. देवाच्या दयेनें आपणाला दोन मुलेंबाळें होतील, त्यांचें कोडकौतुक करीत, त्यांनां लहानाचीं मोठीं करा. त्यानंतर तीं मुलें मोठीं होऊन तुमच्या राजसंसाराचा कार्यभार उचलण्याला पूर्णपणें समर्थ झालीं म्हणजे मग परलोक-मार्ग निष्कंटक होईल अशा पुण्यधर्मकर्माला आपण लागा. तोंपर्यंत आपणाला तो मार्ग निषिद्धच आहे !"

'देवाच्या दयेनें आपणाला दोन मुलेंबाळें होतील,' हे दिवाणजींच्या तोंडचे शब्द ऐकतांच गणपतरावांच्या अंतःकरणाची कांहीं विलक्षण स्थिति झाली. आदल्या रात्रीं दृष्टीला पडलेलें वहिनीसाहेबांचें तें हास्योज्ज्वल व अश्रुपूर्ण मुखमंडल त्यांच्या डोळ्यांसमोर दिसूं लागून तें तेथून कांहीं केल्या हलेना ! आज सकाळीं पुनः आपल्या 'अर्धांगी'चें दर्शन होईल, या आशेनें ते आपल्या खोलींत कितीवेळ तरी बसून राहिले होते—परंतु त्यांची ती आशा दुर्दैवानें पूर्ण झाली नाहीं. दुपारचें भोजन झाल्यानंतर कदाचित् तें सुंदर मुखमंडल पुनः आपल्या दृष्टीला पडेल—ही नवीन आशा गणपतरावांच्या मनांत आतां जोरानें आंदोलनें घेऊं लागली.

इतक्यांत आंतून एक नोकर येऊन, 'पानें वाढून तयार' असल्याची वर्दी देऊन गेला. त्याबरोबर काका-साहेबांनां बरोबर घेऊन गणपतराव आंत गेले.

प्रकरण आठवें.

'मुंबईला जाऊं एकवार !'

भोजन झाल्यावर, दिवाणजींनां बरोबर घेऊन गणपतराव आपणासाठीं तयार केलेल्या त्या खोलींत येऊन बसले. दाजीबानें येऊन पानसुपारीची नीट तयारी आहे कीं नाहीं तें पाहिलें, व सुगंधी गुडाखूनें भरलेली, रखरखीत निखारे ठेवलेली गुडगुडी आणून दिवाणजींजवळ ठेवली. एका थोरल्या आरामखुर्चीवर काकासाहेब आरामानें पडले होते. नानासाहेब त्यांचे यजमान असले, तरी वयानें ते त्यांनां अगदीं मुलासारखे असल्यामुळें व एक प्रकारचा वडिलपणाचा अधिकारहि त्यांच्याकडे असल्यामुळें, खोट्या नम्रपणाचें नाटक करून दाखविण्याची त्यांनां कांहीं जरूर नव्हती, व ते त्या नादींहि कधीं लागले नाहींत. आरामखुर्चीवर आरामानें पडून दिवाणजी गुडाखू ओढूं लागले.

गणपतराव त्यांच्या समोरच एका कोचावर आरामानें पडले होते. त्यांच्या जवळच एका अष्टकोनी चंदनी चौकीवर रुप्याचा पानांचा डबा पडला असून त्यांत सातआठ सुंदर विडे तयार करून ठेवले होते. दिवाणजींशीं बोलतांबोलतां, मधुनमधून त्यांतला एकएक विडा घेऊन गणपतराव तोंडांत टाकीत.

त्या दोघांत बराच वेळ गोष्टी चालल्या होत्या. बहुतेक गोष्टींचा विषय इनामतीचा कारभार हाच होता. दिवाणजी बोलतांबोलतां म्हणाले " एक काम जरूर केलें पाहिजे आपण. "

" काय ?" विडा चघळीत गणपतरावांनीं विचारलें.

" अर्ज वगैरे केल्यानंतर आपण कलेक्टरसाहेबांनां एकदां प्रत्यक्ष जाऊन भेटणें चांगलें. "

" कोणत्या पोषाखानें जावें ?"

दिवाणजी चेहरा गंभीर करून म्हणाले " तोच तर केव्हांपासून मला विचार पडला आहे. आपला हा भगवा पोषाख म्हणजे—"

गणपतराव हंसून म्हणाले " काय वाटतो आपणाला ?"

" कसासाच-जरा चमत्कारिक वाटतो मनाला. बाकी त्यांत म्हणजे कांहीं विशेष गैर आहे, अशांतला भाग नाहीं—"

"मी जेव्हां मठांत होतों, तेव्हांहि साहेबसुभ्यांच्या भेटी मला घ्याव्याच लागत—"

" कोणत्या पोषाखांत ?"

"अर्थात् भगव्या ! हा पोषाख बदलून जायची मला जरूरच नव्हती अन् त्या अधिकाऱ्यांनाहि त्याबद्दल कधीं कांहीं वाटलें नाहीं; परंतु त्या वेळीं गोष्ट निराळी होती. त्या वेळीं मी मठाधिकारी महन्त होतों-म्हणून तो शोभून जाई !"

" उघडच आहे. काय पोषाख असे त्या वेळीं आपला ?"

" भगव्या रशीमकांठी धोतराचा कांचा, अंगांत भगवा रेशमी सद्रा, त्यावर भगव्या रंगाची, जरतारीच्या किनारीची भगवी कफनी, डोकीला पातळ रेशमी जरीचा भगवा पटका, पायांत भगवे रेशमी पायमोजे. फक्त जोडा तेवढा भगवा नसे—बदामी !"

" त्या वेळच्या मठांतल्या या कफन्याबिफन्या आणल्या आहेत का बरोबर आपण ?"

" छेः !"

" तर मग मुंबईला जाऊन हा पोषाख तयार करून आणवला पाहिजे. कांहीं थोडें सामानसुमानहि आतां खरेदी करणें जरूर आहे."

मनांतून अतिशय आनंदून, पण तो आनंद वर न दाखवितां गणपतराव म्हणाले " मलाहि तसेंच वाटतें. मुंबईला जाऊं एकवार ! या वेळीं किती रुपये आहेत तिजोरींत रोख ? एक मोटरहि मुंबईहून घेऊन यावी, अशी इच्छा आहे."

दिवाणजी गणपतरावांकडे पाहून जरा तीव्र स्वरानें म्हणाले " मोटरकार ? भारी किंमत पडते तिला !"

दिवाणजींची ती दृष्टि पाहून व स्वर ऐकून, ते वृद्धकपि या बाबतींत आपल्या आड येण्याच्या विचारांत आहेत, असें गणपतरावांनीं अनुमान केलें. तेव्हां थोडेंसें कौशल्य लढवून ते नरम स्वरानें म्हणाले " छे छेः ! भारी किंमतीची मोटर घ्यायचीच नाहीं मुळीं ! या साऱ्या खेडेगांवच्या भिकार सडकांवरून दौडून पंधरा-वीस हजारांची मोटर नष्ट करून टाकायला मी कांहीं वेडा नाहीं. मोटर घ्यायची ती मध्यमशी किंवा लहानच घ्यावी झालें-सातआठ हजारांपेक्षां एक पैसाहि या चैनीच्या बाबतींत खर्च करायला नाहीं आपण तयार !"

आपल्या या भाषणाचा दिवाणजींच्या मनावर काय परिणाम झाला, त्याचा गणपतरावांनां कांहींच अंदाज कळेना. दिवाणजी शांतपणें म्हणाले " इतकी रकम आपणाला तिजोरीमधूनहि आतां खर्च करतां येईल. कधीं मुंबईला जायचें तो हुकूम व्हावा. म्हणजे त्याप्रमाणें कामकाजाची इकडे व्यवस्था नीट करून जातां येईल. तूर्त हातांत महत्त्वाचीं न् भारी जरूरीचीं अशीं एकदोन कामें आहेत, तीं त्याप्रमाणें पुरीं करून ठेवायला हवींत—"

दिवाणजींची ही प्रस्तावना ऐकून गणपतरावांनां कसेंसेंच वाटूं लागलें. 'मुंबईला जाऊं एकवार !' या आपल्या शब्दांचा ते अक्षरशः अर्थ घेतील, अशी त्यांनां कल्पना नव्हती. म्हातारा तर मग आपल्याबरोबर मुंबईला येणार ! म्हणजे काय, पुरा सत्यानाश आपला ! छट्, काय पाहिजे तें झालें तरी ही गोष्ट होऊं देतांच उपयोगीं नाहीं. मुंबईला आपणाला किती तरी ओळखीदेखीचे लोक भेटण्याचा संभव आहे. समजा, दिवाणजी बरोबर असतां, आपणाला एखादा असा ओळखीचा मनुष्य भेटला आणि खांद्यावर थाप मारून त्यानें आपणाला विचारलें " काय हो गणपतराव, कधीं आलांत दुधईहून ? बदलीबिदली झाली कीं काय ?" मग काय आगच लागावयाची चहूंकडे एकदम ! छट्, तें नाहीं उपयोगीं !

असा 'पोक्त' विचार करून ते म्हणाले " कधीं जायचें त्याचा कांहीं अजून मीं विचार नाहीं केला. कदाचित् उद्यांहि मी निघेन !" असें सांगतांना, कदाचित् हातांतील महत्त्वाचीं कामें आटोपून दिवाणजींनां इतक्या थोड्या अवकाशांत मुंबईला निघतां येणार नाहीं, असें गणपतरावांनां वाटत होतें.

परंतु ती त्यांची आशा व्यर्थ ठरली! दिवाणजी म्हणाले " ठीक आहे. उद्यांहि निघायला माझी कांहीं हरकत नाहीं. त्यामुळें कांहीं विशेष नुकसान होतें आहे असें नाहीं. मुंबईहून आल्यानंतर कामें उरकलीं तरी चालण्यासारखें आहे. पांचसात दिवसांपेक्षां अधिक रहावें लागेल का मुंबईला आपणाला ?"

आपण विचार करीत आहों, असें गणपतरावांनीं दाखविलें. क्षणभरानें ते म्हणाले " हो-कदाचित् रहावें

लागेल असें वाटतें. बहुधा दहा बारा दिवसांच्या आंत तिथलीं माझीं कामें आटोपतील, असें नाहीं लक्षण दिसत. बाबांचें श्राद्ध कधीं? इतक्यांतच आहे—"

"कृष्णचतुर्दशीला."

"त्याची तयारी आपणाला करायला हवी ना? दहाबारा दिवस आपणाला मुंबईला रहातां येईल का? इथें इतके दिवस आपण नसलां, तर घोटाळा नाहीं होणार का कांहीं?"

गणपतरावांचीं हीं भाषणें इतकीं स्पष्ट होतीं, कीं, त्यांचा खरा अर्थ काय तें लक्ष्यांत यावयाला दिवाणजीं-सारख्या माणसाला वेळ लागला नाहीं. यजमान आपणाला बरोबर मुंबईला न्यावयाला नाखूष आहेत, हें काकासाहेब केव्हांच समजले, व त्याबद्दल त्यांनां बरेंच आश्चर्य वाटल्यावांचून राहिलें नाहीं.

आश्चर्य वाटण्याजोगीच ती स्थिति होती. आपण अत्यंत सदाचारी, शुद्ध अंतःकरणाचे, आजपर्यंत वाममार्गावर कधीं एक पाऊलहि न टाकलेले असे जन्मब्रह्मचारी आहों, अशीच गणपतरावांनीं वाड्यांतील सर्व आबाल-वृद्ध माणसांची समजूत करून दिली होती; अशा स्थितींत आपणाला बरोबर न्यावयाला नानासाहेब इतके नाखूष कां असावे, याचें कारण दिवाणजींच्या कांहींच ध्यानांत येईना.

परंतु या गोष्टीला काकांचा कांहींच इलाज चालण्या-सारखा नव्हता. काय करावें? वास्तविक यजमानांचा कान धरून, त्यांची कानउघाडणी करण्याचा आपला अधिकार! परंतु तो अधिकार दिवाणजींनां असून नसल्यासारखें झालें होतें. आज सकाळींच आईसाहेबांनीं त्यांनां एकीकडे बोलावून या बाबतींत सावध करून ठेविलें होतें. आईसाहेब त्यांनां म्हणाल्या "भाऊजी, एका गोष्टीसंबंधानं आपणाला फार जपायला हवं बरं. आणखी कांहीं दिवस तरी नानाला कुठंहि एकटं जाऊं देतां कामा नये. त्याच्यावर आडूनआडून चांगला पहारा ठेवायला हवा. झालं, त्याच्या मनाला कांहीं लागेल असं आडून आडूनदेखील आपणा कुणालाच कांहीं बोलतां कामा नये. नाना आजपासून कुठंहि जावो, पुण्यामुंबईकडे जावो, सांगलीमिरज कोल्हापुरकडे जावो, त्याच्याबरोबर तुम्ही आपले जाच भाऊजी! नानाचं मन कधीं फिरेल, याचा कांहीं नेम नाहीं. पुनः तो पळून जाणार नाहीं, अशी आपणाला पूर्ण सावधगिरी ठेवली पाहिजे. नानाचं मन रंखूनराखून आपणाला राहिलं पाहिजे अन् त्याच्यावर नीट पहारा ठेविला पाहिजे."

आईसाहेबांनीं दिवाणजींनां असें स्पष्ट बजावून सांगितलें असल्यामुळें त्यांनां आतां निराळ्याच युक्तीचें अवलंबन करावें लागलें. ते गणपतरावांनां म्हणाले "चांगली आठवण करून दिलीत आपण मला. कृष्णचतुर्दशीला भाऊसाहेबांचें श्राद्ध, ही गोष्ट माझ्या लक्ष्यांतच नव्हती मुळीं. या वर्षीं तर त्यांची श्राद्धतिथि मोठ्या थाटानें पाळली पाहिजे. श्राद्धाधिकारी आपण इतक्या वर्षांनीं घरीं आलां, तेव्हां दानधर्म न् जेवणखिवण मोठ्या कडाक्यांत झालें पाहिजे. गरिबागुरिबांनां अन्न-वस्त्र-दान आठवण रहाण्यासारखें झालें पाहिजे. तेव्हां श्राद्धाला लागणारे जिन्नसपान्नस अन् वांटायचीं वस्त्रें वगैरे मुंबई-हूनच आणलीं पाहिजेत. तूप, साखर, गहूं, डाळी वगैरे पदार्थ मुंबईहूनच आणले म्हणजे स्वस्तहि पडतील जरा. श्राद्धाच्या पूर्वीं दोनतीन दिवस पांचएक हजार पायरीचे आंबेहि आणावे मुंबईहून अन् गरिबांनां आमरसपुरीचें जेवण द्यावें असें माझ्या न् आईसाहेबांच्या मनांत आहे. दुसरी फळफळावळहि ब्राह्मण मंडळीकरितां आणावी लागेलच. हे सर्व जिन्नस विकत घेऊन, योग्य वेळीं योग्य बंदोबस्तानें पाठविण्याचें काम तेथेंच आपल्या ओळखीच्या एखाद्या विश्वासू माणसावर संपवून मी लवकरच परत येईन. श्राद्धाच्या सैंपाकाला अन् गरिबागुरिबांचें अन्न तयार करावयाला मुंबईहूनच चार आचारी आणावे लागतील. त्यांची व्यवस्था जर एव्हां-पासूनच करून ठेवली नाहीं, तर आयत्या वेळीं ते मिळायचे नाहींत अन् सारीच फजीती उडेल!"

गणपतराव आश्चर्यानें ह्मणाले "काय? सैंपाक करायला मुंबईहून आचारी आणायचे? वः! गांवांत नाहीं का कुणी माणसें मिळायचीं? माझ्या लहानपणीं, मला चांगलें आठवतें आहे, कुणाच्या घरीं कांहीं असें कार्य निघालें, तर गांवची मंडळीच सैंपाकाचें वगैरे काम उत्तम रीतीनें पार पाडीत असत. पुरुषमंडळीच हें काम मोठ्या हौशीनें अंगावर घ्यायची!"

दिवाणजी खिन्नतेनें हंसून म्हणाले "अरे राम! ते दिवस का आतां राहिले आहेत? नानासाहेब, त्या गोष्टीहि आतां बोलायला नकोत. सोळा वर्षांपूर्वी आपल्या दृष्टीला जें पडत असे, तें आतांहि पडेल, अशी आशासुद्धां आपण करूं नका. त्या काळीं, प्रत्येक आळीला अशी दोनचार तरी उत्साही अन् परोपकारी

ब्राह्मण मंडळी ही असायचीच ! आपल्या आळीला किंवा गांवांतहि कोणाच्या घरीं कसलेंहि कार्य निघालें म्हणजे आपण होऊन ही मंडळी यजमानाच्या घरीं जायची अन् एकून एक कार्यांत त्याला कंबर कसून मदत करायची. श्रमांकडे कीं कशा कशाकडे ते पहायचे नाहींत. अगदीं आपल्या घरचें कार्य असल्याप्रमाणें ते यजमानाच्या घरचें काय वाटेल तें काम उचलायचे ! अमूक एक काम मी कसें करूं, हा अभिमान त्यांनां कधींदेखील शिवायचा नाहीं. त्यांच्या मनाला वाटत असे, कीं, आपण यजमानाला मदत करणें हें आपलें 'ग्रामबंधु' या नात्यानें कर्तव्यच आहे, यांत आपण कांहीं अधिक करतों आहों असें नाहीं. उलट, आपल्या श्रमांमुळें पांच सत्पात्र ब्राह्मणांनां अन्न मिळत आहे, हें आपलें भाग्य होय, अशी त्यांची कल्पना असे. हल्लींच्या लोकांनां वाटतें, कीं, यजमान कार्य करायला निघाला तर त्यानें मरमर मरावें हवें तर, नाहीं तर सामर्थ्य असेल तर पैसे टाकून माणसें आणावींत खटपटीला. आम्ही का स्वयंपाकी ब्राह्मण आहोंत, का खटपट्ये शागीर्द आहोंत असलीं कामें करायला ? असलीं कामें करणें म्हणजे हल्लीं लोकांनां अतिशय अपमानाचें वाटतें, नानासाहेब ! "

गणपतराव विचार करूं लागले—'दिवाणजी आपणाबरोबर मुंबईला आल्याशिवाय कांहीं सोडीत नाहींत, असें दिसतें. त्यांनां कसें चुकवावें ? जाऊं द्या. पुढची गोष्ट पुढें पहातां येईल. इतक्या वेळांत वहिनीसाहेबांचें जेवण वगैरे आटोपलें असेल; दिवाणजींची ब्याद येथून लवकर टळेल, तर बिचारी इथें येऊन चार सुखदुःखाच्या तरी गोष्टी बोलेल !'

असा विचार करून गणपतराव कांहीं वेळ स्तब्ध बसले, व नंतर एक मोठी थोरली जांभई देऊन तोंडापुढें टिचक्या वाजवीत ते आळोखेपिळोखे देत उद्गारले "अघाई-हो-"

दिवाणजींच्या लक्ष्यांत ही गोष्ट तावडतोब आली, ते म्हणाले " बरें तर मग, मी उठतोंच आतां. आपण थोडा वेळ आतां स्वस्थ पडा. इथेंच बिछाना आणायला सांगूं का ? "

" हो-सांगा—"

" अरे दाजीबा-ए दाजीबा ! " अशा हांका मारीत दिवाणजी तेथून निघून गेले.

प्रकरण नववें.

" बघ-विसरशील अं ! "

तेथें बसून रहाण्यांत गणपतरावांचा जो हेतु होता, तो लवकरच पूर्ण झाला. दिवाणजी उठून गेल्यावर सुमारें दहा पंधरा मिनिटांच्या आंतच वहिनीसाहेब तेथें आल्या. या वेळींहि त्यांचें मुखमंडल जमिनीकडेच लागलें असून त्या मुळींच वर पहात नव्हत्या.

वहिनीसाहेब या वेळीं खडी काढलेली काळीभोर चंद्रकळा नेसल्या असून ती त्यांच्या गौरवर्णाला भारीच शोभा देत होती. त्यांच्या अंगांत तांबड्या रेशमी कांठांची एक साधीच पांढरी सफेत चोळी होती. त्यांच्या हातांत हिऱ्याच्या बांगड्या, गळ्यांत पेट्या व बुचड्यावर चमकदार गुलाबाचें फूल, एवढेच अलंकार आज होते; परंतु या अलंकारांच्या अल्पतेनेंच त्यांच्या सौंदर्यांत किती तरी भर पडली होती.

वहिनीसाहेबांनां पहातांच गणपतरावांची अगदींच गडबड उडाली. त्या त्रेधेंत ते बोलून चुकले " कुठें जातेस ? "

त्यांचा हा प्रश्न ऐकून वहिनीसाहेब बुचकळ्यांत पडल्या. त्या म्हणाल्या "म्हणजे ? मी कुठं जातें आहें ?"

आपली चूक गणपतरावांच्या आतां लक्ष्यांत आली, ते लज्जित होऊन म्हणाले " नाहीं नाहीं-तसें नाहीं. मीं विचारलें तुला—"

" तर कसं ?" वहिनीसाहेबांनीं हंसून विचारलें.

" इतका वेळ तूं होतीस कुठें, असें मीं विचारलें हो!"

" अस्सं ! असा का आपल्या प्रश्नाचा अर्थ करायचा ?" वहिनीसाहेबांनीं पुनः हंसून विचारलें.

" नाहीं-आम्ही चुकलों ! झालें ? पण सांगशील तर खरी ? आतांपर्यंत तूं कुठें होतीस ?"

" देवघरांत. "

" बरें बस. उभी कां ? अजूनहि लाजच ?"

वहिनीसाहेबांनीं किंचित् हंसून सलज्जभावानें उघड्या दरवाज्याकडे पाहिलें. तत्क्षणीं त्यांच्या मनांतील विचार गणपतरावांच्या लक्ष्यांत आला. त्याबरोबर ते उठले,

आणि त्यांनीं दरवाज्यावरला पडदा नीट सरकावून घेतला. परत येऊन गणपतराव एका खुर्चीवर बसले, व समोरच्या कोचाकडे बोट दाखवून ह्मणाले " बस–बस इथं. उभें रहायचें कारण तें पहा मी आतांच नाहींसें करून आलों."

खालीं पहात, किंचित् हंसून वहिनीसाहेब खालीं बसल्या, व आपला एक हात दुसऱ्या हातीं धरून, खालची दृष्टि न उचलतां ह्मणाल्या " राग येणार नसेल, तर मी विचारूं एक ?"

" विचार–विचार—"

" आपण ह्मणे मुंबईला जायचं आहे ?"

गणपतराव हंसून ह्मणाले " गेली का इतक्यांत बातमी तुमच्यापर्यंत ? कांहीं पंधरा मिनिटें—"

" पण सांगावं ना ?"

" हो. मुंबईला जावें, असें माझ्या मनांत आहे."

गणपतरावांचे हे शब्द ऐकतांच, तत्क्षणीं, वहिनीसाहेबांच्या चेहऱ्यावर दुःखाची छटा पसरली. त्या खालीं पहात स्तब्ध बसून राहिल्या.

" कां–बोलत कां नाहींस ?"

" काय बोलावं तरी माणसांनीं ?"

" कां–राग का आला आमचा ?"

" नाहीं–राग नाहीं–" असें ह्मणून वहिनीसाहेब गप्प बसल्या.

" मग ? मध्येंच गप कां बसलीस ?"

"आतांच मुंबईला कशाला जायचं ?" वहिनीसाहेबांच्या या प्रश्नांत करुणेची छटा भरली होती-स्वर कंपित झाला होता.

वहिनीसाहेबांच्या या शब्दांनीं गणपतरावांनां कसें-सेंच झालें. अपराधी माणसाप्रमाणें ते जमीनीकडे नजर लावून ह्मणाले " कांहीं जरूरीचीं कामें अजून माझीं उरकायचीं राहिलीं आहेत–ह्मणून जातों आहें."

या वेळीं वहिनीसाहेबांनीं दृष्टि वर केली. त्यांचे डोळे अश्रूंनीं भरून आले होते. सजल नेत्रांनीं पतीकडे पहात त्या ह्मणाल्या " आपण मुंबईला जाणार हें ऐकून–"

" काय ?"

" आईसाहेब एकसारख्या रडताहेत."

" अन् तूं नाहींस ना ?" गणपतरावांनीं त्यांतल्या त्यांत किंचित् विनोद करून ह्मटलें. " बरें, आई तरी कां रडते आहे ? मी मुंबईला जातों आहें, यांत आईला काय, किंवा तुला काय, रडायला काय झालें हें मला कळत नाहीं बुवा ! खरेंच सांग–काय झालें?"

वहिनीसाहेब जरा धिटाईनें ह्मणाल्या " आपणाला आतांच जायची जरूर काय आहे मुळीं ?"

" इनामतीच्या कामांकरितांच जाणार आहें मी."

" त्यासाठीं काका जातील–आपणाला जायची कांहीं जरूरी नाहीं. आपण कां जायचं तें मला समजलं आहे."

" होय ना ?–मग मला कां विचारतेस ?" गणपतरावांनीं हंसून विचारलें.

" आपणाला जे जिन्नस पाहिजे असतील, त्यांची यादी काकांजवळ द्यावी जातांना, ह्मणजे ते मुंबईहून एकुणएक जिन्नस आणतील.बघावं तर खरं! हुषार आहेत ते–फसाबिसायचे नाहींत खरेदी करतांना—"

" अग–अशी कां माझी कल्पना आहे ? माझ्यासाठीं कांहीं कपडेबिपडे तयार करवायचे आहेत—"

" असतील—"

" ह्मणून मला स्वतःलाच मुंबईला गेलें पाहिजे—"

" असंच कांहीं नाहीं—"

" ह्मणजे ? काकांच्या अंगचे कपडे मला चालायचे नाहींत." गणपतराव हंसतहंसत ह्मणाले.

" तें मला माहिती आहे. पण त्यासाठीं आपणाला मुंबईला कांहीं खास जायला नको. काका मुंबईला गेले ह्मणजे इनामतीचीं कामं काय असतील तीं करतील, अन् परत येतांना, मुंबईच्या सर्वांत उत्तम दुकानच्या शिंप्याला, त्याची 'फी' देऊन न् त्याचा सारा खर्च करून, बरोबर इथं घेऊन येतील–त्याबद्दल कांहीं काळजी करायला नको—"

" अन् कापडें ?"

" आपणाला हव्या त्या तऱ्हेच्या कापडांचे नमुने घेऊन यायला मी काकांनां सांगतें. इथल्याइथं बसून त्यांपैकीं वाटेल ते नमुने पसंत करून शिंप्याला आपल्या अंगचं माप देऊन परत पाठवावा, ह्मणजे थोड्याच दिवसांत त्या कापडांचे आपल्या अंगचे कपडे तयार होऊन येतील. कपड्यांसाठींच मुंबईला जायचं कांहीं कारण नाहीं—"

गणपतराव कांहीं वेळ स्तब्ध बसले, व नंतर ह्मणाले " ठीक आहे. तुमची इच्छा नाहीं, तर मला तरी जाऊन काय करायचें आहे ? मी गेल्यानें आईला वाईट वाटणार–मग मी इतक्यांतच नाहीं जात."

असें ह्मणून गणपतरावांनीं डब्यांतून एक विडा घेऊन

तोंडांत टाकला, व डबा वहिनीसाहेबांकडे सारून ते ह्मणाले " घे-तूंहि एक घे."

वहिनीसाहेबांनीं हात लांब करून हळुहळू एक विडा डब्यांतून उचलून घेतला. त्या वेळीं त्यांची ती सुंदर नाजूक करलता थरथर कांपत होती. विडा हातीं घेऊन त्या स्वस्थ बसल्या. त्यांनीं तो खाल्ला नाहीं.

गणपतरावांनीं एकदम आठवण झाल्यासारखें करून विचारलें " हो, विचारायचें विसरलोंच ! तुझें जेवण झालें का पण ? आई जेवली ?"

" नाहीं-आह्मी जेवायला निघालों होतों, इतक्यांत काका आईसाहेबांकडे आले अन् त्यांनीं आपण उद्यांच मुंबईला जात असल्याची बातमी त्यांनां सांगितली—"

"अन् ती ऐकून आई न् तूं रडायला लागलां! होय ना?

" आईसाहेब रडूं लागल्या."

" अन् तूं नाहीं ना?" गणपतरावांनीं हंसून विचारलें.

वहिनीसाहेब कांहींच उत्तर न देतां खालीं पाहूं लागल्या.

क्षणभरानें गणपतराव हंसून ह्मणाले "अन् माझ्याकडे शिष्टाई करण्याकरितां आईसाहेबांनीं आपणाला ताबडतोब पाठविलें ! असेंच ना ?"

वहिनीसाहेबांनीं तोंडानें कांहीं उत्तर न देतां मान हलवून त्यांनां होकारार्थी उत्तर दिलें.

गणपतरावांनीं विचारलें " आईनें तुला इकडे पाठविलें नसतें, तर तूं कांहीं आपण होऊन इकडे आली नसतीस आतां ?" असें ह्मणून ते किंचित् हंसले.

तरीहि वहिनीसाहेब कांहीं बोलल्या नाहींत. त्यांच्या अधरावर किंचित् सलज्ज असें मधुर हास्य मात्र विलसूं लागलें.

इतक्यांत बाहेरून दाजीबानें हांक मारली "वहिनीसाहेब–"

चमकून वहिनींनीं विचारलें " कोण ? दाजीबा ? काय रे ?"

" हुजुरांचा बिछाना कुठें घालायचा ?"

" सांगतें अं ? जरा उभा रहा—" असें दाजीबाला सांगून वहिनीसाहेबांनीं गणपतरावांनां विचारलें " कुठं आपला बिछाना घालायला सांगूं ? आईसाहेबांच्या खोलींत आपण निजणार का इथंच ?"

" इथेंच."

परंतु त्या खोलींत पलंगाची वगैरे कांहींच व्यवस्था नव्हती.

वहिनीसाहेब दरवाज्याशीं जाऊन ह्मणाल्या "दाजीबा" इथंच झोंपणार. तूं लखूला सांगून पलीकडच्या खोलींतला धाकटा पलंग इथं आणीव अन् अंथरुणाची चांगली व्यवस्था कर."

" हुकूम—" असें ह्मणून दाजीबा निघून गेला.

वहिनीसाहेब परत येऊन आपल्या जागेवर बसल्या. दोनचार मिनिटें इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर गणपतराव ह्मणाले "जा तूं आतां—"

"कां ? कंटाळा आला वाटतं ?" वहिनीसाहेब हंसून ह्मणाल्या.

"भलतेंच ! मी केव्हांच जेवलों आहें अन् तूं अजून उपाशीं आहेस, हें आतां माझ्या लक्ष्यांत आलें. तूं जाऊन जेव अगोदर. बरें आतां सरकारांचें दर्शन कधीं फिरून ?" असें ह्मणून गणपतराव किंचित् हंसले.

" कां बरं ?"

हें विचारतांना वहिनीसाहेबांचा स्वर किंचित् विव्हल झाला. ही गोष्ट गणपतरावांच्या लक्ष्यांतहि ताबडतोब आली. ते ह्मणाले "कां बरें म्हणजे ? तुला पहावेंसें वाटलें म्हणून !"

वहिनीसाहेब मानेला किंचित् हिसडा देऊन ओंठ फुलवून थोड्या हंसल्या, व उद्गारल्या "अग्गबाई !"

"कां ? 'अग्गबाई' कां ?",

"उगीच आपलं !"

"विश्वास नाहीं वाटतें पटत ?"

मान हलवून वहिनीसाहेबांनीं स्पष्ट 'नाहीं' असें दर्शविलें.

गणपतराव हंसले व म्हणाले " कां ? कां बुवा ? विश्वास न पटायला आमच्या हातून झालें तरी काय असें ?"

वहिनीसाहेब कांहीं न बोलतां खालीं पहात राहिल्या. गणपतराव म्हणाले "सांग-सांग ना ?"

तरीहि वहिनीसाहेब कांहीं बोलेनात. गणपतरावांनीं त्यांनां कारण सांगण्याचा एकसारखा आग्रह चालविला. तेव्हां शेवटीं वहिनीसाहेब म्हणाल्या "उगीच आपलं मीं म्हटलं."

"चल, खोटें सांगतेस. नाहीं ना सांगायचें कारण तुला ? आम्ही विचारीतच नाहीं मुळीं !"

'पतिराज' रागावणार, असें पाहून वहिनीसाहेब हंसून म्हणाल्या "मला सोडून मुंबईला जायचं होतं, अन् याबद्दल एका अक्षरानं दिखील मला दाद द्यायची नाहीं."

गणपतराव ह्मणाले "म्हणून अविश्वास एकदम ?"

वहिनीसाहेबांनीं उत्तरादाखल मधुर स्मित मात्र केलें.

गणपतराव गंभीरतेनें म्हणाले "मुंबईला मी जात होतों म्हणजे कायमचा तर जात नव्हतों ना? दोन दिवसांकरितांच—"

"तरी जायचं होतं ना? अन् मला कळवल्या-वांचून?"

"तुला कळविल्यावांचून मी राहिलों असतों, असें तुला वाटलें तरी कसें? आतांच काकांजवळ बोलतां बोलतां गोष्ट निघाली मुंबईला जायची."

"अस्सं!"

इतक्यांत बाहेरून दाजीबा म्हणाला "वहिनीसाहेब, लखू पलंगडी घेऊन आला आहे."

"हं—"

गणपतराव म्हणाले "जा, तूं अगोदर जाऊन जेव ज्जा. आम्हाला काय गप्पाष्टकें झोडीत बसायला! किती तरी उशीर झाला आहे. मी आतां दोन तास तरी चांगली देतों तण्णावून. मी उठेन तों ऊनहि खालीं जाईल अंमळ—तूं येशील का फिरून मग?"

"कशाला बाई?"

"मला घेऊन बागेंत फिरायला चल." गणपतराव हंसून ह्मणाले. "मागल्या बागेंत नदीच्या कांठीं—"

"बागेंत फिरायला जाणार?"

"हो. तूं ये न् दोघेंजणें जाऊं."

लज्जेमुळें वहिनीसाहेबांच्या चेहऱ्यावर झट्कन् लाली चढली. पुण्यामुंबईकडे नवरा-बायको सायंकाळीं सहल करावयाला जातात, ही गोष्ट वहिनीसाहेबांच्या ऐकण्यांत नव्हती असें नाहीं, किंवा ती त्यांना नापसंत होती असेंहि नाहीं; परंतु प्रत्यक्ष ती गोष्ट अमलांत आणावयाला त्यांचें मन धजेना.

त्या म्हणाल्या "दोघांनीं एकदम?"

"हो—".

"छी छी! भलतंच कांहीं तरी!"

"भलतेंच काय झालें? मुंबईला जाऊन एकवार बॅकबेचा देखावा पहायला जा संध्याकाळीं—

"ही मुंबई नव्हे पण—"

"नसली, तर केली पाहिजे शहाण्या माणसांनीं."

"छी, दोघं बरोबर?"

"मग काय? मी अगोदर जाऊन बसूं न् तूं मागून येशील?"

"इश्श!"

गणपतराव दुःखित होऊन म्हणाले "मग काय तूं येणारच नाहींस? मग मी एकटा जाऊन काय करूं?"

"असं कधीं मीं म्हटलं?"

"मग काय?"

"आपण वेळेवर यावं बागेंत—"

"मी एकटा जायचा नाहीं! जाऊं तर दोघें—नाहीं तर मुळींच नाहीं, बस्स!" गणपतराव निश्चयात्मक स्वरानें म्हणाले.

"ऐकून तरी घ्यावं." वहिनी हंसून म्हणाल्या. "आपण यायचं तेव्हां यावं–मी तिथं अगोदरच जाऊन बसेन."

गणपतरावांचा आनंद गगनांत मावेना! त्यांनीं बजावून विचारलें "खात्रीनें ना अगदीं?"

"अगदीं खात्रीनं!"

"ठीक आहे. जा तूं आतां. पण बघ-विसरशील अं?"

"छे छे–आपण मात्र विसरूं नये म्हणजे झालं." असें म्हणून, गणपतरावांकडे पाहून वहिनीसाहेबांनीं लाजून मृदुहास्य केलें, व त्या तेथून मंद गतीनें निघून गेल्या.

गणपतरावजींच्या शरीरांत कांहीं अवर्णनीय अशा विद्युत्तरंगांचे झटके बसूं लागले!

इतक्यांत लखू व दाजीबा एक छोटा लोखंडी पलंग घेऊन आंत आले, व त्यांनीं गणपतरावांकरितां बिछाना तयार करावयाला आरंभ केला.

प्रकरण दहावें.

ताईचें गौप्य.

सायंकाळीं, त्या 'दांपत्यां' त निश्चित झाल्याप्रमाणें गणपतराव व वहिनीसाहेब यांची मागील बागेंत भेट झाली; परंतु तिचें 'आयुष्य' पांच सात मिनिटांपेक्षां कांहीं अधिक टिकलें नाहीं. एका लताकुंजांत वहिनीसाहेब गणपतरावांच्या अगोदर बराच वेळ एकट्याच जाऊन बसल्या होत्या. गणपतरावांनां शोधतां शोधतां

त्या एकदांच्या सांपडल्या; परंतु लज्जेचें दडपण त्यांच्यावर इतकें पडलें होतें, कीं, या वेळच्या वहिनीसाहेब ह्मणजे अगदीं खेडवळांतल्या खेडवळ बनल्या होत्या. त्या अगदीं थिजून गेल्यासारख्याच झाल्या! कोणी तरी कोणत्या दिशेनें येईल आणि आपण दोघेंच त्यांच्या दृष्टीला पडूं, या आशंकेनें वहिनीसाहेबांची दृष्टि अगदीं तरळल्यासारखी झाली, आणि त्यांचें मन तर पहिल्यापासूनच ठिकाणावर नव्हतें!

आपल्या पतिराजांशीं वहिनीसाहेब, या 'रोमान्टिक प्रसंगीं' दोन शब्द देखील बोलल्या नाहींत.

आपल्या पत्नीचें मन या वेळीं तिच्या बिलकूल ताब्यांत नाहीं, ती लज्जेनें व भीतीनें अगदीं मेल्यापेक्षांहि मेली होऊन गेली आहे, असें पाहून या प्रवेशाची इतिश्री करून टाकणेंच इष्ट आहे, असें गणपतरावांनां वाटूं लागलें, आणि दोनचार शब्द बोलून त्यांनीं वहिनीसाहेबांनां जावयाची परवानगी दिली.

पतिराजांकडून जावयाची परवानगी मिळतांच, वहिनीसाहेबांनां केवढ्या तरी प्रचंड संकटांतून सुटल्यासारखें वाटलें. मुक्ततेचा एक दीर्घ निश्वास टाकून त्या कुंजांतून झटकन् निघाल्या, आणि झाडांच्या आड्नआडून, लपतलपत, धांवतपळत, त्या कशातरी एकदां वाड्यामध्यें जाऊन पोहोंचल्या.

वहिनीसाहेब जातांच, 'काय मला भूल पडली भान हरपलें, तें मुख वर केलें, परि नाहिं चुंबिलें,' या दुष्यन्ताच्या अद्भुतरम्य मनःस्थितींत गणपतराव बागेची शोभा पहात इकडेतिकडे फिरूं लागले.

सूर्यास्त होण्यापूर्वी थोडा वेळ, यमुना व चंपा या दोघी 'मैत्रिणी'-अशी येथें संज्ञा दिलेली पाहून, प्रिय वाचक बंधुभगिनींनां थोडें आश्चर्य वाटल्यावांचून रहाणार नाहीं; परंतु अलीकडे खरोखरच त्या मैत्रिणी बनल्या होत्या,—तेथें आल्या होत्या.

चंपा जेव्हां पहिल्यानें या वाड्यांत घुसली, तेव्हां प्रथमप्रथम ती यमुनेविषयीं अगदींच बेफिकीर होती. तिच्याकडे ती फारशी कधीं ढुंकूनहि पहात नसे. त्या वेळीं यमुनाहि आपल्याच प्रचंड दुःखभाराखालीं अगदीं दडपून गेली असून, ती अगदीं मृतप्राय झाली होती, असें ह्मटलें तरी चालेल. इकडे चंपाहि वहिनीसाहेबांची मनधरणी करण्यांत आणि त्यांची मर्जी आपणांवर कशी बसेल यासंबंधाचीच खटपट करण्यांत अगदीं दंग होऊन गेली होती; परंतु थोड्याच दिवसांत वहिनीसाहेबांची मर्जी चंपेवरून हळुहळू उडूं लागली-कां उडूं लागली याचें विवरण आह्मीं मागें एकदां केलेंच आहे-आणि तेव्हांपासून, चंपेच्या नकळतच, अगदीं थोडथोडें, हळुहळू तिचें मन यमुनेकडे ओढूं लागलें. अलीकडे तर यमुना किंवा चंपा या दोघींनांहि वहिनीसाहेबांच्या सहवासाचा लाभ अगदींच थोडा मिळत होता-यामुळेंहि त्या दोघींमधील स्नेहभाव अलीकडे अधिकाधिक दाट होत चालला होता.

त्या दोघींमधील स्नेह वृद्धिंगत होण्याचें आणखीहि एक महत्त्वाचें कारण होतें. चंपा ही अत्यंत बुद्धिमान् व चतुर होती. यमुनेच्या चालचलणुकीवरून, वर्तनावरून तिच्या मनाची अशी पक्की खात्री झाली होती, कीं, या पोरीच्या जीवितामध्यें कांहीं तरी एक मोठें गूढ रहस्य असून तें इतरांपासून लपवून ठेवण्याचा ती जिवापाड यत्न करते आहे! हें रहस्य काय असावें, हें समजून घेण्याविषयीं चंपेचेहि प्रयत्न चालले होते; परंतु अद्यापि त्या बाबतींत तिला कांहींसुद्धां यश आलें नव्हतें. यमुनेचें गूढ रहस्य उकलण्याच्या उद्देशानेंहि चंपेनें तिच्याशीं इतका गाढ स्नेह करण्याचा कसून प्रयत्न चालविला होता.

त्या दोघी मैत्रिणी संध्याकाळीं, उष्म्यानें त्रासलेलीं आपलीं शरीरें नदीच्या थंडगार पाण्यानें स्नान करून शांत करण्याकरितां निघाल्या होत्या, हें त्यांनीं आपल्या बरोबर घेतलेल्या वस्त्रादिकांवरून स्पष्ट दिसत होतें. घाटावर जाऊन त्यांनीं स्नान केलें.

स्नान करून, त्या दोघी वर आल्या व कोरड्या वस्त्रांनीं आपलीं अंगें पुसूं लागल्या.

केंस जोराजोरानें पुसतांपुसतां यमुना ह्मणाली "वहिनीसाहेब तर भारी आनंदांत दिसतात, नाहीं माई?"

चंपा हंसून म्हणाली "असा ब्रह्मानंद होण्यासारखा जिन्नस हातीं आल्यावर कुणाला नाहीं आनंद होणार? तूं अगदीं एवढी देवधर्मनिष्ठ बैरागीण ना, पण तूं नाहीं का आनंदानं बेहोष होऊन जाणार?"

चंपेची ही थट्टा यमुनेच्या मनाला बिलकूल रुचली नाहीं-तिच्या मनाला ती भारीच लागली. तिच्या भुंवया रागानें किंचित् वांकड्या झाल्या; परंतु ती कांहींच बोलली नाहीं.

चंपा तिच्याकडे पहात गुणगुण करीत, हंसून म्हणूं लागली—

" नाहिं मनिंची हौस पुरलि,
सखे ग ! नाहिं मनिंची हौस पुरली !
नाहिं पतिचें मुख बघितलें !
नच त्याशीं वचन वदलें !
आशा ती मनिंच मुरली !"—

यमुना तिच्याकडे रागानें पाहूं लागली.

चंपा हंसतहंसत म्हणाली " अशा सायंकाळच्या सुंदर वेळीं, अशा एकान्त स्थलीं दिखील आम्ही गुणगुणूं नये, असं आम्हीं विधवांनीं काय पातक केलं आहे ग ? जळला तुमचा नेम न् धर्म !"

" माई, काय हें ?"

"बरं, जाऊं दे त्या गोष्टी तुला रुचत नसतील तर ! बरं, कायग यमुताई, ही का नानासाहेबांची अक्कल, का बुद्धि, का काय म्हणायचं हिला ?"

"काय झालं ?"

"ही व्रताची भानगड ग त्यांच्या !"

"तूं काय म्हणतेस तें माझ्या नाहीं बाई ध्यानांत येत !"

"आतां तुझीच अक्कल म्हणतें झालं !" असें म्हणून यमुनेकडे पाहून चंपा मोठ्यानें हंसूं लागली.

"माई, माई, काय हें ? कुणीं ऐकलं तर म्हणेल तरी काय आपणांला ?"

"काय म्हणणार आहे ? न् इकडे अगोदर मरायला येतं आहे कोण ? तूं कीं नाहीं यमुताई, अलीकडे मोठी शास्त्रीणबाई बनत चालली आहेस. म्हातारी असतीस तर आजीबाईच म्हटलं असतं तुला !"

यमुना कांहीं न बोलतां दुसरीकडे पाहूं लागली.

"मग अशी रागावतेस काय उठल्यासुटल्या ? बरं, अगदीं सरळ सांगतें. अग, हें व्रत नानासाहेबांचं ! व्रताची मुदत जर सहा महिने राहिली होती, तर अगोदर हे आलेच कशाला, विचारतें मी ?"

"कां बरं ?"

चंपा वेडावून म्हणाली "कां बरं काय, कां बरं ? व्रत पूर्ण झाल्यावर सहा महिन्यांनींच यावं होतं. आधीं येऊन हें व्रत पाळीत सहा महिने नाक धरून बसणार नानासाहेब, यांत काय शहाणपणा ?"

"शहाणपणा नाहीं का ?" यमुनेनें मृदु स्वरानें विचारलें. "समज, आईसाहेबांचं झालं आहे वय ! फट्दिशीं सहाच महिन्यांत कांहीं बरंवाईट झालं तर त्यांचं ? नानासाहेब घरीं आल्यामुळं मुलाचं तोंड पहात, त्याच्या मांडीवर डोकं ठेवून तर येईल मरतां म्हातारीला ?"

नाक वांकडें करून चंपा म्हणाली "म्हातारीची गोष्ट मी मुळींच बोलत नाहीं. मी बोलतें आहें तरणीसंबंधानंच—"

क्षणभर विचार करून यमुना म्हणाली "अग, त्यांच्यासंबंधानं म्हटलंस तरी काय एकच !"

" तें कसं ?"

" सहा महिने नानासाहेब अगोदर घरीं आले, हें वहिनीसाहेबांचं मोठं भाग्य नाहीं का ? पतीचं दर्शन हरघडी होणं, त्यांची सेवाशुश्रूषा करायला मिळणं, हें थोर भाग्याशिवाय का आम्हां बायकांनां लाधतं ? माई, यासारखं मोठं भाग्यच नाहीं बरं आमचं !"

चंपा यमुनेला थोडें ढकलल्यासारखें करून म्हणाली "पुरे पुरे शास्त्रीणकाकू ! मोठ्या अगदीं सीता, तारा, मंदोदरी बनल्या आहांत तें आहे ठाऊक मला ! बरं, या वादाचा निकाल नाहीं लागायचा. दुसरी एक अतिशय महत्त्वाची गोष्ट तुझ्या ध्यानांत आली का, यमुताई ?"

" कोणती ग ?"

" हे आलेले गृहस्थ जर नानासाहेब नसतील, दुसरेच कुणी असतील, तर ग ?"

चंपेच्या या शब्दांनीं यमुनेच्या अंगावर शहारेच आले ! ती तिच्या तोंडाकडे 'आ' करून टकमकां पहातच राहिली.

" असं वेड्यासारखं पहायला ग काय झालं ? हे नानासाहेब जर नसतील अन्—"

" तर काय, सत्यानाशच पुरा ! नाहीं. माई, त्याची मला कल्पनादिखील नाहीं होत."

" खरंच गडे !"

" नको माई, अशा गोष्टी बोलूंदिखील नकोस— मनांतदिखील आणूं नकोस. तसं होणं शक्यच नाहीं मुळीं !"

" शक्य नाहीं ! कां नाहीं शक्य ?"

" अग, ते जर नानासाहेब नसते, तर घरच्या मंडळीला त्यांची ओळख कशी पटली असती ? मी म्हणतें, कोणत्या ना कोणत्या तरी गोष्टीवरून त्यांना संशयदिखील नसता का आला ?"

" असता न् नसता, तें कांहींदिखील सांगतां येत नाहीं बाई ! अशा गोष्टी कधीं घडत नाहींत असं मात्र नाहीं."

" कसल्या गोष्टी ? " भीतीनें यमुनेनें विचारलें.

" एकादं माणूस पुष्कळ वर्षेपर्यंत असाच परागंदा होतो न् त्याचा कांहींच पत्ता मुळीं लागत नाहीं. बहुतकरून तो मरूनहि गेलेला असतो. त्याच्या संपत्तीच्या लोभानं त्या माणसाचं सोंग घेऊन एखादा पक्का लफंगा त्याच्या घरीं येतो अन् त्याच्या संपत्तीवर न् बायकोवर लाट मारतो, अशीं उदाहरणं किती तरी प्रत्यक्ष घडलीं आहेत. "

" काय ह्मणतेस–म्हणतेस तरी काय ? "

" मुंबईस रीपन थिएटरांत मी एकदां–नाहीं, मी एकदां एक नाटक पहायला गेलें होतें, तेव्हां आमच्या शेजारीं एक विद्वान् गृहस्थ बसले होते. ते आपल्या शेजाऱ्याला म्हणाले, 'भाऊसाहेब पेशव्यांचा एक तोतया उभा राहिला होता न् त्यामुळें कांहीं दिवस खूबच चळवळ उडून राहिली होती. नानाफडणीसासारख्या जंगी मुत्सद्द्यालादिखील त्याची कांहीं दिवस दहशत बसली होती. पण त्यांनींच त्या तोतयाचं खरं स्वरूप उघडकीला आणलं,न् बिचाऱ्या भाऊसाहेबांच्या पतिव्रता बायकोची-पार्वतीबाईची–भलत्याच विटंबनेंतून शिकस्तीच्या चातुर्यानं मुक्तता केली.हा विषय नाटकाला फारच चांगला असून मी त्यावर एक लवकरच नाटक लिहिणार आहें.' "

"या तोतयाला कुणींच ओळखलं नाहीं पहिल्यानं?"

" नाहीं–मोठमोठे चाणाक्ष लोक त्याच्या सोंगानं पुरे फसून त्याच्या पक्षालादिखील जाऊन मिळाले !"

" पार्वतीबाई चांगल्या सुंदर होत्या का ? "

" मला नाहीं तितकी पुरी माहिती–पण असतील बहुतकरून. पण तूं हें कां विचारते आहेस?"

"त्या तोतयानं अशा व्रताबिताचं कांहीं ढोंग केलं नाहीं ? "

" त्याची न् पार्वतीबाईची मुळीं तशी भेटच झाली नाहीं; पण त्यानं व्रताचं ढोंग केलंच नसतं ! पार्वतीबाई न् पेशवाईच्या प्रमुख सरदारकीचं वैभव न् मान लाटण्यासाठींच तर त्यानं हें बंड उभारलं होतं. "

यमुना हंसून म्हणाली " झालं तर मग. तुझ्याच तोंडून न्याय झाला आपोआप ! "

" तो कसा ? " चंपेनें आश्चर्यानें विचारलें.

" हा आलेला माणूस जर नानासाहेब नसून कुणी तरी लफंगा तोतया असता, तर, त्याचं व्रत खरोखरी असतं तरी वहिनीसाहेबांसारख्या सुंदर सद्गुणी बायकोच्या लोभानं त्यानं त्याच्यावर पाणी सोडलं असतं ! तोतया नानासाहेब वहिनीसाहेबांपासून व्रताच्या निमित्तानं असा आपण होऊन हाताच्या अंतरावर राहिला नसता. "

क्षणभर विचार करून चंपा मान हलवून ह्मणाली " नाहीं, मला नाहीं असं वाटत. "

" वः ! नवलच आहे मोठं ! "

" हा माणूस तोतया नाहीं, असं तुझ्या या प्रमाणानं बिनतोड सिद्ध होतं, असं नाहीं मला वाटत !"

" कां ? कां बरं ? "

" आणखी थोडा अवकाश गेल्याशिवाय तुझ्या या 'कां' चं मला उत्तर देतां येणार नाहीं. एवढं मात्र यावरून निःसंशय सिद्ध होतं—"

" काय सिद्ध होतं ?"

यमुनेला चंपेचें हें ह्मणणें पटत नव्हतें, असें तिच्या चिडखोर स्वरावरून स्पष्ट दिसत होतें.

" असं निःसंशय सिद्ध होतं, कीं, जर खरोखर हा तोतयाच असेल, तर भाऊसाहेब पेशव्यांच्या तोतयापेक्षां हा इंग्रजी राज्यांतला तोतया अधिक हुषार, अधिक चतुर न् अधिक बुद्धिमान् आहे. नाहीं तुला वाटत असं, यमुताई ? "

यमुताई खिन्न स्वरानें ह्मणाली " तो तोतया अधिक हुषार का हा हुषार, हा प्रश्नच नाहीं तूर्त. मी तर असं म्हणतें, कीं, वहिनीसाहेब प्रत्यक्ष पुरावा आहेत त्याच्या अस्सलपणाचा !"

" तें कसं काय बाई ? "

" आमच्या वहिनीसाहेब म्हणजे पूर्वीच्या सावित्री, सीता वगैरे पतिव्रतांच्या तोडीच्या आहेत. त्यांच्यासारखी दिव्य पतिनिष्ठा जगांत कुठं तरी आढळून येईल कीं नाहीं, याबद्दल मला फार शंका आहे. त्यांच्यासारख्या अस्सल पतिव्रतेची वंचना करणारा पुरुष जागच्याजागीं उभा जळून जाईल ! अन् परमेश्वर तरी वहिनीसाहेबांना जन्मांतून उठवण्याइतका निष्ठुर कसा होईल, माई ? "

यमुनेचें हें भाषण ऐकून चंपा एकसारखी 'खो खो' हंसू लागली. विचारी यमुना ! चंपेच्या या हर्षवायूचें कारण तिच्या लक्ष्यांतच येईना. ती चंपेच्या तोंडाकडे वेड्यासारखी पाहूं लागली.

हंशाचा आवेग थोडा ओसरल्यावर, यमुनेच्या तोंडाकडे पहात, मान डोलवीतडोलवीत चंपा ह्मणाली

यमुताई, भारीच गडे भोळी तूं ! तुझं पुढं होणार तरी कसं ग ?"

यमुना चिडून ह्मणाली "अग, झालं तरी काय असं ?"

"आणखी काय झालं ह्मणून मलाच उलट विचारतेस ? अग, तुझं हें कारण हल्लींच्या काळच्या पाळण्यांतल्या पोरालादिखील पटायचं नाहीं. पतिव्रतेच्या तेजानं जागच्या जागीं जळून जाण्यासारखं कापसाचं शरीर देव आतांच्या काळांत कुणालाच देत नाहीं हो! वहिनीसाहेब कांहीं नाहींत, पण तूं मात्र आहेस पूर्वीच्या कृतयुगाला शोभण्यासारखी भोळी !" असें म्हणून यमुनेकडे पाहून मान डोलवीत चंपा पुनः मोटमोठ्यानें हंसूं लागली.

यमुना यावर कांहींच बोलली नाहीं. अंग पुसून, सुकीं वस्त्रें नेसून त्या दोघीहि वर आल्या, व बागेमधून हळुहळू वाड्याकडे निघाल्या. यमुनेनें आतां हा वादग्रस्त विषयच मुळीं बदलला होता. हळुहळू गोष्टी बोलत बागेंतील वायुलहरींचें सेवन करीत त्या मंदगतीनें चालल्या होत्या. यमुना पुढें असून चंपा तिच्यामागें होती.

कांहीं अंतरावर गेल्यानंतर, बागेंतील रस्त्याच्या वृक्षलतांनीं घनदाट गजबजून गेलेल्या भागाच्या जरा बाहेर आल्यावर, एकाएकीं, यमुना चमकल्यासारखें करून जागच्या जागीं स्तंभित होऊन उभी राहिली. चंपा आश्चर्यानें जरा पुढें होऊन पहाते, तों जवळच कांहीं अंतरावर उभे असलेले गणपतराव तिच्या दृष्टीला पडले. या दोघींनां पहातांच, मागें वळून, ते उलट दिशेनें हळुहळू चालूं लागले. त्यांनीं पुनः मागें वळूनहि पाहिलें नाहीं.

चंपेनें यमुनेच्या चेहऱ्याकडे पाहिलें, तों तो अगदीं पांढरा फटफटीत पडला आहे, असें तिच्या दृष्टीला पडलें. तिचे हातपाय थरथरां कांपत होते.

यमुनेनें शुष्क स्वरानें विचारलें "ते कोण ग ?"

यमुनेचें हें 'लक्षण' पाहून, चंपेला अतिशय आश्चर्य वाटूं लागलें. गणपतरावांनां पहातांच हिची चर्या इतकी बदलून कां जावी, भीतीनें अगदीं गर्भगलित होऊन गेल्याप्रमाणें ही कां दिसावी, याचें कारण कांहीं केल्या तिच्या लक्ष्यांत येईना !

चंपेनें तिचा प्रश्न ऐकलाच नाहीं. चंपा कांहींच बोलत नाहीं, असें पाहून पुनः कंपित स्वरानें यमुनेनें विचारलें "माई, ते कोण ग ?"

जरा तीव्र स्वरानें चंपेनें उत्तर दिलें "कोण ह्मणजे ?- आपले यजमानसाहेब—"

चंपेच्या या शब्दांनीं यमुना भारीच चमकली; परंतु आपले आश्चर्यादि विकार शक्य तितके दाबण्याचा प्रयत्न करून ती म्हणाली "म्हणजे ? यजमानसाहेब कोण ?"

"नानासाहेब !-किंवा ज्यानें त्याचें इतकें बेमालूम सोंग आणलें आहे, तो नानासाहेबांचा तोतया !" असें म्हणून चंपा आपल्या तीव्र नजरेनें यमुनेकडे पाहूं लागली.

यमुना कंपित स्वरानें म्हणाली "काय म्हणतेस, माई ? ज्यांनीं नानासाहेबांचं सोंग घेतलं आहे, तो त्यांचा तोतया ! यांनीं का नानासाहेबांचं सोंग घेतलं आहे ?"

चंपेच्या मनांत जो कांहीं संशय कांहीं क्षणांपूर्वी उत्पन्न झाला, तो आतां जवळजवळ पक्का होत आला होता. तेव्हां त्यासंबंधानें कांहीं उजेड पडला तर पहावा, या हेतूनें ती मुद्दामच म्हणाली "सोंग घेतलंन् आहे कीं काय, तें मला ग काय माहीत ?-आपलं तुला—

"काय ?"

"तुला एक माहीत कीं त्याला !" असें म्हणून चंपेनें पुनः आपले तीव्र भेदक नेत्र यमुनेच्या चेहऱ्याकडे लावले.

स्वप्नांत असलेला मनुष्य ज्याप्रमाणें शून्य दृष्टीनें एकाच पदार्थाकडे पहात रहातो, त्याप्रमाणें यमुना चंपेकडे पहात राहिली. कांहीं वेळानें ती ह्मणाली "तूं काय ह्मणतेस, माई ? मला कांहींच कळत नाहीं!"

चंपा हंसून ह्मणाली "नाहीं–मी कांहीं दिखील ह्मणालें नाहीं. मीं ह्मटलं, कीं, या महिन्याचे दिवस किती राहिले ? चल, चल, इथंच वेड्यासारखं असं किती वेळ उभं रहायचं ?"

यमुना कांहींच बोलली नाहीं. चंपा पुढें निघाली, तिच्या मागोमाग खालीं नजर लावून तीहि चालूं लागली. वाड्यांत जातांच, त्या दोघीहि आपापल्या खोल्यांत शिरल्या.

चंपा आपल्या खोलींतील खाटेवर बसून किती वेळ तरी विचार करीत होती. तिच्या मनांत या वेळीं विचारकल्पनातरंगांनीं नुसता कल्लोल मांडला होता. थोड्या वेळापूर्वी बागेंत जी घटना घडून आली, तिचें खरें स्वरूप काय असावें, याविषयीं चंपेनें आपल्या

मनाशीं पुष्कळ तर्कवितर्क केले; परंतु तिची निश्चित अशी मीमांसा कांहींच झाली नाहीं.

नानासाहेब आणि यमुना कांहीं कारस्थान करून येथें आलेलीं नाहींत, एवढी मात्र चंपेची खात्री झाली; परंतु हीं दोघें परस्परांनां चांगलीं ओळखीत असावीं– मग ती ओळख कशाहि खरूपाची असो–याविषयींहि तिला कांहीं शंका उरली नाहीं. पण हा नानासाहेब ह्मणून आलेला गृहस्थ तोतया आहे, किंवा हा खरो-खरच नानासाहेब असून, त्या मठांत तो महन्त असतांनाच त्याचा आणि हिचा परिचय झाला, याचा मात्र चंपेला कांहींच निर्णय करतां आला नाहीं.

रात्रीं नऊ वाजले होते. गणपतराव फराळाला बसले होते. आज भारीच उष्मा होत असल्यामुळें उघड्या गच्चीवर त्यांच्या फराळाची व्यवस्था करण्यांत आली होती. त्यांच्या पानाजवळच एका लहानशा स्टुलावर एक मोठाथोरला ग्यासलेटचा दिवा तेवत होता. गच्ची-जवळच्या, एका खोलींत, अंधारांत, खुल्या खिडकी-जवळ उभी राहून यमुना अगदीं अचल दृष्टीनें गणपत-रावांकडे पहात होती.

इतक्यांत मागून बिलकूल पाय न वाजवितां येऊन चंपेनें यमुनेचे डोळे हळूच झांकले.

यमुना दचकून ह्मणाली " चंपाताई !"

चंपा हंसतहंसत पण डोळे न सोडतां ह्मणाली, "चंपाताई ! मी तुझ्यापेक्षां वयानं मोठी आहें वाटतं,तर मला तूं 'ताई' ह्मणतेस ? अगदीं कुकुलं बाळच कीं नाहीं ?"

यमुना अगदीं त्रासून गेली. मान हलवीत ती ह्मणाली "सोड ना ग डोळे माई !–अगदीं रग लागली बघ डोळ्यांनां !"

" नाहीं सोडणार डोळे ! इनामदारांचा राजबिंडा मुलगा फराळाला बसला आहे, तर त्याच्याकडे अशी चोरून पहात राहिली आहेस का ? बिचाऱ्याला दृष्ट दिखील लागेल तुझी !"

यमुना अगदीं चिडून ह्मणाली "असं काय करतेस ग पोरासारखं अगदीं ?–सोड माझे डोळे-अयाई ग—"

तिचे डोळे सोडून चंपा ह्मणाली " पहा पहा-डोळे फोडून पहा अगदीं–नाहीं तर कमी पडेल हो कांहीं !"

यमुना लज्जित होऊन ह्मणाली " तशा दृष्टीनं नव्हतें मी पहात हो माई ! तुझं आपलं कांहीं तरीच !"

चंपा हंसतहंसत म्हणाली " तशा दृष्टीनं पहा, नाहीं तर अशा दृष्टीनं पहा, त्याच्याकडे पहात होतीस, हें तर कांहीं खोटं नव्हे ना ? खरं बोल–ऐनजिनसीं चोर पकडला आहे !"

" बरं पकडलंस तर पकडलंस–मी मुळीं चोरून नव्हतेंच बघत. बघायला कांहीं कुणाची चोरी नाहीं !"

चंपा गुणगुणूं लागली " दे दर्शन तरि जिवलगा, जीव हा शिणला ! वाट तुझी बघतां–"

यमुना तिच्या तोंडावर हात देऊन ह्मणाली " तुला कांहीं लाजबीज तरी आहे का नाहीं, माई ? अग ऐकूं जाईल ना—"

" अन् तूं अगदीं मोठ्या लाजेची म्हणून अशी पर-पुरुषाकडे घटकान्‌घटका बघत बसली होतीस वाटतं ?"

" चल, बोलूं नकोस अगदीं ! कुठच्याकुठं वहात जातेस तूं !"

चंपेनें हंसून विचारलें " यमुताई, कुठली ग ओळख ?"

" ओळख ? काय म्हणतेस तूं ?"

" हो हो–ओळख–परिचय–मैत्री–स्नेह–यांपैकीं वाटेल तो शब्द घे. पण कुठली ओळख तें सांग !"

" काय म्हणतेस तूं माई ? कुणाची ओळख ?"

" यांची न् तुझी !"

" चल, भलतंच कांहीं तरी ! कुणीं सांगितलं ?"

" कुणीं सांगितलं म्हणे ! आणखी कोण सांगणार आहे ?"

यमुना भांबावून स्तब्धच राहिली.

" अग, यांनीं स्वतःच सांगितलं हो !"

" स्वतः सांगितलं ? कुणाजवळ ? तुझ्याजवळ ?"

" माझ्याजवळ कशाला सांगतील ?" चंपा हंसत हंसत म्हणाली. " सांगायचं त्याच्याजवळ सांगितलं– वहिनीसाहेबांजवळ सांगितलं !"

यमुनेला अत्यंत आश्चर्य वाटलें. ती विस्मय–स्वरानें उद्गारली " काय सांगितलं वहिनीसाहेबांपाशीं ?"

" सांगितलं, कीं, 'या बायकोची न् आपली एका काळीं ओळख झालेली आहे !' "

दृढ स्वरानें यमुना म्हणाली " असं सांगितलं वहिनीसाहेबांनां ? शक्यच नाहीं !"

" तर मग ? खरी हकीगत सांग आतां सगळी !"

कांहींच उत्तर न देतां, यमुना तेथून झट्कन् निघून गेली व आपल्या खोलींत जाऊन, अंथरुणावर पडून, उशीमध्यें तोंड लपवून स्फुंदस्फुंदून रडूं लागली.

त्या रात्रीं, फराळबिराळ उरकल्यानंतर, किती तरी वेळपर्यंत चंपेच्या खोलीच्या बंद केलेल्या खिडक्यांच्या फटींतून दिव्याचा उजेड दिसत होता. बिछान्यावर पडून वसंतरावांनां एक लांबलचक पत्र लिहून, रात्रीं एक वाजावयाच्या सुमाराला चंपेनें दिवा मालविला.

खंड चवथें.

प्रकरण पहिलें.

बुद्धिबळाचे डाव.

प्रिय वाचकांनां आतां आमच्यावरोबर मुंबईला आलें पाहिजे. खेतवाडींतील एका घरांतील दुसऱ्या मजल्यावरील एका खोलींत बसून वसंतराव ऊर्फ सुवर्णमालिनीसाहेब एक पत्र वाचण्यांत अगदीं गढून गेले होते. त्यांच्यासमोर टेबलावर दुसरा एक लिफाफा पडला होता. पहिलें पत्र वाचल्यानंतर वसंतरावांनीं हें दुसरें पत्र हातीं घेतलें. या पत्राचीं, पहिल्याप्रमाणें पुष्कळ पानें नव्हतीं. तें बरेंच लहान असून त्यांत पुढील थोड्या ओळी होत्याः—

"बाणथडी,

ता०—

प्रिय वसन्तराव,

आपलें पत्र आजच पोहोंचलें. माझा आणि आपला तर्क जुळला. जो संशय मला आला आहे, तसाच आपणालाहि आहे, हें पाहून मला संतोष वाटला. आपण ज्या कित्येक गोष्टींसंबंधानें माहिती विचारली आहे, ती अजूनपर्यंत मला मिळवितां आली नाहीं, याबद्दल आपण रागावणार नाहीं अशी आशा आहे.

उद्यां दिवाणजी कांका येथून निघणार असून, मुंबईला ते पांच सात दिवस रहाणार आहेत असें कळतें. ते ग्रँटरोड स्टेशनाजवळ, टिपनिसांच्या बंगल्यांत दाजीसाहेब देशमुखांकडे उतरणार आहेत. जर शक्य असेल तर आपण त्यांची समक्षच गांठ घेऊन आपणाला पाहिजे आहे ती माहिती त्यांच्याकडून काढून घ्यावी.

आपण मला लिहितां, कीं, बाणथडीला आणखी कांहीं दिवस तरी मी रहाणें अवश्य आहे; परंतु माझी येथें कांहीं चमत्कारिक स्थिति झाली आहे. वहिनीसाहेबांची मर्जी माझ्यावर फारशी नाहीं—इतकेंच नाहीं, तर त्यांची मजवर गैरमर्जी झाली आहे, असें ह्मटलें तरी चालेल. वहिनीसाहेबांनां आतां चांगला 'सहचर' मिळाला आहे, आतां त्यांनां 'सहचरी'ची कांहींच जरूरी नाहीं. आपण काकांनां भेटून माहिती निघण्यासारखी असल्यास काढून घ्यावी. माझी प्रकृति बरी आहे. विशेष मजकूर तूर्त नाहीं. लो. क. हे विनंति.

आपली भगिनी,

चंपा"

पत्र वाचून झाल्यावर वसंतरावांनीं समोरच्या भिंतीवरील घड्याळाकडे पाहिलें. तीन वाजून सात मिनिटें झालीं होतीं. ते मनांत ह्मणाले "आतां जावें झालें. आतां ह्मातारा खात्रीनें घरांत भेटेल. जरा उशीर झाला तर कदाचित् स्वारी कुठें निघून जायची !"

असें स्वतःशीं ह्मणून वसंतराव उठले व भिंतीशीं असलेल्या कपाटाजवळ गेले. खालीं बसून त्यांनीं कपाटाचा खालचा कप्पा ओढला, व त्यांतून एक एक कपडा काढून, त्याची घडी उलगडून ते नीट पाहूं लागले. आणि आश्चर्याची गोष्ट ही, कीं, चांगला कपडा दिसला, कीं, तो ते आज नापसंत करून निराळा ठेवीत. शेवटीं त्यांनां पाहिजे होते तसले कपडे त्यांनां सांपडले. एक साध्या चेकचा कोट असून तो छातीशीं फाटला हाता व दोन्ही हातांच्या टोकांच्या सुतांचें एकमेकांशीं बिलकूल नातें जमत नव्हतें. मानेच्या गळपट्टीवरहि तो एक-दोन ठिकाणीं फाटला होता. वसंतरावांनीं हाच कोट पसंत करून निराळा काढून ठेवला. असाच एक फाटका शर्ट काढून तोहि त्यांनीं निराळा ठेवला, आणि सर्व कपडे पुनः कप्यांत ठेवून तो त्यांनीं बंद केला. नंतर त्यांनीं त्याच्यावरचा कप्पा उघडून त्यांतून एक गाठोडें बाहेर काढलें आणि त्यांतून एक मळकें, फाटकें व शाईचे चारदोन मोठाले डाग पडलेलें धोतर बाहेर काढून, बोचकें परत कप्यांत ठेवून, तो त्यांनीं बंद केला.

नंतर आपलें नवें धोतर सोडून वसंतराव तें नेसले. तो फाटका शर्ट त्यांनीं अंगांत चढवला, या शर्टाला त्यांनीं मुद्दाम अगदीं हलक्या गुंड्या लावल्या असून हाताचीं भोकेंहि सुतानें बांधलीं होतीं. शर्टावरून त्यांनीं तो फाटका चेकचा कोट चढविला आणि एक जुनी मळलेली हंगेरियन टोपी चढवून व साधारण जुनें असें उपरणें गळ्याभोंवतीं लपेटून आणि कोपऱ्यांतली छत्री घेऊन वसंतराव खोलींतून बाहेर पडले.

घरांतून बाहेर पडण्यापूर्वी वसंतरावांचें लक्ष्य आपल्या हातांतील छत्रीकडे गेलें. ती छत्री सुंदर रेशमी असून तिची मूठ रुप्याची होती. त्याबरोबर त्यांनीं स्वतःशींच हंसून मान हलवून झटलें "छट्–ही नाहीं उपयोग !"

इतक्यांत समोरच वसंतरावांनां त्यांचा नोकर भिवाजी दिसला. त्याला त्यांनीं विचारलें "भिव्या, छत्री आहे रे तुझी ?"

"आहे; धनीसाहेब !"

"जा, घेऊन ये पाहूं."

भिव्यानें धांवतच घरांत जाऊन आपली छत्री आणली व धनीसाहेबांच्या हातीं दिली. वसंतरावांनीं पाहिलें, छत्री जुनी असून, हलक्या किंमतीची आहे. अर्थातच ती त्यांनां आज पसंत झाली. आपली छत्री भिव्याजवळ देऊन ते ह्मणाले "ही वर ठेवून ये–तुझी छत्री आज मी घेऊन जातों."

भिव्या आश्चर्यचकित होऊन आपल्या धनीसाहेबांच्या चेहऱ्याकडे पहातच राहिला. इतक्यांत चट्‌कन् त्याचें लक्ष वसंतरावांच्या नखशिखान्त पोषाकाकडे गेलें. तो पाहून तर भिव्याच्या आश्चर्याला सीमाच राहिली नाहीं. तो वसंतरावांच्या पायांतील फाटक्या जोड्यापासून तों डोकीवरील मळक्या टोपीपर्यंत वारंवार खालींवर खालींवर पाहूं लागला.

हा प्रकार असावा तरी काय, याविषयीं भिवाजी आपल्याशींच अनुमान करीत आहे, इतक्यांत वसंतराव ओरडून ह्मणाले "जा मूर्खा ! आ करून उभा काय राहिला आहेस?" असें ह्मणून वसंतराव घराबाहेर पडले.

भिवाजी वर जाऊन छत्री कोंपऱ्यांत ठेवून, तेथेंच एका खुर्चीवर बसला, व आपणाशींच विचार करूं लागला. इतके दिवस तो वसंतरावांच्या नोकरीवर होता, परंतु कधीं एक दिवसहि त्यानें त्यांनां असा भिकार पोषाख करून बाहेर पडलेले पाहिलें नव्हतें. वसंतरावजींचा पोषाख तर नेहमीं झकफक, फॅशनेबल, शक्य तितका किंमती आणि भपकेबाज असावयाचा, हें भिवाजी पहिल्यापासून पहात आला होता.

विचार करतां करतां, भिवाजीला एकदम आठवलें, कीं, आपल्या गांवचे बडे दुकानदार खंडाप्पा बावरे यांनीं देखील एक दिवस अशीच युक्ति केली होती ! खंडाप्पाच्या दुकानाची एकसारखी भरभराट होत चालली होती. त्यांच्या दुकानचा माल चांगला असून, त्यांचीं वजनेंमापेंहि अगदीं चोख असतात, अशी त्याची पंचक्रोशींत विलक्षण ख्याति झाल्यामुळें आसपासच्या पांचदहा गांवचे लोक खंडाप्पाच्या दुकानावरूनच माल नेऊं लागले. शिवाय खंडाप्पा वैद्यहि असून त्यानें पांचदहा सामान्य रोगांवर स्वतःचीं औषधें तयार केलीं होतीं. खंडाप्पानें काय युक्ति लढवली असेल ती त्याची त्याला माहीत ! परंतु त्याचीं औषधेंहि विलक्षण गुणकारी आहेत, अशी लोकांत लौकरच प्रख्याति होऊन त्यांनांहि चहूंकडून विलक्षण मागणी पडून खंडाप्पाचा जीव औषधें तयार करतांकरतां अगदीं मेटाकुटीला आला ! त्याचीं औषधें खरोखरीच गुणकारक असावींत, याबद्दल त्याचा गुबगुबीत चेहरा, लठ्ठ मान व प्रचंड शरीर हीं प्रत्यक्षच साक्ष देत होतीं. खंडाप्पाच्या दुकानाचीं अशी दोहोंकडून विलक्षण चलती चालली आहे, इतक्यांत एक दिवस त्याच्यावर इन्कम् टॅक्सची नोटीस येऊन थडकली ! खंडाप्पा मोठा धोरणी व चाणाक्ष माणूस होता. त्यानें विचार केला, आपला असा गुंडगोल तेजस्वी चेहरा पाहून आपल्या गरिबीबद्दल मामलेदारसाहेबांची कांहीं खात्री पटावयाची नाहीं. तेव्हां त्यानें दोन एक दिवस सणसणीत उपास काढून आंघोळहि केली नाहीं आणि साधारण मलिन व थोडासा फाटलेला पोषाख करून तो तालुक्याला जाऊन हजर झाला. अशा वेषांत खंडाप्पा मामलेदारांसमोर उभा राहिला आणि त्यानें युक्तियुक्तीनें आपल्या गरिबीबद्दल त्यांच्यासमोर रडगाणें गावयाला सुरवात केली. चमत्कार हा, कीं, खंडाप्पाची ही युक्ति सफल होऊन त्याचा इनकम् टॅक्स एकदम माफ झाला ! खंडाप्पाची ही हकीगत आठवतांच, भिव्याची भडकलेली तर्कचिकित्सा ठिकाणावर आली ! गंभीरपणें मान हलवून तो स्वतःशींच ह्मणाला "समजलों. डोय–पट्टी चुकवायला धनीसाहेब मामलेदाराच्या कोडतांत जाताहेत !"

इकडे वसन्तराव घराबाहेर पडतांच त्यांनां एक व्हिक्टोरिया दिसली. ज्यांचा व्हिक्टोरियाशिवाय पूर्वी कोठें पाय पडत नव्हता, तेच वसंतराव आतां तिच्याकडे ढुंकूनहि पाहिनात ! कांहीं अंतरावर गेल्यावर त्यांनां ट्रॅमचा नाका लागला, व त्यांनां जावयाचें होतें तिकडे जाणारी ट्रॅमहि त्यांनां येतांना दिसली. त्यांच्या खिशांत थोडेबहुत पैसेहि या वेळीं होते; परंतु वसंतराव ट्रॅममध्यें चढले नाहींत. ऐन उन्हाळ्यांतील त्या उन्हांत, डोकीवर छत्री धरून ते पायींच चालूं लागले.

कांहीं वेळानें वसंतराव ग्रांटरोड स्टेशनजवळ येऊन पोहोंचले, व थोडी चौकशी केल्यानंतर त्यांनां टिपनिसांचा बंगलाहि सांपडला.

बाहेरच एक बाळू बसला होता, त्याला वसंतरावांनीं विचारलें "काय रे, इथें कोण रहातात ?"

"कोन हवं जी आपनाला ?" बाळू ह्मणाला.

"दाजीसाहेब देशमुखांचें का घर हें ?"

"हो, शेट !"

"गुंडोपंत पटवर्धन आले आहेत, दाजीसाहेबांकडे?"

"गुंडोपंत ? कोन गुंडोपंत जी ?"

"बाणथडीला असतात ते–"

मान हलवून बाळू ह्मणाला "हां हां–त्ये भानथडीचे काकासाब दिवान असत्याल ?"

"हो–तेच !"

"होय, आले हैत."

"त्यांनां जरा सांगून येतोस ?"

"काय काम हाय जी ?"

"कांहीं जरूरीचें काम आहे माझें त्यांच्याकडे."

"आपुन कुठून आलासां जी ?"

वसंतराव कपाळाला आंठ्या घालून ह्मणाले "कुठून नाहीं रे बाबा—"

"कुठून नाई म्हंजी ?"

"अरे, इथूनच आलों मी–मुंबईहूनच !"

"आस्सं सांगा ना !"

"जा, काकासाहेबांनां जाऊन सांग–"

"पन सांगूं काय, शेट ?"

"काकासाहेबांनां सांग–ह्मणावें आपणाकडे वसंतराव आले आहेत."

"आपुनच वसंतराव काय ?"

"होय बाबा, होय ! भारीच चौकशी करतोस तूं–"

बाळू रुसून ह्मणाला "चौकशी केल्याबिगर कसं व्हतं शेट ? बरं, काकांनीं जर इचारलं, कोन वसंतराव म्हून न् काय काम है आपलं, तर त्यांस्नी काय सांगूं जी ?"

"सांग,आपली भेट घ्यायची आहे ह्मणावें एकवार."

"ठीक हाय. पण वसंतराव कोन ?"

वसंतराव अगदीं चिडून ह्मणाले "वसंतराव वकील आले आहेत ह्मणून सांग तूं काकासाहेबांनां."

'वकील' हा शब्द ऐकतांच बाळू चमकला, व तो आश्चर्यचकित मुद्रेनें वसंतरावांच्या चेहऱ्याकडे पाहूं लागला. दोनतीन वेळ त्यांच्या पायांपासून मस्तकापर्यंत पाहून, किंचित् स्मित करून बाळूनें विचारलें "आपुन वकील हैती जनू ?"

वसंतराव किंचित् हंसले, व ह्मणाले "होय–मी वकील आहें. पण माझ्याऐवजीं तूं वकील असतास तर छान शोभला असतास ! माझी तूं अगदीं कसून चौकशी चालवली आहेस, तशी दाजीसाहेब खऱ्यांनीं देखील एखाद्या साक्षीदाराची कधीं केली नसेल !"

बिचाऱ्या अशिक्षित बाळूला वसंतरावाचें हें बोलणें अर्थातच तितकेंसें कळलें नाहीं. 'वकीलसाहेब आपल्या चौकशीमुळें खूब चिडले असावेत,' एवढेंच काय तें त्याच्या लक्ष्यांत आलें. तो ह्मणाला "या शेट माझ्यामागून—"

बाळूनें त्यांनां दिवाणखान्यांत नेऊन बसवलें, व तो ह्मणाला "आपुन इथं बसा–मी काकासाहेबांनां सांगूनशानी येतों—"

वसन्तराव बाळूनें दाखविलेल्या टेबलाजवळील खुर्चीवर बसले. तो दिवाणखाना चांगला सुंदर असून आपल्या मालकाची श्रीमंती व उच्च अभिरुचि यांची साक्ष देत होता. दिवाणखान्याच्या भिंतींनां सुंदर 'ऑइलपेन्ट' केलें असून त्यावर बारीक वेलपत्ती काढली होती. भिंतींवर रविवर्म्याचीं व इतर सुंदर सुंदर चित्रें होतीं. दोन समोरासमोरच्या भिंतींवर दोन वयस्क स्त्रीपुरुषांचीं मोठीं तैलचित्रें टांगलेलीं होतीं. खालीं दिवाणखानाभर स्वच्छ, सुंदर सतरंजी पसरली असून मध्यभागीं एक संगमरवरी दगडाचें मेज व त्याभोंवतीं तीनचार सुंदर खुर्च्या होत्या. तीन भिंतींजवळ तीन सुंदर मखमाली कोच होते. दोन मध्यमाकृति काळीं झगझगीत आरशांचीं कपाटेंहि समोरासमोर होतीं. एका कोंपऱ्यांत कांचेच्या केसमध्यें हारमोनियम उभा केला होता. दरवाज्यांवर उंची कापडाचे पडदे सोडले होते.

टेबलावर दोनतीन मराठी मासिक पुस्तकांचे अंक पडले होते; त्यांपैकीं एक घेऊन वसंतराव वाचूं लागले. कांहीं मिनिटांनीं तो बाळू आंतून बाहेर येऊन ह्मणाला "शेट, काकासाहेब झोंपल्याती."

हें ऐकून वसंतराव जरा फिकीरींत पडले. क्षणभरानें त्यांनीं विचारलें "केव्हां उठतील बरें ते ?"

"लई वखत नाहीं लागनार. त्यांस्नी झोंपून मायंदळ वखत झाला हाय. आपुन वसतां जी ?"

"हो, बसतों.काकासाहेब उठले ह्मणजे सांग त्यांनां."

बाळूनें आंत जाऊन पानसुपारीचें तबक आणून त्यांच्यापुढें ठेवलें,व तो ह्मणाला "इडी–सिगारेट देऊं?"

"नको. भारी उकडतें आहे अगोदरच. तेवढा पंखा खोल बघूं—"

विजेच्या पंख्याची चावी फिरवून बाळू पुनः आंत गेला. घरघर करीत पंखा झपाट्यानें फिरूं लागून मृदु वायुलहरींनीं तो दिवाणखाना हळुहळू भरून गेला.

क्षणभरानें हातांतील मासिक पुस्तक टेबलावर टाकून खुर्चीवर मागें रेलून, मानेमागें हात धरून, वसंतराव विचारांत निमग्न होऊन गेले. ते स्वतःशींच ह्मणाले "काय नशिबाचा चमत्कार तरी! मनांत जें जें योजावें तें तें आपलें तिरपागडेंच होऊन बसतें! केवढा डाव रचीत आलों होतों—पण नशीब लंगडें! वहिनीसाहेबांनां पुनर्विवाहाला राजी करून त्यांच्याबरोबर लग्न लावून राजरोसपणें एवढ्या प्रचंड मिळकतीचा मालक होऊन चैनींत, आनंदांत, सुखांत आयुष्य काढण्याचा माझा बेत ऑफस झाला शेवटीं! कोण कुठून उडत आला अन् माझ्या पकडींतून अशी सुंदर बायको न् एवढी मोठी इस्टेट काढून घेऊन त्या दोघांचा चैनींत उपभोग घेत बसला आहे कीं नाहीं! चंपा तर लिहिते आहे, कीं, हा खरा नानासाहेब नाहीं—कुणी तरी त्याचें सोंग सहीसही घेऊन आलेला लफंगा तोतया आहे, अन् ही यमुना कोण असावी?—ही ह्मणे नदींतून वहात येऊन इनामदारांच्या वाड्याच्या घाटाला लागली. हीं दोन माणसें दोहींकडून थोड्या दिवसांच्या अंतरानें वाड्यामध्यें येऊन घुसतात; पण दोघें कांहीं एकमेकांशीं कारस्थान करून आलेलीं नाहींत, अशी आपली खात्री असल्याचेंहि ही पोर लिहिते! आहे तरी काय हा सारा घोंटाळा! कांहीं उलगडाच होत नाहीं बुवा! आपली तर मति गुंग होऊन अगदीं! मला असें वाटतें, कीं, चंपाताईचा हा तर्क बहुतकरून चुकीचा असावा. दोघेंहि वाड्यांत घुसलीं, तीं अगदीं एकमेकांच्या संमतीनें—परस्परांशीं संगनमत करून, कांहीं तरी जबर कारस्थान रचून, यांत कांहीं संशयच नाहीं मुळीं! नाहीं तर दोघेंहि एकदीं नेमकीं एकाच ठिकाणीं येऊन घुसतात कशीं? छट्—चंपा तर साफ हें असें नाहीं ह्मणते. मग हा तोतया कोण अन् ही बया कोण? तोतया आला असेल बायकोवर न् पैशावर लाट मारायला; पण या बयेचा तसा कांहींच हेतु दिसत नाहीं. या बाईला मिशा असत्या, तर एक बुवा कांहीं तसा तर्क करतां आला असता!"

ही शेवटची कल्पना मनांत येतांच वसंतराव आपल्याशींच हंसले. नंतर ते पुनः विचार करूं लागले. "या बुवानें सारेंच आमचें गाडें उफराटें करून सोडलें. नाहीं—पुनर्विवाह करून, एका अनाथ, गाईला बाहेर काढून समाजाला मानसिक धैर्याचें प्रशंसनीय उदाहरण घालून देणार होतों—परंतु या अट्टल ठगानें तो पुण्यलाभ माझ्या हातांतून हिरावून घेतला. नाहीं—पुनर्विवाह नाहीं आपल्या कपाळीं! तरी पण, आहे, एक नामी रोजगार आहे. हा नानासाहेब जर अस्सल नाहीं, तर त्याचा तोतयेपणा उघडकीला आणण्यापासून आपणाला हवा तेवढा फायदा करून घेतां येईल. जवळजवळ लाखएक रुपयांची आपणाला अगदीं निकडीची जरूर आहे. हा तोतया नाना कोण, हें जर आपणाला शिताफीनें शोधून काढतां आलें, तर त्याला एकीकडे गांठून तंबी देतों 'अहो नानासाहेब, आपण अस्सल कोण, काय, तें सारें आह्मांला कळलें आहे. मजबूत साक्षीपुरावाहि तें सिद्ध करण्याजोगा माझ्या हातीं अगदीं जय्यत तय्यार आहे. आतां अधिक कांहीं आमचें मागणें नाहीं—'मागणें लई नाहीं—पोटापुरतें देई!' बाहेर काढा पाहूं चट्कन् लाख रुपये. यावेळीं नगद रुपये एक लाख अन् महिना हजार रुपयांचा तनखा—पेन्शन ह्मणून—आह्मांला तोडून दिलास, तर आह्मी गप्प बसतों. आमच्या या अटी तुला कबूल असतील, तर उत्तमच गोष्ट—नसतील तर हा चाललों अस्साच पोलिस ठाण्यावर!' आतां महिना हजार रुपये जर बिनहरकत मला या इस्टेटींतून तोडून अव्याहत मिळतील, तर माझा कसाबसा चालेल संसार खुट्टरुट्ट! वहिनीसाहेबांशीं पुनर्विवाह करायला मिळता, तर सोळा आण्यांचा मालक होऊन काम सोळा आणे झालें असतें! पण आमच्या शिकंदर नशिबानें दगा देऊन तें कांहीं आह्मांला पचूं दिलें नाहीं—आतां ही तरी हुल्लड साधो, ह्मणजे झालें! हो, चोराच्या हातची लंगोटी—जळत्या घराचा वांसा! हजार रुपये रगड झाले, महिना!"

विचारांच्या प्रवाहांत वसन्तराव याप्रमाणें सारखे कोठच्या कोठें वहात चालले होते. त्यांतच ते निरनिराळे बेतहि करूं लागले. इतक्यांत तेथील मोठ्या घड्याळांत ठण्ठण् असे चारांचे ठोके पडले आणि बाहेर 'कुलफी मलाय' आणि 'आइस्क्रीम मलाय' अशा विकेत्यांच्या आरोळ्या ऐकूं येऊं लागल्या.

इतक्यांत बाळू दरवाज्यामध्यें उभा राहून ह्मणाला "शेट, काकासाहेब उठल्याती."

सुमारें सातआठ मिनिटांनीं, पायांतील खडावे खाड-खाड करीत, दिवाणजी, उघड्या शरीरानें, हलत-डुलत, उपरणें सांवरीत सांवरीत दिवाणखान्यांत येऊन थडकले.

ते दृष्टीला पडतांच, वसन्तराव खुर्चीवरून उठले, व त्यांनीं काकासाहेबांनां नम्रपणें नमस्कार केला. दिवाणजींनींहि प्रतिनमस्कार करून त्याचा स्वीकार केला.

किंचित् स्मित करून वसन्तरावांनीं विचारलें "मला ओळखलें का ?"

दिवाणजींनीं हंसून उत्तर दिलें "वा:! हें का विचारायला पाहिजे वसन्तराव ? बसा बसा."

वसन्तराव व काकासाहेब बसले. काकासाहेबांनीं विचारलें "हं–काय खबरबात ? सारें ठीक ना ?"

"आपल्या कृपेनें. आपण आज का आलांत ?"

"हो. सकाळीं. गाडी जरा लेटच झाली. पण मी इथें आलों आहें हें तुह्माला कसें कळलें ? चंपाताईनीं लिहिलें असेल ?"

"हो. आपली तब्बेत तर बरी आहे ?"

दिवाणजी हंसून ह्मणाले "वसंतराव, माझ्या वयाला साठी उलटून गेली, पिकलीं पानें आम्ही–केव्हां गळून जाऊं याचा नेम नाहीं." आमची तब्बेत बरी काय न् बुरी काय ? तुमची खबर काय बोला ? कुठें वऱ्हाडांत जाणार होतां, तिकडलें जमलें का कांहीं ?"

"छे,कांहींच नाहीं."

"उगीच दिवसगत कां लावतां आहां ? दिवस जातो एकएक, तसें तुमचें नुकसान होतें आहे."

"उघड आहे. पण करणार काय ?"

"कां बरें ?"

"पैशाच्या टंचाईमुळें मला कांहींच करतां येत नाहीं." वसन्तराव तोंड वाईट करून ह्मणाले.

"हो-तें ठीक आहे ह्मणा—"

"वऱ्हाडांत जाऊन वकिली सुरू करायची ह्मणजे कांहीं रकम जवळ पाहिजे अगदीं रोकडी ! कायद्याचीं पुस्तकेंच स्वतःचीं विकत घ्यावीं लागतील जवळजवळ तीनसाडेतीनशें रुपयांचीं ! शिवाय, जरा पोषाखबिषाख नीटनेटका न् वकिलाला शोभण्यासारखा तर हवा ? कपडेबिपडे, टेबलें, खुर्च्या, कपाटें वगैरे सामान–वकिलाचें दुकान मांडून बसावयाचें ह्मणजे हवेंच हें सारें. या सर्व गोष्टींनां केवढ्या रकमेची जरूर आहे तें आपणच पहा काकासाहेब ! शिवाय दुसरीहि अतिशय महत्त्वाची अशी एक बाब आहेच—"

"कसली बाब ह्मणतां ?"

"वकिलाचें दुकान मांडून बसलें ह्मणजे तावडतोब अशिलांचें गिऱ्हाईक लागतें आहे, असें थोडेंच आहे ! अहो, वऱ्हाडांत झालें ह्मणून काय झालें–तिकडे देखील वकिलांची जबरदस्त कॉंपिटिशन आहेच ! इकडल्यापेक्षां कांहीं कमी, इतकेंच - तिकडे देखील दीड रुपया दोन रुपये शेंकडा केसी घ्यायला लागले वकील हळुहळू. तेव्हां पोटापाण्याची थोडीफार तजवीज आगाऊ करूनच जायला पाहिजे. बिऱ्हाडाच्या पांचसहा महिन्यांच्या साऱ्या खर्चाची अगोदर मोटली बांधून गेलें पाहिजे बरोबर घेऊन–तेव्हां कुठें कांहींतरी आमच्यासारख्यांचा थोडाबहुत निभाव लागायचा–"

वसंतरावांचें हें भाषण ऐकून दिवाणजी मनांतल्या मनांत हंसून ह्मणाले "वकिलीचें तुमचें विकटोपर्यंतचें दिव्य ज्ञान आहे, त्यावरून पहातां, पांच सहा महिन्यांच्याच काय, पण पांच सात वर्षांच्या खर्चाची आगाऊ तजवीज करून ठेवून देखील तुमचें भागेल कीं नाहीं, याची मला शंका आहे." नंतर ते वसंतरावांनां उघडपणें ह्मणाले "तुह्मी इथें कुठेंशी मास्तरकी करीत होतां, नव्हे ?"

"हो. इथल्या एका हायस्कुलांत मी चाळीस रुपये दरमहावर लागलों. हल्लीं मला पगार वाढून पन्नास झाला आहे. इथें कांहीं आमच्यासारख्या गरीब मास्तर अन् कारकुनांचा क्लब आहे. त्यांत मी जेवतों न् असतों. शक्य तितक्या कमी खर्चांत रहाण्यासाठीं अशी व्यवस्था करावी लागली आहे नाइलाजानें. थोडेबहुत पैसे जमले, ह्मणजे कुठें तरी जायची तजवीज करीन."

"पण कुठें जायचें, तें तरी ठरवलें आहे का ?"

"तसें नाहीं नक्की ठरलें अजून–पण एका मित्रानें मला एक विचार सुचवला आहे."

"काय तो ? अरे ए रामा, जरा गुडाखूबिडाखू तर आण भरून. रात्रीं दाजीसाहेब आल्यावर काय ह्मणतील तुला, तें आहे काय लेका माहीत ? हं, काय ह्मणतां ?"

"नागपुरला जावें-तिकडे साऱ्या सोई बऱ्या आहेत."

"जागा ठीक आहे. संत्रींबित्रीं विपुल तिकडे–"

वसंतराव हंसून ह्मणाले "त्याकरितां मी तिकडे जाणार नाहीं आहें. माझ्या त्या मित्राचा बाप नाग-

अगदीं एकदृष्टीनें टक लावून पहाणें, नंतर तिचें चंपेशीं झालेलें संशयजनक संभाषण, या सर्व गोष्टी चंपेच्या पत्रांवरून वसंतरावांनां अगदीं इत्थंभूत रीतीनें कळल्या होत्या. या सर्व गोष्टींचें वारंवार पर्यालोचन केल्यानंतर वसंतरावांच्या मनाची अगदीं खात्रीच होऊन चुकली होती, कीं, यमुनेचें नदींतून वहात येणें ही गोष्ट केवळ दैवाधीन किंवा यदृच्छया घडून आलेली घटना नसून तिच्यामध्यें नानासाहेब म्हणून आलेल्या ठगाच्या आणि तिच्या,भागीबिगीच्या कारस्थानाचा पुष्कळ भाग खात्रीनें असला पाहिजे. हा नक्कल नानासाहेब अस्सल कोण आहे, हें शोधून काढणें जरी अतिशय कठीण काम असलें, तरी ही यमुना कोण हें शोधून काढल्यावर नानासाहेबांच्या कुटिल कारस्थानाचा धागान् धागा आपल्या हातीं येईल, अशी वसंतरावांची खात्री होती. या साऱ्या गोष्टींसाठीं, चंपेची या वेळीं भेट होणें अत्यंत आवश्यक होतें. पण ती होणार कशी? अशी कांहींच संधि आपणाला या वेळीं सांपडत नाहीं, हें पाहून वसंतराव आपणाशींच चडफडत हात चोळीत स्वस्थ बसले.

वसंतराव जेथें होते, तेथपासून थोड्याच अंतरावर कचेरीची इमारत होती. तेथें चार दोन इसम गप्पा ठोकीत बसले होते. वसंतराव मनाशीं विचार करूं लागले—"या माणसांमध्यें जाऊन त्यांच्याशीं दोन गप्पा तरी मारूं-इथें एकटें बसून तरी काय करावयाचें आहे?"

अशा 'कांहीं तरी' कामांत रात्रीचा पहिला प्रहर उलटला. सुमारें दहा वाजतां, आंतून पुनः एका नोकरानें येऊन, त्यांनां दूध वगैरे पाहिजे कीं काय म्हणून विचारलें. त्याला 'नको' असें उत्तर देऊन वसंतराव पुनः बैठकखान्यांत येऊन बसले. तेथें येऊन पहातात तों नोकराचाकरांची मारे गडबड उडून गेली आहे, असें त्यांच्या दृष्टीला पडलें. कोणी जिन्यावरचे दिवे लावीत होते. कोणी गडबडीनें वर जात होते, कोणी खालीं उतरत होते. त्यांच्या या गडबडीवरून, इनामदारसाहेबांच्या झोंपण्याची वगैरे ही व्यवस्था चालली आहे, असें वसंतरावांनीं अनुमान केलें.

थोड्याच वेळांत हातीं कंदील घेतलेल्या नोकरांच्या मागून, वाड्याच्या आंतील दरवाज्याकडून कोणी येत आहे, असें वसंतरावांच्या दृष्टीला पडलें. जवळचे नोकर आपसांत कुजबुजूं लागले "आले—आले अं हुजूर!"

गणपतराव व्हरांड्यांत पोहोंचतांच वसंतराव गडबडीनें उठून उभे राहिले. ते जवळ येतांच, मस्तक किंचित् नम्र करून हात जोडून त्यांनीं त्यांनां नमस्कार केला.

गणपतरावांनीं विचारलें "कोण आपण?"

नोकरानें कंदिल वर उचलून धरला. त्याच्या उजेडांत गणपतरावांनीं पाहिलें, ती व्यक्ति अगदीं असामान्य सुंदर आहे!

वसंतराव नम्रपणें म्हणाले "माझें नांव वसंतराव."

गणपतराव विस्मयदृष्टीनें त्यांच्याकडे पाहून म्हणाले "दिवाणजींबरोबर आपणच मुंबईहून आलां, नव्हे?"

"होय, माझी बहीण—"

गणपतराव मध्येंच म्हणाले "मला माहीत आहे. पण अगोदर सांगा आपलें भोजन वगैरे झालें ना?"

"हो-झालें."

नंतर नोकरांकडे पाहून गणपतरावांनीं विचारलें "पाहुण्यांच्या बिछान्याची वगैरे व्यवस्था केली नीट?"

दोघे तिघे नोकर एकदम म्हणाले "हो, केली हुजूर!"

"कुठें?"

"चिराकांच्या खोलीच्या जवळच्या त्या खोलींत."

"कुठल्या? त्या कोंपऱ्यांतल्या?"

"हो—पाहुणे त्या खोलींत पूर्वी एकदां उतरले होतेच—त्याच खोलींत ते झोंपत असत."

गणपतराव म्हणाले "माहीत आहे. आपणाला कांहीं कसली गैरसोय होत नाहीं ना?"

परंतु वसंतरावांचें उत्तर येण्यापूर्वीच गणपतरावांनीं कंदीलवाल्या नोकराला पुढें चलण्याविषयीं इषारा केला, व ते म्हणाले "चला, तिकडेच चला—पाहूं बिछान्याची वगैरे व्यवस्था कशी काय केली आहे तें—"

नानासाहेब आपणाशीं इतक्या अगत्यानें वागतील, अशी वसंतरावांची मुळींसुद्धां कल्पना नव्हती. त्यांनां येतांना पाहून, वसंतरावांनीं अशी अटकळ केली होती, कीं, आपला नमस्कार नुसता मानेनें घेऊन, अगर फार तर प्रतिनमस्कार करून, आपणाशीं एक चकार शब्द बोलल्याशिवाय, नानासाहेब सरळ जिना चढून वर जातील. ज्याचें वर्षाचें एक लाख उत्पन्न,जो आपणाला पन्नास रुपड्यांवर राबवणारा- एक पोरिंहाच्या, चपाताईचा भाऊ—म्हणून समजत आहे, तो आपल्या भोजनाची चौकशी करून आपल्या झोंपण्याची स्वतः जातिनिशीं व्यवस्था करावयाला जातो, आपल्या सोयी-गैरसोयींची अगत्यानें इतकी कसून चौकशी करतो,

याबद्दल वसन्तरावांनां अतिशय चमत्कार वाटल्यावांचून राहिला नाहीं. एखाद्या मंतरलेल्या माणसाप्रमाणें ते गणपतरावांच्या मागोमाग चालूं लागले, व आपल्या खोलींत गेले.

खोलींत येऊन गणपतराव चहूंकडे बारीक नजरेनें लक्ष्यपूर्वक पाहूं लागले. बिछान्याकडे पाहून ते म्हणाले " हें रे काय ? ही जुनी मच्छरदाणी कां घातलीत ? नवी नव्हती ?"

नोकर खालीं पाहून म्हणाला " उद्यां बदलून नवी घालीन."

" आणखी पाण्याचा-थंडगार पाण्याचा एक चंबू भरून इथें आणून कां ठेवला नाहींस ? अरे हे उन्हाळ्याचे दिवस. माणसाला तहान लागते वारंवार. रात्रीं जर पाहुण्यांनां तहान लागली तर यांनीं ऐन दोन वाजतां, इथें अनोळखीच्या जागीं कुणाला हांका मारायच्या? जा, एक सुरेखसा थंड पाण्याचा खुजा भरून घेऊन ये अन् एक स्वच्छ चांगलें फुलपात्र आणून त्याच्यावर ठेव आणखी हा पलंग असा कशाला रे? जरा अलीकडे सारून या बाजूला घ्या बरें-ह्मणजे या दोन खिडक्यांतून चांगला वारा येऊन झोंप चांगली लागेल पाहुण्यांनां. उकडतें आहे ह्मणजे कोण !"

यजमानांच्या आज्ञेप्रमाणें नोकरांनीं ती पलंगडी अलीकडे सरकावून दोन खिडक्यांनां जवळ होईल अशा रीतीनें आणून ठेविली. कॉटच्या डोक्याच्या बाजूला दोन तीन हात अंतरावर एक व बाजूला एक अशा लोखंडी गरादा मारलेल्या दोन मोठ्या खिडक्या असून त्यांतून झुळझुळ वारा येत होता.

याप्रमाणें वसंतरावांची व्यवस्था नीट अमलांत आलेली पाहून गणपतराव त्यांनां ह्मणाले "ठीक आहे. पडा आतां आपण. बरीच रात्र झाली." असें म्हणून ते वेथून सपरिवार निघून गेले.

गणपतराव निघून गेल्यावर वसंतराव पुष्कळ वेळपर्यंत मस्तकावर हात देऊन पलंगाच्या कडेला बसून राहिले. ते विचार करूं लागले " नानासाहेब या वेळीं असे कसे वागले ? त्यांच्या मनांत कांहीं तरी गूढ हेतु नाहीं ना असें वर्तन करण्यांत ? माझ्या मनांतील गुप्त विचार कोणत्या ना कोणत्या तरी साधनामुळें त्यांनां कळून आले असतील काय ? मला त्यांनीं 'आपण कोण ' ह्मणून विचारतांच-मी थोडें सांगतों न सांगतों तोंच, ' ठाऊक आहे ' असें ते झट्कन् ह्मणाले. मी पूर्वीं इथें आलों होतों, त्या वेळीं मी याच खोलींत झोंपत असें, असें अर्धवट रीतीनें तो नोकर सूचित करतो न करतो, तोंच पुनः ते म्हणाले 'आहे माहीत.' मोठे इनामदार हे. यांच्या घरीं दररोज किती पाहुणेरावळे येतात न् जातात, कोण कुठें निजतो, याची बातमी मिळवून ठेवणें हें इनामदारांनां थोडेसें चमत्कारिक अन् अस्वाभाविक नाहीं का ? जर मी कोण अन् माझ्या मनांतील हेतु काय आहेत, हें नानासाहेबांनां कसें ना कसें तरी कळून चुकलें असेल, तर माझी खास धडगत नाहीं ! इनामदारसाहेब मला तसे सहज सोडायचे नाहींत. कदाचित् मला ते ठारहि मारतील ! त्यांनां विचारता पुसता आहे कोण ? मला मारतील अन् माझें प्रेत कुठें केव्हांच नापत्ता करून टाकतील. पोलिसांची मूठ दाबली कीं त्यांचें तोंडहि बंद ! यांनां पैशाला काय तोटा ?"

पुऱ्या पुरुषभर उंचीच्या त्या दोन्ही उघड्या खिडक्यांकडे वसंतराव पाहूं लागले. चंद्राभोंवतीं मघां आलेलीं मेघखंडें आतां चहूंकडे विखुरलीं होतीं. बाहेर पडित जमीन होती. तींत कांहीं अगस्त्याचीं झाडें तयार झालीं होती. पलीकडे दोनचार वेळूचीं बेटें होतीं. वाऱ्यानें वेळूचीं पानें एकमेकांवर आपटलीं ह्मणजे चमत्कारिक खसखसाट होई ! दुसऱ्या खिडकीच्या बाहेर पांचसात हात अंतरावर जंगल वाढलें होतें. कांहीं शेवरीचीं तर कांहीं निंबाचीं लहान झाडें परस्परांनां टेंका देत जवळजवळ उभीं होतीं. त्यांच्या मागें उंचउंच वृक्ष होते,-ते कसले होते, तें चांदण्यामध्यें ओळखूं येण्यासारखें नव्हतें. त्या खिडकीच्या बाजूकडून रातकिड्यांचा किर्र शब्द सारखा ऐकूं येत होता. त्याच बाजूकडून कसलासा चमत्कारिक वासहि येत होता. वसंतराव खेडेगांवचे रहाणारे असते, तर तो वास 'खुरई'च्या फुलांचा आहे, हें त्यांनीं केव्हांच ओळखलें असतें.

त्या बाजूकडे पहात असतां वसंतरावांच्या मनाला अतिशय भय वाटूं लागलें. ते मनाशीं ह्मणाले "समजा, रात्र बरीच झाली आहे; अडीच तीन वाजण्याचा सुमार. मला चांगली गाढ झोंप लागली आहे. इतक्यांत या जंगलांतून, इनामदारांच्या पदरचा एखादा रामोशी किंवा भिल्ल, कानांवर झुलपें असलेला, असा हातांत भाला किंवा असेंच कांहींतरी दुरून प्राण घेणारें हत्यार घेऊन बाहेर पडला अन् या खुल्या खिडकीच्या गरादीं-

तून भाल्याची फेंक करून बरोबर माझ्या मस्तकांत त्यानें तो रोंवला–तर–तर–"

हा विचार मनांत येतांच वसंतरावांच्या सर्वांगावर भीतीनें कांटाच उभा राहिला.

वसंतराव त्या शांत स्तब्ध रात्रीं, एकटेच त्या खोलींत बसले होते. अशा वेळीं, त्या ठिकाणीं त्यांच्या पापी मनांत भलभलते संशयाचे विचार येऊन त्यांचा कोठच्या कोठें विशाल विस्तार होऊं लागला. ते मनाशीं ह्मणाले "त्या पाजी सुन्दरराव फोटोवाल्यानें इथें येऊन कांहीं घोंटाळा तर नाहीं ना केला ? मीं त्याला हडसूनखडसून तीनतीनदां बजावून ठेवलें होतें; पण त्यानें चुकून किंवा मुद्दाम,मूर्खपणानें माझें नांव तर नाहींना फोडलें या लफंग्याजवळ ? कदाचित् कांहीं शहाणपणाहि पाघळला असेल त्यानें ! कदाचित् दिवाणजींनीं येतांच नानासाहेबांनां सांगितलें असेल 'माझ्याबरोबर आलेला हा चंपेचा भाऊ वसंतराव मुंबईला तुमच्यासंबंधानें कांहीं भलत्यान् सलत्याच संशयास्पद चांभारचौकशा करीत होता !' असें असेल तर मग मात्र माझी मुळींच धडगत नाहीं ! मला गुप्तपणें ठार मारण्याची–आज रात्रींच माझें चंदन उडविण्याची या दुष्टानें सारी व्यवस्था करून ठेवली असेल. माझी झोंपण्याची व्यवस्था कशी काय झाली आहे,मी कसा,कुठें, कोणत्या बाजूला निजतों हेंच फक्त पहाण्यासाठीं–माझी सोय–गैरसोय पहाण्यासाठीं नव्हे–तो दिल्लीचा–नव्हे–काशीचा दरोडेखोर इथें आला होता. या उष्म्यांत माझ्या अंगाला थंड वारा लागण्याकरितां कांहीं त्यानें हा पलंग अलीकडे सरकावून घेतला नाहीं. पलंग जवळ घेतला ह्मणजे भाल्याची किंवा तीराची फेंक करायला रात्रींच्या वेळीं तेवढें सोयीचें पडेल, ह्मणूनच अशी गोजीरवाणी व्यवस्था केली गुलामानें !"

भयानें आणि आशंकेनें वसन्तरावांच्या सर्वांगांतून झरझरां घाम निथळूं लागला.

बसल्याबसल्या वसंतराव विचार करूं लागले "तावडींत तर सांपडलों. आतां इथून सुटायला करूं तरी काय ? दरवाजा हळूच उघडून, आस्तेआस्ते पावलांच्या आंगठ्यांवर चालून बाहेर पडून ठोकूं धूम ?–पण मला पळूं कसले देतात हे राक्षस ! माझा खून आज करायचाच, असाच जर या चांडाळांचा कावा असेल, तर मला हा बरा जाऊं देईल ? त्यानें माझ्यावर बाहेर पहारा ठेवला असेल कडक ! मी पळून जात आहें, असें त्यांनां आढळून येतांच लाठीचा एक जबरदस्त तडाका हाणून पहारेवाले माझें माथेंच टाकतील फोडून ! पळायचें असेल तर तें उद्यां सकाळीं !"

हा विचार मनांत येतांच वसंतराव पलंगावरून उठले, व त्यांनीं दोन्ही खिडक्या चांगल्या घट्ट लावून घेतल्या आणि झट्कन् त्यांनां कड्याहि लावल्या. नंतर दिवा खिडक्यांजवळ आणून ते त्यांची नीट परीक्षा करूं लागले. खिडक्यांचीं झडपें चांगल्या मजबूत शिसवीच्या लांकडांचीं आणि जाड्जूड असून त्यांच्या चौकटीहि खूब मजबूत होत्या. खोलीच्या लावलेल्या दरवाज्याजवळ जाऊन, दिव्याच्या उजेडांत त्याची नीट परीक्षा पाहिल्यानंतर वसंतरावांनां आढळून आलें, कीं, खिडक्यांप्रमाणेंच दरवाजाहि चांगला भक्कम आहे–त्याची आंतली लोखंडी कडीहि जाड व खूब मजबूत आहे. एकाएकीं दरवाजा बाहेरून कोणाला फोडतां येणें शक्य नाहीं, अशीं वसंतरावांची खात्री झाली. तेव्हां ते परत येऊन पलंगावर मच्छरदाणीच्या आंत शिरले; परंतु ते बिछान्यावर पडले नाहींत–बसून राहिले. खोलीच्या खिडक्या व दरवाजे लागलेले. भयंकर उन्हाळ्यामुळें अंगाची तुसती आगआग होत होती; अशा उष्म्यांत लवकर झोंप येण्याचा कांहीं संभवच नव्हता. हातांत पंखा घेऊन वारा घेतघेत, डुलक्या घेतघेत, कधीं पडून तर कधीं बसून वसंतराव रात्र काढूं लागले. कचेरीच्या घड्याळामध्यें क्रमानें बारा–एक, दोन आणि तीन वाजलेले त्यांनीं ऐकले.

त्यानंतर त्रासामुळें वसंतरावांनां शेवटीं झोंप लागली–परंतु ती देखील फार वेळ नाहीं. एक अत्यंत भयंकर स्वप्न त्यांनां पडून ते लवकरच जागे झाले. त्या वेळीं बाहेर कावळ्यांची काव काव सुरू झाली असून खिडक्यांच्या फटींतून सकाळचा प्रकाश खोलींत येत होता !

प्रकरण चवथें.

नानांचा जनानी अवतार !

सुमारें आठ वाजतां दिवाणजी वाड्यांत आले. त्यांची गांठ घेऊन, वसंतरावांनीं आपल्या 'भगिनी'ला भेटावयाची उत्कट इच्छा प्रदर्शित केली.

दिवाणजी ह्मणाले "ह्मणजे? कालपासून चंपाताई तुह्माला भेटल्याच नाहींत?"

वसंतराव खिन्नपणें ह्मणाले "नाहीं. माझी मुळीं दादच लागेना!"

दिवाणजी हंसून म्हणाले "संस्थानी कारभारांत आपली दाद आपणच नेटानें लावून घ्यावी लागते–नाहीं तर कधींकधीं उपाशीं देखील मरायला व्हायचें! ठीक आहे. मी व्यवस्था करतों सारी."

सुमारें अर्ध्यापाऊण तासानें, एका नोकरानें येऊन वसंतरावांनां आंत नेलें.

एका खोलींत त्याच्या पाठोपाठ ते प्रवेश करून पहातात, तों मध्यभागीं एक खुर्ची असून तिच्या शेजारीं चंपा हंसतहंसत उभी आहे.

"या–या–बसा." असें हंसतहंसत ह्मणून चंपेनें खुर्ची जरा पुढें सरकावली. तो नोकरहि क्षणभरानें निघून गेला.

चंपेकडे पाहून वसंतराव मृदु स्वरानें म्हणाले "काय ग चंपाताई, गृहस्थांच्या घरचा आश्रय मिळून, तूं इथें राहूं लागल्यापासून आपला धंदा साफ विसरलीस वाटतें?"

चंपेनें आश्चर्यानें विचारलें "धंदा? कसला धंदा?"

"ॲक्टिंगचा! अभिनयबिभिनय पार विसरलीस तूं?"

किंचित् स्मित करून चंपा म्हणाली "म्हणजे? मी नाहीं समजलें!"

वसंतराव हंसून म्हणाले "अग, मी तुझा दादा–वडील भाऊ. मजबद्दल तुझ्या मनांत आदर असला पाहिजे. किती दिवसांनीं तुझा दादा तुला भेटला, तर तूं त्याला नमस्कार देखील करीत नाहींस? काय तुझा हा वेंधळेपणा? या नोकराच्या मनांत तरी काय येईल?"

चंपा हंसून म्हणाली "काय येणार आहे मनांत त्याच्या? मुंबईचीं माणसं हीं अशीं सुधारक! त्यांनां वडील नाहीं धारं नाहीं, लहान नाहीं थोर नाहीं–सकट घोडे बारा टक्के! असं तो मनांत समजेल, दुसरं काय?"

"बरें, कशी काय इथली खबरबात, चंपाताई?"

जवळच एक खाट होती, तिच्या टोंकावर बसून चंपा म्हणाली "मीं आपणाला कळवलंच आहे वेळो-वेळीं! पण काय हो दादासाहेब, आणखी किती दिवस मला आपण इथं ठेवणार?"

"कां ग?"

"माझे प्राण तर अगदीं कंठाशीं आले पहा इथं राहून."

"कां बरें? तुला इथें कांहीं त्रासबीस होतो का? इथलीं माणसें तर चांगलीं दिसतात सारीं!"

उघड्या दरवाज्याकडे नजर टाकून, नाटकांतील नायिकेला उचित असा अभिनय करीत चंपा गुणगुणूं लागली "परवशता तिखट सुरी लागली उरा!"

वसंतरावहि दरवाज्याकडे पाहून हंसतहंसत ह्मणाले "पुरे करा चंपाताई, पुरे करा, माझी झाली पुरी खात्री—"

"कसली खात्री?"

"कीं आपण कांहीं ॲक्टिंग विसरलां नाहीं! अजूनहि तूं फर्स्टक्लास अक्ट्रेस (अभिनेत्री) आहेस!"

गायिकेप्रमाणें सलाम करून हंसतहंसत चंपा ह्मणाली "उस्तादजी, आपहीका कुदरत!"

यानंतर उभयतांनींहि परस्परांच्या शारीरिक कुशलतेसंबंधीं दोनचार प्रश्न एकमेकांनां विचारले. नंतर वसंतराव आपणाशींच विचार करीत स्तब्ध बसले.

चंपेनें विचारलें "कसला विचार चालला आहे?"

मान हलवून वसंतराव ह्मणाले "नाहीं–विचार नाहीं कसला–तुझ्या वहिनीसाहेबांची खबर काय, सांग अगोदर."

चंपा हंसून म्हणाली "तें कांहीं विचारूं नका–अगदीं बेहोष होऊन गेलं आहे प्रकरण!"

"म्हणजे? तें कसें काय?"

"कसं काय तें काय विचारतां? प्रेमाच्या जाळ्यांत पहिल्यानं सांपडलं म्हणजे जसं होऊन जातं, तसं!"

"पण त्या दोघांची तशी भेट–गांठ नाहीं, असें तूंच ना मला लिहिलें होतेंस?"

"रात्रीं नाहीं–पण दिवसा भेटीगांठी हव्या तेवढ्या होतात. अलीकडे तर भारीच भडकून गेलं आहे काम! दुपारपासून संध्याकाळपर्यंत गोष्टी–गोष्टी–गोष्टी! अलीकडे तीनचार दिवस तर संध्याकाळानंतर चांदण्यांत दोघं साहेब–मडमेप्रमाणं बागेंत फिरत असतात मजेनं! एकमेकांच्या प्रेमांत मषगुल, बस्स!" असें म्हणून चंपा हंसूं लागली.

"मग त्यांत दोष काय आहे?"

"कांहीं नाहीं–अर्थांतच कांहीं नाहीं. नवराबायको परस्परांच्या प्रेमांत अशीं मषगुल होऊन जायचींच! पण दादासाहेब, केवढाल्या आशांच्या इमारती आपण रचून ठेवल्या होत्या हो! पण त्या साऱ्या या इनामदार-साहेबांनीं धडाधड कोसळून टाकल्या! निराशेनं आपणाला पूर्ण घेरलं! चहूंकडे निराशेचा घनघोर अंधकार! हा हुश्श! दादासाहेब, आपण 'हताशाचे दग्ध उद्गार' म्हणून एखादी कविता रचून द्या पाठवून एखाद्या मासिकांत! कवि म्हणून गाजूं लागाल फट्दिशीं!—" असें म्हणून एक उसासा सोडून, वर पहात, चंपा नायिकेप्रमाणें अभिनय करून गुणगुणूं लागली

"दुष्ट अदय विधि पाहीं–दादांचें मन दाही!
कवणाचें धन–देई– अन्यही कुणा!"

असें गुणगुणून, कृत्रिम दुःखानें, हताश भावानें खालीं पाहून चंपा आपल्या पदरानें आपले काल्पनिक अश्रु पुसूं लागली.

वसंतराव जरा चिडून म्हणाले "चंपे, ॲक्टिंग आतां पुरे, म्हणून सांगितलें ना? वेळ थोडा आहे आपणाला; कामाच्या गोष्टी बोलूं आपण. हं, सांग हा नानासाहेब कोण, त्याचा कांहीं सुगावा लागला का?"

"कसा लागणार? मी डिटेक्टिव्ह आहें थोडीच!" चंपा वसंतरावांकडे पाहून स्मित करून म्हणाली.

"हा पहिल्यानें होता कुठें, वगैरे हकीगत तुला कांहींच का कळली नाहीं अजून?"

"तशी थोडी कळली आहे—"

"काय ती?" वसंतरावांनीं उत्सुकतेनें प्रश्न केला.

"हे नानासाहेब उत्तर हिंदुस्तानांतल्या एका मठाचे मुख्य महंत होते."

"त्या मठाचें नांव काय?"

"नाहीं बाई कळलं तें—"

"बरें, हा मठ आहे तरी कुठें, तें तरी कळलें आहे?"

"तें तरी कसं कळणार?"

"वहिनीसाहेबांबरोबर तासच्या तास तो बोलत बसतो, तर इतके दिवसांत तिला त्यानें ही हकीगत खात्रीनें सांगितली असेल. वहिनीसाहेबांकडून बोलतां-बोलतां युक्तियुक्तीनें नाहीं का ती तुला काढून घेतां येणार? बरें, तो मठाचा महन्त होता, ही गोष्ट तरी तुला कशी कळली?"

"काशीहून त्यानं जें दिवाणजींनां पहिल्यानं पत्र पाठवलं, त्यांत ही गोष्ट लिहिलीच होती त्यानं. दिवाणजींनीं तें पत्र अथपासून इतीपर्यंत आईसाहेबांनां वाचून दाखवलं होतं."

"त्या पत्रांत मठाचें नांव अन् पत्ता नव्हतीं लिहिलेलीं?"

"पत्र कांहीं मीं स्वतः ऐकलं नाहीं–अर्थात् वाचलंहि नाहीं."

"मग?"

"आईसाहेबच सांगत होत्या, कीं, मठाची महन्तगिरी सोडून हा काशीला येऊन राहिला होता."

"तें पत्र कुठें आहे?"

"माहीत नाहीं."

"दिवाणजींनीं आईसाहेबांपाशीं नाहीं का दिलें तें?"

"माहीत नाहीं बाई!"

"आईसाहेब निजतात कुठें? त्यांचें कपाट किंवा पेट्याबिट्या कुठें असतात?"

वसंतरावांच्या तोंडाकडे पाहून चंपेनें विचारलें "वसंतराव, तुम्हीं 'निहालकुवर' कादंबरी वाचली आहे? भारी छान आहे—"

"वाचली आहे. तिचा काय संबंध इथें?"

"पुष्कळ आहे. मला तुम्ही निहालकुवर व्हायला सांगतां वाटतं?"

"तें कसें काय बुवा?"

"निहालकुवर मोठी धाडशी बाई! हात धुऊन तिच्या पाठीं लागलेल्या गणपतरावाच्या कपाटाला किल्ली चालवून तिनें आपल्या गळ्याशीं येणाऱ्या पत्रांचा पुरावा पार पळवून नेला! तसं मीं करूं, होय?"

"प्रयत्न करून तर पहा."

"अन् त्या प्रयत्नांत माझी मान अडकली तर? निहालकुवरला सोडवणार तिचा म्हातारा नवरा सर जगदेवराव तरी होता–माझा नवरा केव्हांच स्वर्गाला गेला आहे! मला तडक वाट धरावी लागेल

बिनभाड्याच्या घराची ! माझे जगदेवराव असते तर गोष्ट एक निराळी होती."

वसन्तराव हंसून ह्मणाले "जगदेवराव तर जवळच आहे तुझ्या ! मात्र त्याच्याप्रमाणें म्हातारा न् मूर्ख नाहीं. एखाद्या राजाप्रमाणें ऐश्वर्य-वर्षाचें एक लाख रुपयांचें नगद उत्पन्न ! तुझ्यासारखी एखादी चटक-चांदणी निहालकुवर त्याला मिळेल तर त्याच्या हातीं स्वर्ग आल्यासारखें होईल."

"अहो, त्यानें तो स्वर्ग केव्हांच पटकावला आहे ! तीं दोघें सध्यां अगदीं स्वर्गसुखांत असतात !"

"बरें, तें राहूं दे तूर्त ! मला अगोदर हें सांग–ही तुझी यमुना अगोदरपासूनच या नानासाहेबाला ओळखीत आहे, असा अजूनहि तुझा पक्का समज आहे ?"

"अगदीं पक्का! त्याबद्दल मला कसला संशयच नाहीं!"

"तर मग एका बाबतींत तुझा तर्क पार चुकला आहे—"

"कोणत्या ?"

"हीं दोघें अगोदर कांहीं कारस्थान रचून मग बाणथडीला आलीं, असें अजूनहि तुला वाटत नाहीं ना ?"

"नाहीं."

"मग हा तुझा तर्क अगदीं चुकीचा आहे, असें मी ह्मणतों."

"माझीं कारणं मीं तुह्मांला लिहिलीं आहेत."

"तीं पुरेशीं नाहींत असें मला वाटतें. एक पक्का ठग, एवढें जंगी कारस्थान रचून एकट्याच्या हिमतीवर न् करामतीवर तें पार पाडायला येईल, ही कल्पना संभवतच नाहीं मुळीं! वाड्यामध्यें त्याचा एखादा विश्वासू हस्तक असणें त्याच्या कारस्थानाला अगदीं जरूर आहे. आपलीच गोष्ट पहा. माझी जशी तूं, तशी त्याची ही यमुना, असेंच हें त्रैराशिक असलें पाहिजे, असें माझें मत ठाम बनलें आहे."

चंपा मान हलवून ह्मणाली "मला तुमचा हा तर्क बरोबर वाटत नाहीं."

"कां बरें ?"

"हे नानासाहेब पहिल्यानें जेव्हां यमुनेच्या दृष्टीला पडले, तेव्हां मी अगदीं तिच्या जवळ होतें, हें मीं तुह्मांला लिहिलं आहेच. त्यांनां पाहून ती अशी कांहीं दचकली आहे ह्मणतां ! ती कां दचकली, याचें उत्तर द्या. जें असंभवनीय, तें एकदम दिसतांच माणूस दचकतं–नाहीं का ?"

"तुझ्याप्रमाणेंच, या गोष्टीसंबंधानें माझाहि पहिल्यानें तर्क झाला होता; परंतु त्यासंबंधानें पुष्कळ विचार केल्यानंतर मीं तिच्या या दचकण्याचें कारण शोधून काढलें आहे."

"काय तें ?"

"ज्या वेळीं या दोघांनीं या वाड्यावर हल्ला चढवायचें हें कारस्थान रचलें, त्या वेळीं, या अघोरघंटानें बैराग्याच्या वेषानें वाड्यांत प्रवेश करायचा, असें कांहीं ठरलें नव्हतें. त्यानें साध्या वेषानेंच यावें, असें त्याचें न् या कपालकुंडलेचें ठरलें असावें. त्यानें म्हणावें 'मी असा असा अमुक मठाचा महंत होतों, पण तो बैराग्याचा वेष टाकून देऊन गृहस्थ बनूनच मी हा घरीं आलों आहें.' त्या दोघांचा असा पक्का बेत ठरल्यावर ही चामुंडा, होडीबिडींतून येऊन, वाड्याच्या घाटावर उतरली न् तिथें प्रेताप्रमाणें सोंग घेऊन पडली. तिच्यानंतर दोन महिन्यांनीं तोतया नानासाहेब रंगभूमीवर येऊन थडकला. यमुनेची न् त्याची ताटातूट झाल्यानंतर या लफंग्याच्या मनांत विचार आला असेल, कीं, गृहस्थाच्या वेषापेक्षां बैराग्याच्या वेषानेंच वाड्यांत प्रवेश करणें श्रेयस्कर आहे. सहा महिन्यांचें व्रत, ब्रम्हचर्य, जपजाप्य, पूजाअर्चा वगैरे दांभिकपणाचें सोंग नामी उठवून दिलें, कीं, आपला कोणालाच कसला संशय येणार नाहीं. अग, हीच कपटाची युक्ति सुभद्रेला लाटण्याकरितां अर्जुनानें देखील नव्हती का लढविली ? झालें, बैरागीवेषानेंच हा पाजी ठग आला. यमुना जी पहिल्या दृष्टीला चमकली, ती नानासाहेबांनां पाहून नव्हे, तर त्यांचा बैराग्याचा वेष पाहून !"

वसन्तरावांच्या तर्काचा हा इतिहास पूर्णपणें ऐकल्यानंतर दोनतीन मिनिटेंपर्यंत चंपा गालावर हात ठेवून विचार करीत स्तब्ध बसली होती. नंतर वसंतरावांनीं विचारलें "काय वाटतें तुला ?"

चंपा ह्मणाली "तुमचा तर्क खरा आहे, असं आतां मलाहि वाटूं लागलं आहे, परंतु तुह्मीं हेंहि लक्ष्यांत घ्यायला हवं, कीं, यमुना वाजवीपेक्षां जास्त चमकली, यांत संशय नाहीं."

"अं:, त्यांत कांहींच अर्थ नाहीं. गडबडींत तुला तें जरा जास्त वाटलें असेल इतकेंच !"

"शक्य आहे तुह्मी म्हणतां तें—"

"जर आपणाला या तोतयाचा पत्ता लागत नाहीं, तर यमुनेचा तरी लावला पाहिजे. चंपे, तिच्याशीं गोष्टी

बोलतांबोलतां, युक्तियुक्तीनें, या यमुनेची हकीगत तिच्यापासून थोडीबहुत तरी काढतां येण्यासारखी नाहीं का तुला?–ती जर–"

"तसं झालं तर आपला कार्यभाग होतो आहे का?" चंपेनें मध्येंच उत्सुकतेनें विचारलें.

"होतो आहे–जरूर होतो आहे. या दोघां कारस्थानी कापालिकांपैकी एकाची जर खरी हकीगत आपणांला कळेल, तर दुसऱ्याचा बरोबर थांगपत्ता आपणांला हांहां ह्मणतां लावतां येईल."

उत्तेजित स्वरानें चंपा ह्मणाली "वसन्तराव, असं जर असेल, तर मी आपणाला या क्षणीं उत्कृष्ट मदत करूं शकेन–"

तिच्या या उत्तेजनानें वसंतरावांनांहि खूब उत्तेजन आलें. ते ह्मणाले "करशील?"

"जरूर–जरूर–"

"कोणत्या रीतीनें?"

"यमुनेचा थोडासा पत्ता मला लागला आहे. तिच्या बापाचं घर कुठं तें मला कळलं आहे."

"कुठें–कुठें ग?" वसन्तरावांनीं अत्यंत उत्सुकतेनें विचारलें.

"चांदगांवाला–"

"चांदगांव!–कुठला चांदगांव? पण तुला हा तिच्या बापाचा गांव नेमका कसा कळला?

"एकदां माझ्याशीं बोलतां बोलतां यमुना मला ह्मणाली 'ल्हानपणीं आमच्या चांदगांवला दिखील–' इतकं बोलून ती झट्कन् सावध होऊन थांबली न् तिनं निराळीच गोष्ट काढली."

"चांदगांवला यमुनेचें सासर नाहीं, माहेरच, हें नेमकें तूं कसें ओळखलेंस?"

चंपा हंसून ह्मणाली "अं:! त्यांत काय कठीण आहे? ती ह्मणाली ना 'ल्हानपणीं' ह्मणून?"

भुंवया वांकड्या करून, कांहीं क्षण विचारांत घालवून वसंतराव ह्मणाले "होय. चांदगांवला बहुतेक तिचें माहेरच असलें पाहिजे. आजोळबिजोळ नसण्याचा मात्र अगदींच संभव नाहीं असें नाहीं. तरी पण पुष्कळच भांडवल हातीं लागलें आपल्या. हा चांदगांव कुठेंसा आहे, याचा कांहीं पत्ता लागला आहे का तुला?"

मान हलवून चंपा ह्मणाली "तसं नेमकं कांहीं सांगतां येणार नाहीं. पण बहुतेक हा गांव नाशिक जिल्ह्यांत असावा."

"कशावरून ग?"

"इतर कोणत्याच गांवचा उल्लेख यमुनेच्या तोंडून कधीं मीं ऐकला नाहीं. नाशिकची पंचवटी न् त्र्यंबकचा नंदिकेश्वर यांचा उडता उल्लेख तिनें एकदांच माझ्यापाशीं सहज केला होता. मग हा नंदिकेश्वर ह्मणजे नानासाहेब असला, तर कोण जाणे बाई!" असें ह्मणून चंपा किंचित् मोठ्यानें हंसूं लागली.

सुमारें दोन मिनिटें वसंतराव विचार करीत होते. किंचित् हास्य करून, चंपेच्या पाठीवर मृदु आघात करून ते उत्तेजित स्वरानें ह्मणाले "शाबास, चंपाताई, शाबास! नाना फडनिसांचा तूं जनानी अवतार आहेस! तूंच मला या दारुण अंधकारांत मार्ग दाखविलास!"

"आतां पुढं काय करणार तुह्मी?"

"आजच्या आज मी मुंबईला परत जातों न् पोस्ट ऑफिसच्या गाइडमधून हा चांदगांव कुठें आहे तें शोधून काढतों."

"अन् पोस्टच नसलं तर तिथं?"

"शक्य आहे–पण पोस्ट असण्याचाहि बराच संभव आहे. प्रयत्न करून पाहिला पाहिजे—"

"बरं पुढं?"

"लगेच मी मुंबईहून चांदगांवाला जाणार न् गुप्तपणें या यमुनेचा तिथें शोध लावणार—"

क्षणभर विचार करून चंपा ह्मणाली "या बाबतींत एक गोष्ट ध्यानांत घ्यायला हवी—"

"काय?"

"कदाचित् यमुना हें हिचं खरं नांव नसेल! बहुधा नसावंच, असाहि माझा पक्का समज आहे."

"ती गोष्ट माझ्या केव्हांच ध्यानांत येऊन चुकली आहे. त्या गांवांत जाऊन तिथली एखादी बायको फेब्रुआरीपूर्वीं गांवांत होती न् मग बेपत्ता झाली आहे कीं काय याबद्दल मी युक्तीनें चौकशी करीन न् माहिती मिळवीन. ही माहिती मिळतांच आपोआप या साऱ्या प्रचंड कारस्थानाचा उलगडा होतो आहे!"

कांहीं वेळ विचार करून चंपा ह्मणाली "तुमच्या मार्गांत कांहीं अडचणीहि येण्याचा बराच संभव आहे–"

"कोणत्या ग?"

"समजा, पांचसात वर्षांपूर्वीच यमुना त्या गांवांतून नाहींशी झाली असली अन् दुसऱ्याच कुठल्या गांवाला ती जाऊन राहिली असली,—समजा-मुंबईला अगर पुण्याला–तर तुमची ही चौकशी व्यर्थ होणार ! अन् दुसरी मुख्य अडचण अशी आहे, कीं, ही सासऱ्यांहूनच इथं आली असेल ! या बाबतींत तुह्मी काय करणार ? शिवाय, ती पळून न येतां राजरोस दुसऱ्या कुठल्या गांवीं जायच्या उद्देशानें गांवांतून निघून, गुप्तपणं इथं आली असेल–"

कपाळावर हात देऊन वसंतराव म्हणले "तूं म्हणते आहेस या अडचणी संभवनीय असून त्या माझ्या शोधांत अडथळा करतीलहि. पण या दिशेनें प्रयत्न करून पहायला काय हरकत आहे ? हां–ठीक आहे. मला एक सांग. यमुना नदींतून वहात आली, त्या वेळीं ती काय नेसली होती ? लुगडें कीं पातळ ?"

"पातळ असावंसं वाटतं—"

"तें मला आणून देतेस ?"

"तें पातळ काल मीं तिच्या खोलींत दोरीवर टाकलेलं पाहिलं–पण तें तुम्हाला काय करायचं आहे ?"

"कांहीं तरी निमित्त करून, तिच्या जवळून तें तुला थोडा वेळ मागून आणतां नाहीं येणार ?"

"येईल–पण करायचं काय ?"

"चांदगांवाला जाऊन तेथल्या साऱ्या धोब्यांना तें नेऊन दाखवलं, म्हणजे तें कुणाच्या घरचें, तें त्यांच्याकडून मला तेव्हांच कळेल ! मला तें तूं आणून देच, चंपे !"

वसंतरावाकडे पाहून चंपा मान डोलवीत हंसूंच लागली.

"काय–हंसायला काय झालं तुला असं ?" वसंतराव किंचित्-रागावून म्हणाले.

"हंसूं नको तर काय रडूं मी, वसंतराव ? अहो, खेडेगांवच्या बायका मुंबईतल्याप्रमाणं आपलीं पातळं धोब्यांकडे धुवायला देतात, असा का समज आहे तुमचा ?"

"हो." आंबट चेहरा करून वसंतराव म्हणाले. "खरें आहे तूं म्हणतेस तें–हाहि मार्ग खुंटला—"

"नाहीं; खुंटला नाहीं. कर्मधर्मसंयोगानं त्या वेळीं यमुनेच्या अंगांत पोलकं होतं. कदाचित् तें धोब्याकडून धुऊन आलेलं असण्याचा पुष्कळ संभव आहे."

"आणून दे-पाहूं जमलें तर—"

"पण तें तुम्हांला मी देऊं कशी ? संशय नाहीं का माझा यायचा तिला यावरून ?"

क्षणभर विचार करून वसंतराव म्हणाले " तूं एक वार मला तें आणून तर दाखव. मी तें नेत नाहीं–पाहून ठेवतों नुसतें. त्याला तर कांहीं हरकत नाहीं ना ?"

"हां-तसं मला वाटेल तेव्हां तें आणतां येईल !" असें म्हणून चंपा तेथून निघून गेली, आणि कांहीं वेळानें, आपल्या पदराखालून तें पोलकें आणून तिनें वसंतरावांच्या हातीं दिलें.

वसंतरावांचें सुदैव बलवत्तर होतें, असें दिसतें. त्यांनीं बारीक नजरेनें पाहिलें, तों पोलक्याच्या मानेवर धोब्याची कांहीं खूण आहे, असें त्यांनां आढळून आलें. क्षणार्धांत खिशांतून चाकू काढून त्यांनीं पोलक्याचा तेवढा भाग झट्कन् वांकडातिकडा कापून घेतला.

चंपा भयभीत मुद्रेनें म्हणाली "हें काय केलंत वसंतराव, तुम्हीं ?"

तिला कांहींच उत्तर न देतां कापलेला भाग त्यांनीं आपल्या आंतल्या खिशांत ठेवला. नंतर पोलक्याचा कापलेला भाग हातांनीं ओढून ओढून त्यांतून कांहीं सुतें कमीजास्त प्रमाणानें बाहेर पडतील असें त्यांनीं केलें.

"हें काय हें ?"

"आतां हें कापून घेतल्यासारखें दिसतें का, तूंच सांग ? कुणीं तरी उंदराबिंदरानें चावावल्यासारखें हुबेहुब नाहीं का दिसत हें ? जा, आतांच्या आतां जाऊन पोलकें जिथल्या तिथें ठेवून ये. आपणाला चोरीचा माल बिल्कूल नको." असें म्हणून वसंतराव हंसूं लागले.

चंपा पोलका पदराखालीं घेऊन गेली व कांहीं वेळानें हंसत हंसत परत आली.

वसन्तराव म्हणाले "बरें, मी जातों आतां. संध्याकाळीं तुमचे बंधुराज मुंबईला निघणार !"

"आजच जातां ?"

"हो आजच ! भाऊबीज कांहीं लक्ष्यांत नाहीं आहे ना ?" असें ह्मणून वसंतराव हंसूं लागले.

"बरं, मला आणखी किती दिवस इथं रहायला हवं, तें नक्की सांगा–अगदीं कंटाळून गेलें आहें मी."

"फार फार तर आणखी दोन महिने. दोन महिन्यांत जर या तोतयाची सारीं ग्रहनक्षत्रें काढून आणून याची अंत्यनाडी मीं बरोबर शोधून काढली नाहीं, तर माझें नांव बदलून ठेव." असें ह्मणून

वसंतराव मोठ्या उत्साहानें उठून उभे राहिले. त्यांच्या चेहऱ्यावर या वेळीं खूब तेज झळकत होतें.

" नांव काय बदलूं ? ' सुवर्णमालिनी वसंता 'बद्दल काय ' सुवर्णराज वंगेश्वर, ' का ' प्रतापलंकेश्वर, ' का ' मकरध्वज ' नांव ठेवूं तुमचं ? "

" वाटेल तें ठेव, पण ' सुवर्ण ' पाहिजे, बस्स ! " असें ह्मणून वसंतरावांनीं खिशांतून पाकीट बाहेर काढलें, व त्यांतून कांहीं नोटा काढून त्या मोजून त्यांनीं चंपेच्या हातीं दिल्या व ह्मटलें " ही तुमची भाऊबीज ! तुझा दोन महिन्यांचा पगार ! आणखी दोन महिनेच फक्त तूं वाट पहा—कीं, या तोतयाला चांगली मात्रा पोहोंचवून हा ' सुवर्णमालिनी ' खरोखरच ' सुवर्णराज ' बनतो ! "

* * *

त्याच दिवशीं बाणथळीहून निघून वसंतराव दुसऱ्या दिवशीं मुंबईला पोहोंचले. शोध करतां त्यांनां असें कळून आलें, कीं, नाशीक जिल्ह्यांत एक, वऱ्हाडांत एक व रत्नागिरी जिल्ह्यांत एक, असे एकंदर तीन चांदगांव आहेत.

आपला चांदगांव नाशीक जिल्ह्यांतच आहे, असें ठरवून वसंतराव त्याच दिवशीं तिकडे निघाले.

प्रकरण पांचवें.

वसंतरावांची कर्तबगारी !

चांदगांवचें पोस्ट ऑफिस गांवच्या 'बाजारा'च्या मध्यभागींच होतें. दुपारीं एक वाजावयाचा सुमार झाला होता. आकाशांत ढग जमले असल्यामुळें हवा कशी चमत्कारिक आणि कुंद होऊन गेली होती. वाऱ्याचा तर केव्हांपासून कोठें थांगपत्ताच नव्हता ! भयंकर उष्म्यामुळें अतिशय त्रास होत होता, जिवाची सारखी तळमळ चालली होती.

डांक येण्याची वेळ झाली होती. 'ऑफिस'च्या बाहेर व्हरांड्यांत मास्तरसाहेब डांकेची वाट पहात बसले होते. डांक येतांच पत्रें, पार्सलें वगैरे पोस्टमनच्या स्वाधीन करून घरीं जाऊन स्वस्थ चांगली तण्णावून द्यावी, असा त्यांचा विचार होता. चांदगांव हा रेल्वे-स्टेशनचा गांव नव्हता. त्यामुळें स्टेशनवरून टांग्यांतून चांदगांवची मेल येत असे. चार उतारूंचीहि त्याच टांग्यांत सोय केलेली असून प्रत्येकाला दोन रुपये भाडें पडत असे.

खिडकींतून ऑफिसांतील 'टकटक' करणारें थोरलें 'टाइम पीस' स्पष्ट दिसत असे. एक वाजून दहा मिनिटें झालीं, पंधरा मिनिटें झालीं, परंतु काय, मेलटांग्याचा तर कोठेंहि पत्ता नाहीं ! पोस्टमास्तरसाहेब खुर्चीवर बसून पेंगत आणि मधुनमधून जागे होऊन, खिडकीं-तून आंतल्या घड्याळाकडे पहात; नंतर जवळच्या स्टुला-वरची व्ही. पी. रजिस्टरची वही हातीं घेऊन हळुहळु वारा घेत, चुटक्या वाजवून जांभया देत आणि पुनः खुर्चीला टेंकून पेंगूं लागत. अशा रीतीनें किती वेळ तरी त्यांचा कार्यक्रम चालला होता.

हळुहळू उष्मा अधिकाधिक असह्य होऊं लागला आणि घड्याळाचे कांटेहि, दीड वाजला, असें दाखवूं लागले. इतक्यांत कोणाच्या जोड्यांच्या चट्‌चट् शब्दांनीं मास्तर-साहेब तंद्रींतून जागे झाले, आणि डोळे उघडून पहातात, तों समोर श्रीयुत मोरूनाना दप्तरदार ! आज गुरुवार—चांदगांवला ' केसरी ' येण्याचा वार. त्यांच्या अंगांत खादीची बंडी असून तिचा एकहि बंद त्यांनीं बांधला नसल्यामुळें छाती उघडीच होती. हातामध्यें अर्थातच पांढरा अभ्रा चढविलेली जुनीपुराणी छत्री होती. भोजन उरकून, विडा चघळीतचघळीत मोरूनानांची स्वारी पोस्ट—ऑफिसांत येऊन दाखल झाली होती. येतांच नानांनीं विचारलें " डांक आली, मास्तर ? "

मास्तरसाहेब आतां चांगलेच जागे झाले, व नीट उठून बसून जड स्वरानें ह्मणाले " या—या मोरूनाना. बसा—बसा—अरे धर्माजी, आंतून नानांसाठीं एक खुर्ची घेऊन ये पाहूं झट्‌कन्. "

धर्माजीनें झट्‌कन् एक खुर्ची आणून मास्तरसाहे-बांच्या खुर्चीसमोर ठेवली आणि नाना तिच्यावर स्थानापन्न झाले.

" काय मास्तर, टांगा नाहीं आला अजून ? "

जांभई देऊन मास्तर ह्मणाले " नाहीं बुवा ! अजून कुठें पत्ताच नाहीं डांकेचा ! "

" कां बरें आज इतका उशीर ? " मोरूनानांनां डांकेला उशीर होणें ह्मणजे पोस्ट—खात्याचा अगदीं अक्षम्य अपराध वाटत असे.

" काय कीं बुवा ! "

"काय तुमचें हें पोस्टल डिपार्टमेंट, मास्तर!" [illegible] नाना म्हणाले. "अन आम्हा हिंदूंच्या [illegible] साहेब [illegible]! ही काय इंग्लिश [illegible] वाटलें!"

"[illegible] कुठें तरी मेल झाला असेल. कुठें [illegible] झाला असला, तर त्याला [illegible] काय करणार! [illegible] लाइनी कांहीं [illegible] ना!"

[illegible] झालें. एकदोन हवापाण्या-[illegible] ते पोस्टमनला म्हणाले "अरे [illegible] एक चिलीम भरून आण गड्या, भरून—"

[illegible] चिलीम भरावयाला आंत निघून गेला. [illegible] नाना म्हणाले "[illegible] आठवड्याचा 'केसरी' [illegible] तुम्ही!"

"नाहीं बुवा, मी नाहीं फारसें कधीं वर्तमानपत्र वाचीत."

"[illegible] भयंकर प्रकार चालला आहे. इंग्रज [illegible] भयंकर स्थिति आहे."

[illegible] बातम्यांचा शोक फारसा नव्हता. ते [illegible] म्हणाले "असें!"

"[illegible] हो! कधीं काय होईल घोटाळा तिकडे [illegible] नाहीं. काय झालें आहे, आहे [illegible]—" असें म्हणून झटकन् तेथें पडलेला एक [illegible] कोरा फॉर्म घेऊन मोरूनाना घाईघाईनें [illegible] नकाशा काढूं लागले. गेल्या [illegible] केसरी [illegible] इंग्रजांचें सैन्य कोठें आहे, [illegible] संकटांत सांपडलें आहे, बोअर [illegible] आहे. हें सारें ते मास्तरसाहेबांनां [illegible] समजावून द्यावयाला लागले. मेल— [illegible] उशीर झाल्यामुळें आपण कसे भयंकर [illegible] आहों, याविषयीं मास्तरसाहेब विचार [illegible], इंग्रज सैन्याच्या संकटाकडे लक्ष्य [illegible] त्यांना फुरसतच नव्हती! आपल्या या संकटां-[illegible] होतें असें त्यांनां होऊन गेलें होतें.

[illegible] होतें तें समजावून देण्याचा प्रयत्न [illegible] मोरूनाना म्हणाले "तुम्हांला सांगितलें [illegible] नाहीं, मास्तर! परंतु इंग्र-[illegible] काय न झाली काय याबद्दलचा [illegible] डोक्यांत एकसारखा चालल्यामुळें गेल्या आठ दिवसांत मला चांगलीशी झोंप देखील आली नाहीं पहा!"

इतक्यांत चिलीम तयार होऊन आली. तिच्यावर मुकाट्यानें तोंडसुख घेण्यांत मास्तरसाहेब अगदीं निमग्न होऊन गेले होते. त्यांच्या हातून चिलीम घेऊन नाना आपल्या काळजीचें निवारण करूं लागले.

इतक्यांत डांकेच्या टांग्याचा घरघर शब्द दुरून ऐकूं येऊं लागला, आणि तत्क्षणीं नानांच्या चेहऱ्यावर आनन्दाची लकेर पसरली.

मिनिट दोन मिनिटांनीं डांकेचा टांगा येऊन पोस्ट ऑफिसासमोर उभा राहिला. उच्चैःश्रव्याचे ते दोन गचाळ वंशज अगदीं दमून गेले असून त्यांच्या अंगां-तून एकसारखा घाम निथळत होता, ते मोठ्यानें धापा टाकीत होते.

टांग्यांतून तीन उतारू खालीं उतरले. त्यांपैकीं दोघे ग्रामस्थ असून एक व्यक्ति अगदीं अपरिचित होती. या इसमाचा पोषाख भपकेदार असून त्याचा सुंदर सोन्याच्या फ्रेमीचा चष्मा, सोन्याचें रिस्टवॉच, लिंबा-सारखी कांति, गौरवर्ण, सुंदर बांधा आणि मनोहर रूप पाहून मास्तर आणि मोरूनाना त्याच्याकडे 'आ' करून टकमकां पहातच राहिले. ही स्वारी म्हणजे आमचे वसन्तरावजी, हें प्रिय वाचकांनां निराळें का सांगितलें पाहिजे?

गाडींतून पोस्टाच्या शिपायानें डांकेच्या पिशव्या खालीं उतरून घेतल्या आणि गाडीचा कोचमन आणि त्याचा मदतनीस या दोघांनीं मिळून गाडींतून उतारूंचें सामान खालीं उतरून ठेवलें.

बरोबरच्या दोघां उतारूंनां वसन्तराव म्हणाले "जरा थांबा हं." असें म्हणून त्यांनीं आपली ट्रंक उघडली, आणि त्यांतून कागदांचें एक पुडकें बाहेर काढलें. त्यांच्या हातांत एकएक कागद देऊन वसन्त-राव म्हणाले "हें जंगी पुस्तक छापतें आहे. फार चांगलें आहे पुस्तक. कृपा करून जाहिरात शेवटपर्यंत वाचून पहा."

नंतर ते पोस्ट-ऑफिसच्या व्हरांड्यांत गेले, व नम्रपणें मास्तर व मोरूनाना यांनां नमस्कार करून म्हणाले "नमस्कार महाराज!" असें म्हणून त्यांच्या हातीं एकएक जाहिरात वसंतरावांनीं दिली, आणि एक स्टूल तेथें होतें, त्यावर, कोणीं न सांगतांच ते जाऊन बसले.

लागलेली यमुना ही दुसरी कोणी नसून दामूअण्णा सरदेशमुखांची मुलगी कावेरीच आहे, आणि चिंतामणरावांचा धाकटा भाऊ बापुराव हाच नानासाहेब बनून सांप्रत बाणथडीच्या इनामदारांचें प्रचंड वैभव भोगीत आहे. अर्थात्, हीं सारीं अजूनहि केवळ अनुमानेंच होतीं. तीं खात्रीचें सिद्धांत ठरण्याजोगे विश्वसनीय पुरावे अजून कांहीं देखील वसन्तरावांच्या हातीं लागले नव्हते. इतकेंच नव्हे, तर बाणथडीहून कापून आणलेला यमुनेच्या पोलक्याचा तो चिन्हांकित तुकडा निळू परटाला दाखविण्याची संधि त्यांनां अद्यापि मिळाली नसून टमाकाकूंनां युक्तियुक्तीनें विचारून पहाण्याचा आपला विचारहि त्यांनां अद्यापि अमलांत आणतां आला नव्हता.

चांदगांवला आल्यापासून वसंतराव दिवसा मोरूनाना दप्तरदारांच्या घरीं जेवीत असत, आणि रात्रीं शेर दीडशेर दूध विकत आणवून, तें स्टोव्हवर खरपूस तापवून, त्यावरच रात्रींच्या जेवणाची गुजराण करीत. मोरूनानांनीं त्यांनां रात्रींहि भोजनाला घरीं येण्याविषयीं पुष्कळ आग्रह करून पाहिला; परंतु आशंकेमुळें म्हणा किंवा दुसऱ्या कांहीं कारणामुळें म्हणा, वसंतराव कांहीं त्यांच्या आग्रहाला कबूल झाले नाहींत. कांहीं तरी निमित्त सांगून ते रात्रीं ानांच्या घरीं जाण्याचें प्रत्यहीं टाळीत. कदाचित् वेडेगांवच्या जीव-जिवड्यांची भीति हेंहि त्यांच्या ानांतलें कारण असेल !

या आठवड्याचा केसरी, काळ व वार्तासागर हीं ोन्ही पत्रें प्रसिद्ध होतांच ताबडतोब पाठवून देण्या-ाषयीं वसन्तरावांनीं मुंबईला लिहिलें असून त्यांची ाट पहात नाना एक एक दिवस मोजून मोठ्या कष्टानें ठीत होते.

चवथ्या दिवशीं दोनप्रहरीं भोजन वगैरे आटोपून ंतराव पोस्टऑफिसांत गेले. मुंबईहून 'महाराष्ट्र ञयांत प्रचंड खळबळी'च्या जाहिरातींचें बुक-ल पोस्टानें आज त्यांच्याकडे यावयाचें होतें. टमास्तरसाहेब नुकतेंच आपलें भोजन आटोपून, रा देत व पोटावरून हात फिरवीत विडा चघळीत ळीत बाहेर आले होते. डांकेचा टांगा यावयाला ्नहि थोडा अवकाश होता. म्हणून मास्तरसाहेब व ्तराव गप्पाटप्पा मारीत वेळाला 'ठार करण्या'च्या ाराला लागले.

इतक्यांत कांहीं मिनिटांनीं, चिंचगांवच्या पोलीस ठाण्यावरचे इन्स्पेक्टरसाहेब घोड्यावरून तेथें येऊन ठेपले.

"ओ हो हो हो ! इन्स्पेक्टरसाहेब वाटतें ? यावें-यावें ! अरे ए धर्माजी, ऑफिसांतून ती मोठी खुर्ची घेऊन ये बरें झट्कन् बाहेर." असें म्हणत म्हणत मास्तर उठून उभे राहिले. एका रनरनें जाऊन इन्स्पेक्टरसाहेबांच्या घोड्याचा लगाम धरला. इन्स्पेक्टरसाहेब घोड्यावरून उतरून व्हरांड्यांत आले.

वसंतरावांनीं इन्स्पेक्टरसाहेबांकडे लक्ष्यपूर्वक पाहिलें. त्यांचें वय बरेंच लहान असून चोवीस वर्षांपेक्षां कांहीं तें अधिक नसावें, असें त्यांनीं सहज अनुमान केलें. त्यांचा सरकारी खाकी पोषाख अंगावर असल्यामुळेंच ते उग्र व कठोर दिसत होते. नाहीं तर स्वारी होती अगदीं हंसतमुख आणि दिसण्यांत भारी गोड अशी !

मास्तरसाहेबांनीं नमस्कार करून विचारलें "कुठून आली स्वारी या भलत्याच वेळीं ?"

प्रतिनमस्कार करून इन्स्पेक्टरसाहेब ह्मणाले "जवळच्या एका गांवीं गेलों होतों—"

"कांहीं तपासबिपास ?"

"होय—" असें ह्मणून आपल्या खाकी पाटलोणीच्या खिशांतून रुमाल काढून इन्स्पेक्टरसाहेब आपल्या कपाळावरचे व हातांवरचे धर्मबिंदु पुसून काढूं लागले.

"जेवणबिवण अजून झालें नाहीं असें दिसतें ?" मास्तरसाहेबांनीं हंसतहंसत विचारलें.

"नाहीं."

"मग इथेंच स्नान करानां ?-भात टाकायला सांगतों-झट्कन् होईल-वेळ नाहीं लागायचा !"

इन्स्पेक्टरसाहेब नम्रपणें हंसून ह्मणाले "छे छे छे छे ! इतकी तसदी घ्यायची कांहीं जरूर नाहीं—"

"वा वा- असें कधीं कुठें झालें आहे ? स्नान करून दोन घांस खाच. बोलतां बोलतां होईल—"

"छे छे-अगदीं ओ येईपर्यंत फराळ चापून आलों आहें मी. खायची बिलकूल इच्छा नाहीं कांहीं. तहान मात्र भारी लागली आहे. एक फुलपात्रभर थंडगार पाणी आणायला सांगा चांगलें—"

"पाणी कशाला ? त्यापेक्षां थोडें सरबतच घ्या ना ? म्हणजे तहानहि चांगली शांत होईल. चांगलें ताज्या लिंबाचें सरबत करून आणतों पहा तर खरें—"

"छे छे–इतके कष्ट कशाला, मास्तरसाहेब ?"

"कष्ट कसले त्यांत ?" मास्तर हंसतहंसत म्हणाले. "मी हा असाच आंत जाऊन येतों. वसंतराव, आपण तोंवर इन्स्पेक्टरसाहेबांशीं बोलत बसा–दोन मिनिटांत हा आलों मी." असें म्हणून मास्तरसाहेब घाईघाईनें आंत निघून गेले.

इन्स्पेक्टरसाहेब वसन्तरावांकडे आपली खुर्ची फिरवून म्हणाले "आपलें नांव काय ?"

"वसंतराव तांबे."

"अस्सें !" इन्स्पेक्टरसाहेब स्मितपूर्वक म्हणाले. "माझें नांव नारायण महादेव खरे. आपणाला यापूर्वी मीं कधींहि इथें पाहिलें नाहीं. इथेंच असतां आपण?"

"नाहीं. इथें येऊन मला आज चारच दिवस झाले. आपण किती दिवस आहां इकडे ?"

"मी होय ? मला झालीं इथल्या सदर ठाण्याला येऊन दोन एक वर्षे. इन्स्पेक्टर झाल्याबरोबरच इथें मी आलों."

त्या दोघांचें याप्रमाणें परस्परांसंबंधीं संभाषण होत आहे, इतक्यांत मास्तरसाहेब आंतून आले.

मास्तर हंसत हंसत म्हणाले "इतक्यांत येईल सरबत. लिंबू कापून देऊनच मी आलों. वसन्तरावांशीं झाल्या का कांहीं गोष्टी ?"

"हो हो–आम्ही बोलतोंच आहों आपण गेल्यापासून—"

"वसन्तराव, आपली एक जाहिरात द्या ना इन्स्पेक्टरसाहेबांनां ? हे कांहीं पूर्वीच्या काळचे मूर्ख इन्स्पेक्टर नाहींत. नवीन जमान्यांतले पोलीस अधिकारी आहेत. कॉलेजांतलें उच्च शिक्षण मिळालेलें आहे यांनां!"

"काय म्हणतां ?"

"म्हणजे ! बी. ए. फेल आहेत ना हे !" असें म्हणून मास्तरसाहेब अभिमानपूर्वक एकवार वसंतरावांकडे आणि एकवार इन्स्पेक्टरसाहेबांच्या चेहऱ्याकडे पाहूं लागले.

खिसे तपासून वसन्तराव म्हणाले "नाहीं. जाहिरात नाहीं माझ्यापाशीं. साऱ्या संपल्या. आजच्या डाकेनें यायच्या आहेत—"

इन्स्पेक्टरसाहेबांनीं विचारलें "कसली हो जाहिरात? कांहीं औषधेंबिवधें नवीन ?"

मास्तर हंसून म्हणाले "छे छेः ! अगदींच चुकलांत आपण. हे एक पुस्तक छापताहेत."

इन्स्पेक्टर नम्रपणें म्हणाले "अस्सें ? एकूण आपण ग्रंथकार आहांत का ? कादंबरी का नाटक ?"

वसंतराव हसून म्हणाले "छे छे–कादंबरी नाहीं न् नाटकहि नाहीं—"

"मग ?"

"थोडासा इतिहासाचाच प्रकार. महाराष्ट्र–राजचरितमाला !"

इतक्यांत मास्तरसाहेबांच्या नोकरानें सरबताचा प्याला आणून इन्स्पेक्टरसाहेबांच्या हातीं दिला. सरबत हलुहलू पिऊन, शांत होऊन, ते समाधानानें उद्गारले "आः ! भारी मजेदार, मास्तर ! जीव कसा अगदीं थंड झाला पहा !"

वसंतरावांनीं खिशांतून पट्ट्यांचा डबा बाहेर काढून तो उघडून इन्स्पेक्टरसाहेबांपुढें धरला.

इन्स्पेक्टर म्हणाले "थँक्स ! मी पान खात नाहीं."

वसन्तराव मोठ्यानें हंसत हंसत म्हणाले "वाः ! हा काय विलक्षण चमत्कार बुवा ! आपण पान खात नाहीं याचा अर्थ काय ? पानसुपारी खाणें हें तर पोलिसांचें मुख्य काम आहे."

वसन्तरावांची ही कोटी ऐकून इन्स्पेक्टरसाहेबहि मोठमोठ्यानें हंसूं लागले.

मास्तरसाहेब हंसून म्हणाले "नाहीं, वसन्तराव ! आमचे हे इन्स्पेक्टरसाहेब विड्याचें पानहि खात नाहींत अन् नोटांच्या पानांची पट्टीहि गिळंकृत करीत नाहींत. या शिकल्या पढल्या, कॉलेजांतल्या लोकांनां पोलिसांत शिरकावून सरकारनें या डिपार्टमेंटची अगदीं मातीमाती करून टाकली आहे !" असें म्हणून मास्तरसाहेब खो खो हंसूं लागले. हंसें थांबल्यावर मास्तर म्हणाले "एका कुणब्याजवळ पैसा अडका कांहीं नव्हता, तेव्हां त्यानें पोलिसला पान खाण्यासाठीं म्हणून आपल्या जवळची एक बकरीच दिली !"

इन्स्पेक्टर स्मित करून म्हणाले "हो, पोलिसांसंबंधाची अशी एक दंतकथा चालत आली आहे खरी."

इतक्यांत डाकेचा टांगा पोस्ट ऑफिससमोर येऊन थडकला. वसंतरावांच्या नांवानें डाकेंतून जाहिरातींचें एक पार्सल आलें होतें. तें फोडून वसंतरावांनीं त्यांतील एक जाहिरात इन्पेक्टरसाहेबांच्या हातीं दिली.

इन्स्पेक्टरसाहेबांनीं ती जाहिरात अगदीं लक्ष्यपूर्वक वाचली. नंतर त्यांनीं वसंतरावांनां कांहीं

प्रश्न हळुहळू विचारले—उदाहरणार्थ, आपण कोण, कुठें असतां, इकडे केव्हां आलां, आणखी किती दिवस इकडे रहावयाचा आपला विचार आहे, या दोन चार दिवसांत आपलें कितीसें काम झालें, पुस्तकाला थोडे-बहुत तरी कांहीं ग्राहक मिळाले कीं नाहीं—इत्यादि. 'महाराष्ट्र-राजचरित-माला' या पुस्तकासंबंधानेंहि त्यांनीं बरीच चौकशी केली.

शेवटीं ते ह्मणाले "आपली इच्छा असली, तर माझ्यापाशीं थोड्याशा जाहिराती देऊन ठेवा. चिंचगांवाला कितीतरी लोक जातात न् येतात. तेथल्या पोलिस ठाण्यावर, शाळेंत, पोस्ट ऑफिसांत लोकांची 'जा ये' पुष्कळ असते. अशा सार्वजनिक जागीं दोन दोन चारचार जाहिराती चिकटवण्याचीहि व्यवस्था करूं." असें ह्मणून इन्स्पेक्टरसाहेब जावयाला उठले.

"आपले उपकार होतील भारी गरिबावर!" असें ह्मणून वसंतरावांनीं इन्स्पेक्टरसाहेबांच्या हातांत कांहीं जाहिराती दिल्या.

जाहिराती आपल्या खाकी कोटाच्या खिशांत घालून मास्तरसाहेबांनां नमस्कार करून इन्स्पेक्टरसाहेब घोड्यावर चढले, आणि त्यांनीं घोड्याला टांच मारली.

प्रकरण सातवें.

श्रीमंतांकडे !

तीन दिवसांनीं वसंतरावांनां श्रीमंतांचा निरोप आला, कीं, श्रीमंतांची तब्बेत आतां ठीक असून, आज तिसऱ्या प्रहरीं वसंतरावांची भेट घ्यावयाला ते तयार आहेत.

'श्रीमंत बरे झाल्यावर, तुम्हाला बरोबर घेऊन मी त्यांच्याकडे जाईन', असें मोरूनानांनीं वसंतरावांपाशीं कबूल केलें होतें; परंतु आजच्या डांकेनें, एक नाहीं, दोन नाहीं, चांगलीं तीन वर्तमानपत्रें आल्यामुळें आज सारेंच गाडें उलटलें ! बोअर युद्धाचा वृत्तांत वाचण्यांत नाना इतके रंगून गेले, कीं, एखादा प्रणयी तरुण आपल्या वल्लभेशीं प्रेमाच्या गुलगुल गोष्टी बोलण्यांत देखील इतका रंगून जात नसेल ! वर डोकें करावयाला देखील त्यांनां आज फुरसत नाहींशी झाली !

नानांची ही बेहोष स्थिति वसंतरावांच्या लक्ष्यांत आली. नाना आज कांहीं झालें तरी घरांतून बाहेर पडणार नाहींत, हें ते समजले; परंतु आज इतक्या दिवसांनीं श्रीमंतांच्या भेटीचा योग आलेला ! तो दवडणें म्हणजेहि महामूर्खपणाचें झालें असतें. तेव्हां नाइलाजानें, श्रीमंतांकडे एकटेंच जावयाचें, असें वसंतरावांनीं ठरविलें, आणि सुमारें चार वाजतां ते श्रीमंतांच्या मुलाखतीला निघाले. चांदगांवला आल्यापासून लोकांच्या तोंडून वसंतरावांनीं श्रीमंतांचें चरित्र थोडें-बहुत ऐकलें होतें, त्याचें टांचण करून तेंहि त्यांनीं बरोबर घेतलें होतें.

श्रीमंतांचा वाडा मोठा भव्य किंवा उत्तम होता असें नाहीं; पण तो चांगला टुमदार होता. दुसऱ्या मजल्यावर श्रीमंतांचा मुख्य दिवाणखाना असून तो चांगला प्रशस्त होता. खालीं तक्तपोशीवर एकजात लांबरुंद स्वच्छ सतरंजी पसरली असून मध्यभागीं मोठा थोरला नवाच हैदराबादी गालीचा घातलेला होता. गालीच्यावर स्वच्छ चादर घातलेली एक मोठी गादी आंथरली असून, स्वच्छ अभ्रा चढविलेला एक मोठा थोरला लोड त्या गादीच्या बाजूला ठेवलेला होता. लोडाला टेंकून श्रीमंत गादीवर पडले होते. त्यांच्यासमोर पानसुपारीचें रुप्याचें तबक व रुप्याचें पानपूड पडलें होतें. जवळच एक रुप्याची सुंदर नकसकाम केलेली सिगारेट-बॉक्स उघडीच पडली होती. श्रीमंतांच्या भोंवतीं त्यांचे कांहीं खुशामत्ये, मित्र आणि आश्रित बसले असून त्यांच्याशीं गप्पा झोडण्यांत ते अगदीं दंग होऊन गेले होते. मधुनमधून हातांतील सुगंधी सिगारेटचा झुरका मारून त्याच्या धुरानें ते दिवाणखान्याचें वातावरण सुगंधित करीत होते. मधुनमधून जवळ ठेवलेल्या रुप्याच्या तस्तांत ते सिगारेटची राख झाडीत होते. दिवाणखान्याच्या भिंतींनां कांहीं लहानमोठ्या विलायती व देशी चित्रांच्या तसबिरी आणि फोटोग्राफ टांगलेले होते. मध्यें दोन मोठे बिलोरी आरसेहि लावले होते. मोहागनी लांकडाच्या एका सुंदर केसवर संगमरवरी दगडाच्या फ्रेममध्यें बसविलेलें एक मोठें थोरलें घड्याळ ठेवलें असून त्यामुळें दिवाणखान्याला चांगली शोभा आली होती.

वसंतराव वाड्यांत पोहोंचल्यावर, त्यांनां या दिवाणखान्यांत श्रीमन्तांपुढें नेण्यांत आलें. तेथें येतांच वसंतरावांनीं श्रीमंतांनां अगदीं लवून नमस्कार केला.

श्रीमंतांनीं मान किंचित् हलवून त्यांच्या नमस्काराचा स्वीकार केला, व विचारलें "आपलेंच नांव वसन्तराव तांबे काय ?"

वसन्तराव नम्रपणें म्हणाले "होय."

जवळच्या बैठकीकडे बोट दाखवून श्रीमंत म्हणाले "या, बसा असे. आपणाला माझा निरोप पोहोंचला ना?"

वसन्तराव बसून म्हणाले "होय. त्याप्रमाणेंच मी हा आलों आहें श्रीमंतांच्या मुलाखतीला."

"आज दोनचार दिवस माझी प्रकृति अगदीं बिघडून गेली होती—पडशानें नू तापानें जीव अगदीं बेजार होऊन गेला होता पहा. म्हणून इतक्या दिवसांत आपली भेटहि मला घेतां आली नाहीं किंवा आपली नुसती विचारपूसहि मला करतां आली नाहीं. आपली प्रकृति तर ठीक आहे ?"

"हां–ठीक आहे."

"आमच्या शाळेच्या इमारतींत आपण राहिलां आहां असें मीं ऐकलें. आपणाला कांहीं त्रासबीस तर नाहीं ना होत कसला ?"

"नाहीं. कांहीं त्रास नाहीं. आपले मोरूनाना दप्तरदार यांच्या कृपेनें मी चांगला आनंदांत आहें." असें म्हणून वसन्तरावांनीं श्रीमंतांकडे पाहून नम्रपणें किंचित् स्मित केलें.

दोनचार वेळ सिगारेटचे दम घेऊन, धुरानें वातावरण भरीत श्रीमंत म्हणाले "नाना मोठे सज्जन आहेत."

"होय. तें मला पदोपदीं पटतें आहे."

"आपण खुद्द मुंबईलाच असतां नेहमीं ?"

"होय."

"आपण पाठवून दिलेली जाहिरात मीं लक्ष्यपूर्वक वाचली. आपण मोठा स्तुत्य उद्योग आरंभला आहे. काय नांव आपल्या पुस्तकाचें तें?–महाराज-राष्ट्रमाला–"

येणारें हंसूं मोठ्या कष्टानें दावून वसंतराव नम्रपणें म्हणाले "महाराष्ट्र–राज–चरित–माला."

श्रीमंत जरा हंसून म्हणाले "नांव जरा लांबलचक झालें आहे नाहीं ?"

"आंतील मजकूर ध्यानांत येण्यासाठीं हें जरा लांबलचक नांव पत्करावें लागलें—"

"हो–तेंहि खरें आहे. नुसत्या गोड टुमदार नांवाकडे पाहूनच चालत नाहीं." असें म्हणून नाक जरा वाकडें करून, ओंठ गोलाकार करून, श्रीमंत जरा मागें रेलले, आणि डोळे किंचित् बारीक करून, मान हालवीत ते जरा मोठ्यानें आपणाशींच पुटपुटले "महाराष्ट्र–राजचरित–माला !–माला ! माला !"

श्रीमंतांचें हें वर्तन पाहून आणि उद्गार ऐकून, त्यांच्या मित्रमंडळीला व आश्रितांनां वाटलें, कीं, श्रीमंत आतां कांहींतरी मौजेचें रसिक भाषण अगर एखादा सुंदरसा श्लेष करणार खास ! परंतु तो कशासंबंधानें असावा हें कोणाच्याहि लक्ष्यांत येईना. परंतु एकमेकांकडे पाहून हंसें दाबल्यासारखें करणें हें आपलें या वेळचें कर्तव्य होय, असें वाटून सर्वांनीं त्याप्रमाणें केलें.

श्रीमंत ह्मणाले "माला ! ठीक आहे–माला तर माला ! पण वसंतराव, माला कशाची होते, हें आपण सांगूं शकाल काय ? फुलांचीच होते ना ?"

वसंतराव नम्रपणें म्हणाले "फुलांची होते, मोत्यांची होते, आणखीहि पुष्कळ—"

श्रीमंत मध्येंच ह्मणाले "म्हणजे चांगल्या जिनसांची होते. सुंदर सुंदर असे जे पृथ्वीवर पदार्थ असतील, त्यांची माला तयार करतां येते, असेंच कीं नाहीं, वसंतरावजी ? पण जुने फाटके जोडे, दगड धोंडे, कुजकीं पालेंमुळें, किंवा गोंवऱ्या, असल्या कांहीं 'चिजां'ची 'माला' कधीं होते का ? किंवा, यांनां दोरीनें एका ठिकाणीं गुंफतां आलें, तरी जें कांहीं तयार होईल, त्याला 'माला' ही सुंदर संज्ञा कोणी रसिक देईल का ?"

"अर्थात् नाहीं."

"मग आमच्या-या महाराष्ट्रांत जे संस्थानिक, इनामदार, जहागिरदार आहेत, त्यांचीं 'चरितें' माला गुंफण्यासारखीं सुंदर अन् पवित्र आहेत, असें खरोखरच आपणाला वाटतें काय, वसंतराव ?" असें म्हणून, हो हो करून हंसून श्रीमंतांनीं पुनः एक सिगारेट पेटविली, व ती ते ओढूं लागले.

वसंतराव क्षणमात्र स्तब्ध राहिले, व नंतर ह्मणाले "श्रीमंत ह्मणतात तें बरोबर आहे. सुंदर, पवित्र वस्तूंची 'माला' होते; ओंगळ, वाईट जिनसांची होत नाहीं. परंतु माला गुंफण्याचें काम जो आपल्या अंगावर घेतो, तो त्या पदार्थांची निवडहि करतो. हाताला जें लागेल त्याचीच केवळ तो माला गुंफीत नाहीं. शिवाय, फुलें झालीं तरी त्यांत किती तरी प्रकार आहेतच कीं नाहीं ? गुलाब, जाई, जुई पासून तों पांढऱ्या चाफ्यापर्यंत फुलें आहेत; परंतु गुलाब, जाई, जुई हीं फुलें घेऊन माळी माला गुंफतात. मीहि एक प्रकारचा माळीच बनलों आहें. चरित्ररूपी फुलांची निवड करूनच मी

झाला गुंफीन, हें उघड आहे. हेंच पहाना; मी श्रीमंतांनां पूर्वी कधीं डोळ्यांनीं पाहिलेंहि नाहीं; परंतु मुंबईंत बसल्याबसल्याच आपल्या कीर्तीचा सुगंध माझ्यापर्यंत दरवळत आलाच कीं नाहीं? श्रीमंतांसारखें नाजुक सुंदर फूल या खेडेगांवच्या जंगलांत फुललें आहे खरें; परंतु आपला सुगंध आपणाला कसा लपवून ठेवतां येणार?"

वसन्तरावांचें हें भाषण ऐकून चिंतामणराव मृदु हास्य करूं लागले. त्यांचें मन वसन्तरावांच्या भाषणानें अतिशय प्रसन्न होऊन ते त्यांच्यावर भारी खूष झाले असावे, असें स्पष्ट दिसत होतें. श्रीमंतांचे मित्र व आश्रित मंडळी वसंतरावांकडे प्रसन्न दृष्टीनें पाहूं लागून मनांतल्या मनांत त्यांची खूब प्रशंसा करूं लागली.

भाऊभटजींनां तर रहावेनाच. ते दंतप्रदर्शन करून ह्मणाले "वा वा–भारी सुंदर–गोड उपमा! या मुंबईकर पाहुण्यांनीं यथार्थ तेंच कथन केलें. आमच्या श्रीमंतांसारखा गुणालंकृत भूपति साऱ्या भारतवर्षांत मिळायाचा नाहीं!"

यानंतर श्रीमंतांनीं अत्यंत सहानुभूतिपूर्वक वसन्तरावांच्या पुस्तकाची चौकशी केली. पुस्तक तयार होतांच पहिल्याच दिवशीं आपणाकडे व्ही. पी. नें पांच प्रति रवाना झाल्या पाहिजेत, असें त्यांनीं वसन्तरावांनां बजावून सांगितलें–साधलें तर आगाऊच प्रत पाठविण्याविषयींहि फर्मान केलें.

चिंतामणरावांच्या चरित्रासंबंधानें वसंतरावांनीं जें टिप्पण तयार करून आणलें होतें, तें त्यांनीं श्रीमंतांनां वाचून दाखविलें. वसंतराव तें वाचीत असतां चिंतामणराव मधुनमधून कांहीं फेरफार अगर दुरुस्त्या सुचवीत होते–त्या त्यांनीं ताबडतोब जेथल्या तेथें टांचून ठेवल्या. श्रीमंतांनीं कांहीं अधिक माहिती सांगितली; तीहि वसन्तरावांनीं लिहून घेतली.

शेवटीं वसंतराव ह्मणाले "श्रीमंतांचा फोटोहि पाहिजे आहे मला."

श्रीमंत हंसून म्हणाले "कांहीं माथेफिरू माणसांप्रमाणें फोटो द्यायला माझी कांहीं हरकत आहे असें नाहीं; पण माझा अलीकडे चांगलासा फोटोच काढलेला नाहीं."

वसंतराव चेहरा वाईट करून म्हणाले "मग काय करायचें? जो मिळेल तोच मी घेऊन जाईन. इकडे एखादा चांगला फोटोग्राफरहि नाहीं मिळण्यासारखा-"

"वसंतराव, चांदगांव म्हणजे का तुमची मुंबई आहे?" श्रीमंत स्मित करून म्हणाले.

"मग जुनाच फोटो मी घेऊन जातों. किती वर्षांपूर्वींचा आहे तो?"

"दोन तीन वर्षें झालीं असतील काढवून त्याला. मागें मुंबईला मी गेलों होतों, त्यावेळीं काढविला तिकडे."

"अं:! मग तो चांगला असेल–"

"मी तो उद्यां सकाळीं आपणाकडे पाठवून देईन."

"भारी उपकार झाले श्रीमंतांचे." नंतर आपल्या हातांतील कागदाकडे पाहून वसंतराव म्हणाले "यांत आपल्या धाकट्या बंधूंची–बापुरावांची कांहीं हकीगत आली नाहीं. त्यांची एकवार भेट झाली असती, तर बरें झालें असतें."

बापुरावांचें नांव ऐकतांच श्रीमंतांची स्थिति चमत्कारिक झाली. भ्रुकुटी वक्र करून ते म्हणाले "बापुरावाची भेट? पण तो आहे कुठें इकडे?"

"नाहींत का? मग कुठें आहेत?"

"मुंबईला."

"मुंबईला? मग फारच उत्तम! मीच मुंबईला गेल्यावर बापुरावांना भेटेन झालें! मुंबईला कुठेंसे असतात ते? कृपा करून त्यांचा पत्ता श्रीमंतांनीं सांगितला तर—"

श्रीमंत जरा तीव्र स्वरानें म्हणाले "आलें होतें मधें कधींसें त्याचें पत्र मुंबईहून–त्यांत त्यानें आपला कायसा पत्ता दिला होता. काय बरें? नाहीं बुवा–कांहीं लक्ष्यांत नाहीं. हां, मास्तरांनां ठाऊक असेल. अहो मास्तर, जरा इकडे या बरें—"

जवळच्या खोलींतून काळी टोपी, व सदरा घातलेला एक काळाकुट्ट किडकिडीत माणूस येऊन श्रीमंतांसमोर नम्रतेनें उभा राहिला.

श्रीमंत म्हणाले "मास्तर, बापूनें पत्रांत आपला मुंबईचा पत्ता लिहिला होता तो आहे लक्ष्यांत तुमच्या?"

आठवल्यासारखें करून, डोकीवरून हात चोळीत मास्तर ह्मणाले "नाहीं–ध्यानांत नाहीं—"

श्रीमंत म्हणाले "ध्यानच तुम्ही!" असें म्हणून आपल्याच कोटीनें आपण खूष होऊन ते खदखदां हंसले. "जा, तें पत्र काढा न् त्यांत लिहिलेला पत्ता एका कागदावर टिपून या गृहस्थांनां आणून द्या झट्कन्—"

" हां–"असें म्हणून मास्तर निघून गेले, व थोड्याच क्षणांनीं पत्ता लिहिलेला कागदाचा तुकडा आणून त्यांनीं वसंतरावांच्या हातीं दिला.

वसंतराव त्या कागदावरील पत्ता वाचून म्हणाले " काकडवाडी ! ओः त्या बाजूला तर मी नेहमींच जातों. मुंबईला गेल्यावर या पत्त्यावर मी बापुरावांनां जरूर भेटेन. मी येतों आतां—" असें म्हणून उठून वसंतरावांनीं श्रीमंतांनां नमस्कार केला.

" या–नमस्कार."

" तेवढा फोटोग्राफ—"

" उद्यां सकाळीं मी जरूर पाठवून देतों."

पुनः एकवार नम्रपणें श्रीमंतांनां नमस्कार करून वसंतराव हळुहळू तेथून निघून गेले.

प्रकरण आठवें.

आळशावर गंगा!

शाळेंतील आपल्या बिऱ्हाडीं जाऊन वसन्तराव आपला बिछाना उघडून त्यावर पडले. ते या वेळीं अगदीं त्रासून गेले होते. पुनः त्यांच्या मस्तकांत विचारांनीं कल्लोल करावयाला सुरवात केली होती.

चिंतामणरावांचा धाकटा भाऊ बापुराव मुंबईला आहे! तर मग वसन्तरावांनीं तयार केलेली सारी अनुमानपरंपरा धडाधड कोसळली म्हणावयाची! बापुराव जर मुंबईला आहे, तर मग बाणथडीला चैन करीत असलेला हा तोतया नानासाहेव कोण? ती यमुना तरी कोण? नानासाहेबांचा तोतया जर बापुराव नसेल, तर यमुना कावेरी असण्याचा संभव तरी काय राहिला? मोठा चमत्कारिक पेंच! आणि, यमुना हीच जर कावेरी असेल, तर बापुरावाशिवाय दुसरा कोण नानासाहेब असूं शकणार आहे? आज कित्येक दिवस प्रचण्ड खटपटी लटपटी करून, मस्तकाला भयंकर शीण देऊन, वसन्तरावांनीं जी अनुमानांची मोठी थोरली इमारत रचीत आणली होती, ती श्रीमंत चिंतामणरावांच्या एका शब्दानें पार डासळू पहात होती!

रात्रीं वसन्तरावांचें दूध नेहमीप्रमाणें वेळेवर आलें; परंतु वसन्तराव तें तापविण्याच्या भानगडींत पडले नाहींत. त्यांनीं तें तसेंच गिळंकृत करून टाकलें.

विचारांत तळमळ करीत असतां सुमारें बारा वाजतां एकाएकीं वसन्तरावांच्या मनांत विचार आला–आपण तर अंगी चूकच करून बसलों आहों गाढवासारखी! यमुनेचें माहेर अथवा सासर चांदगांवाला आहे, एवढ्या माहितीवरच आपण या पोस्ट–चांदगांवाला आलों; परंतु बापाच्या चंपेनें त्या दिवशीं सुचविलें होतें, त्याप्रमाणें यमुनेच्या चांदगांवाला मुळीं पोस्ट ऑफिस नसलेंच तर? तें कांहीं नाहीं. दुसरे ताळे करून या प्रश्नाचें उत्तर बरोबर आहे कीं नाहीं, तें अगोदर नीट तपासून पाहिलें पाहिजे.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठून प्रातर्विधि व चहापान उरकल्याबरोबर वसंतरावांनीं निळू परिटाला बोलावणें पाठविलें. बाणथडीहून कापून आणलेला पोलक्याचा तुकडा त्याला दाखवून आपल्या संशयाचें निरसन करून घ्यावयाचेंच, असें त्यांनीं ठरविलें. ठमाबाईची तपासणी करून तिच्याकडून कशा रीतीनें माहिती मिळवावी, याविषयींहि वसंतराव मनाशीं विचार करूं लागले.

इतक्यांत, पोलिस ठाण्यावरून इन्स्पेक्टरसाहेबांचें पत्र घेऊन एक पोलिस शिपाई वसंतरावांचा शोध करीत आला, व त्यानें तें त्यांच्या हातीं दिलें. इन्स्पेक्टरसाहेबांनीं त्या पत्रांत लिहिलें होतें–' आपली जाहिरात वाचून आपल्या पुस्तकाविषयीं इकडे बरेच लोक कौतुकानें चौकशी करीत आहेत. आपण चिंचगांवला येऊन जर चार दोन दिवस रहाल, तर पांच पंचवीस ग्राहक आपणाला मिळतील, असा बराच संभव दिसतो. तरी आपण इकडे जरूर निघून यावें. '

वसंतरावांनीं ट्रंकेंतून नोटपेपर, फाउंटनपेन वगैरे सामान काढून पत्राचें उत्तर लिहावयाला प्रारंभ केला. आपल्या पुस्तकाविषयीं इतकें अगत्य दाखविल्याबद्दल इन्स्पेक्टरसाहेबांचे प्रथम अतिशय उपकार मानून वसंतरावांनीं त्यांनां लिहिलें ' मी इतक्यांतच एखाद्या दिवशीं आपणाला येऊन भेटतों. त्याविषयीं काळजी नसावी.'

पत्र पुरें करून, तें एका छानदार लिफाफ्यांत भरून, त्यावर इन्स्पेक्टरसाहेबांचें नांव व पत्ता लिहून

वसन्तरावांनीं तें पोलिस शिपायाच्या हातीं दिलें. रामराम करून तो तें घेऊन निघून गेला.

धोब्याच्या घरीं गेलेला माणूस लवकरच परत आला, व वसन्तरावांनां त्यानें सांगितलें " निळू म्हणाला 'अजून रावसाहेबांचे कपडे कांहीं सुकले नाहींत. संध्याकाळीं इस्त्री करून मी ते स्वतः घेऊन येतों.' "

तो सर्व दिवस वसंतरावांनीं विचारांत घालविला. अजून कोणताहि विचार त्यांच्या मनांत स्थिर होत नव्हता. संध्याकाळीं पांचएक वाजण्याच्या सुमाराला चिंचगांवच्या पोलिसस्टेशनावरून एक पोलिस इन्स्पेक्टरसाहेबांचें दुसरें पत्र घेऊन वसंतरावांकडे आला. इन्स्पेक्टरसाहेबांनीं पत्रांत लिहिलें होतें–'उद्यां सकाळीं दोन मोठे श्रीमंत माणूस पोलिसठाण्यावर यावयाचे आहेत–त्यांपैकीं एक लहानसा इनामदारहि आहे. दोघेहि आपल्या पुस्तकाच्या पांचसात प्रति घ्यावयाला तयार होतील असें वाटतें. निदान, आपल्या समक्ष मला त्यांनां आग्रह तरी करतां येईल व मला नकार देणें त्यांनां कठीण वाटेल, हें उघड आहे. तरी आपण उद्यां सकाळीं नऊ ते दहा वाजण्याच्या दरम्यान जरूर जरूर चिंचगांवच्या पोलिसस्टेशनवर येऊन मला भेटावें. कोणतींहि कामें हातीं असलीं तरी उद्यां सकाळीं इकडे आल्याशिवाय राहूं नये.'

पत्र वाचून वसंतराव शिपायाला म्हणाले " तूं थोडा वेळ बाहेर बस. चहा घेऊन मी साहेबांनां जबाब लिहून देतों."

" ठीक, साहेब!" असें म्हणून शिपाई बाहेर जाऊन बसला.

स्टोव्ह पेटवून वसंतराव चहाचें आधण चढवीत आहेत, इतक्यांत, काखेंत धुतलेल्या कपड्यांचें गांठोडें मारून निळू परीट तेथें येऊन पोहोंचला.

यादीप्रमाणें वसंतरावांनीं निळूकडून आपले कपडे नीट तपासून घेतले. नंतर आपल्या खिशांतून यमुनेच्या पोलक्याचा कापलेला तुकडा काढून तो निळूला दाखवून ते अधिकाराच्या स्वरानें म्हणाले "काय रे निळू, हा तुकडा पहा बरें. ही खूण जी इथें केलेली आहे, ही तूंच केलेली आहेस कीं नाहीं तें मला सांग."

वसंतरावांनीं दिलेला तुकडा हातीं घेऊन निळूनें तो नीट पाहिला. नंतर त्यानें मागें पाहिलें, तों बाहेर झाडाच्या खालीं पोलिस शिपाई बसला आहे, असें त्याच्या दृष्टीला पडलें. संशयाच्या दृष्टीनें निळू वसंतरावांकडे टकमकां पहातच राहिला.

वसंतराव भुंवया वांकड्या करून, तीव्र स्वरानें म्हणाले " काय रे–असा काय पहातोस ?—"

" नाहीं–नाहीं साहेब–"

" ही खूण कोणाची ? ही खूण कोणाच्या घरच्या कपड्यांवर तूं करतोस, तें मला तुझ्याकडून कळलेंच पाहिजे."

ती खूण आपलीच आहे, हें निळूनें केव्हांच ओळखलें होतें. इतकेंच नव्हे, तर दामूअण्णा सरदेशमुखांच्या घरच्या कपड्यांवरची ही खूण असून, त्यांची नाहींशी झालेली मुलगी कावेरी, हिच्या पोलक्याचा हा तुकडा आहे, हेंहि निळूच्या केव्हांच लक्ष्यांत आलें होतें.

वसंतरावांच्या चेहऱ्याकडे पाहून, आंवढा गिळून निळू कंपित स्वरानें म्हणाला "ही–ही खूण कोणाची, तें–तें–"

" काय ? सांग जलदी—"

" तें कसें सांगतां येणार, हुजूर ?"

" काय, नाहीं सांगतां येत ?" वसंतरावांनीं दरडावून विचारलें.

" नाहीं–त–तसेंच–कांहीं–पण हुजुरांनां हा तुकडा मिळाला तरी कुठें ?"

डोळे वटारून, कपाळाला आंठ्या चढवून, वसंतराव तीव्र स्वरानें म्हणाले " तुला त्याची काय पंचाईत ? वाटेल तिथें मिळाला ! तूं आपला मी विचारतों त्याचीं मुकाट्यानें उत्तरें दे."

निळू हात जोडून, काकुळतीच्या स्वरानें म्हणाला " हुजूर, सरकार, मी गरीब माणूस आहें—"

वसंतराव खूब रागावले. ते ओरडून म्हणाले "एव्यो गद्धा ! अरे तूं गरीब आहेस का तालेवार आहेस, तें कोणीं विचारलें तुला, मूर्खा ? ही खूण तूं केलेली आहेस कीं नाहींस, या प्रश्नाचा मला सरळ जबाब दे, बस्स !"

वसंतरावांचें हें ' अधिकारी ' वर्तन पाहून निळू मनांतून खूबच डरला ! त्याच्या शरीरावर कांटा उभा राहून भीतीनें तो थरथरां कांपूं लागला. हात जोडून त्यानें विचारलें " पण हुजूर, हें आहे काय एकंदरींत, झालें आहे तरी काय ?"

वसंतराव बेदरकारपणें झट्कन् म्हणाले " खून झाला आहे लेका, खून !"

निळू अगदीं रडकुंडीला येऊन म्हणाला " काय म्हणतां ? म्हणतां तरी काय हुजूर ? ताईंचा खून झाला शेवटीं ? अरे देवा ! खून झाला ?"

काय समजावयाचें होतें, तें वसंतराव तत्क्षणीं समजून चुकले ! परंतु त्यांत कांहीं शंका राहूं नये, या उद्देशानें त्यांनीं विचारिलें "होय लेका, खून झाला तिचा ! सांग पाहूं झट्कन्–तुझ्या या ताईचें नांव काय तें झट्कन् सांग—"

"अहो, काय कपाळ नांव सांगूं हुजूर ! आमच्या कावेरीताईचा–हो–त्या दामूअण्णांच्या कावेरीताईचा !–अरेरे, कोणीं खून केला हो ताईचा चांडाळानें शेवटीं असा ?"

वसंतरावांच्या मनांतील सारा संशय क्षणार्धांत पार नाहींसा झाला ! आणखीहि थोडीशी मौज करण्याच्या हेतूनें ते कठोर स्वरानें ह्मणाले "दुसरा कोण करणार खून तिचा ? तुमच्या इनामदारसाहेबांचा तो दुष्ट भाऊ !"

मान हलवून, अत्यंत सहानुभूतीच्या स्वरानें निळू ह्मणाला "बापूसाहेबांनीं–बापूसाहेबांनींच शेवटीं खून केला ताईचा ?"

"अरे हो–त्याच हरामखोरानें !"

"अरेरे ! हें त्याच वेळीं आह्मांला ठाऊक होतें, हुजूर ! आतां पुढें काय होणार ? हुजूर, आपण काय छुपे पोलीस ?"

वसंतराव गंभीरपणें ह्मणाले "हां–मी गुप्त पोलिसमधील एक अंमलदार आहें–डिटेक्टिव्ह ऑफिसर आहें."

"काय ह्मणाले हुजूर ?"

"डिटेक्टिव्ह–डिटेक्टिव्ह ! तुह्मी ज्यांनां छुपे पोलिस ह्मणतां, तोच !" असें ह्मणून वसंतराव ऐटीनें आपल्या मिशांच्या टोकांनां पीळ भरूं लागले.

निळू मागें वळून बाहेर बसलेल्या पोलिस शिपायाकडे पाहूं लागला. वसंतरावांनीं झट्कन् या गोष्टीचा फायदा घेतला. ते दरडावून ह्मणाले "मग काय रे ? सांगूं हातकडी लावायला पोलिसला ?—"

निळूनें एकदम वसंतरावांच्या पायांशीं लोळणच घेतली व रडतरडत तो ह्मणाला "शपथ आहे हुजुरांनां ! मी अगदीं गरीब माणूस आहें. मला यापैकीं एक अक्षरदेखील माहीत नाहीं, साहेब ! मला साक्षीबिक्षीच्या पेंचांत घालूं नये हुजुरांनीं ! हुजुरांचे हे कपडे मीं धुऊन आणले आहेत–त्यांचा एक पैसा देखील मला नको. ते मी साहेबांनां पानसुपारीला देतों ! शपथ आहे आपल्या बायकोची आपणाला ! माझ्यावर–गरीबावर दया करा—"

किंचित् हंसून वसंतराव ह्मणाले "अच्छा–जाव तुम् ! किसीको भी मत कहना ! कोणापाशीं यांतलें एक अक्षर देखील बोललास तर याद राखून रहा–माझ्याशीं गांठ आहे. दोन वर्षें चामडें कुटायला पाठवीन—खबरदार—"

आपले दोन्ही कान पकडून, खालीं वांकून निळू काकुळतीच्या स्वरानें ह्मणाला "नाहीं नाहीं–एक अक्षर देखील नाहीं कोणाजवळ मी बोलायचा ! अगदीं हुजुरांची शपथ ! कुणीं जीभ कापली तरी देखील नाहीं बोलायचा !"

"अच्छा–जाव !"

धुतलेल्या कपड्यांच्या राशीकडे एकवार दीन मुद्रेनें नजर टाकून बिचारा निळू तेथून ताबडतोब निघून गेला.

शाळेंतून बाहेर पडून निळू हळुहळू रस्त्यानें चालू लागला. त्याच्या मनांत या वेळीं विचारांनीं अगदीं काहूर करून सोडलें होतें. निळू शाळेंतून निघाला, तो एकदम श्रीमंतांच्या वाड्याच्या मागील दिंडीशीं येऊन पोहोंचला. दिंडी उघडीच होती, तींतून तो आंत शिरला.

श्रीमंतांची स्वारी सायंसंध्येसाठीं पाय धूत मागल्या व्हरांड्यांत बसली होती. त्यांच्या जवळपास कोणी नव्हतें.

निळू आला तो पायऱ्या चढून श्रीमंतांच्या पायांपाशींच जाऊन पडला, व रडक्या स्वरानें ह्मणाला "हुजूर–सरकार—"

"कोण ? निळू ? कायरे ?" श्रीमंत आश्चर्यानें निळूकडे पहात ह्मणाले.

"सरकारांच्या अन्नावर हा पिंड वाढला आहे—हुजूर–आपणाला एक—"

"अरे, काय ह्मणतोस तूं निळू ?" श्रीमंतांनीं कपाळाला आंठ्या घालून विचारलें.

"हुजुरांच्या अन्नावर वाढलों ना मी ? आपणाला खबर दिली नाहीं तर नरकांत पडेन मी–ह्मणून तस्सा उठून धांवत आलों मी सरकारांच्या पायांपाशीं—"

"कसली खबर ?"

"खबर भारीच वाईट आहे, सरकार ! आपला मी ह्मणूनच जीव मुठींत धरून—"

श्रीमंत तीव्र स्वरानें ह्मणाले "निळ्या, मला वेळ नाहीं. सांगायचें असलें तर लवकर सांग–नाहींतर हा मी निघालों."

रडव्या स्वरानें निळू ह्मणाला " खुनी मुकद्दमा, हुजूर ! खुनी खटला एकदम, सरकार ! गांवामध्यें छुपा पोलिस का काय ह्मणतात तो आला आहे ना ?"

हें ऐकून श्रीमंतांनां आश्चर्य आणि थोडी भीतिहि वाटूं लागली. ते ह्मणाले "काय ह्मणतोस तूं, निळू ? काय झालें आहे, नीट सांग. खून कसला ? पोलिसचा कोण आला आहे ?"

" त्यानें कायसें सांगितलें, तें मी विसरूनच गेलों सरकार ! काय बरें तें–दारूचा–हां–काय बरें—"

श्रीमंतांच्या आश्चर्याला आतां सीमा राहिली नाहीं. कपाळाला आंठ्या घालून त्यांनीं विचारलें " काय ? ह्मणतोस तरी काय निळ्या ? दारूचा काय ? दारूबिरू पिऊन तिच्या अंमलांत आला आहेस का काय ? शुद्धीवर आहेस कीं नाहीं तूं ?"

श्रीमंतांच्या भाषणावरून निळूला तो शब्द एकदम आठवला आणि तो खूष झाला. एक मोठा उसासा सोडून तो ह्मणाला " खरोखरच माणसाची शुद्धि देखील जायची ना अशा प्रसंगीं ? हां–आठवलें. छुपे पोलिस असतात ना मुंबईचे, त्यांचा बडा अंमलदार आला आहे आपल्या गांवांत !"

" डिटेक्टिव्ह ऑफिसर ?—"

" हां–हुजूर." असें ह्मणून, शालागृहांत नुकतीच जी हकीगत घडली, तिचें अगदीं विस्तृत, पण कंटाळ-वाणें वर्णन निळूनें श्रीमंतांपाशीं केलें आणि शेवटीं हात जोडून तो ह्मणाला " ही बातमी मीं आपणाला सांगितली, हें कोणाच्याहि कानांवर जातां कामा नये, हुजूर ! नाहीं तर या गरीबावर उगीच कांहीं तरी घोरपड यायची सरकार ! हुजूरांचें जन्मापासून मीठ खात आलों, ह्मणून हातांत मान घेऊन हुजूरांनां ताबड-तोब ही बातमी द्यायला धांवत आलों. धाकट्या हुजु-रांचे प्राण वांचवायची काय तजवीज करायची ती ताबडतोब करावी सरकारांनीं. मी जातों आतां." असें ह्मणून नम्रपणानें रामराम करून निळू तेथून निघून गेला.

निळूनें सांगितलेल्या बातमीमुळें श्रीमंतांच्या सायं-संध्येवर जेथल्या तेथेंच पाणी पडलें ! पोस्टऑफिसांत वसंतराव आणि पोलिस इन्स्पेक्टर यांची झालेली भेट, आज सकाळींच चिंचगांवच्या पोलिस–स्टेशनवरून वसंतरावांकडे शिपाई येणें, या गोष्टी चिंतामणरावांच्या कानांवर केव्हांच आल्या होत्या. बापूरावाचा मुंबईतील पत्ता समजावून घेण्यासाठीं वसंतरावांनीं किती आतु-रता प्रकट केली होती, तेंहि श्रीमंतांच्या आतां लक्ष्यांत आलें. या सर्व गोष्टींवरून, निळूनें सांगितलेली बातमी खोटी असावी, असें त्यांनां बिलकूल वाटेना ! पुनः पुनः मनाशीं विचार करतां ती बातमी अगदीं खरी असावी, असेंच श्रीमंतांनां वाटूं लागलें, आणि ते मोठ्या चिंतेंत पडले.

चिंतामणराव तसेच आंत गेले,आणि त्यांनीं आपली मातुःश्री, वडील बहीण आणि बायको यांनां एकीकडे नेऊन, निळूकडून ऐकलेली हकीगत आपल्या अनु-मानांसह आणि तर्कांसह त्यांच्या कानांवर घातली.

बराच वेळपर्यंत त्या सर्व मंडळींत गुप्तपणें खल चालला होता.

सुमारें तासाभरानें चिंतामणराव बाहेर येऊन वर आपल्या खोलींत गेले, व त्यांनीं आपल्या विश्वासू कार-भाऱ्यांनां बोलावणें धाडलें.

श्रीमंत व कारभारीसाहेब यांचेंहि बराच वेळपर्यंत खलबत चाललें होतें. सुमारें नऊ वाजतां कारभारी खोलीबाहेर आले, व वाड्याबाहेर पडले.

अर्ध्या पाऊण तासानें ते परत येऊन श्रीमंतांच्या खोलींत त्यांनां भेटले.

" काय झालें, विसोपंत ?"

विसोपंत विषण्ण स्वरानें ह्मणाले " तो तर कांहीं पांच हजारांच्या खालीं बिलकूल कबूल होत नाहीं—"

" पांच हजार ! अरे बापरे !" श्रीमंत उद्गारले.

" तो ह्मणतो, कीं, खून झाल्याचा अगदीं विश्वस-नीय पुरावा आपल्या हातीं आहे. फक्त ही बाई कोण, एवढेंच काय तें आपणाला कळायचें राहिलें होतें. ती बातमीहि चांदगांवला आल्यानंतर तीळ न् तीळ आप-णाला लागली !"

" मग त्याचें ह्मणणें तरी काय गुलामाचें ?"

" तो ह्मणाला, या क्षणीं आपणाला अडीच हजार रुपये रोख पाहिजेत; अन् पुरावा कांहीं मिळत नाहीं असा रिपोर्ट वर दाखल केल्यानंतर बाकीचे अडीच हजार रुपये आपण घेऊं."

चिंतामणरावांनीं पुनः आंत जाऊन घरच्या काउ-न्सिलमध्यें या प्रश्नाची वाटाघाट केली,व थोड्या वेळानें, दहादहा रुपयांच्या नोटा आणि गिनी यांनीं अडीच हजारांची रकम पुरी करून ती एका मोटलींत बांधून, ती विसोपंतांच्या स्वाधीन करून ह्मटलें "जा विसोपंत ! घाला नेऊन हे त्या चांडाळाच्या बोडक्यावर !"

अकरा साडेअकरांचा सुमार. चहूंकडे शांत. अशा वेळीं त्या 'बोवाळ्या'नें [illegible] गुमपणें अडीच हजार रुपये रोख मोजून घेतले.

“ठीक आहे तुम्ही जा आतां.” वसंतराव शांतपणानें व गंभीरपणें ह्मणाले. “तुम्ही आतां कसलीहि काळजी नका करूं. सारें प्रकरण पहा मी कसें जिथल्या तिथें अगदीं शिताफीनें जिरवून टाकतों तें.”

विसोपंत रिकाम्या हातीं, उसासे टाकीत निघून गेले.

वसंतराव आपणाशींच हंसत बिछान्यावर पडले, व मनांत ह्मणाले “यालाच ह्मणतात आळशावर गंगा!”

प्रकरण नववें.

मित्र-लाभ.

वसंतराव बिछान्यावर पडले खरे; परंतु कांहीं केल्या त्यांना झोंप [illegible] येईना. एकसारखे या कुशीवरून [illegible] ते तळमळत होते. त्यांच्या मनांत या वेळीं पुढीलप्रमाणें विचार-कल्लोळ सुरू होता:—

“या प्रकरणांत मी इतका दूरवर आलों आहें, कीं, मला आतां [illegible] येणेंच शक्य नाहीं. हा तोतया [illegible] कोण आहे, तें हरप्रयत्नानें शोधून काढणें मला भागच आहे. मला असें वाटूं लागलें होतें, कीं, [illegible] आलेला हा लफंगा बापूराव नसावा; परंतु [illegible] हा [illegible] अगदीं बिनचूक आहे काय? बापूरावाचा पुष्कळ दिवस कोठें पत्ताच नाहीं; इतक्यांत मुंबईहून [illegible] पत्ता असलेलें त्याचें एक पत्र त्याच्या [illegible] येतें; [illegible] एका गोष्टीवरून, हा बापूराव [illegible] गेला नाहीं, असा बिनचूक सिद्धान्त कसा निघतो? पहा आतां—मी हा चांदगांवला आलों आहें ना? मुंबई ताडदेव, अमूक अमूकाचा बंगला, असा पत्ता देऊन मीं कोणा एकाला पत्र लिहिलें [illegible] एका थोरल्या पाकिटांत भरून तें [illegible] मुंबईच्या मित्राला—सुंदररावाला—पाठविलें अन् त्याला [illegible]बरोबरच एक पत्र लिहिलें, कीं, 'या [illegible] अमूक अमूक नांव पत्ता असलेलें पाकीट [illegible] एखाद्या पोस्टाच्या खांबांत ताबड[illegible].' त्याप्रमाणें सुंदररावानें तें पत्र टाकतांच तें [illegible] माणसाला मिळतें. त्यावरून त्यानें जर सिद्धान्त काढला, कीं, मी मुंबईला ताडदेवावर त्या बंगल्यांत रहातों, तर तो खरा आहे का? बिलकूल नाहीं. ह्मणून आतां थेट मुंबईला जाऊन मला बापूरावाची त्या [illegible] पत्यावर चौकशी केलीच पाहिजे. बरें समजा, तेथें जाऊन मीं बाप्याची चौकशी केली, अन् [illegible] माझ्यापुढें येऊन उभा राहिला, मग आपली काय छान गम्मत होईल! ही कावेरी ऊर्फ ताई, इथून कुठें कसकशी कुठून कुठून गेली, तिनें काय काय कुठकुठें केलें, याचा पक्का शोध लावला, कीं, या तोतया नानासाहेबाची सारी खरीखुरी हकीगत आपणाला चट् कळून येते आहे! काय वाटेल तो प्रयत्न करून, ही कावेरीची सारी माहिती मिळवून मगच आपणाला इथून गेलें पाहिजे. या ठमाबाईची एकदां कडक उलटतपासणी करायला मिळाली पाहिजे. परंतु ती मला खरी हकीगत सांगेलच, याला प्रमाण काय? कावेरीचा खून झाला असून, त्या खुनाचा तळास करण्याकरितां—मी डिटेक्टिव्ह ऑफिसर चांदगांवला आलों आहें, ही बातमी उद्यां सकाळच्या आंत साऱ्या गांवभर होईल, यांत तिळप्राय संशय नाहीं. मग ठमाबाईकडून कोणतीहि खरी गोष्ट बाहेर काढणें अगदीं अशक्य होईल. आतां, मी जर खरोखरीच एखादा पोलिस अंमलदार असतों—माझ्याबरोबर चार दोन खरेखुरे पोलिस शिपाई असते, बरोबर हातकड्या, खोडे इत्यादि सरंजाम असता, त्या सटवीला मला चौकीमध्यें कोंडून ठेवतां आलें असतें, तर तिला भय दाखवून, कांहीं खाऊबिऊ देऊन, कशी तरी तिच्याकडून मला खरी हकीगत काढून घेतां आली असती, यांत शंका नाहीं. परंतु या सर्व 'जरां' पैकीं मजपाशीं एकहि 'जर' नाहीं! माझ्यापाशीं ढाल नाहीं, तरवार नाहीं अन् खुशाल जनकोजी शिंदा बनून मी ओरडतों आहें 'गिळचा ह्मणजे बिशाद काय!' काय उपयोग त्याचा?”

विचार करतांकरतां वसंतराव बिछान्यावरून उठले व त्यांनीं काडी पेटवून टेबलावरचा दिवा लावला. नंतर ते त्या खोलींत इकडून तिकडे तिकडून इकडे येरझारा घालूं लागले. फिरतांफिरतां, टेबलावर पडलेल्या इन्स्पेक्टरसाहेबांच्या दुसऱ्या पत्राकडे वसंतरावांची एकाएकीं नजर गेली.

तें पत्र हातीं घेऊन वसंतरावांनीं तें अथपासून इतीपर्यंत पुनः एकवार लक्ष्यपूर्वक वाचलें. नंतर ते आपल्या मनाशीं ह्मणाले " हा एक पोलिस अधिकारी आहे. याचा मला माझ्या कारस्थानांत कांहीं उपयोग करून घेतां येईल का ? या मूर्ख श्रीमंताच्या अजागळ भीतीमुळें माझ्या ट्रंकेंत पैसे तर यथास्थित आहेत तूर्त ! यापैकीं थोडेबहुत पैसे या इन्स्पेक्टरला चारून, त्याच्याकडून माझें हें काम करून घेणें फारसें कठीण नसावें. वास्तविक 'द्रव्येण सर्वे वशाः' ह्मणतात–पण हा ह्मणे सोंवळा अंमलदार आहे–पानसुपारीला ह्मणे शिवत नाहीं.काय करावें मोठी पंचाईत येऊन पडली बुवा !"

आणखी कांहीं वेळ येरझारा घालून वसंतराव पुनः बिछान्यावर जाऊन पडले.

वसंतरावांनां झोंप लागणें शक्यच नव्हतें. ते पुनः विचार करूं लागले–" हा पान खात नाहीं–पण चांगला शिकलासवरलेला आहे–पण नाटकेंकादंबऱ्या वाचतो. मी पुस्तक छापवतों आहें, असें ऐकतांच त्यानें पहिल्यानें मला विचारलें 'कसलें पुस्तक आहे–कादंबरी का नाटक ?' ठीक आहे. या गोष्टीचा फायदा घेऊन आपणाला एक काम करतां नाहीं का येणार ? हा माणूस तरुण, नव्या जमान्यांतला अन् कॉलेजांत पढलेला, बी.ए.फेल आहे. एखादी सुंदरशी 'प्रेम–कहाणी' तयार करून, ती जर मीं या पढतमूर्खाला प्रणयभंगाचे उसासे सोडून सांगितली–मीच जणूं त्या प्रेम–कहाणीचा नायक अन् रहस्याचा शोध लावतां आला तरच आह्मां प्रणयिजनांचें मीलन होतें आहे–तर त्याचा या लंबकर्णाच्या मनावर कांहींच का परिणाम होणार नाहीं ? कां नाहीं होणार ? माझ्या प्रेमाच्या करुण कहाणीनें या शिकलेल्या पढतमूर्खाचें हृदय द्रवल्याशिवाय कधींहि रहाणार नाहीं. अन् मग तो आपले शिपाईप्यादे हातकड्या–बेड्या अन् चौक्या या सरंजामासकट माझ्या साहाय्याला आल्याखेरीज रहाणार नाहीं. वाः ! युक्ति तर ठीक सुचली. परंतु माझी ही प्रेमकहाणी तयार कशी करावी ? ही जितकी सुंदर होईल, तितका मला यश यायचा संभव अधिक. पण अधिक पंचाईत हवीच कशाला मुळीं ? ही चालू गोष्टच घेऊं या हातांत. फक्त थोडीशी उलटापालट, कुठें थोडासा फेरफार, कुठें थोडा मजकूर बाद देणें, तर कुठें थोडा वाढविणें, अन् मधुनमधून अजिबात नवाच मजकूर घुसडून देणें, कीं, झाली आपणाला पाहिजे तशी हुबेहुब प्रेमाची कादंबरी ! मी एवढा कादंबरीकार असल्यावर हवा आहे कशाला सुंदररावाचा तो पोच्या खंडेराव नवलकर ? " असें मनाशीं ह्मणून वसंतराव पडल्यापडल्याच आपल्याशीं किंचित् मोठ्यानें हंसले.

त्या रात्रीं वसन्तरावांनां झोंप लागली, त्या वेळीं तीन वाजून गेले होते.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं साडेसातांच्या सुमाराला वसन्तराव जागे झाले. प्रातर्विधि आटोपून, स्टोव्हवर चहा तयार करून, बिस्किटांबरोबर तो चापून, क्षुरकार्य वगैरे आटोपून त्यांनां ' बिऱ्हाडा ' बाहेर पडावयाला जवळजवळ नऊ वाजले. ते पायांनींच चिंचगांवला निघाले.

चिंचगांव चांदगांवापासून चांगला अडीच तीन मैल होता. दहा वाजण्याच्या थोडें अगोदर वसन्तराव चिंचगांवच्या पोलीसठाण्यावर जाऊन पोहोंचले. तेथें चौकशी करतां त्यांनां असें आढळून आलें, कीं, इन्स्पेक्टरसाहेब अजून ' ऑफिसां'त हजर झालेच नव्हते. नोकराबरोबर आपण आल्याचा निरोप साहेबांकडे पाठवून वसन्तराव त्यांच्या ' दिवाणखान्यां'त एका खुर्चीवर बसले.

सुमारें दहाएक मिनिटांत इन्स्पेक्टरसाहेब हंसतहंसत बाहेर आले.

या वेळीं ते एक लांब पातळ धोतर नेसले असून त्याची पुढची निरीहि काढलेली नव्हती. अंगांत एक उंची पातळ गंजीफ्राक असून पायांत जपानी गवती सपाता होत्या. त्यांच्या हातांत एका मराठी मासिकाचा ताजा अंक होता.

" वसन्तराव ओहो ! नमस्कार."

" नमस्कार. आपल्या हुकूमाप्रमाणें येऊन हजर झालों आहें."

" एक प्याला चहा घ्या अगोदर–मग बोलूं कामाबद्दल."

वसंतराव हंसून ह्मणाले " थँक्स–चहा नको. मी निघतांना चहा घेऊनच आलों आहें."

" पायींच आलांत ना ?"

" हो—"

" झालें तर मग." इन्स्पेक्टरसाहेब हंसून ह्मणाले. " तो सकाळचा चहा कुठच्या कुठेंच गेला ! इतक्या लांब तुम्ही पायींच चालून आलां; तुम्हाला भारी श्रम झाले असतील. एक प्यालाभर चहा घ्या म्हणजे

[illegible] कामासंबंधानें [illegible]हि चांगला [illegible]

वसंतराव हंसून म्हणाले " आपण पान खात नाहीं, पण माझें थोडेंच आहे ! मी चहाहि पितों–पानहि खातों अन् तें दिवसांतून पाहिजे तितके वेळ !"

इन्स्पेक्टरसाहेबांनीं नोकराला घरांतून एक प्याला-भर चहा [illegible] मागितलें.

इकडच्या तिकडच्या दोनचार गोष्टी झाल्यावर इन्स्पेक्टरसाहेब म्हणाले " तुम्ही जरा लवकर आलां, वसंतराव."

" आपण तर मला नक्की दहा वाजतां यायला लिहिलें होतें. हे दहा–दहा तर झाले."

" मला वाटलें होतें, कीं, मी दहा वाजेपर्यंत यायला तुम्हाला लिहिलें म्हणजे तुम्ही अकरा साडेअकरा वाजेपर्यंत तरी याल. अहो, बोलूनचालून आपण इंडियन ! इतक्या वेळीं नेमकें येऊन आपल्या हिंदीत्वाला काळिमा लावायचा कीं काय ! " असें म्हणून नारायणराव हो हो करून हंसूं लागले. त्यांच्याबरोबर वसंतरावानांहि थोडें हंसावें लागलें.

" पण तुम्ही अगदीं साहेबांप्रमाणें वेळेवर आलांत, [illegible] तरी काय करावें ! तुमच्या ' महाराष्ट्र–[illegible]'चे ग्राहक आहेत हिंदु. ते इतक्या लवकर वाचायला नाहीं बसले आहेत !"

किंचित् हंसून वसंतराव म्हणाले " मी जो हा ' [illegible]–माले'च्या जाहिराती घेऊन बाहेर पडलों आहें, तो खरोखर त्या पुस्तकासाठीं नाहीं. तें आपलें एक वरकरणी निमित्त आहे, इतकेंच. "

नारायणराव वसंतरावांच्या चेहऱ्याकडे कांहीं वेळ [illegible] राहिले. नंतर ते किंचित् हंसून म्हणाले " तें मला ठाऊक आहे, वसंतरावजी ! "

नारायणरावांना आपल्या उत्तरानें अत्यंत आश्चर्य वाटेल, अशी वसंतरावांची कल्पना होती. त्यांच्याकडून असें कांहीं उत्तर येईल, हें त्यांच्या स्वप्नींहि नव्हतें ! म्हणून त्यांच्या या उत्तरानें वसंतरावांना आश्चर्य आणि भीतीहि वाटूं लागली. घाईघाईनें त्यांनीं विचारलें " काय ठाऊक आहे ! आपणाला तें कळलें तरी कसें ?"

इन्स्पेक्टरसाहेब म्हणाले " त्या दिवशीं पोस्ट-ऑफिसांत तुमची भेट झाली अन् आपल्यांत थोडें-बहुत बोलणें झालें, त्यावरून माझ्या मनांत तुमच्या-बद्दल थोडाबहुत संशय उपस्थित झाल्यावांचून राहिला नाहीं, हें अगोदरच तुह्माला सांगून टाकणें मला इष्ट वाटतें. ह्मणून त्याच दिवशीं तुमच्या जाहिरातीची एक प्रत मीं मुंबईला पोलीस–कमिशनरकडे पाठवून देऊन या पुस्तकाबद्दल चौकशी करायलाहि त्यांनां मीं लिहिलें. काल रात्रीं त्यांचा मला टेलिग्राम आला, कीं, गिरगांव पोस्टाला अशा एकाहि पब्लिशिंग कंपनीचें नांव ठाऊक नाहीं, किंवा मुंबईतील कोणत्याहि छाप-खान्यांत या नांवाचें किंवा अशा प्रकारचें एकादें पुस्तक तूर्त कुणीं छापायला दिलेलेंहि नाहीं. "

इन्स्पेक्टरसाहेबांचें हें भाषण चालू असतां वसंत-रावांच्या हृदयांत दुरुदुरू होत होतें; परंतु ती भय-भावना चेहऱ्यावर उमटूं न देण्याचा शक्य तितका प्रयत्न करून ते ह्मणाले " आणखी काय लिहिलें आहे साहेबांनीं माझ्याविषयीं ?"

नारायणराव हंसून ह्मणाले " लिहिलें आहे तें आपल्या हिताचेंच आहे–विरुद्ध नाहीं—"

" तरी पण ?"

" तुम्ही मुंबईहून फरारी झालेले इसम नसून तुमचें नांवहि बदमाषांच्या यादींत नाहीं. "

क्षीण स्वरानें वसंतरावांनीं विचारलें " आणखी कांहीं ?"

" आणखी कांहीं असलें तरी तें अजून मला कळलें नाहीं. " इन्स्पेक्टर वसंतरावांकडे पहात हंसून म्हणाले.

हें ऐकून वसंतरावांच्या मनाला बरेंच हायसें वाटूं लागलें. ओंठावरून एकवार जीभ फिरवून, ते किंचित् ओलसर करून वसंतराव म्हणाले " नारायणराव, आपणाला माझ्याविषयीं जर असा जबरदस्त संशय होता, तर माझ्या पुस्तकाला ग्राहक जमवून देण्याविषयीं आपण इतके प्रयत्न कसे केलेत ? त्याप्रमाणें मला चांदगांवाहून मुद्दाम बोलावून तरी कां आणलेंत ?"

इन्स्पेक्टरसाहेब गंभीरतेनें म्हणाले " ज्या वेळीं मीं तुम्हांला बोलावणें पाठविलें, त्या वेळेपर्यंत कमिश-नरसाहेबांकडून मला तार आलेली नव्हती. पण लवकरच येण्याचा संभव मात्र अतिशय होता. म्हणून, तसाच जर कांहीं टेलिग्राम मुंबईहून आला असता, तर तुम्हाला गिरफदार करण्यासाठीं कुठें तुम्हाला आणखी धुंडीत बसूं, असा हेतु मनांत धरूनच मीं आपणाला बोलावणें धाडलें. तुमच्या पुस्तकाचे ग्राहक-ब्रिहक, तुमच्याच भाषेंत बोलायचें म्हणजे–एक वर-करणी निमित्त होतें, इतकेंच. " असें म्हणून नारा-यणराव हो हो करून मोठमोठ्यानें हंसूं लागले.

परंतु वसंतराव या वेळीं मुळींच हंसले नाहींत. आपण समजत होतों तसा हा सुशिक्षित पढतमूर्ख नाहीं, पक्का आहे, असें ते समजले. चेहरा खिन्न करून ते खालीं पहात स्तब्ध बसले.

इन्स्पेक्टरसाहेब मधुनमधून वसंतरावांकडे पाहूं लागले; परंतु ते एकसारखे खालीं दृष्टि लावूनच बसले होते.

शेवटीं इन्स्पेक्टरसाहेब ह्मणाले " वसंतराव, तुह्मी माझ्यावर रागावलांत वाटतें ?"

" नाहीं बुवा ! रागवूं कशाला ?" वसंतराव खिन्नपणें म्हणाले.

" इकडे पहा वसंतराव ! आम्ही बोलून चालून पोलिसचे लोक. संशय घेणें हाच आमचा व्यवसाय असें म्हटलें तरी चालेल. सरकारनें दरमहा देऊन मला जें कर्तव्य करण्यासाठीं नेमलें आहे, तें कर्तव्य मीं बजावलें, इतकेंच. तुह्माला त्यामुळें वाईट वाटलें होय, वसंतराव ?"

वसंतराव वर मान न करतांच ह्मणाले " आपण ह्मणतां तें कांहीं खोटें नाहीं—"

वसंतरावांनां खरोखरच अतिशय वाईट वाटलें आहे, शक्य तर त्यांचें समाधान करणें हें आपलें कर्तव्य आहे, असा विचार करून नारायणराव ह्मणाले " वसंतराव, आपण जर रागावलां नाहीं, तर आपण असे खिन्न होऊन कां बसलां आहां ?"

वसंतरावांनीं आतां वर पाहिलें. नंतर त्यांनीं एक उसासा टाकला, व ते म्हणाले "मी चोर बदमाष असेन, असा आपणाला संशय आला, यामुळें मला वाईट वाटलें असें नाहीं—"

" तर मग ?"

" मी मनांत कांहीं आशा धरून आपणाकडे आलों होतों. ती आशा आपणाकडून पूर्ण होणें शक्य नाहीं, असें वाटूं लागल्यामुळें मला वाईट वाटलें, इतकेंच."

इन्स्पेक्टरसाहेबांनां आश्चर्य वाटलें. ते म्हणाले " कांहीं आशा धरून तुम्ही मजकडे आलां होतां ? काय तुमचा हेतु होता ? मला सांगा तरी—"

" नाहीं–आतां सांगण्यांत विशेष अर्थ नाहीं."

" विशेष नसला, तरी थोडा तरी आहे असें वाटतेंना तुम्हाला ? सांगा–सांगा."

"एका विशिष्ट गोष्टीसंबंधानें माहिती मिळविण्याच्या हेतूनेंच मी या भागाला आलों. या गोष्टीची माहिती मिळण्यावरच माझ्या जीविताचें सारें सुखदुःख अवलंबून आहे. ती माहिती मला मिळाली नाहीं, तर साऱ्या जन्मांत सुखाचें मला दर्शनहि व्हायचें नाहीं-"

इन्स्पेक्टरसाहेब त्यांच्या तोंडाकडे टकमकां पाहूं लागले.

वसंतराव पुढें म्हणाले " आपण पोलिस अंमलदार आहांत. आपल्या हातीं विलक्षण सत्ता आहे. आपण जर मनांत आणाल, तर चौकशी करून या बाबतींत आपणाला मला साहाय्य करतां येईल–आपणाला ती माहिती मला सहज मिळवून देतां येईल."

इन्स्पेक्टरसाहेब पूर्वीप्रमाणेंच कोमल स्वरानें म्हणाले " काय म्हणतां ? चौकशी करून आपणाला मला माहिती मिळवून देतां येईल ?"

" अगदीं सहज—"

" तुम्ही काय म्हणतां तें माझ्या ध्यानांत नाहीं येत. ठीक आहे–वसंतराव–तुमचें नांव वसंतराव असेल तर– आपल्या आशेचा भंग होण्याचें कारण काय, तें मला मन खुलें करून सांगा. म्हणजे तुम्हाला साहाय्य करतां येणें मला शक्य आहे कीं नाहीं तें मला सांगतां येईल."

विषण्ण स्वरानें वसंतराव म्हणाले " मीं जें आपणाला माझें नांव सांगितलें, तें माझें खरें नांव नसावें, असा अजूनहि जर आपणाला संशय आहे, तर आपलें मला मनःपूर्वक साहाय्य होईल, अशी आशा मीं कां धरावी ?"

इतक्यांत नोकरानें आंतून चहा आणला. वसंतराव प्याल्यांत चमचा फिरवीतफिरवीत म्हणाले " नारायणराव, या बाजूला माझी ओळख ना देख ! माझें नांव, मीं सांगितल्याप्रमाणें वसंतराव तांबे हेंच आहे, असें सिद्ध करायला, आपणाला पटेल असा साक्षीदार मी कुठून आणूं ?"

इन्स्पेक्टरसाहेब कांहीं वेळपर्यंत आपणाशींच विचार करीत स्तब्ध बसले होते. नंतर ते ह्मणाले " ठीक आहे वसंतराव ! मला जर तुह्माला कांहीं साहाय्य करतां येणें शक्य असेल—"

वसंतराव मध्येंच ह्मणाले " जरूर शक्य आहे—"

" शक्य असलें, तरी जर मला त्यासाठीं धर्ममार्ग सोडावा लागत नसेल, कांहीं असत्याचरण करावें लागत नसेल, तर तें साहाय्य मी तुह्माला जरूर करीन. तुमचें नांव वसंतरावच आहे किंवा नाहीं, हें खात्रीपूर्वक समजून घ्यायची या बाबतींत मला कांहींच

जरूर वाटत नाहीं. सांगा–कोणत्या बाबतींत मी तुह्माला मदत करूं ?"

वसंतराव उल्हासपूर्वक ह्मणाले "नारायणराव, त्याबद्दल आपण मनांत कांहीं देखील संशय आणूं नका. मला साहाय्य करण्यासाठीं आपणाला धर्ममार्गांतून तिळभरहि इकडे तिकडे सरकण्याचें बिलकूल कांहीं कारण नाहीं–कांहीं असत्याचरण आपल्या हातून होईल, ही सुद्धां आपणाला भीति नको–"

"तर मग आपणाला मी वाटेल ती मदत करायला तयार आहें." इन्स्पेक्टरसाहेब दृढ स्वरानें म्हणाले.

"नारायणरावजी, आपल्या या साहाय्यानें आपले उपकार केवळ मजवरच होणार आहेत असें नाहीं, तर महाराष्ट्रांतील एका खानदानीच्या, शुद्ध शीलाच्या कुलावरहि होणार आहेत."

"उपकारांचें राहूं द्या तूर्त." नारायणराव हंसून म्हणाले. "सारी हकीगत मला तुम्ही पूर्णपणें सांगा अगोदर—"

वसंतरावांनीं चहाचा प्याला तोंडाला लावला, व त्याचे तीनचार घोंट घेऊन ते म्हणाले "मी आपणाला सारीच हकीगत सांगतों म्हणजे आपल्याहि पूर्णपणें लक्ष्यांत येईल." असें म्हणून त्यांनीं सारा चहा पिऊन टाकला, व प्याला खालीं ठेवून, खिशांतील रुमालानें तोंड पुसीतपुसीत हकीगत सांगावयाला आरंभ केला.

"एक पुरुष अन् एक स्त्री एका गांवाला जाऊन, एक मोठें कारस्थान रचून एक भयंकर डल्ला मारण्याच्या बेतांत आहेत. त्यांचें तें जंगी कारस्थान हाणून पाडावें असा माझा हेतु आहे. ती स्त्री कोण, हें इथें आल्यानंतर, चौकशी करतां, मला कळून आलें आहे; परंतु तो पुरुष कोण असावा, हें मात्र अजून मला निश्चयात्मक रीतीनें समजत नाहीं. अन् हें कळणें तर मला अत्यंत जरूरीचें आहे."

इन्स्पेक्टरसाहेबांनीं विचारलें "त्यांचें तें कारस्थान कुठें चाललें आहे ?"

वसंतराव किंचित् स्मित करून ह्मणाले "तें मी आतांच नाहीं आपणाला सांगत. आपण त्याबद्दल मला क्षमा करावी. तरी पण इतकें मी आपणाला खात्रीपूर्वक सांगतों, कीं, या ठिकाणापासून तें स्थान अतिशय दूर आहे. या जिल्ह्यांत नाहीं–इतकेंच नव्हे, तर या हिंदुस्थानमध्येंहि नाहीं !"

क्षणभर विचार करून नारायणरावजींनीं विचारलें "ठीक आहे. पण ही बाई कोण ?"

वसंतराव क्षणभर थांबले. नंतर ते ह्मणाले "चांदगांवचे दामोदरपंत सरदेशमुख यांची मुलगी कावेरी ऊर्फ ताई."

"कावेरी !" आश्चर्यानें नारायणराव उद्गारले.

"ही माहिती मीं कशी मिळविली, हेंहि आपणाला सांगतों." असें ह्मणून, पोलक्याचा चिन्हांकित तुकडा आपण कसा कापून आणला, निळू परटाला तो दाखविल्यानंतर, त्यानें त्यावरील खूण आपलीच असून तो पोलका कावेरीचा आहे, असें पर्यायानें कसें कबूल केलें, तें सर्व वसंतरावांनीं इन्स्पेक्टरसाहेबांनां सांगितलें.

ही हकीगत ऐकून हंसतहंसत इन्स्पेक्टरसाहेब ह्मणाले "मला वाटतें, तुह्मी इंग्रजी डिटेक्टिव्ह कादंबऱ्या खूब वाचीत असाल ! तुह्मी तर कॉनन् डॉइलचे शार्लोक होमच दिसतां, मला ! अन् डॉक्टर वॉटसन्ची मदतहि आपणाला नाहीं !" असें ह्मणून नारायणराव मोठमोठ्यानें हंसूं लागले.

वसंतराव हंसून म्हणाले "कुठें शार्लोक होम–कुठें मी ! त्याची प्रतिभा मला असती तर आणखी काय पाहिजे होतें ?"

हातांतील मासिकाच्या अंकाचीं पानें चाळीतचाळीत नारायणराव म्हणाले "तुम्ही आतांच म्हणालांत वसंतराव, कीं, या भानगडींतला पुरुष कोण तें आपणाला निश्चित रीतीनें कळत नाहीं-म्हणून–तुम्हाला कोणाचा संशय तरी येतो आहे का ?"

"होय."

"कोणाचा ?"

"ज्या रात्रीं कावेरी ऊर्फ ताई ऊर्फ सरस्वती–हें तिचें सासरचें नांव–ही बिंबवली गांवांतील आपल्या सासरच्या घरांतून नाहींशी झाली, त्या रात्रीं, आपल्या या चिंचगांवच्या जवळच, चांदगांवच्या ठमाकाकू देशमुखीण नांवाच्या एका विधवाबाईबरोबर, चांदगांवचे इनामदार श्रीमंत चिंतामणराव देसाई यांचा धाकटा भाऊ गंगाधर ऊर्फ बापूराव हा असून, तीं दोघें एकत्र कुठें जात होतीं, असें पहाणारा एक साक्षीदार आहे. हा बापूरावहि त्या रात्रीपासून कुठें नापत्ता झाला आहे. यामुळें, मला असा संशय आहे, कीं, या बापूरावाबरोबर कावेरी घर सोडून पळून गेली असावी अन् हीं दोघें त्या गांवीं जाऊन, भयंकर कारस्थान रचून जंगी डल्ला मारण्याच्या बेतांत आहेत."

इन्स्पेक्टरसाहेब आपल्या नोकराला हांक मारून म्हणाले " अरे भाऊ, जारे, दिनकरपंतांजवळून चार-पांच महिन्यांच्या जुन्या स्टेशन डायऱ्या मागून घेऊन ये पाहूं. "

वसंतरावांनीं विचारलें "आपल्या पोलिस ठाण्याच्या डायरींत यासंबंधानें कांहीं आहे वाटतें?"

नारायणरावांनीं वसंतरावांनां या प्रश्नाचें कांहींच उत्तर दिलें नाहीं. क्षणभर स्तब्ध राहून ते म्हणाले " काय हो वसंतराव, तुम्ही या दोघांचें हें कारस्थान उलथूं पहात आहां–हा सारा शोध इतका कसून तुम्हीं चालविला आहे. हें सर्व आपण निव्वळ धर्मबुद्धीनेंच चालवलें आहे काय? कोणी संकटांत सांपडलें आहे, कोणाचें घराणें बुडतें आहे, त्यावर उपकार करावा यांच हेतूनें तुमची ही सारी खटपट चालली आहे काय?"

वसंतराव म्हणाले " नाहीं, मी हें अत्यंत स्वार्थ-बुद्धीनेंच करीत आहें, हें मला कबूल केलेंच पाहिजे."

" काय स्वार्थ आहे यांत तुमचा ?"

यानंतर वसंतरावांनीं आदल्या दिवशीं मोठ्या खट-पटीनें रचलेली कादंबरी नारायणरावांनां सांगावयाला आरंभ केला. त्या कादंबरीची संक्षिप्त रूपरेखा आह्मी येथें देत आहों:—

एका श्रीमंत इनामदाराला एकच मुलगा होता. आईबापांसह एकदां तो एका क्षेत्रामध्यें यात्रेला गेला असतां तो हरवला, व तेव्हांपासून कांहीं केल्या त्याचा कोठेंहि पत्ता लागला नाहीं. ही गोष्ट पंचवीस वर्षांपूर्वी घडली. इनामदारसाहेबांची बायको यानंतर कांहीं वर्षांनीं मेली, आणि वय बरेंच झालें असतांहि त्यांनीं दुसरें लग्न केलें. या दुसऱ्या बायकोपासून त्यांनां एक मुलगी झाली. वसंतरावांचा बाप या इनामदारांचा कार-भारी होता. यामुळें, लहानपणापासूनच या मुलीशीं वसंतरावांचा गाढ परिचय असून त्या दोघांचें पर-स्परांवर अतिशय प्रेम जडलें होतें. एक शिक्षकीण ठेवून इनामदारसाहेबांनीं या मुलीला इंग्रजी शिक्षण द्यावयाला सुरुवात केली. वसंतराव तिला मराठी शिक-वीत. दोन वर्षांपूर्वी इनामदारसाहेब वारले. मरण्या-पूर्वी थोडे दिवस त्यांनीं मृत्युपत्र करून ठेवलें असून त्यांत असें लिहिलें आहे, कीं, आपल्या मुलीच्या वयाला सोळा वर्षे पुरीं झालीं ह्मणजे वसंतरावांशीं तिचा विवाह व्हावा, आणि दोघांनांहि आपली संपत्ति समसमान मिळावी. तोंपर्यंत कारभाऱ्यांनीं ट्रस्टी ह्मणून मुलीचें पित्याप्रमाणें संगोपन करावें. या मुलीला सध्यां पंध-रावें वर्ष सुरू असून लवकरच सोळावें लागणार होतें. आणखी एक वर्ष लोटलें, कीं, त्या दोघांच्या हृदयांतील आज कित्येक वर्षे अंकुरित झालेली प्रेममीलनाची आशा सफल होणार आहे! इतक्यांत त्यांच्या या प्रेममीलनांत एक भयंकर विघ्न उपस्थित झालें! दोन महिने झाले-एक माणूस त्या ठिकाणीं येऊन सांगूं लागला, कीं, 'पंचवीस वर्षांपूर्वी त्या क्षेत्रामध्यें हरवलेला इनामदारसाहेबांचा मुलगा तो मीच!' गांवांतील दोघां-चौघां शिष्टांनां आणि इनामतीच्या कांहीं असंतुष्ट नोकरांनां वश करून घेऊन, सबंध इनामतच्या इनामत घशांत टाकावी, असा त्या लफंग्याचा विचार आहे. तो तेथें येण्यापूर्वी कांहीं दिवस, एक अनोळखी बाई, आपण अगदीं अनाथ निराश्रय आहों असें सांगून वाड्यांत आली, व तेथल्या माणसांच्या फाजील दयाळू-पणानें तिचा वाड्यांत अनायासें प्रवेशहि झाला. आतां असा शोध लागत चालला आहे, कीं, हीच बाई, त्या पुरुषाला तेथल्या बातम्या लिहून पत्रानें कळवीत असे. ही बाई म्हणजे दामोदरपंत सरदेशमुखांची मुलगी कावेरी, हें निळू परिटाच्या साक्षीवरून चांगलें सिद्ध झालें आहे. परंतु हा बोवा कोण असावा, हें नक्की कळत नाहीं. हें एकदां निश्चित झालें, म्हणजे वसंत-रावांचा कार्यभाग होणार असून, इनामदारांच्या मुलीशीं त्यांचा विवाह व्हावयाला कोणतीच आडकाठी होणार नव्हती, व इनामतहि त्या दोघांनां मिळणार होती!"

कॉलेजांत शिकलेले, कादंबरीनाटकांचे भोक्ते, मासिक पुस्तकांतील प्रेमाच्या गोष्टी आवडीनें वाचणारे, रोमँटिक इन्स्पेक्टरसाहेब वसंतरावांची ही प्रेमकहाणी अतिशय तल्लीनतेनें ऐकत होते. त्यांच्या मस्तकांत विस्मय, आशंका, भीति इत्यादि विकारांचा तुमुल संग्राम चालला होता!

वसंतरावांची कहाणी संपतांच नारायणराव हंसत-हंसत ह्मणाले "वः वः वसंतरावजी! ही तर एक खरो-खरची सुंदर कादंबरी आहे. संविधानकहि मोठें रसाळ अन् रोमँटिक आहे. खरेंच वसंतराव, तुह्माला लिहा-यला येत असली तर तुम्ही या प्लॉटवर एक कादंबरी लिहा, नाहीं तर मी गांठतों एखादा लेखक!"

मात्रा लागू पडली, अशी वसंतरावांची खात्री होऊन त्यांचा आनंद गगनांत मावेना!

इतक्यांत एका पोलिस शिपायानें येऊन, स्टेशनच्या कांहीं डायऱ्या आणून इन्स्पेक्टरसाहेबांच्या जवळच्या स्टुलावर ठेवल्या.

नारायणराव एकएक डायरी घेऊन तिचीं पानें उलटूं लागले. एके ठिकाणीं बराच वेळ ते लक्ष्यपूर्वक वाचीत होते.

डायरीवरून दृष्टि न काढतां नारायणरावांनीं विचारलें "काय म्हणालांत त्या बाईचें नांव ?"

"ठमाबाई देशमुखीण—"

इन्स्पेक्टरसाहेब मृदु हास्य करून म्हणाले "हें पहा या ठिकाणीं तेंच लिहिलेलें आहे."

वसंतरावांनीं पाहिलें, बिंबवली गांवचा चौकीदार येसबा नाईक यानें रिपोर्ट केला होता–'गेल्या रात्रीं 'रोंद' द्यायला बाहेर पडलों असतां बिंबवली आणि चिंचगांव यांच्या हद्दीच्या जवळ दोन स्त्रिया संशयास्पद रीतीनें चाललेल्या मीं पाहिल्या.' येसबानें जे जे प्रश्न त्यांनां केले, ते व त्यांचीं त्या बाईकडून मिळालेलीं उत्तरें, हींहि स्टेशनच्या डायरींत नोंदलेलीं होतीं !

वसंतराव शेवटीं म्हणाले "तर मग मला आलेला संशय बरोबर आहे, असें दिसतें. बापूरावाबरोबरच ही कावेरी ऊर्फ सरस्वती पळून गेली, हें उघड आहे."

इन्स्पेक्टरसाहेब मान डोलवून म्हणाले "मलाहि तुमच्यासारखेंच खात्रीपूर्वक वाटतें."

यानंतर त्या दोघांत बराच वेळपर्यंत त्या 'प्रेम-कहाणी' संबंधाच्याच गोष्टी चालल्या होत्या.

'माफ कराल तर विचारतों अं–' अशी प्रस्तावना करून नारायणराव मधुनमधून संकोचानें त्या काल्पनिक सुंदर तरुणीसंबंधानें एक एक प्रश्न वसंतरावांनां विचारीत होते आणि कृत्रिम लाजेनें तांबूस होऊन, स्वर यथासाध्य कंपित करून, वसंतरावहि ज़मिनीकडे नजर लावून त्यांच्या प्रश्नांचीं हळुहळू उत्तरें देत होते.

वसंतरावांच्या त्या उत्तरांवरून रोमँटिक इन्स्पेक्टर-साहेबांची पक्की खात्री झाली, कीं, वसंतरावांची ती भावी अर्धांगी रूपानें रती, गुणांनीं लक्ष्मी आणि विद्या-कलादिकांत प्रत्यक्ष सरस्वती आहे. त्या उभयतांचें निर्मळ प्रेम ह्मणजे केवळ 'दिव्य', 'स्वर्गीय !' या मर्त्य जगांत तर त्याची कशाशींहि तुलना करूं पहाणें ह्मणजे अरसिकत्वाची सीमा होय !

इन्स्पेक्टरसाहेबांच्या या मुलाखतीचा परिणाम असा झाला, कीं, 'बेकायदेशीर अशी एकहि गोष्ट न करतां, आपल्या सरहद्दींत, आपणाला जें साहाय्य करतां येईल तें तुह्माला आपण करूं,' असें इन्स्पेक्टरसाहेबांनीं वसंतरावांनां मनःपूर्वक अभिवचन दिलें.

प्रकरण दहावें.

कांहीं पत्रें.

[१]

"चांदगांव, ता.—

प्रियभगिनी चंपाताई हिला अनेक आशीर्वाद विशेष–

तुला मीं मागील पत्र लिहिलें, त्यानंतर मला पुष्कळ गोष्टी कळून आल्या आहेत. येथील पोलिस इन्स्पेक्टर नारायणराव खरे माझे परमस्नेही बनले आहेत. त्यांच्या मदतीनें येथली ठमाबाई देशमुखीण हिला चांगली तंबी देऊन, आम्हीं तिची कसून उलटतपासणी केली. सटवी मारी वस्ताद ! ती सहज कांहीं आमची डाळ शिजूं देईना ! परंतु इन्स्पेक्टरसाहेबांच्या हुकुमावरून शिपायानें तिच्या हातांत घालण्याकरितां जेव्हां हातकडी आपल्या हातीं घेतली, तेव्हां कुठें त्या सटवीनें आम्हांला दाद दिली आणि सर्व गोष्टी उघड करून सांगितल्या. चांदगांवचे इनामदार श्रीमंत चिंतामणराव यांचे धाकटे सावत्र बंधु बापूराव यांनीं ठमाबाईला पैसे चारून बिंबवलीला पाठविली होती. तेथें ती मुद्दाम संध्याकाळ करून गेली, व काळोख पडतांपडतां तिनें कावेरी ऊर्फ सरस्वती हिला मागील दारच्या विहिरीवर एकांतांत गांठलें. ठमाकाकूनें त्या भोळ्या बाईला अगदीं खऱ्याचा आविर्भाव आणून सांगितलें, 'तुझी आई अतिशय आजारी असून अंथरुणाला अगदीं खिळली आहे. परंतु तुझ्या सासरचे हे साळकोजीराव आणि त्यांच्या कडकलक्ष्मी तुला कांहीं झालें तरी माहेरीं पाठविणार नाहींत, हें तुझ्या आईला पक्कें ठाऊक आहे. तेव्हां तिनें मुद्दाम तुला न्यायला गाडी पाठवली असून ती गांवाबाहेर उभी आहे. रात्रीं दहा वाजायच्या सुमाराला मी तुझ्या घरच्या मागील दाराशीं येऊन गुपचूप उभी रहातें. तूं कुणाला न कळतां हळूच बाहेर ये. म्हणजे तुला घेऊन मी गाडींतून चांदगांवला जाईन. तिथें आईची भेट घे अन् रातोरात तुला मी

तशीच सासरीं आणून पोहोंचवीन अन् हें सारें इतक्या गुप्तपणानें करीन, कीं,या कानाची बातमी त्या कानाला लागायची नाहीं. येत असलीस तर सांग–नाहीं तर फिरून कांहीं तुझी आई तुला जिवंत दिसेल अशी अगदीं आशा धरूं नको! भोळी बिचारी कावेरी!' आईची जिवंत भेट घ्यावयाला अत्यंत आतुर झालेली ती निष्कपट मुलगी त्या कवटाळणीच्या भाषणाला अर्थातच कबूल झाली आणि ठरल्याप्रमाणें रात्रीं हळूच घराबाहेर पडून ठमाकाकूबरोबर माहेरीं जावयाला निघाली. गांवापासून कांहीं अंतरावर, एका वडाच्या झाडाखालीं बैलांची धमनी घेऊन बापूराव काळोखांत लपून राहिला होता. कावेरी जवळ येतांच, त्या नीचानें तिला धरली, तिच्या तोंडांत वस्त्राचा बोळा घातला आणि आपल्या धमनींत तिला उचलून ठेवून त्यानें गाडी हांकली.ठमाबाईच्या जबानीवरून त्या गाडीवाल्याचें नांव हैबती भोंसले असें असल्याचें समजलें. इन्स्पेक्टरसाहेबांनीं तत्काल या हैबतीला बोलावून आणून त्याचीहि कडक रीतीनें उलटतपासणी केली. त्यानेंहि ठमाबाईप्रमाणेंच, बापूरावानें कावेरीला धरून तिच्या तोंडांत बोळा कोंबून तिला बलपूर्वक गाडींत घातल्याचें सांगितलें.हैबतीच्या सांगण्यावरून असेंहि कळलें,कीं, कंचनी नांवाच्या एका गांवाजवळच्या हद्दीवरील एका बागेंत जाऊन ही मंडळी उतरली. उद्यां मी इन्स्पेक्टरसाहेबांबरोबर कंचनीला जाणार आहें. तेथें गेल्यावर काय काय नवीन गोष्टी कळून येतात, त्या पाहूं.

कळावें, हे आशीर्वाद.

तुझा दादा,
वसंतराव."

[२]

" चांदगांव, ता०—

अनेक आशीर्वाद विशेष—

परवांच्या दिवशीं याच मुक्कामाहून मीं तुला एक पत्र पाठविलें आहे, तें योग्य वेळीं तुला पोहोंचलें असेलच. त्यांत लिहिल्याप्रमाणें मी कंचनीला गेलों नाहीं. मला बरोबर घेऊन न जातां नारायणराव एकटेच तिकडे गेले होते. ते आजच परत आले. त्यांनीं मला सांगितलें, कीं, चौकशी करतां, कंचनीच्या या बागेंतील बंगल्यांत कावेरीला जवळजवळ महिना सवा महिना बंदिवान् करून ठेवण्यांत आलें होतें, असें कळलें. बापूराव येऊन मधुनमधून तिची भेट घेई, आणि वश होण्यासाठीं निरनिराळ्या प्रकारांनीं तो तिच्या विनवण्या करी. बिचारी कावेरी नेहमीं तेथें रडत बसलेली असे. बापूराव दृष्टीला पडतांच ती ओरडून ह्मणे–'एक पाऊल जवळ आलास, तर मी जीभ हांसडून तुझ्या पायांशीं प्राण देईन!' महिन्या सवा महिन्यानें, बापूरावानें कंचनीहून आपला तळ उठविला, व तेथल्या एका नोकराला बरोबर घेऊन कावेरीसह तो गाडीच्या रस्त्यानेंच दक्षिण महाराष्ट्रांत 'गांवकुंड' नांवाच्या गांवीं त्याचा एक स्नेही होता, त्याच्याकडे गेला, एवढें त्या नोकराच्या सांगण्यावरून कळतें.

येथील इन्स्पेक्टरसाहेब नारायणराव खरे, यांची जर मला मनःपूर्वक मदत मिळाली नसती तर मला यांपैकीं एकहि गोष्ट कळून येण्याचा फारसा संभव नव्हता. चंपाताई,आपलें भाग्य बरेंच जोरावर आहे,असें दिसतें. 'गांवकुंड' गांव ज्या पोलिस डिव्हिजनमध्यें आहे, त्या डिव्हिजनचे इन्स्पेक्टर आमच्या नारायणरावांच्या बरोबर कॉलेजांत शिकत असून त्या दोघांचा फार स्नेहहि आहे. या इन्स्पेक्टरांनां पत्र देऊन नारायणराव मला तिकडे पाठवीत आहेत. गांवकुंडला जाऊन, तेथले गाडीवाले वगैरेंची तपासणी जर इन्स्पेक्टरांच्या मदतीनें मला करतां आली, तर हीं दोघें तेथून कोठें गेलीं, हें आपणांला कळून येणार आहे. पाहूं, तिकडे नशीब आपणांला कसा काय हात देतें तें!

आतांपर्यंत जी माहिती मला मिळाली, तीवरून माझें अनुमान असें झालें आहे, कीं, बहुतकरून ही कावेरी ऊर्फ ताई ऊर्फ सरस्वती बापूरावाच्या कैचींतून कशीतरी निसटली असावी आणि या तुझ्या तोतया नानासाहेबाच्या बगलेंत शिरली असावी. त्याच्याशीं संगनमत करून, ती यमुना बनून, बाणथडीच्या इनामदारांच्या वाड्यांत घुसली! इतक्यांत महत्त्वाची अशी कांहीं बातमी तुला कळली असेल, तर मला ती पत्रद्वारा 'देवगांव डिव्हिजन'च्या पोलिस इन्स्पेक्टरसाहेबांच्या पत्त्यावर कळव.

बाकी पुढील पत्रांत. कळावें, हे आशीर्वाद.

तुझा दादा,
वसंत."

[३]

बाणथडी, ता०—

तीर्थस्वरूप वसंतराव दादासाहेब, यांस वडिलांच्या सेवेशीं—

कृतानेक नमस्कार विनंति विशेष—

दादासाहेब,हा वरील मायना तर बरोबर आहे ना? का त्यांत कांहीं चुकलें आहे? चुकलें असलें, तर ताबड-तोब कळवा, ह्मणजे पुढील पत्रांत ती चूक मी अवश्य दुरुस्त करीन. कोठूनहि वडील बंधूसंबंधाच्या आदराच्या प्रदर्शनांत मजकडून तिळमात्रहि कांहीं चूक होऊं नये, एवढीच माझी इच्छा आहे.

आपलीं, चांदगांव मुक्कामाहून पाठविलेलीं दोन्ही पत्रें पोहोंचलीं. एवढ्या अवकाशांत, एक अत्यंत महत्त्वाची बातमी मला कळली आहे आणि ती आपणाला कळविण्यासाठींच हें पत्र मी आपणाला लिहीत आहें.

हे इकडे येऊन चैन मारणारे श्रीमंत नानासाहेब तोतये, पूर्वी 'तीनतारा' नांवाच्या मठाचे मुख्य महंत होते. एक दिवस जेवणाच्या वेळीं श्रीमंत नानासाहेब आपल्या काकासाहेब दिवाणजींनां ही हकीगत सांगत होते, त्या वेळीं मीं आड उभी राहून हें ऐकलें. परंतु हा 'तीनतारा' मठ कोठेंसा आहे, ही गोष्ट त्यांच्या सांगण्यांत आली नाहीं.

इकडील सर्व मंडळी खुशाल असून सर्व कांहीं ठीक-ठाक आहे. हे आलेले नानासाहेब कोणीहि असोत, खरे असोत अगर तोतये असोत—वहिनीसाहेबांच्यावर त्यांचें अगदीं अन्तःकरणपूर्वक प्रेम जडलें आहे, यांत मात्र तिळप्राय संशय नाहीं.

हें खरें कशावरून, असें आपण अर्थातच विचाराल. आपल्या या प्रश्नाला माझें हें उत्तर आहे:—मध्यें परवां एक दिवस वहिनीसाहेबांनां सडकून ताप आला असून त्यांची स्थिति कठीण आहे,असें आह्मां सर्वांनाच वाटत होतें. त्या दिवशीं,नानासाहेब वहिनीसाहेबांच्या पलंगापाशीं एक खुर्ची टाकून तीवर बसले होते.वहिनी-साहेब डोळे मिटून अगदीं अचेतन पडल्या होत्या. मी हळूच आंत डोकावून पाहिलें, तों नानासाहेब अगदीं एकदृष्टीनें वहिनीसाहेबांच्या चेहऱ्याकडे पहात असून त्यांच्या डोळ्यांतून झरझरां अश्रुप्रवाह चालला होता! वसन्तराव, किती सुंदर, किती उदात्त देखावा हा! कोणीहि कोणावर अगदीं अंतःकरणपूर्वक, निःस्वार्थ प्रेम करतांना मला दिसलें, कीं, माझ्या मनाला अपूर्व आनंद होतो.

आपलें कुशल वारंवार लिहीत जावें. आपल्या पत्राची अत्यंत आतुरतेनें वाट पहात आहें.

कळावें, सेवेशीं श्रुत होय, ही विज्ञापना.

आपली प्रिय भगिनी,

चंपा."

[४]

"देवगांव, ता०—

अनेक आशीर्वाद विशेष—

तुझें पत्र पोहोंचून बरेच दिवस झाले. तूं मला—आपल्या वडील बंधूला—उद्देशून लिहिलेला मायना बरोबर आहे. असाच शहाणपणा शिकत जा बरें नेहमीं! माझी चंपाताई ती!

तूं लिहितेस, कीं, नानासाहेब तोतये पूर्वी 'तीन-तारा' नांवाच्या मठाचे मुख्य महंत होते. परंतु हा मठ कुठें आहे, त्याचा तर्क मला कांहीं केल्या होत नाहीं. 'तीन–तारा' हें गांवाचें नांव नसावें, असें वाटतें. मीं येथें पोस्टल गाइड चाळून पाहिलें—परंतु त्यांत 'तीन तारा' हें नांव दिलेलें कोठेंच आढळलें नाहीं. यावरून त्या गांवीं पोस्टऑफिस नसावें, असें दिसतें. थोड्याच अवकाशांत या 'तीन–तारा' मठाच्याहि पिच्छाला लागून, त्याचा एकदां निकाल करून टाकला पाहिजे, हें उघड दिसतें.

मागील पत्रांत तुला कळविल्याप्रमाणें इन्स्पेक्टर नारायणराव खरे यांचें पत्र घेऊन मी ताबडतोब देवगांवला आलों. येथले इन्स्पेक्टरसाहेब केशवराव भानगांवकरहि मोठे चांगले व सच्छील आहेत, असें मला अनुभवांतीं पटलें. आपल्या मित्राच्या पत्रावरून मला आपला अगदीं स्नेही समजून, अगदीं अंतःकरण-पूर्वक मला मदत करण्याचें त्यांनीं मला वचन दिलें आहे.

केशवरावांनां बरोबर घेऊन मी गांवकुंडला गेलों होतों. गांवकुंडला बापूरावाचे गोविंदराव ऊर्फ दादा-साहेब घारे ह्मणून एक श्रीमंत तरुण स्नेही आहेत, व त्यांच्या गांवाबाहेरच्या एकांत बागेंत कांहीं दिवसपर्यंत कावेरीला घेऊन बापूराव राहिले होते, अशी बातमी आह्मांला कळली.बागेंतील गोविंदरावांचा नोकर ग्यानबा याला व त्याची बायको राई हिला इन्स्पेक्टरसाहेबांनीं खूब छेडलें, व भयहि दाखविलें. त्यामुळें, त्यांनां माहीत असलेल्या गोष्टी आह्मांला त्यांनीं बहुतेक सांगितल्या, असें ह्मणावयाला हरकत नाहीं.

कंचनीयेथल्याप्रमाणेंच गांवकुंडलाहि बापूरावांनीं कावेरीची, ती वश व्हावी ह्मणून अगदीं पाठ पुरविली

होती; परंतु ती त्यांनां कधींहि बधली नाहीं! 'याद राखा–जीभ हांसडून मी प्राण देईन माझ्याजवळ याल तर!' अशा एकच धाकाच्या वाक्याशिवाय ती कधीं एक चकार शब्दहि त्या मांगापाशीं बोलली नाहीं.

चंपे, कोणी कोणावर खरें प्रेम केलें असतां तुला जसा आनंद होतो, तसाच, मी कसाहि पापी, दुराचारी असलों तरी, आमच्या स्त्रियांनीं जिवावरच्या संकटालाहि तुच्छ करून, आपल्या पातिव्रत्याचें उत्कृष्ट तऱ्हेनें रक्षण केलेलें पाहून, मलाहि ब्रह्मानंद होतो.

कावेरीला तिच्या आईबापांपासून व सासरच्या गांवापासून दूरदूर नेल्यानें ती कधीं तरी वठणीला आल्याखेरीज रहाणार नाहीं, असा त्या हरामखोर बापूरावाचा पूर्ण समज होता, असें त्याच्या, ग्यानबानें व राईनें ऐकलेल्या उद्गारांवरून आणि त्याच्या मागाहूनच्या वर्तनावरूनहि स्पष्टपणें दिसतें. अजूनहि कावेरी आपलें म्हणणें ऐकत नाहीं, असें पाहून बापूराव कांहीं दिवस गांवकुंडला राहून, गोविंदरावाच्या संमतीनें, आणखीहि दक्षिणेकडे–घोडगांवला गेला. ही माहिती गोविंदरावांकडून आम्हाला कळली.

होय, चंपाताई, अशी चपापूं नकोस. घोडगांव म्हणजे तुमच्या बाणथडीच्या हद्दीवरचेंच गांव. घोडगांवला मी या तपासाला गेलों होतों, पण इतक्या जवळ येऊनहि मी तुला भेटलों नाहीं, याला तसेंच कारण आहे. तें हेंच, कीं, मी आपल्या मागावर आहें, असा संशय देखील तुझ्या त्या तोतयाला येऊं नये. एकदां आपला संशय त्याला आला, कीं, सर्वच कांहीं ऑफस् व्हावयाचें! शिवाय, तुला खरें सांगावयाचें तर तुझ्या बाणथडीची मला एक प्रकारची धास्तीच बसली आहे!

घोडगांवला बापूराव कावेरीसह गांवाच्या बाहेरच गोविंदरावाच्या एका मित्राच्या घरांत राहिला होता. तेथें आल्यानंतरहि, त्या नराधमानें कावेरीचा पूर्वीप्रमाणेंच छळ चालविला होता, व ती साध्वी अजूनहि त्याच्याकडे उघड्या नजरेनें पहात नव्हती! इतक्या दूर येऊन बापूरावाचा दुष्ट हेतु अजून कांहीं केल्या साधत नव्हता! जीव द्यावयाच्या धमकीशिवाय कावेरी त्याच्याशीं एक शब्दहि बोलत नव्हती!

घोडगांवला आल्यानंतर, पोलिसच्या साहाय्यानें, तपासणी करून जो शोध मीं लावला, त्यामुळें तर हें रहस्य अधिकाधिक गंभीर होत चाललें आहे. येथल्या बंगल्याचा माळी आम्हाला देवगांवाला भेटला तो म्हणाला, कीं, 'रावसाहेब व ती स्त्री घोडगांवला आली, त्या वेळीं ती अतिशय कृश झाली होती. ती बहुधा अगदींच थोडें जेवी, कधीं मुळींच जेवीत नसे. नेहमीं अष्टौप्रहर ती रडे. एक दिवस संध्याकाळीं एकदम माझी बायको ओरडूं लागली 'अहो, सुरी आणा–सुरी आणा–बाई गळ्याला फांस लावून जीव देते आहे!" हा गोलमाल ऐकतांच सर्व मंडळी खोलींत धांवत गेली, आणि घाईघाईनें दोरी कापून, तिचा जीव त्यांनीं कसा तरी बचावला. तिला दोरी कापून खालीं उतरली, तेव्हां ती अगदीं बेशुद्ध पडली होती; परंतु पुष्कळ खटपट केल्यानंतर ती प्रहर रात्रीच्या सुमाराला शुद्धीवर आली. रात्रीं थोडें दूध पिऊन ती निजली; ती खोलींत एकटीच निजत असे. रावसाहेब बाहेर निजत. ते व मी पहाऱ्याचें काम करीत होतों. त्या दिवशीं माझी बायको तिच्या शेजारींच निजली. परंतु दुसऱ्या दिवशीं सकाळीं मंडळी उठून पहातात, तों त्या बाईचा कोठेंच पत्ता नाहीं! नदीपर्यंत तिच्या पावलांचा माग लागत गेला. यावरून असें वाटतें, कीं, रावसाहेबांच्या कांचांतून सुटण्याकरितां त्या बाईनें नदींत जाऊन जीव दिला असावा. आम्हीं ही सर्व बातमी गुपचूप ठेविली. रावसाहेबांनीं मला खूब बक्षीस दिल्यावरून मी नोकरी सोडून ताबडतोब निघालों आणि तेहि कुणीकडे निघून गेले!" माळी आणखी सांगतो 'त्या दिवशीं मार्च महिन्याची विसावी तारीख होती. वीस तारखेला आपला पगार होतो–त्याच दिवशीं त्या बाईनें नदींत जीव दिला!"

चंपाताई, तुमच्या यमुताई कोणत्या दिवशीं बाणथडीच्या घाटाला येऊन लागल्या तें नीट शोध करून पत्रोत्तरीं कळवा. त्यावरून मला कळून येईल, कीं, माळ्यानें वर्णन केलेले 'रावसाहेब' आणि 'बाई' म्हणजे बापूराव आणि कावेरीच, किंवा दुसरीं कोणी! पत्र फार लांबलें. पत्र ताबडतोब पाठीव, व त्यांत मीं विचारलेली माहिती ताबडतोब कळव. माझी प्रकृति बरी आहे.

कळावें, हे आशीर्वाद.

तुझा दादा,
वसंत."

[५]

" बाणथडी ता०——

सा. न. वि. वि.

आपलें पत्र पोहोंचलें. घाईघाईनें पत्रोत्तर लिहीत आहें. चौकशी करतां, यमुना येथें २१मार्चलाच घाटावर सांपडली, असें कळतें.

कळावें, ही विनंति.

आपली,
चंपा."

[६]

मुंबई, ता०—

अनेक आशीर्वाद विशेष—

तुझें पत्र मिळून बरेच दिवस झाले. तुझें पत्र वाचून मी बराच हताश झालों, हें मला कबूल केलेंच पाहिजे. मला असें स्पष्ट दिसूं लागलें आहे, कीं, यमुना या नानासाहेबाशीं संगनमत करून आलेली नाहीं. या दोघांसंबंधें अति श्रमांनीं केलेला सर्व शोध व्यर्थ गेला. हे श्रीमंत नानासाहेब तोतये खरोखरच कोण आहेत, यासंबंधानें मला अजून कांहींच निर्णय करतां येत नाहीं.

देवगांवाहून मी ताबडतोब इकडेच आलों. येतांच मी चिंतामणरावांकडून काढून आणलेल्या पत्त्यावर बापूरावांचा शोध करावयाला गेलों होतों. तेथें मला असें कळून आलें, कीं, कांहीं दिवसांपूर्वी तो क्विन्स रोडनें गाडींतून जात असतां, एका मोटरला बुजून त्याच्या गाडीचा घोडा उधळला व तो गाडींतून जोरानें खालीं आपटला. मर्मावर जबरदस्त आघात झाल्यामुळें ताबडतोब त्याला गोकुळदास तेजपाळ हॉस्पिटलमध्यें नेण्यांत आलें. तेथें जाऊन मीं चारपांच वेळ बापुरावांची भेट घेतली. शेवटीं, काल संध्याकाळीं तो मरण पावला.

मरणापूर्वी थोडा वेळ त्यानें वकील बोलावून आणून इस्पितळांत आपलें मृत्युपत्र केलें होतें. त्या मृत्युपत्रांत बापूरावानें लिहिलें आहे, कीं 'मीं कावेरीताईसारख्या एका सती साध्वीवर अत्याचार करण्याचा जो प्रयत्न केला,त्या दारुण पापाचें प्रायश्चित्त म्हणून या अपघातानें अशा जागीं मला मरावें लागत आहे. ईश्वरकृपेनें आणि कावेरीच्या पातिव्रत्यप्रभावानें माझा तो दुष्ट हेतु सफल झाला नाहीं ! कावेरी अगदीं निष्कलंक, परम वंद्य पतिव्रता आहे. ती संपूर्णपणें शुद्ध आणि निष्पाप आहे. ती जीवंत असेल, तर माझ्या हक्काच्या संपत्तीचा अर्धा भाग मी माझ्या पापाचें प्रायश्चित्त म्हणून, तिच्या चरणीं अर्पण करतों. बाकीचा अर्धा भाग मी आपल्या पुतण्यांना देतों.' बापूरावाच्या या मृत्युपत्रावर मीं माझी साक्ष घातली आहे.

मी उद्यां रात्रीं काशीला जावयाला निघत आहें. तेथें अनेक साधु, संन्यासी, बैरागी आहेत. हा 'तीन-तारा' मठ कोठेंसा आहे, याचा काशीला गेल्यावर मला शोध लागेल असें वाटतें. तेथला कोणीना कोणी तरी बैरागी त्या मठाचा शोध मला लावून देईल, अशी माझी पक्की खात्री आहे. त्या मठांत जाऊन शोध केल्यानंतर हा नानासाहेब कोण, त्याचा कायमचा निकाल लागेल, यांत संशय नाहीं.

माझें पुनः तुला पत्र येईपर्यंत अर्थात्च तुला पत्र पाठविण्याचें कारण नाहीं, आणि अमूक दिवशीं मी अमूक ठिकाणीं असेन, हें तरी मला नेमकें कुठें ठाऊक आहे ?

कळावें, हे आशीर्वाद.

तुझा दादा,
वसंतराव."

[७]

"मुंबई, ता०—

अनेक आशीर्वाद विशेष—

चंपाताई, हें पत्र मी तुला जवळजवळ पंचवीस-सव्वीस दिवसांनीं लिहितों आहें. माझें मागील पत्र तुला योग्य वेळीं पोहोंचलें असेल.

प्रिय चंपाताई, आज मी धन्य—त्रिवार धन्य झालों. इतके दिवसांचे माझे सर्व परिश्रम आज पूर्णपणें सफल झाले. आज माझ्या आनंदाला सीमा नाहीं !

मागच्या पत्रीं तुला लिहिल्याप्रमाणें, दुसऱ्याच दिवशीं मी काशीला गेलों, व तेथील संन्यासी, बैरागी, साधु यांच्याकडे ' तीन-तारा ' मठाची चौकशी करूं लागलों. माझ्या अटकळीप्रमाणें हा शोध लागावयाला मला फार दिवस लागले नाहींत. दुसऱ्याच दिवशीं एका बैराग्याकडून मला या मठाचा पत्ता बरोबर लागला.

अर्थात्च मग मी काशीला राहिलों नाहीं. मी तसाच पश्चिमेकडे महादेवपुर म्हणून गांव आहे, तिकडे गेलों. या गांवापासून जवळच हा 'तीन-तारा' मठ आहे. मठ मोठा असून त्याचें उत्पन्नहि बरेंच आहे, असें समजलें.

मठांत जाऊन तेथील बैराग्यांकडून मीं युक्तियुक्तीनें मला पाहिजे होती ती सारी माहिती मीं मिळवली. त्यांच्या सांगण्यांवरून असें कळलें, कीं त्यांचा पूर्वीचा मुख्य महंत हा दख्खनेंतलाच असून धुंडिराज उर्फ नानासाहेब पटवर्धन असें त्यांचें नांव होतें. थोड्याच दिवसांत आपण परत येतों असें सांगून गेल्या मार्च महिन्यांत महंतजी दक्षिणेकडे जावयाला निघाले; परंतु महिन्याभरांत त्यांची नुसती चिठ्ठी—चपाटी देखील आली नाहीं,

असें पाहून त्यांचे चेले मुंबईला आले. तेथील पोलीस, रेल्वे पोलिस ऑफिस वगैरेकडे चौकशी करतां, त्यांनां असें कळून आलें, कीं, त्या सुमारालाच, जी. आय्. पी. रेल्वेच्या दुधई नांवाच्या स्टेशनवर गाडींत मेलेल्या एका बैराग्याचें प्रेत उतरण्यांत आलें होतें. त्या बैराग्याच्या बरोबरची ट्रंक वगैरे सामान रेल्वे ऑफिसांत बिनवारसी माल ह्मणून ठेवलेलें होतें, तें तपासतां त्यांच्या चेल्यांनीं, तें आपल्या महन्तजींचेंच, असें ताबडतोब ओळखलें.

यासंबंधानें अधिक शोध करण्यासाठीं मी ताबडतोब दुधईला गेलों. तेथें मार्चमहिन्यांत एका बैराग्याचें प्रेत गाडींतून खालीं उतरण्यांत आलें होतें खरें, अशी बातमी मला कळली. आणखीहि असें मला कळून आलें, कीं, ज्या रात्रीं तें बैराग्याचें प्रेत स्टेशनवर उतरण्यांत आलें, त्याच रात्रीं बिंबवलीगांवचे गणपतराव देशपांडे नांवाचे असिस्टंट स्टेशनमास्तर—कावेरीताईचे पतिराज—ड्यूटीवर होते. त्यांच्या ताब्यांत तें बैराग्याचें प्रेत सर्व रात्रभर होतें. यानंतर थोड्याच दिवसांत गणपतराव चाकरी सोडून काशीला गेले.

दुधईहून मी बिंबवलीला गेलों. तेथें गणपतरावांच्या घरांत त्यांचा एक चुलतभाऊ असतो. त्याला अद्यापपर्यंत गणपतरावांचा बिलकूल पत्ताहि नाहीं. ते जीवंत आहेत कीं मेले, हेंहि त्यांनां माहित नाहीं!

या सर्व गोष्टींवरून, सूर्यप्रकाशाप्रमाणें मला असें स्पष्टपणें दिसत आहे, कीं, हे कावेरीचे पतिराज गणपतरावजी देशपांडेच, मेलेल्या महंतमहाराजांच्या कागदपत्रांवरून वगैरे त्यांचें नांवगांव व दुसऱ्या गोष्टी यांची छान माहीत करून घेऊन, नानासाहेब बनून बाणथडीला गेले. त्या दिवशीं संध्याकाळीं, नदीवरून परत येत असतां, बागेंत एकाएकीं श्रीमंत नानासाहेब तोतयांनां पाहून तुमची 'यमुना' एकदम कां चमकली, त्याची आतां चांगली उपपत्ति लागते.

अजूनहि कित्येक बारीकसारीक गोष्टींसंबंधानें खऱ्या बातम्या मला मिळवावयाच्या आहेत. हें काम पुरें झालें, कीं, बाणथडीला येऊन मी आपल्या 'अस्सल' कामाला आरंभ करीन.

कळावें, हे आशीर्वाद.

तुझा दादा,
वसंत."

खंड पांचवें.

प्रकरण पहिलें.

कर्मभोग !

श्रावण महिन्यांतील दिवस. तीनप्रहर उलटून गेले आहेत. आज बरोबर सात दिवस झाले. दिवसरात्र पावसाची झिमझिम एकसारखी सुरू आहे. अंगांत फ्लॅनेलची स्वच्छ बंडी, डोकीला काळी टोपी, या वेषानें दिवाणजी कचेरीमध्यें बसून आपलें काम लक्ष्यपूर्वक पहात आहेत, आणि मधुनमधून खोः खोः करून जोरजोरानें खोकत जवळ ठेवलेल्या पितळी पिकदाणींत कफविसर्जन करीत आहेत.

दिवाणजी मधुनमधून बाहेर पहात होते,त्यावरून ते कोणाची तरी वाट पहात असावे, असें दिसत होतें. या वेळीं तर पावसाच्या झिमझिमीला चांगलें जोराचें स्वरूप येत चाललें होतें. थोड्याच वेळापूर्वी एक अतिशय महत्त्वाचें काम उपस्थित झालें असून त्यासंबंधानें श्रीमंतांची भेट घेणें अत्यावश्यक होतें. यामुळें, दिवाणजींनीं नानासाहेबांकडे आंत नोकरामार्फत निरोप पाठविला होता, कीं, 'अत्यंत जरुरीचें काम उपस्थित झालें आहे, त्यासंबंधांत श्रीमंतांची भेट मला एकीकडे ताबडतोब पाहिजे आहे. हुकूम होईल त्याप्रमाणें मी आंत येऊन आपणाला भेटतों किंवा आपण तरी बाहेर येण्याची कृपा करावी !' यावर नानासाहेबांचा उलट निरोप आला, कीं, 'मी लवकरच बाहेर येऊन आपणाला भेटतों.'

हा नानासाहेबांचा निरोप येऊन तास सवातास झाला, तरी त्यांचा अजूनपर्यंत कोठें पत्ताच नव्हता. 'बाहेर येऊन भेटतों' असा निरोप असल्यामुळें दिवाणजींनां इतराजीच्या भीतीमुळें आंतहि जातां येईना. ते अगदीं त्रासून गेले !

इतक्यांत दाजीबा तेथून कोठेंसा जात होता त्याला काकासाहेबांनीं हांक मारून आंत बोलावलें.

तो येतांच दिवाणजींनीं विचारलें " दाजीबा, नानासाहेब आतां कुठें आहेत रे ?"

" आंत —"

दिवाणजी हंसून ह्मणाले " अरे, तें मला ठाऊक आहे. पण आंत ह्मणजे कुठेंसे ?"

" वर—"

" काय करताहेत ?"

" वहिनीसाहेबांजवळ बसून राहिले आहेत बुवा केव्हांपासून ! जेवल्याबरोबर ते तिकडेच गेले. "

दिवाणजी क्षणमात्र आपणाशीं विचार करीत स्तब्ध राहिले. नंतर त्यांनीं विचारलें " दाजीबा, वहिनीसाहेबांची तब्बेत या वेळीं कशी काय आहे रे ?"

" आहे–बरीच बरी आहे."

" ठीक आहे– तूं जा."

दाजीबा हळुहळू निघून गेला. जातांना तो किंचित हंसला. कां, तें त्याचें त्याला माहीत !

सूर्यास्त होण्याची वेळ होत आली असून प्रकाशहि हळुहळू कमीकमी होत चालला होता. डोळ्यांनां चष्मा असतांहि दिवाणजींनां कागदावरील शाईच्या रेघा स्पष्ट दिसावयाला भारी त्रास पडत होता. तेव्हां हातांतील लेखणी त्यांनीं कानांवर ठेवली, व मानेवर हात ठेवून, मागच्या तक्क्यावर रेलून ते विचार करूं लागले.

मनांतल्या मनांत दिवाणजी म्हणाले " छे छे बुवा ! नानासाहेबांनीं अगदीं ताळच सोडल्यासारखें केलें आहे ! दिवसेंदिवस, क्रमाक्रमानें, ते अधिकाधिक स्त्रैण बनत चालले आहेत–हें लक्षण कांहीं एकंदरीनें ठीक नाहीं बुवा ! एवढी मोठी इस्टेट बापानें कमावून ठेवली आहे–ती नुसती या भाग्यवंतांनीं नीट राखली,तरी पुष्कळ झालें ! पण तिचें रक्षण तरी सांप्रतच्या त्यांच्या मनःस्थितींत

चांगलेसें होईल कीं नाहीं, याबद्दल माझ्या मनाला अतिशय शंका वाटते. कांहीं तरी खासेचें आपल्या इनामतीकडे लक्ष ! जेव्हां पहावें तेव्हां स्वारी आपली बायकोच्या जवळ बसून गुलगुल गुलगुल गोष्टी करते आहे ! चाकरा-नोकरांच्या देखील ही गोष्ट आतां चांगली ध्यानांत आली आहे, यांत संशय नाहीं. हा दाजीबाच पहाना आतां कसें खाचीखोचीनें बोलला तो ! नोकर झाले तरी माणसेंच ना तीं. शेवटीं ! घन्याच्या किंवा आमच्यासारख्या बुढ्या कारभाऱ्यांच्या मुरवतीसाठीं कांहीं दिवस आपलीं तोंडें दाबून धरतील-पण असें चालणार किती दिवस ! पुढें त्यांनां आपोआपच तोंड फुटतें अन् आमचीं तोंडें त्या वेळीं मुकाट्यानें गप्पच रहातात-काय करावें ? आतां या नानासाहेबांनां करावें तरी काय ? माणसांनीं कांहीं काळवेळ पाहूं नये ह्मणजे आहे तरी काय ?"

दिवाणजींनीं पुनः त्रासानें घड्याळाकडे पाहिलें. त्यांच्या मनःसंतापाचा पळभरहि विचार न करतां, तें बिचारें एकसारखें धीमेपणानें आणि घुमेपणानें टिकटिक करीत पुढेंच चाललें होतें !

माणसाच्या मनांत खळबळ चालली असली, आणि तिचा विशेष जोर झाला, ह्मणजे ती त्याला स्वस्थ बसूं देत नाहीं. काकासाहेबहि आतां पडल्या बैठकीवरून ताडकन् उठले, व त्या खोलींत इकडून तिकडे हलुहलू येरझारा घालूं लागले. छातीवर दोन्ही हात अडकावून ते विचार करूं लागले " यांच्या या स्त्रैणपणाची मजल जाणार आहे तरी कुठवर, कांहीं कळत नाहीं. त्यांतल्यात्यांत समाधान एवढेंच आहे, कीं, पोरगी मोठी शहाणी, धोरणी अन् समंजस आहे. ती नवऱ्याला कारशी भंडकूं द्यायची नाहीं ! स्त्रीला स्पर्शहि करायचा नाहीं, असें व्रत घेतलें आहे ह्मणे ! अन् हें काय ? स्पर्शाचा बाप-आजोबा ! यापेक्षां स्त्रीला प्रत्यक्ष स्पर्श झालेला शतपटीनें बरा ह्मणतों मी !" असें मनाशींच ह्मणून काका आपणाशीं खूब मोठ्यानें हंसले.

नंतर खोलीच्या बाहेर डोकावून, जवळ उभा असलेल्या गड्याला हांक मारून काका ह्मणाले 'रत्नू, असाच आंत जा अन् नानासाहेब असतील तिथें त्यांची गांठ घे. त्यांनां ह्मणावें, कांहीं अतिशय जरूरीच्या कामासाठीं काकांनां आपली भेट घ्यायची आहे. आपली वाट पहात ते कचेरींत बसून राहिले आहेत-अजून घरीं गेले नाहींत."

" हुकूम !" असें ह्मणून रत्नू तेथून निघून गेला, व थोड्या अवकाशानें परत येऊन ह्मणाला "श्रीमंतांनीं लवकरच येतों, असें सांगितलें आहे."

हलुहलू संध्याकाळ उलटून रात्र पडावयालाहि सुरुवात झाली; तरी नानासाहेबांचें 'लवकरच' संपण्याचें कांहीं चिन्हहि दिसेना ! एका नोकरानें येऊन दिवाणजींच्या टेबलावर एक झगझगीत सून दिवा ठेवला, व तो गेला.

दिवाणजींनीं घड्याळाकडे पाहिलें तों पावणे-सात ! सायं-संध्येचा आपला नेहमींचा वेळ जात चालला आहे, असें पाहून दिवाणजींनां वाईट वाटल्यावांचून राहिलें नाहीं. संध्या टाळावयाची नाहीं, असा निश्चय करून दिवाणजी उठले, व एका कारकुनाला बोलावून ते ह्मणाले "सखारामपंत, तुह्मी इथें बसून रहा. श्रीमंत आले, तर त्यांनां सांगा, संध्येची वेळ झाल्यामुळें मी निघून गेलों. संध्या, धुपारती अन् फराळ आटोपून मी साडेआठांच्या सुमाराला वाड्यांत परत येतों."

बरोबर साडेआठ वाजतां काकासाहेब वाड्यांत परत आले. अजूनहि नानासाहेब बाहेर आले नाहींत, असें त्यांनां कळून आलें ! आपल्या निरोपाचें स्मरण देण्याकरितां फिरूनहि एकदां नानासाहेबांकडे माणूस पाठवावा, असें एकवार त्यांनां वाटलें; परंतु पुनः त्यांच्या मनांत असा विचार आला, कीं, वारंवार निरोप पाठविल्यामुळें श्रीमंत एकदम उसळावयाचे ! अजून आपणाशीं ते आदरभक्तीनें वागत आहेत, तोंवर आपला मान आपणच राखून घेतला पाहिजे. साडेआठ तर वाजलेच; साडेनवांच्या सुमाराला नानासाहेब झोंपण्याकरितां बाहेर येतीलच; त्या वेळीं त्यांची भेट अनायासेंच होईल; असा 'पोक्त' विचार करून दिवाणजी कचेरींत आपल्या गादीवर विराजमान झाले.

नानासाहेबांचें आजचें चमत्कारिक वर्तन पाहून दिवाणजी त्यांच्यावर मनांतल्या मनांत अतिशय खप्पा होऊन गेले होते. "बायको बायको झाली, तरी माणसाला कांहीं सुमार हवा का नको ?" काकासाहेब विचार करूं लागले " माझ्या वयाला ही साठी उलटून गेली. मी आणखी किती दिवस वांचणार आहें ? एव्हांपासून जर साऱ्या कारभाराची यांनीं माझ्याकडून माहिती करून घेतली नाहीं, तर इस्टेटीचें रक्षण तरी कसें होणार ? लोक काय-चांगलें कुणाचें कुणाला पहावतें आहे ? कोणत्या ना कोणत्या तरी निमित्तानें दुष्ट

लोक इस्टेटीचे लचके तोडून ते अचूक घशाखालीं लोटायला टपून बसलेलेच आहेत ! कुणाच्यामुळें जग अडून बसलें आहे ह्मणा ! रामरावणासारखे मोठमोठे गेले, तरी जग हें आपलें चाललेंच आहे ! माझ्यामागें इस्टेटीसाठीं कुणी तरी सोमा-गोमा दिवाण हा नेमावा लागणारच. परंतु भाऊसाहेबांची न् माझी दिलमिलाई झालेली असल्यामुळें, मी जसा जीव तोडून मालकाच्या हितासाठीं डोळ्यांत तेल घालून कारभार पहात होतों, तसा तो कां ह्मणून पाहील ? तो आपल्या पोळीवर तूप ओढल्याशिवाय कसा राहील ? अन् विशेषतः यजमानाचें सारें लक्ष बायकोकडे-इष्टेटीकडे मुळींसुद्धां तो पहात नाहीं, ही गोष्ट त्यांच्या एकदां ध्यानांत आल्यावर तर तो दोनदोन हातांनीं लुटायला कमी नाहीं करायचा ! मारील सडकून ताव अन् करील दोनचार वर्षांत चांगला गुळगुळीत गोटा !"

नानासाहेबांचें मन इतकें स्त्रैण बनलें आहे, तें बेतावर येऊन आपल्या वडिलांच्या संपत्तीच्या रक्षणाकडे कसें लागेल, त्यासाठीं काय युक्त्या कराव्या, याविषयीं दिवाणजी विचार करूं लागले. 'पाण्यांत पडल्याशिवाय लोक कांहीं पोहायला शिकत नाहींत. संकट आल्याशिवाय कोणी तें निवारण्याची आगाऊ तरतूद करून ठेवीत नाहीं.' असा विचार करून दिवाणजींनीं मनाशीं असें निश्चित करून टाकलें, कीं, 'कांहीं तरी निमित्त करून कांहीं दिवस तरी आपण येथून सटकावें ! ह्मणजे आपोआप श्रीमंत आपले झांकलेले डोळे किलकिले करून तरी सभोंवतालीं पहातील. कारभाराचा बोजा स्वतःच्या मस्तकावर पडल्यावर, नानासाहेबांनां थोडथोडे हातपाय हलवणें भागच पडेल, आणि अशा रीतीनें सारा कारभार त्यांनां हळुहळू कळूं लागेल.'

अशा स्थितींत सवा नऊ वाजले. कंटाळून कंटाळून दिवाणजी बैठकखान्याच्या व्हरांड्यांत येऊन बांकावर बसले. सुमारें साडेनऊ वाजतां कंदील हातीं घेतलेल्या नोकराच्या मागोमाग, मस्तकावर सुंदर छत्री घेतलेले गणपतरावजी तिकडेच येत आहेत, असें काकासाहेबांच्या दृष्टीला पडलें. पाऊस मध्यें थोडा थांबला होता तो या वेळीं पुनः पडूं लागला.

गणपतराव जवळ येतांच दिवाणजी उठून उभे राहिले.

त्यांच्याकडे पाहून आश्चर्यव्यंजक स्वरानें गणपतराव ह्मणाले "हें काय ? काकासाहेब, तुह्मी अजून वाड्यांतच ?"

"हो—"

"घरीं नाहीं गेलांत अजून ?"

राग, तिट्कारा वगैरे भावना यथासाध्य दाबून टाकून शक्य तितक्या मृदु स्वरानें काकासाहेब ह्मणाले "नाहीं. एक अतिशय जरूरीचें काम आलें आहे अन् तें आपल्या कानांवर घातल्याशिवाय गत्यन्तर नव्हतें."

आठवण झाल्यासारखें करून गणपतराव ह्मणाले "ओहो ! संध्याकाळीं तुह्मीं मला बाहेर येऊन जायला निरोप पाठवला होता नव्हे, कुणाबरोबरसा, काका ?"

"हो-पहिल्यानें चार साडेचारांच्या सुमाराला मीं आपणाला तसा निरोप पाठविला होता. 'आपणाला जर बाहेर यायला या वेळीं सवड नसेल, तर मी आंत येऊन आपणाला भेटतों; काम अतिशय जरूरीचें आहे; आज भेट ही झालीच पाहिजे,' असाहि माझा निरोप होता; परंतु आपलें उलट उत्तर आलें, कीं, 'मीच बाहेर येऊन तुह्माला भेटतों.' साडेपांचपर्यंत आपली वाट पाहून, आपणाला कामाचें स्मरण करून देण्यासाठीं पुनः मीं एक नोकर आंत पाठवला."

मान हलवून, खिन्नपणें हंसून गणपतराव ह्मणाले "हो हो-मला या गोष्टीचें स्मरणच कसें तें राहिलें नाहीं पहा. भारी वाईट गोष्ट झाली, काकासाहेब ! माझ्या हातून अगदीं चूकच झाली मोठी ! मला क्षमा करा, काकासाहेब ! तुह्माला माझ्यामुळें भारीच त्रास झाला !"

गणपतरावांच्या या नम्र वृत्तीनें आणि मृदु शब्दांनीं काकासाहेबांचें मन खरोखरीच अगदीं नरम झालें. मान हलवून ते ह्मणाले "छे छे, त्रास कसला आला आहे त्यांत ?"

"वा, काकासाहेब, असें कसें ह्मणतां तुम्ही ?" गणपतराव अधिकच नम्रतेनें ह्मणाले. "श्रावणांतली रात्र. आकाश भरून आलें आहे. अंधार गुडुप आहे. पावसाची झिमझिम सारखी चालूच आहे. अन् इतक्या रात्रीं, काळोखांत, पावसांतून आपणाला भिजत घरीं जावें लागणार आहे ! केवळ माझ्यामुळें आपणाला हा त्रास, नाहीं का ? काका, संध्याकाळपूर्वीच आपण घरीं कां बरें गेलां नाहीं ? हो, पण काम भारी जरूरीचें आहे, असें ह्मणालां नाहीं का तुह्मी ?"

"होय-काम तसेंच आहे जरूरीचें !"

"या, तर मग— वरच चला. तिथेंच काय तें सांगा." असें ह्मणून गणपतराव जिना चढूं लागले.

त्यांच्या मागोमाग स्थूलकाय दिवाणजीहि हळुहळू जिना चढूं लागले. चढतां चढतां त्यांनीं विचारलें "वहिनीसाहेबांची तब्बेत कशी काय आहे आतां?"

दिवाणजींचा हा प्रश्न ऐकतांच गणपतरावजींनां अगदीं मनापासून लाज वाटूं लागली. त्यांनां असें वाटूं लागलें, 'बायकोला घेऊन मी अगदीं मषगुल होऊन पडलों आहें—तिच्यापुढें मला कांहींच सुचत नाहीं— अवश्य कर्तव्याचीहि मीं—हेळसांड चालविली आहे, ह्याला कारण केवळ एक वहिनीसाहेब—ही गोष्ट बुढ्ढ्याच्या केव्हांच ध्यानांत येऊन चुकली आहे!'

गणपतराव उत्तरले "दिवसा तब्बेत चांगली ठीक होती; पण संध्याकाळपासून थोडथोडा बिघाड होत चालला—"

"काय झालें?"

"संध्याकाळपासूनच ताप येण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं अन् रात्र पडतांना ताप भरलाच शेवटीं!"

"अजूनहि ताप आहेच का?"

"होय—अजून नाहीं काढला!"

"किती आहे? पाहिला होता का?"

"आहे एकशेंएक—पॉइंट. आतांच थर्मामिटर लावून पाहिला."

दिवाणजी ह्मणाले "ताप असला जरी इतका, तरी तो काळजी करण्यासारखा नाहीं, असें मला वाटतें. पाऊस भारी पडला आहे—त्यामुळें सर्दी वाढली अन् त्यापासून ताप आला, दुसरें कांहीं नाहीं. अगदीं कांहींसुद्धां भिण्यासारखें नाहीं कांहीं त्यांत!"

गणपतराव कांहींच बोलले नाहींत. ते मुकाट्यानें आपल्या शयनगृहांत शिरले. दिवाणजीहि त्यांच्या मागोमाग आंत आले.

तेथल्या एका खुर्चीवर बसून गणपतराव नोकराला ह्मणाले "अरे, एखादा सुखा चांगला टुवाल घेऊन माझे पाय नीट स्वच्छ पुसून काढ पाहूं." नंतर दिवाणजींनां ते ह्मणाले "या बसा काका, या कोचावर. हं—बोला आतां काय आहे भानगड?"

दिवाणजी कोचावर बसून ह्मणाले "तशी कांहीं भानगडबिनगड नाहीं. आज सदराहून कलेक्टरसाहेबांचे चिटणीस शंकरराव भगाडे यांचें मला पत्र आलें आहे, कीं, परवांच्या दिवशीं कलेक्टरसाहेब भिंगारडीगांवच्या डाक बंगल्यांत येऊन पोहोंचतील. भिंगारडीला तीन दिवस रहाणार आहे साहेबांची स्वारी."

गणपतरावांनीं विचारलें "अशा पावसांत निघाली आहे कशाला साहेबांची स्वारी फिरतीवर?"

यजमानांच्या ह्या पोरकटपणाकडे लक्ष न देतां दिवाणजी म्हणाले "भिंगारडीजवळ भलें चांगलें रान आहे. तिथें पांखरांची शिकार करण्याचा साहेबांचा विचार आहे, असें चिटणिसांनीं लिहिलें आहे मला."

"नेमके इकडेच कसे येताहेत साहेब?"

"गुदस्तांहि ते भिंगारडीला आले होते; त्या वेळीं ती जागा त्यांनां अतोनात पसंत पडली. आपल्या इनामतींत साहेबांची स्वारी येते आहे—तेव्हां त्यांचें ठाकठीक स्वागत तर झालें पाहिजे? साहेब ह्मणजे जिल्ह्याचे मालक—राजे! जज्ज किंवा मॅजिस्ट्रेट तर नव्हेत? त्यांची गोष्ट एक निराळी!"

गणपतरावांनीं विचारलें "कांहीं नजरनजराणा पाठवायला हवा वाटतें साहेबांनां?"

"हो—नजराणा तर पाठवायलाच हवा, पण त्याची सारी व्यवस्था मीं अगोदरच केली आहे. आपल्याला न विचारतांच मीं गोविंदरावांनां संध्याकाळच्या गाडीनें मुंबईला पाठवूनहि दिलें आहे. असल्या सगळ्या गोष्टींत आमचे गोविंदराव भारी हुशार आहेत. वॉटसन् हॉटेलमधून साहेबांच्या खाण्यापिण्याचे जिन्नस—चार बाटल्या शाम्पेन, एक डझन व्हिस्की—आणखीहि बरेच जिन्नस— अशा प्रसंगीं काय काय जिन्नस लागतात, त्यांची एक पक्की यादीच आम्हीं तयार करून ठेविली आहे—त्या यादीप्रमाणें सर्व जिन्नस विकत घेऊन उद्यां संध्याकाळीं गोविंदराव मुंबईहून निघतील ते परस्पर थेट भिंगारडीला परवां पोहोंचतील."

गणपतराव ह्मणाले "ही भिंगारडी म्हणजे आमच्या इनामतींतच आहे असें दिसतें—"

मनांतल्या मनांत हंसून दिवाणजी म्हणाले "हो—"

"तिथेंहि आमची कचेरीबिचेरी आहे का?"

दिवाणजी मनांतल्यामनांत म्हणाले "बेट्याला घरीं येऊन झाले जवळजवळ तीन महिने—पण आपल्या इनामतींत गांव किती न् कुठें काय आहे याच्या माहितीसंबंधानें अजून अगदीं भोपळ्याएवढें!" नंतर ते उघडपणें म्हणाले "नाहीं—भिंगारडीला आमची कचेरीबिचेरी कांहीं नाहीं; परंतु भिंगारडीपासून दीड एक कोसावर निजधुरी म्हणून आपला एक गांव आहे,

तिथें त्या बाजूकडली आपली मुख्य कचेरी आहे. चांगली इमारत आहे कचेरीची दुमजली. ल्हानपणीं आपण निजसुरीला भाऊसाहेबांच्या बरोबर एकदोनदां गेलां होतां-मला वाटतें; आपणाला हें स्मरत नसेल आतां ?"

दिवाणजींचा प्रश्न ऐकून गणपतराव मनांतल्या मनांत हंसले. नंतर ते ह्मणाले "नाहीं बुवा-मला कांहीं आठवत नाहीं."

दिवाणजी ह्मणाले "फार वर्षांपूर्वीची गोष्ट ती-आतां कशी आपणाला आठवणार ? निजसुरीच्या कारभाऱ्यांनां मीं नुकतेंच पत्र देऊन एक माणूस पाठवला आहे. साहेबांसाठीं मुर्गी, वैदे, तूप, दूध, मांस, भाजी वगैरे सर्व पदार्थ मिळवून ठेवावे, असा आपला हुकूम मीं पत्रांत लिहिला आहे."

गणपतराव किंचित् हंसून ह्मणाले "वा-ठीक केलेंत. तर मग सारी व्यवस्था झालीच ह्मणायची !"

दिवाणजी ह्मणाले "हो, तशी सारी व्यवस्था लागली. पण एका गोष्टीबद्दल जरा मला विचार पडला आहे—"

"काय ?"

"कारभारी ह्मणजे साधा कारकुनच तो ! जवळजवळ त्याच्यावरच सर्व भार टाकून आपणाला निर्श्चित रहातां येईल का ?"

गणपतरावांनीं विचारलें "तर मग तुह्मी स्वतःच भिंगारडीला जाणार ह्मणतां ? वा-तसें झालें तर मग उत्तमच! ह्मणजे मग कांहींच कमी पडायची भीति नको."

दिवाणजी हळुहळू ह्मणाले "तशी-मला कांहीं जायला हरकत आहे अशांतला भाग नाहीं. पण आपण स्वतः गेलांत तर उत्तम होणार आहे."

भुंवया वांकड्या करून गणपतरावांनीं विचारलें "मी जाऊं ? पण काकासाहेब, या वेळीं मी कसा-"

काकासाहेब मध्येंच ह्मणाले "वहिनीसाहेबांसंबंधानें आपणाला तशी काळजी करण्यासारखें कांहींच नाहीं. त्यांची तब्येत तर आतां हळुहळू चांगली सुधारत चालली आहे. आजचा ताप या चमत्कारिक हवेमुळें आलेला दिसतो आहे त्यांना. वैद्युवा तो हां हां ह्मणतां बरा करतील. त्याविषयीं कांहीं काळजी करायला नको आहे आपणाला. मी इथें आहेंच कीं नाहीं ?-हरघडील त्यांचा समाचार मी घेत जाईन—"

"पण काका-"

काकासाहेब जरा अधिकाराच्या स्वरानें ह्मणाले-"आपण न जाणें ह्मणजे जरा तें वाईटच-बिलकूल शोभण्यासारखें नाहीं."

स्वतःशीं विचार करीत गणपतराव खिन्नपणें स्तब्ध बसून राहिले. इतक्या अवकाशांत नोकरानें त्यांचे पाय चांगले स्वच्छ पुसून काढून चटईचे पैजारहि त्यांच्या पायांत चढविले होते.

यजमानांनां आपलें ह्मणणें बिलकूल रुचलें नसावें, हें तत्क्षणीं दिवाणजींच्या लक्ष्यांत आलें. तेव्हां तें जरा अनुनयाच्या स्वरानें ह्मणाले "नानासाहेब, या वेळीं मीं आपणाला भिंगारडीला जायचा आग्रह केला नसता; परंतु एक तर आपण घरीं परत आल्यापासून कलेक्टरसाहेबांच्या मुलाखतीला एकदांसुद्धां गेलां नाहीं—त्यांतूनहि,खुद्द आपल्या इनामतींत साहेब आले असतां आपण स्वतः त्यांनां भेटायला न जातां, त्यांच्या साऱ्या सरबराईचें काम एका लहानशा कारकुनावर संपविणार यामुळें मनांतल्या मनांत साहेब आपणावर चिडल्याखेरीज रहाणार नाहींत-अन् तें कांहीं एकंदरीनें ठीक नाहीं. हो, अधिकाऱ्यांचा राग तो-सामान्य नाहीं !"

कांहीं वेळ गणपतराव विचार करीत गप्प बसले. नंतर त्यांनीं विचारलें "बरें, समजा, मी स्वतः गेलों, तर मला तिथें काय करायला हवें ?"

दिवाणजी प्रसन्नतेनें ह्मणाले "नाहीं, तसें फारसें कांहीं करण्याची जरूरी नाहीं. उद्यां जेवण वगैरे झालें, कीं, आपण गाडींतून निजसुरीला रवाना व्हा. संध्याकाळपर्यंत आपण सहज पोहोंचाल तिथें. तिथें कचेरींतच आपण उतरा. परवां सकाळीं गोविंदराव मुंबईहून नजराण्याचें सामान अन् साहेबांच्या खाण्यापिण्याचे पदार्थ घेऊन तिथें येऊन पोहोंचतीलच. मुर्गीबिर्गी, दूध, तूप, भाज्या, अन् नजराण्याची फळफळावळ वगैरे सारे पदार्थ गोविंदरावांबरोबरच किंवा तेथल्या कारकुनाबरोबर आपण ताबडतोब पाठवून द्यायची व्यवस्था करा. ही मंडळी भिंगारडीच्या डाकबंगल्यांत जाऊन बसतील. दहा वाजायच्या आंत कांहीं साहेब तिथें येऊन पोहोंचत नाहींत हें खास ! साहेब आले, ह्मणजे तूप, दूध, भाज्या, मुर्ग्या वगैरे पदार्थ गोविंदराव साहेबांच्या खानसाम्याच्या स्वाधीन करून येतील. मुंबईहून आणलेला नजराणाहि ठीकठाक तयार करून ठेवतील. एक घोडेस्वार तिथें तयार ठेवलेला असेलच-अन् इकडे कचेरींत आपली गाडीहि जोडून

तयार असेल. साहेब येऊन डाकबंगल्यांत पोहोंचता-हेत, तों स्वार दौडत जाऊन आपणाला खबर देईल. तत्क्षणीं आपण गाडींत बसून निघावें. तिथें पोहोंचतांच आपल्या नांवचें कार्ड आपण साहेबांकडे पाठवून द्यावें. तें हातीं येतांच साहेब आपणाला बोलावणें धाडतील."

"साहेबांसमोर जाऊन मी काय करूं?"

"साहेबांशीं नम्रपणें शेक-हँड करून आपण जवळच्या खुर्चीवर बसावें. 'हुजुरांची तब्येत तर ठीक?' 'मेमसाहेबांची प्रकृति कशी आहे,?' 'त्या बरोबर कां नाहीं आल्या हुजुरांच्या?' 'रस्त्यांत हुजुरांनां कांहीं त्रासबीस तर नाहींना झाला?' असे चारपांच प्रश्न आपण हंसतमुखानें साहेबांनां करा—"

गणपतरावांनीं विचारलें "मराठींतच?"

दिवाणजी गडबडीनें म्हणाले "छे छे छे छे! इंग्रजींतच आपण विचारा. ही गोष्ट माझ्या अजीबात लक्ष्यांतूनच गेली होती. भाऊसाहेब कधीं इंग्रजींत तर कधीं हिंदींत हे प्रश्न साहेबांनां विचारीत. पण म्हाताऱ्यांनां याबद्दल कसलीच कुणी हरकत करीत नाहींत. पण आपण तरुण—आपणाला इंग्रजींतच त्यांच्याशीं बोललें पाहिजे. नाहीं तर साहेबांवर आपली छाप नाहीं पडायची."

गणपतरावांनीं त्रस्त स्वरानें विचारलें "इंग्रजींत? हिंदींत बोलून आपल्या भाषेचा अभिमान आपण कां दाखवूं नये?"

"छे छे छे छे!" दिवाणजी किंचित् हंसून म्हणाले. "अभिमान दाखवायची ही जागा नव्हे अन् ही वेळहि नव्हे. तशा संधि आपणाला पुढें हव्या तेवढ्या मिळणार आहेत. इंग्रजींत अर्थातच आपणाला 'हुजूर' वगैरे म्हणायला नको. चार दोन वेळ 'युवर ऑनर' म्हणावें, मधुनमधून कधीं 'सर' म्हणावें. पण होतां होईल तों 'युवर ऑनर'च आपण अधिक म्हणा—त्यामुळें साहेबांची मर्जी आपणावर अधिक प्रसन्न होईल."

"बरें, पुढें?"

"हें सर्व झालें म्हणजे आपण म्हणा 'युवर ऑनरच्या सेवेसाठीं कांहीं मुर्ग्या, अंडीं, तूप, दूध, भाजीपाला वगैरे पदार्थ आम्हीं अगोदरच पाठवून दिले आहेत—आमच्या कारकुनानें ते सर्व आपल्या खानसाम्याच्या ताब्यांत देऊन ठेवले आहेत. याशिवाय, युवर ऑनरसाठीं मुद्दाम एक नजराणा घेऊन आलों आहे, त्याचा 'सर'नीं स्वीकार केला, म्हणजे मी कृतकृत्य होईन!' असें म्हणून आपण गोविंदरावांनां इशारा करावा, म्हणजे ते झांकलेली डाली आणून साहेबांच्या समोर ठेवतील अन् परत जातील."

गणपतराव तोंडावर हात ठेऊन म्हणाले "अरे बापरे! साहेबांच्या भेटीला इतके का विधि करावे लागतात? जबरदस्त कर्मभोग आहे हा!"

दिवाणजी किंचित् हंसून म्हणाले "तें का आम्हाला कळत नाहीं, नानासाहेब? पण करायचें काय? हे अधिकारी हेच आपल्यासारख्यांचे देव ना! त्यांची पूजाविधा केल्याशिवाय का ते आपणाकडे प्रसन्न-दृष्टीनें पहातात?"

गणपतराव किंचित् स्तब्ध राहून म्हणाले "बरें पुढें?"

"पुढें काय?"

"या देवाची अशी मीं पूजा केली, म्हणजे तरी माझी सुटका होईल का? मग तरी ताबडतोब मी तसाच येऊं ना घरीं?"

मान हलवून दिवाणजी म्हणाले "छे छे छे! घरीं कसें येतां येईल आपणाला, नानासाहेब?"

"कां बरें?"

"तें का बरें दिसतें?" काकुळतीच्या स्वरानें दिवाणजी म्हणाले. "साहेब तिथें राहिलेले अन् आपण घरीं निघून यायचें, हें त्यांनां तरी कसें आवडेल बरें?"

"किती दिवस रहाणार साहेब भिंगारडीला म्हणालांत तुम्ही?"

"तीन दिवस, असें चिटणिसांनीं लिहिलें आहे."

"मीं तीन दिवस तिथें राहून काय करायचें?" कपाळाला आंठ्या घालून गणपतरावांनीं विचारलें.

"रोज सकाळीं जाऊन एकवार आपण त्यांनां भेटून त्यांच्याशीं 'गुड मॉर्निंग' करून यायचें, न् थोडें कांहीं तरी त्यांच्याशीं बोलायचें."

"अहो, रोज रोज मी त्यांच्याशीं बोलूं काय कपाळ?" गणपतराव जरा चिडून म्हणाले.

"अमूकच कांहीं बोलावें, असें नाहीं. 'युवर ऑनरला कांहीं इथें त्रासबीस तर नाहीं ना होत? कांहीं बाबतीसंबंधानें 'सर'नां कांहीं गैरसोय सोसावी लागत असली, तर मला कळवावी, मी योग्य बंदोबस्त करतों!' अशा प्रकारच्या शिष्टाचाराच्या चारदोन गोष्टी बोलून, यावें निघून. थोडीशी साहेबांची खुशामत करायची, दुसरें काय?"

गणपतराव तरी आतां काय करतात? दिवाणजींनीं सांगितल्याप्रमाणें करावयाला ते मुकाट्यानें तयार झाले. ते ह्मणाले "मींच तिकडे जाणें अत्यंत जरूरीचें आहे असें तुम्ही सांगत आहां, तर मला गेलेंच पाहिजे. तर मग करा तशी व्यवस्था सारी."

बरीच रात्र झाली होती. आणखी दोनचार गोष्टी बोलून दिवाणजींनीं यजमानांचा निरोप घेतला.

अंधारांत पलंगावर पडून गणपतराव मनांत विचार करूं लागले "मला इथें येऊन अडीच पावणे तीन महिने झाले असतील; पण तेव्हांपासून आतांपर्यंत एक दिवसहि कधीं आम्ही परस्परांपासून दूर झालों नाहीं. सबंध तीन दिवस ती माझ्या आतां दृष्टीला पडणार नाहीं! तीन दिवसांत मी जिवंत राहिलों तर घरीं परत येणार चौथ्या दिवशीं!"

तापामुळें व अशक्ततेमुळें फटफटीत झालेला आपल्या 'अर्धांगीचा' चेहरा गणपतरावांच्या नजरेसमोर दिसूं लागून, त्यांच्या हृदयाला भावी विरहाच्या यातना अधिकच होऊं लागल्या. मनांतल्या मनांत ते म्हणाले "अहाहा! जर एखादी मोटरकार असती माझी, तर आम्हा दोघांच्या मनाला फारशा विरहयातना भोगाव्या लागल्या नसत्या! रोज पहांटे उठून फों फों करीत, मोटर उडवीत, भिंगारडीला मी गेलों असतों अन् साहेबांची खुशामत, पूजाअर्चा, उठाबस काय ती करून, दुपारच्या जेवणाच्या वेळेला पुनः तिच्या खोलींत येऊन हजर झालों असतों! म्हाताऱ्याला मोटर घ्यायला मी किती सांगत होतों! पण जुनीं खोडें हीं! आपलाच हट्ट घेऊन कपाळ फोडीत बसायचे! आतां तीन दिवस ही बरी असली म्हणजे वांचलों मी म्हणायचा!"

प्रकरण दुसरें.

व्रतभंगाची शिक्षा!

दुसऱ्या दिवशीं जागे होतांच गणपतरावांनीं आपल्या नोकराला तावडतोब आंत पाठवून आपल्या पत्नीच्या तब्येतीची खबर आणविली. 'वहिनीसाहेबांना आतां पुष्कळच बरें वाटत आहे,' असें त्यानें येऊन सांगतांच गणपतरावजींच्या जिवांत जीव आला.

प्रातर्विधि आटोपून, चहा वगैरे घेऊन, गणपतरावजी आंत गेले. वहिनीसाहेबांच्या खोलीच्या दरवाज्यापाशीं ते जातात, तों दोघी स्त्रिया त्यांच्या पलंगावर टोकाशीं बसून त्यांच्याशीं बोलत आहेत, असें त्यांच्या दृष्टीला पडलें. गणपतराव आलेले दृष्टीला पडतांच त्या दोघीहि झट्कन् तेथून उठून पळून गेल्या!

क्षणभर बाहेर राहून गणपतराव हळुहळू आंत आले. त्यांनीं पाहिलें, तों पलंगाच्या कठड्याशीं एकावर एक तीन तक्के ठेवून वहिनीसाहेब त्यांना ओठंगून बसून राहिल्या आहेत, असें त्यांच्या दृष्टीला पडलें.

त्या स्थितींत आपल्या अर्धांगीला पाहून गणपतरावांना अत्यंत आनंद झाला. गणपतराव दृष्टीला पडतांच वहिनीसाहेब उठून उभें रहाण्याचा प्रयत्न करूं लागल्या.

"हं हं, हें काय करतेस? उठूं नकोस; उठूं नकोस. हे सारे मान न् लाजलज्जा तुझ्यामाझ्यामध्यें नाहीं, अन् आजारीपणाच्या स्थितींत तर अगदीं नाहींच नाहीं!"

वहिनीसाहेब मग उठल्या नाहींत. किंचित् हंसल्या मात्र.

पलंगाजवळ मांडलेल्या खुर्चीवर बसून गणपतरावांनीं विचारलें "काय? आतां कशी काय आहे प्रकृति तुझी? रात्रीपेक्षां कांहीं बरें वाटतें का?"

क्षीण स्वरानें वहिनीसाहेबांनीं उत्तर दिलें "आतां पुष्कळच बरं वाटतं."

"आतां ताप नाहीं ना कांहीं अंगांत?"

आपले मूळचे तांबडे लाल, परंतु आतां पांढरे पडलेले ओंठ किंचित् आकुंचित करून वहिनीसाहेबांनीं उत्तर दिलें "मला काय माहीत?"

"ह्मणजे?"

"ह्मणजे काय? अंगांत ताप आहे की नाहीं, हें अंगाला ठाऊक, मला ठाऊक नाहीं."

आपल्या पत्नीच्या या खोंचदार उत्तराचा खरा अर्थ काय, हें तत्क्षणीं गणपतरावांच्या ध्यानांत आलें. तिच्या कपाळावर हात ठेवून अथवा तिच्या हातांत हात घालून ताप आहे, अगर नाहीं, हें न पहातां आपण नुसती तोंडानें त्याबद्दल चौकशी केली, याबद्दल

तिनें सहज उत्तरांत कितीतरी कोमल, स्त्रीसुलभ अभिमान प्रकट केला हा !

विषादपूर्ण दृष्टीनें एकवार वहिनीसाहेबांच्या चेहऱ्याकडे पाहून व नंतर खालीं दृष्टि लावून गणपतरावांनीं एक उसासा सोडला, व ते खिन्न स्वरानें ह्मणाले " असें काय बरें, अनु ? तुला तर सर्व माहीत आहे !"

" काय माहीत आहे मला ?"

" आणखी निष्ठुरपणें असें काय विचारतेस ?"

" पण काय ?"

" माझें दुर्दैव काय अन् कसें आहे, हें तुला माहीत आहे, अनु !" गणपतरावांचा कंठस्वर या वेळीं अतिशय सद्गदित झाला होता. त्यांच्या हृदयांत या वेळीं प्रचंड खळबळ उडाली होती.

वहिनीसाहेबांनींहि एक मोठा निःश्वास टाकला. क्षणभर त्या स्तब्ध राहिल्या. नंतर तोंडावर बळेंच थोडें हंसें आणावयाचा प्रयत्न करून त्या ह्मणाल्या " नाहीं—नाहीं ! माझ्या मनांत तसं कांहीं नव्हतं हो ! मीं आपली थोडीशी थट्टा केली ! आपणाला राग का आला गडे ?"

" छे छे, राग कसला त्यांत ? अनु, तुझा मला कधीं तरी राग येणें शक्य आहे का ? माझ्या प्राणांचा प्राण, हृदयाचा विसावा तूं ! माझें जीवनसर्वस्व तूं—"

गणपतरावांच्या बोलण्याकडे विशेष लक्ष्य न देतां वहिनीसाहेब ह्मणाल्या " राग आला असला, तर मी आपली क्षमा मागतें हो पदर पसरून थट्टा करण्याबद्दल—"

" अग पण—"

" दुर्दैव आपलं, असं आपण ह्मणायचं. कां बरं बोल लावून घ्यावा भलताच आपल्या दैवाला असा ? खरोखरच आपलं हें दुर्दैव नाहीं. तूर्तातूर्तच्या गोष्टींवरच का नजर ठेवावी माणसांनीं—दूरचा परिणाम नको का पहायला त्यांनीं ? आपण जें व्रत घेतलं आहे, त्यानं आपलं आयुष्य वाढणार आहे, याहून एक तरी गोष्ट साऱ्या त्रिभुवनांत मला प्रिय असेल का ? शिवाय, हें व्रत पालन करण्यांत, मनाला आपल्या ताब्यांत ठेवण्याचें आपणामध्यें किती विलक्षण सामर्थ्य आहे, याची मनाला खात्री पटून आपणाबद्दल मला अतिशय अभिमान वाटतो. ही का आपल्या दुर्दैवाची गोष्ट ? छे छे गडे, असं भलतं न् सलतं कांहींतरी मनांत आणून वाईट वाटून घेऊं नये—आपल्या न् माझ्यासारखं सुदैव आहे कुणाचं ?"

" बरें सांग—ताप कसा आहे ?"

" खरंच बरं आहे आतां माझं—ताप पहांटेच्या सुमाराला काढला अगदीं—आतां बिलकूल नाहीं. आतांच चंपाताईनीं थर्मामिटर लावून पाहिला—साडेअठ्ठयाण्णव आहे सारा !"

यानंतर त्या उभयतांमध्यें औषधासंबंधाच्या, पथ्यपाण्याच्या, वैद्यबुवांच्या बऱ्याच गोष्टी झाल्या; परंतु आपल्या 'पतिराजां'चें मन नेहमींप्रमाणें प्रसन्न नाहीं, त्यांला आंतून कांहींतरी टोंचण्या लागल्या आहेत, ही गोष्ट वहिनीसाहेबांच्या लक्ष्यांत आल्याशिवाय राहिली नाहीं.

त्या ह्मणाल्या " हें असं काय हें गडे ? मला नाहीं हें बरं वाटत. "

" काय झालं ?"

" मघांपासून आपण असं उदासीनपणं कां बरें बसून रहायचं ? मी मघांशीं तसं बोललें ह्मणून ?"

" छे छे—भलतेंच !"

" पण मीं ती सारी थट्टा ह्मणून सांगितलं ना ?"

" अग पण मला त्याबद्दल खरोखरच कांहीं वाटत नाहीं. तुला त्यासंबंधानें खरोखरच कांहीं वाटायला नको. "

" मग कशाबद्दल आपल्या मनांत या वेळीं चालले आहेत विचार ?" आपली भेदक दृष्टि गणपतरावांच्या चेहऱ्याकडे लावून वहिनीसाहेबांनीं विचारलें.

गणपतराव क्षणभर स्तब्ध राहिले. नंतर ते ह्मणाले " हें पहा अनु, तूं भलतें न् सलतें कांहीं मनांत आणूं नकोस. तूं माझ्या व्रतासंबंधीं आज उल्लेख केलास, ह्मणून माझ्या मनाला वाईट वाटलें, असें नाहीं. पण तुला खरें सांगायचें ह्मणजे मला, हें व्रत पाळणें दिवसेंदिवस अगदीं कठीण होत चाललें आहे—माझ्या हृदयाला तें अगदीं असह्य होत चाललें आहे, असें सांगितलें पाहिजे. या व्रताच्या फेऱ्यांत सांपडल्यामुळें माझे प्राण अगदीं कंठाशीं आले आहेत, अनु ! तुला माझ्या स्थितीची कधीं यथार्थ कल्पनाहि येणें शक्य नाहीं !"

" असं काय ह्मणावं बरं ?"

" परंतु तुला मी निक्षून सांगतों, कीं, भलत्याच कल्पना मात्र तूं माझ्याविषयीं मनांत आणूं नकोस—"

वहिनीसाहेब 'पतिराजां'च्या तोंडाकडे पहात राहिल्या.

गणपतराव बोलूं लागले "अनु, माझ्या प्राणा, जोंपर्यंत तुझी प्रकृति उत्तम होती, तोंपर्यंत, व्रतामुळें तुला स्पर्शहि मला करतां येत नसल्यामुळें माझ्या मनाला अतिशय कष्ट होत होते, ही गोष्ट मी नाकबूल करीत नाहीं; परंतु ते कष्ट सहन करणें मला फारसें कठीण पडत नव्हतें, हीहि गोष्ट मी तुला सांगून ठेवतों. परंतु तुझी प्रकृति बिघडायला आरंभ झाला त्या दिवसापासून ते कष्ट मुकाट्यानें सहन करण्याची माझी शक्तिहि हळुहळू कमीकमी होत चालली आहे अन् सध्यां तर या बाबतींत मी अगदींच हताश अन् निर्बल झालों आहें. तुला ताप आला, म्हणजे त्याच्या वेदनांनीं तुझ्या शरीराची तळमळतळमळ चाललेली असतां, तुझ्या कपाळावर हातहि मला फिरवतां येऊं नये, यापेक्षां माझें दुर्दैव तें कोणतें ? अनु, तूं दुखण्यांत अतिशय निःशक्त झालेली असतां, लग्नाच्या वेळीं ज्या या हातानें मीं तुझें पाणिग्रहण केलें, तो हात देऊन तुला वर उठविणें मला अशक्य व्हावें अं ! तुला थंडी वाजूं लागली म्हणजे तुझ्या अंगावर लेप घालायला किंवा उघडे पडलेले पाय झांकून टाकायलाहि मला अधिकार नाहीं ! अनु, अनु, माझें भाग्य इतकें दुष्ट आहे ! हाय, अशा वेळीं मनांत काय होतें, तें तुला मी कोणत्या शब्दांनीं न् कसें सांगूं ? अशा वेळीं मला असें वाटतें, कीं, हें व्रतग्रीत आतां रगड झालें, आतां त्याची आपणाला बिलकूल जरुरी नाहीं; आजच्या आज तुझ्या पवित्र चरणांवर त्याचें उद्यापन करावें. तुझ्या पवित्र चरणांच्या सेवेपेक्षां कोणत्या व्रताचें पुण्य मला अधिक पारितोषिक देऊं शकणार आहे ?"

"छी छी ! असं मळतं न् सलतं मी नाहीं गडे बोलूं द्यायची हो आपणाला ! मी आपल्या चरणांची दासी ना ?"

"छट् ! तूं माझ्या हृदयाची देवता–सर्वस्वाची स्वामिनी !" गणपतराव उल्लसित वृत्तीनें म्हणाले.

"नाहीं–कांहीं झालं तरी मी असं होऊं देणार नाहीं." वहिनीसाहेब दृढ स्वरानें म्हणाल्या.

"काय नाहीं होऊं देणार तूं ?"

"आपल्या व्रताचा भंग ! मी आपल्या चरणांची दासी आहें–आपल्या म्हणण्याप्रमाणें हृदयाची–दे–स्वामिनीहि कदाचित् असेन—"

गणपतरावांनीं मध्येंच विचारलें "काय ? त्याबद्दल तुला अजून संशयच ?"

"नाहीं–संशय नाहीं. आपली मी सहधर्मिणी आहें, हें मात्र अगदीं निर्विवाद आहे. आपल्या धर्माचरणाला साहाय्य न होतां, मी आपल्या अधर्माला कारण होणं कालत्रयींहि संभवनीय नाहीं."

गणपतराव कांहींच बोलले नाहींत. ते त्या साध्वीच्या भावदीप्त मुखमंडलाकडे भक्तिभावानें पहातच राहिले. वहिनीसाहेबांच्या ठिकाणीं असलेली त्यांची आदराची आणि श्रद्धेची भावना या वेळीं शतपटीनें वृद्धिंगत झाली. त्या त्यांनां परमेश्वरापेक्षांहि पूज्य वाटूं लागल्या.

अशा स्थितींत दोन एक मिनिटें गेलीं. नंतर किंचित् हंसून वहिनीसाहेब म्हणाल्या "फक्त एकच गोष्ट घडून आली तर मी हें अगदीं आपलपोटेपणाचं काम करीनहि—"

"कसलें काम ?"

"आपल्या व्रताचा भंग !"

गणपतराव गोंधळलेल्या मुद्रेनें म्हणाले "काय म्हणतेस तूं, अनु ? माझ्या कांहींच लक्ष्यांत येत नाहीं !"

"एकच घटना घडून आली, तर ही व्रतभंगाची शिक्षा मी आपणाला दिल्याशिवाय कधींहि रहायची नाहीं—"

आश्चर्यचकित होऊन गणपतराव वहिनीसाहेबांकडे पाहूं लागले. कुतूहलाच्या जिज्ञासेनें त्यांनीं विचारलें "व्रतभंगाची शिक्षा ! तूं हें काय म्हणतेस ? कोणती गोष्ट घडून आली म्हणजे तूं ही शिक्षा देणार मला ? माझ्या कुठल्या अपराधा—"

वहिनीसाहेब हंसत हंसत मध्येंच म्हणाल्या "आपल्या हातून कधीं कांहीं अपराध होणं शक्य आहे, असं ज्या दिवशीं मला वाटेल, तो दिवस माझ्या आयुष्याचा शेवटचा होवो !"

"मग–मग—"

वहिनीसाहेब हळुहळू बोलूं लागल्या "आपल्या या व्रताची सांगता व्हायला आतां सवातीन साडेतीन महिने राहिले आहेत. तें सांग होण्यापूर्वींच जर परमेश्वराच्या दयेनं माझा अंतकाल येऊन ठेपला—"

गणपतरावांच्या अंगावर कांटाच उभा राहिला ! निर्भर्त्सनेच्या तीव्र स्वरानें ते म्हणाले "छी छी, अनु, काय अमंगल बोलतेस हें ? असे दुष्ट शब्द तोंडावाटे

काढणें तरी योग्य आहे का तुला ? छट्–असे अमंगल शब्द—"

वहिनीसाहेब उत्तेजित स्वरानें म्हणाल्या "अमंगल ! गडे, यापेक्षां मंगल, यापेक्षां पुण्यप्रद अशी कोणती गोष्ट स्त्रीला या जगांत असूं शकणार आहे ? यापेक्षां कोणतं परमभाग्य तिच्या कपाळीं असणार आहे ?"

गणपतराव खालीं पहात स्तब्ध बसले.

"त्या दिवशीं मात्र मी अगदीं कसलाच नाहीं हो विचार करणार !" मृदु हास्य करीत पतीच्या मुखाकडे पहात वहिनीसाहेब म्हणाल्या. "मुळींसुद्धां आपलं मी ऐकणार नाहीं. त्या दिवशीं ही व्रतभंगाची शिक्षा आपणाला भोगावीच लागेल ! मरतांना आपल्या मांडीवर मस्तक ठेवून मी मरेन अन् भरल्या कुंकवांनीं मी हंसत हंसत स्वर्गाला निघून जाईन ! त्या दिवशीं मात्र आपलं हें व्रतबीत मी कांहींएक मानायची नाहीं !"

बोलतां बोलतां वहिनीसाहेबांचा गळा अगदीं भरून आला, आणि डोळ्यांत अश्रुबिंदु चमकूं लागले. त्यांच्या मुखमंडलावर मृदु हास्याचें शांत मधुर तेज आणि डोळ्यांत अश्रुबिंदु, हा केवळ स्वर्गीय देखावा पाहून पापी गणपतराव अगदीं स्तंभितच झाले ! एखाद्या मंत्रमुग्धाप्रमाणें ते वहिनीसाहेबांच्या चेहऱ्याकडे पहातच राहिले.

परंतु हें कांहीं क्षणपर्यंतच ! हळुहळू गणपतरावांच्या हृदयाला अपार तीव्र यातनांचा अनुभव येऊं लागला. या वेदना केवळ आत्मग्लानीपासूनच उत्पन्न झाल्या होत्या–स्वतःचा स्वतःलाच जो त्यांना भयंकर धिक्कार वाटूं लागला होता त्याच्या या यातना होत्या !

पतिराजांच्या हृदयांत कसला तरी कल्लोळ चालला आहे, हें त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेल्या विकारप्रतिबिंबावरून वहिनीसाहेबांच्या लक्ष्यांत यावयाला फारसा वेळ लागला नाहीं. आपल्या मरणाची गोष्ट निघाल्यामुळें, आपल्या पतीच्या मनाला अशा यातना होत असाव्या असें त्यांना वाटलें. आतां चालू गोष्टींचा प्रवाहच फिरवून टाकणें इष्ट आहे, असा त्यांनीं विचार केला.

पदराच्या टोंकानें डोळे झट्कन् पुसून वहिनीसाहेबांनीं विचारलें "हें ऐकलं हें खरं गडे ?"

"काय तें ?"

"कीं, कलेक्टरसाहेब आपल्या इनामतींतल्या कुठल्याशा गांवीं यायचे आहेत !"

"हो–येणार आहेत, असें कालच काकांनां त्यांच्या चिटणिसांचें पत्र आलें आहे."

"कुठल्या गांवीं ?"

"भिंगारडी म्हणून आपला एक गांव आहे तिथें."

या वेळीं गणपतरावांची स्थिति चमत्कारिक झाली होती. चुलींतून निघून आपण वैलाकडे चाललों आहों, असें त्यांनां वाटूं लागलें.

"भिंगारडी आहे मला माहीत. किती बरं दूर आहे ती ?"

"निजसुरीजवळ."

"अगबाई ! म्हणजे बराच लांब आहे म्हणायचा ! बरं, साहेबांबद्दलची सारी व्यवस्था झाली का नीट ?"

"हो, झालीच म्हणायची !"

"मुंबईहून बरेंच जिन्नस आणायचे असतील ? कोण गेलं आहे मुंबईला ? काका का ?"

"छेः— गोविंदरावांनां पाठविलें आहे काकांनीं."

"हो–तेंहि ठीक आहे—"

"जिन्नसपान्नस आणायला गोविंदराव गेले आहेत. दुसऱ्या खाण्यापिण्याच्या जिनसांची नीट व्यवस्था ठेवावी म्हणून निजसुरीच्या कारभाऱ्यांनां काकासाहेबांनीं कालच पत्र रवाना केलें आहे. ही सारी व्यवस्था तर ठीक झाली. परंतु—"

"परंतु काय ?"

"मी मोठ्या मुष्किलींत पडलों आहें."

"कशाबद्दल ?"

दिवाणजींबरोबर गेल्या रात्रीं ज्या ज्या गोष्टी झाल्या, त्या त्या सर्व गणपतरावांनीं हळुहळू वहिनीसाहेबांनां सांगितल्या. नंतर त्यांच्याकडे अत्यंत खिन्न दृष्टीनें पहात ते म्हणाले "तुझ्या प्रकृतीची ही स्थिति–अन् हे तीन दिवस तुला सोडून मी तिकडे राहूं तरी कसा ? खरेंच अनु, मी मोठ्या संकटांत सांपडलों आहें."

वहिनीसाहेब चारदोन क्षण विचार करीत राहिल्या. त्यांच्या मुखमंडलावर आतां अभिमानाची छटा अधिकाधिक दाट दिसूं लागली. त्या झट्कन् बोलून गेल्या "तीन दिवस मला सोडून रहायचं तर इतक्या संकटांत पडायचं–मग सबंध सोळा वर्सं मला सोडून कसं रहायला झालं बरं ?" वहिनीसाहेबांचे ओंठ थरथर हालत होते !

"त्या वेळीं तुला मी नीट ओळखीत नव्हतों तुझी योग्यता त्या वेळीं मला चांगली ठाऊक झाली नव्हती !"

गणपतरावांच्या मनांत या वेळीं वहिनीसाहेबांच्या शिवाय दुसरे कोणते विचार खेळत असणार ? ते विचार करूं लागले ‘ हाय ! आज कांहीं फिरून आपणाला तिचें दर्शन घडावयाचें नाहीं. उद्यांहि ती देवी आपणाला दिसावयाची नाहीं—परवांहि आपण तिच्या पुण्यदर्शनाला पारखेच असणार ! त्याच्या दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं घरीं परत आल्यावर आपणाला ती दिसेल !’ आपली प्रियतमा या वेळीं काय करीत असेल, कोणाशीं काय बोलत असेल, तिच्याजवळ या वेळीं कोण कोण असतील; आपण निघालों त्या वेळीं तर तिच्या अंगांत ताप बिलकूल नव्हता; आतांहि तिचें अंग तसेंच असेल, कीं, हुडहुडी भरून तिला ताप भरूं लागला असेल; कदाचित् ताप पूर्ण चढून तिची सारखी काहिली आणि तळमळतळमळ चालली असेल कीं काय, हे व असेच दुसरे अनेक विचार गणपतरावांच्या मस्तकांत तांडव घालूं लागले.

गणपतरावांच्या हृदयाला भयंकर यातना होत होत्या, त्या केवळ या एका विचारामुळें—तीन दिवस आपल्या हृदयवल्लभेचें आपणाला दर्शनहि होणार नाहीं ! आणि चवथ्या दिवशीं तरी ? होईल का आपणाला तिचें पुण्यपावन दर्शन ? हो—मनुष्याचें आयुष्य ! केवळ कमळावरचें पाणी ! आतां आहे—क्षणार्धांत पार नाहीं ! काय—कसें सांगतां येईल ?. आणि—आणि—बाणथडीला जातांच जर आपल्या कानांवर येऊन आदळलें, कीं, वहिनीसाहेबांनीं काळव आपली आठवण काढीत स्वर्गाला प्रयाण केलें ! बोलूनचालून ताप तो ! महा-हरामखोर—अत्यंत विश्वासघातक भयंकर रोग ! कधीं, कसा, कोणाचा केंसानें गळा कापील, याचा बिलकूल नियम नाहीं !—

बाणथडीला जातांच जर आपणाला आढळून आलें, कीं, आपला सर्वनाश झाला—ती देवता आपला आणि सर्वांचा—राजसंसाराचा—लोभ सोडून स्वर्गाला निघून गेली ! सर्व वाड्यांत हलकल्लोळ उसळला आहे—आईसाहेब शोकानें छाती पिटीत आहेत, सर्व नोकरचाकर ‘ गेली, आमची बाई गेली !’ असा काळाचेंहि हृदय विदारून टाकील असा प्रचंड आक्रोश करीत आहेत, तिच्या मैत्रिणी हंबरडा फोडून ‘वहिनीसाहेब, आह्मांला कुणाच्या पदरांत निरवून गेलां ?’ असें ओरडत आहेत, वृद्ध काकासाहेब कपाळाला हात लावून बसले आहेत, त्यांच्या छातींत प्रत्यक्ष पोटच्या मुलीच्या मृत्यूच्यापेक्षांहि भयंकर शोकाचा अंगार पेटला आहे—गांवांतील शिष्टशिष्ट ह्मातारी व पोक्त मंडळी वाड्याच्या अंगणांत जमली असून कोणी मुकाट्यानें तिच्या शेवटच्या मिरवणुकीची तयारी करीत आहेत—कोणी तोंडाला उपरण्याचें टोंक लावून ‘ मुलगी मोठी सद्गुणी —प्रत्यक्ष स्वर्गांतली देवी ! नवऱ्यानें मात्र कसाबानें भारी छळलें तिला ! नानासाहेबांनीं या वेळीं तरी जायला नको होतें—नवऱ्याच्या मांडीवर तरी मरण आलें असतें बिचारीला,’ अशी हळुहळू कुजबूज करीत आहेत! आंत तिच्या खोलींत—तिला दर्भशय्येवर जमिनीवरच—

गणपतरावांच्या हृदयांत वृश्चिकदंशाच्या यातना होऊं लागल्या; सर्व शरीरावर कांटा उभा राहून दरदरां घाम सुटला असतांहि अंगाची आगीआग होऊं लागली; त्यांनीं विकलतेनें आपले डोळे मिटले. मिटलेल्या डोळ्यांतूनहि अश्रूंचे ठिपके टपाटप खालीं गळून गाडीची गादी भिजूं लागली.

अशा स्थितींत कांहीं वेळ गेला. गणपतरावांनीं हळुहळू डोळे उघडले—हळुहळू ते उठूनहि बसले. आपल्या कफनीच्या शेवटानें एकवार डोळे चांगले पुसून ते मनाशींच ह्मणाले “ नाहीं, तसें होणें शक्य नाहीं ! देव दयाळु आहे—तो माझ्यावर इतका दारुण वज्राघात कसा करील ?”

परंतु विजेच्या झटक्यासारखी गणपतरावांच्या मनांत तत्क्षणीं दुसरीहि एक कल्पना आली—“ परमेश्वर दयाळु असला, तरी माझ्यावर तो दया कां करील अन् त्यानें तरी कां करावी ? मी महापापी ! माझ्या पातकांनां कांहीं तरी सीमा आहे का ? प्रत्यक्ष नरकहि मला पाहून शेंकडों योजनें दूर पळून जाईल ! हाय ! किती घोर माझीं पातकें ! एखाद्या फुलाप्रमाणें जिचें हृदय निर्मळ आणि कोमल, जगदुद्धार करणाऱ्या जान्हवी-मातेप्रमाणें जी स्निग्ध आणि पवित्र, तिचा केंसानें गळा कापून मी तिचा सर्वनाश करायला बसलों आहें ! आपल्या परम पवित्र, परम निर्मळ, परम मंगल अशा कन्येचा सत्यानाश करणाऱ्या मला अधमाधम नीच पापी चांडालाला, परमेश्वर कितीहि दयाशील असला, तरी क्षमा कशी करील ?”

विचार करतांकरतां गणपतरावांनीं दोन्ही हातांनीं तोंड घट्ट झांकून घेतलें. त्यांच्या डोळ्यांतून पुनः झरझर आंसवें गळूं लागलीं.

अशा स्थितींत आणखी एक तास गेला आणि गाडी एका लहानशा गांवांत शिरली. रस्त्याच्या बाजूला एक मोठें थोरलें छायाळ वडाचें झाड असून जवळच पायऱ्या बांधून काढलेली एक विहीर होती. जवळच गूळ, तूप, तेल, पीठ, मीठ विकणाऱ्या वाणीदादांचें एक लहानसें दुकानहि होतें. गाडीवाल्यानें या वडाच्या झाडाखालीं, शीतल छायेंत गाडी आणून उभी केली.

खालीं उतरून गाडीवाला हात जोडून ह्मणाला "हुजूर, हुकूम होईल तर या ठिकाणीं थोडें खाऊन पाणीबिणी पितों न् घोड्यांनांहि पाजतों—भारी दमलीं आहेत जनावरें."

"ठीक आहे—हा घे रुपया अन् दुकानांतून कांहीं मिळत असेल तर आणून खा." असें ह्मणून गणपतरावांनीं ठण्कन् त्याच्याकडे एक रुपया फेंकला. गाडींत बसून बसून त्यांचें शरीरहि थोडें आंबल्यासारखें झालें होतें ह्मणून तेहि गाडींतून खालीं उतरले.

"कोणतारे गांव हा?" त्यांनीं विचारलें.

"या गांवाचें नांव तानवडें, हुजूर ! इथें ब्रह्मदेवबुवा ह्मणून एक मोठे साधु होऊन गेले, त्यांची समाधि आहे जवळच. पहाण्यासारखें ठिकाण आहे हुजूर."

"तुम्ही खाऊन घ्या न् थोडे पडा. घोड्यांनांहि चांगलें पाणीबिणी पिऊन ताजेतवाने होऊं द्या. त्यांची चंदीबिंदी आहे ना बरोबर नीट?"

"होय, हुजूर."

कोचमन आणि सैस हातपाय धुण्यासाठीं विहिरीच्या पायऱ्या उतरूं लागले. गणपतराव हळूहळू हिंडतहिंडत गांवामध्यें शिरले. बुवांच्या समाधीचें दर्शन घेतल्याशिवाय रहावयाचेंच नाहीं, असा कांहीं त्यांचा निर्धार नव्हता. कोचमनाचें व घोड्यांचें खाणेंपिणें उरकतें आहे, तों गांवांत जरा पाय मोकळे करून यावें, तितक्यांत समाधीचें दर्शन झालें, तर तेंहि घेऊन यावें, या हेतूनें गणपतरावांनीं सहज गांवाची दिशा धरली.

गांव दिसत होता गचाळच ! घरें ठेंगू, गलिच्छ आणि पेबलट दिसलीं. त्यांचीं धाबीं तर जंगी पावसांत 'दणाणून' जाण्यासारखीं दिसत होतीं. घरांचीं अंगणें अस्वच्छ असून मध्येंच एखादें छोटें तुळशीवृंदावन आणि भोंवतीं खुशाल गवत रुजलेलें, असाच देखावा गणपतरावांनां बहुतेक जागीं दिसला. ब्राह्मणवस्ती त्यांनां फारशी कोठें आढळूनहि आली नाहीं. लहानमोठीं कोंबडीं आणि मधुनमधून शेळ्याहि अंगणांत भटकतांना दिसत होत्या. कोठेंकोठें ओसरीवर उखळ्यांतून कांडण चाललें असून बऱ्याच ठिकाणीं एक अगर दोन स्त्रिया दळणांत व पाणीं गाण्यांत दंग होऊन गेलेल्या दिसल्या. घराच्या पायऱ्यांवर बसून सभोंवतालीं गोंधळ घालणाऱ्या पोरांनां मधुनमधून दबकावीत एखादी स्त्री आपल्या तान्हुल्याला अंगावर प्रेमानें पाजीत असलेलीहि आढळत होती.

हा सर्व देखावा पहातपहात गणपतराव पुढेंपुढेंच चालले होते. जवळपास कोठें तरी ब्रह्मदेवबुवांची समाधि आपणाला सहजगत्या दिसेल, आणि तिचें दर्शन घेऊन आपण परतूं, असा त्यांचा हेतु होता. परंतु त्यांनीं कोणापाशींहि समाधीची नुसती चौकशीहि केली नाहीं.

गणपतराव आणखी थोडेंसें चालून गेले, तों त्यांनां असें आढळून आलें, कीं, एका झोंपडीसमोरच्या अंगणांत बरीच गर्दी जमली असून तेथें मोठी गडबड उडून राहिली आहे. एक माणूस एका मलत्या गलेलठ्ठ बोकडाला, गळ्याला दोरीनें बांधून जोरानें ओढीत असून तोंडानें अचकट विचकट शिव्या देत होता. आणि बाकीचे लोक तो 'तमाशा' पहात एकमेकांशीं कुजबुजत व बोलत होते. बोकडाशेजारींच एक मराठा—वयानें पन्नाशी उलटलेला—उभा असून तो उलट दिशेनें त्याची दोरी खेंचीत असून तोंडानें "प्राण गेला तरीबी चालल—पन ह्यो गजा माजा न्हे देनार—बस्स !" असें मोठमोठ्यानें श्वास टाकीत ओरडत होता. त्याच्या 'गजा' बोकडाला ओढणाराहि मराठाच असून त्याच्या काखेला एक लठ्ठ सोटा, डोकीला हिरवें मुंडासें व अंगांत तालीमबाजी सदरा, असा त्याचा वेष होता.

"काय येत न्हैस? अरं ल्योका, तुजा बा देईल—तुजा आजा येईल! काय समजला हैस तूं! अर, सावकाराचा हुकूम है तुज्या! न्है येत? रुपये येकी फेकुनशान त्येचे!" असें तो शिपाई दरडावून म्हणाला.

दुसरा एक तत्पक्षीय तमासगीर ओरडला "न्है तर करुनशानी टाका शिपाईबुवा, यासंग त्याची बी चटनी!" असें म्हणून तो खदखदां हंसला.

तो मराठा चवताळून म्हणाला "अर, सावकासच काय दोन चव्वलं लागतुया मी? जा फिर्यादी कर म्हणावं माज्यावर. वखुतसर व्याज पोंचवलें मी त्याला न् मुदत भरल्यावर एक दिवस न्है येका ठेवनार

हरामजाद्याचा ! या गजाला म्यां बच्चेपनापासन पोसला न् पोटच्या पोराप्रमानं वाढवला–त्येस्नी चरचरा चिराया देऊं व्हे खाटकाच्या सुरीखालीं ? न्है देनार. अर, ह्योतर सुद जुलूम झाला !"

झोंपडीच्या दरवाज्याशीं दहाबारा वर्षांचा एक मुलगा रडवें तोंड करून उभा असून एकेकदां शिपाया-कडे, 'गजा'च्या मालकाकडे आणि गजाकडे केविलवाण्या नजरेनें पहात होता. मुलाच्या जवळच एक पोक्त बायको, हातीं पिठाची चाळण घेऊन खिन्न मुद्रेनें उभी होती. ही त्या मुलाची आई आणि 'गजा'च्या 'बापा'ची बायको असावी. ही खरोखरच 'लंकेची पार्वती' शोभण्यासारखी–दागि-न्यांच्या बाबतींत तरी होती.

सर्व हकीगत आतां गणपतरावांच्या लक्ष्यांत आली. रस्त्यावरून अंगणांत येऊन ते म्हणाले " कायरे इथें तुम्हीं ही कसली गडबड चालवली आहे ?"

'गजा'चा मालक नमस्कार करून म्हणाला "दंडवत बुवासाहेब ! आपुन साधुबैरागी–आम्हा साऱ्यांस्नीच येवासमान हैसां—आपुनच करा न्याव. ह्यो माझा 'गजा' बोकड है, यास्नी मी बच्चेपनापास्नं खाऊं जेऊं घालूशान वाढिवला. पोटच्या पोरासारका है ह्यो मला. वखुताला म्यां न्है खाल्लं–पन यास्नी घातलं अन् इक्का मोठा क्येला. लईच पिरेम वाटतं आम्नां, या पोरास्नी न् या माझ्या कारबारनीस्नी या गजाबद्दल. आम्हां साऱ्यांच्या पेरमाचं जनावर आमी काय म्हणून द्यावं ! असल्याल म्होट सावकार तर ग्येतील पैस—"

तो शिपाई ओरडला " बघुनशानी घ्या ल्येकाचा नूर ! आमच्या धनीसाबांचं शेत करतुयास, मायंदळ रुपयेबी घेतले हैस न् बोकड मागल्यात तर त्यास्नी खाप नाहीं म्हनतुयास है ? थुः तुज्या तोंडावर ल्येका. अर, सावकारांकडे आमच्या उद्यां खाना है–ममईहून बड़बड लोक यायचे हैत त्येंच्याकड खान्याला–मग तुज्या गजाला न्है कापायचा तर ल्येका, तुला कापून ठेवायचा व्हय त्येंच्यापुढं ? मग बोल-बऱ्या बोलानं देनार हैस का पैजारा मोजाया होव्या पाटीवर तुज्या ?" असें ह्मणून त्यानें 'गजा' बांधलेल्या दोरीला एक सपाटून हिसका मारला; त्याबरोबर 'गजानना'ची तुंदिल स्वारी मातींत धाड्दिशीं आपटून ब्यां ब्यां करूं लागली.

हा सारा प्रकार पाहून गणपतरावांच्या तळपायांची आग मस्तकाला गेली. ते ओरडून म्हणाले " कोण रे तूं हरामजाद्या ? "

शिपाई तोंडें वेडींवाकडीं करीत, हेटाळणीनें हंसत हंसत म्हणाला " अरारारारा ! मोटा अगदी गवंडरच आला लेकाचा, बरं का ! अर ह्याय ठावं सारं–तुज्यासार लई बैरागी पायल गांजेकस !. मी कोन त्येची तुला काय चौकशी र ? मी है इतल्या घाटग सावकारांचा शिपाई न् ह्यो ग्यानबा है त्येंच कूल ! बैरागीबुवा, मुकाट्यानं वाटेनं चालूं लागा–न्है तर माज्याशीं गाट है–गांजा न पितां काजवे दिसूं लागतील ! "

हे शब्द ऐकतांच गणपतरावांचा राग अगदीं अना-वर झाला. बेफाम होऊन ते ओरडले " चूप रहा हराम-खोरा ! ज्याचा जिन्नस तो जर देत नाहीं, तर तूं काय त्याच्यावर जबरदस्ती करणार, पाजी माणसा ?"

ग्यानबाच्या बाजूची कितीतरी मंडळी त्या घोळक्यांत होती; परंतु त्यांपैकीं बरेच घाटग्यांचीं कुळें असल्यामुळें तोंडांतून 'ब्र' काढावयालाहि ते कचरत होते. एका वाटसरू अपरिचित बैराग्यानें दिलेल्या जोरामुळें आतां त्यांनां खूबच उत्तेजन आलें, व त्यांनीं त्या शिपायावर एकच गिल्ला करून सोडला. कोणी म्हणाले 'देऊं नका व ग्यानबा ! अवो, गजा तुमचा का सावकाराच्या बाचा ?' कोणी म्हणाले 'ह्या शिपुरडा ल्येकाचा जुलूम करतो व्हय ? पघूं या तर मजाच साल्याची आतां–आमच्या समूर जा पघुं घेऊन गजाला ! थुः तुज्या तोंडावर ल्येका !' कोणीं कोणीं तर घाटगे सावकारांनां उद्देशून याहिपेक्षां चव्या शिव्या द्यावयाला सुरुवात केली.

या साधुबैराग्याच्या शापाच्या भयानें असो, किंवा ग्यानबाच्या बाजूच्या मंडळीचा जमाव आणि जोर हीं दोन्ही वाढत चाललीं आहेत हें पाहिल्यामुळें असो, शिपाईबुवांची मिजास आतां खूबच नरम आली. स्वर खालवून तो म्हणाला " आमी काय मोफत मागतों का काय बोकड ? बोल, काय किंमत है ती न् घे गिगून रोक ! ह्ये बग पैस ! "

ग्यानबा ओरडून म्हणाला " अरे दे फेकुनशान तुज पैस त्या हिरींत ! अर ज्याच्यावर मी पिरेम करतुं, त्येच्याच गळ्यावर सुरी ठेवूं देईन व्हय मी ? न्है–कदीबी न्है–परान गेला तरीबी न्है !" असें म्हणून ग्यानबानें गजाच्या गळ्याला प्रेमानें मिठी मारली.

सर्वजण ओरडले "शाबास ग्येनबा ! पिरमाच्यांच मानेवर सुरी चालवयची व्हय ! थू : त्या जिनगानीवर !"

गणपतराव दरडावून ह्मणाले "अरे ए घाटग्यांच्या शिपुरड्या, जास्त फजिती नको असली, तर मुकाट्यानें इथून तूं चालता हो. तुझ्या सावकारांनां जर बोकड खायची इच्छाच झाली असली, तर जो स्वतःच्या खुषीनें आपला बोकड विकायला तयार असेल, त्याच्याकडून विकत घेऊन खुशाल जा. गरीबांवर जुलूम-जबरदस्ती केलीस, तर याद राखून रहा !"

शिपाईबुवा गणपतरावांकडे दृष्टिहि न फेकतां, आवेशानें हात हलवीत हलवीत ओरडूं लागले "ब्येस है-ब्येस है ! पघतुंयाच आतां तुह्मां साऱ्यांची मजा ! घाटग सावकाराचा अपमान करतां नव्ह का ? मजाच पघा आतां साल्यांनों !" असे गर्जतगर्जत शिपाईबुवा एक एक पाउल मागें घेत तेथून निघून गेले.

शिपाईबुवांची ही शेवटची दरडावणी ऐकून ते सारे लोक अगदीं गर्भगळीत होऊन गेले असावे, असें गणपतरावांनां स्पष्ट आढळून आलें. ते आपसांत ह्मणूं लागले "इचिभन, लईच वाइट गोष्ट झाली ! सावकार आतां येकेकाची मुंडीच मुरगाळूनशान टाकील ग्यानबा!"

ग्यानबा आवेशानें ह्मणाले "अर टाकील तर टाकील ! सावकार काय करनार-फार तर मारून टाकील ! मरून जाऊं-है काय त्येंत ? पन् या माझ्या पिरतीच्या जनावराची मुंडी मुरगळाया न्है येनार !"

गणपतराव ह्मणाले "अरे, इकडे पहा-हे तुमचे घाटगे सावकार मोठे दुष्ट आहेत असें दिसतें. जर या गोष्टीमुळें चिडून जाऊन त्यांनीं तुह्मांला कांहीं त्रास दिला, तर तुह्मी कलेक्टरसाहेबांकडे आपली फिर्याद नेऊन गुदरा. कलेक्टरसाहेबांचा तंबू उद्यां भिंगारडीला पडायचा आहे न् तीन दिवस तिथें त्यांचा मुक्काम आहे. तुह्मी सर्वजण मिळून भिंगारडीला जा न् कलेक्टरसाहेबांपाशीं आपली दाद लावून घ्या. मी पण तिथेंच आहें. मी तुह्मांला पूर्ण मदत करीन." असें ह्मणून गणपतराव तेथून निघाले. सर्व मंडळी त्यांनां आदरपूर्वक दंडवत् करूं लागली..

त्या वडाच्या झाडाशीं जाऊन गणपतराव पहातात, तों कोचमन वगैरे मंडळी खाऊन पिऊन तयार असून घोडेहि ताजेतवाने झाले आहेत, असें त्यांनां आढळून आलें. ते आंत बसल्यावर थोड्या वेळानें गाडी आपल्या रस्त्यानें निघाली..

गाडींत बसल्याबसल्या नुकत्याच घडून आलेल्या गोष्टींचें गणपतराव मनांतल्या मनांत पर्यालोचन करूं लागले. सर्व गोष्टींमध्यें ग्यानबाचें 'ज्येच्यावर पिरीम करतूं, त्येच्या गळ्यावर सुरी ठेवूं देइन व्हय मी ?' हे शब्द त्यांच्या कानांमध्यें एकसारखे प्रचंड नादानें घुमूं लागले. हा ग्यानबा म्हणजे एक गरीब अशिक्षित मराठा; परंतु आपल्या जुलमी सावकाराच्या भयंकर क्रोधाची उपेक्षा करून, कांहीं तरी भयंकर संकट आपणावर ओढवणार आहे हें पक्कें माहीत असतांहि त्याबद्दल पूर्णपणें बेफिकीर राहून आपल्या प्रेमाच्या जनावराचें त्यानें खाटकाच्या सुरीपासून रक्षण केलें. त्याच्या मानेवरची सुरी त्यानें आपल्या मानेवर ओढून घेतली; या त्याच्या स्वार्थत्यागामुळें ग्यानबाविषयीं गणपतरावांनां अत्यंत आदर वाटूं लागला; तो ज्ञानानें व पैशानें कितीहि कमी असला, तरी खरोखर तो मनानें थोर आहे, अशी त्यांची खात्री झाली. ते मनांतल्या मनांत उद्गारले "माणसाचें वर्तन नेहमीं असें असलें पाहिजे!"

या मधल्या हकीगतीमुळें गणपतरावजींचें मन अत्यंत क्षुब्ध होऊन गेलें होतें, तें हळूहळू शांत झालें. त्यांच्या अन्तःकरणांत आतां आपल्या अर्धांगीविषयींचे विचार पुनः खेळूं लागले. आपण येतांना तर तिची प्रकृति पुष्कळ चांगली होती; ताप वगैरे कांहीं नव्हता. खोकला थोडासा होता; परंतु त्याबद्दल कांहीं काळजी करण्याचें कारण नाहीं, असें खुद्द वैद्यबुवांनींच आश्वासन दिलें होतें. गणपतरावांनां वाटूं लागलें ' ' आईसाहेबांनीं सुचविल्याप्रमाणें आतां वैद्यबुवांचें औषध पुरें करावें. भिंगारडीहून परत घरीं गेल्यानंतर मिरजेहून अगर खुद्द मुंबईहूनच उत्तमांतला उत्तम गोरा डॉक्टर आणून त्याला एकदां वहिनीसाहेबांची प्रकृति दाखवावी. त्यानें जर हवा बदलण्याविषयीं सल्ला दिली, तर तिला एखाद्या हवाशीर ठिकाणीं ताबडतोब घेऊनहि जावें. डॉक्टर सल्ला देतील त्या ठिकाणीं-महाबळेश्वरीं, नैनितालला किंवा ते सांगत असतील तर खुद्द काश्मीरलाहि आपल्या अर्धांगीला घेऊन जावयाचें; त्यांत आतां कसला आळस किंवा कसूर ह्मणून करावयाची नाहीं,' असा गणपतरावांनीं आपल्या मनाशीं निर्धार केला. 'हवापालट करून तेथें महिना दोन महिने राहिलें, कीं, वहिनीसाहेबांची प्रकृति पूर्णपणें सुधारेल, मग पुढील

आयुष्य तिच्यासह आपण केवळ ब्रह्मानंदांत कंठूं,' अशा मनोराज्यांत ते गुंग होऊन गेले. 'आपल्या खोट्या व्रताला जवळजवळ तीन महिने झाले. अजून तीन महिने राहिले आहेत. ते पुरे झाले, कीं,—'

गणपतरावांच्या हृदयांत विलक्षण चमकच निघाली ! त्यांच्या सर्वांगांतून दरदरां घाम निथळूं लागला, चेहरा पांढरा फटफटीत होऊन गेला ! कोणी तरी आपल्या हृदयांतील अत्यंत नाजूक असा मर्मभाग ज़ोरानें आवळून धरीत आहे, असें त्यांनां वाटूं लागलें. त्यांचे डोळे तारवटल्याप्रमाणें झाले, नाकपुड्या भात्याप्रमाणें वर-खालीं होऊं लागल्या, श्वासोच्छ्वास अतिशय वेगानें सुरू झाला. त्यांनां भयंकर वेदना होऊं लागल्या.

हळुहळू, थोडथोडें, गणपतरावांचें मस्तक खालीं-खालीं जाऊं लागलें. या स्थितींत, अगदीं स्तब्धपणें ते बराच वेळ बसून राहिले होते. त्यांच्या मस्तकांत विचार-विकारांनीं नुसती आगीआग भडकावून दिली होती. त्यांच्या मिटलेल्या डोळ्यांतून टपाटप टपोरे अश्रुबिंदु एकसारखे खालीं पडूं लागले.

शेवटीं गणपतराव आपणाशींच अस्फुट स्वरानें ह्मणाले "ग्यानबा निरक्षर, अकलशून्य मराठा; परंतु त्याला जी धर्माची, कर्तव्याची जाणीव आहे, ती मला नाहीं ! मी ब्राह्मण, शिकलासवरलेला, उच्च संस्कार माझ्यावर झालेले, परंतु घोर स्वार्थानें मी नीचाहून नीच, अधमाहून अधम, चांडाळाहून चांडाळ बनलों आहें, ग्यानबाचें प्रेम ज्याच्यावर जडलें होतें त्या प्रेमाच्या जनावराच्या मानेवर कुणी सुरी घालील या भीतीनें त्याच्या बदलीं आपला प्राण द्यावयाला तो तयार झाला, अन् मी—मी चांडाळ—जिच्यावर माझें प्रेम, जी माझ्या प्राणांचा प्राण, तिचा आपल्या हातानें, केंसानें गळा कापायला मी सिद्ध झालों आहें ! शतवार धिक्कार असो मला अन् माझ्या अदृष्टाला !"

प्रकरण चवथें.

व्याधीचें भयंकर स्वरूप !

भिंगारडील कलेक्टरसाहेबांच्या पूजेंत आणि उपासनेंत गणपतरावांनीं तीन दिवस घालविले. काकासाहेबांनीं उपदेशिल्याप्रमाणें त्यांनीं साहेबांची, त्यांच्या चिटणीसांची आणि खानसाम्याची खुशामत केली, तेव्हां या घोर तपश्चर्येनें गणपतरावांवर या साऱ्या देवता प्रसन्न झाल्या ! " Oh Mr. Patwardhan, you are a nice man !" असे साहेबांच्या तोंडचे उद्गार ऐकून गणपतराव तीनहि जगांत धन्य धन्य झाले !

तीन दिवस या तपश्चर्येंत घालवून चवथ्या दिवशीं गणपतराव बाणथडील परत आले. ते वाड्यांत पोहोंचले तेव्हां संध्याकाळचे चारसाडेचार वाजण्याचा सुमार झाला होता.

नानासाहेबांनां पाहून सर्वजण आश्चर्यानें अगदीं थक्कच होऊन गेले. या तीन दिवसांत त्यांचा चेहरा अगदीं पांढरा फिकट होऊन गेला होता. डोळे अगदीं निस्तेज बनून खोल गेले होते. डोळ्यांभोंवतालची कातडी काळी पडली होती. गणपतराव अगदीं निस्तेज, अशक्त झाले असून साऱ्या तीन दिवसांच्या अल्पावधींत त्यांच्यावर अकालवृद्धत्वाची छटा पूर्णपणें पसरली होती!

गणपतराव गाडींतून उतरले ते तडक आंत गेले व आईसाहेबांच्या खोलींत जाऊन त्यांनीं त्यांच्या पायांवर मस्तक ठेवलें. त्यांनां पहातांच आईसाहेबांनां कसेंसेंच झालें ! त्यांनीं खिन्नतेनें विचारलें "नाना अरे हें काय हें बाबा ?"

"काय ग आई ?"

"अरे, तूं हा असा काय चमत्कारिक दिसतोस बाबा ?" गणपतरावांनीं खिन्नपणें स्मित केलें.

"तुला कांहीं होत का होतं ? ताप का येत होता ?"

"नाहीं ग आई !"

"मग काय होत होतं, खरं सांग बाबा, खरं सांग—"

"खरेंच, कांहीं नाहीं ग आई ! मला खरोखर कांहीं होत नव्हतें. माझी प्रकृति खरोखरच चांगली आहे."

"तर मग तुझा चेहरा हा असा काय झाला आहे ?" आईसाहेबांनीं शंकित स्वरानें विचारलें.

"मला वाटतें, वाटेच्या श्रमांमुळें दिसत असेल तसा !" असें ह्मणून, एकवार खिन्नपणें हंसून गणपतराव जड पदांनीं तेथून हळुहळू निघून गेले.

गणपतराव तेथून तडक वहिनीसाहेबांच्या खोलींत गेले. त्यांची प्रकृति बरीच चांगली आहे, असें त्यांनां आढळून आलें. गणपतराव भिंगारडीला निघून गेल्यापासून आज चार दिवसांत त्यांनां बिलकूल ताप आला नव्हता.

" मुळींसुद्धां कधीं अंग तापलें नव्हतें ना ?" गणपतरावांनीं विचारलें.

" नाहीं–कधींच नाहीं."

" खोकला ?"

" खोकलाहि पुष्कळ कमी आहे. शक्तिहि आतां बरीच वाटूं लागली आहे."

" हं–ठीक आहे." असें ह्मणून गणपतराव विमनस्कतेनें वहिनीसाहेबांकडे पाहूं लागले.

आपल्या 'पतिराजां'नीं जरी आल्याबरोबर आपल्या प्रकृतीबद्दल रीतसर चौकशी केली, तरी त्यांचें मन आज ठिकाणावर नाहीं, केवळ यंत्राप्रमाणें त्यांच्या तोंडांतून कसे तरी शब्द बाहेर पडत आहेत, हें वहिनीसाहेबांच्या ताबडतोब लक्ष्यांत आल्यावांचून राहिलें नाहीं. गणपतरावांच्या प्रकृतींतहि अगदीं विलक्षण असा फरक पडला आहे, हें भेटीच्या पहिल्या क्षणींच त्यांच्या ध्यानांत आलें !

वहिनीसाहेबांनीं विचारलें " आपली प्रकृति तिकडे बरी का नव्हती ?"

" छे बुवा ! उत्तम होती."

" छट् ! प्रकृति कांहीं तरी बिघडली होती हें खास!"

गणपतराव खिन्नपणें हंसून ह्मणाले "माझ्या प्रकृतीबद्दल माझ्यापेक्षां तुलाच अधिक माहिती दिसते !"

" तें कांहीं जरी ह्मटलं, तरी तिकडे स्वारीला तापबीप चोरून तरी येत असावा खात्रीनं—"

" खरोखरच नाहीं. माझ्या प्रकृतीबद्दल तुझ्यापासून कांहीं चोरून ठेवायचें मला काय कारण ?"

" मग तब्बेत अगदीं इथल्याप्रमाणं होती ?"

" अगदीं इथल्याप्रमाणं."

" मग चेहरा असा अगदीं कोमेजून गेलेला कां बरं ? डोळे असे निस्तेज न् खोल गेलेले कां ? डोळ्यांभोंवतीं अशा काळ्या रेघा कां, तें आपणच सांगावं–"

" छे छे–तसें खरोखरच कांहीं नाहीं. माझी प्रकृति अगदीं उत्तम आहे. मला खरोखरच कांहीं होत नाहीं."

" माझ्या गळ्याची शपथ, गडे ?"

गणपतरावांच्या हृदयांत एकदम चमकच निघाली. ते कंपित स्वरानें ह्मणाले " हो–तुझ्या–शपथ !"

" रस्त्याच्या श्रमांनीं दिखील होईल ह्मणा असं गळून गेल्यासारखं अगदीं–कधीं संवय नाहीं—"

" हो–तसेंहि असेल !" गणपतरावांनीं विमनस्कतेनें बाहेर पहात उत्तर दिलें.

" गेले का साहेब येऊन ?"

" हो–आज सकाळींच रवाना झाल्या स्वाऱ्या. आज कुठें आमची मोकळीक झाली. "

" मर्जी बिघडली नाहीं ना कशावरून स्वारीची ?"

" छे छे !" गणपतराव किंचित् हंसून ह्मणाले. " सर्टिफिकीट देखील मिळवलें साहेबांपासून, कीं, 'नानासाहेब पटवर्धनांसारखा सालस न् परोपकारी माणूस नाहीं' ह्मणून ! अग, मीं तपश्चर्याच तशी केली दांडगी ! तीन दिवस सारखी थुंकी झेलीत होतों ना !– अशा घोर तपश्चर्येनें देवता प्रसन्न झाली, तर त्यांत कांहीं नवल नाहीं !" असें ह्मणून गणपतराव हसूं लागले.

वहिनीसाहेबांनींहि त्या हंशाला आपल्या निर्मल हास्याची जोड दिली. त्या हंसतहंसत ह्मणाल्या " हो, हल्लीं आपल्यासारख्यांचे देवच जर मुळीं ते आहेत, तर त्यांनां हरप्रयत्नानं प्रसन्न करून घ्यायलाच हवं ! हो, बरी आठवण झाली. निजसुरीला जायचं होतं ना ?"

" होय."

" दत्ताच्या दर्शनाला जायला झालं होतं ?"

" होय."

" मग मीं सांगितलं होतं त्याप्रमाणं दत्ताला नवस करून यायचं का ?"

दोन तीन पळें विचार करीत गणपतराव स्तब्ध राहिले. नंतर ते ह्मणाले " नाहीं."

पतिराजांच्या तोंडून हें उत्तर येईल, अशी वहिनीसाहेबांची कल्पनाच नसल्यामुळें, तें ऐकून, त्यांनां बरेंच आश्चर्य वाटल्यावांचून राहिलें नाहीं. एकंदर प्रकार घडला तरी काय असावा, याचा त्यांनां मुळींच कांहीं अंदाज होईना !

गणपतरावहि मग तेथें फार वेळ राहिले नाहींत. वहिनीसाहेबांचा निरोप घेऊन ते बाहेर पडले, आणि थोडें फराळाचें खाऊन व चहा पिऊन ते बाहेर आपल्या खोलींत येऊन पडले.

संध्याकाळीं काकासाहेबांची आणि गणपतरावांची भेट झाली. 'साहेबां'ची हकीगत त्यांनीं गणपतरावांकडून आद्योपान्त काढून घेतली. तींत ते अगदीं मनःपूर्वक रंगून गेले असावे, असें दिसत होतें. नंतर त्यांनीं वहिनीसाहेबांच्या शारीरिक स्वास्थ्यासंबंधानें गणपतरावांनां प्रश्न केले. शेवटीं ते ह्मणाले " नानासाहेब, मी आपणाला एक विनंति करणार आहें. "

" काय ती ?"

" मला महिन्या-दीड महिन्याची सुट्टी पाहिजे आहे. "

गणपतरावांनीं आश्चर्यानें विचारलें " सुट्टी ? कशाला हो काकासाहेब ?"

" माझी प्रकृति अलीकडे भारीच खालावल्यासारखी झाली आहे. मधुनमधून बारीक ताप येतो अन् खोकलाहि बराच झाला आहे. शक्ति मुळींच वाटत नाहीं-"

" कधींपासूनच माझ्या हें लक्ष्यांत आलें आहे, काका !"

" ह्मणून ह्मणतों, महिना-दीड महिना कुठें तरी हवा बदलायला जावें, ह्मणजे प्रकृति, पूर्वीप्रमाणें जरी नाहीं, तरी बरीच ताळ्यावर येईल. "

" कुठें जाणार ?"

" देवळालीला जावें, असा विचार आहे. पूर्वी एकदां माझी अशीच प्रकृति बिघडली होती, तेव्हां भाऊसाहेबांबरोबर मी देवळालीलाच गेलों होतों. तिथें कांहीं मला फार दिवस रहायला सांपडलें नाहीं-होतों सारा पंधरा दिवसच; परंतु तेवढ्यानेंहि मला फार बरें वाटूं लागलें-अगदीं ताजातवाना होऊन आलों मी. तेवढ्या हवापालटानें माझी प्रकृति अगदीं हां हां ह्मणतां ताळ्यावर आली. ह्मणून ह्मणतों, देवळालीला जाऊन रहावें महिना दीडमहिना. तिथें आमचे मेहुणे आहेत. त्यांच्याकडे रहायचीहि चांगली सोय आहे. "

गणपतराव किंचित् हंसून ह्मणाले " आपल्या प्रकृतीच्या आड मी येईन का कधीं तरी, काकासाहेब ? आपल्या प्रकृतीला जर आराम वाटत असेल तर जरूर जाऊन या आपण देवळालीला."

" मी जातोंच ह्मणा-पण-पण-"

" पण काय, काका ?"

" पण आपण कामाकाजासंबंधानें थोडी माहिती करून घेतली, तर फार चांगलें होणार आहे. माझा जीव टांगून राहिल्यासारखा होईल, देवळालीला गेल्या नंतर. महत्त्वाचीं अशीं जरूरीचीं कामेंच तेवढीं मी समजावून देतों आपणाला, ह्मणजे मला तेवढी काळजी नाहीं लागून राहणार. "

" गोविंदराव आहेतच आपले."

खिन्नपणें हंसून काकासाहेब ह्मणाले "नाहीं-गोविंदराव आहेतच मागें कामकाज पहायला. गोविंदराव तसा चांगला हुषार, माहीतगार अन् अनुभवी माणूस आहे, विश्वासूहि आहे; पण आपल्या मालकीच्या चीजवस्तूंवर स्वतःची नजर नसली, ह्मणजे पुढेंमागें कधीं तरी तिचा नाश झाल्यावांचून रहात नाहीं ! यजमानाची नजर ती यजमानाची नजर !"

दिवाणजी कांहीं आज आपणाला कामाच्या वेठीला धरल्याशिवाय सोडीत नाहीं, अशी खात्री झाल्यामुळें गणपतरावांनीं मुकाट्यानें त्यांच्या या 'जुलुमा'ला मान वांकविली.

कागदपत्र काढून, दिवाणजींनीं इनामतीचीं महत्त्वाचीं कामें गणपतरावांनां समजावून द्यावयाला आरंभ केला. आपल्याकडून अगदीं जीव तोडतोडून ते त्यांनां एकएक गोष्ट सांगत होते; परंतु त्यांपैकीं एक अक्षरहि गणपतरावांच्या कर्णरंध्रांतून त्यांच्या मेंदूपर्यंत जाऊन पोहोंचलें असेल तर शपथ ! ते मधुनमधून, समजल्याप्रमाणें करून मान डोलवीत होते खरे, परंतु त्यांचें मन इनामतीच्या हिशेबठिशेबांच्या शेंकडों योजनें वर आकाशांत वेगानें भ्रमण करीत होतें ! आज दोनचार दिवस जे विचार गणपतरावांच्या मनाला जाळूनपोळून टाकीत होते- त्याच विचारांत या वेळींहि ते मग्न राहिले होते.

पुष्कळ वेळ हिशेब-समजावणींत घालविल्यानंतर मग कोठें दिवाणसाहेबांच्या लक्ष्यांत आलें, कीं, आपल्या श्रोत्याचें मन आपल्या बोलण्याकडे मुळींच नाहीं-आपण इतका वेळ जीव तोडतोडून जें नानासाहेबांनां सांगितलें, त्यापैकीं एक अक्षरहि त्यांनां कळलेलें नाहीं ! त्यांचा मनोभ्रमर त्यांच्या बायकोच्या मुखकमलाभोंवतीं रुंजी घालीत असावा, असें त्यांनीं ताडलें.

दिवाणजींनीं एक उसासा टाकला, व ते ह्मणाले, " बरें तर, आज मी आतां उठतों, नानासाहेब ! बरीच रात्र झाली."

मोठ्या पेंचांतूनच आपली सुटका झाली, असें वाटून गणपतराव पडल्या फळाची आज्ञा घेऊन चट्कन् उठून उभे राहिले, व ह्मणाले " काय निघालांत, काका !"

" हो-जातों आतां."

" या."

दिवाणकाकांची रवानगी करून गणपतराव आपल्या पलंगावर बाहेरून अगदीं स्वस्थपणें पडले. बाहेर बसलेल्या नोकराला हांक मारून ते ह्मणाले " अरे, सिगारेट्स् संपल्या आहेत माझ्या.गोविंदरावांकडे जा न् ही बॉक्स भरून आण."

थोड्याच वेळांत सिगारेट्स् आल्या.बॉक्समधून एक सिगारेट काढून गणपतराव ती ओठीत तक्क्याला डोकें टेंकून पडले. त्यांच्या मनांत मात्र या वेळीं विचारांनीं भयंकर काहूर माजविलें होतें. विचार-विचार-विचार! विचारांनीं गणपतरावांच्या मस्तकाच्या अगदीं ठिकऱ्या उडण्याची वेळ आली!

सिगारेटचे चारपांच दम मारल्यानंतर विचारांच्या भरांत गणपतरावांच्या हातांतून सिगार आपोआप गळून खालच्या जमिनीवर पडलीच व तेथून ती धुराचे क्षीण फवारे सोडूं लागली. लोक ह्मणतात, कीं, चिंतेच्या व्याधीवर तमाखूसारखें औषध नाहीं; परंतु व्याधीचें स्वरूप अतिशयच भयंकर झाल्यावर महौषधींचेंहि कांहीं चालत नाहीं! त्या उलट्या विकार बळिंगत करतात. गणपतरावांच्या चिंताव्याधीचें स्वरूप या वेळीं कल्पनातीत भयंकर झालें होतें!

कांहीं वेळानें फराळाचें पान मांडल्याची आंतून वर्दी आली. गणपतराव आंत जाऊन, हातपाय धुऊन शंभर शिवगायत्री जपल्याचें ढोंग कसेंतरी पार पाडून, फराळाला बसले; परंतु त्यांच्या घशाखालीं पदार्थ उतरतच ना, त्याला त्यांचा तरी काय इलाज? घांस तोंडांतल्या तोंडांत फिरूं लागे-पण खालीं जाईना! पान बहुतेक जसेंच्या तसेंच भरलेलें ठेवून गणपतराव कांहीं वेळानें उठूं लागले.

आईसाहेब जवळच बसल्या होत्या, त्या गडबडीनें ह्मणाल्या " हें रे काय नाना?"

" काय ग?"

" झाला फराळ तुझा? उठतोससा?"

" आज भूकच नाहीं मुळीं मला!"

" वा-ह्मणजे? सगळं पान तर अगदीं जसंच्या तसं आहे न् ह्मणतोस फराळ झाला ह्मणून-खा, थोडं-तरी खा-"

मान हलवून खिन्न स्वरानें गणपतराव ह्मणाले " नको आई, खरंच नको. मला आज मुळींसुद्धां भूक नाहीं पहा."

" तुझी तब्बेत तर ठीक आहे ना? तुला कांहीं होतं का आहे?" अत्यंत स्नेहार्द्र स्वरानें आईसाहेबांनीं विचारलें.

" नाहीं ग-कांहीं होत नाहीं मला! माझी प्रकृति अगदीं चांगली धडधाकड आहे."

आईसाहेब अगदीं काकुळतीला येऊन ह्मणाल्या " नाना-नाना! असं काय बरं करतोस? आह्मीं सारीं तुझ्या तोंडाकडे पाहून जिवंत राहिलों आहों. आम्हाला असा काळजींत पाडूं नकोस. सांग-तुला काय होतं आहे, तें मला नीट सांग. अरे, मी तुझी आई ना प्रत्यक्ष? माझ्याजवळ सांगायला इतका संकोच? तुला कांहीं तरी होतं आहे, त्याबद्दल मला तर कांहीं शंका नाहीं. वैद्यबुवांनां पाठवूं का बोलावणं?"

गणपतराव खिन्नपणें हंसून ह्मणाले " खरेंच आई, मला कांहीं होत नाहीं. प्रवासाच्या श्रमांनीं मी थोडा-बहुत गळलेला दिसत असेन,परंतु त्याची इतकी काळजी करायला नको कांहीं. जरा दोन दिवस विश्रांति न् झोंप मिळाली, ह्मणजे झालें. त्याला वैद्यबुवा कशाला हवेत न् डाक्टरसाहेब कशाला पाहिजेत?" असें ह्मणून ते जवळच्या तस्तांत हाततोंड धुऊं लागले.

क्षणभरानें गणपतराव तेथून निघाले. दररोज-विशेषतः वहिनीसाहेब आजारी पडल्या, तेव्हांपासून दर दिवशीं-निजावयाला बाहेर जाण्यापूर्वीं गणपतराव त्यांच्या खोलींत जाऊन त्यांच्याशीं घटका दोन घटका मोकळ्या अंतःकरणानें बोलत, तेव्हांच बाहेर पडत; परंतु आज तसें त्यांनीं कांहीं केलें नाहीं. गणपतराव आज फराळ करून जे उठले, ते इकडेतिकडे कोठेंच न वळतां तडक बाहेर आपल्या शयनगृहांत गेले. जातांच त्यांनीं खोलीचा दरवाजा आंतून घट्ट बंद करून घेतला, व ते पलंगावर पडले.

वहिनीसाहेबांनीं पतिराजांची वाट पहापहा पाहिली. परंतु त्यांचा त्या दिवशीं त्यांनां पायरवहि लागला नाहीं.शेवटीं कंटाळून कंटाळून, त्यांनीं पतीसाठीं नेहमी-प्रमाणें तयार करून ठेवलेला गोविंदविडा दाजीबाबरोबर बाहेर पाठवून दिला. दाजिबा यजमानसाहेबांच्या खोलीशीं येऊन पहातो,तों दरवाजा आंतून बंद! त्यानें हळूच दरवाज्यावर एक दोनदां बोटानें आघात केला,

परंतु आंतून कांहींच प्रत्युत्तर मिळेना. नंतर तो दोन वेळ मोठ्यानें खोकला, तरीहि कांहीं जबाब नाहीं. शेवटीं कंटाळून दाजिबा वहिनीसाहेबांकडे परत आला, व ह्मणाला " हुजूर केव्हांच झोंपले देखील !"

प्रकरण पांचवें.

निश्चय कायम–दायम !

आणखीं दोन दिवस गेले. वहिनीसाहेबांचें पथ्यपाणी बहुतेक सुटून त्यांनां नेहमीप्रमाणें जेवाखावयाला वैद्यबुवांनीं परवानगी दिली. वाड्यांतल्या वाड्यांत त्या आतां चांगल्या हिंडूंफिरूंहि लागल्या.

दुसऱ्या दिवशीं, नानासाहेबांचा निरोप घेऊन दिवाणकाकाहि देवळालीला निघून गेले.

या दोन गोष्टींची गणपतराव अत्यंत आतुरतेनें वाट पहात होते. मधल्या अवकाशांत निरनिराळ्या बाजूंनीं विचार करकरून, सर्व रात्री विचारांत घालवून, अलोचन जागरणें करून, त्यांनीं आपलें मन आतां निश्चल करून टाकलें होतें. आपलें हृदय वज्रापेक्षांहि त्यांनीं आतां कठीण केलें होतें.

गणपतरावांच्या साऱ्या शंकाकुशंका, संदेह–संशय, पार नाहींसे झाले.त्यांनीं आपला निश्चय अगदीं कायम-दायम करून टाकला ! प्रेमाच्या उरांत कट्यार मारावयाची नाहीं, विश्वासाशीं प्रतारणा करून त्याची मान सुरवळावयाची नाहीं, असा त्यांनीं मनाचा वज्रलेप निर्धार करून टाकला. आपले सर्व अपराध वहिनीसाहेबांशीं खुल्या दिलानें कबूल करावयाचे, असें त्यांनीं ठरविलें. आपल्या या वर्तनाचे काय परिणाम व्हावयाचे असतील ते होवोत, जगांतील सर्व प्रचंड अनर्थांची परंपरा आपल्या मस्तकावर आदळावयाची असेल तर आदळो, परंतु 'प्रेमाच्या मानेवर सुरी' ठेवावयाची नाहीं, असा गणपतरावांचा दृढ निश्चय झाला !

तीन प्रहरीं दिवाणकाकांनां गाडींत बसवून दिल्यावर गणपतराव आपल्या शयनगृहांत आले, व दरवाज्याला कडी लावून घेऊन पलंगावर विचार करीत पडले. आतां जरी त्यांच्या मस्तकांत विचारविकारांनीं प्रचंड कल्लोल चालविला होता, तरी अलीकडे कांहीं दिवस दिसत होती, त्याप्रमाणें आतां त्यांच्या चेहऱ्यावर अशांतीची किंवा मनःक्षोभाची फारशी छाया दिसत नव्हती. किंकर्तव्यमूढ मनाचा कायमदायम निश्चय करून टाकल्यामुळें त्यांच्या मनाला एक प्रकारचा गाढ शांतीचा लाभ झाला होता; परंतु यामुळें त्यांच्या मनोयातना नाहींशा झाल्या, किंवा त्यांच्या दारुण चिंतेचा अंत झाला, अशी मात्र प्रिय वाचकांनीं कल्पना करूं नये.

हल्लीं, आपल्या भविष्यासंबंधानेंच गणपतरावांनां मुख्यतः चिंता लागून राहिली होती. आपला निश्चय अमलांत आणल्यावर, बाणथडीच्या वाड्यांतून तर आपली खास उचलबांगडी होणार–मग ती उद्यां होवो, दोन दिवसांनीं होवो–याबद्दल त्यांनां कांहींच शंका नव्हती. या ठिकाणींच आपल्या हृदयदेवीच्या मूर्तीचें विसर्जन करून आपणाला जावें लागणार, पुनः साऱ्या जन्मांत त्या प्रेममय मूर्तीचें आपणाला कधीं एकदांहि दर्शन होणार नाहीं, अशी गणपतरावांच्या दिलाची पुरीपुरी खात्री होती. हाय ! त्या दिव्य प्रेमदेवतेच्या दर्शनाविना आपण सारें जीवित कसें कंठावयाचें ?

गणपतरावांचें पुढील सर्व भविष्य काळ्याकुट्ट काळोखानें भरलेलें असलें, तरी त्यांत एखादी क्षीण किरण-रेखा अगदींच दिसत नव्हती, असें मात्र बिलकूल नाहीं. गणपतराव या वेळीं आपल्या मनाशीं ह्मणत होते " हाय ! माझ्या जीवनाचा केवळ आधारच बनलेल्या माझ्या हृदयदेवतेच्या दिव्य मूर्तीचे इथेंच विसर्जन करून जातांना माझ्या हृदयाचे शतधा तुकडे होतील, यांत संशयच नाहीं. होऊं दे–माझ्या हृदयाचें पार चूर्णविचूर्ण होऊं दे ! परंतु माझ्या हृदयपुष्पानें जिची पूजा बांधणें अवश्य, अशा माझ्या जीवनदेवतेच्या मूर्तीला मीं कधींहि अपवित्र किंवा कलंकित केलें नाहीं, हेंच माझ्या मनाला मोठें समाधान होऊन राहील ! माझें हतभाग्याचें जें कांहीं आयुष्य आतां राहिलें असेल, त्या आयुष्यामध्यें हें समाधान मला खात्रीनें कांहींतरी शांतिसुखाचा मार्ग दाखवील. जिच्यावर माझ्या हृदयाचें प्रेम जडलें होतें, तिच्या उरांत मीं कट्यार खुपसली नाहीं, जिची पूजा बांधण्यासाठीं मीं आपल्या हृदयाचें सिंहासन तयार केलें, तिला मीं कधींहि कलंकित केलें नाहीं, हेंच समाधान मला माझें भावि आयुष्य सुसह्य करील ! पापाच्या घनदाट काळोख्या अमावास्येला हा पुण्यमय प्रेमाचा

पौर्णिमेचा चंद्र तळपूं लागल्यामुळें, मला माझा मार्ग चांगला दिसूं लागला !"

आज सायंकाळीं, वहिनीसाहेबांनां मागच्या बागेंत फिरावयाच्या निमित्तानें नेऊन, आपले सर्व कृतापराध त्यांच्यापाशीं मोकळ्या मनानें कबूल करावे, केलेल्या दारुण अपराधांबद्दल त्या दयाशील देवतेच्या चरण-तलाशीं शतसहस्र क्षमायाचना करून, तिचा जन्माचा निरोप घ्यावा, असा गणपतरावांनीं आपल्या मनाशीं निश्चय कायम करून टाकला.

घड्याळांत ठण्ठण् असे चार ठोके पडले. गणपतराव झट्कन् पलंगावरून उठले, व त्यांनीं मोरीपाशीं जाऊन सुरईतील थंड पाण्यानें आपलें तोंड, डोळे, कान वगैरे नीट धुऊन टुवालानें कोरडे केले. नंतर दरवाजा उघडून जडपदानें तें आंत निघून गेले.

वहिनीसाहेबांच्या खोलींत गणपतराव जाऊन पहा-तात, तों तेथें एका कोचावर पडून त्या कांहीं पुस्तक वाचण्यांत अगदीं निमग्न होऊन गेल्या आहेत, असें त्यांनां आढळून आलें. गणपतराव अगदीं जवळ येऊन उभे राहीपर्यंत वहिनीसाहेबांच्या कांहीं लक्ष्यांतच आलें नाहीं; परंतु नंतर ते आल्याचें कळतांच मात्र, त्यांची जी कांहीं लटपट उडाली आहे, ती कांहीं विचारण्याची सोय नाहीं ! पुस्तक झट्कन् मिटून, तें जवळच्या टेब-लावर भिरकावून देऊन त्या हंसत हंसत चट्कन् उभ्या राहिल्या, आणि विनयानें खालीं पाहूं लागल्या.

गणपतराव जवळच्या खुर्चीवर बसून ह्मणाले " चला, जरा येतां बागेंत फिरायला ?"

आपला कंठस्वर अगदींच चमत्कारिक ऐकूं येत आहे, असें त्यांचें त्यांनांच वाटूं लागलें !

आपल्या पतिराजांच्या चेहऱ्याकडे शंकाकुल दृष्टीनें वहिनीसाहेब कांहीं वेळ नुसत्या पहातच राहिल्या.त्यांचा चेहरा आज अधिकच सुकून गेला आहे, डोळे अगदींच खोल जात चालले आहेत, असें त्यांनां आढळून आलें.

वहिनीसाहेबांनीं विचारलें " काल रात्रीं यायचं नाहीं इकडे झोंपायला जातांना !"

" भारीच झोंप येत होती."

" वाट बघूनबघून मीं नेहमींचा गोविंदविडा दाजिबा-बरोबर पाठवला आपल्याकडे—"

" पण जेवतांच मी जो पलंगावर पडलों, तों हां हां ह्मणतां मला झोंपच लागली !"

" आतां कशी आहे तब्बेत ?"

" ठीक आहे."

"मग असं कां हें सारं, गडे ?"

"काय झालें ?"

" आपला गळा आज असा चमत्कारिक कां लागतो आहे ? आपले डोळेहि फुलल्यासारखे कां दिसताहेत ?"

वहिनीसाहेबांच्या या प्रश्नाला गणपतरावांनीं कांहींच उत्तर न देतां ह्मटलें " चल, बागेंत फिरायला येत असलीस तर चल; म्हणजे तिथें सांगतों. येतेस का ?"

" वा ! म्हणजे ? आपल्या मर्जीबाहेर का मी आहें ?"

बागेंत फिरावयाला जावयाचें म्हणजे पहिल्यानें वहिनीसाहेबांनीं तेथें अगोदर जाऊन एखाद्या कुंजांत बसावयाचें, आणि नंतर कांहीं वेळानें गणपतरावांनीं तेथें जाऊन मग बागेंत त्या दोघांनीं हिंडूं लागावयाचें, असा त्या 'दांपत्या'चा ठराव झालेला होता. या ठरावा-प्रमाणें वहिनीसाहेब अगोदर उठून बागेंत गेल्या. नंतर कांहीं वेळानें गणपतरावहि त्या खोलींतून बाहेर पडले, आणि सांकेतिक जागीं वहिनीसाहेबांनां मिळाले.

नंतर दोघेंजणें जवळजवळ राहून बागेंत इकडून तिकडे येरझारा घालूं लागलीं. गणपतरावांचें मन अर्थातच या वेळीं अत्यंत क्षुब्ध होऊन गेलें होतें. ते वहिनीसाहेबांशीं फारसे बोलत नव्हते. विचारल्या प्रश्नांचीं नुसत्या मानेच्या खुणांनीं 'होय' अगर 'नाहीं' या एकशब्दात्मक वाक्यानें ते त्यांनां उत्तरें देत होते. ही गोष्ट वहिनीसाहेबांच्या लक्ष्यांत केव्हांच येऊन चुकली होती; आणि म्हणूनच त्या आपल्या पतिराजांच्या चेहऱ्याकडे वारंवार सूक्ष्म भेदक दृष्टीनें पहात होत्या.

आपलें अत्यंत गूढ व 'हृदयभेदक' रहस्य वहिनी-साहेबांसमोर प्रकट करावयाला गणपतरावांचा अगदीं प्राणांपलीकडच्या जोराचा प्रयत्न चालला होता; परंतु एकदांहि त्यांचा तो प्रयत्न सफल झाला नाहीं. अगदीं गळ्याशीं शब्द येऊन ते तेथल्या तेथें गडप होत ! आपला गळा कोणी तरी अतिशय जोरानें दाबून धरीत आहे, असा प्रत्येक वेळीं गणपतरावांनां भास होई ! वाटेल तितका नेट केला, तरी त्यांच्या कंठाचा तो अवरोध नाहींसा होईना, आणि शब्द कांहीं बाहेर फुटत ना ! या 'तोंड दाबून बुक्यांच्या मारा'मुळें **गणपतराव खरोखरच अगदीं रडकुंडीला परतले !**

चालतांचालतां मध्येंच आपल्या पतिराजांकडे वळून वहिनीसाहेब ह्मणाल्या " माझं एक म्हणणं ऐकायला होईल ?"

" काय तें ? "

वहिनीसाहेब म्हणाल्या " आपण कितीहि जरी सांगितलं, तरी आपणाला कांहीं तरी होतं आहे, यांत कांहींच शंका नाहीं. मीच असं ह्मणतें असं नाहीं. सासूबाई अन् वाड्यांतलीं सारीं माणसं असंच ह्मणतात."

"तुम्ही सारीं माणसें आहांत सात वेडीं !"

वहिनीसाहेब किंचित् हंसून ह्मणाल्या " वेड्या माणसांत शहाण्यांनांदिखील वेड व्हावं लागतं. वेड्या माणसांच्या कलानं शहाण्यांनीं चालावं,असं सांगतात ना? आमच्या समजुतीसाठीं तरी आपण आम्ही सांगतों त्याप्रमाणें वागावं. माझ्या विनंतीची आपणाला कांहींच का किंमत नाहीं ?"

खालीं पहात गणपतराव म्हणाले " असें होईल तरी कसें ? तुझा एकएक बोल म्हणजे त्रिभुवनाच्या मोलाचा मला वाटतो ! "

" हेंच खरं तर माझ्या सांगण्याप्रमाणं ताबडतोब करावं—"

" सांग, तुझा काय हुकूम आहे ?"

"आपलं शरीर अन् मन हीं दोनीहि अगदीं खराब होऊन गेलीं आहेत. आपण सोळा वर्सं सतत उत्तर हिंदुस्तानांत असायचं, तिथून एकदम आपण महाराष्ट्रांत आल्यामुळं इथलं हवापाणी आपणाला सोसत नाहींसं दिसतं."

" वः ! ठीक कारण शोधून काढलेंस !"

"तसंच,आज सोळा वर्सं जो आयुःक्रम एकसारखा, अगदीं रेखीव रीतीनं इकडच्या आचरणांत आलेला होता, तो एकदम बदलून आपण अगदीं निराळ्याच परिस्थितींत पडलां अन् पूर्वींच्याहून अगदीं भिन्न असा आयुःक्रम आपणाला आक्रमावा लागत आहे, यामुळं आपलं मन कसं कावल्याकावल्यासारखं झालं आहे."

" शक्य आहे तूं म्हणतेस हें."

" यावर मीं एक उपाय शोधून काढला आहे."

गणपतरावांनीं कांहींच उत्तर दिलें नाहीं. ते केव्हांपासून आपल्याच विचारांत निमग्न होऊन राहिले होते. वहिनीसाहेबांच्या भाषणावर जरी मघांपासून ते एकदोनदां कांहीं बोलले, तरी तो फोनोग्राफाप्रमाणें नुसता वरवरचा यांत्रिक शब्दोच्चार होता. त्यांच्या मनाची सारी तंद्री, त्यांनां भंडावून सोडणाऱ्या त्या प्रश्नाकडेच लागून राहिली होती.

वहिनीसाहेब बोलूं लागल्या " मीं यावर अशी योजना केली आहे, कीं, आपण सारींजणं प्रवासालाच निघूं या. कांहीं दिवस उत्तरहिंदुस्तानांत आपण घालविले, कीं, आपलं शरीर न् मन दोन्ही हां हां म्हणतां ताळ्यावर येतील, अशी माझी खात्री आहे.आईसाहेबहि आज किती तरी दिवस तीर्थयात्रेला जाऊं जाऊं ह्मणताहेत; चलावं, त्यांनां बरोबर घेऊनच आपण काशी, पुरी वगैरे यात्रा करूं न् परत येऊं. दीड दोन महिने अशीं फिरून दिवाळीच्या आंत घरीं येऊं ह्मणजे झालं. काय आपलं ह्मणणं यावर ? "

गणपतरावांकडून कांहींच उत्तर नाहीं ! ते आपल्याच विचारांत गर्क होते. कांहीं वेळ पतिराजांच्या उत्तराची वाट पाहून वहिनीसाहेबांनीं पुनः विचारलें " माझी सूचना पटते का आपणाला कांहीं ? "

गणपतराव जणूं एकदम झोपेंतून चमकून जागे झाले. त्यांनीं विचारलें " आं ? काय ह्मणतेस ? "

वहिनीसाहेबांनीं विचारलें " मग काय ह्मणायचं ? निघायचं का ? आपलं मत पडलं तर अस्संच जाऊन सासूबाईंनां सांगतें. लगेच तयारीलाहि लागलं पाहिजे."

गणपतरावांनीं वेड्याप्रमाणें वहिनीसाहेबांकडे पहात विचारलें "कसली तयारी ? कुठें निघायचें ह्मणतेस तू ?"

वहिनीसाहेब किंचित् हंसून ह्मणाल्या " ह्मणजे ! हें काय बाई ? मीं इतका वेळ घसाफोड केली ती व्यर्थच वाटतं ? "

गणपतरावांनां स्वतःची स्वतःलाच लाज वाटूं लागली. ते ह्मणाले " मी दुसऱ्याच कांहीं गोष्टीबद्दल विचार करीत होतों, म्हणून माझें तितकेंसें लक्ष्य नव्हतें तुझ्या बोलण्याकडे. पुनः सांग पाहूं जरा–"

वहिनीसाहेबांनीं तीर्थयात्रेला जावयाची आपली सूचना पतिराजांनां पुनः एकवार समजावून सांगितली आणि विचारलें " मग कसा काय वाटतो आपणाला हा विचार ? "

गणपतराव म्हणाले " ठीक आहे. जरा विचार करून पहातों. "

आतांपर्यंत बराच वेळ वहिनीसाहेबांबरोबर गणपतराव एकान्तांत होते;परंतु आपला बेत पार पाडण्याचें धैर्य त्यांनां झालें नाहीं. वहिनीसाहेबांच्या समक्ष ' ती गोष्ट '

सांगण्याचें सामर्थ्य आपणाला नाहीं, हें त्यांनां आतां पक्कें कळून चुकलें. तेव्हां, आज रात्रीं त्यांनां उद्देशून एक पत्र लिहावें आणि त्यांत आपणाला त्यांनां काय कळवावयाचें आहे तें विस्तृत लिहावें, आणि चांगलीशी संधि पाहून, त्यांनां एकीकडे गांठून तें पत्र त्यांच्या हातीं द्यावें, असा गणपतरावांनीं आपल्या मनाशीं निश्चय केला.

आणखी थोड्या वेळानें तीं दोघें वाड्यांत परतलीं. गणपतराव वहिनीसाहेबांच्या खोलींत गेले नाहींत. आपल्या खोलींत ते जाऊन बसले.

रात्रीं फराळ वगैरे आटोपल्यानंतर गणपतराव आपल्या शयनगृहांत आले, व खोलीला कडी लावून ते टेबलाशीं बसून वहिनीसाहेबांनां पत्र लिहूं लागले.

एक पान, दोन पानें, तीन पानें ते लिहीत; पुनः सारीं फाडून टाकीत; पुनः पहिल्यापासून पत्र लिहावयाला आरंभ करीत. मध्येंच टांक खालीं ठेवून, वर कडीपाटाकडे नजर लावून ते कांहीं वेळ विचार करीत बसत. पुनः लिहूं लागत. मध्येंच एकाद्या वेळीं खुर्चीवर रेलून स्वस्थ पडून, दोन्ही हातांनीं तोंड झांकून ते हृदयांतील क्षोभाला डोळ्यांवाटे बाहेर झिरपूं देत, आणि नंतर डोळे स्वच्छ पुसून कांहीं वेळानें ते पुनः लिहूं लागत. असा किती तरी वेळ गणपतरावांचा कार्यक्रम चालला होता.

पत्र लिहितांलिहितां एक वाजला, दोन वाजले, तीनहि वाजले, तरी गणपतरावांचें पत्रलेखन चाललेंच होतें !

पत्र बहुतेक पुरें होत आलें होतें. आणखीं पानभर मजकूर सरासरी लिहावयाचा राहिला होता. आतां मात्र गणपतरावांनां लिहिणें कठीण जाऊं लागलें. त्यांचा हात थरथरां कांपूं लागला. सर्व रात्र झगझगीत दिव्याजवळ एकसारखें बसून राहिल्यामुळें त्यांच्या डोळ्यांनां अगदीं रग लागली, आणि मस्तकांत झिमूझिम् होऊं लागलें. आतां बाहेर गच्चीवर जाऊन मोकळ्या स्वच्छ हवेंत थोडा वेळ रहावें म्हणजे आपणाला पुष्कळ बरें वाटेल. मग कांहीं वेळानें परत येऊन पत्र पुरें करावें, आणि मग झोंपावें, असा गणपतरावांनीं विचार केला.

गणपतराव खुर्चीवरून उठले; त्या वेळीं त्यांचे पाय लटलट कांपत होते. खोलीचा दरवाजा उघडून ते बाहेर आले व गच्चीवर इकडून तिकडे येरझारा घालूं लागले. भाद्रपदाचा महिना; परंतु आकाशांत आज एकहि मेघ दिसत नव्हता, चंद्रहि अस्ताला गेला होता. त्या मेघशून्य आकाशांत लाखों तारका चमचम करीत गणपतरावांच्या दुर्दैवाला हिणवीत होत्या. चहूंबाजूला जिकडेतिकडे शांततादेवीचें साम्राज्य पसरलें होतें–रानावनांतले रातकिडेहि आतां निजूं लागले होते. वायूच्या मृदुमंद लहरी वहात होत्या.

बराच वेळपर्यंत गणपतरावांच्या इकडून तिकडे येरझारा चालल्या होत्या. येरझारा घालतांघालतां मध्येंच त्यांच्या मस्तकांत एकाएकीं एक विचार चमकला, आणि एकदम ते जागच्याजागीं थबकले. कांहीं वेळ ते आपणाशींच विचार करीत स्तब्ध उभे होते. नंतर त्यांनीं येरझारा फिरून सुरू केल्या नाहींत. ते तडक खोलींत आले, आणि झटक्यासरसें त्यांनीं पत्राचें शेवटचें पान लिहून पत्र पुरें केलें. पत्र फिरून वाचण्याच्या भानगडींत न पडतां, त्यांनीं दिवा मालवला, व ते पलंगावर जाऊन पडले.

आज गणपतरावजींनां लवकर झोंप लागणें केवळ अशक्य होतें. झोंप लागेपर्यंत, ते पत्राच्या शेवटच्या भागासंबंधानेंच एकसारखा विचार करीत होते.

एक मोठा उसासा सोडून गणपतराव उद्गारले "ती आशा फुकट आहे ! माझें भाग्य असें बलवत्तर असतें, तर येथपर्यंत तरी मजल कां आली असती ? त्या दिवशीं मीं जें वाचलें,

'सागरें बुडतां घोर भयंकर, तृण जरि लागे हातीं,
प्राणाशेनें तेंचि धरी नर; क्षणिं परि दोन्ही बुडती !'

तें अगदीं पूर्णपणें खरें आहे ! मला तर ही फसवी आशाहि नाहीं ! कांहीं झालें तरी आणखी फार तर दोन दिवस ! उद्यांच्या उद्यांच इथून आपलें काळें तोंड घेऊन निघून जावें, असा विचार केला होता. पण फार तर आणखीं दोन दिवस ढकलतां येतील ! जबरदस्त घोंटाळा तर उडणार हें उघड आहे ! कदाचित् ही मंडळी मला पोलिसच्या हवालींहि करतील ! तुरुंगांत खडी फोडायला जावें लागेल ! लागूं द्या–तुरुंगांत असणें किंवा तुरुंगाबाहेर रहाणें हीं दोन्ही आतां मला सारखींच आहेत !"

हळुहळू गणपतरावांनां झोंप लागली.

प्रकरण सहावें.

वज्राघात !

दुसऱ्या दिवशीं वहिनीसाहेबांनां अशी आशा लागून राहिली होती, कीं, आपले पतिराज सकाळीं फराळाला आंत येतील, तेव्हां तरी आपणाला खास भेटतील, आणि पुनः आपण त्यांच्याजवळ तीर्थयात्रेची गोष्ट काढून खात्रीनें त्यांची संमति मिळवूं. काल रात्रीं गणपतराव जेवल्यानंतर नेहमीप्रमाणें वहिनीसाहेबांच्या खोलींत न जातां तडक आपल्या शयनगृहांत गेले; हें वहिनीसाहेबांच्या मनाला थोडेंसें लागल्याशिवाय राहिलें नाहीं; परंतु आपल्या पतिराजांची मानसिक स्थिति कोणत्या ना कोणत्या तरी कारणामुळें अतिशय वाईट झाली आहे, हें त्यांनां माहीत असल्यामुळें त्यांनीं त्याकडे तादृश लक्ष्य दिलें नाहीं. पतिराजांची शारीरिक व मानसिक स्थिति पाहून वहिनीसाहेबांच्या मनाला अतिशय यातना होत होत्या. काल रात्रीं त्यांनां चांगली झोंपदेखील आली नाहीं.

परंतु वहिनीसाहेबांची हीसुद्धां आशा पूर्ण झाली नाहीं. स्नानासाठीं गणपतराव आंत आले खरे; परंतु तें व फराळ आटोपून, ते वहिनीसाहेबांची गांठ न घेतांच परस्पर बाहेर निघून गेले.

दुपारीं जेवावयाला पतिराज आंत येतील, त्या वेळीं तरी ते आपणाला भेटल्याखेरीज रहाणार नाहींत, अशी वहिनीसाहेबांनां आतां आशा लागली होती; परंतु या त्यांच्या आशेचीहि पूर्वीप्रमाणेंच वाट लागली ! दुपारीं गणपतराव भोजनाला आंत आले. वहिनीसाहेब त्यांच्या दर्शनाला जवळच टपून राहिल्यामुळें त्यांची या वेळीं दृष्टभेट झाली. खोलींत येऊन एकवार भेटून जावें, अशा अर्थाच्या वहिनीसाहेबांनीं खुणाहि केल्या; परंतु गणपतरावांनीं त्यांच्याकडे लक्ष्यहि दिलें नाहीं. कसेबसे चार घांस खाऊन गणपतरावांनीं आपलें जेवण आटोपलें, व वहिनीसाहेबांची भेट न घेतां ते तडक बाहेर गेले. या वेळींहि त्या 'पति–पत्नीं' ची भेट झाली नाहीं.

आतां मात्र वहिनीसाहेबांच्या मनांत एका प्रकारचा अभिमान उत्पन्न झाला. त्या आपल्या मनाशीं विचार करूं लागल्या "असें कां म्हणतें मी ? मला असं मुद्दाम टाळायचं कां म्हणून ? मीं आपण होऊन बोलावलं तरी खील मुद्दाम माझ्यापासून दूर पळून जायचं, असं म्हणून बाई ? मीं काय केलें आहे ? जाणूनबुजून तर स्वारीचा मीं कांहींदिखील अपराध केल्याचं मला स्मरत नाहीं अन् झाला असला कांहीं चुकूनमाकून, तर तो स्पष्टपणं सांगायला काय हरकत होती ? मी कांहीं त्याबद्दल स्वारीवर रागावलें का असतें ? इथं आल्यानंतर बरेच दिवस–अगदीं परवांपरवांपर्यंत मी म्हणजे तिकडची अगदीं जीव का प्राण होऊन बसलें होतें. माझ्यावर स्वारीचं किती प्रेम–निरनिराळ्या निमित्तांनीं चोरूनमारून माझ्या भेटीगांठी घ्यायला स्वारी कशी अगदीं हपापलेली असायची ! अन् आतांच कां माझ्याशीं असं निष्ठुर वर्तन ? असा एकाएकीं स्वारीच्या स्वभावांत विलक्षण फरक कां पडला बाई ? भिंगारडीहून आल्यापासूनच हा फरक मला स्पष्ट दिसूं लागला. माझ्या हातून स्वारीचा असा अपराध तरी काय झाला ? कांहींच मुळीं लक्ष्यांत येत नाहीं. देवा गजानना, मीं कांहीं जाणूनबुजून तर स्वारीला दुखवलं नाहीं, याला तूंच साक्ष आहेस. देवा, तूंच मला आतां मार्ग दाखीव."

आणखी बराच विचार केल्यानंतर शेवटीं वहिनीसाहेबांनां असें खात्रीपूर्वक वाटूं लागलें, कीं, स्वारीची प्रकृति बिघडल्यामुळेंच मनाची स्वस्थताहि नाहींशी झाली आहे. पहिल्यानें तिकडची प्रकृति सुधारण्याचा कांहींतरी उपाय केला पाहिजे–आणि तोहि शक्य तितक्या लवकर–असें वहिनीसाहेबांनीं मनाशीं निश्चित केलें. आज संध्याकाळीं कोठल्या तरी उपायानें स्वारीची गांठ घेऊन, यात्रेला निघण्याबद्दल एकदां पक्कें करून घ्यावयाचें, असें त्यांनीं ठरविलें.

आईसाहेब व वहिनीसाहेब एकत्रच भोजनाला बसत असत. जेवतांना त्या दोघींत गणपतरावांच्या बिघडलेल्या मनःस्थितीविषयीं थोडीबहुत चर्चाहि झाली –परंतु तिचें कारण मात्र कोणालाहि कांहीं कळेना !

भोजन आटोपून वहिनीसाहेब आपल्या खोलींत आल्या, त्या वेळीं एक वाजून गेला होता. सकाळपासूनच–आकाशांत मेघ जमूं लागले होते–आतां तर आकाश अगदीं पूर्णपणें मेघाच्छादित होऊन गेलें होतें. पश्चिम बाजूकडील खिडकीशीं उभ्या राहून वहिनीसाहेब विमनस्कतेनें मेघांच्या लीला पाहूं लागल्या. मधुनमधून दिवसाच–आज विजेचे चमकारेहि होत होते. आज

खात्रीनें पाऊस बराच कोसळल्याशिवाय रहात नाहीं, असें वहिनीसाहेबांनां वाटूं लागलें.

वहिनीसाहेब नुकत्याच दुखण्यांतून उठल्या होत्या. त्यांच्या अंगांत अजून फारशी शक्ति आली नव्हती; त्यामुळें त्यांनां फार वेळ उभें रहाणें शक्यच नव्हतें. थोड्याच वेळांत, त्या खिडकीजवळून येऊन जवळच्या कोचावर बसल्या. थोड्याच वेळांत, यमुना व चंपा या आपल्या मैत्रिणी आपल्या खोलींत येतील, असें त्यांनां वाटत होतें. जेवणानंतर त्या दोघी कांहीं वेळ आपापल्या खोल्यांमध्यें जाऊन पडत असत.

एका मासिक पुस्तकाचा नवा अंक कालच आला होता; तो हातीं घेऊन वहिनीसाहेब त्याचीं पानें चाळूं लागल्या. इतक्यांत घड्याळांत ठण् असा ठोका पडला. दीड वाजला होता.

थोड्याच क्षणांनीं बाहेर कोणाच्या पावलांचा शब्द त्यांनां ऐकूं आला. तत्क्षणीं वहिनीसाहेबांच्या हृदयांतील रक्तांत प्रचंड सळसळ सुरू झाली. पावलांचा तो ध्वनि वहिनीसाहेबांच्या पूर्ण परिचयाचा असून आज त्याच्याकडेच त्यांचें सारें ध्यान लागून राहिलें होतें.

वहिनीसाहेबांनीं झट्कन् आपला पदर वगैरे सांवरला, व त्या उठून उभ्या राहिल्या.क्षणभरानें गणपतराव तेथें येऊन पोहोंचले. त्यांचा चेहरा या वेळीं अगदीं पांढरा फटफटीत होऊन गेला होता. हृदयाप्रमाणेंच हातांपायांनांहि प्रचंड कंप सुटला होता. घशाला कोरड पडली होती. ओंठ सुकून गेले होते.

गणपतराव येतांच वहिनीसाहेब दोन पावलें पुढें आल्या. मधुर स्मित करीत त्या ह्मणाल्या "झाली ह्मणायची आमची आठवण शेवटीं ? कां बरं, आजच एवढं ओढून धरायला झालं, गडे ?"

गणपतराव खालीं मान घालून उभे राहिले होते. त्यांच्या तोंडून शब्दहि फुटेना !

"कां, अबोलाच वाटतं अजून माझ्याशीं ? असा माझ्या हातून आपला अपराध तरी काय झाला बाई ?"

तरीहि गणपतराव निरुत्तरच !

"माझ्याकडून चुकून कांहीं अपराध झाला असेल, तर मला क्षमा करावी हो गडे ! मी आपली अर्धांगी ना ?"

गणपतरावांच्या डोळ्यांतून खळ्कन् दोन अश्रुबिंदु पडले; परंतु वहिनीसाहेबांनीं ते पाहिले नाहींत.

"राग आला असला तर जाईल. पण माणसांनां बसायला तरी कांहीं हरकत नसावी आल्यावर. बसावं—बसावं—नाहीं बसायचं ?" असें ह्मणून वहिनीसाहेबांनीं मृदु हास्य केलें.

गणपतराव गद्गद स्वरानें ह्मणाले "नाहीं !"

"कां बरं ? काय अपराध झाला असा माझ्या हातून ? माझ्यावर कालपासून इतका राग कां बरं ?"

कांहीं न बोलतां गणपतरावांनीं सदऱ्याच्या खिशांतून एक लिफाफा बाहेर काढला, व आपला कांपणारा हात पुढें करून तो वहिनीसाहेबांसमोर धरला.

वहिनीसाहेबांनीं विचारलें "कुणाचं पत्र ?"

"तुझेंच."

वहिनीसाहेबांनीं हात पुढें करून गणपतरावांच्या हातांतून तें पत्र घेतलें, आणि लिफाफा उलटा सुलटा करून पाहिला. पत्र डाकेंतून आलें नाहीं, असें त्या समजल्या.

"कुणीं लिहिलं आहे हें ?" त्यांनीं विचारलें.

"फोडून पहा." एवढे दोनच शब्द कसेबसे रुद्ध कंठानें उच्चारून एखाद्या दारू प्यालेल्या माणसाप्रमाणें गणपतराव झुकांड्या खात निघून गेले !

'पतिराजां'च्या या चमत्कारिक वर्तनाची वहिनीसाहेबांनां कांहीं मीमांसाच करतां येईना ! पण त्यांच्या मनांत कांहीं चमत्कारिक शंका उद्भवून छातींत एकदम धस्स झालें. एक अज्ञात पण महाविकाळ राक्षस, आपणाला खाण्याकरितां आपला भयंकर जबडा पसरून आपणाकडे धांवून येत आहे, असें त्यांनां वाटूं लागलें. त्यांचा दुखण्यामुळें पांढुर झालेला चेहरा अधिकच पांढरा फटफटीत होऊन गेला. हातपाय थरथरां कांपूं लागले.

क्षणभर विचार करून, कांपणाऱ्या हातांनीं वहिनीसाहेबांनीं तो लिफाफा फोडला. मेघावडंबरामुळें क्षीण झालेल्या प्रकाशांत त्या तें पत्र वाचूं लागल्या.

पत्र असें होतें:—

"मी तुला कसें आणि कोणत्या नांवानें संबोधूं, हेंच मला कळत नाहीं. माझ्या जीवनाचें तूं केवळ एकमात्र सुख आहेस–तूं माझ्या आयुष्याचा ब्रह्मानंद आहेस–माझ्या जीविताच्या काळोख्या अमावास्येमध्यें तूं **पौर्णिमेचा चंद्र** आहेस ! परंतु दैवाच्या विडंबनामुळें, हा ब्रह्मानंद दूर फेंकून देऊन दुःखाच्या गर्तेंत उडी घ्यावयाला मी सिद्ध झालों आहें. मी चांगला शिकलासवरलेला माणूस नाहीं–सरस्वतीची कृपा मजवर बिलकूल नाहीं. त्यामुळें मनांतील साऱ्या गोष्टी ठीकठीक

रीतीनें तुला लिहून कळविण्याचें सामर्थ्य मला नाहीं. तें सामर्थ्य मला असतें, तर या पत्रानें माझ्या हृदयांत तुझ्याबद्दल जें अनिर्वचनीय, अकृत्रिम, गाढ प्रेम वसत आहे, त्याची मीं तुला खात्री पटवून दिली असती.

" मी जन्माचाच दुर्दैवी आणि दुःखी, यांत संशय नाहीं. मला वाटलें होतें, कीं, इतक्या दिवसांनीं निर्दय विधीनें प्रसन्न होऊन, मजवर सुखाचा वर्षाव चालविला आहे; परंतु माझ्या अदृष्टांतच सुख नाहीं, त्याला त्याचा तरी काय उपाय ? माझ्या सर्व सुखांचें, आशांचें पार भस्म झालें ! मी अत्यंत दुष्ट, दुराचारी, पापी, नीच, अधमाधम आहें. माझ्यासारखा पातकी, दुराचारी माणूस पृथ्वीवर एकहि नसेल. मीं तुझा जो भयंकर अपराध केला आहे, त्याला बिलकूल क्षमाच नाहीं, हें मला चांगलें ठाऊक आहे. हिंदु कुळांत जन्माला आलेली कोणतीहि सती साध्वी पतिव्रता स्त्री त्या अपराधाची कधीं चुकूनहि क्षमा करणार नाहीं. खरोखरच मी क्षमेला अगदीं अयोग्य आहें. मी मूर्ख, अगदीं अशिक्षित; परंतु तुझ्यावर माझें अगदीं हृदयाच्या हृदयाचें प्रेम जडल्यामुळें, या दोनतीन महिन्यांत मला जें शिक्षण मिळालें आहे, त्यामुळेंच हें पत्र कसेंबसें तुला लिहावयाला मी बसलों आहें.

" तुझ्यावर माझें जें प्रेम जडलें आहे, तसें साऱ्या जन्मांत माझें कोणावरच, जगांतील कोणत्याच वस्तूवर कधीं जडलें नाहीं, हें मी तुझीच—माझ्या हृदयदेवतेची—शपथ वाहून सांगतों. तुझें पुण्यदर्शन घडण्यापूर्वीं, 'प्रेम' कशाला ह्मणतात, त्याची नुसती मला कल्पनाहि नव्हती. तुझ्यावर माझें हृदयाचें खरेंखुरें प्रेम जडलें आहे—तुला फसविण्याचें पातक मी करणार नाहीं. अगदीं निष्कपट मनानें, अकृत्रिम प्रेमानें, तूं माझ्यावर विश्वास टाकून निःशंक राहिली आहेस. तुझ्या हृदयांत कट्यार खुपसण्याइतका दुष्ट नीच नराधम मी नाहीं.

" तर मग खरी गोष्ट मी तुला सांगतों. नीट ध्यान देऊन वाच. माझें नांव धुंडिराज नाहीं—मी तुझा पतीहि नाहीं. तुझा पति खरा धुंडिराज केव्हांच परलोकीं गेला. हें कळून आल्यामुळेंच, त्याच्या अतुल संपत्तीच्या लोभानें मी नानासाहेब बनून—"

येथपर्यंत तें पत्र वहिनीसाहेबांनीं कसेंबसें वाचल्यावर त्यांच्या डोळ्यांसमोर भयंकर काळोखी दिसूं लागली. क्रमाक्रमानें तो अंधकार वाढत चालला, आणि चेतना हरपून त्या कोचावरून धाड्कन् खालीं जमिनीवर पडल्या.

यानंतर सुमारें अर्धमिनिट गेलें असेल. सुपारी—व हळूच तमाखूहि—चघळीतचघळीत हलतडुलत चंपाबाईंची स्वारी तेथें येऊन पोहोंचली. दारापाशीं येतांच, वहिनीसाहेब मूर्च्छित पडलेल्या पाहून "आं—हें काय बाई झालं ?" असें उद्गारून ती धांवतच त्यांच्यापाशीं गेली.

वहिनीसाहेबांच्या हातांतील पत्र जमिनीवर पडलें होतें—तें झट्कन् उचलून घेऊन, चंपेनें, येथली एक ओळ, तेथली एक ओळ, इकडलें एक वाक्य, तिकडलें एक वाक्य, असें भराभरां वाचतांच सर्व प्रकार हां हां ह्मणतां तिच्या लक्ष्यांत येऊन चुकला. घाईघाईनें पत्र चोळीमध्यें लपवून, " धांवा हो धांवा ! हें पहा काय झालें तें वहिनीसाहेबांनां !" असें ती ओरडत सुटली.

चंपेची ओरड ऐकतांच वाड्यामध्यें एकच पळापळ सुरू झाली. चहूंकडे धांदल उडाली. पहिल्यानें यमुना धांवतच तेथें आली. तिच्यामागून धापा टाकीतटाकीत बायजा येऊन पोहोंचली. आणखीहि कांहीं बायका, दासी तेथें येऊन थडकल्या.

वहिनीसाहेबांजवळ मस्तकावर हात ठेवून बसून, बायजेनें रडूनओरडून सारा वाडाच डोकीवर घ्यावयाला सुरुवात केली होती; परंतु मोठ्या कष्टांनीं चंपाताईनें तिला थांबविलें.

इतक्यांत आईसाहेबहि तेथें येऊन पोहोंचल्या. तत्क्षणीं वहिनीसाहेबांच्या मस्तकावर गार पाण्याचे हबके मारून, फोडलेला कांदा नाकाशीं धरून त्यांनां शुद्धीवर आणावयाचे प्रयत्न जारीनें सुरू झाले.

कांहीं वेळानें वहिनीसाहेबांनीं शुद्धीवर येऊन हळुहळू डोळे उघडून इकडेतिकडे पाहिलें. दोघांतिघांनीं उचलून त्यांनां कोचावर बसविलें.

आईसाहेब तेथें आल्यापासून ढळढळां रडत होत्या. त्यांनीं रडतरडत विचारलें " काय असं एकाएकीं झालं तुला बाळ ? मघाशीं तुला बरं वाटत होतं चांगलं, नी एकाएकींच हें भलतंच काय झालं ? "

वहिनीसाहेबांनीं कांहींच उत्तर न देतां, कपाळाला नुसता हात लावला, आणि एक मोठा उसासा टाकला.

चंपाताईचें लक्ष्य अगदीं पूर्णपणें वहिनीसाहेबांकडे होतें. त्या पत्राचा बिलकूल शोध करीत नाहींत, त्याच्या शोधार्थ त्यांचे डोळे इकडेतिकडे फिरकत नाहींत, हें

तिच्या तेव्हांच लक्ष्यांत आलें. वहिनीसाहेब एकसारख्या वर कडीपाटाकडे पहात होत्या.

आईसाहेबांनीं विचारलें "मुली, निजतेस का बिछान्यावर ?"

वहिनीसाहेबांनीं मान हलवून 'होय' म्हणून सुचविलें.

दोघांचौघां बायकांनीं वहिनीसाहेबांनां धरून बिछान्यावर नेऊन निजविलें. पाण्यानें ओलीं झालेलीं वस्त्रें बदलण्यांत आलीं व त्यांच्या औषधपाण्याची व्यवस्था सुरू झाली.

एकंदर प्रकरण खरोखर आहे तरी काय, हें समजून घेण्यासाठीं चंपेला अगदीं कमालीची चुटपुट लागून राहिली होती. तिनें तें पत्र चोळीमध्यें लपवून ठेविलें होतें; तें जळत्या निखाऱ्यांप्रमाणें तिच्या वक्षःप्रदेशाला अगदीं जाळून सोडीत होतें !

चांगलीशी संधि पाहून चंपा वहिनीसाहेबांच्या खोलींतून चट्‌कन् सटकली, आणि आपल्या खोलींत आली. येतांच अगोदर तिनें खोलीचें दार बंद करून त्याला हळूच कडी घातली; नंतर एका खिडकीजवळ येऊन ती उभी राहिली. त्या वेळीं पाऊस पडावयाला सुरुवात झाली होती. उघड्या खिडकींतून पावसाच्या मजेदार शिडका आंत येत होत्या.

किंचित् मागें सरून चंपेनें तें 'हृदयाला जाळणारें' पत्र चोळींतून बाहेर काढलें, आणि ती तें अत्यंत उत्कंठेनें वाचूं लागली.

कशी तरी मोडकीतोडकी प्रस्तावना करून त्या पत्रांत गणपतरावांनीं आपलें सर्व चरित्र संक्षेपानें लिहिण्याचा प्रयत्न केला होता. आपली पत्नी सरस्वती हिचें आपणावर प्रेम नसणें, सुटी घेऊन तिला नोकरीच्या गांवीं आणावयासाठीं आपल्या घरीं जाणें, तेथें जातांच ती आदल्या रात्रींच कोठें नाहींशी झाली असें आपणाला कळून येणें, तिच्या माहेरच्या गांवच्या इनामदाराचा भाऊ बापुराव याच्या-बरोबर ती पळून गेल्याची कुजबूज, दुधईला परत आपण येतों तों कंपनीकडून आपणाला आलेली नोटीस, आगगाडींतून बैराग्याचें प्रेत स्टेशनावर खालीं उतरणें, ऐन मध्यरात्रीं त्याची ट्रंक उघडून त्याचे पैसे व कागद-पत्र लांबविणें, त्या कागदपत्रांवरून मृत व्यक्तीच्या हकीगतीचें अक्षरन् अक्षर कळून येणें, त्याचें आत्म-चरित्र, त्या मृत बैराग्याच्या व आपल्या चेहऱ्यांमधील आणि वय वगैरे गोष्टींमधील विलक्षण साम्य, शेवटीं नानासाहेब बनून बाणथडीला येण्याची कल्पना आणि ती कल्पना बेमालूमपणें अमलांत आणण्यासाठीं केलेली उपाययोजना इत्यादि सर्व गोष्टी यथावकाश लिहून, गणपतरावांनीं त्या पत्रांत शेवटीं लिहिलें होतें:—

"मी दुष्टपणानें अत्यंत पापी कल्पना मनांत आणून, जो बेत मीं योजला, तो अगदीं उत्कृष्ट रीतीनें सिद्धीला गेला, यांत बिलकूल संशय नाहीं. मी अस्सल नाना-साहेब नसून, कोणी तरी त्यांची नक्कल–तोतया आहें, असा नुसता संशयदेखील तुह्मांपैकीं कोणालाहि आला नाहीं. कोणतेंहि विघ्न न येतां या विपुल राज्यैश्वर्याचा उपभोग मला उत्तम रीतीनें घेतां आला असता; परंतु माझ्या योजनेंत एक मोठी चूक झाली होती. त्या वेळीं खरें प्रेम ह्मणजे काय पदार्थ आहे, याची नुसती ओळखहि मला नव्हती ! त्या वेळीं मला ठाऊक नव्हतें, कीं, शुद्ध प्रेमामुळें मनुष्याच्या मनाचें विलक्षण परिवर्तन होतें ! आतां तें मला पूर्णपणें कळून आलें आहे. या एका गोष्टीमुळें, माझी सर्व योजना पार मातीला मिळाली !

"देवि, तुझ्या चरणांचे जे मीं अत्यंत भयंकर अगदीं अक्षम्य अपराध केले आहेत, त्यांच्याबद्दल तुझ्या लक्षावधि क्षमा मागून मी तुझा जन्माचा निरोप घेतों. जोंपर्यंत माझ्या या पापी देहांत माझे नीच प्राण असतील, तोंपर्यंत मी परमेश्वरापाशीं एकच प्रार्थना करीत राहीन, कीं, माझ्या हृदयाची देवी चिरकाल सुखी असो; पापताापाचा, दुःखाचा तिच्या मनाला कधीं स्पर्शहि न होवो; या क्षणापर्यंत ती जशी शुद्ध राहिली, तशी ती आमरणांत शुद्ध राहो; धर्ममार्गाचें आक्रमण करीत असतां, परमेश्वरी इच्छेनें ती शांत, निष्पाप मनानें आपल्या पुण्यावताराची समाप्ति करो !

"तुझ्यापाशीं ज्याप्रमाणें मीं सर्व गोष्टी उघडउघड रीतीनें कबूल केल्या, त्याप्रमाणेंच परमपूज्य मातुःश्री आईसाहेबांपाशींहि त्या कबूल करणें मला सर्वथैव उचित होतें. त्यांच्या पायां पडून त्यांची क्षमायाचना करणें हेंच मला योग्य होतें; परंतु एकच विचार मनांत येऊन ती गोष्ट मीं केली नाहीं. मीं जर आईसाहेबांपाशीं आपले अपराध कबूल केले, तर वाड्यांतल्या एकुणएक व्यक्तींच्या कानांवर ही हकीगत हां हां ह्मणतां जाईल–आणि पुढें क्रमाक्रमानें सर्व गांवाला–सर्व देशाला ती कळून येईल ! आणि असें झालें म्हणजे लोक तुझ्या विशुद्ध, शुभ्र

नांवाला निष्कारण–आणि तोहि जन्माचा–कलंक लावतील ! देवि, तूं किती निष्पाप, निर्मल, पवित्र पतिव्रता आहेस, त्याची कलुषित लोकगंगेला यथार्थ कल्पना कशी असणार ? तुझी पुण्यपावन योग्यता लोकांनां कशी कळणार ?

"हाय ! तुझें परम अनिष्ट जें काय घडून येणें शक्य होतें, तें तर मी अधमाधम करून चुकलों आहें. आणखी अधिक मी करीत नाहीं. देवि, माझी पाप्याची नुसती आठवणहि आपल्या पवित्र हृदयावरून पार बुजवून टाक आणि सुखानें, पवित्रतेनें, योग्य कालीं आपली येथील संसारयात्रा आटोपून परलोकीं आपल्या पतीशीं अक्षय्य एकजीव होऊन रहा. माझ्यासारखा हतभागी माणूस जगांत आजवर कधीं झाला नाहीं, आणि पुढेंहि कधीं होणार नाहीं !

"झालें–हृदयदेवि, संपली माझी कर्मकहाणी ! तुझा जन्माचा निरोप घेऊन मी आपलें काळें तोंड घेऊन निघून जातों. पुनः तुला या हतभाग्याची कधींहि आठवणहि न होवो !

गणपतराव देशपांडे."

" ताजाकलम—

एक विचार माझ्या मनांत आतांच आला आहे. त्यामुळेंच, तुझा जन्माचा निरोप घेऊन गेल्यानंतरहि फिरून मी तुझ्या चरणांपाशीं आलों आहें. तो विचार तुला लिहून माझ्या अपराधांत मी अधिकच भर घालतों आहें कीं काय, हें मला कळत नाहीं. या वेळीं माझ्या बुद्धिशुद्धीचा अगदीं पूर्णपणें लोप होऊन गेला असल्यामुळें, मी तुला काय लिहितों आहें, याचें मला कांहींच भान नाहीं ! अगदीं स्वतःलाहि विसरून, पूर्णपणें ज्ञानशून्य होऊन मीं जसें तुझ्यावर प्रेम केलें, तसेंच जर या हतभाग्यावर तुझेंहि प्रेम जडलें असेल आणि विधवापुनर्विवाह हा पाप किंवा दुराचार नाहीं, असें तुझें अंतःकरणपूर्वक मत असेल, तर तूं आणि मी, यथाशास्त्र, विधिपूर्वक विवाहबंधनानें बद्ध होऊन पति–पत्नी या नात्यानें संसाराश्रमाचा सुखानें आणि धर्मानें उपभोग घेऊं. या गोष्टीला जर तुझी संमति मिळेल, तर माझ्या हातीं स्वर्गच येईल, ही गोष्ट कांहीं तुला निराळी सांगावयाला नको आहे. तुझी या गोष्टीला संमति नसेल, तर तसें तुझ्याकडून मला कळतांच, मी येथून तुझा जन्माचा निरोप घेऊन जाईन. माझ्या सर्व भयंकर अपराधांची मला क्षमा कर, हीच, हृदयदेवते, तुझ्या चरणांपाशीं माझी अखेरची करुण याचना आहे.

गणपतराव."

या वेळीं जोराजोरानें पाऊस पडत होता. मधुनमधून गुरगुर गुरगुर अशी आकाशांत मृदु गर्जनाहि होत होती. पत्र संपूर्ण वाचून झाल्यावर चंपा स्तंभित होऊन कांहीं वेळ शून्य दृष्टीनें वर आकाशाकडे पहात राहिली. नंतर तिनें तें पत्र आपल्या ट्रंकेंत, अगदीं खालीं तळाशीं ठेवलें आणि ट्रंक बंद केली.

चंपा आश्चर्यचकित होऊन मनाशींच म्हणाली " दैवानंच खैर केली, म्हणून हें पत्र माझ्या हातीं पडलं; नाहीं तर काय भयंकर घोंटाळा उडाला असता ग बाई ! दुसऱ्या कुणाच्या हाताला हें पत्र लागतं तर इतक्या अवधींत साऱ्या वाणथडीभर या एकाच गोष्टीची ज्याच्या-त्याच्या तोंडीं चर्चा सुरू झाली असती ! गणपतराव जाणार तर जाऊंद्यात–लोकांनां वाटेल, कीं, नानासाहेब पूर्वी जसे घरांतून पळून जाऊन वैरागी झाले, तसेच, त्यांनां पुनः वैराग्याची लहर आल्यामुळं ते पुनः घरांतून निघून गेले ! संसारांत त्यांचं मन टिकलं नाहीं ! गणपतरावांनीं ठीक लिहिलं आहे–ही गोष्ट कानाच्या कोनालाहि न कळण्यांतच सर्वांचं हित आहे !"

ट्रंक नीट लागली आहे, अशी खात्री करून घेऊन चंपा खिडकीशीं येऊन उभी राहिली, व अनिमेष दृष्टीनें, कोसळणाऱ्या पावसाकडे पाहूं लागली. अस्फुट स्वरानें ती आपल्याशींच ह्मणाली " आश्चर्य ! खरोखरीच भारी कौतुक करण्यासारखंच आश्चर्य आहे हें ! हे गणपतराव आहेत तरी कोण ?—मनुष्य का देव ? खरंच, त्यांच्या पायांची धूळ मस्तकाला लावावी, असं मला वाटूं लागलं आहे ! या पापी जगांतहि अशा पवित्र देवता आहेत ह्मणायच्या !"

इतक्यांत दरवाज्याची कडी वाजली.

" कोण आहे ?"

" मी यमुना. माई, माई, काय करते आहेस ग ? चल, झट्कन् ये–काय घोंटाळा उडाला आहे तिकडे !"

" काय झालं ग ?"

" वहिनीसाहेबांनां पुनः जबरदस्त झीट आली आहे."

झट्कन् दार उघडून चंपा बाहेर आली, व यमुनेबरोबर वहिनीसाहेबांच्या खोलीकडे धांवतच निघाली.

प्रकरण सातवें.

त्यांतल्यात्यांत !

गणपतराव बाहेर, दिवाणखान्याच्यावरील आपल्या शयनगृहांत पलंगावर पडले होते. या वेळीं त्यांच्या मस्तकांत आगीचा नुसता डोंब उसळून राहिला होता. या कुशीवरून त्या कुशीवर अशी त्यांची सारखी तळमळ-तळमळ चालली होती. जवळच टेबलावर एक मोठा 'मून' दिवा तेवत होता. वहिनीसाहेबांची स्थिति कांहीं फारशी आशाजनक नव्हती. रात्रीं दहा वाजेपर्यंतची हकीगत गणपतरावांनां कळली होती. वैद्यबुवा एकसारखे वाड्यांत खेपा घालीत होते.

गणपतराव स्वतःशींच ह्मणत होते "शिवशिव ! काय मी करून बसलों हें ! अगोदरच आजारानें अनूची अगदींच वाईट स्थिति झाली आहे; अशा स्थितींत हा दारुण 'वज्राघात' तिच्या दुर्बल मनाला अन् शरीराला बिलकूल सहन होणार नाहीं, हें मला मूर्खाला कसें कळलें नाहीं, कोण जाणे ! एखाद्या लहान मुलाला देखील हें सहज कळलें असतें-विशेष बुद्धिमत्तेची या गोष्टीला गरज नव्हती. शिवशिव ! किती मूर्ख मी ! केवढा अधमाधम नीच चांडाळ मी ! अनूची स्थिति फार भयंकर आहे ह्मणतात-अन् दुर्दैवानें-जर-जर-कांहीं बरेंवाईट झालें, तर तिची हत्त्या मींच केली, असें नाहीं का होणार ? ही हत्त्या—हा धडधडीत खून आहे-हा नरयज्ञ आहे-निष्ठुरतेची ही परम सीमा नव्हे काय ? स्त्रीहत्त्या माझ्या हातून व्हायचीच, असेंच माझ्या कपाळीं लिहिलें होतें काय ? हाय ! कसलें भयंकर अदृष्ट कपाळीं घेऊन मी करंटा या जगांत आलों, कुणाला ठाऊक !"

गणपतरावांच्या डोळ्यांतून अत्यंत वेगानें अश्रुप्रवाह सुरू झाला. उशीमध्यें तोंड लपवून ते स्फुंदस्फुंदून रडूं लागले. त्यांच्या अश्रुजलानें उशी अगदीं भिजून गेली !

कांहीं वेळानें, आपला शोकावेग स्वतःच आवरण्याचा प्रयत्न करून गणपतराव स्वतःशींच ह्मणाले "जी जिवाची आशा माझ्या मनाला लागून राहिली आहे, ती पूर्ण होणें बिलकूल अशक्य आहे, असें उघडउघड दिसतें. जर माझ्याशीं पुनर्विवाह करायला कांहीं हरकत नाहीं, असें अनूचें मत असतें, तर माझें पत्र वाचून तिच्या मनावर इतका जबरदस्त आघात झालाच नसता! निराशेमुळें उत्पन्न झालेलें तीव्र दुःख तिला बरेंच झालें असतें, यांत तर कांहीं संशय नाहींच; परंतु तिच्या त्या दुःखामध्यें आशाहि बरीच ध्वनित झाली असती, हेंहि तितकेंच खरें आहे. परंतु तसें तर बिलकूल कांहीं झालेलें दिसत नाहीं. अन् खरें म्हटलें तर असें व्हावें तरी कां ह्मणून ? या ठिकाणींहि माझ्या हिशेबांत एक जबरदस्त चूक झालेली आहे ! अनूच्या मनावर जन्मापासून जुन्या मतांचे संस्कार झालेले आहेत, एका जुन्या मताच्या ब्राह्मण घराण्यांत ती लहानाची मोठी झालेली आहे. हे सर्व संस्कार अजीबात बाजूला सारून, पुनर्विवाहाच्या गोष्टीला तिनें मनांत स्थान द्यावें, हें संभवनीय तरी आहे काय ? ज्या देशांत कित्येक शतकें, कित्येक सहस्रें, विधवांनीं पुनः लग्न करणें ह्मणजे दोन्ही कुळांनां 'यावच्चंद्रदिवाकरौ' नरकांत बुडवून ठेवणें, असा कुलीन स्त्रियांचा दृढ भरंवसा आहे, त्या देशांत, त्या कुळांत जन्म घेऊन, या वंशपरंपरागत,—ज्याचीं पाळेंमुळें अतिशय खोल व दूरवर गेलेलीं आहेत अशा संस्काराला एखादी स्त्री आपल्या हृदयांतून मुळासकट उपटून काढून दूर फेंकून देईल, ही गोष्ट सर्वथा अशक्य होय. मी अशी आशा हृदयाशीं धरून बसलों, हा माझाच वेडेपणा ! मी वेडाच नाहीं तर काय ? पण हाय ! मी वेडा असतों, तर आणखी काय पाहिजे होतें ! या दुःसह मर्मयातनांच्या आगींत तरी मला असें जळावें लागलें नसतें !"

गणपतराव बिछान्यावर ताड्कन् उठून बसले, व दोन्ही हातांनीं तोंड घट्ट झांकून घेऊन रडतरडत अर्धस्फुट स्वरानें ह्मणाले "आहा ! जर मला वेड लागलें असतें ! जर मला स्मृतिभ्रंश होता—"

कचेरीच्या खोलींतील घड्याळांत ठण् करून एकाचा ठोका पडला. तत्क्षणीं गणपतराव एकदम चमकल्यासारखे झाले ! ते पलंगावरून खालीं उतरले, व एका खिडकीजवळ जाऊन उभे राहिले. तेथून वाड्याचा मागील भाग बराच दिसत होता. आकाश मेघखंडांनीं भरून गेल्यामुळें चांदणें फारसें स्पष्ट नव्हतें; परंतु त्या साधारण प्रकाशांतहि गणपतरावांनां दासदासींची आंतून बाहेर, बाहेरून आंत चाललेली वर्दळ

चांगलीच दिसत होती—तर मग वहिनीसाहेब अजून आहेत–कांहीं भलतेंसलतें अजूनहि घडून आलेलें नाहीं!

शून्य दृष्टीनें गणपतराव कांहीं वेळानें वाड्याच्या त्या भागाकडे पहात खिडकीपाशीं उभे राहिले. थोड्या वेळानें त्यांचा त्यांनांच त्रास होऊं लागला, आणि ते पलंगावर येऊन पडले. झोंप आली तर पहावी, या हेतूनें त्यांनीं डोळे मिटले; परंतु जो बोलूनचालून हतभागी, त्याच्याकडे निद्रादेवी तरी काय म्हणून ढुंकून पाहील ?

तळमळ तळमळ करीत गणपतराव याप्रमाणें पलंगावर पडले आहेत, इतक्यांत कांहीं वेळानें, खोलीच्या दरवाज्यावर हळुहळू कोणी आघात करीत आहे, असा त्यांनां भास झाला. चकित होऊन ते कान देऊन ऐकूं लागले, तों खरेंच–कोणी अंगुलीनें दरवाज्यावर आघात करीत आहे ! तत्काल, क्षणार्धांत विजेप्रमाणें त्यांच्या मनांत अशी कल्पना आली, कीं. वहिनीसाहेबांचा अंतकाल अगदीं नजीक आला आहे, ही खबर देण्यासाठींच कोणी तरी आंतून आलें असावें.

तत्क्षणीं गणपतरावांनीं उठून बसून जडस्वरानें विचारलें "कोण आहे ?"

परंतु त्यांनां कांहींच उत्तर मिळालें नाहीं. मात्र पूर्वीप्रमाणेंच दरवाज्यावर हळुहळू अंगुलीचे आघात चालूच राहिले.

तेव्हां गणपतरावांनीं उठून, दरवाज्याजवळ जाऊन, कंपित हृदयानें व कांपणाऱ्या हातानें तो हळूच उघडला आणि पहातात तों समोर पांढरें पातळ नेसलेली एक तरुण स्त्री ! तिला पाहून त्यांनां आश्चर्य वाटल्यावांचून राहिलें नाहीं.

त्यांनीं कांपणाऱ्या जड स्वरानें विचारलें "कोण ? कोण तुम्ही ?"

त्या स्त्रीनें खोलींत येऊन अगोदर झट्कन् दरवाजा लावून घेतला. नंतर गणपतरावांच्या अगदीं जवळ येऊन ती उभी राहिली. पातळाचा कमरेला खोंचलेला पदर तिनें मोकळा करून एकदोन वेळां मागेंपुढें केला; कपाळावर येऊं पहाणाऱ्या केंसांच्या बटा तिनें हळुहळू मागें सारल्या आणि ती स्थिर दृष्टीनें गणपतरावांच्या चेहऱ्याकडे पहात राहिली. गणपतरावांनीं तिच्याकडे पाहिलें, तों ती स्त्री अगदीं तरुण, जवळजवळ वीस एकवीस वर्षांची असावी, असें त्यांनां वाटलें. तिच्या कपाळीं सौभाग्यतिलक नव्हता; तरी तिच्या तोंडावर सौंदर्याचें तेज नुसतें सांडून राहिलें होतें. तिचे डोळे मात्र थोडेसे विषादयुक्त आणि म्लान दिसत होते.

गणपतरावांनीं पुनः विचारलें "तूं–तुम्ही कोण आहां ?"

"माझं नांव चंपा."

"गणपतरावांनीं 'चंपा' हें नांव पुष्कळ वेळां ऐकलें होतें. वहिनीसाहेबांची ही मैत्रीण आहे, हें त्यांनां ठाऊक होतें. चार सहा वेळ त्यांनीं तिला दुरून पाहिलेंहि होतें.

"ओः ! हां—काय म्हणतां ? काय हकीगत आहे एकंदरींत ? वहिनीसाहेबांची तब्बेत कशी काय आहे ?"

चंपा गंभीरपणानें म्हणाली "मोठीशी कांहीं ठीक नाहीं."

आपली छाती कोणी जोरानें दाबून धरीत आहे, असें गणपतरावांनां वाटलें. त्यांनीं रुद्ध कंठानें विचारलें "ठीक नाहीं ? तर मग काय–"

गणपतरावांच्या तोंडांतून शब्दच फुटेना. डोळे अगदीं भरून आले. चंपेकडे ते एकसारखे पहातच राहिले.

चंपा पूर्वीप्रमाणेंच म्हणाली "वैद्यबुवांनीं निकाल सांगितलाच आहे–आजची रात्र तरी जाईल कीं नाहीं, याबद्दल संशय आहे."

चंपेच्या तोंडचे हे शब्द ऐकतांच गणपतरावांच्या डोळ्यांसमोर एकदम अंधारी आली. ते दोन पावलें झट्कन् मागें सरले व पलंगाच्या टोंकावर मस्तकावर हात ठेवून बसले. त्यांची कमर अगदीं खचून गेली.

टेबलाजवळ जाऊन चंपेनें दिव्याची वात मोठी केली–खडखड करीत जवळची मोठी खुर्ची पलंगाजवळ ओढून आणली, आणि प्रकाशाकडे तोंड करून गणपतरावांसमोर ती खुर्चीवर बसली.

सुमारें एक मिनीटभर स्तब्ध राहून अति मधुर, अत्यंत कोमल स्वरानें चंपा म्हणाली "त्याबद्दल नुसता विचार करकरून आतां काय होणार ? ज्याच्या अदृष्टांत जें लिहिलं असेल, तें होणारच ! त्याचं खंडन करणं प्रत्यक्ष देवाला तरी शक्य आहे का ? नका–असे डोळ्यांतून अभद्र पाणी नका काढूं. असं काय बरं करतां ? आपण तर चांगले शहाणे, ज्ञानी आहां. डोळ्यांतून पाणी काढणं आम्हां बायकांनांच शोभतं !"

गणपतरावांनीं हळुहळू मस्तक वर उचललें, व विचारलें "तुम्हाला माझ्याकडे कुणीं पाठविलें आहे कीं काय?"

" कुणीं ह्मणजे ?"

" वहिनीसाहेबांनीं—"

" नाहीं बाई ! त्यांनीं पाठवायला त्या का शुद्धीवर तरी आहेत ?"

" शुद्धीवर नाहींत ? अरे देवा—त्यांनां बेशुद्ध होऊन कितीसा वेळ झाला ?" गणपतरावांनीं रुद्ध स्वरानें विचारलें.

गणपतरावांकडे आपल्या भेदक दृष्टीनें पहात चंपा ह्मणाली " आपण वहिनीसाहेबांनां तें पत्र देऊन गेलांत, तेव्हांपासून त्या बहुतेक बेशुद्धच आहेत—"

" अगदीं एकसारख्या ?"

" नाहीं. मध्यें एकदोन वेळ त्या शुद्धीवर आल्या होत्या; परंतु त्यांची शुद्धि फार वेळ टिकत नसे—चार दोन मिनिटांनीं त्यांनां पुनः मूर्च्छा येई—वहिनीसाहेब बहुतेक सारख्या बेशुद्धच आहेत—"

गणपतराव विचार करूं लागले—'या बाईला आपल्या पत्राची हकीगत कळलेली असावी, असें दिसतें. दुपारपासून मध्यंतरीं इतका वेळ गेला—इतका वेळ का ती गुप्त रहाणार आहे ? वाड्यांतल्या एकूण एक माणसाला ती कळून चुकली असेल आतांपर्यंत. सर्वांनां कळली तर कळो—कळेल याबद्दल तर मला मुळीं संशयच नव्हता; पण कळल्यानंतर चहूंकडे एकच गडबड व्हायची, ती अजूनहि कशी झाली नाहीं, याबद्दल मात्र भारी आश्चर्य वाटतें. हो, तेंहि खरेंच आहे. वहिनीसाहेबांची इकडे अशी अवस्था झालेली; त्यांच्या प्राणांसंबंधानें यमाची न् या मंडळीची भयंकर ओढाताण चाललेली—सारी मंडळी वहिनीसाहेबांच्या प्रकृतींतच गर्क असणार हें उघड आहे. मग या भयंकर घोंटाळ्यांत माझी कुणाला आठवणहि होऊं नये, यांत नवल तें काय ? परंतु वहिनीसाहेब तिकडे भयंकर प्राणसंकटांत—सर्वांचें ध्यान त्यांच्याकडे—असें असतां ही चंपा माझ्याकडे इतक्या रात्रीं कशाला आली आहे, कांहीं कळत नाहीं ! हिचा हेतु तरी काय असावा ?'

गणपतराव विचारांत पडले आहेत, कसली तरी त्यांनां जबरदस्त काळजी लागून राहिली आहे, असा विचार करून, त्यांचें सांत्वन करण्याच्या हेतूनें ती कोमल स्वरानें ह्मणाली " आपण वहिनीसाहेबांनां आज दुपारीं जें पत्र देऊन आलांत—समजलांत गणपतराव ?—तें पत्र दुसऱ्या कुणाला न सांपडतां किंवा न समजतां, केवळ माझ्याच हातीं पडलं, हें मोठं भाग्यच समजा ! तें पत्र मीं लपवून ठेवलं—माझ्या या शिताफीमुळं कुण्णाकुण्णाला त्यांतलं एक अक्षर दिखील कळलेलं नाहीं—"

गणपतरावांनीं आश्चर्यानें विचारलें " तुह्मीं तें पत्र लपवून कां ठेवलेंत ?"

चंपाताईंनीं खुर्ची आणखीहि थोडीशी पुढें सरकावली आणि पुनः त्या तिच्यावर ठाकठीक बसल्या. नंतर एकदां गणपतरावांकडे पाहून मग त्यांनीं खालीं जमिनीकडे दृष्टि लावली. एक मोठा उसासा सोडून त्या खिन्न स्वरानें ह्मणाल्या " आपलं पत्र जर दुसऱ्या कुणाच्या हातीं लागतं, तर केवढा अनर्थ कोसळला असता, आहे माहीत ? अहो गणपतराव, इतक्यांत ठाण्यावरचे पोलिस दिखील—"

गणपतराव निष्काळजीनें ह्मणाले " हो—ठाण्यावरचे पोलिस आले असते; पण येऊन त्यांनीं काय केलें असतें ?"

" काय केलं असतं ह्मणजे ? अहो, काय केलं नसतं मला सांगा ? आपणाला काढण्यांनीं बांधून नेलं असतं कीं—"

तीव्र स्वरानें गणपतराव ह्मणाले " नेलें असतें, तर नेलें असतें ! त्याबद्दल तुह्माला कां उगीच एवढी माथेदुखी? "

गणपतरावांचें हें वाक्य चंपेला भारी लागलें. गाल फुगवून, भुंवया आकुंचित करून अभिमानाच्या स्वरानें ती ह्मणाली "अहो गणपतरावजी, माथं असेल, त्याला माथेदुखी व्हायची ! मला आपण काय—समजतां तरी काय ?"

गणपतरावांनीं आश्चर्यानें विचारलें " ह्मणजे काय ? तुह्मी वहिनीसाहेबांच्या मैत्रीण आहां, हें मला माहीत आहे."

" या गोष्टीची आपणाला आठवण करून द्यावी, असा माझा हेतु नव्हता—मी किती झालें तरी माणूस आहें—आपल्या हातांपायांनां काढण्या लावून पोलिसांनीं पहाऱ्याखालीं आपणाला नेलं असतं, तर तें आह्मांला डोळ्यांनीं पहावलं असतं, असं का आपणाला वाटतं ? आपणाला वाटतं तरी काय ?—आमचं हृदय दगडाचं आहे, का पोलादाचं आहे, अशी तर नाहीं ना आपली कल्पना, गणपतराव ?" शेवटींशेवटीं चंपेचा स्वर अगदीं जड व सद्गदित झाला होता. तिच्या त्या सुंदर पाणीदार

डोळ्यांत अश्रुबिंदु उभे राहिले आहेत, असें गणपतरावांनां आढळून आलें.

त्या तरुणीचें हें वर्तन व हावभाव पाहून आणि भाषण ऐकून गणपतरावजींचें आश्चर्य तर उत्तरोत्तर वृद्धिंगतच होत गेलें. इतक्या रात्रीं, आपणाकडे येण्यांत या स्त्रीचा नुसतें सहानुभूतीचें प्रदर्शन, एवढाच का हेतु असावा ? गणपतराव मोठ्या गोंधळांत पडले. त्यांनीं विचारलें " ही गोष्ट सांगण्यासाठींच का तुह्मी इतक्या रात्रीं मुद्दाम इतके श्रम घेऊन माझ्याकडे आलांत ? "

चंपेनें झट्कन् गणपतरावांच्या हृदयाला उद्देशून एक तीव्र कटाक्षबाण सोडला, व किंचित् हंसल्यासारखें करून ती ह्मणाली " कां बरं ? इकडे आल्यामुळं माझ्या हातून आपला कांहीं अपराध तर नाहीं ना झाला बाई ? हो–एक करतां एक व्हायचं आपलं ! इकडे मी आलें ह्मणून आपणाला रागबीग तर नाहीं ना आला माझा ?"

गणपतरावांनीं तिच्या या प्रश्नाचें कांहींच उत्तर दिलें नाहीं. त्यांनीं विचारलें " इतक्या रात्रीं तुह्मी आलांत तरी कशा ?"

" कां बरं ?"

" वहिनीसाहेबांची तशी स्थिति झालेली—"

" सारीं माणसं त्याच धांदलींत गुंतलीं आहेत असं मीं पाहिलं—" चंपा मधुर स्मित करून, वक्र दृष्टीनें गणपतरावांकडे पाहून ह्मणाली." मोठा दरवाजादिखील या धांदलींत उघडा राहिला होता. मीं ही संधि साधली न् चट्कन् आलें आपल्या खोलीकडे !"

गणपतराव रागाच्या स्वरानें ह्मणाले " वः ! ठीक केलेंत ! तुम्ही मोठ्या धाडशीच दिसतां मला—"

मधुर मधूचा मनसोक्त वर्षाव करीत चंपा ह्मणाली " हें काय बरं हें असं ? "

" काय झालें ? "

" आपण मला मघांपासून एकसारखं ' तुम्ही ' 'तुम्ही' असं काय म्हणायचं बाई ? यामुळं मला अगदीं लाजेनं मेल्याहूनहि मेलं होऊन जातं हो ! मी काय अशी कुणी जहागीरदारीण आहें, का नबाबीण लागून गेलें आहें, तर मला आपण इतका बहुमान द्यावा ? असं काय बरं ? गडे, मी तर आपल्या पायांची दीन दासी ना ?"

या शेवटच्या वाक्याबरोबर चंपेनें गणपतरावांकडे एक प्रखर, चंचल कटाक्ष सण्कन् फेंकला ! नंतर पुनः मस्तक खालीं करून ती मृदु स्वरानें ह्मणाली "धाडस मीं केलं खरं; पण तें का मीं उगीच हौसेखातर केलं ? प्राण संकटांत पडल्यावर माणूस हवं तें साहस करायला तयार होतोच आहे !"

चंपेच्या मनांत कांहींतरी गूढ हेतु असावा, हें गणपतरावांच्या आतां लक्ष्यांत आलें. त्यांनीं विचारलें " एवढ्या कसल्या प्राणसंकटांत तुह्मी पडलां आहां ?"

काय आश्चर्य ! चंपेनें गणपतरावांच्या प्रश्नाला या वेळीं कांहींच उत्तर दिलें नाहीं ! तिनें आपलें मस्तक मघांशीं जें खालीं घातलें होतें, तें वर ह्मणून केलें नाहीं.

गणपतरावांनीं चंपेकडून कांहीं उत्तर येईल ह्मणून क्षणभर वाट पाहिली. नंतर, ती कांहींच बोलत नाहीं असें पाहून त्यांनीं विचारलें " खरं सांगा चंपाताई, इकडे येण्यांत तुमचा हेतु तरी काय आहे ?"

चंपेनें एक सणसणीत मुरका मारला ! वांकड्या दृष्टीनें ती गणपतरावांकडे पाहूं लागली. नंतर लज्जेच्या जड स्वरानें, मुरकतमुरकत, थांबतथांबत ह्मणाली " इकडच्या–पायांच्या–या–दीन दासीला–पायांशीं–आश्रय–मिळेल, या आशेनं इतक्या रात्रीं इकडे येण्याचं धाडस मीं केलं आहे. दुसरा आणखी माझा कोणता हेतु असणार आहे ?" असें ह्मणून तिनें एक मोठा थोरला उसासा टाकला.

चंपेच्या तोंडचे हे शब्द ऐकून गणपतरावांच्या तळपायांची आग मस्तकाला जाऊन भिडली ! त्यांचें पित्त अगदीं खवळून गेलें. आवेशानें, तिरस्कारानें त्यांनीं आपलें तोंड दुसरीकडे फिरविलें.

चंपा गणपतरावांकडे एकसारखी दृष्टि लावून बसली होती. ते आपणाशीं कांहींतरी बोलतील, अशी तिला फार आशा होती; परंतु ते कांहींच बोलत नाहींत, असें दिसून आल्यावर कांहीं वेळानें ती बोलूं लागली "इकडे पहा गणपतराव ! माझं ह्मणणं तरी ऐकून घ्या—"

कपाळाला आंठ्या घालून गणपतरावांनीं तिच्याकडे तोंड फिरविलें. नंतर चंपा बोलूं लागली "गणपतराव, वहिनीसाहेबांच्या अदृष्टांत जें लिहिलं होतं, तें तर घडून आलं. त्यांची आशा आतां सुटली आहे. पहांटेच्या सुमाराला–उजाडतांउजाडतां, त्यांचा साराच ग्रंथ आटोपेल, असं चिन्ह स्पष्ट दिसत आहे—"

" अग, तूं ह्मणतेस तरी काय ?" गणपतराव ओरडून ह्मणाले.

चंपा शांतपणें ह्मणाली " गणपतराव, बाणथडीची एवढी ही प्रचंड इनामत, राजासारखं एवढं हें मोठं वैभव, चोरांपोरीं लुटून खावं-फस्त करावं, हें आपणाला तरी बरं वाटतं का ? त्यापेक्षां आपणच त्याचा अविच्छिन्नपणं उपभोग घ्यायला काय हरकत आहे ? गणपतराव, आपणाला तर-आपणाला तर—"

" काय ह्मणतां ? मला काय ?"

चंपेनें एकवार पदर सरसावला, एक सपादून कटाक्ष ह्माणला आणि अत्यंत मधुर स्वरानें ती ह्मणाली "आपणाला तर-आपणाला विधवेशीं पुनर्विवाह करायला कांहींच हरकत वाटत नाहीं !"

आतां सर्व प्रकार गणपतरावजींच्या ध्यानांत आला. ते व्यंग्योक्तीनें ह्मणाले " तुमच्याशीं वाटतें ?"

चंपा गंभीर स्वरानें ह्मणाली " होय-माझ्याशीं ! त्याला काय हरकत आहे ? मी जातीनं ब्राह्मण आहें-माझं माहेरचं अन् सासरचं अशीं दोन्हीं कुळं मोठीं आहेत—"

गणपतराव पूर्वीच्याच स्वरानें ह्मणाले " त्या कुळांचा आपल्या या पराक्रमानें तूं उद्धार करायला पहाते आहेस वाटतें ?"

गणपतरावांच्या या व्यंग्योक्तीकडे चंपेनें मुळींसुद्धां लक्ष्य दिलें नाहीं. ती गंभीरतेनें ह्मणाली "आपण नानासाहेबांचं सोंग घेऊन आलां आहां, तसंच तें कायम ठेवावं. आपलं हें कपटनाटक कुणाच्याहि कधीं ध्यानांत यायचं नाहीं. माझ्याशीं आपण खुशाल राजरोस पुनर्विवाह करावा. या राजासारख्या संपत्तीचा, या प्रचंड राजवैभवाचा आपण दोघं मग हक्कानें उपभोग घेऊं ! बस्स-चैन-आनंद !"

गणपतरावांचा संताप आतां अगदीं अनावर भडकला. ते आपल्या मनाशींच ह्मणाले "ही सटवी आहे तरी कोण ? हडळ, जखीण का राक्षसीण ? ओः ! अंगाचा भडका होतो-भडका होतो ! काय करूं ? काय भयंकर हा पैशाचा लोभ ! काय ही सुखलालसा ! आपणावर विवाहित पत्नी ह्मणून माझें कधीं तरी प्रेम जडेल, अशी, माझें पत्र वाचल्यानंतर या डाकिणीला आशा लागून राहिली असावी ! केवळ वैभवाच्या न् संपत्तीच्या लोभानें आपल्या धर्मावर, लाजलज्जेवर तिलांजलि द्यायला ही तयार झाली अन् मलाहि आपणाबरोबर नरकांत ओढून नेण्यासाठीं इकडे आली ! आः ! काय भयंकर पिशाची ही ! निव्वळ सैतानी !"

गणपतराव विचारांत स्तब्ध आहेत असें पाहून चंपेनें विचारलें " असं काय बरं गडे ! मला काय तें उत्तर द्यावं ना एक ! दासीला चरणांपाशीं स्थान द्यायचं ना ?"

दांतांवर दांत आपटून, क्रोधकंपित स्वरानें गणपतराव ओरडले " काय करूं ? असें वाटतें, कीं, धाड्कन् तुला खालीं पाडून तुझ्या गळ्यावर पाय देऊन तुझा इथल्या इथें प्राण घ्यावा ! एका स्त्रीची तर मीं हत्या केलीच ! मनाला अनिवार इच्छा झाली आहे, कीं, आणखीहि एका स्त्रीची हत्त्या करावी-गळा दाबून प्राण घ्यावा ! हो तर काय ? जिथें ऐशीं तिथें पंचायशीं !"

चंपा झट्कन् उठून उभी राहिली. एका क्षणार्धात त्या नटीचें सर्व वर्तन आणि हावभाव यांत विलक्षण फरक दिसूं लागला ! अत्यंत मृदु मंजुल स्वरानें ती म्हणाली " गणपतराव, मलाहि आपली ही इच्छा पूर्ण व्हावी, असं वाटतं. गणपतराव, आपल्या मनांत आल्याप्रमाणं जर कराल, आपल्या या पुण्यमय चरणांनीं माझा गळा दाबून माझ्या या पापी कलंकित आयुष्याचा -मला भारभूत झालेल्या या जन्माचाच-जर आपण अंत करून टाकाल, तर मला वाटतं,-माझी खात्री आहे, कीं, माझ्यासारख्या पतित स्त्रीचाहि उद्धार होऊन मला स्वर्गलाभ होईल! परंतु हें सारं काव्य आहे--असं होणंच केवळ अशक्य आहे. पण माझ्या हातीं आहे तेवढं मी करतें-द्या, गणपतराव, आपल्या पायांची धूळ मला मस्तकीं ठेवूं द्या-माझ्या या धारिष्टाची आपण मला क्षमा करा." असें ह्मणून चंपेनें चट्कन् गणपतरावांचे पाय धरले.

चंपेच्या मघांच्या व आतांच्या वर्तनांतील विलक्षण फरक पाहून गणपतराव तर अगदीं हतबुद्धच होऊन गेले ! ही स्त्री आहे तरी कोण आणि हें करते आहे काय, हें त्यांनां कळेना. एखाद्या वेड्याप्रमाणें ते चंपेकडे टकमकां पहातच राहिले.

परंतु गणपतरावांच्या आश्चर्याच्या विस्ताराला फारसा अवसर न देतां चंपा उठून बसली, व ह्मणाली "गणपतराव, मी आपणाला अगदीं खरंखरं सांगतें. वहिनीसाहेबांनां आपण लिहिलेलं पत्र वाचल्यापासून, आपल्या पायांची धूळ मस्तकीं धारण करावी, अशी खरोखरच मला तळमळ लागून राहिली होती. मनुष्याचं हृदय इतकं सरळ, सत्यमय अन् त्यागशील असणं संभवनीय आहे, अशी मला कधीं स्वप्नांतहि कल्पना आली

नाहीं. माझ्या प्रेमाचं प्रदर्शन दाखवायला मी आपणाकडे आलें नाहीं, गणपतराव ! आपणाबद्दल माझ्या मनांत जी अपार श्रद्धा, भक्ति अन् आदर हीं उत्पन्न झालीं होतीं, त्यांचा आपणाला यत्किंचित् तरी परिचय करून द्यावा, या हेतूनं इतक्या रात्रीं मी आपणाकडे आलें. पण म्हणतात ना–'अंगारः शतधौतेन'–कोळशाचा घाणेरडा काळेपणा कसा नाहींसा होणार ? तितक्यांतल्या तितक्यांत माझी दुष्ट बुद्धि फिरली–मनांत आलं, कीं, थोडासा त्यांतल्यात्यांत अभिनयहि करावा ! हो, आपणाला सांगायला मी विसरलें–आपणाला अगोदरच सांगायला हवं होतं, कीं, मी जुन्या चालीची धर्मकर्मशील विधवाबिधवा कुछ नहीं ! माझा ब्राह्मणकुळांत जन्महि झालेला नाहीं—"

"तर मग ?" गणपतराव आश्चर्यातिशयानें ओरडले. "तर मग तूं आहेस तरी कोण ?"

"मी एक नटी–वारांगना आहें. तोंडाला रंग लावून मी मुंबईच्या थिएटरांमध्यें नाटकांत नाचत होतें. स्टेजवर प्रेम करून करून, रक्त ओकेपर्यंत प्रेमाचीं स्तुतिस्तोत्रं गाणं हा माझा मुख्य धंदा ! या नाटकी प्रेमाचा मला अगदीं वीटवीट येऊन गेला आहे, गणपतराव ! मी खरीखुरी आहें कोण हें इथं कुणालाहि ठाऊक नाहीं. आज फक्त आपणाला मीं हें सांगितलं. आपण जसे सोंग घेऊन वाड्यांत घुसलां, तशी मीहि सोंग घेऊनच वाड्यांत घुसलें आहें !"

गणपतरावांनीं विचारलें "तुह्माला सोंग घेऊन वाड्यांत शिरायचें काय कारण बुवा ?"

"तो माझ्या अदृष्टाचा दोष, गणपतराव ! दुसरं काय सांगूं ? तो एक मोठा लांबलचक इतिहास आहे. संधि सांपडली, तर फिरून कधीं तरी तो सर्व वृत्तांत मी आपणाला सांगेन. पण अदृष्टाचा 'दोष' असं तरी मीं कां ह्मणावं ? माझ्या अदृष्टाचा गुण, असंच मी ह्मणतें. गणपतराव, आपल्यासारखे पुण्यवान् त्यागी लोक या पापी पृथ्वीवरहि आहेत, हें इथं आल्यावांचून मला कधीं तरी कळून आलं असतं का ?"

गणपतराव कांहींच बोलले नाहींत. खालीं मान घालून ते आपल्याच विचारांत गढून गेले होते.

चंपा पुढें बोलूं लागली "मी आतां कांहीं फार दिवस इथं रहात नाहीं; परंतु जे कांहीं थोडे दिवस इथं मी आहें तितक्यांत, आपणावर जर मला कांहीं उपकार करतां आले तर मी करीन, अन् जगांत धन्य होईन. मी आतां जातें गणपतराव ! आपणाला मी नमस्कार करतें."

गणपतरावांच्या हृदयावर, चंपेच्या भाषणाचा अतिशय परिणाम झाला असावा, असें दिसलें. ते कृतज्ञतेच्या दृष्टीनें तिच्याकडे पाहूं लागले.

क्षणभरानें ते ह्मणाले "जरा थांबा–बसा. वहिनींसाहेबांसंबंधानें तुह्माला कांहीं विचारावें, असें माझ्या मनांत आहे."

चंपा पुनः आपल्या खुर्चीवर बसली.

गणपतरावांनीं विचारलें "वहिनीसाहेबांच्या हातीं मीं दिलेलें पत्र तुह्माला कसें मिळालें ?"

आपल्या हातीं पत्र कसें लागलें, तें चंपेनें गणपतरावांनां संक्षेपतः सांगितलें.

गणपतराव क्षणभर स्तब्ध बसले. नंतर ते ह्मणाले "वहिनीसाहेब मध्यंतरीं दोनतीन वेळ शुद्धीवर आल्या होत्या, असें तुह्मी मघाशीं ह्मणालांत–त्या वेळीं तुह्मी त्यांच्याजवळ होतां का ?"

"हो–होतें."

"शुद्धीवर आल्यावर वहिनीसाहेब कांहीं कुणाशीं बोलल्या का ?"

"नाहीं–विशेष–असं कांहीं त्या बोलल्या नाहींत."

कांहीं विचारूं न विचारूं, अशा स्थितींत गणपतराव कांहीं वेळ गप्प राहिले. नंतर त्यांनीं खिन्न स्वरानें विचारलें "माझ्यावर त्या खूब रागावल्या आहेत, किंवा माझ्यासंबंधानें त्यांनां अतोनात तिट्कारा आला आहे, असें कांहीं चिन्ह तुह्माला दिसून आलें का, चंपाताई ? त्यांच्या भाषणावरून–वर्तनावरून—?"

चंपा गंभीरतेनें ह्मणाली "गणपतराव, त्यासंबंधानं प्रश्न करणं अगदीं व्यर्थ आहे. शुद्धीवर आल्यावर, पत्रासंबंधानं नुसती चौकशी दिखील त्यांनीं कधीं चुकून केली नाहीं."

गणपतरावांनीं एक मोठा उसासा सोडून जमिनीकडे दृष्टि लावली. त्यांच्या मनांत प्रचंड खळबळ उडाली होती.

चंपा बोलूं लागली "गणपतराव, झाल्या गेल्या गोष्टींचा नुसता एकसारखा विचार करून करून तरी काय लाभ होणार आहे ? आपण वहिनीसाहेबांनां शेवटीं घोर अनर्थापासून, घोर कलंकापासून वांचविलं, त्यासंबंधानं त्यांनां आपल्याबद्दल अतिशय कृतज्ञता

वाटणार, हें उघड आहे. देवाच्या दयेनं अन् त्यांच्या आग्यानं, वहिनीसाहेब या भयंकर दुखण्यांतून वांचल्या तर त्यासारखा दुसरा आनंद नाहीं. गणपतराव, पुढं आपला काय विचार आहे ? ”

गणपतराव खिन्न स्वरानें ह्मणाले “ दुसरा कसला विचार ? इथून मी निघून जाणार, हें उघड आहे. वहिनीसाहेबांच्या प्राणांला कांहीं धक्का नाहीं, असें मला कळून येतांच, त्या क्षणींच, मी आपलें हें काळें तोंड घेऊन इथून चालता होईन. ”

“ कुठं जायचा विचार आहे आपला ?”

“ त्यासंबंधानें मीं अजून कांहींच ठरविलें नाहीं. जिकडे वाट फुटेल तिकडे मी जाईन. दाही दिशा मला आतां मोकळ्याच आहेत ! ”

चंपा क्षणभर थांबली. नंतर ती ह्मणाली “ गणपतराव, माझी एक विनंति आपण मान्य कराल ? ”

“ बोला—”

“ जायच्या पूर्वी एकवार आपण मला जरूरजरूर भेटा. मुळींदिखील अनमान करूं नका—”

“ कां बरें ? ”

“ तसंच कांहीं कारण आहे. ”

“ काय आहे कारण ? ”

चंपा गंभीर स्वरानें ह्मणाली “ तें मी आपणाला आतां सांगत नाहीं. त्या वेळीं सांगेन. तूर्त आपणाला इतकं मात्र मी सांगून ठेवतें, कीं, माझी भेट घेतल्याचांचून जर आपण इथून निघून जाल, तर आपणाला नकळत, आपण एका माणसाचा सर्वनाश केल्याचं पातक मात्र आपणाला लागेल!”

“ कोण माणूस ?”

“ तें मी आपणाला सांगत नाहीं. पण तें माणूस अगदीं निर्दोष, अगदीं निष्पाप असं आहे, अन् त्याचा आपण सत्यानाश मात्र करणार आहां ! गणपतराव, आपणाला वहिनीसाहेबांचीच शपथ आहे–पहा, माझी भेट घेतल्यावांचून आपण इथून जाणार नाहीं, असं आपण मला वचन द्या.”

गणपतराव क्षणभर विचार करून ह्मणाले “यामध्यें काय गूढ रहस्य आहे, हें माझ्या तर कांहींच लक्ष्यांत येत नाहीं. ठीक आहे, तुमचा इतका आग्रहच आहे, तेव्हां तुमची भेट घेतल्याशिवाय मी इथून जाणार नाहीं, झालें आतां ?”

“ झालं–माझ्या मनाचं आतां पूर्ण समाधान झालं. आणखी कांहीं विचारायचं आहे ?”

“ कांहीं नाहीं.”

चंपा उठली व ह्मणाली “बरं तर, येतें मी आतां. आपणाला मी नमस्कार करतें.”

गणपतरावहि उठून उभे राहिले. चंपेच्या मागोमाग दरवाज्यापर्यंत जाऊन ते ह्मणाले “ चंपाताई, माझें एक काम कराल ?”

“ जरूर करीन–काय तें ?”

“ तुह्मी आंत गेल्यावर वहिनीसाहेबांची तब्बेत कशी काय आहे, तें मला दाजीबाबरोबर सांगून पाठवाल ?”

“ पाठवीन–जरूर पाठवीन.” असें ह्मणून चंपा तेथून हळूहळू निघून गेली.

सुमारें दहा मिनिटांनीं दाजीबा तेथें आला.

गणपतरावांनीं त्याला विचारलें “ काय रे ? कशी काय आहे तब्बेत ?”

“ दोन वाजतां वहिनीसाहेब जाग्या झाल्या होत्या. कांहीं थोडेंसें बोलल्या देखील—”

“ कांहीं खाल्लें का ? ”

“ हो–थोडेंसें दूध प्याल्या. ”

“ आतां काय करताहेत ? ”

“ पुनः झोंप लागली आहे त्यांनां. ”

“ ठीक आहे–जा तूं आतां. ”

वहिनीसाहेबांच्या तब्बेतीची ही बातमी ऐकून गणपतरावांच्या मनाला किंचित् शांति वाटूं लागली. ते जाऊन पलंगावर पडले.

चंपेशीं झालेलें संभाषण, तिनें ध्वनित केलेलें गूढ रहस्याचें इंगित वगैरे गोष्टींविषयीं विचार करतां करतां शेवटीं पहांटेच्या सुमाराला गणपतरावांचा डोळा लागला.

प्रकरण आठवें.

दोन नबाबजादे!

पहांटे गणपतरावांचा डोळा लागला खरा; परंतु त्यांनां फार वेळ झोंप मिळाली नाहीं. उजाडतां उजाडतांच ते एका स्वप्नामुळें दचकून जागे झाले.

तसेच ते पलंगावरून उठले, आणि बाहेर येऊन गच्चीवर इकडूनतिकडे येरझारा घालूं लागले. कांहीं वेळानें त्यांनीं शौचमुखमार्जनादि आपलीं प्रातःकृत्यें आटोपलीं व ते पुनः आपल्या खोलींत येऊन बसले.

थोड्या वेळापूर्वींच गणपतरावांनां कळलें, कीं, वहिनीसाहेब कांहीं वेळापूर्वीं जाग्या झाल्या असून त्यांनीं दोन वेळ औषधहि घेतलें. वैद्यराज त्यांच्याजवळ बसूनच होते. आतां वहिनीसाहेबांनां कांहीं धास्ती नाहीं, असें सांगून ते घरीं निघून गेले होते.

ही बातमी ऐकून आपल्या छातीवरचा सात मण वजनाचा धोंडा खालीं पडला, असें गणपतरावांनां वाटलें. त्यांनीं कृतज्ञतेनें परमेश्वराला शतशः धन्यवाद दिले.

यानंतर थोड्याच वेळानें आंतून एक नोकर येऊन ह्मणाला "आईसाहेबांनीं हुजुरांनां एकवार भेटून जायला सांगितलें आहे."

गणपतरावांनीं विचारलें "अरे, वहिनीसाहेब काय करताहेत रे?"

"कांहीं नाहीं—नुसत्या पडल्या आहेत."

"कोण आहे त्यांच्याजवळ?"

"फक्त यमुताईच आहेत. त्यांच्याशीं गोष्टी बोलत पडल्या आहेत वहिनीसाहेब."

"ठीक आहे जा—येतों ह्मणून सांग."

यमुना नांवाची एक निराश्रित, अनाथ, तरुण ब्राह्मणकन्या वहिनीसाहेबांच्या आश्रयाला राहिली आहे, ही गोष्ट गणपतरावांनां ठाऊक होती; परंतु यमुना आजवर त्यांच्या कधींच दृष्टीला पडली नव्हती. ती आपण होऊनच गणपतरावांच्या दृष्टीच्या कक्षेंतून नेहमीं दूर दूर रहात असे, आणि गणपतरावांनींहि तिचीच काय, परंतु घरांतल्या कोणत्याच बायकोची कधीं नुसती चौकशीहि केली नाहीं. यमुनेवर वहिनीसाहेबांचें अत्यंत प्रेम असून, ती त्यांच्या विश्वासाची मैत्रीण आहे, हेंहि गणपतरावांनां ठाऊक होतें.

कांहीं वेळानें गणपतराव आंत गेले, व आईसाहेबांच्या खोलींत त्यांनां भेटले.

त्यांच्याकडे पहातांच आईसाहेब आश्चर्यानें उद्गारल्या "अग बाई! हें काय रे?"

गणपतरावांनीं नुसतें त्यांच्याकडे खिन्न दृष्टीनें पाहिलें.

"नाना, तुझा चेहरा न् डोळे हे असे काय अगदीं कोमेजल्यासारखे झाले आहेत बाळा? रात्रीं तुला झोंप नाहीं वाटतं लागली चांगली?"

गणपतरावांनीं कांहींच उत्तर दिलें नाहीं. खालीं नजर लावून ते स्तब्धपणें उभे होते. त्यांच्या डोळ्यांतून आसवांचे थेंब टपाटप खालीं पडूं लागले.

अत्यंत स्नेहार्द्र, सहानुभूतीच्या स्वरानें आईसाहेब ह्मणाल्या "नाना, बाळा, असं नको रे डोळ्यांतून अभद्र पाणी काढूं! तुझ्या डोळ्यांत पाणी पाहिलं, कीं, माझी छाती अगदीं फाटून जाते."

गणपतरावांनीं खिशांतून रुमाल काढून डोळे पुसले.

आईसाहेब बोलूं लागल्या "नाना, देवाच्या दयेनें काळजी करण्यासारखं आतां फारसं कारण नाहीं, असं वाटतं. रात्रीं दोनप्रहरांपासून पुनः कांहीं मुलीला फिट आली नाहीं. तेव्हांपासून आतांपर्यंत सुनबाईची तब्बेत चांगली आहे. कांहीं घाबरूं नकोस, नाना! वैद्यबुवा रात्रभर मुलीच्या जवळच बसून होते. ते सकाळीं गेले. आतां कांहीं भय नाहीं, असं त्यांनीं सकाळीं सांगितलं बरं! नाना, या गडबडींत काल रात्रीं तूं काय खाल्लंस न खाल्लंस तें मला बघायलाहि नाहीं सांपडलं बाबा! जा, आंघोळ करून ये झट्कन्, तोंवर तुझ्या जपाची मी सारी तजवीज करून ठेवतें. जप आटोपतांच फराळ कर थोडा. मी स्वतः वाढतें तुला. जा, मुलीकडे जाऊन येणार आहेस का आतां?"

गणपतरावांनीं मुकाट्यानें मान हलवून 'नाहीं' ह्मणून सांगितलें. तें पाहून आईसाहेबांनांहि थोडें आश्चर्य वाटल्यावांचून राहिलें नाहीं.

स्नान करून, शिवगायत्रीचा जप झटझट आटोपून, आईनें आग्रहानें वाढलेल्या फराळापैकीं चारपांच घांस पाण्याच्या घोंटांबरोबर कसे तरी गिळंकृत करून,

गणपतराव बाहेर आले. त्या वेळीं नऊ वाजले होते. बैठकखान्याच्या जवळून जात असतां, व्हरांड्यांतील एका बांकावर वसंतरावजींची स्वारी बसली आहे, असें त्यांनां आढळून आलें. त्यांच्या अंगांत या वेळीं इंग्रजी सायक्लिंग ड्रेस असून, मस्तकावर 'सोला हॅट' होती. त्यांनीं आपली बायसिकल व्हरांड्याच्या खालीं भिंतीला उभी करून ठेविली होती.

गणपतरावांनां पहातांच वसंतराव उठून उभे राहिले व डोक्यावरील टोपी काढून ह्मणाले "गुड् मॉर्निंग !"

गणपतराव हिंदुपद्धतीचा नमस्कार करून ह्मणाले "नमस्कार. मध्येंच, या भलत्याच वेळीं कुठून आलांत आपण ? आपण या वेळीं बाणथडीला येणार आहां, अशी आह्माला कांहीं बातमी नव्हती."

वसंतराव हंसून ह्मणाले "मी आलों थेट मुंबईहून—"

"बहिणीला भेटायला ?"

"नाहीं. आपल्याकडेच माझें विशेष जरूरीचें काम आहे एक."

"माझ्याकडे ?"

"हो, आपणाकडेच."

"ठीक आहे. स्नानवीन आटोपून जरा फराळ करा. मग कामासंबंधानें काय तें बोलूं आपण."

वसंतराव जरा अधिकाराच्या स्वरानें ह्मणाले "नाहीं हुजूर, काम भारीच महत्त्वाचें न् जरूरीचें आहे. तें झट्पट आटोपून दुपारीं तिहींच्या गाडीनें मला मुंबईला गेलेंच पाहिजे. ह्मणून ह्मणतों—आतांच्या आतां जर काम आटोपलें तर बरें होईल ! फार नाहीं वेळ लागायचा—पंधरा वीस मिनिटें फार तर—"

वसंतरावांचा त्या वेळचा एकंदर उद्दाम आविर्भाव पाहून आणि हें अधिकाराच्या वाणीनें केलेलें भाषण ऐकून गणपतरावांनां त्यांचा मनांतून भारी राग आला. ते मनांतल्या मनांत ह्मणाले "वहीण तर आहे नाटकांत नाचणारी एक नायकीण—पण हे बंधुराज बनून आले आहेत जणूं नबाबजादे !" नंतर वसंतरावांनां उद्देशून ते ह्मणाले "ठीक आहे. आतांच टाकूं काम उरकून. मला फुरसत झाली ह्मणजे आपणाला बोलावणें पाठवितों." असें ह्मणून गणपतराव जिना चढून तडक वर गेले.

गणपतरावांचें हें वर्तन वसंतरावांनां भारी उद्दामपणाचें आणि बेपरवाईचें वाटलें. ते मनांतल्या मनांत ह्मणाले "होतास तर रेल्वेचा एक कारकून ! साऱ्या पंचवीस रुपड्यांवर तर महिनाभर हमाली करीत होतास ! अन् इथें येऊन झाला आहेस मोठा नवाबजादा ! दम धर, तुझी नबाबी सारी झाडून टाकतों एका क्षणांत !"

परंतु त्या नबाबजाद्यांपेक्षां या नबाबजाद्यांची स्थिति निराळी होती. ते केव्हांच वर आपल्या शयनगृहाकडे निघूनहि गेले, आणि हे हात चोळीत स्वस्थ तेथें बांकावर बसून राहिले !

वसंतराव व्हरांड्यांत बांकावर बसूनबसून कंटाळले. दहा—दहा पंधरापंधरा सेकंदांनीं ते मनगटावरील आपल्या सोन्याच्या घड्याळाकडे पहात होते. पंधरा मिनिटें झालीं; वीस झालीं—अर्धा तास झाला; तरी 'हुजुरां'कडून कांहीं बोलावणें ह्मणून येईना !

वसंतराव मनांतल्या मनांत संतापून ह्मणाले "डॅम् हिज फेस ! मी काय ह्मणून इथें बसून त्याची उमेदवारी करूं ? मी याची खुशामत करायची का यानें माझी ? रास्कल कुठला ! हा मी निघालों—या चोराची मी थोडीच केअर करायला बसलों आहें !"

असें ह्मणून खाडखाड बुटांचा आवाज करीत वसंतराव जिना चढून वर गेले.

या वेळीं गणपतराव आपल्या शयनगृहांत उघड्या खिडकीजवळ एका आराम—खुर्चीवर सिगारेट ओढीत स्वस्थपणें पडले होते. त्यांच्या मस्तकांत या वेळीं विचारांचें काहूर माजून राहिलें होतें. इतक्यांत बुटांचा शब्द ऐकून ते चमकले, आणि दरवाज्याकडे पाहूं लागले.

आंत येतांच वसंतराव हेटाळणीच्या स्वरानें ह्मणाले "काय महाराज ? आपण भारी गडबडींत आहां, नव्हे ?" असें ह्मणून जवळची एक खुर्ची फरफर ओढून ते तिच्यावर बसले.

रागानें भृकुटि वक्र करून गणपतराव ह्मणाले "काय काम आहे आपलें माझ्याकडे ?"

खिशांतून सुवासित रेशमी रुमाल काढून तो लीलेनें फिरवित फिरवित वसंतराव ह्मणाले "तसें कांहीं मोठेंसें काम नाहीं. मला थोड्या पैशांची जरूर आहे."

गणपतराव तीव्र स्वरानें ह्मणाले "मग माझ्याकडे कशाला आलांत ? आपल्या बहिणीच्या पगाराच्या बाकीबिकीची कांहीं भानगड असेल, तर तिची गांठ घेऊन तुह्मी तिला सांगा काय तें. दिवाणजी तर नाहींतच, गोविंदराव आहेत, ते हिशेब करून देतील सारी बाकी !

वसंतराव मनांतल्यामनांत ह्मणाले " काय सांगतो आहे लेकाचा मोठमोठ्या दिवाणांच्या न् याच्या त्याच्या गोष्टी ! जणूं काय नबाबजादाच !" नंतर ते गणपतरावांनां ह्मणाले " नाहीं–माझ्या वहिणीच्या पगाराचा हिशेब नाहीं आहे हो—"

" तर मग ? "

" हुजूरांकडूनच मला कांहीं मिळावें, अशी आशा धरून मी मुद्दाम मुंबईहून आलों आहें—कांहीं फार नको आहे मला—"

गणपतरावांनीं वसंतरावांकडे नुसतें पाहिलें.

" कांहीं फार नको. " वसंतराव व्यंगोक्तीनें ह्मणाले. " तूर्तातूर्त एक लाख रुपये रोख अन् यापुढें जन्मभर महिन्यामहिन्याला बाँबे बँकवर दोन हजारांचा एक एक चेक ! बस्स–इतकी माझी तरतूद हुजुरांकडून झाली, ह्मणजे माझें कांहीं अधिक मागणेंच नाहीं ! "

वसंतरावांच्या तोंडचें हें भाषण ऐकून गणपतराव तर आश्चर्यानें थक्कच होऊन गेले. विस्मयाकुल दृष्टीनें ते वसंतरावांच्या चेहऱ्याकडे एकसारखे पहात राहिले. नंतर ते ह्मणाले " आपण नशाबिशा कांहीं करतां काय ? "

" करीत होतों. " वसंतराव ह्मणाले. " पण आतां माझा खिसा रिकामा झाला असल्यामुळें फारसा नशा करायला मिळतच नाहीं मुळीं ! दारू पिऊन अगर गांजा ओढून कांहीं मी आपणासमोर आलों नाहीं—माझे हे डोळे पहा–कसे साफ चांगले, अगदीं आपल्याप्रमाणेंच आहेत. हं, मला नाहीं वेळ ! काढा पाहूं पैसे झट्पट ! रोख पैसे नसले, तर एक लाख रुपयांचे सरकारी रोखे एन्डॉर्स करून दिलेत, तरी ते घ्यायला माझी तयारी आहे. तसेंहि करायची हुजुरांची इच्छा नसली, तर बाँबे बँकवर, नॅशनल बँकवर अगर दुसऱ्या कुठल्याहि चांगल्या बँकवर एक लाखाचा चेक दिलात, तरी मला चालेल. मुंबईला गेल्यानंतर चेक वटावून मी त्याची रोकड रकम करून घेईन. यांपैकीं हुजुरांच्या मर्जीला लागेल तें मला द्या–पण झटपट द्या ! "

गणपतराव गंभीरतेनें ह्मणाले "काय ह्मणून तुह्माला पैसे द्यायचे ? तुह्मी माझे कुणी आहां कीं काय ?"

वसंतराव 'हो हो' करून किती वेळ एकसारखे हंसतच सुटले. नंतर ते ह्मणाले " अहो हुजूर, मी आपला भाऊ होतों ना ? "

" काय ? "

स्वर खालवून वसंतराव ह्मणाले " सख्खा भाऊ नाहीं. व्यवसायबंधु !"

" ह्मणजे काय ? "

" आपला माझा व्यवसाय एक ! चोरीचा–ठकबाजीचा ! इतकी प्रचंड संपत्ति आपण एकट्याएकट्यानेंच का खाणार, रावसाहेब ? आपणाला ती पचेल कशी बरें ? माझ्यासारख्या आपल्या बंधूलाहि तिच्यांतला कांहीं हिस्सा द्या. आपण साऱ्या संपत्तीवर खुशाल लाट मारा–माझें कांहींच ह्मणणें नाहीं त्याबद्दल. मला आतां नगद रुपये एक लाख अन् दर महिन्याला दोन हजार रुपये पेन्शन् मिळालें, कीं, माझा त्यांत अगदीं संतोष आहे. समजलें, का—यावर मराठींत कांहीं टीका आवश्यक आहे ? "

" मराठी टीका ती काय ?"

" टीका ह्मणजे स्वच्छ स्पष्टीकरण. आपणाला एकंदरींत इतकें मला स्वच्छ समजावून द्यायचें आहे, कीं, आपण बाणथडीचे इनामदार धुंडिराज ऊर्फ नानासाहेब पटवर्धन मुळींच नाहीं ! आपलें नांव गणेश सदाशिव देशपांडे. आपण जी. आय्. पी. रेल्वेच्या दुधई नांवाच्या स्टेशनवर टकटक टेलिग्राफ करीत होतां–घटघट उतारूंनां तिकिटें विकीत होतां. गाडी आली ह्मणजे चटचट फाटका जोडा वाजवीत, तिला 'पास' करायला प्लॅटफॉर्मकडे धांवत होतां. काय ? पडला का कांहीं समज ? का आणखी टीकेची जरूरी आहे ? "

गणपतराव शांतपणें ह्मणाले " या साऱ्या गोष्टी तुह्माला कळल्या तरी कशा ? "

वसंतराव मिशांनां पीळ भरीत ह्मणाले " अतिशय श्रम करून अन् पाण्यासारखा पैसा खर्च करून ! "

गणपतराव पूर्ववत् ह्मणाले "तर मग आपले इतके श्रम अन् पैशांचा खर्च अगदींच फुकट गेला ह्मणायचा !"

" ह्मणजे ?"

" म्हणजे काय ? आपणाला एक पैसादेखील मिळायचा नाहीं !"

मुळींसुद्धां न डगमगतां वसंतराव ह्मणाले " काय ? पैसे नाहीं मिळायचे ?"

" नाहीं. "

वसंतराव कांहीं क्षण कसला तरी विचार करीत होते. शेवटीं ते ह्मणाले " गणपतराव, तुह्माला वाटलें असेल, कीं, माझे हे सारे बायबार आहेत ह्मणून ! परंतु आपला हा मोठा भ्रम आहे, समजलांत ? मला वाटतें, आपली कल्पना असेल–मी इतक्या प्रचंड संपत्तीचा मालक, हा कुठला कोण कुणाला ठाऊक ! माझें हा काय करूं शकणार आहे, किंवा याला साक्षीपुरावा तरी काय सांपडणार आहे ? पण रावसाहेब, आम्ही बोलूनचालून मुंबईचे लोक–आह्मी कच्चें काम कोणतेंच कधीं करीत नाहीं. साक्षी, पुरावा, प्रमाणें सर्व कांहीं मजपाशीं अगदीं जय्यत तयार आहेत. मी आपल्या बिंबवलीला गेलों होतों, चांदगांवला गेलों होतों, दुधईला गेलों होतों,–अन् आपण जिथें साऱ्या जन्मांत कधीं गेलां नव्हतां, त्या ' तीन तारा ' मठापर्यंत देखील मी गेलों होतों ! दुधईचा आपला सिग्नलमन् हनुमानसिंग, पाण्याचा ब्राह्मण जलधर महाराज अन् दोन पोर्टर इतकी मंडळी सुटी घेऊन आली असून मुंबईला माझ्या घरांत बसून डाळरोटीचें रात्रंदिवस श्राद्ध करीत आहेत ! त्यांच्या साक्षीवरून, आपण दुधईचे माजी छोटे स्टेशनमास्तर गणपतराव देशपांडे, हें अगदींच सहज रीतीनें सिद्ध होईल. ' तीन–तारा ' मठांतील चार बैरागीहि मी घेऊन आलों आहें–गोंसावी लछमनगीर, भैरवगीर, वासुदेवगीर अन् दामोदरगीर ! त्यांच्या गांजाच्या घाणीनें मला घरांत एक मिनिटभर रहाणेंहि अगदीं अशक्य होऊन गेलें आहे. त्यांनीं आपणाला पाहिलें, ह्मणजे ते शपथेवर सांगतील, कीं, आपण कांहीं त्यांचे माजी महन्त भजनानन्दगीर नाहीं ! माझ्या या साक्षीदारांनां पैसाअडका चारून आपण फोडूं शकाल ही कल्पनाहि आपण मनांत नका आणूं ! तो रस्ताच मीं आपणाला मोकळा ठेवलेला नाहीं. माझ्या घराच्या दरवाजांवर चार लठ्ठ भय्ये अष्टौप्रहर पहारा करीत आहेत ! महाराज, माझी सारी योजना कशी कडेकोट आहे, तें आतां आलें ना आपल्या ध्यानांत ? तर मग झटपट मी मागतों ते पैसे काढा पाहूं बाहेर ! नाहीं तर तसें सांगा–उद्यां सदर ठाण्यावर जाऊन पोलीस साहेबांजवळ सर्व हकीगत सांगतों. इथें पिनलकोड आहे का ? नसलें तर दिवाणजींच्या कचेरींतून तें आणवून, त्यांतलें ४१९ वें कलम वाचून पहा!"

गणपतराव बेफिकीरपणानें ह्मणाले " पाहिलें."

" पाहिलेंत ना ? किती शिक्षा सांगितली आहे ? तीन वर्षें चामडीं कुटायला जावें लागेल, इतकेंच ! फार नाहीं–सारीं तीन वर्षें सक्तमजुरी ! कां ? आपलें मत बदललें का कांहीं आतां ?"

जांभई देऊन गणपतराव ह्मणाले " नाहीं."

"अजून नाहीं ? पुराच इंगा फिरला पाहिजे वाटतें?"

" आपणाला एक कपर्दिकाहि मिळायची नाहीं !"

" गणपतराव, लक्ष्यांत घ्या–तीन वर्षें चामडीं कुटायला जावें लागेल लौकरच !"

गणपतराव तुच्छतेच्या स्वरानें ह्मणाले " मला आपण हें भय उगीच दाखवतां आहां ! मीं वहिनीसाहेबांपाशीं कालच माझे सारे अपराध मोकळ्या मनानें कबूल केले आहेत !"

हें ऐकतांच वसंतराव जणूं आकाशांतून एकदम खालीं पडले. कमालीच्या आश्चर्यानें ते ह्मणाले "काय ? सारें कबूल केलेंत ?"

"होय. आपल्या ती–बहीण असो अगर कुणीहि असो–चंपेला आपण विचारा, ह्मणजे सर्व कांहीं आपणाला कळून येईल." असें ह्मणून त्यांनीं नोकराला हांक मारली.

नोकर येतांच गणपतराव त्याला ह्मणाले " अरे, या पाहुण्यांनां घेऊन जा न् यांच्या स्नानादिकांची व्यवस्था कर अन् आपल्या बहिणीला भेटायची जर यांची इच्छा असेल, तर आंत आईसाहेबांकडे तसा निरोप पाठीव, अन् त्यांची परवानगी आल्यावर यांनां आंत घेऊन जा न् चंपाताईंनां भेटीव ?"

प्रकरण नववें.

वसन्तरावांचा सूड !

व्हरांड्यांत येऊन वसंतराव धाड्कन् बांकावर बसले. त्यांचा सारा आंवाकाच एकदम नाहींसा झाला–कमर अगदीं खचून गेली !

हातांत एक टुवाल व साबणाची वडी घेऊन तो नोकर त्यांच्याजवळ येऊन ह्मणाला "रावसाहेब, धोतर असेल तर द्या–त्याच्या चुन्या करून ठेवतों."

वसंतराव ह्मणाले "धोतर नाहीं."
"मग सरकारी धोतर मागून आणतों एक."
"मला धोतरच मुळीं नको."
"मग नेसणार काय?"
"कांहीं नाहीं—"
"मग आंघोळीला चला—"
"नाहीं–मला आंघोळच करायची नाहीं."

वसंतरावांच्या चेहऱ्यावरील विकार पाहून आणि त्यांचीं हीं 'भाषणें' ऐकून त्या नोकराला अतिशय आश्चर्य तर वाटलेंच; परंतु तो बराच भ्यालाहि. कांहीं वेळ गप्प राहून त्यानें विचारलें "तर मग फराळाचें इथेंच आणायला सांगूं?"

वसंतराव मस्तक मागें हेलावून ह्मणाले "नको !"

वसंतरावांच्या या वर्तनावरून नोकरानें असा तर्क केला, कीं, 'हुजुरांनीं या गृहस्थाला खूब झाडून टाकलें असावें, किंवा याचा बराच अपमान केला असावा, ह्मणून याला अतिशय वाईट वाटलें असावें, आणि त्या खेदाच्या भरांत हा असा मनाचा त्रागा करीत असावा! नाहीं तर, स्नान करावयाचें नाहीं किंवा फराळहि करावयाचा नाहीं, असें जो हा ह्मणतो, त्याचा अर्थ तरी काय ?'

असा विचार करून तो जाऊं लागला; परंतु कांहीं विचार मनांत येऊन तो परत फिरला, व त्यानें विचारलें "आपल्या बहिणीला आपणाला भेटायचें आहे का? आंत जाऊन आईसाहेबांची परवानगी घेऊन येऊं?"

"ये." वसंतराव खिन्नतेनें विचार करीत दुसरीकडे पाहूं लागले. नोकर निघून गेला.

तो गेल्यावर वसंतरावांनीं आपल्या कोटाचीं मधलीं एकदोन बटणें खुलीं केलीं, आणि आंतल्या खिशांतून एक रुप्याचें बरेंच मोठें 'फ्लास्क' बाहेर काढलें. या फ्लास्कमध्यें तोंडोतोंड ब्रँडी भरली होती. वसंतरावांनीं भरभर वरचा स्क्रू फिरवून फ्लास्कचें झांकण खुलें केलें, आणि फ्लास्कच्या फ्लास्क तोंडाला लावून, त्यांतील ब्रँडीचे दोन चार घोट पाण्यावांचूनच घटाघटा ते प्याले. नंतर फ्लास्क बंद करून, तें आंतल्या खिशांत ठेवून, वसंतराव पुनः विचारांत मग्न झाले.

आशेच्या मोठमोठ्या इमारती रचून वसंतराव आज बाणयडीला आले होते; परंतु क्षणार्धांत त्यांच्या त्या इमारती पार जमीनदोस्त झाल्या! तोतया नानासाक्षीपुराव्यानिशीं 'तूं अमूक अमूक आहेस, बोल, मी सांगतों ती रकम देतोस, का कळवूं पोलिसांत ?' असें सांगतांच, तो आपल्या ह्मणण्याला आपोआप कबूल होईल, आणि आपल्या अगदीं गळ्याशीं आलेली रकम एका क्षणांत आपल्या हातीं खेळूं लागेल, अशी वसंतरावांची अगदीं ठामठाम कल्पना होती! परंतु दैवानें सारें कांहीं एकदम तिरपागडें करून टाकलें! आतां सावकारांनां रकमा द्यावयाच्या कोठून, घराची अपमानास्पद लिलांवांतून सुटका कशी करावयाची, पुढें तरी पैशावांचून या महागऱ्या जगांत आजपर्यंत राहिलों तसें राजवैभवानें रहावयाचें कसें, खावयाचें काय, ल्यावयाचें काय, सर्वांचीं तुंबलेलीं बिलें द्यावयाचीं कशीं, वारांगनांनां दिलेलीं वचनें पार कशीं पाडावयाचीं, गुत्तेवाल्यांनां मोकळ्या खिशानें तोंड तरी कसें दाखवावयाचें, इत्यादि इत्यादि शेंकडों प्रश्न वसंतरावांसमोर उभे राहिले आणि त्याचें मस्तक अगदीं फिरून गेलें.

अगोदरच तीव्र निराशेच्या भयंकर यातना आणि अनशा पोटीं निर्जल ब्रँडीचे घोंटावर घोंट–यामुळें वसंतराव अगदीं क्षुब्ध होऊन गेले. त्यांनां जवळजवळ वेड लागण्याची पाळी आली! गणपतरावांच्या वर्तनांतलें गूढ रहस्य त्यांनां कांहीं कळेना! कसला संशय नसतां, कांहीं कारण नसतां, गणपतरावांनीं वहिनीसाहेबांजवळ आपले सारे अपराध कां कबूल केले, त्यांत त्यांचा गूढ हेतु तरी काय होता, हें कांहीं केल्या वसंतरावांच्या लक्ष्यांत येईना! तर्कवितर्क लढवून निरनिराळीं अनुमानें काढून झाल्या गोष्टींच्या कारणांची उपपत्ति लावण्याची शक्ति त्यांच्या मस्तकाला या वेळीं मुळींच नव्हती. वसंतरावांच्या नाकांतून आणि कानांतून आगीच्या ज्वाळा निघूं लागल्या; परंतु छातीच्या आंत, बर्फापेक्षांहि थंड अशा कांहीं तरी अज्ञात पदार्थामुळें सर्व रक्त गोठून घट्ट बनूं लागलें!

थंडीवर ब्रँडीसारखें मुळीं औषधच नाहीं, असा विचार करून वसंतरावांनीं आपल्या बुक-पॅकेटमधून पुनः तें फ्लास्क बाहेर काढलें, आणि त्यांतील जहाल पेयाचे पुनः चार पांच घोंट घेतले.

थोड्याच वेळांत, वसंतरावांच्या मस्तकाची अगदींच अनुकंपनीय स्थिति झाली. कचेरीच्या समोरच्या [illegible]ांत इकडूनतिकडे शतपावली करीत सुटावें, अशी या वेळीं त्यांनां प्रबळ इच्छा होऊं लागली; परंतु तितक्यांतल्या तितक्यांत त्यांच्या मस्तकांतील एका कोंपऱ्यांत अशी कल्पना आली, कीं, आपल्या चालण्या-

वगैरे लोक अशी कल्पना करतील, कीं, हा गृहस्थ छाकटा होऊन आला आहे ! आणि असें झालें ह्मणजे आपला वाड्यांत प्रवेश होऊं शकणार नाहीं आणि चंपाताईशीं भेट होणेंहि मग अशक्य होऊन, आपणाला खरीखुरी माहिती कांहींच कळणार नाहीं !

अशा स्थितींत जवळजवळ पंधरावीस मिनिटें गेलीं. प्रतिक्षणीं वसंतरावांची अवस्था अधिकाधिक खराब होत चालली होती. इतक्यांत आंत गेलेला तो नोकर त्यांच्यासमोर येऊन उभा राहिला.

" क्यौं भाई ?"

" चला, या रावसाहेब."

नोकर पुढें निघाला. 'रावसाहेब' उठून हलतडुलत ल्हानसहान झुकांड्या खात, त्याच्या मागोमाग जाऊं लागले.

पूर्वी ज्या आंतल्या खोलींत एक दोन वेळ चंपेची आणि त्यांची भेट झाली होती, त्याच खोलींत त्या नोकरानें त्यांना नेलें. तेथें, चंपा आपली वाट पहात उभी आहे, असें वसंतरावांना आढळून आलें.

जातांच खुर्चीवर धाड्कन् अंग टाकून जड स्वरानें वसंतरावांनीं विचारलें " का चंपाताई–काय खबर ?"

आपले बंधुराज कोणते प्रताप गाजवून आले असावे, याची चंपेला, त्यांच्या ध्यानाकडे पहातांच क्षणार्धांत कल्पना आली. तिनें मृदु स्वरांत विचारलें " वसंतराव, हें काय हें?"

हलतडुलत वसंतराव ह्मणाले " काय झालें ?"

" आपण हे असे काय चमत्कारिक दिसतां ? आपणाला झालं आहे तरी काय ?"

" मोठा चमत्कार–झाला आहे ना ? मग चमत्कारिक कां नाहीं दिसणार मी ? तुला नाहीं ठाऊक, चंपाताई ?"

" नाहीं. कसला चमत्कार ?"

" खरोखर नाहीं तुला ठाऊक ?"

" नाहीं."

" तर मग काय अजीबात खोटेंच सारें ?"

" काय तें ? वसंतराव, हें काय, आहे तरी काय?"

"मला फसवतो काय साला ? माझ्याशीं–या वसंतरावाशीं–या वस्ताद वसंतरावांशीं अशी ठकबाजी करतो ? भामटेगिरी माझ्याशीं लढवतो ? या वसंतरावाशीं ?"

" कोण करतो तुमच्याशीं भामटेगिरी ?"

" दुसरा कोण ? अग, तुमचा तो–कोण ? अग, तुमचा तो—"

" कोण–आमचा कोण ?"

" तुमचा तो कोण बरें ?–हां–गणपतराव ! गणेश सदाशिव देशपांडे–आहे माहीत ?"

" आहे. त्यांची न् तुमची भेट झाली का ? "

" हो. झाली ह्मणजे ! माझी भेट घ्यायला तो टाळीत होता–पण हा पठ्ठ्या का त्याला ऐकतो ? काय, चंपाताई ? ऐकतो ? "

" नाहीं ऐकणार तुह्मी ! बरं, काय ह्मणाले गणपतराव ? "

" त्याची भेट होतांच, मीं एकदम त्याला सांगितलें, कीं, रावसाहेब, झटपट काढा एक लाख रुपये ! नाहीं तर असाच पोलीसठाण्यावर जाऊन जिकडेतिकडे बोंबाबोंब करून टाकतों. पण माझ्या या धाकाला तो मुळींच बधला नाहीं. तो ह्मणाला–वहिनीसाहेबांजवळ मीं साऱ्या गोष्टी कालच सांगून टाकल्या आहेत ! चंपाताई, ही गोष्ट खरी आहे, कीं, त्यानें मला नुसती थाप दिली ? "

" गोष्ट खरी आहे. "

" तर मग खरी आहे–खरी आहे ! " असें ह्मणून वसंतरावांनीं खिशांतून फ्लास्क बाहेर काढून पुनः ब्रँडीचे दोनचार घोंट घेतले.

" वसंतराव—"

वसंतरावांनीं चंपेला थांबवून मध्येंच विचारलें " वाड्यांतल्या साऱ्या मंडळीला ही गोष्ट कळल्यावर ते काय ह्मणाले ? "

" ते कोण ? "

" अगदीं मूर्ख आहेस तूं, चंपे ! वाड्यांतली सारी मंडळी काय ह्मणाली ? त्यांचें मत काय पडलें ? "

" अजून कुणालाच ही बातमी कळलेली नाहीं–"

" कुण्णाला नाहीं ? "

" नाहीं–फक्त वहिनीसाहेबांनांच कळली आहे. "

" वहिनीसाहेबांनांच ? अस्सें ! " असें ह्मणून वसंतरावांनीं ब्रँडीचे पुनः दोन घोंट घेतले.

" वसंतराव, हें तुह्मीं चालवलें आहे तरी काय ?"

" ब्रँडी पितों आहें. "

" अनशापोटीं तुम्ही ब्रँडी पितां, हें बरं का ?"

" वा–चंपे ! ब्रँडी तर आनंदाचा राजा आहे राजा ! चल घे, तूंहि घे हवे तर दोन घोंट ! "

"वाः ! मला नको —"

"नको तर नको !" असें ह्मणून वसंतरावांनीं फिरून फ्लास्क तोंडाला लावलें !

"तुह्मीहि पिऊं नका, वसंतराव, इथं ! तुह्मी कुठं आहांत, काय करतां आहांत, याची कांहीं क्षिति आहे का तुह्माला ?"

"काः-काय झालें ?"

"सभ्य गृहस्थांच्या घरांत हा सारा घोटाळा काय ह्मणून ? कुणीं पाहिलं तर कान धरून बाहेर काढतील दोघांनां !"

"ओः ! ड्याम इट !" असें ह्मणून वसंतराव डोळे मिटून खुर्चीवर मागें रेलूं लागले.

सुमारें दोन मिनिटें वसंतराव डोळे मिटून पडले होते. नंतर आपल्या मस्तकाच्या केसांवरून एकसारखा हात फिरवीत ते, जणूं आपणाशींच, फिदीफिदी हंसूं लागले.

त्यांचें हें लक्षण पाहून चंपेला खरोखरच मनापासून अतिशय भीति वाटूं लागली. ती ह्मणाली "वसंतराव, हें तुह्मीं काय चालवलें आहे ?"

डोळे न उघडतांच वसंतराव ह्मणाले "हां काय तुमचा त्रास, डियर चंपाताई ? आतां तर कांहीं मी पीत नाहीं ना ? शुचिर्भूत ब्राह्मणासारखा मी स्वस्थ ध्यान करीत पडलों आहें ना ?"

"वसंतराव, हे तुमचे चाळे वाड्यांतील कुणाच्या नजरेला पडले, तर सारीं जणं तुह्माला न् मला ह्मणतील तरी काय ?"

वसंतरावांनीं डोळे उघडले आणि एखाद्या वक्त्याप्रमाणें ते सुरावर बोलूं लागले "पहिला मुद्दा असा आहे, कीं, माझीच बुद्धि अगदीं खराब झाली आहे. हा हा हा ! असें पहा चंपाताई ! पहिल्यानें जेव्हां गणपतरावानें ही गोष्ट मला सांगितली—हा हा हा !—तेव्हां, मला असें वाटलें, कीं—हा हा हा !—बेटा एकदम साधु बनला, समजलें का चंपाताई !"

"हो."

"बेटा साधु बनून—हा हा हा ! सर्व वैभवाचा त्याग करून हिमालयांत तपश्चर्येलाच चालला आहे ! हा हा हा ! पण आतां तुझ्या तोंडून, समजलें कीं नाहीं चंपाताई—तुझ्या तोंडून जेव्हां ही हकीगत ऐकली, तेव्हां मला स्पष्ट कळून आलें, कीं, त्या हरामखोराची पारी लुच्चेगिरी आहे ! हा हा हा ! चंपा—ताई, गुलामानें डाव तर मोठा युक्तीचा टाकला, यांत शंका नाहीं—हा हा हा !"

चंपेनें विचारलें "कसला डाव ?"

"डाव कसला तें तुला ठाऊक नाहीं ? तुझ्या नाहीं ध्यानांत येत, चंपाताई ?"

"नाहीं !"

"हा हा हा ! अग बोलूनचालून तूं एक बायको ! बायकांनां का कुठें डोकें असतें ? हा हा हा !"

"बरं नसतं—"

"अग, बायकांची बुद्धि ती किती ? केरपोतेऱ्यापर्यंतच कीं नाहीं ? हा हा हा ! त्या बेट्यानें मनांत काय विचार केला आहे, आहे ठाऊक, चंपे ?"

"नाहीं—मी बायको आहें ना वसंतराव !"

"अन् मी आहें पुरुष चंपाताई ! हा हा हा ! हां, काय सांगत होतों ? हां—त्यानें मनांत असा विचार आणला, कधीं ना कधीं तरी, एखाद्या दिवशीं आपली ही ठकबाजी उघडकीला आल्याशिवाय कांहीं रहात नाहीं, हें खास ! मग आपली काय भयंकर स्थिति होईल ! हा हा ! त्या बेट्यानें पाहिलें, वहिनीसाहेब आपल्या प्रेमांत गटंकळ्या खात आहेत, आपणावर त्या अगदीं बेहोष फिदा होऊन गेल्या आहेत ! हा हा ! माशानें आमिष तर गिळलें आहे ! आतां जाते कुठें बटकीची पोर !"

चंपा रागावून ह्मणाली "हं—हें काय हें, वसंतराव ?"

"हा हा ! काय सांगतों तें ऐकून घे, चंपाताई ! त्यानें विचार केला, वहिनीसाहेब आपणावर अगदीं फिदा झाल्या आहेत ! आतां जरी त्यांनां कळलें, कीं, हे आपले पतिराज अस्सल नानासाहेब नाहींत, तरी प्रेमामुळें वहिनीसाहेब आपणाला आतां दूर लोटूं शकणार नाहींत, अशी त्या गुलामाची पक्की खात्री झाली होती. काय तुझें मत चंपाताई ? हा हा—"

चंपा कांहींच बोलली नाहीं.

"ह्मणून त्या बेट्यानें असा कावा योजला, कीं, आपण होऊन वहिनीसाहेबांनां साऱ्या खऱ्या गोष्टी सांगून टाकाव्या ! त्या जातात कुठें ? पुढें थोड्याच दिवसांत त्यांच्याशीं पुनर्विवाह करून अगर सिव्हिल मॅरेज लावून, त्यांनां पक्केंच गांठवून घ्यावें ! मग मधली ही हकीगत गुप्त राहिली तर फारच उत्तम—बरें उघडकीला आली, डॅम केअर ! ओः ! काय बेट्याची बुद्धि ! काय बुद्धि !" असें ह्मणून वसंतराव एकसारखें किती वेळ तरी मस्तक हलवीत राहिले.

"वसंतराव, तुह्मी आतां जरासे जाऊन पडा पाहूं."

चंपेच्या सूचनेकडे लक्ष्यहि न देतां वसंतराव पुढें बोलूं लागले " ठीक आहे-उत्तम आहे ! अरे, पण तूं जाशील कुठें बेव्या ? वहिनीसाहेबांनां हातीं धरल्यामुळें तुला कसलीच भीति नाहींशी झाली आहे नव्हे, गुलामा ? अस्सल गोष्ट उघडकीला येवो न येवो, तुरुंगांत जायची किंवा वाड्यांतून गचांडी मिळायची आपणाला आतां भीति नाहीं, अशी तुझी पक्की खात्री झाली आहे, हें मला ठाऊक आहे. पण बेव्या, तूं एक ठग, तर हा वसंतराव दहा ठग आहे, हें तुला ठाऊक नाहीं ! "

चंपा कुतूहलानें वसंतरावाकडे पहात राहिली.

" तुला दुसरी कुठली भीति नाहीं, हें मी कबूल करतों. पण कलंक ? वहिनीसाहेबांनां जबरदस्त कलंक तरी लागेल कीं नाहीं ? अब्रूला काळोखी लागल्यामुळें त्यांनां जन्मांतून उठावें लागेल, ही गोष्ट, बेव्या, तुझ्या मुळींच लक्ष्यांत आली नव्हती.काय तुझें मत,चंपात.इ."

चंपा कांहींच बोलली नाहीं.

" हा मी चाललों पुनः गणपतरावांकडे. "

" कशाला ? "

" त्याला जाऊन-त्याः-त्याच्या तोंडावर ठां-ठांसून सांगतों-बेव्या, तुः-तुझा सारा मत्-मतलब माझ्या ध्यानांत आला ! पैसे दे-देणार तः-तर दे; नाहीं तर तुझें स-सगळें पोम बाहेर फोडून टाकतों! अरे, कर, सि-सिव्हिल मॅरेज कर-ना-नाहीं तर पु-पुनर्विवाह कर-मुं-मुंबईला जाऊन केः-केसरींत-हिंहिंदुपं-पंचांत ऐसा भ-भडीमार सुरू कर-तों, कीं, बेव्याला अगदीं नः-नको हा जीव असें होऊन जाईल ! इथून तुला पण पळून जावें ला-लागेल दूर कुः-कुठें तरी बलुचिस्तानांत ! तसा मी तुला सोः-सोडायचा नाहीं बाबा ! सः-सहज सोडायचा नाहीं ! पण चः-चंपे—"

" काय ह्मणतां ? "

आपले लालबुंद झालेले डोळे चंपेकडे लावून वसंतराव बरळूं लागले " चः-चंपे ! तूं अगदीं कुचकामाची आहेस ! एः-तुः-तुझ्यामध्यें कांहीं दि-दिखील अर्थ नाहीं-तू-यूसलेस अगदीं ! "

" काय मीं केलं ? "

" अन् का-काय मीं केः-केलं, ह्मणून पुनः वि-विचारतेस तो-तोंड करून ? ती-तीः वहिनी तर पु-पुनर्विवाहाला राजी झालीच-पः-पण माझ्याबरोबर पुनर्विवाह करायला का-कांहीं तूं तयार केलीस ना-नाहींस तिला ! त्या बे-बेव्यानेंच लाट मारला ना ? तूं, कां-कांहींच माझें काम केलें नाहींस ?" असें ह्मणून, डोळे मिटून वसंतराव भसाड्या सुरानें गाऊं लागले—

"पुनर्विव्हाहा सध्यश येव्हो-
धन्यछी छास्त्रीभोवा ! "

वसंतरावांची ही अगदीं बेफाम स्थिति पाहून चंपेला अतिशय भीति वाटूं लागली. त्यांच्या खांद्यावर हात ठेवून, ती त्यांनां हलवीत ह्मणाली " वसंतराव, अहो वसंतराव—"

झोंपेंतून दचकून जागें झाल्याप्रमाणें करून डोळे उघडून वसंतरावांनीं विचारलें " खाय-खाय ह्मणथेस थूं ? "

" वसंतराव, हें तुम्हीं चालवलं आहे तरी काय ? तुह्मी आहां कुठं-करतां आहां काय ?

" खाय-खाय करथों आहें मी ?"

" तुह्माला वसंतराव, ब्रँडी खूबच चढली आहे-"

" डोळे मिटून मान हलवून वसंतराव ह्मणाले " हा हा हा ! अघ माझी भ्रा-भ्रांडी हाहेच थशी !"

" कांहीं तरी तोंडाला येईल तें बकतां आहां तुम्ही. "

" खा-खाय थोंडाला येहील थें भखलों म्ही ?"

" वसंतरावांनां हलवून चंपा ह्मणाली " वसंतराव, अहो वसंतराव, मी सांगतें तें ऐका—"

" खाय सांघथेस ?"

" तुम्ही हा सारा आपला बेत सोडून द्या—"

" मघ खाय खरूं ह्मणतेस ?"

"गणपतरावांकडे तुम्ही जाऊं नका. तुह्माला पैसे मिळायची आतां कांहींदिखील आशा राहिली नाहीं. "

" खाई आशा न्हाहीं ?"

" नाहीं-मुळींच नाहीं. "

" खां-न्हाहीं ?"

" ती बरीच मोठी हकीगत आहे. आतां मीं ती तुह्माला सांगितली, तर तुह्माला ती कांहीं कळायची नाहीं. तुमचं डोकं आतां ठिकाणावर नाहीं. दारू तुह्माला भारीच चढली आहे. "

" हां-चढल्ही हाहे !"

"तुम्ही आतां जा—स्नानबीन करा न् थोडंसं खाऊन पडा. झोंपून उठलांत म्हणजे पुनः आपण बोलूं. त्या वेळीं तुम्ही शुद्धीवर असाल अन् माझं सारं बोलणं तुम्हाला समजेल."

वसंतराव उठले. या वेळीं त्यांचे डोळे लालबुंद झाले असून त्यांतून जणूं आगीचे लोटच्यालोट बाहेर पडत होते! त्यांचे पाय लटलट कांपत होते. सर्व शरीर पुढेंमागें झुकांड्या घेत होतें.

त्यांनीं विचारलें "हायां—झला खांहीं-आशा—न्हाहीं न्हाहीं-म्हणथेस?"

चंपा भयानें दोन पावलें मागें सरून म्हणाली "नाहीं—वसंतराव, तुम्ही मुकाट्यानं जा इथून."

एखाद्या वेड्याप्रमाणें वसंतराव एक उडी मारून चंपेजवळ गेले आणि त्यांनीं तिला एक जोराचा धक्का दिला. बिचारी चंपा क्षणार्धांत खालीं पडली!

नंतर नाटकांतील नायकाप्रमाणें गंभीर स्वरानें "पापिणी, हें तुझ्या पापाचें प्रायश्चित्त!" असें म्हणून वसंतराव तेथून झुकांड्या खात बाहेर पडले.

खालीं येऊन, अंगणाच्या मध्यभागीं उभे राहून दोन्ही हातांनीं ढोल वाजविल्याप्रमाणें अभिनय करून जड, भंगलेल्या स्वरानें, पण शक्य तितका मोठा आवाज काढून ते ओरडले 'तेरे दूम—तेरे दूम—दूम तेरे दूम दूम दूम! अहो, सर्व लोकहो, कोणी कोठेंहि असलां तरी ऐका! लोकहो ऐका! लोकहो ऐका! हा खरा नानासाहेब नाहीं—नानासाहेब नाहीं—नानासाहेब नाहीं. हा गणपतराव देशपांडे—गणपतराव देशपांडे आहे! अन् तुमची ही यमुना या गणपतरावाची बायको आहे!" असें ओरडून वसंतराव, शक्य तितक्या वेगानें, हलतडुलत बाहेर आले आणि तसेच कचेरीसमोरच्या अंगणांतून झुकांड्या खात पार होऊन बाहेर रस्त्यावर आले.

वसंतरावांची ती 'मत्त' अवस्था पाहून लोक भयानें त्यांनां आपण होऊन रस्ता करून देऊं लागले. गांवांतलीं मुलें टाळ्या वाजवून गद्‌गदां हंसतहंसत एकमेकांनां सांगूं लागली "अरे तो पहा—छाकटा साहेब कसा चालला आहे तो पहा!"

परंतु वसंतराव बिलकूल इकडेतिकडे दृष्टिहि न फेकतां, जोरजोरानें पावलें टाकीत रस्त्यांतली धूळ उडवीत स्टेशनाकडे जाऊं लागले.

आपल्या बायसिकलचें त्यांनां स्मरणहि नव्हतें!

प्रकरण दहावें.

आईसाहेबांचा हुकूम!

आज प्रातःकाळपासून वहिनीसाहेबांच्या प्रकृतीला तुरळकच आराम वाटत होता. औषध वगैरे काय घ्यावयाचें तें त्या अगदीं वेळेवर घेत. वैद्यबुवांनीं सांगितल्याप्रमाणें पथ्यपाणीहि अगदीं योग्य रीतीनें व तंतोतंत पाळीत; परंतु हृदयांतल्या हृदयांत त्यांनां ज्या दुःसह अनंत यातना होत होत्या, किंवा जी भयंकर लज्जा व मानहानि त्यांनां वाटत होती, त्यांबद्दल एक अवाक्षरहि त्यांनीं कोणापाशीं कधीं चुकूनहि उच्चारलें नाहीं. आईसाहेब वगैरे साऱ्या मंडळींचा असा पक्का समज होता, कीं, दुखण्यामुळें त्यांनां अतिशय अशक्तता आली असून तिच्यामुळेंच त्या अशा वारंवार मूर्छित पडत असतात, आणि त्यांचा तसा समज होणें साहजिकच होतें.

चंपाताई आज मधुनमधून वहिनीसाहेबांजवळ बराच वेळ एकटी होती; परंतु तिनें स्वतः होऊन त्या गोष्टीबद्दल त्यांच्याजवळ कधींहि उल्लेख केला नाहीं, आणि वहिनीसाहेबांनींहि तिला त्या बाबतींत एकहि प्रश्न कधीं केला नाहीं. गणपतरावांनीं दिलेलें पत्र आहे कोठें, त्याचें पुढें झालें काय, तें कोणाच्या हातीं लागलें वगैरे हकीगत समजावून घ्यावयाची त्यांनां तिळभरहि उत्कंठा किंवा जिज्ञासा नाहीं, असेंच चंपेला आढळून आलें, आणि त्याबद्दल तिला आश्चर्य वाटल्यावांचून राहिलें नाहीं.

ज्या वेळीं चंपा वसंतरावांबरोबर त्या एकान्त खोलींत बसून गोष्टी ऐकत व बोलत होती, त्या वेळीं वहिनीसाहेब आपल्या खोलींत पलंगावर तक्क्याला टेंकून, तळहातावर गाल ठेवून आपल्या अदृष्टाच्या विडंबनाबद्दल विचार करीत बसल्या होत्या. विचार, विचार, विचार—विचारांचा कोठें थांग ना पत्ता—शेंडा ना बुडखा, अशी त्यांची स्थिति झाली होती. त्यांनां राहूनराहून हा विचार छळीत होता, कीं, मागील जन्मीं आपण असें कोणतें भयंकर पाप केलें होतें, कीं, त्यामुळें आपणाला

असें भयंकर प्रायश्चित्त मिळावें, हा जन्माचा काळा-कुट्ट कलंक आपल्या निर्मल चारित्र्याला लागावा ? या वेळीं वहिनीसाहेबांच्या डोळ्यांत पाण्याचें एक टिपूस नव्हतें–परंतु हृदयांत खांडववनाच्या दहनाप्रमाणें महा-भयंकर आग लागली होती. त्यांच्या डोळ्यांतील पाण्याचा झरा पार आटून–मरून गेला होता !

वसंतराव जेव्हां खाडखाड शब्द करीत जिना उतरूं लागले, त्या वेळीं त्यांच्या बुटांचा तो शब्द त्यांच्या कानांवर गेला. तो अपरिचित आणि चमत्कारिक शब्द ऐकून त्या एकदम चमकल्या, आणि त्यांचे कान त्या शब्दाकडे पूर्णपणें वेधून राहिले. हळुहळू तो शब्द खालींखालीं जाऊं लागला. त्यानंतर, अंगणांतून जो अत्यंत विकट, अत्यंत भयंकर चीत्कार झाला, त्यापैकीं प्रत्येक शब्द वहिनीसाहेबांच्या कानांवर जाऊन आद-ळला ! त्याच्याबरोबरच सर्व वाड्यांत जी कांहीं विल-क्षण खळबळ झाली, विलक्षण गडबड उडाली, तीहि त्यांनां स्वच्छपणें कळून आली. अपमान, कलंक, धिक्कार, निराशा इत्यादिकांनीं, भयंकर आगीच्या कल्लोळाप्रमाणें त्यांनां चहूंकडून वेढून टाकलें, आणि क्षणोक्षणीं अधि-काधिक उद्दाम ज्वाला फेंकीत ती आग त्यांच्या अगदीं हृदयापर्यंत येऊन भिडली ! त्यांच्या मस्तकांत कांहीं विलक्षण शब्द होऊं लागून त्यांत तुसती आग शिजून राहिली आहे, असें त्यांनां वाटूं लागलें. त्यांची चेतना झपाट्यानें नाहींशी होऊं लागली, आणि त्या क्षणार्धांत बिछान्यावर मूर्च्छित होऊन पडल्या. त्यांची ही अवस्था कोणीं पाहिली नाहीं, आणि कोणाला लवकर कळलीहि नाहीं !

इकडे छाकटे वसंतराव अंगणांतून बाहेर निघून गेल्यानंतर वाड्यांतील बायका आणि दासदासी तेथें जमल्या, आणि किंकर्तव्यमूढ होऊन एकमेकांच्या तोंडां-कडे वेड्यांप्रमाणें पाहूं लागल्या. आईसाहेब या वेळीं देवघरांत होत्या. त्या तशाच धांवतधांवत अंगणांत आल्या, आणि जिलातिला विचारूं लागल्या "काय ग? चंपाताईचा भाऊ हें काय बडबडत गेला ?"

आईसाहेबांच्या कानांवरहि वसंतरावांचा शब्दान् शब्द गेला होता; परंतु आपल्या कानांवर त्यांचा मुळीं विश्वासच बसेना ! अशा सर्वनाशी, उत्पाती, महानर्थ-कारक गोष्टीवर एकाएकीं कोणाचा कधीं विश्वास बसणें शक्य आहे काय ?

आईसाहेबांनां कोणीं कांहींच उत्तर दिलें नाहीं. तेव्हां त्या जड कंठानें रुद्ध श्वासानें ह्मणाल्या "अग, चंपा कुठं आहे, यमुना कुठं आहे ? कुणी तरी मला सांगा ग लवकर !"

एका दासीनें एका खोलीकडे बोट दाखवून ह्मटलें "यमुताई या खोलींत आहेत !"

एखाद्या वेडीप्रमाणें आईसाहेब धांवतच त्या खोली-मध्यें गेल्या. यमुना तेथें एका भिंतीला धरून कशी-बशी उभी राहिली असून स्फुंदस्फुंदून रडत आहे, असें त्यांच्या दृष्टीला पडलें.

आईसाहेबांनीं दोन्ही डोळे अगदीं कपाळांत नेऊन विचारलें "यमू–यमुताई ! हा माझा नाना–नाहीं ?"

खालीं पहात रडतरडत यमुना ह्मणाली "नाहीं."

"हा तुझा नवरा ?"

"हो." असें ह्मणून यमुना मोठमोठ्यानें हामस्या-हामशीं रडूं लागली. तिला अगदीं 'दे माय धरणी ठाय' होऊन गेलें !

आईसाहेब तशाच आवेगाच्या भरांत खोलीबाहेर आल्या, आणि क्षुब्ध दृष्टीनें इकडेतिकडे पाहूं लागल्या. धांपा टाकीतटाकीत त्या ह्मणाल्या "चंपा–चंपाताई कुठं आहे ?"

एका दासीनें धांवतच वर जाऊन चंपाताईला बोलावून खालीं आणलें. ती दृष्टीला पडतांच आई-साहेबांनीं विचारलें "चंपाताई, इथं अंगणांत उभा राहून तुझा दादा मोठमोठ्यानं काय बरं बोलत होता–? काय सांगितलं त्यानं, चंपाताई ?"

कांहींच उत्तर न देतां चंपा खालीं मान घालून स्तब्धपणें उभी राहिली.

आईसाहेबांनीं विचारलें "चंपाताई, सांग, खरें सांग–हा आलेला माणूस आमचा नाना नाहीं ?"

चंपेनें स्पष्ट सांगितलें "नाहीं."

"तर मग काय तो यमुताईचा नवरा ?"

"होय."

कपाळावर जोरानें हात आपटून आईसाहेब 'श्री ... काय रे केलेंस हें !' असें उद्गारल्या, आणि पडेल्या ... केळीच्या झाडाप्रमाणें कांपतकांपत ज...वर धाड्-कन् पडल्या.

+ + +

इकडे बाहेरहि ही बातमी पोहोंचावयाला फारसा अवकाश लागला नाहीं. वसंतराव झुकांड्या खात

कचेरीच्या पटांगणांतून रस्त्यावर निघून गेल्यानंतर सुमारें अर्ध्या मिनिटाच्या आंतच बाहेरच्या एकूणएक कारकुनाला, नोकराला, प्याद्याला, शिपायाला, सैसाला, टांगेवाल्याला ही वातमी कळली.

'नायब-दिवाण' गोविंदराव ह्मणजे आतां मोठें प्रस्थ झालें होतें! ते अजूनहि कचेरीला आले नव्हते. त्यांनां बोलावून आणावयाला एक शिपाई त्यांच्या घराकडे धांवतच निघाला. गोविंदरावजी त्या वेळीं भोजनाला बसले होते. कसेबसे समोरच्या पानावरचे चार-दोन घांस पोटांत लोटून त्यांनीं झट्कन् आपोषण घेतलें, व हात धुऊन, झटपट विडा तोंडांत घालून तो चघळीत चघळीत, त्यांनीं आपला पोषाख चढविला, आणि धांवतच ते कचेरीकडे निघाले.

कचेरींत पोहोंचतांक्षणींच त्यांनीं मुख्य कारकुनाला बोलावून झटलें "काय हो पळाला देखील का?"

"नाहीं–नाहीं. आहे अजून!"

गोविंदराव तसेच कचेरीच्या बाहेर आले, आणि मोठमोठ्यानें "ओ जमादार–माधोसिंग ओ माधोसिंग!" असें ओरडत इकडेतिकडे फिरूं लागले.

जमादार माधोसिंग त्यांच्याजवळ येऊन, मुजरा करून उभा राहिला.

गोविंदरावांनीं हुकूम केला "ऐ जमादार माधोसिंग! ये जो आदमी हम लोकको हुजूर इनामदार साहेब साजके आया है ना?"

"हां जी!"

"ओ इनामदारसाब नै हाय्! ओ बडा पाजी बदमाष हाय्! जेतना सिपाहीप्यादा सब लोक जाव–बैठकखाना बाडीमें पहारा देव! वो बदमाषको भागना न देना–समझ्या?"

"जी हुकूम!"

"अच्छा–सब वंदोबस्त करके हमे इतिला देना!"

"जी हुकूम!" असें ह्मणून माधोसिंग लुटलुट देह [illegible]त आपल्या हाताखालचे शिपाईप्यादे एकत्र क[illegible]तां धांवतच निघून गेला.

गो[illegible] परत येऊन आपल्या 'गादी'वर बसले, व त्यांनां ज[illegible]च्या खुज्यांतलें दोन फुलपात्रें पाणी ढोसून कपाळाव[illegible] घाम फडक्यानें पुसला. नंतर ते ह्मणाले "अहो, त[illegible]वेळेलाच मला पका संशय आला होता गुलमाचा!"

गदाधरपंत कारकून ह्मणाले "मग तुह्मी कुणाजवळ कांहीं बोललां नाहीं?"

"अहो, ह्मटलें बोला कशाला? असलें स्पष्ट बोलणें कधीं कुणाला रुचत असतें, असा का समज आहे तुमचा?"

"हो, तेंहि खरें आहे."

"अहो, संबंध सोळा वर्षें ज्या माणसाचा कुठें थांग ना पत्ता, जो जिवंत आहे कीं मेला आहे, हें देखील कुणाला कधीं कळलेलें नाहीं, तो कधीं परत येईल, ही गोष्ट कधीं शक्य तरी आहे का? दिवाणजी काय, आपले 'काकासाहेब, काकासाहेब' अशा त्या गुलामाच्या हांका ऐकून गेले गळून! अरे काका काय न् साहेब काय! अहो काय सांगूं तुह्माला गदाधरपंत, मी जर दिवाण असतों, तर या दिल्लीच्या सोद्यानें माझ्या डोळ्यांत कशी धूळ फेंकली असती, तेंच मीं पाहिलें असतें! आतां हें तरी मोठें भाग्य समजा, कीं, या वेळीं तरी सगळा 'चार्ज' माझ्याकडे आहे!"

गदाधरपंत ह्मणाले "तुह्मीं विशेष तें काय केलेंत?"

"विशेष काय केलें? त्याला अडकावून तर ठेवलें–पळूं तर नाहीं दिलें? अहो, दिवाणजी जर असते, तर या चोरानें त्यांच्या हातावर तुरी देऊन केव्हांच सूंबाल्या ठोकला असता!"

आपल्या पराक्रमामुळेंच जणूं श्रांत होऊन गोविंदरावांनीं आणखी एक फुलपात्रभर पाणी झोंकलें.

गदाधरपंत ह्मणाले "हें सारें ठीक झालें. आतां पुढें करायचें काय?"

हातांतून फुलपात्र खालीं ठेवून गोविंदराव ह्मणाले "सदरठाण्यावर खबर पाठवतों."

गदाधरपंत मान हलवून ह्मणाले "मला नाहीं हें ठीक वाटत!"

"कां हो?"

गदाधरपंत ह्मणाले "पोलिससाहेब तर सपाट्याबरोबर प्रश्न टाकतील, कीं, हे अस्सल नानासाहेब नाहींत, याला साक्षीपुरावा काय? तेव्हां त्यांनां आपण काय जबाब देणार? नुसत्या त्या छाकट्या दारुड्याच्या बरळण्यापलीकडे तर आपणाजवळ कांहीं पुरावा नाहीं ना? कुणालाहि तोतया ठरवणें हें महाकर्म कठीण असतें!"

गदाधरपंतांचा हा युक्तिवाद ऐकून गोविंदराव तर आंतून अगदीं गळूनच गेले ! एकदम आतां त्यांच्या मनांत कल्पना आली, कीं, 'त्या छाकट्यानें जर उगीच कांहीं तरी बडबड केली असली, तिच्यांत कांहींच अर्थ नसला, तर नानासाहेबांच्या रागाला मीं गरीब उगीच बळी नाहीं का पडायचा ! हा त्यांच्यावर खडा पहारा ठेवून त्यांचा जो मी अपमान केला, त्याबद्दल मला ते मनांत काय बरें ह्मणतील ? उद्यांच नाहीं का माझी चाकरी जायची ? छट्, माझी मोठीच चुकी होते आहे ही ! '

नंतर ते उघड ह्मणाले " हो, तो छाकटा गेला कुठें बरें ? त्याला बोलावून आणून त्याला चांगला हडसूनखडसून विचारूं या बरें ! त्याला जाऊन किती वेळ झाला ?"

एक जण ह्मणाला " फार तर अर्धा तास ! "

गोविंदरावांनीं पुनः शिपायांनां हांका मारण्याचा सपाटा सुरू केला. ते आल्यानंतर, नुकत्याच गेलेल्या त्या छाकट्या पाहुण्यांनां शोधून घेऊन यावयाला त्यांनीं त्यांनां हुकूम केला.

गदाधरपंत ह्मणाले " गोविंदरावजी, माझ्या मताप्रमाणें तुह्मी एकवार आईसाहेबांनां या बाबतींत भेटून याल तर फार चांगलें होणार आहे. अहो, आपण सारे जण किती झालें तरी हुकुमाचे चाकर! आईसाहेबांचा हुकूम घेऊन त्याप्रमाणें कामें करणें हेंच आपणाला नेहमीं श्रेयस्कर होणार आहे. आईसाहेब काय ह्मणतात–ठाण्यावर खबर द्यायला सांगतात–कीं, देवळालीला काकासाहेबांनां तार करून बोलवायला सांगतात, तें ऐका, अन् त्याप्रमाणें व्यवस्था अमलांत आणा ह्मणजे बरें, असें निदान मला तरी वाटतें बुवा !"

गोविंदराव कांहीं वेळ स्तब्ध बसले. नंतर ते ह्मणाले " हो, तुह्मी ह्मणतां तेंच एकंदरींत ठीक ! आईसाहेबांकडे जाऊन त्यांचा हुकूम होईल, त्याप्रमाणेंच करतों मी ! त्यांनां विचारल्याशिवाय कोणतेंहि काम करणें हें आपणाला तरी योग्य आहे का ? जा बरें, तुह्मींच जाऊन आईसाहेबांकडे कुणाला तरी पाठवा–नायबदिवाणसाहेब आपल्या भेटीची इच्छा करीत आहेत, असा जाऊं द्या आंत निरोप."

गदाधरपंतांनीं आईसाहेबांकडे निरोप पाठविण्याची व्यवस्था केली; परंतु त्यांचा हुकूम यावयाला विलंब होऊं लागला. ' नायब दिवाणसाहेब' तर प्रत्येक पळाला अधिकाधिक अधीर होत चालले. त्यांच्याकडून माणसांवर माणसें आंत जाऊं लागलीं. शेवटीं, कांहीं वेळानें त्यांची एकदांची वर्णी लागली !

गोविंदरावांनां आंत योग्य जागीं नेण्यांत आलें. आईसाहेब तेथें अगोदरच येऊन बसल्या होत्या.

गोविंदरावांनीं जातांच आईसाहेबांनां प्रणाम करून ह्मटलें " हुजूर, आह्मीं जें ऐकलें तें खरें काय ?"

आईसाहेब खिन्न स्वरानें ह्मणाल्या " होय–खरं आहे तें दुर्दैवानं !"

" तर मग हे आमचे नानासाहेब नाहींत ?"

" नाहीं—"

" मग आतां पुढें काय करायचें ?"

" काय करायचं !" आईसाहेब एक मोठा उसासा सोडून ह्मणाल्या. "आपण काय करणार ? देव काय करील तें खरं !"

" सदरठाण्यावर पोलिस अम्मलदारांकडे खबर पाठवूं काय ? त्याच्यावर मीं पहारा बसवला आहे."

" नको–ठाण्याबिण्यावर खबर द्यायचं कांहीं कारण नाहीं. त्याच्यावरचा पहारा एकदम उठवा. त्याचा कुणीहि बिलकूलसुद्धां अपमान करूं नका–किंवा त्याच्यासंबधानं कुणी कांहीं कुत्सित उद्गारहि काढूं नका. तो आपल्या इच्छेनं जाईल तेव्हां जाऊं द्या—"

" तोंपर्यंत ?"

" अर्थात् तो इथंच राहील !"

" आणखी कांहीं हुकूम आहे ?"

" मुलीचं दुखणं आज अतिशय काळजी करण्यासारखं झालं आहे. स्टेशनावर ताबडतोब एखादा स्वार पाठवा न् मिरजेच्या गोऱ्या डॉक्टरसाहेबाला एकदम यायला तार करा--जितक्या लवकर त्यांनां येतां येईल तितकं या ह्मणून त्यांनां कळवा--अगदीं पहिल्याच गाडीनं येऊं द्या त्यांनां. त्यांच्या फीचे वगैरे पैसे जरूर तितके सर्व त्यांनां तारेनें आगाऊ पाठवा अन् पहिल्या गाडीला डॉक्टरसाहेबांसाठीं आपला टांगा, अशी व्यवस्था करायला विसरूं नका.'

" आणखीं कांहीं हुकूम आहे "

" नाहीं—"

" काकासाहेबांनां निघून

" नको."

पुनः प्रणाम करून गोविंदराव कचेरीकडे जावयाला निघाले. आईसाहेबांचें एकंदर आचरण पाहून ते आश्चर्यानें अगदीं थक्कच होऊन गेले.

हळुहळू ते कचेरींत येऊन पोहोंचले, आणि त्यांनीं आईसाहेबांचे सर्व हुकूम तामिल केले. नंतर गादीवर बसून, लोडाला ओठंगून, आपल्या टक्कल पडलेल्या मस्तकावरून एकसारखा हात फिरवीत ते विचारांत अगदीं निमग्न होऊन गेले. 'ज्या पाजी हरामखोर माणसानें यांचा असा सर्व नाश केला, ज्याला जमिनींत कमरेपर्यंत पुरून भुकेलेल्या कुत्र्यांकडून फाडफाडून खावविण्याची शिक्षा करूनहि मनाचें समाधान होणें शक्य नाहीं, त्या नीच नराधमावर आईसाहेबांनीं इतकी दया कां दाखविली?'

दया दाखविण्याला तसेंच बलवत्तर कारण होतें. चंपेनें एक सत्कृत्य केलें होतें. गणपतरावांचें पत्र काढून, त्यावरून तिनें आईसाहेबांची अशी खात्री केली होती, कीं, वसंतराव येऊन अस्सल हकीगत सर्वांनां कळवितील, ही गोष्ट ज्या वेळीं खतः गणपतरावांनां एका अक्षरानें देखील माहीत नव्हती, त्या वेळीं खतः गणपतरावांनीं, आपण होऊन वहिनीसाहेबांनां एकूणएक गोष्ट कळविली. चंपेनें आईसाहेबांनां असेंहि समजावून सांगितलें, कीं, ऐनवेळीं सावध होऊन, धर्माला, सत्याला जागून, गणपतरावांनीं त्यांच्या पवित्र कुलाची पवित्रता कायम राखली, त्याला तिळमात्रहि कलंक लागूं दिला नाहीं, याबद्दल त्या सर्वांनीं त्यांच्याशीं कृतज्ञतेनें वागणें हेंच उचित आहे—आणि जन्मदरिद्री असतांहि त्यांनीं एवढ्या प्रचंड संपत्तीच्या आणि राजवैभवाच्या लोभावर विजय मिळविला आणि धर्ममार्गापासून ते तिळमात्रहि चळले नाहींत, याबद्दल ते सर्वांच्या श्रद्धाभक्तीलाहि पात्र आहेत, यांत तिळप्राय संदेह नाहीं !

प्रकरण अकरावें.

सुपारी.

धाकट्या वसंतरावांची वेडी 'दौंडी' ऐकतांच, वहिनीसाहेब ज्या पलंगावर झीट येऊन पडल्या, त्या किती वेळ तरी तशाच पडल्या होत्या. अर्धापाऊणतासपर्यंत त्यांची कोणीं नुसती विचारपूसहि केली नाहीं. सुमारें दोन घटकांनीं एक दासी कांहीं कामाकरितां म्हणून त्या खोलींत आली, तों वहिनीसाहेबांची ती स्थिति तिच्या दृष्टीला पडली. तिनें तत्क्षणीं चहूंकडे हांकाहांक केल्यामुळें वहिनीसाहेबांकडे सर्वांचें लक्ष्य वेधलें.

अतिशय प्रयत्न केल्यानंतर वहिनीसाहेब कांहीं कालानें शुद्धीवर आल्या; परंतु लवकरच दुसरा एक अनर्थ झाला. त्या शुद्धीवर येतांच त्यांच्या अंगांत ताबडतोब ताप भरला, आणि तो हळुहळू वाढूं लागला.

प्रहर रात्रीच्या सुमाराला मिरजेहून डॉक्टर ख्रिस्ती येऊन पोहोंचले. तीन दिवसपर्यंत त्यांचा मुक्काम बाणकोटलाच होता.

डॉक्टरसाहेब तीन दिवसपर्यंत एकसारखे रोग्याजवळ बसून होते म्हटलें तरी चालेल. सतत तीन दिवस वहिनीसाहेबांच्या अंगांत होता तसा ताप होता. त्यांच्या अंगाची सारखी काहिली चालली होती. ताप हटविण्याची डॉक्टरसाहेबांची एकसारखी अविश्रांत खटपट चाललीच होती. तिसऱ्या दिवशीं रात्रीं दोन प्रहरांच्या सुमाराला वहिनीसाहेबांचा ताप किंचित् नरम पडूं लागला. सूर्योदयाबरोबर त्यांचें लुप्तप्राय चैतन्य परत आलें, आणि त्यांनीं डोळे उघडले.

त्या वेळीं, वहिनीसाहेबांच्या पलंगावर बसून यमुना त्यांच्या मस्तकाला हळुहळू पंख्यानें वारा घालीत होती. वहिनीसाहेबांनीं डोळे उघडले, आणि त्या खोलींत चहूंकडे हळुहळू पाहूं लागल्या.

यमुनेकडे पाहून वहिनीसाहेबांनीं क्षीण स्वरानें विचारलें " यमुताई, तूं सारी रात्र इथं बसून आहेस ग ?"

त्यांच्या मस्तकावरून स्नेहभरानें हळुहळू हात फिरवीत यमुना म्हणाली " नाहीं, मला इथं बसून कांहीं फार वेळ नाहीं झाला."

" मग कोण होतं ?"

" आईसाहेब होत्या. त्या आम्हाला बसूंच देत ना! आम्हाला निजायला जायला त्यांनीं खूब आग्रह केला."

" कुठं आहेत सासूबाई ?"

"आतां नुकत्याच मला इथं बसवून नदीवर अंघोळीला गेल्या आहेत त्या, वहिनीसाहेब. गेल्या दोन दिवसांत त्यांनीं आंघोळ केली नाहीं, कीं, तोंडांत पाणीहि

ीं. माउली दोन दिवस एकसारखी तुमच्या-
न रडत होती."

स्वरानें वहिनीसाहेबांनीं विचारलें "दोन

—"

मग मी किती दिवस पडलें आहें अशी?"

तीन दिवस झाले नाहीं का? तेरवां दुपारीं
म झीट येऊन पडलांत—नाहीं?"

ाहेब आठविण्याचा प्रयत्न करूं लागल्या.
तेशक्ति अत्यंत दुर्बल झाली होती. डोळे वर
स्वरानें त्या ह्मणाल्या "तेरवां—दुपारीं?
ाई! हां—" असें ह्मणून वहिनीसाहेबांनीं
. त्यांच्या मिटलेल्या डोळ्यांच्या पापण्यां-
ोठे अश्रुबिंदु खालीं गळूं लागले.

ाहेबांनां रडतांना पाहून यमुना मोठ्या
पडली. आतां काय बोलावें, काय करावें,
ारीला कांहींच कळेना!

ती ह्मणाली "डॉक्टरसाहेब काल ह्मणाले—"
यमुना गप्प बसली.

ाहेबांनीं डोळे उघडले, व त्या यमुनेच्या
हूं लागल्या. त्यांनीं विचारलें "कोण ह्मणा-
ई?"

रसाहेब."

डॉक्टरसाहेब?"

हून ते गोरे डॉक्टर नाहीं का आले?"

हून?"

हून माझ्यासाठीं गोऱ्या डॉक्टरला आणलं
ंनीं?"

"

ऱ्या दिवशीं रात्रीं."

" असें ह्मणून वहिनीसाहेबांनीं दुसरी-
फिरविलें, व त्या कांहीं विचार करूं

गाली "ते डॉक्टर ह्मणत होते—"
हेबांनीं पुनः यमुनेकडे तोंड फिरविलें,
मुद्रेनें त्या तिच्याकडे पाहूं लागल्या.

ाला थोडं बरं वाटूं लागलं, कीं, तुम्हाला
ऱ्या हवेवर घेऊन गेलं पाहिजे."

वहिनीसाहेबांच्या डोळ्यांतून पुनः झरझर आंसवें गळूं लागलीं. त्या ह्मणाल्या "त्याची आतां मुळींच जरूर नाहीं."

"ह्मणजे?"

"ह्मणजे काय? हवाबिवा पालटायची माझ्यासाठीं मुळींच जरूर नाहीं उरली बरं यमुताई!"

"कां बरं, वहिनीसाहेब?"

वहिनीसाहेब यमुनेकडे पहात मुकाट्यानें अश्रुविसर्जन करूं लागल्या. त्या ह्मणाल्या "कां बरं, काय विचारतेस यमुताई?"

"काय झालं, वहिनीसाहेब?"

"सारं तूं ऐकलंस तर खरं!"

"हो, ऐकलं."

"तर मग—" इतकेंच बोलून वहिनीसाहेब गप्प राहिल्या, व एकसारख्या रडूं लागल्या.

"असं काय बरं करतां गडे?"

"यमुताई, तुला सारं ठाऊक आहे ना? माझ्यासारख्या अभागिनीला आतां जगून तरी काय करायचं आहे?"

आपल्या पदरानें वहिनीसाहेबांचे अश्रु पुसून त्यांच्या मस्तकावरून हळुहळू हात फिरवीत यमुना ह्मणाली "वहिनीसाहेब, असं कां बरं तुह्मी अभद्र बोलतां?"

वहिनीसाहेब ह्मणाल्या "यमुताई, मरण हें मला आतां अमंगल नाहीं—तें मंगलांतलं मंगल आहे मला! तूंच सांग—मला आतां वांचून काय करायचं आहे?"

यमुना स्नेहार्द्र स्वरानें ह्मणाली "असं नका कांहीं वेडं न् विद्रं बोलूं गडे! वहिनीसाहेब, एक दिवस माझ्यासंबंधानं असंच मीं ह्मटलं होतं, तेव्हां तुह्मीं काय बोलून माझ्याविषयीं तिट्कारा दाखविलात, तें तुमच्या ध्यानांतून गेलं का?"

वहिनीसाहेबांचें अंग एकदम थरारलें. त्यांनीं एक मोठा दुःखाचा उसासा सोडला. नंतर त्या ह्मणाल्या "यमुताई, मीं त्या वेळीं तुला तसं ह्मटलं खरं, पण त्याला तसंच कारण नव्हतं का?"

यमुना वहिनीसाहेबांच्या चेहऱ्याकडे पाहूं लागली.

वहिनीसाहेब बोलूं लागल्या "यमुताई! तुझ्या अन् माझ्या स्थितींत जमीन-अस्मानाचं अंतर आहे, हें मीं का तुला समजावून द्यायला हवं, वेडे! यमुताई,

मला साऱ्या-" असें ह्मणून त्या स्फुंदस्फुंदून एकसारख्या रडूं लागल्या.

यमुनेनं पुनः आपल्या पदरानं त्यांचे डोळे पुसले, व विचारलं " वहिनीसाहेब, माझ्यामुळं तुह्मांला दुःख होतं असं दिसतं. मी जाऊं का इथून ?"

यमुनेचा हात आपल्या [illegible] हातांत घेऊन वहिनी-साहेब ह्मणाल्या " यमुताई, असं भलतंसलतं मनांत कांहीं आणूं नकोस-तूं तर माझ्या जिवाचा विसावा गडे!"

" मग अशा कां बरं रडतां आपण ?"

" रडूं नको तर काय करूं ?" वहिनीसाहेब गद्गद स्वरानें ह्मणाल्या "यमुताई, मला साऱ्या जन्माचा कलंक लागला ! साऱ्या जन्मांत तो कधीं तरी आतां [illegible] निघायची आशा राहिली आहे का ?"

यमुना कांहींच बोलली नाहीं.

"हें जर खरं आहे, तर माझ्या या कलंकित आयुष्याचा अंत जितक्या लवकर होईल तितकं बरं नाहीं का ! घोर कलंकांत, झिजत खितपत आयुष्य कंठण्यापेक्षां एकदम त्याचा शेवट झाला, तर तें शतपटीनें-[illegible] बरं नाहीं का ?"

यमुनेनं वहिनीसाहेबांचा हात आपल्या हातीं घेतला, आणि तो आपल्या हृदयाशीं धरला. दुसऱ्या हातानें ती त्यांचे अश्रु पुसूं लागली. नंतर ती ह्मणाली "वहिनी-साहेब, तुह्मी असं कसं ह्मणतां बरं ?"

" कां ? माझं ह्मणणं खोटं आहे का ?"

" मी विचारतें, झालं यांत तुमचा तर कांहीं दोष नाहीं ना ?"

कपाळाला हात लावून वहिनीसाहेब उद्गारल्या " माझ्या या फुटक्या कपाळाचा दोष !"

" झालं घडलं यांत तुह्मीं आपण होऊन कांहीं केलं नाहीं."

वहिनीसाहेब कांहींच बोलल्या नाहींत.

"वहिनीसाहेब, तुह्मी तर आपले पति समजून—"

यमुनेच्या या शब्दांनीं वहिनीसाहेबांच्या साऱ्या शक्ति जागृत झाल्या. त्यांच्या डोळ्यांतलें पूर्वीचें तेज जणुं क्षणभर परत आलें-शतपट झालें ! त्या अत्यंत [illegible]जित स्वरानें ह्मणाल्या " तें तर शंभर वेळ--एक वेळ ! देव साक्षी आहे !"

[illegible]हेबांच्या वृत्ति उल्लसित झालेल्या पाहून [illegible]तिशय उत्तेजन आलें. ती उत्साहानें [illegible] तुह्मी असं कां ह्मणतां ? तुह्मी [illegible]र-पण मनानं दिखील अतिशय पवित्र आहां ! एक क्षण दिखील तुमचं मन कधीं पाप-विचाराकडे वळलं नाहीं. मग आपणाला जन्माचा कलंक लागला, असं तुम्ही कां ह्मणतां ?"

यमुनेचें हें भाषण वहिनीसाहेबांना पटत चाललें असावें असें दिसत होतें. कांहींच न बोलतां आशातुर दृष्टीनें त्या यमुनेच्या चेहऱ्याकडे पहात राहिल्या.

" वहिनीसाहेब !" यमुना पुढें बोलूं लागली. "दगडाच्या मूर्तीला परमेश्वर मानून आपण तिची पूजा करतों. आपली ती पूजा कुणाला पोहोंचते ? त्या दगडाला का परमेश्वराला ? वहिनीसाहेब, याप्रमाणंच तुह्मीं आपल्या पतीचीच पूजा केली आहे ! तुमची सारी पूजा तुमच्या पतींनांच पोहोंचणार ! परमेश्वराच्या दरबारांत हें असंच रुजू होणार, यांत शंका नाहीं."

वहिनीसाहेबांनीं डोळे मिटले. क्षणभरानें त्या ह्मणाल्या " तूं ह्मणतेस त्याबद्दल विचार करून पाहिला पाहिजे."

यमुना स्थिर दृष्टीनें वहिनीसाहेबांच्या चेहऱ्याकडे अगदीं लक्ष्यपूर्वक पाहूं लागली. वहिनीसाहेबांच्या मिटलेल्या डोळ्यांच्या पापण्या मधुनमधून थरथरत होत्या. त्यांचा श्वासहि मधुनमधून कंपित होत होता. मधुनमधून त्यांचें सर्व अंग थरथरत होतें !

याप्रमाणें कांहीं वेळ गेला. नंतर वहिनीसाहेबांनीं हळुहळू डोळे उघडले, व त्या एकसारख्या यमुनेकडे पाहूं लागल्या. त्यांच्या त्या कातर दृष्टींत कृतज्ञता पूर्णपणें भरून राहिली होती.

क्षणभरानें त्यांनीं यमुनेचा हात आपल्या हातीं घेतला, व क्षीण स्वरानें त्या ह्मणाल्या "होय, यमुताई ! तूं ह्मणतेस तें अगदीं खरं आहे. माझ्या मनाला तुझं ह्मणणं अगदीं पूर्णपणं पटलं. जगानं कांहीं ह्मटलं तरी मला कसलाच कलंक लागलेला नाहीं. मी पूर्ण निर्दोष आहें. माझी सारी पूजा तिकडच्या चरणींच रुजू झाली आहे."

यमुनेच्या अंगावर मूठभर मांस चढलें. ती ह्मणाली "आतां किती मला बरं वाटलं ह्मणून सांगूं, वहिनी-साहेब !"

"यमुताई, माझं जरा एक काम करतेस गडे ?"

"काय, वहिनीसाहेब ?"

"माझ्या बिछान्याखालचा चाव्यांचा जुगडा काढ बरं जरा. या इथं आहेत चाव्या."

यमुना उठली, व वहिनीसाहेबांनीं दाखविलेल्या जागीं हात घालून तिनें चाव्यांचा जुडगा काढला.

"यमुताई, माझं हें कपाट उघड जरा. ही रुप्याची चावी कपाटाची."

यमुनेनें वहिनीसाहेबांचें कपाट उघडलें.

"यमुताई, खालचा कपा ओढून त्यांतल्या डाव्या बाजूच्या खणाचं झांकण उघड. त्यांत अगदीं खालीं एक हस्तिदंती डबा आहे. तो घेऊन ये बरं जरा—"

वहिनीसाहेबांनीं सांगितल्याप्रमाणें यमुनेनें कपाटाचे खण वगैरे उघडून एक मध्यमाकृति हस्तिदंती डबा आणून त्यांच्या हातीं दिला. तो घेऊन वहिनीसाहेबांनीं अत्यंत भक्तियुक्त अंतःकरणानें आपल्या हृदयावर ठेवला.

यमुनेनें कौतुकानें विचारलें "यांत काय आहे हो वहिनीसाहेब?"

वहिनीसाहेबांनीं यमुनेला कांहीं उत्तर न देतां आपल्या कांपणाऱ्या हातांनीं हळुहळू त्या डब्याचें झांकण उघडलें. डब्यांत एका स्वच्छ हिरव्या रंगाच्या रुमालांत कांहीं बांधलेलें आहे, असें यमुनेला आढळून आलें. वहिनीसाहेबांनीं हळूच ती छोटी मोटली डब्यांतून बाहेर काढली, आणि डबा बिछान्यावर ठेवून त्यांनीं ती मोटली आपल्या हृदयावर ठेवली. नंतर त्यांनीं हळुहळू त्या मोटलीच्या गांठी सोडावयाला आरंभ केला.

मोटलींतून एक सोन्याचा छोटा फणीकरंडा व एक सुपारी बाहेर पडली!

यमुनेनें कुतूहलानें विचारलें "हें काय वहिनीसाहेब?"

वहिनीसाहेबांच्या ओंठावर मधुरस्मिताची किंचित् लकेर पसरली. त्या ह्मणाल्या "हा माझ्या लग्नांतला सौभाग्याचा हळदीकुंकवाचा करंडा बरं!"

"अन् ही सुपारी?"

"लग्नाच्या दुसऱ्या दिवशीं नवरा अन् नवरी सुपारी लपवतात ना? ही सुपारी तिकडून लपवायला झाली होती न् मीं ती पट्दिशीं शोधून काढली, तेव्हां काय हंसायचं झालं ह्मणतेस!"

वहिनीसाहेबांचें हें भाषण ऐकून यमुनेचे डोळे पाण्यानें अगदीं भरून आले. त्यांची उज्ज्वल पतिनिष्ठा पाहून त्यांच्याबद्दलचा तिच्या मनांतील आदरभाव शतपटीनें वृद्धिंगत झाला. मनांतल्यामनांत तिनें त्या महापतिव्रतेला वंदन केलें!

वहिनीसाहेबांनीं रुमाल बिछान्यावर टाकला, व त्याच्या सुरकुत्या त्या हळुहळू साफ करूं लागल्या. साफ करतांकरतां मध्येंच त्यांचा हात किंचित् जोरानें फिरून त्या आघाताबरोबर जवळची सुपारी फट्दिशीं कोठें उडाली, व खालीं पडून भरकन् कोठें नाहींशी झाली!

हें पाहून वहिनीसाहेबांचा जीव अगदीं खालींवर खालींवर होऊं लागला. त्या गडबडून जाऊन ह्मणाल्या "यमुताई, बघ बघ गडे—आण बरं कुठं गेली ती शोधून!"

यमुना पलंगाखालीं उतरली, व खालीं वांकून सुपारी शोधूं लागली. पण ती जी कोठें दडून बसली होती, ती तिला कोठें लवकर सांपडेना!

इकडे वहिनीसाहेबांनीं तर तिला "नाहीं का ग सांपडत यमुताई?" "कुठंच नाहीं का?" इत्यादि प्रश्न विचारण्याचा धूमधडाका चालविला होता.

शेवटीं, खालच्या हातरीच्या एका कोंपऱ्याखालीं ती लपून बसलेली सुपारी यमुनेला एकदांची सांपडली! "सांपडली हो वहिनीसाहेब!" असें ह्मणून हंसतहंसत तिनें ती आणून वहिनीसाहेबांच्या हातीं दिली.

वहिनीसाहेबांनीं ती सुपारी हातीं घेतली, व त्या तिच्याकडे अत्यंत स्नेह-प्रेम-भरित दृष्टीनें पाहूं लागल्या. जणूं काय, ती सुपारी नसून अतिशय किंमतीचा एखादा हिरा होता व तो किती तरी दिवस सांपडत नव्हता! याप्रमाणें कांहीं वेळ त्या सुपारीकडे पाहून, वहिनीसाहेबांनीं एकवार ती मस्तकावर ठेविली, आणि साश्रुनयनांनीं फणीकरंड्याबरोबर त्यांनीं ती रुमालांत पुनः घट्ट बांधून ठेवली. नंतर ती मोटली डब्यांत नीट चांगली ठेवून वहिनीसाहेब यमुनेला ह्मणाल्या "यमुताई, हा होता तिथं नीट ठेवून ये बरं गडे!"

यमुना डबा ठेवून, कपाट बंद करून परत येऊन पहाते तों वहिनीसाहेब डोळे मिटून पडल्या; असें तिला आढळून आलें. यमुना त्यांच्याजवळ व हळुहळू त्यांनां पंख्यानें वारा घालूं लागली

क्षणभरानें डोळे उघडून वहिनी "यमुताई, मला गडे झोंप येते ..."

" निजा-निजा !" असें म्हणून यमुना त्यांनां वारा घालूं लागली.

वहिनीसाहेबांनां लवकरच झोंप लागली. यमुनेनें त्यांच्या चेहऱ्याकडे निरखून पाहिलें-आज किती तरी दिवसांनीं त्या निद्रामग्न मुखमंडलावर शांतीची छाया विराजमान झाली आहे, असें तिला आढळून आलें.

प्रकरण बारावें.

इतिश्री !

वाड्यांत 'यमुना' नांवाची जी स्त्री वहिनीसाहेबांच्या आश्रयाला आहे, ती गणपतरावांची बायको, असें वमनरावांनीं आपल्या 'दौंडी'त जाहीर केल्यानंतर, थोड्याच क्षणांनीं ही वातमी गणपतरावांनांहि कळून चुकली. ती ऐकून त्यांच्या आश्चर्याला सीमाच राहिली नाहीं !

पांच सहा महिन्यांपूर्वी, आपली पत्नी सरस्वती चांदगांवाहून बापूराव इनामदाराबरोबर जी नाहींशी झाली, ती, कोणत्या घटनाचक्राच्या फेऱ्यामुळें, वाणशेंडीच्या इनामदारांच्या वाड्यामध्यें प्रविष्ट झाली, हें गणपतरावांच्या कांहीं केल्या लक्ष्यांतच येईना ! ही गोष्ट घडून येणें संभवनीय तरी कसें आहे, हेंच मुळीं त्यांनां कांहीं कळेना !

गणपतरावांनीं स्मरण करून पाहिलें, तों त्यांनां असें आढळून आलें, कीं, यमुनेचें नांव तर आपण पुष्कळ वेळां ऐकलें आहे; परंतु एक वेळहि तिला आपण कधीं डोळ्यांनीं पाहिलेलें नाहीं. यावरून आपल्या नजरेला कधींहि न पडण्याविषयीं यमुना मुद्दामच प्रयत्न करीत असली पाहिजे, असें त्यांनीं सहजच अनुमान केलें, आणि गणपतरावांचा हा तर्क अगदीं खरा होता.

या गोष्टीविषयीं विचार करीत असतां, गणपतरावांनां अतिशय कुतूहल वाटूं लागलें. त्यांची जिज्ञासाबुद्धि क्रमाक्रमानें अत्यंत तीव्र झाली. ही माहिती बरोबर मिळविण्याला कोणाला तरी ती विचारणें जरूर होतें; परंतु विचारणार कोणाला ? वाड्याच्या आंतला भाग त्यांनां आतां जन्माचाच बंद झाला होता ! मधुनमधून आचारी, वाढपी आणि इतर एक दोन नोकर त्यांच्याकडे कामाच्या निमित्तानें येतजात असत, नाहीं असें नाहीं; परंतु त्यांनां या बाबतीसंबंधानें कांहीं प्रश्न विचारणें हें गणपतरावांच्या मनाला मुळींच पटेना ! या हलकट मंडळींला ही माहिती विचारणें म्हणजे निष्कारण आपला अपमान करून घेणें, आणि गांवच्या गढूळ लोकगंगेला आपण होऊन भरती आणणें होय, असें गणपतरावांनां वाटत होतें.

चंपेबरोबर आपलें जें संभाषण झालें, जें वचन तिनें आपणाकडून घेतलें, त्याचें स्मरण आतां गणपतरावांनां झालें. वाड्यांतून निघून जाण्यापूर्वी चंपेची एकवार भेट घेण्याचें आपण कबूल केलें आहे खरें; परंतु आपलें तें वचन आपणाला कसें पार पाडतां येणार, याबद्दल त्यांच्या मनाला मोठें गूढ पडलें. चंपेनें आपणाकडून घेतलेल्या वचनाचा संबंध सरस्वतीशीं कांहीं तरी असावा, असें गणपतरावांनां आतां खात्रीपूर्वक वाटूं लागलें.

वहिनीसाहेबांची प्रकृति बरी आहे, त्यांच्या जीवाला आतां कांहीं धोका नाहीं, एवढेंच ऐकण्यासाठीं केवळ गणपतराव वाड्यांत राहिले होते; परंतु आतां, तसें ऐकल्यानंतरहि त्यांचा पाय वाड्यांतून बाहेर पडेना ! आपल्या हृदयाची अशी विलक्षण प्रवृत्ति कां व्हावी, हें गणपतरावांच्या कांहीं केल्या लक्ष्यांत येईना ! सरस्वतीबरोबर आपलें पुनर्मीलन व्हावें, असें त्यांच्या अन्तःकरणाला मुळींच वाटत नव्हतें. तशी त्यांनां बिलकूल इच्छाच नव्हती ! आणि जें कांहीं त्यांनीं ऐकलें होतें-आणि तें खरें असावें, असा त्यांचा दृढ विश्वासहि होता-त्यावरून तशी इच्छा त्यांनां असणें केवळ अशक्यच होतें; परंतु विवाहकालीं, अग्निब्राह्मणासमोर, मंत्रोच्चारपूर्वक, जिचें आपण पाणिग्रहण केलें, इतकीं वर्षें जिला आपली अर्धांगी, आपल्या जिवाचा कलिजा, असें आपण समजत होतों तिचें आतांपर्यंत झालें काय आणि तिचा शेवटीं परिणाम काय होणार, हें समजून घेण्यासाठीं गणपतरावांचें मन व्यग्र होऊन रहावें, यांत फारसें कांहीं नवल नव्हतें. तें मनुष्यस्वभावाला अनुसरूनच होतें. चंपेशीं आपली भेट कशी होते, हें त्यांनां कळेना, आणि तिची भेट घेतल्यावांचून तर त्यांनां वाड्यांतून बाहेर

जातां येईना. अशा विवंचनेंत गणपतराव असतां आणखीहि दोन दिवस गेले.

तिसऱ्या दिवशीं सकाळीं गणपतरावांनां अशी बातमी कळली, कीं, काकासाहेबांनां देवळालीला तार करण्यांत आली असून ते उद्यां येऊन पोहोंचणार आहेत; आईसाहेब आणि वहिनीसाहेब या तीर्थयात्रेला निघण्याची तयारी करीत असून, निघण्याचा दिवसहि मुकरर होऊन चुकला आहे !

ही बातमी ऐकून गणपतरावांनां वाटलें, 'मी वाड्यांतून बाहेर पडत नाहीं, ठरीठाम तळ देऊन बसून राहिलों आहें असें पाहून त्या दोघी इतक्या घाईघाईनें बाहेर पडत आहेत ! काय करणार ? ' स्थानत्यागेन दुर्जनः' या न्यायानें मला दुर्जनाला टाळण्यासाठीं त्यांनां स्वतःच्या स्थानाचाहि त्याग करून निघून जावें लागत आहे ! नाहीं, मला आतां येथून निघून जावयाला बिलकूल विलंब लावतां कामा नये ! '

असा विचार करून त्याच दिवशीं संध्याकाळच्या गाडीनें बाणथडीहून निघून जावयाचें, असें गणपतरावांनीं निश्चित केलें; आईसाहेब आपणाशीं अत्यंत निष्ठुरतेनें वागत नसून आपल्याविषयीं त्यांच्या अंतःकरणांत कांहीं तरी सदय सहानुभूति आहे खास; नाहीं तर त्यांच्या हुकुमानें आपणावरचा पहारा उठला नसता; दुसऱ्याहि अपमानांतून आणि पोलिसांच्या हातकड्यांतून आपली सुटका कधींहि झाली नसती हें त्यांनां माहीत होतें. ह्मणून गणपतरावांनीं मनाशीं असा विचार केला, कीं, आईसाहेबांनां अखेरचा प्रणाम करण्याकरितां जावें, आणि त्याच वेळीं चंपेची एकवार शेवटची भेट घेण्याविषयीं त्यांची परवानगी मागावी. आईसाहेब आपणाला नकार देणार नाहींत, असें त्यांनां खात्रीपूर्वक वाटत होतें.

स्नान वगैरे आटोपल्यानंतर गणपतरावांनीं आईसाहेबांकडे निरोप पाठवून त्यांच्या भेटीची परवानगी विचारली; आणि ती त्यांनां ताबडतोब मिळालीहि. त्यांनां आंत नेणाऱ्या नोकरानें, पहिल्या प्रथम जी खोली लागली, तींत गणपतरावांनां नेऊन बसविलें. थोड्याच वेळांत तेथें आईसाहेब आल्या.

गणपतरावांनीं पाहिलें, आईसाहेबांचा चेहरा मेघाप्रमाणें गंभीर असून त्यांची दृष्टि खालीं लागली होती. त्यांनां बसण्यासाठीं खुर्ची मांडलेली होती; परंतु त्या बसल्या नाहींत.

हलुहळू एकएक पाऊल टाकीत गणपतराव आईसाहेबांसमोर येऊन उभे राहिले. त्यांनां आतां हांक तरी कशी व काय मारावी, याबद्दल गणपतरावांनां मोठा विचार पडला. आपणाला 'आई' ह्मणून हांक मारण्याचा अधिकार आपल्यासारख्या महापातक्याला त्या देतील कीं नाहीं, याबद्दल गणपतरावांनां मोठी शंका होती.

हळुहळू गुडघे टेंकून, जमिनीला मस्तकाचा स्पर्श करून, गणपतरावांनीं आईसाहेबांनां प्रणाम केला. त्या वेळीं त्यांचें अंतःकरण अगदीं भरून आलें असून डोळ्यांतून पाण्याची धार लागली होती. क्षणभरानें त्यांनीं मोठ्या कष्टानें आपलीं आंसवें आवरलीं व खालीं नजर लावून ते ह्मणाले "माझ्या सर्व अपराधांबद्दल मला आपण क्षमा नाहीं का–"

गणपतरावांच्यानें पुढें बोलवेना ! साश्रु नयनांनीं, हात जोडून त्यांनीं आईसाहेबांकडे पाहिलें. आईसाहेबांच्या डोळ्यांतूनहि झरझरा आंसवें गळत आहेत, असें त्यांनां आढळून आलें.

हें पाहून गणपतरावांचा अश्रुप्रवाह दुप्पट वेगानें सुरू झाला. कंपित स्वरानें ते ह्मणाले "आपणाला 'आई' ह्मणून हांक मारण्यासारखी माझी योग्यता नाहीं. मी अधम, महापातकी आहें. जर आपली अनुमति मिळेल, तर आपल्या पायांची धूळ मस्तकावर ठेवून, आपला जन्माचा निरोप घेऊन मी इथून काळें तोंड करीन !"

आईसाहेबांचे ओंठ थरथरां कांपूं लागले. त्या ह्मणाल्या "बाळा–" यापेक्षां त्यांच्या कंठांतून दुसरा शब्दच उमटेना ! अश्रूंच्या जबरदस्त पुरापुढें, त्यांनां जें कांहीं बोलावयाचें होतें तें, कोठच्याकोठें पार वाहून गेलें ! पदरानें चेहरा झांकून घेऊन त्या एकसारख्या फुलून फुलून रडूं लागल्या.

आईसाहेबांचें हें दयाशील वर्तन पाहून गणपतरावांनां अतिशयच धीर आला. ते गद्गद स्वरानें ह्मणाले "मी आपणाला जितका हतभागी समजत होतों, तितका मी खरोखर नाहीं, असें दिसतें. मला आपला 'बाळ' असें ह्मणून, आपण मला आपणाला 'आई' या नांवानें हांक मारण्याचा अधिकार दिलात. आई, येतों तर मग !" असें ह्मणून गणपतरावांनीं आईसाहेबांसमोर साष्टांग नमस्कार घातला.

डोळ्यांवरून पदर काढून आईसाहेब सद्गदित कंठानें ह्मणाल्या "ये, बाळा, ये. माझा तुला पूर्ण आशीर्वाद आहे, कीं, तुझी बुद्धि धर्मापासून कधींहि चळणार

नाहीं. तूं पुनः पहिल्यासारखी सुखी हो, असाहि माझा तुला आशीर्वाद आहे."

असें ह्मणून आईसाहेब मागें वळून हळुहळू दरवाज्याकडे निघाल्या. दरवाज्याशीं जातांच त्या एकदम थांबल्या आणि मागें वळून ह्मणाल्या "थोडा वेळ थांब इथं. चंपाताई तुला येऊन भेटणार आहे."

चंपेची भेट घ्यावयाची गोष्ट गणपतराव अजिबात विसरूनच गेले होते!

गणपतराव सुमारें पांचएक मिनिटें तेथें बसून राहिले असतील, इतक्यांत चंपा तेथें आली. गणपतराव ज्या खुर्चीवर बसले होते तिच्याजवळच दुसरी खुर्ची होती. तिच्याकडे बोट दाखवून गणपतराव ह्मणाले "बसा, चंपाताई!"

परंतु चंपा बसली नाहीं. खुर्चीवर हात ठेवून ती उभीच राहिली. गणपतरावांनीं पुनः आग्रह केला तरी ती बसली नाहीं.

मृदु स्वरानें चंपेनें विचारलें "आपण आज का निघणार?"

"होय."

"केव्हां निघणार?"

"संध्याकाळच्या गाडीनें."

चंपा स्तब्ध राहिली. गणपतरावांनीं क्षणभरानें विचारलें "वहिनीसाहेबांची तब्येत आतां कशी काय आहे?"

"मी त्याबद्दल मोठ्या विचारांत पडले आहे केव्हांपासून!"

गणपतरावांनीं आश्चर्यानें विचारलें "ह्मणजे?"

चंपा ह्मणाली "आपणाला आतां बरं वाटतं आहे, आपली प्रकृति आतां झपाट्यानं सुधारत चालली आहे, असं वहिनीसाहेब लोकांनां खूब दाखवतात–पण माझा त्यांच्यावर विश्वास बसत नाहीं."

"कां बरें?"

"त्यांचं मनच त्यांनां आंतून पोखरीत आहे. वहिनीसाहेब ह्मणजे देवमाणूस. आपल्यासंबंधानं कुणाला तिळमात्रहि दुःख होऊं नये, अशी त्यांची इच्छा–ह्मणून आपली प्रकृति क्षणोक्षणीं झिजत चालली असतांहि आपण झपाट्यानं सुधारत चाललों आहों, असा त्या आविर्भाव आणतात अन् लोकं त्याला फसतात!"

गणपतराव ह्मणाले "परवांच ही मंडळी तीर्थयात्रेला निघणार असं ऐकलं मीं."

"हे, खरं आहे तें."

"पण प्रकृति इतकी खराब झाली असतां, शरीर इतकें दुर्बल झालें असतां तीर्थयात्रेला इतक्या घाईनें जाणें होईल का?"

"हें सारं सांगून सांगून आह्मा साऱ्यांच्या दातांच्या अगदीं कण्या झाल्या गणपतराव! पण कांहीं केल्या वहिनीसाहेब आमचं कुणाचंच ह्मणणं मुळीं मनावर घेत नाहींत."

"कां बरें?"

"जिथं आपली विटंबना झाली, तिथं राहूंच नये, असं त्यांच्या मनानं पक्कंच घेतलेलं दिसतं आहे."

"आईसाहेबांची संमति तरी कशी मिळाली त्यांनां?"

"वहिनीसाहेबांच्या मनानंच घेतल्यावर त्या तरी काय करतात बिचाऱ्या? वहिनीसाहेब ह्मणजे मनानं अतिशय खंबीर अशी बायको आहे. शिवाय, जागापालट अन् हवापालट केल्यानं सुनेला खरोखर बरंहि वाटूं लागेल, अशा कल्पनेनं आईसाहेबांनींहि आपली संमति दिली!"

"कुठं जायचें ठरवलें आहे?"

"एकदम काशीला!"

"इतक्या लांब? त्यापेक्षां नरसोबाची वाडी, नाशिक त्र्यंबक, असें जवळचें एखादें क्षेत्र कां नाहीं पसंत केलं?"

"आपल्या गांवापासून जितका लांबचा पल्ला गांठावा तितका बरा अशीच मुळीं वहिनीसाहेबांची इच्छा आहे."

गणपतराव क्षणभर गप्प होते. इतक्यांत चंपेनें विचारलें "बरं आपण कुठं जायचं ठरवलं आहे?"

"पहिल्यानें मुंबईलाच जावें असा विचार केला आहे."

"तिथंच का रहाणार कायम?"

"नाहीं. तिथून कुठें तरी जावें, असा विचार आहे."

"तें नाहीं अजून ठरलं वाटतं?"

"नाहीं–पुढचें पुढें पहातां येईल."

क्षणभर विचार करून चंपेनें विचारलें "सरस्वतीबाई याच वाड्यांत आहेत, हें ऐकलं आहे ना आपण?"

खालीं मान घालून गणपतराव ह्मणाले "हो–ऐकलें आहे."

"त्यांची काय व्यवस्था करणार आपण?"

"कसली व्यवस्था?" असें ह्मणून गणपतरावांनीं एक मोठा उसासा सोडला.

"ह्मणजे? लग्नाच्या बायकोची कांहींच का नाहीं व्यवस्था करायची बाई?"

खिन्न स्वरानें गणपतराव ह्मणाले "आपली व्यवस्था तर तिची तिनेंच, आपल्या मुखत्यारीनेंच करून घेतली आहे. मी आणखी तिची निराळी व्यवस्था काय करणार आहें? चंपाताई, तुह्माला ती सारी हकीगत ठाऊक आहे ना?"